अ६५

32

८०

३५.

स्थळप्रत

सं० १८८

श्री.

# नित्यानित्यविवेक

हा ग्रंथ

## राजाराम केशव कुळकर्णी

ब्रह्मचारी धारपुडीकर यांनीं

स्वतः रचून तयार केला

तो त्यांनीं व

## बलदेव चिन्नाप्पाशेट हलवाई सातारकर

यांनीं

पुणें येथें 'इंदिरा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

( सन १८६७ चे २५ वें आक्टाप्रमाणें नोंदून ग्रंथकर्त्यांनें
सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

शके १८२०—सन १८९८.

किंमत दोन रुपये.

श्रीदत्तप्रसन्न.



# प्रस्तावना.

मनुष्यांस पारमार्थिक ज्ञान प्राप्त करून देणारे बहुतेक ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले गेले आहेत व संस्कृत भाषा फारच थोड्या मनुष्यांस कळते, हें जाणून कांहीं महात्मे पुरुषांनीं त्या संस्कृत ग्रंथांचीं शब्दशः प्राकृत भाषेंत भाषांतरें केलीं; कोणी शब्दशः भाषांतर न करितां त्यांतील प्रमेय मात्र घेऊन ग्रंथांतील विषय भावीकजनांस उत्तम प्रकारें कळेल अशा बेताची ग्रंथरचना केली. अशा प्रकारें सत्पुरुषकृत प्राकृत बरेच ग्रंथ प्रसिद्ध झाल्यामुळें लोकांचा फायदाही पुष्कळ झाला. कर्म, उपासना व ज्ञान या तिन्हीं वेदांतील कांडांतील रहस्य उत्तम प्रकारें कळेल असे प्राकृत ग्रंथ म्हटले म्हणजे श्रीज्ञानेश्वरकृत ज्ञानेश्वरी व अमृतानुभव, एकनाथकृत एकनाथी भागवत, तुकोबा महाराजांनीं केलेले अभंगांचा गाथा, श्रीरामदासकृत दासबोध, वामन पंडितकृत यथार्थदीपिका, श्रीमुकुंदराजकृत विवेकसिंधु व श्री विष्णुबावा ब्रम्हचारीकृत भावार्थसिंधु इत्यादि पुष्कळ ग्रंथ आहेत.

हे ग्रंथ प्राकृत भाषेंत असून सर्वमान्य आहेत खरे, पण बहुतेक लोक असें ह्मणतात कीं, ते आह्मांस बरोबर समजत नाहींत. याचें कारण भाषेचें काठिण्य ह्मणावें तर ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे दोन ग्रंथ खेरीज करून बाकीचे पुष्कळ ग्रंथ समजण्यास योग्य अशा सोप्या भाषेंत आहेत. हे ग्रंथ लोकांस कां न कळावें? याचें कारण पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, हे सर्व ग्रंथ ओवीबद्ध आहेत व ओवीबद्ध ग्रंथ वाचण्याची अलिकडील कांहीं लोकांस संवय नाहीं व आवड नाहीं. दुसरें कारण असें आहे कीं, हे ग्रंथ वेदान्तपर असल्यामुळें ते सूक्ष्म-दृष्टीनें मननपूर्वक वाचिल्यावांचून अगर सत्पुरुषांचे मुखानें ऐकिल्या-वाचून त्यांतील रहस्य कळत नाहीं; व अशा रीतीनें कोणी कळकळीनें

ग्रंथावलोकन करीत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें ज्यांनीं श्रद्धापूर्वक ग्रंथ वाचिले अगर ऐकिले त्यांना या ग्रंथांपासून पुष्कळ फायदा झालेला आहे.

ज्यांना हे ओवीबद्ध ग्रंथ वाचण्याची संवय नाहीं, व चोहों-कडे नास्तिक वाद उत्पन्न झाला असल्यामुळें आशंकाच फार आहेत, अशा लोकांना त्यांचे संशय खंडन होऊन त्यांस ज्ञान प्राप्त व्हावें व आत्मज्ञानप्राप्तीनें त्यांचा उद्धार व्हावा म्हणून अलिकडील कांहीं सत्पुरुषांनीं गद्यात्मक असे कांहीं ग्रंथ रचिले आहेत. त्यांत आमचे सद्गुरु श्रीमत् परमहंस विष्णुबावा ब्रम्हचारी यांणींही वेदोक्त-धर्मप्रकाश व सेतुबंधनी टिका या नांवाचे दोन अपूर्व ग्रंथ रचिले आहेत. हे दोन्हीही ग्रंथ ज्यांनीं वाचिले आहेत ते असें सांगतात कीं, असे गद्यग्रंथ जर प्रथम वाचण्यांत आले तर त्यास कोणताही ओवी-बद्ध ग्रंथ समजूं लागेल, व आत्मज्ञान होईलच होईल. परंतु असे ग्रंथ श्रद्धापूर्वक वाचून ज्ञान होणें हें पुष्कळ अंशीं पूर्वपुण्य व रिकामपणाचे कालाचा सद्व्यय करणें या दोन गोष्टींवर अवलंबून आहे.

या वरील गोष्टी लक्षांत आणून व वेदान्त विषयावर गद्य ग्रंथ फारच थोडे आहेत असें जाणून हा नित्यानित्यविवेक नांवाचा लहानसा गद्यपद्यात्मक ग्रंथ आपल्या अल्प समजुतीप्रमाणें रचून सज्जनांपुढें मांडिला आहे.

**देशकालानुरोधेन वर्तितव्यं सदा बुधैः**

ही उक्ति मनांत आणून व सध्यां जगांत नास्तिक, पाखांडी, तार्किक व वेदबाह्य अशीं बरींच मतें उत्पन्न झालीं असल्यामुळें या मतवादी लोकांच्या संगतीचा परिणाम मुमुक्षूंच्या अंतःकरणांवर होऊन त्यांनाही वेदप्रतिपाद्यधर्मासंबंधानें व आध्यात्म विषयासंबंधानें पुष्कळ संशय उत्पन्न होतात; हें जाणून व मुमुक्षूंच्या शंका जाऊन त्यांना आत्मज्ञान-प्राप्तीचा मार्ग कळावा, व त्यांची आपल्या धर्मावर श्रद्धा वाढावी, अशा इरायानें या ग्रंथाची मांडणी खालीं लिहिल्याप्रमाणें केली आहे.

प्रथम सामान्य विचार दर्शिविते वेळीं कांहीं आशंका उद्भवल्या, त्यांचे निवारणार्थ नास्तिक व वेदब्राह्मतखंडन नांवाचें पहिलें प्रकरण लिहिलें. नंतर सामान्य वैराग्य उत्पन्न होऊन ज्ञानाविषयीं अभिलाष बुद्धि उत्पन्न झाल्यावांचून व प्रयत्न प्रारब्ध यांचा निर्णय कळल्यावांचून मनुष्याची बुद्धि अध्यात्मविषयांत प्रवेश करूं शकत नाहीं हें जाणून तद्बोधार्थ सारासारविचार नांवाचें दुसरें प्रकरण लिहिलें. सारासार विचार करून मनुष्य न्यायदृष्टीनें अथवा नीतीनें वागूं लागला म्हणजे त्याचें अंतःकरण शुद्ध होऊन तो आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यास योग्य होतो असें जाणून व त्यास संपूर्ण शरीरांतील तत्वांचा निर्णय कळून आत्मज्ञान प्राप्ति व्हावी म्हणून तिसरें आत्मज्ञान नांवाचें प्रकरण गुरुशिष्यसंवादरूपानें लिहिलें. शरीरांतील तत्वनिर्णय कळल्यावर ब्रम्हांडाचाही निर्णय झालाच पाहिजे व माया काय, ब्रह्म काय, सगुण काय, निर्गुण काय, मी कोण, जगत कोण, जीव कोण, ईश्वर कोण, नित्य काय, अनित्य काय, सगुणास भजावें,कां निर्गुणास ध्यावें, मूर्तिपूजा करावी कां न करावी इत्यादि सर्व महत्वांचे गोष्टींचा निर्णय झालाच पाहिजे हें जाणून तद्बोधार्थ चौथें विश्वाभास नांवाचें प्रकरण लिहिलें. पांचवें प्रकरण ओवीबद्ध रचिलें असून त्यास योगाभ्यासक्रम असें नांव दिलें आहे. या प्रकरणांत अद्वैत वेदान्तपर कांहीं भाग लिहिला असून शरीरशुद्ध्यर्थ आसनें कशीं करावीं, मानसपूजेचेयोगें व प्राणायामाचेयोगें षट्चक्र भेदन कसें करावें, बीजाकृति ध्यान, सगुण ध्यान, निर्गुण ध्यान कसें करावें, अनुहतध्वनि कसे श्रवण करावे, ते श्रवण करण्यापासून फळ काय, ध्यानोपदेश मंत्र, शापविमोचन मंत्र कोणते, ते केव्हां म्हणावे, त्रिबंध काणते, षण्मुखीमुद्रा कशी करावी, समाधि कशी चढवावी, ती उतरावी कशी वगैरे महत्वांच्या सर्व गोष्टी या प्रकरणांत लिहिल्या असून मुद्रादिकरून गुप्तमार्ग लिहिले आहेत. याशिवाय आणखी बऱ्याच गोष्टी लिहावयाच्या राहिल्या आहेत त्याचें कारण ग्रंथ विस्ताराचें भय. असो, याप्रमाणें या ग्रंथांत पांच महत्वाचीं

प्रकरणें लिहिलीं आहेत; तीं वाचकांनीं मननपूर्वक वाचल्यास ज्ञानाचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

हा ग्रंथ अगर वेदान्तपर असलेले अन्य ग्रंथ वाचून ज्यांना फायदा करून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं ग्रंथ वाचते वेळीं आपलेपाशीं चित्तास विक्षेप उत्पन्न करणारीं जीं कुबुद्धीचीं थट्टेखोर माणसें, तीं व मोह उत्पन्न करणाऱ्या स्त्रिया, लोभ उत्पन्न करणारीं मुलें इत्यादि असूं देऊं नयेत; व ग्रंथ वाचणें तो एकाग्र चित्तानें एकांताचे व रिकामपणाचे वेळीं अगर रात्रीं स्वस्थ चित्त असेल तेव्हां वाचावा. असें केल्यानें वाचणारांस ग्रंथांतील रहस्य जलद समजून त्यांस वाचण्याची गोडी उत्पन्न होते.

ज्यावेळीं आत्म्यासंबंधीं निर्णय वाचण्यांत येतो त्यावेळीं सुईचे नेड्यांत दोरा ओवीत असतां जसें एकाग्र चित्त असतें तसें एकाग्र अंतःकरण करावें, व ज्या ज्या वस्तूपासून आत्मा ह्मणजे आपलें स्वरूप भिन्न काढिलें असेल त्या वस्तूहून आपण ह्मणजे वाचणाऱ्या मुमुक्षूंनीं तात्काळ वेगळें निघावें. लिहिण्याचा भावार्थ कळत नाहीं असें वाटल्यास तेंच तें पुनः पुनः मननपूर्वक वाचल्यास कळूं लागतें. याप्रमाणें जो हा ग्रंथ अवलोकनांत आणील आणि वाचनाच्या पांच आवृत्त्या करील त्यास खात्रीनें आत्मज्ञान होईल. अशा रीतीनें वाचणाऱ्या मुमुक्षूंस आत्मज्ञान होऊन त्याचा तरणोपाय व्हावा असें ग्रंथकाराचें ईश्वराजवळ मागणें आहे.

सांप्रत जे वेदान्तपर प्राकृत ग्रंथ आहेत त्या बहुतेक ग्रंथांत शास्त्रीय व मोठमोठ्या शब्दांचा बराच भरणा केलेला आढळतो. या कारणामुळें अशिक्षित जनांस त्यांचा बोध व्हावा तसा न झाल्यानें ग्रंथांतील रहस्य कळत नाहीं; असें आमच्या कांहीं मित्र मंडळींनीं सुचविल्यावरून हा ग्रंथ जितक्या साध्या भाषेंत लिहितां आला तितका लिहिला आहे. आमचे परम पूज्य रा. रा. कृष्णलाला लाटकर यांचे उपदेशाचे योगें आत्मज्ञानामृत पिऊन निजानंदी रत झालेले परम

भगवद्भक्त रा. रा. बलदेव चिनाप्पाशेट हलवाई यांनीं आम्हांस वेळोवेळीं मदत करून ग्रंथ छापण्याचे कामीं उत्तेजन दिलें याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. हे गृहस्थ वेदान्त विषयाचे मोठे कट्टे भक्त असून त्यांचे अंगीं दयाळुपणा, शक्तिनुसारउदार-पणा, धैर्य, सुचिर्भूतपणा वगैरे गुण आहेत; व हे त्यांना भूषणावह आहेत. तसेंच हा ग्रंथ ज्या छापखान्यांत छापिला त्या छापखान्याचे म्यानेजर आमचे परम मित्र रा. रा. त्र्यंबक हरी आवटे यांणीं आमचा ग्रंथ होईल तितक्या थोडे खर्चात छापून दिला याबद्दल त्यांचेही आम्ही आभार मानितों.

रा. रा. गोविंद बाणोजी माजगांवकर सहुकार, रा. रा. नारायण सोनजी लब्धे मास्तर, रा. रा. अंताजी रामचंद्र बेंद्रे, रा. रा. गंगाराम गोविंद लाटकर हलवाई, इत्यादि सातारकर मंडळींनीं या ग्रंथाचें पांचवें प्रकरण छापण्याचे कामीं द्रव्यद्वारां योग्य ती मदत दिल्याबद्दल व रा. रा. लक्ष्मण विष्णु भिडे वकील राहणार सातारा याणीं कित्येक ठिकाणीं संस्कृत श्लोक तपासण्याचे कामीं मदत केल्ययाबद्दल ग्रंथकर्ता या सर्वांचा मोठा आभारी आहे.

ग्रंथकाराचा ग्रंथ रचण्याचा हा अगदीं पहिलाच प्रसंग असल्यामुळें, व ग्रंथकारास लेख लिहिण्याची मुळींच संवय नसल्यामुळें, तसेंच ग्रंथ तपासण्याचे कामीं सुशिक्षित मनुष्याची मदत न मिळाल्यामुळें ग्रंथांत शुद्धतेसंबंधीं बरेच दोष राहण्याचा संभव आहे. हें जाणून वाचकांनीं शुद्धतेसंबंधीं होणाऱ्या चुका माफ करून व विषयांचें महत्व लक्षांत आणून ग्राह्यांश तेवढा हंसक्षीर न्यायानें ध्यानीं आणून जसे निज बालकाचे बोबडे बोल पित्यास सुश्राव्य वाटतात तसें हें माझें अप्रौढ लेखन प्रिय करून ध्यावें अशी ग्रंथकाराची विनंति आहे.

**राजारामबावा ब्रह्मचारी धारपुडीकर ग्रंथकर्ता.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| सामान्य विचार. | १ |
| नास्तिक व वेदबाह्यमतखंडन अथवा प्रश्नोत्तर संवाद. | ३ |
| सारासार विचार. | ४९ |
| आत्मज्ञान अथवा गुरुशिष्य संवाद. | ७१ |
| विश्वाभास प्रकरण. | १३१ |
| योगाभ्यासक्रम प्रकरण. | २३४ |
| आसन निरूपण. | २९४ |
| षट्कर्म निरूपण. | २५४ |
| पिपिलिका ध्यानोपदेश. | २५९ |
| आधारचक्र ध्यानोपदेश. | २६८ |
| स्वाधिष्ठान चक्र ध्यानोपदेश | २७२ |
| मणिपूर चक्र ध्यानोपदेश. | २७४ |
| अनाहत चक्र ध्यानोपदेश. | २७७ |
| विशुद्धचक्र ध्यानोपदेश. | २७८ |
| अज्ञाचक्र ध्यानोपदेश. | २८० |
| सहस्त्रदलचक्र ध्यानोपदेश. | २८१ |
| प्राणायाम लक्षण. | २८२ |
| अनुहत ध्वनि निरूपण. | २८६ |
| मुद्रादि गुप्तमार्ग कथन. | २९७ |

# नित्यानित्यविवेक

## सामान्य विचार.

मनुष्याचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे संसारसंबंधीं कामें आटोपल्यानंतर जो रिकामपणाचा काळ मिळेल, त्या काळाचा सद्व्यय करणें हें आहे. एकाच वेळीं दोन कामें होत नसतात असा नियम आहे. मनुष्यास तर दोन कामें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आहारादि मनुष्याचे जीवित्वास अवश्य लागणारे विषय संपादन केल्यावांचून प्राणिमात्राचें चालत नाहीं; व संपूर्ण आयुष्य विषय संपादन करण्याकडे जर घालविलें तर त्याचें जें दुसरें कृत्य, संसारापासून मुक्त होऊन अक्षय सुख ज्यामध्यें आहे असा जो मोक्ष तो हस्तगत करून घेणें हें साध्य होणार नाहीं. ह्यामुळें अनंत कालपर्यंत जन्ममरणादि दुःखरूप फेऱ्यांत पडून दुःखें सहन करावीं लागतील. कारण संसारबंधनांत अगर देहबंधनांत असणारा जो जीव तो बंदिवान आहे व त्यास संसाराचीं कामें करीत राहणें हीच सक्तमजुरीची शिक्षा आहे. देह हा कारागृहांतील कोठडीप्रमाणें आहे. कारागृह मोडकळीस आलें असतां त्यांतील बंदिवान कैदी जसा दुसरे तुरुंगांत नेला जातो तसाच जीव हा देहरूपी कारागृह जीर्ण झालें असतां दुसऱ्या चौऱ्यायशीं लक्ष योनिरूपी कारागृहांत एकांतून दुसऱ्यांत नेला जातो; यासच मरण ह्मणतात. मरण ह्मणजे एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणें. निःशेष जगांतून नष्ट होणें असा मरण याचा अर्थ नाहीं; जर

मरण याचा अर्थ जगांतून पूर्ण नष्ट होणें असा असता तर मात्र मनुष्यास अवश्य करावें लागणारें कर्तव्य, संसार करणें किंवा विषय प्राप्त करून घेणें असें एकच ठरलें असतें. मग मोक्षप्राप्ति करून घेणें हें जें मनुष्याचें दुसरें कर्तव्य तें त्यास उरलें नसतें. परंतु तसें तर होत नाहीं. जीवाचें अस्तित्व अक्षय ( अज्ञाननिवृत्ति म्हणजे आत्मज्ञानप्राप्ति होईपर्यंत ) आहे. यामुळें मनुष्यांस संसारप्राप्तीहून अन्य कर्तव्य-कर्म आहेच असें ठरतें. जीवास जर संसारव्यतिरिक्त अन्य कर्तव्य आहे तर तें केव्हां करावें हा प्रश्न पुढें आलाच. अर्थात् रिकामप-णाचे वेळांत असा न्याय झालाच. कोणतीही गोष्ट दुसऱ्याचे मद-तीशिवाय होणें संभवनीय नाहीं, ह्मणून ज्यास ज्यास्त रिकामपण संसाराचीं कामें आटोपून राहतें, त्यानें त्या रिकामपणाचे काळांत संसारनि-वृत्ति अगर मोक्षप्राप्ति कशी होईल ह्यासंबंधीं विचारद्वारें प्रयत्न करून स्वतःचा फायदा करून दुसऱ्यास तो देण्याविषयीं प्रयत्न करणें हें त्याचें कर्तव्य आहे, ह्मणून ह्या ग्रंथाचें प्रयोजन सिद्ध झालें.

आतां कोणी ह्यावर असा प्रश्न करील कीं, देहपातानंतर पुनरपि जीवास जन्म आहे, व त्यामुळें त्यास पुनरपि सुखदुःखाचे भोगही भोगावे लागतील हें आपण कशावरून म्हणता ? तसेंच एका स्थि-तींतून दुसऱ्या स्थितींत जाणें यासच मरण म्हणावें व मरण म्हणजे जीवाचा अगदीं नष्टांश नव्हे, असें म्हणण्यास काय प्रमाण आहे ? कारण जगांत मरणानंतर कांहीं उरत नाहीं; म्हणून पाप, पुण्य, नरक, स्वर्ग, बंध, मोक्ष जीवास संभवतच नाहींत, जीवानें संसार करून आपल्या अस्तित्वांत फक्त संसारसंबंधीच सुख कमाविणें हेंच एक त्याचें कर्तव्य आहे, असें अलीकडील पुष्कळ विद्वानांचें मत आहे; करितां दुसरीं स्वानुभवास पटणारीं अशीं प्रमाणें जर द्याल तर मात्र जीवास देहपातानंतर सौख्यास साधनीभूत असें दुसरें कर्तव्य

आहे असें गृहीत धरतां येईल व आपल्या ग्रंथाचें प्रयोजनही सिद्ध होईल; म्हणून अशीं कांहीं स्वानुभवास पटणारीं प्रमाणें असल्यास दाखवावीं. ह्या वरील प्रश्नास उत्तर देण्याकरितां व जीवाचें संसार-व्यतिरिक्त कांहीं कर्तव्यकर्म आहे असें सिद्ध करण्यास पुढील मत-खंडन प्रकरण लिहिलें आहे. तें वाचल्यानें संपूर्ण शंकांचा खुलासा होईल.

---

# प्रकरण पहिलें.

## नास्तिक व वेदबाह्यमतखंडन.

### प्रश्नोतरसंवाद.

**प्रश्न**—जीवास पुनर्जन्म आहे असें कशावरून म्हणतां ? यास कांहीं स्वानुभविक व शास्त्रसिद्ध प्रमाणें आहेत काय ?

**उत्तर**—असा नियम आहे कीं प्रत्यक्षास आधार अगर प्रमाण नको. दासबोधांत दशम दशकाचे चतुर्थ समासांत रामदास म्हणतात.—

**प्रत्यक्षास आणि प्रमाण । निश्चयासि आणि अनुमान ॥**
**मार्ग सांडून आडरान । घेऊंच नये ॥ १ ॥**

जी वस्तु नेत्रांसमक्ष दिसते तिला प्रमाणांची अपेक्षा नसते. तसेंच मनुष्य जेव्हां मरतो तेव्हां त्याचा देह जो आपण पूर्वीं सचेतन पाहत होतों तोच मरणानंतर अचेतन स्थितींत पाहून कुडींतून (देहांतून) जीव गेला असें आपण म्हणतों, परंतु देह गेला असें आपण म्हणत नाहीं. जर जीव गेला असें म्हटलें तर अर्थात् जीवाचे जाण्यास आपण मरण म्हणतों असें सिद्ध झालें. कारण देह मेला म्हणावें तर तो नष्ट होत नाहीं; प्रेतरूपानें जीवाचे पश्चात् दृष्टीस पडतो. यावरून देहास सुद्धां मरण ( अगदीं नष्ट

होणें ) प्राप्त होतें असें नाहीं, त्यास मेला असें म्हटल्यानें एवढेंच घ्यावयाचें कीं, तो निरुपयोगी झाला. तो ज्या तत्वांचा झाला आहे त्यांपैकीं पृथ्वीशिवाय इतर तत्वें उडून जाऊन शेवटीं तो पृथ्वीरूपी तत्वांत, त्याचे अंतींची स्थिति जी मृत्तिका त्या मृतिकारूपानें मिळतो. यावरून देह देखील एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत गेला असेंच अनुभवसिद्ध होतें. देह जड असून दृश्य आहे म्हणून आपणांस त्याची रूपांतरदशा कळते.

जीव निराकार असून वायूप्रमाणें त्याचें रूप आहे त्यामुळें तो जातांना आपणांस दिसत नाहीं; म्हणून तो नष्ट झाला असा अर्थ नाहीं. तो जरी दिसत नाहीं तरी जसा वायु दिसत नसून भासतो, तसा जीव, देहाचें चलनवलन व श्वासोच्छ्वास करण्याचें काम बंद पडलें म्हणजे आपणास देहरूपगृहीं नाहीं, तो गेला असें कळतें. जीवाची शक्ति, जडवस्तूस सचेतन करून, देहद्वारें व्यापार चालविण्याची असते, ती जीवाबरोबर जाते, त्यामुळें नुसता अचेतन देहमात्र उरीं उरतो. यावरून जीव हा चैतन्य म्हणजे दुसऱ्यास चेतविणारा कोणी वेगळाच असला पाहिजे इतकें सिद्ध झालें. तसेंच देहाचें मरण म्हणजे रूपांतर व जीवाचें मरण म्हणजे स्थलांतर असेंही सिद्ध झालें. ज्याप्रमाणें मनुष्याचे देहांत असणारा प्राणवायु जीव गेल्यानंतर शरीरांत नसतो व दिसत नाहीं, एवढ्यावरून जसें आपणांस तो मेला असें म्हणवत नाहीं, परंतु तो निघून गेला असें निःशंकपणें लागवतें त्याचप्रमाणें जीवाचें जाणें वायुसारखें संभवतें, मरण संभवत नाहीं. जसा प्राणवायु देहाहून पृथक् आहे, तो देह नव्हे तसाच जीवही देह व प्राण ह्यांहून वेगळा आहे; तो देहही नव्हे व प्राणही नव्हे, इतकें अनुभवसिद्ध झालें. यावर आणखी शास्त्रीयप्रमाणें सांगतों म्हणजे ह्या विषयास अधिक पुष्टि येईल.

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥

भगवद्गीता अध्याय २ श्लोक १३.

जशी देहास किंवा शरीराला बाल्यावस्था जाऊन तारुण्यावस्था प्राप्त होते व तारुण्य जाऊन वृद्धावस्था प्राप्त होते, तशीच त्यास मृत्यूची अवस्था गेल्यानंतर पुनर्जन्म अवस्था प्राप्त होते. परंतु जे धीरवान् म्हणजे ज्ञानी पुरुष आहेत ते ' न मुह्यति ' म्हणजे पुनरपि जन्ममरणाचे फेऱ्यांत पडत नाहींत, मुक्त होतात. दुसरें याच अध्यायांतील प्रमाण, श्लोक २२.

वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥

ह्मणजे जीवात्म्याचा शरीराच्या नाशानें नाश होत नाहीं, परंतु तो एक वस्त्र टाकून दुसरें घ्यावें त्याप्रमाणें एक देह सोडून लागलाच दुसरा भोगसृष्टींतील भोगदेह कर्माप्रमाणें धारण करून पूर्वीचा देह ज्या तत्वांचा होता, त्याच तत्वांचा पण आकृतीनें मात्र भिन्न असा स्थूल देह धारण करितो. यावरून भगवद्गीतेंतील अ० १५ श्लोक ७,

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥

ह्या कृष्णोक्तिप्रमाणें जीव ईश्वरांश असून सनातन व अक्षय आहे असें सिद्ध झालें. ह्मणून प्राणिमात्रांस फक्त इहलोकींचेंच दुःखमय सुख संपादन करण्यांत काळ गमाविणें इष्ट नाहीं; असें समजून येईल.

प्रश्न—असें जर जीवास अक्षयत्व व पुनःपुनः जनन मरण आहे हें उघड सिद्ध होतें, तर मग हल्लींचे कांहीं विद्वान्, " मेल्यानंतर कांहीं उरत नाहीं म्हणून जीवास जन्ममरण संभवत नाहीं, जीवाचें अस्तित्व देह आहे तेथपर्यंतच असतें, पुढें नसतें, खुशाल

प्रापंचिक सुख भोगवेल तितकें भोगावें हेंच शहाणपण आहे" असें म्हणतात, तें काय आधारानें ? ते अगदीं का अविचारी आहेत ?

उत्तर--सांप्रतचे विद्वान् लोकांचें असें मत होण्यास कारण शोधिलें तर असें निघतें कीं, त्यांनीं वेदप्रतिपाद्यधर्माचा यथास्थित शोध केला नाहीं; कारण त्यांचा बहुतेक वेळ व्यवहारोपयोगी पडणाऱ्या इंग्लिश वगैरे भाषा शिकण्यांत गेल्यामुळें व त्यांचें मन दृश्यपदार्थशोधनज्ञानाच्या पूर्ण व्यासंगांत गर्क झाल्यामुळें ते तर्कशास्त्रावर विशेष अवलंबून राहतात. त्यांना असें वाटतें कीं, आम्हीं जो विचार केला तोच योग्य. त्यांच्या विचाराविरुद्ध कोणी गोष्ट काढिली कीं तिकडे ते लक्ष देत नाहींत. ते आपले विचार दुसऱ्यास सांगण्यास व गुरुत्व घेण्यास जितके तयार असतात तितके ते हा विषय खरा आहे, असें त्यावरील अपवाद खंडन करून सिद्ध करून देण्यास मुळींच तयार नसतात, ते सर्वांस वेडे समजतात; त्यांनीं अनेक धर्मांचीं मतें काय आहेत हें न पाहतां फक्त ऐकींव गोष्टीवरच विश्वास ठेविलेला असतो. त्यांना असें वाटतें कीं, जगांत जिकडे पाहावें तिकडे गोंधळ आहे; खरें कोणास कळत नाहीं; करितां आपणच स्वबुद्धीनें एक मत ठाम करावें व तें सर्वांनीं मान्य करून आमचे अनुयायी व्हावें. या त्यांच्या समजुतीप्रमाणें त्यांनीं स्वबुद्धीनें रचून कांहीं मार्गही स्थापन केलेले आहेत; आणि इतर जनांस वळवून आपले मतांचा प्रभाव पाडण्याचा ते प्रयत्न करीत आहेत; परंतु तो अद्यापि व्हावा तसा सफळ झाला नाहीं. हे मतवादी लोक एकामागून एक खालीं लिहिल्याप्रमाणें उत्पन्न झाले.

वेदप्रतिपाद्यधर्माचा सिद्धांत खोटा आहे हें दाखविण्याकरितांच वेदोक्त धर्माचे कांहीं भाग मानून व कांहीं स्वकल्पित रचून बौद्धादि मतें उत्पन्न झालीं. यासंबंधीं हकीकत पुढें याच प्रकरणीं देण्यांत

आली आहे. त्यांतच अगदीं अलीकडे ब्राह्ममत उत्पन्न झालें असून तें ख्रिस्ती मताधारें रचिलेलें आहे. या मताचा स्थापनकर्ता राजाराम मोहनराय हा होय. हें मत ब-याच अंशांनीं शीक लोकांचा गुरु नानक याच्या मताशीं मिळतें, यास सुमारें पांसष्ट वर्षें झालीं. हीं सर्व मतें वेदप्रतिपाद्यधर्माविरुद्ध असून वेदप्रतिपाद्य धर्मास निंदितात. पण वेदप्रतिपाद्यधर्मांत या मतवाद्यांच्या मतांचें नांव सुद्धां नाहीं; कारण वेदप्रतिपाद्यधर्म ईश्वररचित असून अनादि आहे. त्यामुळें ज्या वेळीं वेदप्रतिपाद्यधर्म झाला, त्या वेळीं हीं सर्व मतें नव्हतीं. अर्थात् या मतांचीं नांवें त्यांत सांपडत नाहींत. परंतु वेदप्रतिपाद्य-धर्माच्या कांहीं चालीरीति व वेदप्रतिपाद्यधर्माचें नांव हीं या सर्व मतांत आढळतात, यावरून हीं मतें अलीकडे बनावट झालेलीं आहेत असें सिद्ध झालें. जरी या मतवादी लोकांनीं आपल्या मतास धर्म हें नांव दिलें आहे तरी शहाणे लोक या मतवाद्यांच्या पंथास धर्म न म्हणतां नास्तिक अथवा पाखंडी मत म्हणतात. हीं सर्व मतें आहेत, धर्म नाहींत, हेंही सर्वांनीं लक्षांत ठेवावें. शिवाय अलीकडे इंग्लंड, वगैरे यूरोपीय राष्ट्रांत हजारों ख्रिश्चियन लोक सुद्धां हीं सर्व मतें आहेत व वेदप्रतिपाद्य धर्मच खरा आहे असें मानूं लागले आहेत, यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, हे सर्व विद्वान् मतवादी आहेत व ते वेदप्रति-पाद्यधर्माविषयीं पूर्ण अज्ञानी आहेत; त्यांचें जें मत तें नुसतें असत्याचें भांडार असून काल्पनिक आहे. त्यांनीं जरी ईश्वरास मान दिला नाहीं व देहपातानंतर कांहीं उरत नाहीं असें मानिलें, तरी ईश्वराची मानहानि होत नाहीं, व देहपातानंतरचें जीवाचें अस्तित्व नष्ट होत नाहीं, असें शहाण्यांनीं समजून, त्यांस अविचारीच मानावें; याशि-वाय निवळ नास्तिक म्हणजे परमेश्वरच मुळीं नाहीं असें म्हणणारे ही कांहीं लोक आहेत. ते तर या सर्व मतवाद्यांस व संपूर्ण धर्मास

केवळ झुगारून देतात. त्यांनीं नास्तिक शास्त्रसंबंधीं कांहीं नवीन ग्रंथ रचिले आहेत.

**प्रश्न**–वर सांगितलेल्या मतवादी लोकांपैकीं सर्वच ईश्वर नाहीं असें समजतात किंवा त्यांपैकीं कांहीं ईश्वराचें अस्तित्व मानितात?

**उत्तर**–बौद्ध, शीक, यहुदी, ख्रिस्ती व महंमदी वगैरे लोक आचारभ्रष्ट असून ईश्वरास मानितात; परंतु या सर्व मतवाद्यांतील कांहीं लोक व वेदप्रतिपाद्य धर्मांतील कांहीं लोक असे मिळून ईश्वर न मानणारे कांहीं लोक आहेत, त्यांस आम्हीं नास्तिक समजतों. जे ईश्वराचें अस्तित्व मानीत नाहींत त्यांस व जे मतवादी धर्मभ्रष्ट, आचारभ्रष्ट, व ज्ञानभ्रष्ट आहेत त्यांसही आम्ही नास्तिकच समजतों.

**प्रश्न**–ईश्वर नाहीं असें समजणारे जे नास्तिक त्यांचें सृष्टीचे उत्पत्तीविषयीं तसेंच सृष्टीचे संहाराविषयीं काय मत आहे? व जीवाची व्यवस्था देहपातानंतर ते कशी लावितात?

**उत्तर**–ईश्वर न मानणारे लोक असें समजतात कीं, पंचभूतें म्हणजे पृथ्वि, आप, तेज, वायु व आकाश हीं तत्वें असून अनादिसिद्ध आहेत. त्यांस नियंता नाहीं. या पंचमहाभूतांचें संमेलन अशा कांहीं प्रमाणानें होतें कीं, त्यांचें संयोगजन्यकार्य प्राणिमात्रांचें शरीर होतें. देह झाला म्हणजे त्या देहामध्यें अशा कांहीं प्रमाणानें या पंचभूतांचे अंश येतात कीं, त्या पंचभूत अंशांचें संयोगजन्य कार्यच चैतन्यस्थितीप्रत पावतें. त्या चैतन्यास ते जीव, आत्मा इत्यादि समजतात. आणखी असेंही समजतात कीं जर पंचभूतांचें कार्य देह आहे, व देहजन्यकार्य चैतन्य आहे तर मग जीव देहाहून वेगळा नाहींच. देहरूपी पंचभूतकार्याचे क्रमेंकरून कांहीं अंश कमी झाले म्हणजे चैतन्यरूपी कार्य नष्ट होतें; व पृथ्वीचा अंश पृथ्वीवर पडतो; व बाकी चार भूतांचे अंश चार भूतांत मिळून जातात. अशा रीतीनें

उत्पत्ति होणें, व लय होणें हा सृष्टीचा स्वभाव आहे. देह उत्पन्न होऊन, त्यांत कामविकार उत्पन्न होणें व स्त्रीपुरुषांच्या युग्मापासून मनुष्याची उत्पत्ति होणें हाही सृष्टिस्वभावच आहे. चुना, हळद व पाणी ह्या तीन वस्तु एकत्र केल्या म्हणजे त्यांचें संयोगजन्यकार्य तिसराच तांबडा रंग उत्पन्न होतो तसेंच पंचमहाभूतांचें संयोगजन्यकार्य तिसरें चैतन्य उत्पन्न होतें, व त्या चैतन्याचें आद्यरूप जडपंचभूतें हेंच होय. ह्या चैतन्यास जिव असें म्हणावें. हें जीवरूपीकार्य नाश झाल्यानंतर मागें कांहीं उरत नाहीं. मग पापपुण्य तें काय? तें कोणी भोगावें? परमार्थ तो कसचा? सर्व थोतांड आहे. हें वेड कांहीं मूर्ख मनुष्यांनीं उगीच स्थापित केलें आहे. अशा रीतीनें ईश्वर न मानणाऱ्या लोकांचें मत व सिद्धांत आहे. त्यामुळें ते अक्षय विषयलंपट व अविचारी झाले आहेत.

**प्रश्न**—या नास्तिक मताचें खंडन होत नाहीं काय? होत असल्यास हा नास्तिकवाद खंडन करून आमचे मनास आस्तिक्य द्यावें म्हणजे आम्हांस तुह्मी सांगतां त्या धर्माप्रमाणें मत ठाम करण्यास बरें पडेल.

**उत्तर**—नास्तिकांचें म्हणणें आहे कीं, मानवी सृष्टि निर्माण करण्यास कोणी ईश्वरादिक आधार नाहीं. मानवी सृष्टि ही पंचमहाभूतांच्या सहज स्वभावाचें संयोगजन्य कार्य आहे. याचप्रमाणें संपूर्ण प्राणिमात्रांचीं शरीरें हीं पंचमहाभूतांचें संयोगरूपी कार्यच आहे. जगाचा कर्ता कोणी नाहीं व केलेल्या कर्माचा देहान्तीं नाशच आहे. भोक्ता कोणी उरत नाहीं व पुनर्जन्मही नाहीं. या नास्तिक मतांपैकीं प्राणिमात्रांचीं शरीरें हीं पंचमहाभूतांपासून झालेलें कार्य आहे हा सिद्धांत आस्तिकास मान्य आहे. कारण वेद-

प्रतिपाद्यधर्मांत हा देह पंचमहाभूतांच्याच अंशांचा मिळून झालेला आहे असें स्पष्ट लिहिलेलें आहे; व त्याप्रमाणें अनुभवही आहे. कारण साक्षात् पंचमहाभूतें देहांत स्पष्ट दिसतात. परंतु त्यांचे आमचे मतांत फरक तो एवढाच आहे कीं, पंचमहाभूतांपासून देह होतो तथापि देहरूप धारण करण्याचा गुण पंचमहाभूतांच्या आंगचा स्वभाव नसून, पंचमहाभूतांचा देह होणें, हा पंचमहाभूतांत ईश्वरी नियम आहे. पंचमहाभूतें स्वतंत्र नसून तीं ईश्वराच्या आकर्षणशक्तींत गुंतलेलीं म्हणजे आकर्षिलेलीं आहेत. म्हणून सृष्टि-व्यापार सुरळीत चालला आहे. नास्तिकमतांत असा ईश्वरी नियम मान्य नाहीं; कारण ते ईश्वराचें अस्तित्वच धरीत नाहींत. म्हणून त्यांचे मतास अपवाद पुष्कळ येतात, व त्यांस प्रश्न केले असतां निरुत्तर होणें भाग पडतें. नास्तिकांस आमचा असा एक प्रश्न आहे कीं, आपल्या ह्मणण्याप्रमाणें पंचमहाभूतांपासून आपोआप कधीं मनुष्य अगर पशुपक्ष्यादि प्राण्यांपैकीं एखादा तरी चुकून उत्पन्न झाल्याचें उदाहरण आपणांस आढळून आल्याचें स्मरतें काय ? अगर कोठें मनुष्य युग्माखेरीज ह्मणजे मैथुनादिक क्रिया केल्याशिवाय प्राण्याची उत्पत्ति झाल्याचे लेख लिहिलेले आठवतात काय ? ह्यावर नास्तिक निरुत्तर होतो, व कांहीं तरी बोलावें ह्मणून बोलतो कीं, असले लेख जरी आढळून आल्याचें स्मरत नाहीं, तरी मनुष्यापासून मनुष्य उत्पन्न होतो असें स्पष्ट दिसून येतें. यावरून मनुष्यास ईश्वर उत्पन्न करितो असें ह्मणतां येत नाहीं. ह्मणून पंचमहाभूतात्मक मनुष्यशरीरापासून पंचमहाभूतात्मक मनुष्यांचीं शरीरें उत्पन्न होतात असें उघड दिसतें, म्हणून आम्हीं असें म्हणतों. ह्यावर आस्तिक त्यास उलट विचारितो. अरे नास्तिका, जरा शुद्धीवर ये व बोल. अरे, मनुष्यापासून मनुष्य उत्पन्न होतो हें तूंच सांगावयास नकोस.

[library stamp]

तें आठ वर्षांच्या बालकासही कळेल. तूं यांत अधिक काय सांगतोस ? तुला असें विचारणें आहे कीं, मनुष्याची अगर कोणत्याही प्राण्याची उत्पत्ति ही प्रथम ज्यावेळीं नुसतीं पंचमहाभूतेंच होतीं, त्यावेळीं ह्मणजे सृष्टीचे आरंभीं कशी झाली ? तेव्हां मनुष्यास आदि मनुष्य नव्हते. या दोन प्रश्नांचीं उत्तरें देतांना नास्तिकास पळ काढावा लागतो. आतां नास्तिकांचा तिसरा मुद्दा असा आहे कीं, चुना हळद, व पाणी हे निरनिराळे जिन्नस एकत्र केले म्हणजे जसें या तीन पदार्थांचें संयोगजन्यकार्य चवथा निराळाच तांबडा रंग उत्पन्न होतो, तसेंच पृथ्वि, आप, तेज, वायु इत्यादि तत्वें एकीकरण पावल्यानें त्यांचें संयोगजन्यकार्य निराळेंच चैतन्य उत्पन्न होतें. तोच जीवरूपी आत्मा आहे. हा जीव संयोगरूपीकार्य असल्यामुळें देहाच्या नाशांनीं ह्मणजे कारणाच्या अभावीं नष्ट होतो. त्यावर आस्तिक विचारतो. अरे नास्तिका, तूं म्हणतोस त्याचा विचार कर. अरे चुना, हळद व पाणी ह्या तिन्ही वस्तु एकत्र केल्या असतां तांबडा रंग बनतो हें बरोबर आहे. परंतु हा तुझा दृष्टांत चैतन्यास जुळत नाहीं. कारण चुना, हळद व पाणी हे तिन्ही पदार्थ जड असून त्यांचें संयोगजन्यकार्य जो तांबडा रंग तोही जडच आहे. हें सजातिय वस्तूपासून सजातीयकार्य उत्पन्न झालें; तसें चैतन्याच्या उदाहरणांत होत नाहीं. कारण पंचमहाभूतें जड पदार्थ आहेत. तेव्हां पंचमहाभूतांचें संयोगजन्यकार्य जडच उत्पन्न झालें पाहिजे. तसें येथें होत नाहीं चैतन्य तर जडास अगदीं विजातीय आहे. तेव्हां चैतन्य हें जडाचें अगदीं विरुद्ध व विजातीय कार्य कसें उत्पन्न झालें याचें उत्तर दे. यावर नास्तिक निरुत्तर होतो. येणेंप्रमाणें नास्तिकवाद अतिशय घातक व अज्ञानावरण जास्तच वाढविणारा आहे.

**प्रश्न**—आणखी नास्तिकाचे कांहीं सिद्धांत आहेत काय? असल्यास ते कृपा करून सांगावे.

**उत्तर**—होय, नास्तिकांचे आणखी निःसत्त्व असे पुष्कळ सिद्धांत आहेत. पण ते सर्व खंडन होतात. वेदप्रतिपाद्यधर्माच्या सत्यवादापुढें ते टिकत नाहींत. त्यांतील कांहीं सिद्धांत आणखीं सांगून त्यांचे खंडन करून दाखवितों म्हणजे लक्षांत येईल. नास्तिकाचा आणखी असा एक प्रश्न आहे कीं, मनुष्याची उत्पत्ति वीर्यापासून होते व वीर्यांत जर जीव असतो तर तो वीर्य पुसून टाकिलें असतां कोठें जातो? पतन झालेलें वीर्य जसें पुसून टाकावें, तसेंच मरण आहे. ह्यावर आस्तिक उत्तर देतो. अरे नास्तिका, तूं किती वेडा आहेस, पहा, पुरुष व स्त्री हीं नित्य रममाण होऊन त्यांचें वीर्य पतन पावतें, परंतु तें वीर्य जरी पुसून टाकिलें नाहीं, तरी त्या नित्य पतन पावणाऱ्या वीर्यांत जीव नसतो. परंतु ईश्वरी नियमान्वयें जेव्हां दुसऱ्या एखाद्या योनींतून जीव मोकळा होऊन त्यास पुनर्जन्म धारण करण्याचा योग येतो तेव्हां पुत्र इच्छिणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या मैथुनांतीं पुरुषाचें रेत स्त्रीचे गर्भाशयांत शोणिताशीं ऐक्य पावतें व नंतर तो जीव पूर्वकर्मानुसार त्या वीर्यामध्यें मातापितरांच्या श्वासामधून अगर अन्नोदकाशीं ऐक्य होऊन प्रवेश करितो, असा अनुभव आहे. पहा, व्यवहारांत, पुष्कळ स्त्रीपुरुष नित्य संतति व्हावी अशा इच्छेनें रममाण होतात, परंतु कित्येक वर्षें त्यांस संतति होत नाहीं, असें जगांत दिसून येतें. यावरून वीर्यांत जीव असतो, तो वीर्य पुसल्यावर कोठें जातो? ह्या तुझ्या प्रश्नाचें संतोषकारक व पूर्ण उत्तर देऊन तुझ्या प्रश्नाचें खंडन केलें. विचार कर म्हणजे तुला कळेल कीं, पुरुषास संतति प्राप्त होण्याची वेळ आली म्हणजे, जीव प्रथम बापाचे देहांत त्याचें घ्राणेंद्रियद्वारा श्वासांतून आंत प्रवेश करितो. अगर बापाचे भोजनाचे

वेळीं अगर पाणी पिण्याचे वेळीं तो, देह धारण करण्यास आलेला जीव त्या अन्न अगर पाणी या पदार्थाशीं मिश्र होऊन प्रथम बापाचे देहांत प्रवेश करितो. नंतर बापाचे पोटांतील रेतास आकर्षण करणें व आईच्या पोटांत वृद्धि होण्यास जाणें, या गोष्टी साधण्याकरितां कामोत्पत्तीच्या वेळेस जन्मास येणाऱ्याचा जो वासनात्मक लिंगदेह आहे, तो पित्याचे रेतास आकर्षण करून पितारूपी पुरुषाचे संकल्प मैथुनांतीं नांहींसे करून, आईच्या गर्भकमलांत शिरून जन्म घेतो. जशीं केळीच्या कोंबांत सूक्ष्म केळीं व पानें आहेत, तसेंच रेताचे आंत जन्मास येणाऱ्याचा सूक्ष्म लिंगदेह व अहंपण धरणारें ज्ञान असतें, ह्मणूनच तें उदयास येतें. जसा बीजांत अनुद्भूत वृक्षाकार अव्यक्त असतो, म्हणूनच बीजापोटीं वृक्ष उत्पन्न होतो याच न्यायानें हें समज. यावर नास्तिक ह्मणतो, हो हो ! समजलों!! बीजांत वृक्ष नसता तर बीजापोटीं वृक्षोत्पत्ति झालीच नसती. बीजांत वृक्ष असेल तरच विस्तार पावेल. तद्वतच रेतांत ज्ञानरूपी जाणीव, बीजांत वृक्ष या न्यायानें असलीच पाहिजे, यावरून आस्तिकपण यथार्थ व खरें आहे. असा वादविवाद ऐकून नास्तिकांचे पुष्कळ आस्तिक झाले आहेत व पुढेंही होतील.

कित्येक नास्तिक म्हणतात कीं, मेंदू आहे म्हणून ज्ञान संभवतें मेंदू बिघडला ह्मणजे ज्ञान नष्ट होतें. परंतु हें बोलणें अगदीं वेडेपणाचें आहे. कारण मेंदू हा विचार करण्याचें द्वार असल्यामुळें मेंदूच्या बिघडण्यानें ज्ञान बिघडत नसून स्मरणशक्ति किंवा विचारशक्ति मात्र बिघडते. म्हणून वेडा झालेल्या मनुष्यास सुद्धां पुनर्जन्म आहे व सुखदुःखाचे भोगही आहेत. या वेळीं नास्तिक निरुत्तर होतो.

आणखी नास्तिक लोक असें म्हणतात कीं, परमाणु हे अनादिसिद्ध आहेत व अशीं परमाणुरूपी अविनाशि त्रेसष्ट तत्वें आहेत. त्यांना एकजातित्व नाहीं. हें त्यांचें म्हणणें अगदीं चुकीचें आहे.

कारण हे संपूर्ण परमाणु जड आहेत, व त्यांच्या अंगीं नियमित रीतीनें एक स्थळीं अगर अनंत स्थळीं राहण्याची शक्ति नाहीं. या गोष्टीचा सूक्ष्म विचार केला असतां असें कळून येतें कीं, सर्व परमाणूंत एक प्रकारची गुरुत्वाकर्षणशक्ति आहे. तिचा परमाणूंच्या आद्यंतीं नाश होत नाहीं, म्हणजे परमाणु नाश पावले तरी शक्तीचा नाश होत नाहीं. यावरून गुरुत्वाकर्षणशक्ति ही परमाणूंहून भिन्न असून तिच्या अंगीं परमाणूंचें नियमन करण्याचें सामर्थ्य आहे असें सिद्ध झालें. अर्थात् परमाणूंहून भिन्न असणारी ही गुरुत्वाकर्षणशक्ति हें परमाणूंहून दुसऱ्या कोणत्याही तत्वाचें कार्य अगर गुण असला पाहिजे. ही शक्ति, ज्या तत्वाचा गुण आहे तें तत्व या शक्तीहून अगदीं भिन्न असलें पाहिजे अशा प्रकारें अनंत ब्रम्हांडगोलास अगर अनंत परमाणुरूपी सृष्टीस ज्या तत्वानें आपल्या आकर्षणशक्तीनें समतोल तोलून धरलें आहे, तें तत्व काय आहे, असा नास्तिकास आमचा प्रश्न आहे. हा प्रश्न आस्तिकानें नास्तिकांच्या डोक्यांत जेव्हां घातला तेव्हां नास्तिकांपैकीं कांहीं लोक असें समजूं लागले कीं, पंचमहाभूताहून व गुरुत्वाकर्षणशक्तीहून भिन्न असें एक तत्व आहे, त्यालाच ज्ञान म्हणावें. असें नास्तिकांस आस्तिकपक्षानें अस्तित्व सिद्ध करून दाखविलें, तरी पण नास्तिक लोक हटवादी असल्यामुळें जरी नास्तिकमत खंडन होऊन आस्तिक पक्ष खरा ठरला, तरी ते मतवादी म्हणतात तुमचा ईश्वर आम्हांस दिसत नाहीं, असल्यास दाखवावा, म्हणजे सृष्टीस कोणी नियंता आहे असें आम्ही सिद्ध धरूं, व ईश्वरास भजूं. असे बहुत प्रकारें नास्तिकवादी आस्तिक बनत चालले आहेत व साकांक्ष होऊन कधीं नास्तिकवाद करितात, कधीं आस्तिकवाद करितात व संकटसमयीं चोरून ईश्वरोपासनाही करितात. अशाच तऱ्हेचे जगांत नास्तिक आहेत. त्यांच्यावर कोणीं विश्वास ठेवूं नये. हे नास्तिक लोक

अंतरीं ईश्वर असावा असें समजतात; व बाह्यात्कारीं मात्र वितंडवाद घालितात; असें मी स्वतःचे अनुभवावरून स्पष्ट सांगतों. त्यांच्या बुद्धीचे ठिकाणीं ईश्वराचें अस्तित्व वास करूं लागल्या वेळेपासून ते आस्तिक पक्षास नेहमीं प्रश्न करितात, परंतु साधारण ईश्वरोपासक भाविक मनुष्यांस त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास सामर्थ्य नसतें. या कारणानें त्यांना अस्तिकांपेक्षां बोलण्यांत श्रेष्ठत्व प्राप्त होऊन जास्तच वाद करावासा वाटतो. वाद करते वेळीं भाविक मनुष्यापुढें ईश्वराच्या अस्तित्वासंबंधानें त्यांचे नेहमीं जे प्रश्न येतात, त्या प्रश्नापैकीं ठोकळ मुद्याच्या प्रश्नांचे खंडनार्थ या स्थळीं नास्तिक व आस्तिक यांचा संवाद देतों.

ना०—कां हो भगवद्भक्त, तुमचा ईश्वर कसला आहे, हें सांगा तर खरें!

आ०—आमचा ईश्वर आहे तसाच आहे. त्यांत सांगण्याजोगें काय आहे व तुम्हांस आमच्या ईश्वराशीं काय करावयाचें आहे?

ना०—अहो भगवद्भक्त, रागावूं नका, आम्हीं आपले सहज विनोदानें पुसतों. तुमच्या ईश्वराशीं आम्हांस कांहीं करावयाचें नाहीं; फक्त तुम्हापाशीं ईश्वर आहे, असें मानण्यास काय आधार आहे हें आम्हांस समजून घ्यावेंसें वाटतें म्हणून विचारतों.

आ०—आम्हांस राग आला तर शहाण्या माणसाचाच येतो. ज्या कोणांस यथार्थ ज्ञान नाहीं, अशा माणसांवर आह्मीं राग ठेवीत नाहीं. कारण अज्ञानी माणसांवर राग ठेवणें ह्मणजे साप ह्मणून भुई धोपटण्यासारखें निष्फळ आहे.

ना०—एकूण तुह्मीं शहाण्या माणसांचे द्वेष्टे आहांत! तुह्मीं ह्मणतां, आह्मीं शहाण्या माणसांवर रागावतों, अज्ञान्यांवर नाहीं. हें आपलें बोलणें आपणांस योग्य दिसतें काय?

आ०—कायरे तुझी ही समज! अरे, रागावणें म्हणजे कांहीं द्वेषबुद्धीचें नसतें. आम्हीं शहाण्यावर रागावतों म्हणजे त्यांचा द्वेष करितों असें नाहीं. शहाण्या माणसांवर आम्हीं रागावतों याचें कारण आमची त्यांजवर प्रीति असते व राग म्हणजे प्रीति. आमची शहाण्या मनुष्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा असते, म्हणून त्यानें कधीं एखादी वेळें होऊन चूक केली म्हणजे आम्हीं त्यास रागें भरतों व तोही आमचे रागावण्यास मान देतो. यामुळें आमचें परस्परांशीं प्रेमच जडतें,अप्रेम होत नाहीं. अज्ञान्यावर आमची प्रीति नसल्याकारणानें त्यानें आम्हांस चार शिव्या जरी दिल्या तरी त्याकडेस आम्हीं लक्ष पुरवीत नाहीं. कारण त्याकडेस जर आम्हीं लक्ष पुरविलें म्हणजे त्यावर रागावलों तर तो अन्यायानें आमचा वैरी बनून मत्सर करील. यांत आमचा फायदा तर नाहींच पण उलट त्रास मात्र आहे. म्हणून आज्ञान्यांवर आमचा राग नसतो म्हणजे प्रीति नसते व प्रीति नसते म्हणून द्वेषही नसतो. असा माझे बोलण्याचा मथितार्थ आहे असें समज.

ना०—एकूण जर आपणास माझे बोलण्याचा राग आला नाहीं, तर आपण मला मूर्ख व अज्ञानी समजतां असें झालें!

आ०—तें कांहीं समज, व्यर्थ तुजबरोबर बोलण्यांत वेळ मात्र जाईल. आम्हीं आतां जातों, माफ कर.

ना० —( आस्तिक जावयास निघाला असें पाहून ) अहो, थोडे थांबा. आम्हीं व्यर्थ बोलणें काढीत नाहीं. परंतु आम्हांस आपणांपासून विशेष कांहीं कार्य करून घ्यावयाचें आहे, म्हणून मी आपणांस थांबा म्हणतों.

आ०—तुम्हांस मला काय विचारावयाचें आहे तें विचारा लौकर. पण मी जें सांगेन तें विवेकानें ऐकून घेण्याचें कबूल कराल तर विचारा.

ना०—होय, मी आपण जें सांगाल तें विवेकानें ऐकून घेईन. ( मनांत म्हणतो, आपण कांक्षा विचारतां विचारतां या बुवास घोटाळ्यांत आणूं व आपण चांगले बुद्धिमान् आहों हें त्याचे प्रतितीस आणून देऊं. )

आ०—तर मग विचार, शहाण्यांचे आम्ही दास आहों.

ना०—आपण ईश्वर आहे असें कशावरून म्हणतां, व तो असल्यास कसला आहे हें कृपा करून सांगा.

आ०—(मनांत—या नास्तिकाची नेहमीं हरएक मनुष्याशीं रिकामी वटवट असते. आपलाच थोडा वेळ गेला तरी हरकत नाहीं, पण याची एक वेळ खोडच मोडली पाहिजे. ) अरे, ईश्वर आहे असें आम्हीं तुझे व माझे अस्तित्वावरून आणि तूं ईश्वराची वाटाघाट करीत आहेस यांवरून तसेंच माझ्या स्वानुभवावरून व वेदादिग्रंथावरून व भक्तांस ईश्वराचे साक्षात्कार होतात त्यावरून व ज्यास ज्ञानरूपी नेत्र आहेत त्यांना तो दिसतो यावरून आम्हीं ईश्वर आहे असें समजतों. हें आमचें समजणें केवळ मानीव नसून स्वानुभवसिद्ध आहे समजलास! तुझे आज जेवढे प्रश्न असतील तेवढे विचार. कांहीं शिल्लक ठेवूं नको.

ना०—तुह्मांस जास्त विचारावयास जावें तर तुम्हीं प्रश्नांचा तिरस्कार करून निघून जाल या भीतीनें जोरदार प्रश्न विचारण्यास मी भितों. आतां आपणच परवानगी देत असाल, तर विचारतों.

आ०—खुशाल विचार, मजकडून कांहीं अडथळा नाहीं.

ना०—आतांच आपण म्हणाला कीं, ज्यास ज्ञानरूपी नेत्र आहेत त्यास ईश्वर दिसतो; मग आम्हांसच कां दिसत नाहीं ? आम्हांस कां ज्ञान नाहीं ?

आ०—अरे, तुला ज्ञान आहे, सर्व कांहीं आहे परंतु तें असून नसल्यासारखेंच आहे असें समज.

ना०—या आपल्या बोलण्याचा भावार्थ मला कळत नाहीं. मला ज्ञान आहे असें आपण ह्मणतां तर मला परमेश्वर दिसलाच पाहिजे. आपण माझे ज्ञानास "असून नसून सारखेंच," असें काय कारणानें बोलला ? हें कृपा करून सांगा.

आ०—तुला ज्ञान आहे, पण तें कसें आहे असें म्हणशील तर तुला एक दृष्टांत सांगतों.

एक जन्मांध मनुष्य होता. त्यानें एका डोळस मनुष्यास विचारिलें कीं, मुलें कां रडतात ? डोळस मनुष्यानें त्या अंध मनुष्यास उत्तर दिलें कीं, दुध पाजतात म्हणून. अंधळा म्हणतो, दुध कसें असतें ? डोळस त्यास सांगतो, दुध पांढरें असतें. अंध म्हणतो, पांढरें कसें असतें ? डोळस म्हणतो, पांढरें बगळ्यासारखें असतें अंध म्हणतो बगळा कसा असतो ? ( डोळस मनुष्य आपला कोंपरापासून बोटापर्यंत हात वांकडा वळवून तो अंधाचे हातांत देऊन म्हणतो ) बगळा असा असतो. अंध त्या डोळसाचा हात चांचपून म्हणतो, अरे बापरे ! येवढें मोठें लठ्ठ दूध लहान बाळाच्या घशांत कोंबतात ह्मणूनच मुलें रडतात. असो, या अंधाच्या दुधाच्या ज्ञानाप्रमाणें तुझें ज्ञान आहे. त्या अंधाच्या ज्ञानास जसें ज्ञान ह्मणतां येत नाहीं तसें तुझे ज्ञानासही आह्मीं ज्ञान समजत नाहीं. व तुजला ज्ञान नाहीं ह्मणून ईश्वरही दिसणार नाहीं असें आह्मीं ह्मटलें हेंही बरोबरच.

ना०—मग आह्मांस सत्यज्ञान प्राप्त कशानें होईल ?

आ०—सद्गुरूस शरण जाऊन एक ग्रंथ त्यांजपासून समजावून घे ह्मणजे तुजला सत्यज्ञान होईल.

ना०—ग्रंथ समजावून देण्यास सद्गुरूच पाहिजे असें आपण कां

म्हणतां ? आम्हांस ग्रंथ वाचतां येतो. व ज्या भाषेंत ग्रंथ आहेत ती भाषाही आम्हांस चांगली अवगत असून आम्हांस अर्थही समजतो. मग सद्गुरूच कशास पाहिजे ?

आ०—जरी तुला ग्रंथांचा अर्थ समजतो व भाषाही येते तरी सद्गुरूवांचून गत्यंतरच नाहीं. यावर एक दृष्टांत सांगतों ह्मणजे तुला नीट कळेल.

एक कोट्यावधि रुपयांचा सावकार होता. तो मोठा चतुर व सत्यवक्ता असून पोक्त विचारी होता. त्यास एक पुत्र होता. पुत्र विशेष बाहेरख्याली असल्यामुळें तो आपल्या पश्चात् संपूर्ण संपत्ति लयास नेऊन आपण भिकेस लागेल असें जाणून सावकारानें एक नवी चोपडी घालून तीवर असा लेख लिहिला कीं, “माघ वद्य अष्टमीचे दिवशीं दिवसा बारा वाजून पस्तीस मिनिटांनीं लक्ष्मीनारायणाचे देवळाचे डेऱ्यांत पन्नास लाख मोहरा ठेविल्या आहेत.” नंतर त्यानें ती चोपडी स्वतंत्र खासगी पेटींत ठेवून दिली व त्याप्रमाणें मोहराही ठेविल्या. पुढें थोडक्याच दिवसांनीं तो सावकार मरण पावला. पुढें त्याच्या पुत्रानें संपूर्ण संपत्ति दुर्व्यसनांत खर्च केली. शेवटीं तो कर्जबाजारी झाला; व पैशाकरितां लाचार होऊन हाय हाय करूं लागला. स्नेही, इष्टमित्र कोणी विचारीत नाहींसें झाले आणि केल्या गोष्टीचा त्यास पूर्ण पश्चात्ताप झाला. एके दिवशीं दैवयोगें वरील लेख लिहिलेली चोपडी त्याच्या हस्तगत झाली. त्यानें आपल्या बापाचें हस्ताक्षर ओळखून तें मननपूर्वक वाचिलें; व पन्नास लाख मोहरा आपल्या बापानें आपणाकरितां लक्ष्मीनारायणाचे देवळाचे डेऱ्यांत ठेविल्या आहेत असें जाणून मोठा आनंदित झाला. लागलीच उतावीळ होऊन त्यानें चाकरमाणसें गोळा करून देवळावरील डेरा उतरून काढिला. डेऱ्यांत पाहतो तों मोहरा नाहींत. ह्मणून मोठा विस्मित

झाला. लोकही त्यास द्रव्येच्छेनें वेड लागलें असें म्हणूं लागले. बापानें बांधलेल्या देवळाचा त्यानें कळस उतरला व संसाराचाही मातेरा केला असेंही ह्मणूं लागले. त्या सावकारपुत्राचा आपल्या बापाच्या लेखावर पूर्ण विश्वास असल्यामुळें त्यास सदर लेख मिथ्या असावा असें मुळींच वाटलें नाहीं. आपणास कदाचित् अक्षरें वाचतां आलीं नसतील ह्मणून त्यानें तो चोपडीवरील लेख मोठमोठ्या धूर्त व विद्वान् लोकांस वाचावयास सांगितला. सर्व विद्वानांनीं त्यास त्यानें जें वाचलें होतें तेंच वाचून दाखविलें व लक्ष्मीनारायणाचे देवळाचे डेऱ्यांत तुझ्या बापानें मोहरा ठेविल्या आहेत त्या काढून घे असेंच सुचविलें; परंतु त्यानें सांगितलें कीं, आपण सांगितल्याप्रमाणें मीं डेरा तपासून पाहिला, देऊळ मात्र विशोभित झालें पण मोहरा निघाल्या नाहींत. असें ऐकून विद्वान् लोक म्हणाले; जर मोहरा मिळाल्या नाहींत तर हा लेख कोणी थट्टेखोरानें तुला फसवावयाकरितां लिहिला असेल अगर खरा असल्यास, कोणी पाळत राखून त्यांतील मोहरा काढून नेल्या असतील. अशींच सर्वांचीं मतें पाहून तो सावकारपुत्र विन्मुख असा परत घरीं आला. परंतु त्यानें ती चोपडी दुसऱ्यांस दाखवावयाचा क्रम सोडिला नाहीं. एके दिवशीं तो ती चोपडी घेऊन एका वयोवृद्ध मनुष्याच्या घरीं गेला व त्यास ती चोपडी वाचावयाकरितां दिली. त्या वृद्ध माणसानें प्रत्येक शब्द लक्षपूर्वक अवलोकनांत आणून त्यास विचारिलें कीं, तूं डेरा शोधून पाहिलास काय? पाहिला असल्यास तूं त्या डेऱ्याची काय वाट केलीस? सावकारपुत्रानें मीं डेरा खालीं तजविजीनें उतरून काढिला आहे परंतु त्यांत मोहरा प्राप्त झाल्या नाहींत असें सांगितलें. नंतर त्या वयोवृद्ध माणसानें त्या सावकारपुत्रास भरंवसा येण्याकरितां असें सांगितलें कीं, देवाची शांतता न करितां एकदम तूं त्या डेऱ्यास हात घातलास,

त्यामुळें देव तुजवर क्रुद्ध झाला आहे व त्यानेंच तुझ्या बापानें ठविलेल्या मोहरा अदृश्य केल्या आहेत. तूं प्रथम तो डेरा पुनः जशाचा तसाच देवळावर चढीव; नंतर मजकडे ये. मी तुला मोहरा प्राप्त करून देईन. सावकारपुत्र दरिद्री झाला असल्यामुळें त्या वृद्ध मनुष्यानेंच त्यास डेरा बसविण्याचे कामास लागणारा खर्च दिला. सावकारपुत्रानें पुनः डेरा पूर्ववत् देवळावर चढविला. नंतर त्या वृद्ध माणसानें त्यास माघ वद्य अष्टमी रोजीं तूं हत्यारें घेऊन देवळांत जा, मीही तेथें येतों असें सांगितलें. ठरल्याप्रमाणें माघ वद्य अष्टमीच्या दिवशीं तो वृद्ध मनुष्य व सावकारपुत्र असे उभयतां त्या लक्ष्मीनारायणाचे देवळांत गेले. चोपडीमध्यें सावकारपुत्राच्या बापानें जी नक्की वेळ दाखल केली होती, ती होतांच त्या वृद्ध मनुष्यानें त्या सावकारपुत्रास, देवास नमस्कार करून कुदळ घेऊन चल असें सांगितलें. नंतर तो सावकारपुत्रही उठला. प्रदक्षिणेचे वेळीं देवळावरील डेऱ्याची छाया ज्या जमिनीच्या भागावर पडली होती, तो जमिनीचा भाग त्या वृद्ध मनुष्यानें त्या सावकारपुत्रास दाखवून सांगितलें कीं, हा डेरा पहा व येथें खण. असें म्हणतांच तावडतोब त्या सावकारपुत्रानें त्या देवळाचे डेऱ्याच्या प्रतिछायारूपी डेऱ्यांत खणलें, तों तात्काल मोहरांनीं भरलेला हंडा त्यास प्राप्त झाला. मग आनंदास काय विचारावें! त्या सावकारपुत्रानें शहरांतील अनंत विद्वानांस तो लेख दाखविला होता व त्यानेंही खुद्द तो वाचिला होता. त्या सर्वांनीं त्याचा अर्थही केला होता. परंतु त्या अर्थापासून अगर अक्षरें वाचण्यापासून कोणास अर्थ समजला नाहीं; म्हणजे सत्य वस्तूचें ज्ञान झालें नाहीं. याप्रमाणेंच जरी तुला ग्रंथांतील भाषेचें पूर्ण ज्ञान आहे तरी तें ज्ञान असून नसून सारखेंच आहे असें पूर्ण समज. शिवाय ज्ञानप्राप्ति ही सद्गुरूवांचून होत नाहीं असें जाण. अनंत जन्मीं विधि-

युक्त कर्माचरण घडलेल्या हजारों मनुष्यांतून एखाद्यास ग्रंथ वाचून कदाचित् ज्ञान होऊं शकतें. जरी ग्रंथ वाचून ज्ञान झालें तरी तें ज्ञान सत्पुरुषांनीं केलेल्या ग्रंथाचे साह्यानें झालें असल्यामुळें त्या ग्रंथाचा कर्ता जो सत्पुरुष असेल, तोच त्यानें आपला गुरु समजावा. या प्रकारें तूं ग्रंथ वाचून ज्ञान साध्य करून घेण्याजोगा अधिकारी नाहींस असें मला वाटतें; म्हणून मीं तुला सद्गुरूचा आश्रय करावयास सांगितलें.

ना०—मागें आपण म्हणाला कीं, तुझें व माझें अस्तित्वावरूनच ईश्वर आहे, असें सिद्ध होतें. तें कसें हें सांगावें. कारण मी तर ईश्वर मुळींच नाहीं असें म्हणतों.

आ०—याचा भावार्थ असा आहे कीं, तूं जें ईश्वर नाहीं असें म्हणतोस, तें तुझें ह्मणणें तूं ईश्वराचें अस्तित्व मनांत आणल्याखेरीज कसें निघालें? याचा न्याय असा आहे कीं, वस्तूचा अंगिकार केल्यावांचून त्या वस्तूचा त्याग करणें संभवत नाहीं. वस्तु प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असल्यावांचून त्या वस्तूचा अंगिकार अगर त्याग संभवत नाहीं. तूं तर प्रत्यक्ष ईश्वर नाहीं असें म्हणतोस. यांत तुझ्या अंतःकरणांत ईश्वरच्या नास्तित्वाचें अस्तित्व उघडपणें वास करीत आहे असें दिसतें. मनांत कोणतीही गोष्ट आल्यावांचून ती बोलून दाखवितां येत नाहीं असें अनुभवसिद्ध आहे. या न्यायानें ज्याअर्थी ईश्वराच्या नास्तित्वाचें अस्तित्व तुझ्या हृदयांत वास करीत आहे, त्या अर्थी ईश्वर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कोठें तरी वास करीत असला पाहिजे असें सिद्ध होतें. जी वस्तु जगांतच नाहीं, ती वस्तु कधींही बोलण्यांत येत नाहीं व तीसंबंधी वाटाघाटही होत नाहीं तूं तर उघड ईश्वररूपी वस्तूविषयीं बोलत असून वाटाघाट करीत आहेस; यांत तूं जरी ईश्वर नाहीं असें म्हणालास तरी मला भाषाज्ञान पूर्ण असल्यामुळें तूं ईश्वर

आहे असेंच म्हणतोस असें मी समजतों. कारण तूं म्हणतोस, ईश्वर नाहीं. या वाक्यांतील नाहीं हा शब्द केवळ निषेधार्थी नसून नाहीं हा शब्द न व अस् या उभय शब्दांचा मिळून झालेला आहे. तस्मात् नाहीं यांतच आहे नाहीं, अशा अर्थाचा समावेश आहे. नाहीं हा शब्द उभयार्थी असल्यामुळें, तो ईश्वरास पूर्ण लागू पडतो. व ईश्वराचें पूर्ण स्थळ, नाहीं या शब्दानें स्पष्ट दाखविलें. तेव्हां नाहीं हा शब्द ईश्वरदर्शक गुरुरूप आहे असें सिद्ध झालें. नाहीं या शब्दानें ईश्वर कसा दर्शित होतो असें म्हणशील तर सांगतों. ईश्वराच रूप व स्थितीविषयीं वेदप्रतिपाद्यधर्मांत असें सांगितलें आहे कीं, ईश्वरास नांव नाहीं व रूपही नाहीं, त्यास आकार व परिमेयता नाहीं. तो एक नाहीं, अनेकही नाहीं, तो एक अनेकातीत सहज आयताच स्वयंभु आहे. याप्रमाणें प्रथम वेदप्रतिपाद्यधर्मांत ईश्वराच्या स्थितीविषयीं निषेधार्थ सुचवून पुनः त्या ईश्वरास परब्रह्म परमेश्वर सच्चिदानंद, वासुदेव, निरंजन, निर्विकल्प अशीं अनंत नांवेंही दिलीं आहेत. यावरून व गीतेंत श्रीकृष्णांनीं स्वमुखानें सांगितलें आहे कीं,

'वृष्णी-नाम् वासुदेवोऽस्मि' यांत वासुदेव असें श्रीकृष्णानें आपणास नाम घेतलें आहे; व पुनः त्यानेंच आपणास नाम नाहीं असेंही म्हटलें आहे, प्रमाण 'नामरूपव्यतीतोहं,' चिदाकारोह मच्युतः' यास्थळीं मला नामही नाहीं व रूपही नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे, यावरून असें सिद्ध झालें कीं, ईश्वर 'आहे नाहीं' या दोन शब्दातीत आहे. म्हणजे आहे नाहीं अशा शब्दरूप आकाश गुणास आधार स्थळ आहे. म्हणूनच त्यास शब्दातीत, भावातीत, ज्ञातृज्ञेयातीत, अदृश्य असें म्हणतात, हें योग्यच आहे असें सिद्ध झालें. नाहीं हा शब्दही उभयार्थी आहे तेव्हां उभय अर्थास म्हणजे आहे नाहीं अशा उभयार्थी संकल्पास जो अधिष्ठान ईश्वर त्यासच

फक्त हा नाहीं शब्द लागू पडतो, त्यायोगें ईश्वरास्तित्व सिद्ध होतें. ईश्वराचा निषेध सिद्ध होत नाहीं. नाहीं हा शब्द ईश्वराचें अस्तित्व दाखवितो व तूंही नाहीं हाच शब्द उच्चारिलास यावरून ईश्वर आहे असें तुझे बोलण्यावरूनच सिद्ध झालें. तूं, नाहीं हा शब्द उच्चारण्यापूर्वी, ईश्वर असा शब्द बोललास त्यांत तर साक्षात् त्याचे नांवच तूं जपलेंस असें झालें. 'ईश्वर' हा शब्द बोलून पुनः 'नाहीं' म्हणालास यांत सुचविलें आहे कीं, नाहीं हा शब्द तुझे कल्पनेंत सार्थ वास करीत आहे. तो कल्पनेंतच असण्याचें कारण कल्पनेंत ईश्वर नाहीं. तो तुझे कल्पनातीत आहे व असें सुचविण्याकरितांच नाहीं हा शब्द तुझे कल्पनेंत आला आहे. तो तुझा गुरु आहे. तूं असें समज कीं, आहे व नाहीं हे दोन्ही शब्द तुझे कल्पनेचे अस्तित्वांत आहेत. तुजमध्यें नाहींत. तूं कल्पना सोड म्हणजे तुला असा अनुभव प्राप्त होईल कीं, तुझे स्मरणरहित अस्तित्वाखेरीज जें तत्त्व आहे त्याचे ठिकाणीं ईश्वराचे नास्तित्वाची व तुझे अस्तित्वाची मुळीं कल्पनाच वांझ आहे. करितां कल्पना हीच माया आहे व तूं मिथ्या नास्तिकही काल्पनिकच आहेस. त्या तूं आपलें काल्पनिक अस्तित्व धरिलें नाहींस म्हणजे तूं नास्तिक ही वंध्यासुताप्रमाणें नाहींसाच होशील आणि नाहीं या शब्दानें दर्शित असें जें कल्पनारूप अस्तित्व नष्ट करणारें सच्चिदानंद समष्टिईश्वररूप आहे, तें तुझ्या हृदयस्थ राहील, व हृदयस्थो जनार्दनः ही श्रुति तुझे अनुभवास येईल.

हें ज्ञान तुला 'नाहीं' या शब्दापासून झालें म्हणून तूं त्या नाहीं या शब्दरूपी गुरूस चिकटून राहिलास म्हणजे तुला सद्गुरुप्राप्ति झाली. पहा, तुकोबा महाराजांनीं तुला असें सांगितलें आहे कीं, 'नाहींच होउनि राहिजे ॥ तरीच पाविजे आत्मसुखा' एवढ्याकरितां आतां तुझें भाग्य उदयास आलें व तुझाच मंत्र तुला फलदायक झाला

असें समजून त्याचा तूं परित्याग करूं नकोस. आणखी कांहीं तुला विचारावयाचें आहे काय, असल्यास विचार.

ना०—( सद्गदित होऊन व आश्चर्य पावून ) आतांच मी आपणांस शरण आलों. आपला मीं विनाकारण छळ केला व कुटिल-बुद्धीनें मीं आपणांस प्रश्न केले, हा मजकडून मोठा अन्याय झाला. माझे आतां नेत्र उघडले व खात्री झाली कीं, ईश्वर नाहीं म्हणणें हें अगदीं चुकीचें आहे. कारण ईश्वर नाहीं हें वाक्यच ईश्वररूप आहे असें आपण सिद्ध केलें, मग पुढें काय बोलावें ?

आ०—तुझ्या सर्व शंका गेल्या काय ?

ना०—जरी माझ्या सर्व शंका गेल्या नाहींत, तरी ईश्वर नाहीं जसें मीं म्हटलें, तों लागलीच नाहीं या शब्दाचें अस्तित्व माझे हृदयांत उत्पन्न होतें व नाहीं या शब्दाचेंच जर अस्तित्व आहे तर ईश्वराचें अस्तित्व धरणें भाग पडतें. यावरून ईश्वर असावा असें मला वाटतें; परंतु मला आणखी कांहीं पूर्वीच योजून ठेविलेले प्रश्न विचारावयाचे आहेत, त्याचें यथासांग आपलेकडून खंडण झालें म्हणजे ईश्वर संबंधी मी संशयरहित होईन. करितां आणखी कांहीं प्रश्न विचारतों. परमेश्वराचें रूप आपण सांगतां त्याप्रमाणें ग्रंथांतरींही लिहिलें आहे. तो निराकार निर्विकल्प निर्गुण असा आहे, तो दिसत नाहीं, जगास ओळखत नाहीं व कल्पनेंतही येत नाहीं; तसाच तो कांहीं वस्तुही नाहीं व दृश्यही नाहीं असें ऐकितों; यावरून त्यास शून्य म्हणावें कीं काय हें समजत नाहीं. या संशयामुळें तो नसावा असें वाटतें. कारण मजजवळ शून्य रुपया आहे असें कोणीं म्हटलें म्हणजे जसें रुपयाचें नास्तित्व सिद्ध होतें, तसें ईश्वर कांहीं वस्तु नाहीं असें म्हटलें म्हणजे तो मजजवळ शून्य रुपया आहे या म्हणण्याप्रमाणेंच झाला, जसें शून्य शब्दानें रुपयाचें अभावरूप द्यावयाचें तसेंच तो निराकार

निर्वस्तु आहे असें म्हटलें म्हणजे त्याचें अभावरूपच घेतलें पाहिजे असें मला वाटतें. यावर आपलें मत काय आहे हें कृपा करून सांगा.

आ०—मजजवळ शून्य रुपया आहे अशा म्हणण्यानें रुपयाचें कायमचें अभावत्व घ्यावयाचें नाहीं. फक्त मजजवळ मात्र त्या वेळीं रुपया नाहीं असा अर्थ घ्यावयाचा. दुसरे कोणापाशीं रुपया असेल व आपणही तो कधीं पाहिला असेल म्हणूनच आपणास रुपयाचें अस्तित्व आपल्या कल्पनेंत घेऊन मजजवळ शून्य रुपया आहे असें बोलतां आलें. रुपया हा शब्द आपण कधीं तरी ऐकिला असेल अगर रुपयारूपी वस्तु कधीं पाहिली असेल म्हणूनच रुपयाचें शून्यत्व तुझे कल्पनेंत व बोलण्यांत आलें. यावरून जसें रुपयाचें अस्तित्व कल्पनेंत येण्यास रुपयाचें अस्तित्वच कारण आहे व जसें रुपयाचें शून्य अभावरूपही दाखविण्यास रुपयाचें अस्तित्वच कारण आहे तसेंच निराकार निर्गुण निर्वस्तु असें म्हणण्यानें आकाररहित निराकार व गुणरहित निर्गुण व वस्तुरहित निर्वस्तु असें जें उपाधिरहित स्थळरूप अस्तित्व सिद्ध होतें तेंच निराकाराचें अस्तित्व आहे. कारण आकार याचे उलट निराकार असलाच पाहिजे. जगांत सर्वच वस्तु आकारी नाहींत, कांहीं दृश्य आहेत व कांहीं अदृश्य आहेत. यास उदाहरण.—तुझी कल्पना तुझ जाणिवेचे योगें तूं जाणतोस म्हणून तुझी कल्पना अदृश्य असून दृश्य आहे. परंतु तूं ज्या ज्ञानानें आपल्या कल्पनेस जाणिलेंस तो ज्ञाता कल्पनेस दृश्य होत नाहीं व कल्पनेच्या योगें जाणवलाही जात नाहीं, तो कल्पनातीत म्हणजे कल्पनेचा नाश झाला तरी नाश पावत नाहीं. कल्पनेच्या अभावीं जशाचा तसाच आहे. या शरीरांतील ज्ञात्या साक्षी ईश्वराचा कल्पनेस कधींही अनुभव येत नसल्यामुळें तुझे कल्पनेस तो ज्ञाता समष्टिरूपी ईश्वर शून्य आहे असें वाटतें, परंतु वास्तविक विचार करून पाहतां

तो 'आहे नाहीं' शून्य निःशून्य या उभयभावातीत आहे, दुसरें नाहीं तेंच आहे म्हणजे काय असें म्हणशील तर सांगतों ऐक. पहा, आपण दररोज निजतों व आपणांस गाढ निद्रा लागली म्हणजे त्या निद्रेंत तुझ्या कल्पनेचा अत्यंत अभाव आहे व त्यामुळें तुला सृष्टीचें अगर सृष्टींतील कोणत्याही पदार्थाचें भान राहात नाहीं. फार तर काय ज्या देहांमध्यें तूं आहेस त्या देहाचेंही तुला भान नसतें व तुला तुझें अस्तित्वाचेंही स्मरण नसतें असें खरेंना? या सुषुप्ति अवस्थेंत म्हणजे निद्रेंत तुझें तुला स्मरण नाहीं, एवढ्यावरून तुझें अस्तित्व नष्ट होतें काय? सुषुप्ति अवस्थेंत तुझें अस्तित्व तुला मुळींच नसतें; परंतु हें तुझें नास्तित्व सुषुप्ति अवस्थेंत असून नाहीं असें आहे. हें जसें तुझें असणें सिद्ध होतें; तसेंच निर्विकल्प निरंजन परमात्म्याचें अस्तित्व तुझ्या कल्पनेंत नसून तुझ्या कल्पनातीत आहे असें समज. आणखी असेंही समज कीं, जशी तुझ्या जागृदवस्थेंतील कल्पनेच्या अस्तित्वांत, तुझ्या झोंपेची व तुझी भेट कधींही होत नाहीं व झोंपेचा जागृतींत कधीं उपभोगही तुला घेतां येत नाहीं त्याप्रमाणेंच जाग्रत्कालपर्यंत तुझी अज्ञानमूलक सुषुप्ति आहे तावत्काल पावेतों तुला कल्पनातीत व अज्ञानातीत जें परब्रह्म तें प्राप्त होणार नाहीं. तुझें जागृतीचें अस्तित्व राखून तुला सुषुप्तीचा अनुभव घ्यावयास आला, तर खात्रीनें तुला अज्ञानरूपी अवस्थेंत निराकार परमेश्वराचा अनुभव मिळेल. जसें जागृतकाळीं झोंपेचें अस्तित्व नाहीं तसेंच तुला तुझे कल्पनारूप अस्तित्वांत निराकार परमेश्वराचें अस्तित्वाचा अनुभव मिळणें दुर्मिळ आहे; परमेश्वराविषयीं संशय धरूं नको. अरे, मी तुला विचारितों कीं, शून्याचें अस्तित्व तुझे कल्पनारहित स्थितींत राहूं शकतें काय? जर राहूं शकत नाहीं तर शून्य हेंही कल्पनाच आहे व तज्जन्य संपूर्ण आंकडेही कल्पनारूपच आहेत. अरे, तूं शून्य

ह्मणजे कांहीं नाहीं असें समजतोस हें तुझें केवढें वेडेपण आहे पहा! तूं विचार कर, ह्मणजे तुला असें दिसून येईल कीं, सर्व अनंत आंकड्याचे रूपास एकटें शून्यच येतें, व सर्व आंकडे शून्यरूपच आहेत. म्हणून तूं शून्याची योग्यता कमी व आंकड्यांची जास्त असें समजूं नको. कां म्हणशील तर सांगतों. तूं लेखणीनें कागदाला स्पर्श केलास कीं प्रथम शून्य उत्पन्न होतें नंतर तेंच शून्य लेखणीच्या सतत स्पर्शानें रेघरूपास येतें व आंकडेही त्याचेच होतात; म्हणून सर्व शून्यरूपच आहे. जेवढी तूं जगांतील वस्तूंची गणना करून संख्या मोजशील अगर बोलशील अगर लिहिशील ती सर्व संख्या मोजणें अगर लिहिणें हें सर्व शून्यरूपच होईल. दुसरा विचार असा समज कीं, जसें शून्य अगर आंकडा काढण्यापूर्वीं कागद निःशून्य आहे तसाच तुझी कल्पना उठण्यापूर्वीं परमात्मा निर्विकल्प व निःशून्य आहे. तूं असें समज कीं, कागदाच्या आधारानें लिहिलेले वर्ण कागदावरच दिसतात. परंतु एकस्थळीं दोन वस्तूंचें अस्तित्व राहत नाहीं या सिद्धांतान्वयें जेथें कागद आहे तेथें शाईची वर्णरूपी कपची नाहीं, व शाईची वर्णरूपी कपची जेथें आहे तेथें कागद नाहीं. परंतु असें जरी आहे तरी कागदाच्या आधाराशिवाय शाईनें लिहिलेले वर्ण नाहींत. या दृष्टांताप्रमाणें कागदाचें ठिकाणीं पोकळी आहे; त्या पोकळी-मध्यें वर्णस्थानापन्न परमाणु नाहींत आणि वर्णस्थानापन्न परमाणु आहेत तेथें कागदस्थानापन्न पोकळी नाहीं; परंतु कागदस्थानापन्न पोकळीच्या आधाराशिवाय वर्णस्थानापन्न परमाणूंना अस्तित्व नाहीं. पहा कागदाचा नाश होण्याबरोबर त्या वर लिहिलेल्या वर्णांचाही नाश होतो. त्याप्रमा-णेंच परमाणूंच्या आकृतीची जागा म्हणजे परमाणु राहण्याची पोकळी नाश पावली म्हणजे परमाणूरूप सृष्टीही नाश पावते व परमाणूंस स्थलरूप जें आकाशतत्त्व तें तर 'आत्मनः' आकाशः संभूत या

श्रुतीप्रमाणें आत्मा म्हणजे परमेश्वर त्यापासून पोकळीरूपी कल्पना उत्पन्न झाली व त्या आकाशापासून अनंत पंचमहाभूतात्मक अनंत ब्रम्हांडगोलरूपी सृष्टि निर्माण झाली अशी श्रुति आहे. यावरून ज्याअर्थी संपूर्ण परमाणुरूप सृष्टीस कारण असणारी जी पोकळी तीच उत्पन्न झालेली आहे त्याअर्थी त्या आकाशाचा केव्हां तरी नाश होतोच व आकाशस्थानापन्न निर्विकार निराकार परमात्माच उरतो असें समज; व असेंही समज कीं, जर कागदस्थानापन्न पोकळी नाहीं तर वर्णस्थानापन्न परमाणुंही नाहींत, व परमाणु नाहींत म्हणून तुझा देह परमाणूंचा तोही नाहीं तूं देहाला जाणणारा कोणी आहेस असें ह्मणावें, तर तो तूंही काल्पनिक असल्यामुळें नाहींसच असें समज. आकार विरहित निराकार सर्वत्र आहे व एक ठिकाणीं दोन पदार्थांचें अस्तित्व रहात नाहीं या न्यायानें सर्व स्थानापन्न जें निराकाराचें अस्तित्व त्या अस्तित्वांत तुझें भिन्न अस्तित्व वंध्यासुतवत् आहे. जसा मिथ्या स्वप्नापासून मिथ्या स्वाप्निक पुरुष होऊन पुनरपि त्या स्वाप्निक पुरुषापासून स्वाप्निकच व्याघ्र निर्माण होतो व तो व्याघ्र ज्यापासून निर्माण होतो त्यासच खावयास धांवतो; परंतु जसें तें सर्वच मिथ्या असतें तसेंच तूं मायारूपी सुषुप्तीचे पोटांत म्हणजे ईश्वराचे कल्पनेचे पोटांत उत्पन्न होऊन त्यास आपला त्राता न समजतां उलट त्यासच तूं मिथ्या समजतोस. परंतु जसा स्वाप्निक वाघानें स्वाप्निक देहास खाल्लें असतां तुझा सत्य देह नाश पावत नाहीं, तसाच ईश्वराचे कल्पनारूप स्वप्नांतलि तूं व्याघ्र व मी मनुष्य या नात्यानें जरी भांडून व ईश्वर नाहीं असें म्हणून जरी आपण नाश पावलों तरी ईश्वर नाश पावत नाहीं असें पक्कें समज. मी तुला विचारितों कीं, आकाश हें काय तत्त्व आहे ? तें आकारी आहे कां निराकारी ? जर आकाश निराकारी आहे व पंचमहाभूतांत त्याची गणना आहे तर मग आकाश ही काय

वस्तु आहे ? आकाश ही वस्तु नसून शून्य म्हणजे पोकळ स्थळ आहे व पोकळ म्हणजे कांहीं नाहीं. कांहीं नाहीं असें जें आकाश त्याची आपण तत्त्वांत गणना केली आहे. जर कांहीं नसणाऱ्या पोकळीचें आपण अस्तित्व धरिलें तर कांहीं नसणाऱ्या निराकार परमेश्वराचें अस्तित्व तूं कां धरीत नाहींस ? पोकळी जशी सर्वत्र असून तुझ्या देहांत व शब्दांत व्याप्त आहे तसाच ज्ञानरूप परमात्मा सर्वव्यापी असून तुझ्या देहांत-ही आहे असें सिद्ध होतें. ज्या ठिकाणीं वस्तु नाहीं त्या ठिकाणीं आकाश हीच वस्तु आहे. तसेंच ज्या ठिकाणीं आकाशादि पंचमहाभूतें नाहींत तेथेंच निराकार परमात्मा आहे. पोकळीस जसें शून्यत्व दि-ल्यानें पोकळीचें अस्तित्व नष्ट होत नाहीं, तसेंच निराकार परमेश्व-रासही शून्यत्व लागू केल्यानें त्यास शून्यत्व येत नाहीं असें समजावें. निराकार परमेश्वर कल्पनातीत असल्यामुळें कल्पना करण्याचें सोड-ल्यावांचून तो अनुभवास येत नाहीं. करितां व्यर्थ कल्पना करीत बसूं नये. कारण सत्पुरुषांचें वाक्य आहे 'ज्याची कल्पना निमाली तो प्राप्त पुरुष' एकाच वेळीं दोन विचार चालत नाहींत असा न्याय आहे. या न्यायानें ज्या वेळीं तूं कल्पना करितोस त्याच वेळीं निर्विकल्पता तुला कशी प्राप्त होईल याचा विचार कर व ईश्वराच्या नास्तित्वभावाचा कल्पनारूपी प्रांत तूं सोडिलास कीं, लागलीच तूं ईश्वराच्या अस्तित्वाच्या कल्पनाप्रांतीं प्रवेश करशील व बोध ऐक-ण्यास अधिकारीही होशील; त्यावेळीं अशा लाखों संशयांची रक्षा होईल असें समजून पूर्ण आस्तिक हो.

**नास्ति०**—हो म्हणावयास नकोच. मी तर आस्तिक झालोंच झालों; परंतु या पुढें जें काय आपण सांगाल तें मी शिष्य भावनेनें श्रवण करीन व पुढील आपल्या उपदेशाच्यायोगें ज्ञानी होऊन तरून

जाईन. आतां आपण मला नास्तिक न समजतां आस्तिकच समजावें व मला आपलें शिष्यत्व मिळावें इतकीच विनंति आहे.

आ०—आतां तूं आस्तिक झालास हें चांगलें झालें. तुला पुढें मी सत्यज्ञान जेणेंकरून प्राप्त होईल असाच अनुभवसिद्ध बोध करीन. कारण कांहीं आशंका परब्रह्म परमेश्वराचा अनुभव आल्याखेरीज व त्याचा मनुष्याचे अंतःकरणास साक्षात्कार झाल्यावांचून नष्ट होत नाहींत. आतां पुढील निरुपण तूं फार लक्षपूर्वक ऐक म्हणजे तुला परब्रह्मदर्शन खात्रीनें होईल.

प्रश्न—येणेंप्रमाणें तुम्हीं नास्तिकवाद उत्तम प्रकारें खंडण केला व चैतन्य हें पंचमहाभूतांचें संयोगजन्यकार्य नसल्यामुळें देहपात झाल्यानंतर लिंगदेहासह चैतन्यरूप जीव मागें राहतो. इतकें चांगले प्रकारें आपण सिद्ध केल्यामुळें मनुष्यप्राणीमात्रांस संसाराखेरीज देहपातानंतर मुक्त होण्याचा प्रयत्न करण्याचें दुसरें कर्तव्यकर्म आहे असें सिद्ध झालें व त्यामुळें आपल्या ग्रंथाचें प्रयोजनही सिद्ध झालें, आतां ग्रंथांत कोणकोणते विषयांचा समावेश केला आहे हें सांगून विषय, प्रयोजन, अधिकार व संबंध मिळून चार प्रकरणास अनुबंध चतुष्टय ह्मणतात, तें अनुबंध चतुष्टय या ग्रंथास कसकसें लागू केलें आहे, तेंही सांगावें.

उत्तर—जीवास चौऱ्यांशी लक्ष योनींतील देहापासून मुक्त करून जीव व परब्रह्म यांची ऐक्यता आहे असें वेदादि ग्रंथ सांगतात. हेंच ऐक्यत्व या ठिकाणीं स्वानुभवसिद्ध वठवून देण्याचा आमचे ग्रंथांतील विषय आहे. हा जीव ब्रह्मैक्य होऊन त्याची चौऱ्यांशी लक्ष योनींतून मुक्तता व्हावी अशी ज्या मनुष्यप्राण्याची दृढेच्छा आहे तोच या ग्रंथाचा पूर्ण अधिकारी आहे; व श्रुति, युक्ति व अनुभव या तिहींस

अनुसरून या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे. म्हणून प्रतिपाद्य प्रतिपादक असा भावरूप संबंध आहे. याप्रमाणें अनुबंध चतुष्टय समजावें.

**प्रश्न**—आपण नास्तिकमत खंडण करून जसें आमचें समाधान केलें, तसेंच आपण मागें सांगितलेल्या मतांपैकीं कांहीं घेऊन त्यांचें ईश्वरसंबंधीं व जीवाचे उत्पत्तिलयाविषयीं काय मत आहे हें कृपा करून सांगावें व नंतर आपण आपल्या वेदप्रतिपाद्यधर्माप्रमाणें यथार्थ प्रतिपादन करावें; म्हणजे आम्हांस नित्य रस्त्यावर उभे राहून उपदेश करणारे ख्रिस्ती लोक, तसेंच मुसलमानी, यहुदी वगैरे लोक आहेत त्यांच्या सांगण्यावर आमचा विश्वास बसणार नाहीं. जर आपल्या सांगण्यामुळें त्यांचे धर्म कांहीं कमी दर्जाचे आहेत असें वाटलें तर आमचा आमचे धर्माविषयीं अभिमान अधिक जागृत होईल. करितां थोडक्यांत त्यांचेही धर्मांतील मुद्दे काय आहेत तें सांगावें.

**उत्तर**—ख्रिस्ति, महंमदी, यहुदी, या तिन्ही मतांस वेदप्रतिपाद्य-धर्मांतील लोक नास्तिकमत समजतात. याचें कारण त्यांचीं मतें वेदप्रतिपाद्यधर्माविरुद्ध आहेत. दुसरें या तिन्ही मतांचा सिद्धांत जवळ जवळ परमेश्वर नाहीं म्हणणाऱ्या यथेष्टाचरणी लोकांस अनुसरूनच आहे. तो कसा म्हणाल तर सांगतों. नास्तिकवाद्यांचें मत मागें दिलेंच आहे, त्यावरून लक्षांत येईल कीं, नास्तिक लोक ईश्वरास मानीत नसल्यामुळें व प्राण्यांची उत्पत्ति होणें हा सृष्टीचा सहज स्वभाव असून पंचमहाभूतांचें संयोगजन्यकार्य देह उत्पन्न होतो व देह उत्पन्न झाला ह्मणजे पुनः त्या देहांत पंचमहाभूतांचे अंशजन्यसंयोगरूपी कार्यचैतन्य उत्पन्न होतें ह्मणून पूर्वींही जीव नाहीं व पुढेंही देहपातानंतर जीव उरत नाहीं ह्मणून त्यास पुनर्जन्म, पापपुण्य, स्वर्ग-नरक इत्यादि भोगणें नाहीं असें ते ह्मणतात. या नास्तिकमतांस अनुसरूनच यहुदी ख्रिस्ति व महंमदी या तिन्ही मतांचा सिद्धांत आहे;

अंतर तो येवढाच आहे कीं, नास्तिक ईश्वरास मानीत नाहींत व जीव जडत्त्वाचें कार्य समजतात. ख्रिस्ती, महमदी, यहुदी हे लोक ईश्वराचें अस्तित्व समजतात व देहाच्या नाशांतीं जीव मागें उरतो असें ह्मणतात. परंतु ते जीवास मागें जन्म नव्हता व पुढें जन्म नाहीं, असें जें म्हणतात तें त्यांचें म्हणणें नास्तिकपक्षास अनुसरूनच आहे. मागें नास्तिकमताचें खंडन केलें आहे, त्याबरोबर या मतांचेंही खंडन झाल्याप्रमाणेंच आहे. तथापि त्या नास्तिकमतांच्या व ख्रिस्त्यादिमतांमध्यें बरेंच अंतर असल्यामुळें या तिन्ही मतांसंबंधीं पुढें विचार दर्शवितों. ख्रिस्ती, यहुदी, व महमदी हीं तिन्हीं मतें एकाच पायावर असून अल्पकाळांतच उत्पन्न झालीं आहेत. यहुदी मत मोषा नामक इस्रायल मनुष्यापासून उत्पन्न झालें, त्यास सुमारें पस्तिसशें वर्षें झालीं. या मतांवरून यहुदीपैकीं इस्रायल म्हणून जात आहे त्यांतील येशू नामक मनुष्यापासून सुमारें एकोणिसशें वर्षांपूर्वीं ख्रिस्ती मत उत्पन्न झालें. या ख्रिस्ती मतावरून म्हणजे ख्रिस्ती मतांतील कांहीं भाग घेऊन व कांहीं नवीन स्वकल्पित रचून महमद नांवाच्या अर्बस्थानांतील अरब जातीच्या व यहुदी मताच्या मनुष्यापासून महमदी म्हणजे मुसलमानी मत उत्पन्न झालें. त्यास सुमारें तेराशें वर्षें झालीं. त्यानें काबुलपर्यंत जाऊन बाराशें अनुयायी प्रथम जमविले. यावरूनच हीं मतें उत्पन्न करणाऱ्या पुरुषांची म्हणजे मोषा, येशू व महमद यांची कारकीर्द इतिहासांत स्पष्ट दिली आहे त्यावरून, तसेंच या लोकांनीं मतें स्थापन करण्यास कसकसे प्रयत्न केले हेंही लिहिलें आहे, यावरून वाचकांच्या स्पष्ट लक्षांत येईल कीं, हीं तिन्हीं मतें आहेत धर्म नाहींत आणि तीं मतें अगदीं अलीकडे अल्प काळांतच उत्पन्न झालीं असून तीं ईश्वरप्रणित नाहींत. या तिहीं मतांचे लोक आम्हांस ईश्वरानें हे धर्म नेमून दिले आहेत असें म्हणतात; परंतु

त्यांना जर त्यांच्या पैगंबराची ( मत स्थापकांची ) कारकीर्द अगदीं आलीकडील असल्याचें त्यांच्याच ग्रंथावरून सिद्ध होत आहे असें दाखविलें, म्हणजे त्यांनाही हीं मतें साडेतीन हजार वर्षांतीलच आहेत असें कबूल करावें लागतें. नंतर ते बोलूं लागतात कीं, जरी हे आमचे धर्म अलीकडील आहेत तरी आमचे पैगंबर जे येशू, महमद, मोषा इत्यादि होऊन गेले, ते ईश्वराकडून जगाचा उद्धार करावया-करितां आलेले असल्यामुळें त्यांनीं जे धर्म स्थापन केले तेच ईश्वरी धर्म आहेत. कारण त्या पैगंबरांना ईश्वराकडून धर्माज्ञा प्राप्त झाल्या आहेत. अशाप्रकारें हे मतवादी लोक कांहीं तरी स्वकल्पित सांगून आपलीं मतें खरीं करावयास पहातात. त्यांना आम्हीं पुन्हां जर विचारलें कीं, मोषा, येशू, व महमद हे उत्पन्न झाल्यानंतर तुम्हांस हे धर्म प्राप्त झाले व तुम्ही आपणांस यहुदी, ख्रिती, मुसलमान असें म्हणूं लागला; परंतु या तुमच्या पैगंबरापूर्वीं तुमचे जे पूर्वज होते, ते या तुमच्या धर्माचे नव्हते असें उघड दिसतें, करितां ते कोणत्या धर्माचे होते? यावर पूर्वींच्या आमच्या पूर्वजांचा धर्म वेगळा होता, असें त्यांस कबूल करावें लागतें. यावरून वाचकांची खात्री होईल कीं, साडेतीन हजार वर्षांपूर्वींचे त्यांचे पूर्वज त्या वेळीं चालू असलेल्या व गौतम ऋषीनें घालून दिलेल्या बौद्ध मतापैकींच होते. गौतम तर वेदप्रतिपाद्यधर्मांतीलच होता. यावरून या सर्व मतवादी लोकांचा आद्य वेदप्रतिपाद्यधर्मच आहे, अन्य नाहीं, असें सिद्ध झालें. वेदप्रतिपाद्यधर्म ज्या भाषेत लिहिला गेला आहे ती संस्कृत भाषा असल्यामुळें व संस्कृत भाषेचें ज्ञान या मत स्थापन करणाऱ्या लोकांस नसल्यामुळें त्यांना या वेदप्रतिपाद्यधर्माची खरी योग्यता कळली नाहीं; म्हणून त्यांनीं असें स्वकल्पित मत काढिलें. आपणांस यथेष्टाचरण करितां यावें व आपला मान

जगांत वाढून आपण नांवालौकिकास यावें ह्मणून त्यांनीं आपल्या ग्रंथांत वेदप्रतिपाद्यधर्माची निंदा केली आहे व वेदप्रतिपाद्यधर्माविरुद्ध त्यांनीं मागेंही जन्म नव्हता व पुढेंही जन्म नाहीं असें लिहून ठेविलें. हें त्यांचें लिहिणें त्यांना कोणत्या प्रकारें फायद्याचें आहे हें सांगतों. या मतवाद्यांनीं मागें जन्म होता असें म्हटलें असतें, तर त्यांना पुढेंही जन्म आहे असें कबूल करावें लागलें असतें. मागें जन्म होता व पुढेंही जन्म आहे, हा सिद्धांत वेदप्रतिपाद्यधर्मांतील आहे. या सिद्धांताचा जर त्यांनीं अंगिकार केला असता, तर त्यांना नवीन ईश्वरीधर्म स्थापन करण्याचें कारण काय असें लोकांनीं विचारिलें असतें, व त्यांना नवीन मत स्थापन करण्यास जागा राहिली नसती. मागें मनुष्यास जन्म नव्हता, व पुढेंही नाहीं असें म्हणणें हाच त्या मतांचा पाया आहे. यामुळें त्यांना वैदिक धर्माविरुद्ध मत काढण्यापासून स्वमत स्थापन करण्याचा व आपला मोठेपणा जगांत वाढविण्याचा मोठा फायदा झाला. दुसरें आपणांस यथेष्टाचरण करितां यावें असा जो या मतवाद्यांचा मुख्य उद्देश तो मागें जन्म होता असें म्हटल्यापासून पुढें जन्म आहे असें त्यांना म्हणावें लागून सिद्धीस गेला नसता. पुढें जन्म आहे असें जर वेदप्रतिपाद्यधर्माप्रमाणें त्यांनीं मानिलें असतें, तर या जन्मीं जें पापाचरण होईल, त्याचे भोग पुढील जन्मीं भोगावे लागतील असें त्यांना कबूल करावें लागलें असतें; व त्या भोगांच्या भीतीनें त्यांच्या यथेष्टाचरणास बाध आला असता. कारण यथेष्टाचरण हें पातकाचीं कृत्यें केल्यावांचून होत नाहीं. यास उदाहरण, ज्या कोणास मांस खाण्याची इच्छा आहे त्यांस पशु हननादिक हिंसाकर्म म्हणजे पातक कर्म केलें पाहिजे. ज्या कोणास नीतीनें द्रव्य प्राप्त होत नाहीं, त्यांची द्रव्येच्छा पूर्ण होण्यास चोरी, विश्वासघात,

खून, इत्यादि क्रिया केल्या पाहिजेत; तसेंच ज्या कोणास विशेष कामेच्छा म्हणजे स्त्रीभोगेच्छा आहे त्यांस अनीतीच्या क्रिया केल्या पाहिजेत; असें केल्यावांचून त्यांची यथेष्टाचरणाची इच्छा तृप्त व्हावयाचीच नाहीं. वेदप्रतिपाद्यधर्मानें या यथेष्टाचरणास अडथळा केला आहे. वरील लोकांस तर आपले यथेष्टाचरण चालवावयाचें, तेव्हां अर्थातच या मतवादी लोकांनीं वेदप्रतिपाद्यधर्ममतास एकीकडे झुगारून दिलें, व आपणास जसें पाहिजे तसें मत स्थापन केलें. पुनर्जन्म नाहीं असें मानल्यामुळें ते पातकाची भीतीच बाळगीत नसून मनास वाटेल त्या क्रिया करितात. याशिवाय या मतवाद्यांनीं गाईस अगर दुसऱ्या कोणत्याही पशूंस आत्मा नाहीं असें मानिलें आहे. यामुळें त्यांना मारिलें असतां पातक नाहीं असें जें त्यांनीं लिहिलें, तें त्यांचें लिहिणें मांस भोजनेच्छा तृप्त व्हावी अशा करितांच आहे. हे लोक मनुष्यांसच फक्त आत्मा आहे असें ह्मणतात. त्यांना आत्मा कशास म्हणावें असें जर विचारिलें तर सांगतां येत नाहीं. या लोकांना आत्म्याचें ज्ञान नसतां ते मनुष्याखेरीज इतर प्राण्यांस आत्मा नाहीं असें म्हणतात, हें त्यांचें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कारण पशूंना देखील त्यांच्या निर्वाहापुरतें ज्ञान असतें, व त्यास त्रास दिला असतां दुःख होतें असें आपल्या अनुभवास येतें. मनुष्य जसा सजीव आहे तसेच इतर प्राणीही सजीव आहेत, निर्जीव नाहींत. प्राण्यांचें अंगीं सजीवत्व असणें, व त्यास सुखदुःखाचें भान होणें हें आत्मा असल्याखेरीज होत नाहीं असें सिद्ध आहे. त्यांचे धर्मांत कोठेंही आत्म्याचा निर्णय केलेला नसून एकदम मनुष्यांखेरीज इतर प्राण्यांस आत्मा नाहीं असें म्हटलें हें त्यांनीं आपल्या यथेष्टाचरणास अनुकूल मत ठरविलें आहे असें दिसतें. ज्या अर्थी त्यांच्या धर्मांत जीव, प्राण व आत्मा असें एकच वस्तूस मानून आत्म्याचा स्वतंत्र निर्णय कोठें

केलेला आढळत नाहीं, त्या अर्थीं त्यांनीं आत्मा हा शब्द वेदप्रतिपाद्यधर्मांतील लोकांच्या बोलण्यांत येणारा घेऊन, त्याचा त्यांनीं अंगिकार केला आहे असें दिसतें. आत्मा कशास ह्मणावें हें त्यांना कळलेंच नाहीं. वेदप्रतिपाद्यधर्मांत आत्मा हा शब्द साक्षात् निराकार सर्वव्यापी असणाऱ्या ईश्वरास लाविला आहे, यास प्रमाण—

श्लोक श्रीमच्छंकराचार्य उवाच.

**एवं देह द्वयादन्य आत्मा पुरुष ईश्वरः ।**
**सर्वात्मा सर्व रूपश्च सर्वातीतोहमव्ययः ॥**

ह्मणजे मी ईश्वर सर्वांचा आत्मा असून प्राणीमात्रांच्या देहांत मला आत्मा, पुरूष, ईश्वर अशा नांवें आहेत. दुसरें प्रमाण—

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशय स्थितः ॥**
**अहमादिश्च मध्यंच भूतानामंत एवच ॥**

गीता अ. १० श्लो. २०

हे अर्जुना, या शरीरांतील हृदयस्थ ज्ञात्याच्या ज्ञानानें मी मला ओळखत नाहीं असें आपण आपलें अज्ञानस्वरूप दाखविणाऱ्या जीवभूता, तूं स्वअज्ञानरूपी निद्रेवर तिचा नाश करण्याचा अंमल बसविलास, तस्मात् तं गुडाकेश आहेस. यास्तव हे गुडाकेश, अहमात्मा ह्मणजे मी, एक अनेक असा निराकार परमात्मा आहे. तो मी तुह्मी जे सर्व जीवभूत आपआपणांस आहों असें मानितां त्या तुमचें आपलेंपण मानण्याचें जें अनेकरूपी अभावरूप त्या अनेकरूपी अभावरूपाच्या राहण्याच्या आशयांत ह्मणजे अभावरूपी अर्थस्थानांत एकरूपी, जो परमात्मभाव आहे तो मी परमात्मा आहे; तो तुमच्या जीवभूत प्रकृतीच्या पूर्वीं आहे, अंतीं आहे व मध्यें जे तुह्मी माझें अभावरूप आहां त्या ठिकाणीं आद्यंतासारखाच तुमच्यामध्यें आहे. तो सर्पभासाच्या आदि, मध्य, अंतीं सत्य रज्जू, तसा सर्वभूत आशयांत ह्मणजे मिथ्याभासांत मी

त्रिकाळीं सत्य आहे. या वेदप्रतिपाद्यधर्मांतील प्रमाणावरून आत्मा हा साक्षात् ईश्वर आहे व तो सर्वप्राणिमात्रांच्या शरीरांत सारखा व्याप्त आहे असें स्पष्ट सिद्ध केलें आहे. हा विचार या मतवाद्यांना माहीत नसल्यामुळें व ईश्वराचें सत्यज्ञान त्यास नसल्यामुळें आत्मा म्हणजे ईश्वर हा मनुष्यप्राण्यांखेरीज इतर प्राण्याचे शरीरांत नाहीं असें ते म्हणतात; व प्राण्यांना त्यांची दया न करितां चिरून खातात. त्यांना बोध करावयास गेलें असतां प्राण्यांनीं आह्मांस शरीर अर्पण केलें असून त्यास आत्मा नसल्यामुळें, मारलें असतां पाप नाहीं असें ते म्हणतात. हें त्यांचें पूर्ण अज्ञान आहे असें सर्वांनीं समजून त्यांच्या मोहपाशांत कोणीं पडूं नये, अशी विनंती आहे. अशा रीतीनें या मतवाद्यांचे पक्ष अगदीं अलीकडील असून स्वकल्पित आहेत. त्यांत धर्म व नीति मुळींच नाहीं. या तिन्ही मतांचे लोकांस पुढें जर जन्म नाहीं तर तुम्हांस ईश्वरोपासना करून काय करावयाचें आहे असें विचारलें तर, पुनः ते म्हणतात कीं, जीव अमर असून देहपातानंतर तो मागें राहतो; त्यास पुनः देह धरून जन्म घ्यावा लागत नाहीं. तो पुण्यवान असल्यास अल्ला (गॉड) याचे मकानासभोंवतीं (घरासभोंवतीं) फिरतो, व पातकी असल्यास थडग्यांत पडून राहतो. त्या पातकी जीवाचे सृष्टीच्या प्रळयकालीं एक वेळ न्याय करून जें काय करावयाचें तें ईश्वर करील; त्यानें आम्हांस उत्पन्न केलें आहे म्हणून आम्हीं त्यास भजतो असें कांहीं तरी सांगतात. आह्मी या तिन्ही मतांचे लोकांस खालीं लिहिलेले प्रश्न विचारतों व त्यांचें उत्तर ते कसें उडवाउडवीचें व अन्यायाचें देतात तेंही वाचकांचे लक्ष्यांत येण्याकरितां देतों. त्यावरून वाचकांची खात्री होईल.

अहो मतवादी लोकहो, तुम्हांस ईश्वरानें जन्मास कां घातलें? तुह्मी

सर्व जर परमेश्वराचीं लेंकरें आहांत व तुम्हांस पूर्वीचा जन्म नसल्यामुळें तुमच्यांपैकीं कोणासही पापपुण्य नाहीं, तर मग ईश्वरानें तुम्हांपैकीं एकास निर्धन, एकास सधन, एकास अंधळा, एकास डोळस, एकास सुखी, एकास दुःखी असें कां निर्माण केलें? यांत त्याचा फायदा काय? हें ईश्वराचें करणें पक्षपाताचें होत नाहीं काय! ईश्वर का अन्यायी आहे? जर अन्यायी असला तर ईश्वर मोठा न्यायी आहे असें कसें म्हणतां? तो जर दयाळु आहे तर तुमच्या प्रार्थनेस भुलून तो दुःखांतून तुम्हांस केव्हां सोडवील? सध्यां जे अतिदुःखांत प्राणी आहेत त्यांना पुनर्जन्म जर नाहीं तर ईश्वर सुख केव्हां देणार? अशा रीतीचें आमचे या तिन्ही मतवादी लोकांस प्रश्न आहेत. हे प्रश्न या मतवादी लोकांस केले असतां यांपैकीं एकाही प्रश्नाचें उत्तर त्याना देतां येत नाहीं; उत्तर दिलेंच तर या सर्व प्रश्नास मिळून ते एकच उत्तर देतात कीं, ईश्वराचा हा खेळ आहे; त्याला वाटेल तसें तो करितो. या उत्तरावर आमचा फिरून प्रश्न आहे कीं, ज्या खेळाचेयोगें अगर तुमचे ईश्वराच्या इच्छेच्यायोगें आम्हां प्राण्यांस व्यर्थ दुःख भोगावें लागतें, तो खेळ अथवा ती इच्छा काय कामाची? त्याचा खेळ होतो पण आमचा जीव जातो. असें करणें ईश्वरास अन्यायी ठरवीत नाहीं काय? असा या मतवादी लोकांस प्रश्न केला म्हणजे ते एक शिवीगाळ तरी करितात, अगर त्रासून निघून तरी जातात. अशा प्रकारें त्यांचें मत पूर्ण खंडन होऊन वेदप्रतिपाद्यधर्म खरा ठरतो. कारण या प्रश्नांचीं उत्तरें वेदप्रतिपाद्यधर्मांत समर्पक दिलेलीं आहेत; व कोणत्याही प्रश्नोत्तरावर शंकाही राहत नाहीं. म्हणून वेदप्रतिपाद्यधर्मच खरा; बाकीचीं मतें हो मतें! समजा व वेदप्रतिपाद्यधर्माचा आश्रय करून कल्याण करून घ्या. पहा एके ठिकाणीं म्हटलें आहे.—

तावद्गर्जंति शास्त्राणि जंबुका विपिनें यथा ।
न गर्जति महाशक्ति यावद्वेदान्त केसरी ॥

म्हणजे जोंपर्यंत जगद्रूपी अरण्यांत महा शक्तिमान् वेदान्तरूपी सिंहाची आरोळी कडाडली नाहीं तोंपर्यंतच मतवाद्यांचीं शास्त्रें कोल्ह्या-प्रमाणें कुहे कुहे करितात. पहा कोल्ह्याप्रमाणें कुहे कुहे करणारीं शास्त्रें वेदांत सिंहाच्या आरोळ्या ऐकून भिऊन लपून गुपचुप बसतात.

जसा पतंग नांवाचा कीटक दीपकास आपलें भक्ष्य समजून, त्यास भक्षावयाचे हेतूनें त्यावर उडी घालितो व शेवटीं आपणच जळून मरतो, त्याप्रमाणेंच वेदप्रतिपाद्यधर्मापुढें इतर मतें टिकत नाहींत. इतर मतवाद्यांनीं वेदप्रतिपाद्यधर्मातील मतें खंडन करावीं म्हणून जों जों प्रयत्न चालविला तों तों वेदप्रतिपाद्यधर्माचा प्रकाश अधिकच पडूं लागला. व सूर्यापुढें जसा खद्योत, तशीं हीं सर्व मतें भासूं लागलीं. करितां वेदप्रतिपाद्यधर्माविरुद्ध कोणी मत काढूं नये व समजावें कीं, सृष्टींतील सर्व प्राणिमात्रांचा वेदप्रतिपाद्यधर्म असून बाकीचीं सर्व मतें आहेत.

**प्रश्न**—वेदप्रतिपाद्यधर्मास अद्वैत धर्म कां म्हणतात ? जर तो अद्वैत आहे तर त्यांत जीव आणि ईश्वर असे भेद कां झाले आहेत ? तसेंच ईश्वर, जीव, व आत्मा अशीं जर एकासच नांवें आहेत तर पापपुण्याचें फल जें सुखदुःख तें कोणास भोगावें लागतें ? याचा निर्णय करून सांगावा.

**उत्तर**—वेदप्रतिपाद्यधर्मास अद्वैतधर्म म्हणावयाचें कारण असें आहे कीं, या अनंत ब्रम्हांडास अधिष्ठान असें जें एक परब्रह्म तत्त्व आहे तें स्वतः अनादिसिद्ध अचळ, असें आहे. तें निर्विकल्प असल्यामुळें त्यास जगताची कल्पना सुद्धां नाहीं. तें स्वसंवेद्य असल्यामुळें त्यास कोणी जाणूं शकत नाहीं. तें सर्वव्यापी असल्यामुळें तें नाहीं

असें रिकामें स्थळच नाहीं. तें निर्विकार असल्यामुळें त्यास त्रिगुणांचा विकार होत नहीं. या परब्रह्म तत्त्वाप्रमाणें दुसरें कोणतेंही तत्त्व नाहीं. म्हणजे परब्रह्माप्रमाणें शाश्वत, निर्विकारी निर्गुणी, अचल, स्वसंवेद्य अशी जगांत कोणतीही वस्तु नाहीं कीं, जी परब्रह्माची बरोबरी करील. जर परब्रह्माच्या जोडीस दुसरें तत्त्वच नाहीं तर परब्रह्मास अद्वैत कां न म्हणावें ?

या अद्वैत परब्रह्माचे ज्ञानप्राप्तीचा मार्ग वेदप्रतिपाद्यधर्मांत सांगितला असल्यामुळें वेदप्रतिपाद्यधर्मास अद्वैत धर्म म्हणतात. याशिवाय त्या परब्रह्मतत्त्वावांचून दुसरी जगद्रुपी वेगळी वस्तूच नाहीं असा वेदप्रतिपाद्यधर्माचा सिद्धांत असल्यामुळेंही त्यास अद्वैत धर्म असें नांव आलेलें आहे. तिसरें कारण असें आहे कीं, परब्रह्म स्वसंवेद्य म्हणजे तो त्यावांचून इतराकडून जाणवला जात नाहीं. त्याचे ठिकाणीं स्वतःस जाणण्याचा जो गुण आहे तो त्याचे ठायीं स्वयंभूच असल्यामुळें त्यास ‘ अहंब्रह्म किंवा ब्रह्माहमस्मि ’ असा स्मरणरूप गुण झाला हें म्हणणेंच शोभत नाहीं. अहंब्रह्म असें जें ब्रम्हाचें ठायीं अखंड स्मरण आहे, त्यांत अन्य वस्तूचें विकल्परूप स्मरण नसल्यानें, त्यास त्या स्मरणामुळें द्वैतत्त्व येत नाहीं. ‘ अहं ब्रह्म ’ या स्मरणरूप चिंतनाचा परब्रह्मस्थानीं कधींही वियोगच नसल्यामुळें त्या परब्रह्म तत्त्वास आपलें ‘ अहंब्रह्म ’ असें मुद्दाम स्मरण करावें लागत नाहीं. तें त्यास सहज आहे. त्या सहज स्मरणामध्यें ज्ञानरूप तत्त्वाची एक सत्ता आहे. त्या सत्तेसच पुरुष किंवा आत्मा असें म्हणतात. हाच जगाचा पिता होय. त्या सत्तारूप पुरुषाचे स्थानीं ‘ अहं ब्रह्म ’ अशी जी स्फुरद्रूप स्वयंभू भावना हीच प्रकृति अगर माया समजावी. हीस जगाची माताही म्हणतात. या प्रकृतिपुरुषाचे अस्तित्व परब्रह्मस्थानीं भिन्न नसल्यामुळें त्यास या आपल्या प्रकृतिपुरुषास जाणतां येत नाहीं व उत्पन्न-

ही करितां येत नाहीं. यामुळें परब्रह्म हें अकर्ते निरंजन, व निर्विकल्प असें आहे. या प्रकृतिपुरुषास परब्रह्मानें उत्पन्न केलें नसल्यामुळें त्यासही वेदादि ग्रंथांत अनादि असें म्हटलें आहे. परब्रह्म जर नसेल तर त्याची-ही प्रकृतिपुरुषरूपता म्हणजे स्मरणाविस्मरणरूपशक्ति असणें संभव-नीय नाहीं. म्हणून परब्रह्म हें या अनादि प्रकृतिपुरुषरूपास आदि आहे. परंतु परब्रह्मस्थानीं हीं दोन वेगळीं नसल्यामुळें परब्रह्म त्यास आदिही नाहीं. परस्पराहून परस्पर वेगळें व्हावें तरच एकानें दुस-ऱ्यास आदि असावें असा न्याय आहे. म्हणून परब्रह्म हें या प्रकृति-पुरुषास आदि नाहीं यामुळें प्रकृतिपुरुषही अनादि आहेत; व पर-ब्रह्मावांचून हीं स्वतंत्र असूं शकत नाहींत म्हणून अनादि नाहींत. अशीं हीं प्रकृतिपुरुषरूपी दोन तत्त्वें ना आदि व ना आनादि आहेत. यांस आदि आनादि हे शब्दच लागू होत नाहींत. आतां मागें सांगि-तलेल्या सिद्धांताप्रमाणें जर परब्रह्म या प्रकृतिपुरुषास जाणत नाहीं व उत्पन्न करीत नाहीं तर प्रकृतिपुरुषरूपी जोडपें म्हणजे ज्ञानाज्ञानरूपी जोडपें परब्रह्मीं काल्पनिक आहे असें ठरलें व परब्रह्म कल्पनातीत आहे असा न्याय झालाच. जर ही प्रकृतिपुरुष-रूप माया परब्रह्म स्थानीं काल्पनिक आहे असें वेदादि ग्रंथावरून सिद्ध आहे तर माया शब्दाचा मा म्हणजे नाहीं व या म्हणजे जी असा जो अर्थ करितात तो योग्यच आहे. जर मायाच नाहीं तर मायेचें आद्य-बीज शून्यच असलें पाहिजे व परब्रह्म हें शून्यातीत निःशून्य आहे असें ठरलें. येणेंप्रमाणें या प्रकृतिपुरुषरूप मायेचें रूप असल्यावरून तीस सत् ना असत् अथवा अनिर्वचनीय म्हणतात हें योग्य आहे.

मागें जो परब्रह्मस्थानीं सत्तारूप पुरुष सांगितला, त्यासच ईश्वर अगर आत्मा असें नांव आहे. ह्या आत्म्याची व्याप्ति सर्वाकाशस्थानीं सारखी आहे. आत्म्याचे अंगीं ज्ञान हा स्वभावसिद्ध गुण आहे.

ज्ञानाला स्वरूपाचें स्मरण असतें, पण स्मरणाला मात्र ज्ञानावांचून अस्तित्वच येत नाहीं. यावरून या स्मरणरूप प्रकृतीस जडच म्हटलें पाहिजे, व ज्ञानवान आत्म्यास चैतन्य म्हटलें पाहिजे हें उघडच आहे. मागें सांगितलेंच आहे कीं, आत्म्याचे ठिकाणीं स्मरण हें अक्षय आहेच, यावरून लक्षांत येईल कीं, चैतन्य आत्मा, व जड प्रकृति मिळून ज्याअर्थी एकवट नांदतात, त्याअर्थी प्रकृतिपुरुष मिळून चिज्जडरूप आहे. 'यथा बीजं तथांकुरः' या सिद्धांताप्रमाणें ज्याअर्थी जगांत जड चैतन्य अशीं मुख्य दोन तत्त्वें दिसतात त्याअर्थी या जगाचें आद्यबीजरूपही चिज्जडच ( जड चैतन्य मिळून होणारें रूप ) असलें पाहिजे. आपणांस या स्थळीं प्रकृतिपुरुष मिळून जें रूप आहे तें चिज्जड आहे असें कळून आलेंच आहे. त्यावरून हें जड-चैतन्यमय जगत् चिज्जड जे प्रकृतिपुरुष त्यापासून उत्पन्न झालें आहें असें सिद्ध झालें. ( या सृष्ट्युत्पत्तीचा सविस्तर विचार याच ग्रंथांतील चौथे प्रकरणांत केला आहे; तो पाहिला असतां सृष्टि कशी झाली हें कळेल ) 'आत्मा पुरूष ईश्वरः' या मागें सांगितलेल्या प्रमाणावरून आत्म्यालाच पुरुष, ईश्वर इत्यादि नांवें आहेत हेंही उघड झालें, व आत्मा कशास म्हणतात हेंहीं सांगितलें. जीव व ईश्वर एक कसे व जर ते एकरूप आहेत तर पाप पुण्याचें फल जें सुखदुःख तें कोणास भोगावें लागतें हें आतां पहावयाचें आहे.

प्रकृति ही जड असून अति स्वच्छ आहे. तीसच पराप्रकृति म्हणतात. या प्रकृतीपासून पंचमहाभूतें व त्रिगुण मिळून आठ तत्त्वें उत्पन्न होतात. त्यांस अष्टधाप्रकृति असें नांव आहे. ही अष्टधाप्रकृति यास्थळीं घ्यावयाची नाहीं, मूळ प्रकृति घ्यावयाची. या प्रकृतीसच अविद्या असेंही एक नांव आहे. या अविद्येस शरीरांत बुद्धि असें म्हणतात. त्या बुद्धींत सच्चिदानंद आत्म्याचें प्रतिबिंब पडतें,

ही करितां येत नाहीं. यामुळें परब्रह्म हें अकर्तें निरंजन, व निर्विकल्प असें आहे. या प्रकृतिपुरुषास परब्रह्मानें उत्पन्न केलें नसल्यामुळें त्यासही वेदादि ग्रंथांत अनादि असें म्हटलें आहे. परब्रह्म जर नसेल तर त्याचीही प्रकृतिपुरुषरूपता म्हणजे स्मरणाविस्मरणरूपशक्ति असणें संभवनीय नाहीं. म्हणून परब्रह्म हें या अनादि प्रकृतिपुरुषरूपास आदि आहे. परंतु परब्रह्मस्थानीं हीं दोन वेगळीं नसल्यामुळें परब्रह्म त्यास आदिही नाहीं. परस्पराहून परस्पर वेगळें व्हावें तरच एकानें दुसऱ्यास आदि असावें असा न्याय आहे. म्हणून परब्रह्म हें या प्रकृतिपुरुषास आदि नाहीं यामुळें प्रकृतिपुरुषही अनादि आहेत; व परब्रह्मावांचून हीं स्वतंत्र असूं शकत नाहींत म्हणून अनादि नाहींत. अशीं हीं प्रकृतिपुरुषरूपी दोन तत्त्वें ना आदि व ना आनादि आहेत. यांस आदि आनादि हे शब्दच लागूं होत नाहींत. आतां मागें सांगितलेल्या सिद्धांताप्रमाणें जर परब्रह्म या प्रकृतिपुरुषास जाणत नाहीं व उत्पन्न करीत नाहीं तर प्रकृतिपुरुषरूपी जोडपें म्हणजे ज्ञानाज्ञानरूपी जोडपें परब्रह्मीं काल्पनिक आहे असें ठरलें व परब्रह्म कल्पनातीत आहे असा न्याय झालाच. जर ही प्रकृतिपुरुषरूप माया परब्रह्म स्थानीं काल्पनिक आहे असें वेदादि ग्रंथावरून सिद्ध आहे तर माया शब्दाचा मा म्हणजे नाहीं व या म्हणजे जी असा जो अर्थ करितात तो योग्यच आहे. जर मायाच नाहीं तर मायेचें आद्यबीज शून्यच असलें पाहिजे व परब्रह्म हें शून्यातीत निःशून्य आहे असें ठरलें. येणेंप्रमाणें या प्रकृतिपुरुषरूप मायेचें रूप असल्यावरून तीस सत् ना असत् अथवा अनिर्वचनीय म्हणतात हें योग्य आहे.

मागें जो परब्रह्मस्थानीं सत्तारूप पुरुष सांगितला, त्यासच ईश्वर अमर आत्मा असें नांव आहे. ह्या आत्म्याची व्याप्ति सर्वाकाशस्थानीं सारखी आहे. आत्म्याचे अंगीं ज्ञान हा स्वभावसिद्ध गुण आहे.

ज्ञानाला स्वरूपाचें स्मरण असतें, पण स्मरणाला मात्र ज्ञानावांचून अस्तित्वच येत नाहीं. यावरून या स्मरणरूप प्रकृतीस जडच म्हटलें पाहिजे, व ज्ञानवान आत्म्यास चैतन्य म्हटलें पाहिजे हें उघडच आहे. मागें सांगितलेंच आहे कीं, आत्म्याचें ठिकाणीं स्मरण हें अक्षय आहेच, यावरून लक्षांत येईल कीं, चैतन्य आत्मा, व जड प्रकृति मिळून ज्याअर्थीं एकवट नांदतात, त्याअर्थीं प्रकृतिपुरुष मिळून चिज्जडरूप आहे. 'यथा बीजं तथांकुरः' या सिद्धांताप्रमाणें ज्याअर्थीं जगांत जड चैतन्य अशीं मुख्य दोन तत्त्वें दिसतात त्याअर्थीं या जगाचें आद्यबीजरूपही चिज्जडच ( जड चैतन्य मिळून होणारें रूप ) असलें पाहिजे. आपणांस या स्थळीं प्रकृतिपुरुष मिळून जें रूप आहे तें चिज्जड आहे असें कळून आलेंच आहे. त्यावरून हें जड-चैतन्यमय जगत् चिज्जड जे प्रकृतिपुरुष त्यापासून उत्पन्न झालें आहे असें सिद्ध झालें. ( या सृष्ट्युत्पत्तीचा सविस्तर विचार याच ग्रंथांतील चौथे प्रकरणांत केला आहे; तो पाहिला असतां सृष्टि कशी झाली हें कळेल ) 'आत्मा पुरूष ईश्वरः' या मागें सांगितलेल्या प्रमाणाव-रून आत्म्यालाच पुरुष, ईश्वर इत्यादि नांवें आहेत हेंही उघड झालें, व आत्मा कशास म्हणतात हेंही सांगितलें. जीव व ईश्वर एक कसे व जर ते एकरूप आहेत तर पाप पुण्याचें फळ जें सुखदुःख तें कोणास भोगावें लागतें हें आतां पहावयाचें आहे.

प्रकृति ही जड असून अति स्वच्छ आहे. तीसच पराप्रकृति ह्मण-तात. या प्रकृतीपासून पंचमहाभूतें व त्रिगुण मिळून आठ तत्त्वें उत्पन्न होतात. त्यांस अष्टधाप्रकृति असें नांव आहे. ही अष्टधा-प्रकृति यास्थळीं घ्यावयाची नाहीं, मूळ प्रकृति घ्यावयाची. या प्रकृ-तीसच अविद्या असेंही एक नांव आहे. या अविद्येस शरीरांत बुद्धि असें ह्मणतात. त्या बुद्धींत सच्चिदानंद आत्म्याचें प्रतिबिंब पडतें,

त्यासच जीव म्हणावें. हाच हरएक शरीरांतील क्षेत्रज्ञ म्हणजे शरीरास व सुखदुःखास जाणणारा आहे. (या जीवोत्पत्तीचा व सुखदुःखाचे भोगासंबंधीं विशेष खुलासा चौथे प्रकरणांत केला आहे.) जसें सर्व घटीं व्यापक असणारें आकाश सहसा हलत नाहीं, तसें महदाकाश स्थानापन्न असणारें जें आत्मतत्त्व तें सदा अचल आहे. जसें सर्वगत असणारें आकाश घटांतील जळांत प्रतिबिंबित होऊन तें प्रतिबिंबाकाश हलत आहे असें दिसतें. तसेंच सर्वगत असणारा जो आत्मा त्या आत्म्याचें प्रतिबिंब जेव्हां बुद्धिरूपजलांत पडतें तेव्हां त्यांतील प्रतिबिंबासच जीव असें म्हणतात. आत्मा एक आहे व तोच प्रतिबिंब रूपानें अनेक होतो. जसें एकच महदाकाश सर्वगत असून त्याचें अनेक घटजळीं प्रतिबिंबरूपानें येणें होतें तसेंच जो कूटस्थ असणारा आत्मा त्याचे अनेक शरीरीं जें बुद्धिजळ आहे त्या जळांतप्रतिबिंब रूपानें येणें होतें. बुद्धिस्थानीं असणारें जें प्रतिबिंबरूप त्या रूपानें आत्म्यालाच जीव असें उपाधियोगें नाम प्राप्त झालें आहे. जीव ज्याचें प्रतिबिंब आहे त्या बिंबरूपास आत्मा असें म्हणतात. या प्रकारें आत्मरूपाचे दोन भेद झाले. एक सर्वगतात्मा व दुसरा प्रतिबिंबात्मा. सर्वगतात्म्यास सुखदुःखाचें भोक्तृत्व नाहीं. परंतु त्याचें प्रतिबिंबात्म्यास सुखदुःखाचें भोक्तृत्व आहे, वायूच्यायोगें जल हलूं लागलें म्हणजे त्यांतील प्रतिबिंबाकाश हलूं लागतें. त्याप्रमाणेंच बुद्धिरूपी जल प्रारब्धरूप वायूच्यायोगें हलूं लागलें म्हणजे त्यांतील प्रतिबिंबित जीवात्माही हलूं लागतो. प्रारब्धरूप वायूचे योगें बुद्धिजल चंचल होऊन त्यांतील प्रतिभासिक जीवात्माही चंचल होतो. अशा वेळींच जीवात्म्यावर सुखदुःखाचे परिणाम होतात एरव्हीं होत नाहींत. जीवात्मा जेव्हां आपले आत्मरूपाशीं ऐक्य पावतो तेव्हां सुखदुःखाचे परिणाम त्यावर होत नाहींत. जीवात्म्यास आत्मैक्य तीन रीतीनें प्राप्त

करून घेतां येतें. आत्मस्वरूपाचें ज्ञान झालें असतां, योगसाधन करून समाधियोग सिद्ध केला असतां, व निजलें असतां. त्यांपैकीं सुषुप्ति अवस्थेचा अनुभव सर्वांस आहे. सुषुप्ति अवस्थेंत म्हणजे गाढ निद्रेंत जीवात्म्यास आत्मरूपबिंबाशीं युक्त होतां येतें, त्यामुळें त्यास सुखदुःख भोगावें लागत नाहीं. पाण्याचे अटण्यानें जसें त्यांतील प्रतिबिंबाकाश महदाकाशीं ऐक्य पावतें, तसेंच सुषुप्तिरूपी तेजानें बुद्धिरूप जल शोषून घेतलें, म्हणजे जीवात्म्यास आत्मैक्यता येते. ही बिंबैक्य स्थिति वनस्पतीखेरीज इतर प्राण्यांना अक्षय नाहीं. याचें कारण प्रारब्ध हेंच होय. प्रारब्धरूपी वायूचे योगें बुद्धिजळ चंचळ होऊन त्यांतील प्रतिबिंबरूप चैतन्य आत्म्याहून वेगळें पडतें. हें प्रतिबिंबरूप चैतन्य व बुद्ध्यादि जडेंद्रियें आत्मप्रभेनें चिज्जड होऊन सुखदुःख भोगितात. याचें कारण अशा वेळीं प्रारब्धयोगें जीव हा घाबरा होतो. त्या वेळीं बुद्धिरूप जळाच्या लाटा म्हणजे विषयादिकांच्या वासना उसळूं लागतात. त्यांत अहंपणाची लाट पहिली होय. बुद्धीच्या ठिकाणीं अनेक विषयरूप लाटांचा उगम होऊं लागला म्हणजे जीवास सुखदुःख भासूं लागतें. सुखदुःखाचा भोग होणें हें मुख्यत्वें अहंपणरूपी लाटेवर अवलंबून आहे. जागृत् काळीं मीपणाचें स्मरण व अस्तित्व असतें म्हणून सुखदुःखाचे परिणाम जीवावर होतात. ज्या वेळीं मीपणाचें स्मरण प्राणिमात्रांस नसतें, त्या वेळीं सुखदुःखाचे भोगही प्राणिमात्रांस भोगावे लागत नाहींत. मीपणाचें स्मरण झोंपेंत नसतें, व त्या वेळीं शरीरांवर ज्वरादि विकार असतां सुखदुःख होत नाहीं असा सर्वांस अनुभव आहे. योग्यास सुषुप्ति सारखी स्थिति समाधीमध्यें प्राप्त होते. त्यामुळें तो समाधि घेऊन बिंबाशीं ऐक्य झाला ह्मणजे सुखदुःखाचे तडाक्यांत सांपडत नाहीं. परंतु बहुतकरून असें होतें कीं, प्रारब्धयोगें सुखदुःखाचे

भोग भोगण्याची वेळ आली, म्हणजे बुद्धि आत्मरूपबिंबापासून वेगळी पडते. बुद्धीचे वेगळे पडण्यामुळें तिचे ठिकाणीं आत्मरूप बिंबाचे प्रतिबिंब जो जीव तो निर्माण होतो. तो निर्माण झाला कीं, त्यास सुखदुःखाचें भान झालेंच. तस्मात् सिद्धच झालें कीं, बुद्धीचा व आत्मतत्त्वाचा जो वियोग तोच भोग आहे. आतां कोणी म्हणेल कीं, जीवाप्रमाणेंच आत्म्यालाही सुख भोगावें लागत असेल, परंतु तसें नाहीं, आत्मा सर्वदा अलिप्त आहे. याचें कारण दुसऱ्या वस्तूस लिप्त करणारे जे सत्व, रज, तम हे गुण आहेत ते त्याला लिप्त करूं शकत नाहींत. जीवास त्रिगुणोपाधि आहे त्यामुळें त्यास भोक्तृत्व आहे. रज तम विरहित जें आत्मतत्त्व त्यास सुखदुःख कसें व्हावें? चैतन्य म्हणजे सर्वगत आयतेंच असणारें परब्रह्मतत्त्व व सत्वगुण या दोहोंमुळें आत्मरूपवृत्ति व जीवरूपवृत्ति निर्माण झाली हें खरें, पण या दोहोंमध्यें स्पष्ट भेद आहे. आत्मवृत्ति सात्विक आणि विद्यामय अशी आहे; व जीववृत्ति त्रिगुणांनीं मिश्रित असून अविद्यामय आहे. अविद्येचे दोन भेद आहेत. एक विक्षेप आणि दुसरा आवरण. अविद्या जरी नष्ट झाली म्हणजे रज, तम गुणरहित अशा शुद्ध सत्त्वरूप बुद्धीला परब्रह्म तत्त्व कळलें, तरी देहेंद्रियें असल्यामुळें प्रारब्ध वायु त्या बुद्धीला चंचल करतोच. त्या समयीं रज, तम असे दोन्ही गुण बुद्धीस मिळून त्यायोगें जीव विषयेच्छा धरितो, आणि या इच्छेमुळें तो पापपुण्याचीं कृत्यें करून बद्ध होतो. याप्रमाणें पापपुण्याचें फल जें सुखदुःख तें जीवासच भोगावें लागतें, आत्म्यास नाहीं. असें जरी आहे तरी जीवाचें आत्मरूप म्हणजे चिद्रूप ईश्वरतत्त्वच आहे, त्यामुळें जीव व ईश्वर यांचेमध्यें अंतर नाहीं. आत्म्याचें जें अभावरूप म्हणजे त्याचें प्रतिबिंबरूपानें अनेक होणें यासच जीव म्हणतात. अशा प्रकारें एका सच्चि-

दानंद परब्रह्माचे ठायीं, जीं अनेक ब्रम्हांडें व त्यांतील अनेक प्राणी, व आद्य जे चिज्जड प्रकृतिपुरुष, हीं सर्व परब्रह्मरूप भात्ररूप क्षेत्राचें अभावरूप क्षेत्र असल्यामुळें द्वैत सिद्ध होत नाहीं. ह्मणून वेदप्रातिपाद्यधर्मास अद्वैत धर्म ह्मणततात तें योग्यच आहे. या वर लिहिलेल्या जीवात्मन्यायास अनुसरून वामनं पंडितांनीं म्हटलें आहे.

श्लोक भुजंगप्रयात.

अणुत्वा महत्वा न हा जीव साहे।
स्वनानात्व एकत्वही जो न लाहे॥
ह्मणोनी अनेका जळीं सूर्य नाना।
तसा जीव सिद्धांत दूजा घडेना॥ १॥

द्रुतविलंबितवृत्त.

ह्मणउनी श्रुतिही वदति असे।
स्मृति पुराण कदंब वदे तसें॥
सकळ बिंब हरी प्रतिबिंब हा।
जितुकिजे तनुहा तितुका पहा॥ २॥
सकळ जीव कदंब हरी स्वयें।
अनुभवी प्रतिबिंबपणें भयें॥
लय सुषुप्तित नित्य तदैक्यता।
हरिस कां न घडे सकळात्मता॥ ३॥
अनुभवी सुखदुःख पृथक्पणें।
डळमळी जळीं भानु न आणणें॥
अणुमहत्व उपाधिगुणें तया।
प्रकृति ईश अनीशपणें जया॥ ४॥

अनीश माया प्रतिबिंब रूपी।
ईशत्व तें बिंब सुख स्वरूपी॥
अनीश्वरोपाधिमध्यें अविद्या।
उपाधि जो ईशपणांत विद्या॥ ५॥
दुःखादिभोक्तृत्व अनीश्वराशी।
भोक्तृत्व नाहीं परमेश्वरासी॥
सिद्धांत ऐसा सकळ श्रुतींचा।
ज्या 'द्वासुपर्णा' दिक वेदवाचा॥ ६॥

येणेंप्रमाणें या प्रकरणांत वेदबाह्य मतांचे सिद्धांत सांगून त्यांचें थोडक्यांत खंडन केलें; आणि वेदप्रतिपाद्यधर्माचें महत्त्व सांगून त्यास अद्वैत धर्म म्हणण्याचें कारणही सांगितलें. वेदप्रतिपाद्यधर्मांतील सिद्धांतापुढें इतर मतें तुच्छ आहेत हें पुढील वामन पंडिताचे उक्तीवरून स्पष्ट दाखवून हा भाग आटोपता घेतों.

श्लोक.

वेदाश्रितें भेद मतें समस्तें।
झालीं पहा येरिति येत अस्तें॥
सिद्धांत हा भास्कररूप जेथें।
भेदांधकारा बळ काय तेथें॥ १॥

वामन पंडितकृत.

# प्रकरण दुसरें.

## सारासार विचार.

आहार निद्रा भय मैथुनानि
समानि चैतानि नृणां पशूनाम्।
ज्ञानं नराणा मधिको विशेषो
ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥

जगांत मानव, पश्वादि भूचर प्राणी, मत्स्यादि जलचर प्राणी, तसेंच पक्ष्यादि गगनचर प्राणी आहेत. या सर्वांस प्रयत्नावांचून आहार, निद्रा, भय व मैथून हे चार विषय उपजतच प्राप्त झाले आहेत; आणि हे चार विषय प्राप्त करून घेण्याचें ज्ञानही त्यांस उपजतच प्राप्त झालेलें आहे. पश्वादि इतर प्राणी क्षुधा लागली असतां, थकवा आला असतां, भय प्राप्त झालें असतां व कामविकार उत्पन्न झाला असतां, आहार कमविण्याचा उद्योग करितात, निद्रा घेतात, पळतात, किंवा सुरक्षित आश्रय पाहतात व मैथुनादिक क्रिया करितात. हीं कृत्यें करण्यास त्यांस कोणी शिकवावें अगर सांगावें लागत नाहीं. तसेंच मनुष्य प्राण्यांचेंही आहे. मनुष्यांनाही हे वरील विषय कमविण्याची अवश्यकता प्राप्त झाली असतां तेही सांगितल्यावांचून अगर शिकविल्यावांचून विषयप्राप्त्यर्थ उद्योग करीत असतात. यावरून उघड होत आहे कीं, मनुष्य व पश्वादि इतर प्राणी विषयप्राप्तीचे कर्माच्या मानानें सारखेच आहेत. त्यांमध्यें अंतर फारसें दिसत नाहीं.

सृष्टीमध्यें सर्व विषय ईशकृपेनें आयतेच उत्पन्न झाले असल्यामुळें व ते कमविण्याचे कामीं प्रयत्न करण्याची बुद्धीही आयतीच प्राप्त झाली असल्यामुळें प्राणिमात्रांस विषयचिंतन व विषयप्राप्तीची विशेषशी

काळजी करण्याचें कारण नाहीं. थोडेबहुत मानानें सर्व प्राण्यांस विषयप्राप्ति होतेच. शरीरासच कर्म ही संज्ञा असल्यामुळें शरीर हें कर्म केल्यावांचून राहणारच नाहीं. ह्मणून मनुष्यप्राण्यानें विषयांची काळजी करून ते कमविण्याचे कामीं आपलें आयुष्य खर्च केलें तर वरील श्लोकांतील उक्तीप्रमाणें त्यास पशुतुल्य म्हणण्यास हरकत नाहीं.

मनुष्यप्राण्यास एवढी थोरवी मिळण्याचें कारण असें आहे कीं, पश्वादि इतर प्राण्यांस फक्त विषयासंबंधीं विचार करण्याचें ज्ञान आहे. परंतु परमेश्वरप्राप्तीचा विचार करण्याचें साधन जें ज्ञान तें त्यांना नाहीं. तें मनुष्यांस मात्र आहे. म्हणून मनुष्यमात्रानें त्या ज्ञानाचा ईशप्राप्त्यर्थ अवश्य उपयोग केला पाहिजे. तसें जर न होईल, व पशुप्रमाणेंच मनुष्यप्राणी विषयेच्छेनें कालक्रमणा करील तर तो शुद्ध पशुच होय. यांत भेद शरीराकृतिशिवाय नाहीं. जो मनुष्यप्राणी ईशप्राप्ति करून घेतल्यावांचून देहत्याग करितो तो नरदेह ( सर्व सोईचा देह अथवा विषयांचे ठिकाणीं अक्षय रममाण होऊन न राहण्याकरितां धारण केलेला देह—) धारण करण्यास अयोग्य ठरल्यामुळें पश्वादिकांच्या जन्मास जातो. हें जाणूनच वरील श्लोकांत " ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः " ह्मणजे परब्रह्म प्राप्त करून घेण्याचा जो ज्ञानमार्ग अगर विचार आहे, त्या विचारद्वारें जो सावध झाला नाहीं तो पशुसमानच होय असें म्हटलें आहे. येथें ज्ञान शब्दाचा अर्थ आत्मज्ञानप्राप्तीविषयीं साधनीभूत जो विचार आहे तो घ्यावयाचा. सामान्य ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान. तें तर सर्वत्र परिपूर्ण आहे; परंतु त्या ज्ञानाची प्राप्ति करून घेण्याचें सामर्थ्य मात्र मनुष्यांखेरीज असणाऱ्या इतर प्राण्यांचे अंगीं नाहीं. अर्थात् मनुष्यांखेरीज इतर प्राण्यांस विषय कमविण्याचा विचार

करण्याचें सामर्थ्य आहे, परंतु ईश्वरज्ञान प्राप्त करून घेण्याचा विचार करण्याचें सामर्थ्य त्यांचे अंगीं मुळींच नाहीं. यावरून सिद्ध झालें कीं, मनुष्यांनीं अनेक विद्या शिकून अगर कलाकौशल्याचें ज्ञान प्राप्त करून घेऊन पैसा मिळवून आहार, निद्रा, भय, मैथून इत्यादि विषय प्राप्त करून घेतले म्हणून तो ज्ञानी नव्हे. अशा जगांतलि अनेक नश्वर विषयांचें ज्ञान म्हणजे माहिती कमाविणें व ती लक्षांत ठेवणें हें काम मनोमय कोशाचें अगर बुद्ध्यादिकरून इंद्रियांचें आहे, ज्ञानाचें नव्हें. तीं बुद्ध्यादिकरून इंद्रियें ज्या आत्मप्रकाशेंकरून प्रकाशलीं जातात त्या आत्म्याचें अगर ईश्वराचें ज्ञान मनुष्यानें आपल्या विचार-द्वारें जर प्राप्त करून घेतलें तरच त्यास नर म्हणावे. नाहीं तर तो व पशु यांत मुळींच अंतर नाहीं असें सिद्ध झालें. करितां मनुष्यप्राणीमात्रांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, विषय म्हणजे नेत्रादि-कांस दिसणारे, व मनास भासणारे संपूर्ण जगतांतील पदार्थ. इंद्रियें म्हणजे आपल्या शरीराचीं अवयवें, अगर पंचकर्मेंद्रियें म्हणजे वाक् हस्त, पाद, उपस्थ, आणि गुद मिळून पांच, व पंचज्ञानेंद्रियें म्हणजे श्रोत्र, चक्षु जिव्हा, घ्राण व त्वचा अशीं दहा इंद्रियें व प्राण म्हणजे आपल्या शरीरांत जो वायु आहे ( जीव नव्हे ) कीं ज्याच्या-योगें आपण श्वासोच्छ्वास करितों तो, या सर्वांस मनुष्य सहज जाणतो. पण मी कोण आहें हें विचार केल्यावांचून त्यास कळत नाहीं; हा विचार फक्त मनुष्यदेहांत मात्र होतो. तशांत आपणांस दैवयोगें मनुष्यजन्म प्राप्त झाला असून, सत्पुरूषांच्या गांठीही पडतात. त्यांपासून अगर त्यांचे ग्रंथ वाचून मी कोण आहें, हें ज्ञान प्राप्त करून घेण्याचें आपणांस साधनही मिळालेलें आहे. ह्या समयीं आपण जर स्वस्वरुपज्ञानप्राप्तीचा विचार केला नाहीं, तर पशुपक्षादिक सर्व जीव आणि आपण बरोबरीनें अज्ञानीच आहों असें होईल.

इतर जीव जसे विषयसुख भोगावें म्हणून कामक्रोध धारण करून मरतात, तसेंच आपणही मरूं; आणि इतर जीवांस जशी मरतांना विषय भोगण्याची वासना राहते तशीच आपणांस मरणकाळीं (म्हणजे आयुष्याच्या अंतकाळीं) विषय भोगण्याची वासना राहील. आणि इतर जीव मेले म्हणजे ज्या प्राण्यांच्या देहांचें त्यांस अति वैरानें, किंवा अति प्रीतीनें ध्यान लागून त्यांनीं प्राण सोडिले, त्या देहांचे जातीचा अगर दुसऱ्या कोणत्याही जीवांच्या जातीचा जन्म त्यांना पश्चात् घ्यावा लागतो; त्याप्रमाणेंच आपण मनुष्यदेह धारण केला असून जर विचारानें व सगुणभक्तीच्या साह्यानें आत्मज्ञानी झालों नाहीं, तर विषय भोगण्याची वासना राहून मरणानंतर मनुष्याचा, अथवा पशुपक्षादिक मलत्या एखाद्या जातीचा जन्म आपणांस घ्यावा लागेल, आणि अतिशय आहारविहार समयीं शत्रूचें भय अखंड बाळगावें लागेल. अरेरे! मग असल्या पश्वादिक देहांत विचार व्हावयाचाच नाहीं. शत्रूपासून आपलें रक्षण करीत असतांच शत्रूच्या हातीं सांपडूं, आणि ते शत्रु आपणांस जीवंतच टोंचून टोंचून मारतील. अशा अनंत यातना जर आपणांस आत्मज्ञान नसेल तर होतील. बरें, मनुष्यदेहांत सुख असेल असें म्हणावें तर तेंही बोलणें व्यर्थ आहे. पहा, मनुष्य जेव्हां जन्मास येतो, तेव्हां तो योनिद्वारांतून बाहेर येते वेळीं मोठ्या यातना भोगितो; तशांत आडवा आला तर लोक कापून त्याचे तुकडे तुकडे करून बाहेर काढितात, तेव्हां त्याच्या मांसांत चाकूचीं पातें भोंसकत असतील, आणि तो आईच्या पोटांत तडफडत असेल तेव्हां त्याचे किती हाल होत असतील, याचें अनुमान आपल्या शरीरांस एकादे ठिकाणीं कापल्यास जें दुःख होतें त्यावरून करितां येईल. जन्म घेतांना व बाळपणीं परस्वाधीन असतांना अशीं दुःखें होतात. बाळपणीं मुंग्या, माशा, चिलटें, ढेंकूण, पिसा,

विंचू, व सर्प, इत्यादिक दंश करितात तेव्हां अतिशय दुःख होतें; परंतु तें त्याच्यानें दूर करवत नाहीं म्हणून तडफडतो, व रडतो, आणि रात्रंदिवस भितो. इतक्याही सपाट्यांत विस्फोटक रोग, जसे देवी, गोवर, कांजिण्या उठणें; तसेंच खराब हवेचा संचार, नेत्रांत फुलें पडणें, किरी लागणें, पोटांत रोग होणें, अथवा माता मरून जाणें अशीं दुःखें बिचाऱ्या प्राण्यास देहधारण केल्यामुळें भोगून मरावें लागतें. इतक्या दुःखांच्या सपाट्यांतून तो जगलाच तर रोज पोट कसें भरेल, मी करूं काय, व कोणती विद्या शिकूं, अशी अतिशय चिंता त्यास लागते. तितक्याही चिंतेंत तो काळ काढीत असतो, परंतु दुसऱ्याचें मरण पाहिलें म्हणजे आपली दशा हीच आहे असें समजून घाबरतो. पुढें स्त्री, पुत्र, गृह, क्षेत्रादिक माझें माझें म्हणून व्यर्थ चिंता वाहतो, व मरणपर्यंत कांहीं विचार करीत नाहीं. मोह, ममता, व विषयवासना धारण करून व अतिशय भयभीत होऊन त्याची अंतकाळ होण्याची वेळ आली म्हणजे, तो मनुष्यप्राणी जी जन्मभर अहंकारानें कृत्यें करितो, त्या संपूर्णकृत्यांचा स्मरणरूप अहंकार त्याचे मस्तकाचे आंत विस्मृतिरूपी कोशांत जाऊन राहतो. नंतर त्या विस्मृतिरूप कोशास त्याचे शरीरांतील प्राण येऊन मिळतो. नंतर तो प्राण त्याच्या त्या विस्मृततिरूप कोशास घेऊन बीजरूपानें बाहेर पडतो. पुढें विस्मृति-रूप कोशांत देहाकार ज्या प्रकारचा असेल त्या प्रकारच्या मनुष्य शरीराखेरीज करून इतर ज्या पशुपक्ष्यादिक योनी आहेत, त्या योनींत जन्म घेऊन अति दुःख भोगतो. अशा तऱ्हेचीं दुःखें पुढें प्राप्त न व्हावीत, म्हणून मनुष्यमात्रांनीं नरदेह आहे तोंपर्यंतच विषयाशा सोडून स्वात्मैक्य ज्ञानाचा विचार करावयास लागावें, हें बरें. मनुष्यप्राण्या, मनुष्ययोनीखेरीज इतर ज्या चौऱ्याशी लक्ष योनी आहेत, त्या प्रत्येक योनींत आहार, निद्रा, भय, व मैथून हे

चार विषय स्पष्ट तुला नेत्रांनीं दिसत असतां ह्या विषयप्राप्तीची चिंता वाहून व्यर्थ काळ कां घालवितोस ? हे विषय प्राप्त न होता जरी मनुष्य प्राणी मेला, तरी पुनः त्यास चौऱ्याशी लक्ष योनींत निःसंशय विषय प्राप्त होतील. पण परमेश्वरप्राप्ती होणार नाहीं; व संतसमागमाचा फायदाही मिळणार नाहीं. सत्पुरुषाचें एक वाक्य आहे

**मात मिले, पुन तात मिले, सुत भ्रात मिले**
**जनमके सुखदाई पण साधु समागम दुर्लभ भाई ॥**

बरें, आपण कधींही सृष्टींतील सुखें भोगिलीं नाहींत असेंही नाहीं. आपण अनादिकालापासून या सृष्टींत आहोंत; व अनंत वेळां मनुष्याचा जन्म घेतला असून सर्व तऱ्हेचीं सुखेंही अनंत कालपर्यंत भोगिलीं आहेत; असें विवेकानें स्मरावें. अग्नींत सर्पण टाकल्यानें जसा अग्नि विझत नाहीं पण ज्यास्तच पेटतो, अशा प्रकारेंच जों जों विषयेच्छा बाळगावी व जों जों विषय सेवावे तों तों मनुष्याची इच्छा अधिक पेट घेते म्हणजे वाढते, पण शांत होत नाहीं. उलट ही इच्छा, मनुष्यप्राण्यारे, तुला देहपातानंतर व सध्यांही दुःखांत पाडील. करितां वेळेवर सावध हो. कारण एके ठिकाणीं म्हटलें आहे

**' आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।**

आशा ही अति दुःख देणारी असून निराशा अति सौख्यकारक आहे. असें समजावें कीं, आशा हीच कोणी एक सुंदर स्त्री आहे. ती नित्य आपणांस भुलविते. तिची तृप्ति व्हावी म्हणून आपणांस ती सर्वकाल विषयप्राप्ति करण्याचे कामीं लाविते, आणि जर तिला ते विषय उपभोग घेण्यास मिळाले नाहींत, तर ती आपणांस सुख न देतां उलटें दुःख मात्र देते. करितां या आशेची आशा सोड व तृप्तीचा अंगिकार कर. कारण म्हटलें आहे

आशया बध्यते लोकः कर्मणा बहु चिंतया ॥
आयुः क्षिणं न जानान्ति तस्मात् जागृहि जागृहि ॥

म्हणजे आशेनें सर्व मनुष्यांना बांधून टाकिलें आहे व कर्माचें चिंतन तिनें इतकें कांहीं करावयास लाविलें आहे कीं, मनुष्यप्राण्यांस आपलें आयुष्य क्षणभंगुर आहे असें सुचूं देखील देत नाहीं. करितां हे मनुष्यप्राण्या, जागा हो, व शांतीचा अंगिकार कर. कारण महासंत तुकाराम महाराज म्हणतात

शांति परतें तत्व नाहींरे अन्यथा ।
वाया व्यर्थ कथा सांडी मार्ग ॥

नरदेह हा वारंवार प्राप्त होणारा नसून, दैवयोगें चुकून प्राप्त झाला आहे. मनुष्यप्राणी विनाकारण आपल्या आयुष्याची धुळधाणी करून घेत आहे. ती कशी, तर

चिंतामणिं देहमुपेत्य मानुषं
सर्वार्थदं भोग विषक्त मानसः ।
पुत्रान्धनाद्यर्थ मथोत्सृज्यत्यहो
तापंतुपश्चात्कृषिकोयथाश्नुते ॥

एक शेतकरी होता. त्याचें एका मोठ्या नदीचे तीरीं एक शेत होतें. त्यांत सुंदर पीक आल्यामुळें तो तें नित्य राखीत बसे, व पांखरांनीं पिकाची नासाडी करूं नये म्हणून तो जमीन खणून त्यांना मारण्याकरितां मातीचे गोळे तयार करून ठेवीत असे. पांखरें त्या ठिकाणीं आलीं म्हणजे त्यांना तो ते गोळे फेंकून मारी. असा त्याचा नित्यक्रम चालला असतां दैवयोगानें माती खणतां खणतां त्यास चिंतामण्यांनीं पूर्ण भरलेला असा एक घट सांपडला. त्याला वाटलें कीं, बरें झालें, आपणांस आतां एवढें या गाडग्यांतील खडे संपेतोंपर्यंत मातीचे गोळे करावयास नकोत. असें समजून त्या शेतकऱ्यानें त्या घटांतील सर्व चिंता-

मणी पांखरांस फेंकून मारिले. नदी जवळच असल्याकारणानें ते पांखरांस फेंकून मारलेले सर्व चिंतामणी नदींत जाऊन पडले; परंतु दैवयोगें त्यांतील एक चिंतामणी मात्र चुकून राहिला, तो त्याचे बसण्याचे ठिकाणीं पडला होता. इतक्यांत त्या शेतकऱ्याची बायको त्यास भाकरी घेऊन आपल्या लहान मुलासह तेथें आली. तिनें मुल रडत आहे असें पाहून त्याचे हातांत तो पडलेला चिंतामणी खेळावयास दिला. नंतर ती त्या मुलास घराकडे परत घेऊन जात असतां, कोणी एका चिंतामणीपारख्यानें त्या मुलाचे हातांतील तो मणी पाहून त्या बाईस विचारिलें, बाई, त्या मुलाचे हातांतील मणी तूं केवढ्यास विकत देतेस ? तेव्हां ती म्हणाली, माझे नवऱ्यास मी बोलावून आणतें, त्यास विचारा. शेतकरी येतांच त्यास त्या चिंतामणीपारख्यानें किंमत विचारिली. तो ह्मणाला, मला ह्या मण्याची किंमत माहीत नाहीं. तुम्हांस जें वाटेल तें सत्यास स्मरून द्या. तो चिंतामणीपारखी मोठा धार्मिक मनुष्य होता. त्यानें त्या शेतकऱ्यास सांगितलें कीं, उद्यां सर्व दिवसभर तुझ्यानें जितकें द्रव्य नेववेल तितकें ने. हीच या मण्याची किंमत आहे. त्या शेतकऱ्यास मोठा हर्ष झाला व त्यानें तो मणी विकला. ठरल्याप्रमाणें तो ज्या वेळेस त्या व्यापाऱ्याचे घरांतून आपले घरीं द्रव्य नेऊं लागला, त्यावेळेस त्याला त्यानें फेंकलेल्या सर्व मण्यांची आठवण होऊन तो रडूं लागला. तेव्हां दुसऱ्या एका गृहस्थानें त्याला विचारलें कीं, तुला इतकें धन मिळालें असतां तूं कां रडतोस ? शेतकऱ्यानें उत्तर दिलें, माझें नशीब फुटकें, मला असे पुष्कळ मणी सांपडले होते, ते म्यां मूर्खानें सर्व टाकून दिले. म्हणून मला आतां त्याचा पश्चात्ताप होऊन रडें येतें दुसरें काय ? तात्पर्य, याच प्रकारें हें मानव शरीर घटरूप असून त्यांत श्वासरूपी अनंत मणी भरले आहेत. जसा चिंता-

मणी चिंतिलेलें देणारा आहे. तसा हा "श्वासयुक्त देह" पुरुषार्थ-द्वारें सर्वार्थप्राप्ति करून देणारा आहे. जो श्वास गेला तो सर्व पृथ्वीचें मोल जरी खर्च केलें, तरी पुनः परत मिळत नाहीं. हें न जाणून त्या श्वासरूपी चिंतामणीचा अनादर करून, धनपुत्रादि विषयसंपादनार्थ, जो मनुष्य कालरूप नदीच्या प्रवाहामध्यें ते खर्ची घालतो, त्यास एखादे वेळीं एखाद्या श्वासांत एखादें सत्कर्म अगर सत्संग केल्यावरून, जेव्हां परलोकीं त्या सत्कर्म केलेल्या श्वासाची किंमत मिळते, तेव्हां आपण व्यर्थ आयुष्य खर्ची घातलें असें त्यास वाटून, तो पश्चात्तापानें अति दुःख करतो. करितां कालरूपी राक्षसाची आपणांवर गदा बसण्यापूर्वींच मनुष्यानें सावध व्हावें. जसें सर्पाच्या मुखांत पडलेला बेडूक आपणास सर्परूपी काळानें पकडलें आहे हें न जाणतां, आपलें भक्ष्य जी मक्षिका तिजवर आशक होऊन तीस पकडण्याकडे आपलें चित्त गुंतवितो, व त्या सर्पाच्या मुखांतून सुटण्याचा उद्योग करण्याचें त्यास भान न राहिल्यामुळें जसा सर्प त्या बेडकाच्या शरीराचा नाश करितो, तसेंच कालरूपी सर्प मनुष्याचा नाश करितो. मनुष्यानें आपण काळरूपी सर्पाचे मुखांत सांपडलों आहों हें न विसरतां, व स्त्रीधनादिक ज्या मक्षिका, त्यांस भुलून न जातां वेळींच सावध राहून काळाचे जबड्यांतून सुटण्याचा उद्योग करावा, हें योग्य आहे. यावर दुसरा एक दृष्टांत सांगतों. कोणी एक साधु एका बाईस पाहून रडूं लागला, तेव्हां त्या बाईनें त्याला रडण्याचें कारण विचारिलें. कारण विचारितांच त्या साधूनें त्या बाईस सांगितलें कीं, मीं तुला जात्यांत दाणे घालून त्या दाण्यांचें पीठ करीत असतांना पाहिलें व त्यायोगें मला रडें आलें. दुसरें कांहीं एक कारण नाहीं. बाई ह्मणाली, दाणे दळले ह्मणून रडण्याचें कारण काय? साधूनें सांगितलें कीं, बाई, तूं जशी जात्यांत

दाणे घालून त्यांचें दळून पीठ करीत आहेस, तसें काळानेंही तुला आपल्या काळरूपी जात्यांत घातलें असून तो तुझा लवकरच नाश करील; व ती वेळ अगदीं जवळ आली आहे. ती बाई घाबरून त्या साधूस ह्मणाली कीं, तर मग त्या काळरूपी जात्यांत आपण सर्व जण सांपडलोंच आहों; त्यांतून आपली सुटका कशी बरें होईल? होईल काय? सुटका होण्याचा कांहीं मार्ग असल्यास कृपा करून सांगावा. साधूनें उत्तर दिलें, बाई, जेथें इच्छा आहे तेथें मार्ग आहे. तूं आपल्या जात्याची तळी उचलून पहा त्या बाईनें जात्याची तळी उचलून पाहिल्यानंतर साधु तिला ह्मणाला, तूं हें जातें सारखें किती वेळ तरी फिरवीत आहेस? व किती दाण्यांचें तूं पीठ केलेंस? परंतु तुझ्या दळण्याच्या तडाक्यांतूनही हे जात्यांतील खुंट्यास चिकटून राहिलेले दाणे पीठ न होतां कसे वांचले, हें तुला दिसतें काय? हें पाहतांच बाई त्या साधूस म्हणाली खरेंहो खरें! जे दाणे खुंट्यास धरून राहतात त्यांवर जात्याचें कांहीं एक चालत नाहीं, असें आतां मला पक्कें समजलें. नंतर साधु तिला म्हणाला, तसेंच या काल-रूपी जात्यांत परमेश्वररूपी खुंटा आहे. त्या परमेश्वररूपी खुंट्याचा तूं जर आश्रय केलास तर काळाचें तुला कांहींएक भय नाहीं. करितां तूं दाणे दळ; पण मनांत ईश्वरास विसरू नको, ह्मणजे परमेश्वरास दया येऊन तो तुझ्या हातांतील जातेंही नाहींसें करील. तूं ज्या काळ-रूपी जात्यांत सांपडून चिरडली जाणार आहेस तेंही ईश्वर फोडून टाकील. मग तुला काळाचें भय राहणार नाहीं. करितां मनुष्यप्राण्यारे, तूं परमेश्वराचा आश्रय कर व असें समज कीं, जन्ममरण हेंच कोणी एका मोठ्या दडून बसलेल्या काळासारखें आहे. तें तुझा कंठ फोडून त्यांतील रक्त प्राशन करण्यास अगदीं टपून बसलें आहे. त्यास संधि मिळतांच तें तुझ्या नरडीचा घोट घेईल! मग तुझें कांहीं

चालणार नाहीं. तुझ्या आरोळ्याकडे तें लक्ष देणार नाहीं, पण उलट बजावील कीं, ज्या अर्थी तूं ईश्वरचिंतन केलें नाहींस व तूं माझा रिकामा वेळ विषयसंपादण्याकडे व्यर्थ खर्ची घातलास त्या अर्थी जेथें जेथें तूं जन्म घेशील, तेथें तेथें मी तुला असाच छळून मारीन. मी काळ आहें समजलास! मी तुझ्या बापाचा तसेंच तुझ्या आज्या-पणज्याचा प्राण घेतला आहें, हें तूं पाहत असतां उगीच स्वस्थ कां बसलास? ईश्वरचिंतन कां बरें केलें नाहींस? असें म्हणून, तो काळ तुझा नाश करील. करितां हे मनुष्यप्राण्या, वेळेवर सावध हो. मनुष्य-प्राण्या, विचार कर कीं, तूं जो अहोरात्र संसारचिंतन व विषयचिंतन करण्यांत आपला कालक्षेप करीत आहेस, त्या तुझ्या काळजीनें तुला विषयप्राप्त होतील काय? होणार नाहींत. कारण तुझे इच्छेचे स्वाधीन कांहींही नाहीं. पूर्वजन्मीं जसें तूं कर्म केलें असशील त्या कर्माप्रमाणें त्याचीं फळें तुला येथें बिनचुक प्राप्त होतील. ज्यास्त काळजी किंवा खटाटकरून कांहींही उपयोग होणार नाहीं. पहा, जगांतील हरएक प्राण्यास सुखाची इच्छा आहे. दुःख कधींही होऊं नये म्हणून अहोरात्र तो खटपट करितो. परंतु त्यास दुःखाची इच्छा नसतां दुःख प्राप्त होतें; तसेंच एखादे वेळीं न इच्छितांही मोठा लाभ होतो. अर्थात् सिद्ध झालें कीं, इच्छेचे स्वाधीन कांहींही नसून, पूर्व-कर्माप्रमाणें बिनचुक या स्थळीं सुख, दुःख, द्रव्य, सुत, दारा, इत्यादि प्राप्त होतात. तुकाबा म्हणतात

तुका म्हणे उगीचें रहावें ।
जें जें होईल तें तें पहावें ॥

तसेंच आलिया भोगासी असावें सादर ।
देवावरी भार घालूं नये ॥

यावरून प्रारब्धकर्मापुढें कोणाचीही गति चालत नाहीं. मग रिकामी

काळजी करण्यांत व्यर्थ कालक्षेप कां करितोस ? त्या काळांत परमेश्वर आराधना कर. ज्या वेळेस जें काम करावयाचें असेल, त्या वेळीं तें काम करण्याची अचुक बुद्धि प्राप्त होते. कारण म्हटलें आहे 'बुद्धि कर्मानु सारिणी' बुद्धि एकटी एकही विचार करण्यास समर्थ नाहीं; तिला पूर्वजन्मीचें कर्म फिरवितें असें पक्कें समज. व 'कर्मणो गहना गतिः' म्हणजे कर्माच्या गति अनंत आहेत; त्यांचा तुला अंत लागणार नाहीं; करितां काळजी सोड व ईश्वरास भज. कोणी म्हणेल कीं, नुसतें प्रारब्धावर हवाला ठेकून कार्य होत नाहीं. त्याला प्रयत्नच केला पाहिजे. तर हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कारण प्रारब्ध व प्रयत्न दोन मुळींच नाहींत. प्रारब्ध हें बीज आहे, व प्रयत्न हा वृक्ष आहे. तो प्रारब्धरूपी बीजांत उत्पन्न होतो. मनुष्यांस प्रारब्धरूपी बीज एक प्रकारचेंच नाहीं. पूर्वजन्मीं ज्या ज्या प्रमाणें पाप अगर पुण्य केलें असेल, त्या त्या प्रमाणें त्याचे पोटीं प्रयत्नरूपी वृक्ष उत्पन्न होतो. पूर्वजन्मीं जर विद्याभ्यासंग अर्धा तडीस गेला असला, तर या जन्मीं मनुष्याची बुद्धि चलाख राहून पूर्वभ्यासंगाच्या विद्येचें संपादन करण्याकडे तिचें लक्ष लागतें; व ती विद्या लवकर साध्य होते. नाहीं तर एकाची बुद्धि जड, व एकाची तीव्र, असें होण्याचें कारण नाहीं. एकाच जन्मीं सर्व विद्या साध्य होत नाहींत. पूर्वजन्मीं जर थोडथोडें सर्व विद्येचें ज्ञान प्राप्त करून घेतलें असेल तर या जन्मीं त्या सर्व विद्या कमीज्यास्ती प्रमाणानें साध्य होतात. सांप्रत जगांत सर्वविद्यासंपन्न असे कांहीं लोक आढळून येतात, हें कांहीं त्यांचें याच जन्मीचें कृत्य नव्हें. तसेंच पूर्वजन्मीं जर यज्ञ याग, दान, धर्म पुष्कळ केला असेल व चांगलीं सत्कर्मेंही केलीं असतील, तर तो या जन्मीं श्रीमान्, विद्वान, धर्माचरणशील असा सर्वगुणसंपन्न होतो. या सर्व गोष्टींचा मानवी प्राण्यांनीं विचार करून चिंताक्रांत न होतां,

व मनांत तळमळ न करितां स्वस्थ असावें व धैर्यानें आलेल्या प्रसंगास पाठ द्यावी. परंतु संसारव्यासंगामुळें भगवच्चिंतन घडत नाहीं असें वेडगळासारखें बोलून स्वस्थ बसूं नये.

कोणी कोणी असा प्रश्न करितात कीं, जसा प्रपंच प्रारब्धेंकरून होतो तसा परमार्थही नशिबीं असल्यास होईल. प्रयत्न करून काय व्हावयाचें आहे ? त्याचें हें बोलणें कांहींअंशीं प्रमाणसिद्ध आहे. पूर्वजन्मीं जर भगवत्प्राप्तीविषयीं कांहीं केलें असेल तर या जन्मीं त्याला कळूं लागतांच तो मनुष्य ईश्वरभक्त होतो. पूर्वजन्मीं जर ईश्वरभक्तीचा योग तडीस गेला नसेल तर तो योगभ्रष्ट या न्यायानें पुन्हां उत्तम कुलांत जन्म घेतो; व संपूर्ण योग तडीस नेऊन मुक्त होतो. याविषयीं श्रीमद्भगवद्गीतेंतील प्रमाण आहे. प्रमाण

**प्राप्यपुण्य कृताऽल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥**

भगवद्गीता अध्याय ६—श्लोक ४१.

म्हणजे परब्रह्म प्राप्त करून घेण्याचा निष्काम योग सिद्ध करीत असतां, तो पूर्ण सिद्धीस गेला नाहीं, तरीही तो भक्त अगर योग करणारा त्या योगाच्या विचारानें पूर्ण सत्वगुणी होतो. त्यामुळें तो सत्वगुणी जीवात्मा बहुत पुण्याच्या योगानें प्राप्त होणारे जे स्वर्गादिक लोक त्या लोकांप्रत समष्टि ईश्वराच्या पोटांत राहून पोहोंचतो. परंतु इतर पुण्याईचे लोक जसे (गीता अध्याय ९ श्लोक २१ यांत सांगितल्याप्रमाणें) पुण्य संपल्यावर स्वर्गाहून मृत्यु लोकीं पतन पावतात; तसा हा ईश्वरप्राप्तीचा योग सिद्धीस न जाऊन मनुष्य जरी मृत्यु पावला, तरी तो वैकुंठ, कैलास, सत्यलोक, गोलोक व इतर स्वर्गलोक यांच्या ठिकाणीं राहणारी जी स्वर्गभूमी तिच्या शाश्वतीप्रमाणें, त्या भूमीवर शरीरानें शाश्वत

राहतो; परंतु पतन पावत नाहीं. त्याला परब्रह्माचा योग करणें आहे, ह्मणून परब्रह्मसुखापुढें तें स्वर्गसुखही त्याला तुच्छ वाटून योगच करावा असें वाटतें. यामुळें तो योग करण्यासाठीं या मृत्युलोकीं शुचिकुलांत जन्म घेतो. ह्मणजे ज्या ठिकाणीं जन्म घेतला असतां अशुचि बुद्धीच्या प्राण्याचा समागमच होत नाहीं, अशा घरीं तो जन्म घेतो. त्या घरीं श्रीमंती असते, ह्मणजे खाण्यापिण्याची वस्त्रप्रावर्णाची कमताई नसते; व श्रीमंत जो नारायण त्याची पूजा असते. अशा त्या सद्वंशांत तो योगभ्रष्टपुरुष स्वर्गादिक भोग भोगून पुनर्जन्मास येतो, आणि पुन्हां योगच करावयास लागतो. सारांश, सर्व ठिकाणीं असणारें जें एक शाश्वत परब्रह्म त्या परब्रह्मावर ज्याचें लक्ष आहे, त्यास स्वर्गादिक सुखें सारखीं व निरंतर मिळतात. आणि अशाश्वत विषयांची इच्छा धरून जे पुण्य करितात, त्यांचें पुण्य ह्मणजे कर्माचें उभें केलेलें बळ संपलें ह्मणजे स्वर्गीचा देह नाश होऊन नवमास गर्भवास भोगून ते जन्मास येतात. त्यांत बाळपणींच मरणें वगैरे ऋण-हत्या उगवून घेतात. परंतु योगभ्रष्टाला मात्र तसें नसतें. त्याचा जन्म वर सांगितल्याप्रमाणें उत्तम प्रकारचा असतो. या वरील प्रमाणावरून सिद्धच झालें कीं, पूर्वजन्मीं जर भगवत्सेवा घडली असेल तर त्यास या जन्मींही ईश्वरोपासना करण्याची संचितानुरूप इच्छा असते, व त्याप्रमाणें तो येथें करितो. एवढ्यावरून नशीबावर हवाला ठेवून गप्प बसणें, व भगवत्सेवा न करणें हें उचित नाहीं. कारण जर प्रारब्धानेंच परमार्थ साधिता तर साधुसंतांनीं, व साक्षात् ईश्वरानें जो मनुष्यप्राण्यांस बोध केला आहे व करितात तो करण्याचें कारण नव्हतें. त्यांनीं ज्याअर्थी असें सांगितलें आहे कीं, मनुष्यानें परमेश्वर-प्राप्तीचा उद्योग झटून केला पाहिजे त्याअर्थी मनुष्यानें संसार जसा

नशिबानुसार चालतो तशीच प्रारब्धानुसार भगवत्प्राप्तीही होईल असें मानून स्वस्थ बसूं नये असें सिद्ध होतें.

शिवाय मनुष्यप्राण्यांस सुखाचे अगर दुःखाचे भोग प्रारब्धानुसार जरी भोगावे लागतात, तरी प्रारब्धाप्रमाणें सुखदुःख भोगून व प्रारब्धानुसार विषयप्राप्तीचे उद्योग करूनहीं मनुष्यांस रिकामपणाचा थोडा तरी काल प्राप्त होतोच. त्यावर प्रारब्धाचा बिलकूल अंमल नाहीं. त्या भोगरहित व व्यवहाररहित निर्विघ्नकालावर ईश्वरीसत्ताच असली पाहिजे; कारण ईश्वराचा काल भोगरहित आहे. हा भोगरहित काल मनुष्यप्राण्यांस एवढ्याचकरितां प्राप्त झाला आहे कीं, त्या कालांत त्यानें भगवत्प्राप्तीचा उद्योग करावा. कारण ह्मटलें आहे—

> यावत्स्याद्गुणवैषम्यं तावन्नानात्वमात्मनः ।
> नानात्वमात्मनो यावत्पारतंत्र्यतदेवहि ॥
> यावदस्या स्वतंत्रत्वं तावदीश्वर तोप्ययं

जावत्कालपर्यंत मनुष्याचे ठिकाणीं वासनेसह कर्म व नाना भेद आहेत तों वेळपर्यंत परतंत्रत्व, शास्त्र व ईश्वरभय हीं त्या प्राण्यास आहेत. भेदबुद्धि व वासना असणें व त्यायोगें आपण परतंत्र आहोंत असें मानणें हें अज्ञानाचें कार्य आहे. हें जाणून मनुष्यानें आपल्या रिकामपणाच्या काळांत अज्ञाननिवृत्तीचा ह्मणजे आत्मानात्म विचाराचा जर उद्योग केला तर ईश्वरनियमानें जीवास पराधीनता व कर्माप्रमाणें फलप्राप्तता होणें, हें जें प्रारब्ध क्रियमाग कर्माच्या अनुरोधानें घडतें, तें घडणार नाहीं. ज्याकाळीं ज्ञान असतें त्याकाळीं अज्ञाननिवृत्ति असते, ज्याकाळीं सूर्यप्रकाश असतो त्याकाळीं अंधःकार नसतो; ज्याकाळीं निद्रा असते, त्याकाळीं वासनात्मक लिंगदेहाचा अभाव असतो. ज्याकाळीं शांतता असते त्याकाळीं क्रोधादिकांचा अभाव असून आनंद असतो. त्याप्रमाणेंच ज्याकाळीं प्रारब्ध भोग नसतो त्याकाळीं

जीव व जीवाचें विचार करण्याचें जें साधन अंतःकरणपंचक हें स्वतंत्र असतें. अशा वेळीं जीवानें आपल्या अंतःकरणद्वारें आत्मविचार करून, आपलें मन चंचल होऊं देऊं नये. इतरप्रसंगीं प्रारब्धाचे भोग जरी शरीरावर येऊन भिडले तरी भोग भोगतें अंतःकरण अंतर्मुख असल्यास त्यास त्या भोगाचा स्पर्शसुद्धां होणार नाहीं. जेव्हां मनुष्य सुषुप्तिअवस्थेंत असतो किंवा समाधियुक्त होऊन आत्मरूपीं रत असतो तेव्हां त्याचें अंतःकरण अंतर्मुख असतें. तो विषयचिंतनांत असतो त्यावेळीं त्याचें अंतःकरण बहिर्मुख असतें. अंतःकरण बहिर्मुख होऊन भोग भोगण्यास सिद्ध होण्यापूर्वीं, भोगाचा अंतःकरणास भोगण्याचा जो काल गेला, तो भोगाची जेवढी कालावधि असेल, तीमधून वजा जातां बाकी राहिलेल्या मुदतीपर्यंतच अंतःकरणास सुखदुःख देईल. यास प्रमाण स्वानुभवाचें देतों. खरूज वगैरे आदिकरून ज्वरादिक व्याधींचे आपले शरीरांवर भोग घडत असतां जर आपलें अंतःकरण देहभानावर असेल तर त्यास ह्या रोगाचे भोग घडतात. तेंच अंतःकरण देहास पराङ्मुख होऊन सुषुप्तिमध्यें ( निद्रेंत ) रत झालें असेल तर, त्यास ज्वरादिक व्याधींचे भोग घडत नाहींत, असें अनुभवसिद्ध आहे. कारण जर प्रारब्धाचें निरंतरत्व असतें तर जो ब्राह्मण सात दिवस स्नानरहित व तीन दिवस संध्यारहित व बारा दिवस वैश्वदेवादिक उपासनारहित आहे, तो शूद्रवत आहे असा बोजा ईश्वरानें वेदशास्त्रांत लिहून ठेविला आहे तो योग्य झाला नसता. कारण निरंतर मनुष्यदेहावर प्रारब्धाचे भोग घडतात व त्यायोगें तो दुःखभोगांत असल्यामुळें त्यास स्नानसंध्यादिक ह्मणजे.—

स्नानं संध्या जपो होमो वेदाध्ययन पूजनं ।
अतिथिर्वैश्वदेवंच षट्कर्माणि दिने दिने ॥ १ ॥

इत्यादि षट्कर्में नित्य करितां यावयाचीं नाहींत. यावरून ज्या अर्थी

नुष्य प्राण्यांवर हा एवढा मोठा कर्माचा बोजा ईश्वरानें लादला आहे ाअर्थी मनुष्यांस निरंतर प्रारब्धाचे भोग नसतात असें सिद्ध झालें. ावरून असें स्पष्ट होतें कीं, प्रारब्धाचे भोगवर्जित जो काळ आहे ो भगवत्भक्तीकडे लाविल्यास प्रारब्धाचे मदतीशिवाय ईश्वरप्राप्ति ूरून घेतां येईल. त्यांत प्रारब्धाची पूर्वसंचितानुरूप ईश्वरसेवेस दत असली तर अल्प प्रयासानें भगवत्प्राप्ति होईल. यावर कोणी सा प्रश्न करील कीं, प्रारब्धरहित जर मनुष्यांस काळ आहे, व त्या ाळांत भगवत्सेवा होऊं शकते, तर त्याच काळांत प्रारब्धाचे दतीवांचून द्रव्यादिक ऐहिक सुखाचें साधन जर प्राप्त करण्याचा उद्योग केला तर त्याचें फळ कां प्राप्त होणार नाहीं? याचें उत्तर असें आहे कीं, जें पेरावें तेंच उगवतें. या न्यायानें पूर्वजन्मीं जें ेरलें असेल त्याचेंच फळ याजन्मीं उगवून येईल. बीजावांचून वृक्ष ोत नाहीं. कारण म्हटलें आहेः—

यथाबीजं तथांकुरः

या न्यायानें जें कर्म तुह्मीं पूर्वजन्मीं केलें, त्याचें फल तुम्हांस प्रारब्धानें मिळतें, हें यथास्थित आहे; व प्रारब्धाचे भोगनिवृत्त काळीं जर तुम्हांजवळ बीजच राहत नाहीं तर मग वृक्ष कसा व्हावा हें तुम्हींच पहा. भगवत्प्राप्तीचें तसें नाहीं; कारण, साक्षात् भगवान् सर्वांतर्यामीं वास करीत असून तो सर्वांचें आद्यबीज आहे. त्यामुळें प्रारब्धाशिवाय त्याचा कृपारूप वृक्ष उत्पन्न होऊन भक्तांस फळ देतो, व मुमुक्षूंस मोक्ष देतो. म्हणून ईश्वर काय न करील? तो सर्वशक्तिमान आहे. त्याचे चरण मनुष्यानें दृढ धरून रिकामपणाचे काळांत मनुष्यानें आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावें; हें योग्य आहे. कारण गुरु ईश्वर, देवादिक यांचा प्रसाद मनुष्यास प्रयत्नानेंच साध्य होतो; प्रयत्नाविना होतच नाहीं. प्रमाणः—

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ।'

आपल्याच स्वानंदांत निमग्न असणाऱ्या ईश्वरास जीवांना पुण्यपाप, सुखदुःख दंड, अनुग्रह देण्याची मुळींच इच्छा नाहीं. परंतु अज्ञानी लोक विनाकारण देवावर आळ घालितात, व देव आम्हांस सुखदुःखाचे भोग देतो असें म्हणतात, हें त्यांचें अज्ञान आहे. विचार करा कीं, सूर्य दर्पण जलादिकांत प्रतिबिंबित होतो, व पाषाणादिकांतच प्रतिबिंबित कां होत नाहीं? यांत जसा सूर्याचा दोष नाहीं, परंतु वस्तूचीच पात्रापात्रता आहे असें सिद्ध होतें, त्याप्रमाणेंच ज्याचें अंतःकरण काम, क्रोध, भय, आवरण, विक्षेप व वासना इत्यादिकेंकरून रहित आहे त्याच्या अंतःकरणांत, सर्वांच्या हृदयस्थ असणारा परमात्मा, जसा सूर्य प्रतिबिंबेंकरून जलांत अतित्वास येतो, तसा आपल्या दिव्य तेजोमय व ज्ञानघनस्थितीनें त्याचे अंतःकरणांत प्रतिबिंबित होतो. असें झालें म्हणजे मनुष्याच्या सुखास काय पारावार आहे? धन्य तो पुरुष! एवढ्याकरितां मनुष्यप्राण्यानें विषयांच्या ठायीं आसक्ति न ठेवितां परमात्म्याचे ठिकाणीं प्रीति ठेवावी, हेंच उचित आहे. कारण विषय भोगिल्यानें विषयांची इच्छा पूर्ण तर होत नाहींच पण उलट विषयेच्छा विषाप्रमाणें मनुष्यांस बाधक आहे. विष भक्षण केल्यानें एकाच शरीराचा नाश होतो; पण विषय सेविल्यानें जन्मजन्मांतरीं दुःख प्राप्त होतें. जसें सर्पास प्यावयास दिलेलें दुग्ध विषच बनतें तसेंच इंद्रियांस दिलेले विषय इंद्रियांस ज्यास्त दुःख देण्यासच कारण होतात. यास प्रमाण

विषम् विषयवैषम्यं न विषं विषमुच्यते
जन्मांतरघ्ना विषया एकदेहहरं विषम् ॥

याचा अर्थ वर दिलाच आहे. एवढ्याकरितां हे मनुष्यप्राण्या, व्यर्थ आयुष्याचा काळ गमवूं नकोस. कारण मृत्यूचा घाला तुजवर केव्हां येईल हें तूं जाणत नाहींस; कदाचित् मध्येंच मेलास तर विषय कमविणेंही बाजूस राहून परमार्थही साधणार नाहीं; व त्यामुळें अति नीच योनीप्रत जाऊन पोहोंचशील. हातूचा सुटलेला बाण परत येत नाहीं हें तूं जाणतोस. मग तुझे हातांत असलेला काळ तूं कसा व्यर्थ दवडतोस ? बरें असें तरी आहे काय कीं, संपूर्ण विषय प्राप्त होतीलच ? तसेंही नाहीं; ते मिळणेंही प्रारब्धावर अवलंबून आहे. बरें, यदाकदाचित् कोणाचें प्रारब्धही चांगलें असलें, व त्यास विषयही प्राप्त झाले, तरी त्या विषय सेवनानें त्यांची आशा कमी होऊन त्या प्राण्याची कधीं तृप्ति झाली आहे काय ? तसेंही नाहीं. कारण म्हटलें आहे—प्रमाण

**नाग्निस्तृप्यति काष्ठैर्नापगाभिश्चसागरः ।**
**न कालः सर्वभूतैश्च न तृष्णा भोगसंचयैः ॥**
**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति**
**हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥**

अग्नि काष्टादिकें कधींच तृप्त होत नाहीं. समुद्र कितीही नद्या त्यास येऊन मिळाल्या तरी तृप्त होत नाहीं. काळ सर्व सृष्टि भक्षण करूनही संतुष्ट होत नाहीं. तसेंच इच्छेची भोगानें तृप्ति होत नाहीं. तेल किंवा तूप घातल्यानें अग्नि शांत होईल काय ? होणार नाहीं. पण अग्नीस जर दहन सामग्री न मिळाली तर मात्र तो विझून जातो. तशी इच्छा ही इच्छिलेले पदार्थ मिळाल्यानेंही तृप्त होत नाहीं; पण न मिळालें असतां अधिक खवळते. तेव्हां अग्नीपेक्षां इच्छा अधिक प्रखर नव्हे काय ? यावरून असें दिसून येतें कीं, इच्छेचे नादीं लागून मनुष्याचा अमोल्य आयुष्याचा काळ मात्र फुकट जातो; व तो

पश्वादिक नीच योनीस पात्र होतो. एवढ्याकरितां मानवी प्राण्यानें तिचा त्याग करावा हें बरें. इच्छेचा त्याग केल्यानें देह रक्षण होत नाहीं असें नाहीं. कारण ज्या ईश्वरी नियमानें मनुष्यांस उपजतच आहार प्राप्त झाला, त्याच नियमानें आईचे स्तनांत जसें दूधही उत्पन्न झालें, तसें त्याच नियमानें देह रक्षण होईल, यांत शंका नाहीं. कारण तुम्हीं इच्छा सोडिली म्हणून प्रारब्धाप्रमाणें देह रक्षणार्थ विषयप्राप्त होणें राहत नाहीं असें पक्कें समजा; व ईश्वर भजनास लागा. कारण या जगांत आपलें कांहींही नाहीं. सर्व कांहीं ईश्वराचें आहे; मग माझें माझें म्हणून कबाड ओझें कां वाहतां ? पहा म्हटलें आहे

**माता नास्ति पिता नास्ति नास्ति बंधु सहोदरः ।**
**अर्थं नास्ति गृहं नास्ति तस्मात् जागृहि जागृहि ॥ १ ॥**

आई, बाप, बंधू, बायको, मुलें, सोयरेधायरे, गृह, संपत्ति आदिकरून आपलीं नाहींत, व आपणही त्यांचे नाहीं. जसे प्रवासी थकून रात्रीं वस्तीस एकेठिकाणीं धर्मशाळेंत जमतात, आनंदाच्या गप्पा मारितात, आणि उजेडतांक्षणींच कोणी कोणाबरोबर न जातां आपापल्या रस्त्यानें चालते होतात, त्याप्रमाणेंच हीं संपूर्ण कुटुंबांतील माणसें चौऱ्याशी लक्ष योनींतून प्रवास करीत करीत येथें जमलीं आहेत. आयुष्य सरलें कीं सर्व आपापला मार्ग धरितात. करितां मनुष्यप्राण्या, तूं सर्वांची काळजी सोड. ज्याचें त्याचें प्रारब्ध ज्याच्या त्याच्या बरोबर आहे; तुझ्या काळजीनें कांहीं सुद्धां होणार नाहीं, असें समजून जागा हो, जागा हो.

**ऐश्वर्यं स्वप्नसंकाशं यौवनं कुसुमाक्षणं ।**
**क्षणं चंचल मायुष्य तस्मात् जागृहि जागृहि ॥**

हें संपूर्ण जगत् स्वप्नवत् आहे, म्हणजे मिथ्याभास आहे. तारुण्य

पुष्पाप्रमाणें सुकून जाईल. आयुष्य चंचल असल्यामुळें त्यास स्थिरता कधींही यावयाची नाहीं. तस्मात् मनुष्यप्राण्या, जागा हो जागा हे

काम: क्रोधो लोभमोहौ देहे तिष्ठन्ति तस्कराः ।
ज्ञान रत्नापहाराय तस्मात् जागृहि जागृहि ॥ १ ॥

देहरूपी गृहांत काम, क्रोध, लोभ, मोह, इत्यादि षड्रिपु वास करीत असून अरे, मनुष्यप्राण्या, तुझें स्वस्वरूप जें ज्ञानरूप रत्न तें ते चोरून नेत आहेत; करितां हे मनुष्यप्राण्या, जागा हो जागा हो. ऊठ चोरांस हकल. पहा भगवद्गीतेंत साक्षात् श्रीकृष्ण भगवान् म्हणतात:—

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ॥
कामः क्रोधस्तथा लोभ स्तमा देतत्त्रयंत्यजेत्. ॥

श्लोक २१ अध्याय १६.

नरकप्राप्ति म्हणजे दुःष्ट प्राण्यांची शासन भोगण्याची गति, त्या गतींत तीन प्रकारांनीं अज्ञानी जीवात्मा जातो. ते तिन्ही रस्ते टाकले तरच तो जीवात्मा शुद्ध होऊन मी ज्ञानरूप जो शिव त्या मला तो मिळेल. आतां हे नरकांत जाण्याचे तीन रस्ते कोणते व ते टाकावे कसे ह्मणशील तर ऐक. आपण मी मी असें म्हणणारे आपल्या सर्वांच्या मस्तकांत दिसणारा पराशक्तिरूपी एकच महाकारणदेहरूपीबिंदु जो आहे, त्यामध्यें ज्ञानरूप आहों, व तें सर्वांचें ज्ञानरूप एकच आहे त्यास शिव असें म्हणतात. तें शिवरूप आपण उत्पति, स्थिति, लय व सुखदुःख याविरहित आहों. तेंच आपण मस्तकांतील पोकळींत प्रकाशमान असे आहों; व त्या रूपानें आपण सर्व एकच आहों, असें न जाणणें हेंच अज्ञान. त्या अज्ञानाचे पोटांत सत्व, रज, तम असे तीन गुण राहतात. त्या तीन गुणांपैकीं जो तमोगुण तो विकारास

पश्वादिक नीच योनीस पात्र होतो. एवढ्याकरितां मानवी प्राण्यानें तिचा त्याग करावा हें बरें. इच्छेचा त्याग केल्यानें देह रक्षण होत नाहीं असें नाहीं. कारण ज्या ईश्वरी नियमानें मनुष्यांस उपजतच आहार प्राप्त झाला, त्याच नियमानें आईचे स्तनांत जसें दूधही उत्पन्न झालें, तसें त्याच नियमानें देह रक्षण होईल, यांत शंका नाहीं. कारण तुम्ही इच्छा सोडिली म्हणून प्रारब्धाप्रमाणें देह रक्षणार्थ विषयप्राप्त होणें राहत नाहीं असें पक्कें समजा; व ईश्वर भजनास लागा. कारण या जगांत आपलें कांहींही नाहीं. सर्व कांहीं ईश्वराचें आहे; मग माझें माझें म्हणून कबाड ओझें कां वाहतां ? पहा म्हटलें आहे

**माता नास्ति पिता नास्ति नास्ति बंधु सहोदरः ।**
**अर्थं नास्ति गृहं नास्ति तस्मात् जागृहि जागृहि ॥ १ ॥**

आई, बाप, बंधू, बायको, मुलें, सोयरेधायरे, गृह, संपत्ति आदिकरून आपलीं नाहींत, व आपणही त्यांचे नाहीं. जसे प्रवासी थकून रात्रीं वस्तीस एकेठिकाणीं धर्मशाळेंत जमतात, आनंदाच्या गप्पा मारितात, आणि उजेडतांक्षणींच कोणी कोणाबरोबर न जातां आपापल्या रस्त्यानें चालते होतात, त्याप्रमाणेंच हीं संपूर्ण कुटुंबांतील माणसें चौऱ्याशी लक्ष योनींतून प्रवास करीत करीत येथें जमलीं आहेत. आयुष्य सरलें कीं सर्व आपापला मार्ग धरितात. करितां मनुष्यप्राण्या, तूं सर्वांची काळजी सोड. ज्याचें त्याचें प्रारब्ध ज्याच्या त्याच्या बरोबर आहे; तुझ्या काळजीनें कांहीं सुद्धां होणार नाहीं, असें समजून जागा हो, जागा हो.

**ऐश्वर्यं स्वप्नसंकाशं यौवनं कुसुमाक्षणं ।**
**क्षणं चंचल मायुष्य तस्मात् जागृहि जागृहि ॥**

हें संपूर्ण जगत् स्वप्नवत् आहे, म्हणजे मिथ्याभास आहे. तारुण्य

पुण्याप्रमाणें सुकून जाईल. आयुष्य चंचल असल्यामुळें त्यास स्थिरता कधींही यावयाची नाहीं. तस्मात् मनुष्यप्राण्या, जागा हो जागा हो

काम: क्रोधो लोभमोहौ देहे तिष्ठन्ति तस्करा: ।
ज्ञान रत्नापहाराय तस्मात् जागृहि जागृहि ॥ १ ॥

देहरूपी गृहांत काम, क्रोध, लोभ, मोह, इत्यादि षड्रिपु वास करीत असून अरे, मनुष्यप्राण्या, तुझें स्वस्वरूप जें ज्ञानरूप रत्न तें ते चोरून नेत आहेत; करितां हे मनुष्यप्राण्या, जागा हो जागा हो. ऊठ चोरांस हकल. पहा भगवद्गीतेंत साक्षात् श्रीकृष्ण भगवान् म्हणतात:—

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मन: ॥
काम: क्रोधस्तथा लोभ स्तमा देतत्त्रयंत्यजेत्. ॥

श्लोक २१ अध्याय १६.

नरकप्राप्ति म्हणजे दुःष्ट प्राण्यांची शासन भोगण्याची गति, त्या गतींत तीन प्रकारांनीं अज्ञानी जीवात्मा जातो. ते तिन्ही रस्ते टाकले तरच तो जीवात्मा शुद्ध होऊन मी ज्ञानरूप जो शिव त्या मला तो मिळेल. आतां हे नरकांत जाण्याचे तीन रस्ते कोणते व ते टाकावे कसे ह्मण- शील तर ऐक. आपण मी मी असें म्हणणारे आपल्या सर्वांच्या मस्तकांत दिसणारा पराशक्तिरूपी एकच महाकारणदेहरूपींबिंदु जो आहे, त्या- मध्यें ज्ञानरूप आहों, व तें सर्वांचें ज्ञानरूप एकच आहे त्यास शिव असें म्हणतात. तें शिवरूप आपण उत्पति, स्थिति, लय व सुखदुःख याविरहित आहों. तेंच आपण मस्तकांतील पोकळींत प्रका- शमान असे आहों; व त्या रूपानें आपण सर्व एकच आहों, असें न जाणणें हेंच अज्ञान. त्या अज्ञानाचे पोटांत सत्व, रज, तम असे तीन गुण राहतात. त्या तीन गुणांपैकीं जो तमोगुण तो विकारास

पावला म्हणजे काम, क्रोध, लोभ या रूपास येतो; व या रूपास तो तमोगुण आला म्हणजे, जीवास आत्मस्वरूपाची विस्मृति होऊन तो मी मी असा दृढ अभिमान धरितो; व मदांध होऊन अनेक कामना धारण करून काम, क्रोध, लोभ, याद्वारें पातक कर्म करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळें देहांतीं तो नरकास प्राप्त करून घेतो. असा काम क्रोधाधारें नरकवास प्राप्त होतो. आतां यांतून सुटण्याचा एकच मार्ग आहे तो तुला सांगतों. काम, क्रोध, लोभ या तिघांचा नाश "आत्म-ज्ञानं मृतांमसः" या प्रमाणान्वयें आत्मज्ञानेंकरूनच होतो. तें आत्मज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान. व ब्रम्हज्ञान म्हणजे, मनानें मानलेलें पंचमहाभूतात्मक मानवी शरीर प्राणाधारें आकाशांत तोलून धरणारा जो चिदाभासरूपी जिव, त्यानें मी हाडकें, कातडें, मांस, रक्त यांचा जो जड देह आहे तो नव्हें; मी तर त्या देहाच्या आंत जो प्राणवायु आहे, त्या प्राणवायूच्या आंत जो लिंगदेह, व मनोमय कोश आहे, त्या मनोमय कोशांत विज्ञानात्मक ज्ञानवान आहें असें समजून नंतर विज्ञानात्मक जें मी हें स्फुरण तेंही मी नाहीं; मी तर अहंपण धरणाऱ्या विज्ञानातीत आयताच आत्मा आहें म्हणजे ब्रह्म आहें असें जाणून, स्वमिथ्यत्वाचें जें स्वसत्यज्ञान त्या ज्ञानानें स्फुरणरहित निर्विकार सहज समाधि-युक्त राहणें. सच्चिदानंद ब्रह्मापासून ही संपूर्ण सृष्टि उत्पन्न झाल्यामुळें सृष्टीचें मूळरूप म्हणजे आत्मरूप ब्रह्म आहे; व यामुळेंच ब्रह्मास सर्वांचा आत्मा असें नांव आहे. त्या परब्रह्मास जाणलें म्हणजे मनुष्यरूपी शरीर धारण करणारा जो जीव तो काम क्रोधाधारें नरकांत म्हणनें जन्म मरणाचे फेऱ्यांत न जातां मोक्षास जातो.

# प्रकरण तिसरें.

## आत्मज्ञान.

### गुरुशिष्य संवाद

कोहं कथमिदं केन संसारः प्रतिपन्नवान् ।
इत्यावलोचनार्थज्ञ स्तपः शंसति पंडितः ॥

मी कोण, हा जगद्रुपी संसार कसा उत्पन्न झाला, व तो कोणी केला इत्यादि विचार करून जाणणें यासच पंडित लोक तप असें म्हणतात.

शिष्य–गुरुमहाराज, ज्या ज्या ठिकाणीं मी कथा, कीर्तनें श्रवणास जातों, त्या त्या ठिकाणीं कथेकरी, शास्त्री, व संतसाधु हे नेहमीं असें बोलतात कीं, आत्मज्ञान प्राप्त झाल्याशिवाय मनुष्याची संसारांतून मुक्तता व्हावयाचीच नाहीं; व परमेश्वरप्राप्तिही व्हावयाची नाहीं. ते हें नुसतें तोंडानेंच बोलतात असें नाहीं; तर अशाविषयीं ते शास्त्रप्रमाणेंही देतात. त्यांपैकीं मला येथें एक आठवतें आहे, तें सांगतों; त्यावरून आपली खात्री होईल. प्रमाणः—

संसार ताप दग्धाना मात्मज्ञाना मृतंभवेत ।
ताप शांतिर्नचान्येन सत्यमेव न संशयः ॥

इदंहि वेदवेदस्य पराहि निष्ठा मुनिश्वराणां शंकरस्यतु ॥

हा संसार आत्मज्ञानाखेरीज निवृत्त होत नाहीं. परंतु आत्मज्ञानेंकरूनच या संसाराची म्हणजे जन्ममरण उपाधीची रक्षा होते. हा भवसागररूपी ताप दुसऱ्या कोणत्याही उपायानें शांत होत नाहीं, हें निःसंशय आहे. या वेदवाक्यावर फक्त ऋषीच भरंवसा ठेवितात असें नाहीं; तर शंकर आदिकरून सृष्टिचालकही या गोष्टीस अनुसरूनच मुक्त आहेत. अशा तऱ्हेचीं अनंत प्रमाणें ऐकून मला आत्मज्ञान

म्हणजे काय हें समजून घेण्याची मोठी जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. करितां हे गुरु, कृपा करून मला याचा निर्णय सांगावा. कारण मला ही या संसारापासून सौख्य होत नाहीं.

गुरु—हे शिष्य, तूं जें आत्मज्ञानेंकरूनच मोक्ष होतो म्हणून ऐकिलेंस, तेंच सत्य आहे. आजपर्यंत जे ऋषी, साधु, संत झाले, ते सर्व याच ज्ञानेंकरून संसारापासून सुटून परब्रह्मस्थान जो केवळ मोक्ष, त्या मोक्षाप्रत गेले, हेंच निःसंशय आहे. ऋग्वेदामध्यें सुद्धां 'ज्ञानादेवतु कैवल्यं' म्हणजे ज्ञान हेंच कैवल्य मोक्षास कारण आहे, असें स्पष्ट सांगितलें आहे. जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्यही असेंच म्हणतातः—

**ज्ञान विहिने सर्व मतेन मुक्तिर्नभवति जन्म शतेन ॥**

शत जन्म घेऊन संसार निवृत्तिप्रीत्यर्थ अनेक उपाय केले, तरी आत्मज्ञानाखेरीज संसारनिवृत्ति होऊन, प्राण्याची मुक्तता कधींही होणार नाहीं. श्रीमद्भगवद्गीतेंतही साक्षात् श्रीकृष्ण भगवान् असेंच सांगतात

**ज्ञानं लब्धापरां शांति मचिरेणाधि गच्छति**

गीता अध्याय ४ श्लोक ३९.

अज्ञान आवरणानें अच्छादित झालेला जीव जन्ममरणरहित होऊन स्वात्मज्ञानानेंच त्यास शांति प्राप्त होते; म्हणून आत्मज्ञान हेंच तारक आहे. आत्मज्ञानापेक्षां जगांत कांहींही श्रेष्ठ नाहीं; व स्वतंत्र म्हणजे मुक्त होण्यास आत्मज्ञानाखेरीज मार्गच नाहीं. पहा म्हटलें आहेः—

**सार्वभौमो यथा राजा स्वच्छंदं वर्तते भुवि ।**
**स्वपूर्णात्म शिवज्ञानी स्वछंदं वर्तते तथा ॥**

जसा सार्वभौम राजा भूतलावर स्वछंदानें निर्भय होऊन वास करितो, तसा आत्मज्ञानी पुरुष सृष्टीचे ठिकाणीं स्वतंत्र म्हणजे आपल्या स्वतःच्या आत्मानंदाच्या छंदानें निर्भय होऊन सृष्टींत असतो. स्वात्मज्ञानासारखें मोक्षास दुसरें साधन नाहींच, हें जाणून श्रीरामानें वशिष्ठास

गुरु करून ज्ञानसंपादन केलें. अर्जुनानें श्रीकृष्णापासून ज्ञान श्रवण केलें, व जेवढे सत्पुरुष आजपर्यंत होऊन गेले, त्यांनीं आत्मज्ञानच संपादन करून स्वताहास मुक्त करून घेऊन, दुसऱ्यांसही मुक्त केलें. जेवढे सत्पुरुषांचे ग्रंथ आढळतात, त्यांतही ज्ञानाचेंच महत्त्व वर्णिलें आहे. साक्षात् श्रीकृष्ण भगवान् अर्जुनास असें सांगतात कीं, मला ज्ञानी पुरुष जसा प्रिय आहे, तसें जगांत कांहींही प्रिय नाहीं. ज्ञानी हा नित्य मीच आहें, मजमध्यें व ज्ञान्यामध्यें भेद मुळींच नाहीं. प्रमाण

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ ॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहंस च मम प्रियः ॥

जगांत चार प्रकारचे माझे भक्त आहेत. त्यांचीं नांवें आर्त, जिज्ञासु, अर्थाअर्थी, व ज्ञानी. या चार भक्तांपैकीं ज्ञानी हा मीच आहें. अशा प्रकारें ज्ञान श्रेष्ठ आहे, व तेंच मुक्तीस कारण आहे असें समज. आत्मज्ञान म्हणजे आपण जे मानवीशरीर धारण करणारे मिथ्या जीव आहों त्या जीवांच्या सत्य स्वरुपाचें ज्ञान.

शि०—आपण आत्मज्ञानाचे पुष्टिकरणार्थ जीं प्रमाणें दिलीं तीं ऐकून मी आत्मज्ञान श्रवण करण्यास अगदीं उतावीळ झालों आहें. आतांच आपण सांगितलें कीं, आत्मज्ञान म्हणजे जीवाचें सत्यस्वरूप. तें जीवाचें सत्यस्वरूप जीवास कळलें, म्हणजे तेंच आत्मज्ञान. यावरून मला शंका उत्पन्न झाली आहे कीं, सध्यां जें जीवाचें स्वरूप आहे तें कां मिथ्या आहे, हें कांहीं समजत नाहीं; तर तें मला कळेल असें फोडून सांगा.

गु०—तूं म्हणतोस तें सर्व खरें, पण आत्मज्ञान सांगणें व तें शिष्याचे अनुभवास आणून देणें हें काम मोठें दुर्घट आहे. तें तुला

एकाएकीं समजावयाचें नाहीं. प्रथम थोडे दिवस ईश्वराची सेवा निष्काम होऊन कर, म्हणजे तुझें अंतःकरण शुद्ध होऊन, तूं आत्मज्ञान श्रवण करण्यास अधिकारी होशील. तूं अधिकारी झालास म्हणजे सद्गुरु तुला उपदेश करतील. उगीच उतावीळ होऊं नकोस. ईश्वरसेवा कर म्हणजे सर्व कांहीं प्राप्त होतें.

शि०—गुरुमहाराज, मी आपणापुढें काय बोलावें ! कारण जास्त बोलावें तर आपण मजवर रागवाल कदाचित्; म्हणून बोलत नाहीं. आपलें दर्शन घेऊन जातों आतां.

गु०—अरे, आम्हांस राग आणि लोभ मुळींच नाहीं. तुला जें बोलावयाचें असेल तें खुशाल बोल.

शि०—गुरुमहाराज, आपण परवानगी दिली म्हणून बोलतोंच. कारण भिडेनें जर तसाच बसलों तर माझें कार्य होणार नाहीं. आपण सांगितलें कीं, तूं प्रथम कांहीं दिवस ईश्वरसेवा कर, ह्मणजे तूं ज्ञान श्रवण करण्यास अधिकारी होशील. तर मी आजपर्यंत जी ईश्वरोपासना केली व कथा पुराणादिक श्रवण करून त्याप्रमाणें व्रतें, अनुष्ठानें, व तीर्थयात्रादिक केलीं तें सर्व व्यर्थ गेलें काय ? मला ईश्वरप्राप्तीची मोठी इच्छा आहे म्हणून मी आपणाकडे आलों, व "आत्मा पुरुष ईश्वरः" असें वाक्य ऐकून, आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची जिज्ञासा आपणास दर्शविली; परंतु आपण माझा अव्हेर करतां हें पाहून मला मोठेंच दुःख वाटतें. आतां मी आपणांस शरण आहें. माझी खात्री आहे कीं, जर आपण मजवर कृपा कराल तर मला आत्मज्ञानप्राप्ति होईल.

गु०—हे शिष्य, तुझी वाणी ऐकून व आत्मज्ञान प्राप्त्यर्थ उत्कंठा पाहून मला मोठा आनंद झाला. तुझ्या सारखा जिज्ञासु शिष्य मला मिळणार नाहीं तूं आजपर्यंत ईश्वरप्राप्त्यर्थ जीं स्वधर्मयुक्त कर्में केलींस त्यांचेयोगें तुझें अंतःकरण शुद्ध झालें आहे; व त्यामुळेंच

तुला आत्मज्ञानप्राप्तीची उत्कंठा प्राप्त झाली आहे. कारण श्रीमच्छंकराचार्य म्हणतातः—

स्ववर्णाश्रम धर्मेण तपसाहरितोषणात् ।
साधनं प्रभवेत्पुंसां वैराग्यादिचतुष्टयं ॥

अर्थ स्ववर्णाश्रम धर्माते अर्पितां हारे तोषतो ।
त्या तपें साधिती चारी वैराग्यादिक साधनें ॥

याप्रमाणें तुला वैराग्य म्हणजे विषयाचे ठिकाणीं अप्रीति व आत्म्याचे ठिकाणीं प्रीति उत्पन्न झाली आहे असें जाण. आतां तूं ज्ञानाधिकारी झालेला आहेस; यांत कांहीं शंका नाहीं. मीं प्रथम उगीच तुझें मन पाहिलें कीं, तुला खरें अगत्य आहे कीं काय? कारण सध्यां जगांत अशीं कांहीं मनुष्यें आहेत कीं, तीं उगीच सत्पुरुषांकडे जातात, व आपली विद्वत्ता त्यांस दाखवितात, अगर घटकाभर मजा या नात्यानें आत्म्याची त्यांजबरोबर चर्चा करितात, व निघून जातात. दाखवावयाचें मात्र आह्मी ज्ञानी आहों. पण व्यर्थ पांडित्यापेक्षां त्यांचेपाशीं कांहीं नसतें अशांशीं बोलण्यांत आम्ही व्यर्थ काळ घालवीत नसतों. परंतु तूं नुसता आम्हांस गुरु म्हणणारा दिसत नाहींस; तूं खरा गुरुज्ञानाचा अधिकारी आहेस. करितां तुला मी आतां उपदेश करितों, तो तूं लक्षपूर्वक ऐक. तूं विचारिलेंस कीं, जीवाचें रूप मिथ्या आहे कीं काय? व जर मिथ्या आहे तर त्यास हें असें मिथ्यारूप प्राप्त होण्यास कारण काय? तुला हें समजण्याकरितां प्रथम एक दृष्टांत सांगतों. नंतर दृष्टांताचा सिद्धांत करून साधारण अनुमानिक ज्ञान तुला उत्पन्न होईल असें सांगून, मग सत्य आत्मज्ञानाचा उपदेश करीन.

कोणीएक धनगर अरण्यांत मेंढरें राखीत असतां त्यानें असें पाहिलें कीं, नुकतीच एक सिंहीण व्याली आहे व आपलें तान्हें पिलूं झाडींत

ठेवून ती आपलें भक्ष्य धुंडण्याकरितां अरण्यांत दूर निघून गेली. असें पाहतांच धनगरास जिज्ञासा उत्पन्न झाली कीं, हें सिंहाचें पिलूं सिंहीण येण्यापूर्वींच आपण बाळगावयाकरितां घरीं न्यावे. असा इरादा करून तो धनगर आपल्या मेंढरांसह त्या सिंहिणीचे पिलास घेऊन घरीं आला. घरीं येतांक्षणींच त्यानें त्या पिलास दूध पाजून मेंढरांमध्येंच कोंडून ठेविलें. दुसरें दिवशीं धनगरानें रानांत चरावयाकरितां त्या सिंहाचे पिलास मेंढरांबरोबरच नेलें. असा क्रम बरेच दिवस चालला. तें सिंहाचें पिलूंही त्या मेंढरांत आनंदानें राहूं लागलें. त्यास उपजतांच मेंढरांची संगत प्राप्त झाली. त्यास हिंसक पशूंची संगत नसल्यामुळें हिंसेचा गुण मात्र त्याचे अंगीं आला नव्हता. तें पिलूं आपण एक मेंढरूंच आहों असें मानूं लागलें. परंतु जात्या त्याची जात अति पराक्रमी व उंच वाढीची असल्यामुळें तें थोडेच दिवसांत मोठें झालें; व लोकही त्या सिंहास मेंढरांमध्यें पाहून त्या धनगराची वाहवा करूं लागले. पुढें एके दिवशीं धनगरानें तीं मेंढरें अरण्यांत चारणीस लाविलीं असतां असें झालें कीं, तेथून जवळच असणाऱ्या डोंगरांतून एका मोठ्या सिंहाची गर्जना ऐकूं आली. हें पाहून तो धनगर व मेंढरें पळूं लागलीं. त्यांबरोबर मेंढरांतील सिंहही पळूं लागला. डोंगरांतील सिंह दरींतून बाहेर येऊन पाहतो तों त्यास असें दिसलें कीं, सर्व मेंढरें रानोमाळ पळत आहेत व त्या मेंढरांमध्यें आपणासारखाच भला मोठा एक सिंहही पळत आहे. हें पाहून तो चकित झाला व विचार करूं लागला कीं, आपणासारखा सिंह मेंढरांत कां बरें असावा! व त्यानें मला भिऊन पळण्याचें कारण काय? असा विचार करून त्या दरींतील सिंहानें कारण शोधून, लागलींच त्या मेंढरांतील सिंहास अरे, मोठ्या मेंढरा, म्हणून जोरानें हांक मारिली. त्या सरशीं मेंढरांतील सिंहास वाटलें कीं, मोठें मेंढरूं

मीच आहें व मलाच ही हांक आहे. असें जाणून तो मेंढरांतील सिंह उभा राहिला. दरींतील सिंह त्याचे जवळ गेल्यानंतर त्या उभय सिंहांचें खालीं लिहिल्याप्रमाणें बोलणें झालें.

**दरींतील सिंह॰**—कां मित्रा, तूं मेंढरांबरोबर कां पळत होतास? तूं सिंह आहेस; तुझी योग्यता मेंढरांबरोबर पळण्याची नाहीं.

**मेंढरांतील सिंह॰**—काय, तूं सिंह कोणास म्हणतोस? तुझा बाप सिंह असेल! तूं मेंढरांतून कां पळतोस म्हणजे काय? कारण मीही मेंढरूंच आहें.

**द॰ सिं॰**—अरे, तूं रागावूं नकोस. मी तुला तुझ्या हिताचे दोन शब्द सांगतों. तूं जर सर्व मेंढरांपेक्षां मोठा आहेस तर तूं मेंढरूं कसें होशील याचा विचार कर.

**में॰ सिं॰**—उगींच कांहीं तरी बोलून तूं मला थांबवीत आहेस? मी जातों. तुला मजशीं काय करावयाचें आहे? अरे, मी मोठा असलों म्हणून काय झालें? मी मोठें मेंढरूं आहें, व तीं लहान मेंढरें आहेत. कोणास वाढ असते, कोणास नसते. मोठ्यावर व लहानावर काय आहे? मी जातों आतां; पुन्हां मला हांक मारूं नकोस.

**द॰ सिं॰**—अरे, मी तुझ्या पाया पडतों पण थांब जरा. माझे आणखी दोन शब्द ऐक. अरे तूं एक मोठा आहेस, एवढेंच तुझें लक्षण मेंढरांहून वेगळें आहे असें नाहीं; तुझा रंग पांढरा आहे, व मेंढरूं काळें आहे. तुझे पायांस नख्या असून पंजे आहेत; मेंढरांचे पायांस खूर असून नख्या नाहींत. तुझी कमर बारीक असून तुझे मुखास गेळे नाहींत; मेंढरांची कमर तुझे कमरेसारखी नसून त्यास हनवटी खालीं गेळे आहेत. अशीं तुझीं पुष्कळ लक्षणें मेंढरांचे लक्षणांस जुळत नाहींत याचा विचार कर; व तुझीं लक्षणें जर मेंढरांशीं जुळत नाहींत, तर तूं मेंढरूं कसा तें सांग.

**मेंं० सिं०**—( जरा विस्मित होऊन ) मग जर माझीं लक्षणें मेंढरांस जुळत नाहींत तर कोणास जुळतात ?

**द० सिं०**—अरे, तूंच विचार कर. तुझ्या देहाचें व माझ्या देहाचें लक्षण जुळतें कीं नाहीं तें पहा.

**मेंं० सिं०**—( बराच वेळ विचार करून व त्याचे शरीरांशीं आपले शरीराची तुलना करून ) हो, जुळतात. मग आतां तुझें म्हणणें काय?

**द० सिं०**—माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, तूं माझ्या जातीचा आहेस कां मेंढराच्या जातीचा आहेस याचा विचार कर.

**मेंं० सिं०**—( विचार करून ) मला वाटतें कीं, मी तुझे जातीचा असावा. परंतु तुझें तोंड व माझें तोंड सारखें आहे कीं नाहीं हें कसें समजावें ? कारण माझें तोंड मला दिसत नाहीं.

**द० सिं०**—येथें जवळच एक तळाव आहे, त्या तळावाचे कांठीं आपण उभे राहून पाण्यांत पाहिलें ह्मणजे दोघांचींही तोंडें पाण्यांत प्रतिबिंबतील व तीं दोघांसही दिसतील. मग पहा, तुझें व माझें तोंड सारखें आहे कीं नाहीं.

**मेंं० सिं०**—( तळ्यांतील पाण्यांत पडलेलीं उभयतांचीं मुखें सारखींच आहेत असें पाहून ) होय, सारखींच आहेत. आतां मी तुझे जातीचा आहें, इतकें मला पक्कें समजलें. पण मी इतके दिवस मेंढरांत कसा राहिलों ? माझीं आईबापें कोठें आहेत ? तसेंच मी जर मेंढरूं नाहीं तर कोण आहें, व तूं कोण आहेस हें सांग.

**द० सिं०**—त्या धनगरानें तुला उपजतांच फसवून चोरून नेलें व मेंढराचे संगतीमुळें तूं मेंढरूंच आहेस असें तुला वाटूं लागलें, हा त्यांचे संगतीचा गुण समज. तूं मेंढरूं नसून सिंह आहेस. आपण सर्व पशूंमध्यें श्रेष्ठ असून पशूंचे राजे आहों. आपल्या पराक्रमापुढें कोणाचाही

पराक्रम चालत नाहीं; व मेंढरें आपलें भक्ष्य आहे. करितां तूं आतां त्यांचे जातींत जाऊं नकोस. तीं आलीं असतां तूं त्यांस मारून खा.

मे० सिं०—तूं सांगितल्याप्रमाणें मी आतां मेंढरांचा आश्रय करणार नाहीं व तीं आलीं असतां त्यांस मारून खाईन. चल आतां मी तुज बरोबर येतों.

पहा, तो सिंह मेंढरांचे संगतीमुळें मेंढरूंरूपच झाला होता. तसाच हा जीव निराकार ज्ञानवान् साक्षात् ब्रह्म असून देहाध्यासानें चर्ममय जो घाणेरडा देह तोच मी आहें असें मानूं लागला आहे. या ठिकाणीं अज्ञान हाच धनगर आहे. या अज्ञानरूपी धनगरानें जीवरूपी सिंहास देहरूपी मेंढरांत आणून सोडिलें आहे; व देहाचे संगतीनें जीवास मीच शरीर असें वाटूं लागलें आहे. हेंच जीवास स्थूलदेहबंधन आहे. हें बंधन दरींतील सिंहाप्रमाणें जेव्हां कोणी सद्गुरु भेटेल तेव्हां तो जीवाचीं व देहाचीं लक्षणें परस्पर अगदीं भिन्न आहेत असें दाखवून त्यास देहबंधनांतून मुक्त करील. त्या मेंढरांतील सिंहानें जरी कोटी वर्षें तपश्चर्या केली असती, तरीही त्यास सद्गुरुवांचून स्वस्वरूप सिंहरूप ज्ञान प्राप्त झालें असतें काय ? जें कोटि वर्षांच्या तपसामर्थ्यें प्राप्त न होणारें तेंच सद्गुरु साह्यानें तात्काळ प्राप्त होतें. म्हणून म्हटलें आहे:—

**न गुरोरधिकं तत्त्वं । न गुरोरधिकं तपः ॥**
**गुरु साक्षात् परब्रह्म । तस्मै श्रीगुरवेनमः ॥**

गुरुपेक्षां तप अधिक नाहीं, व तत्त्वही अधिक नाहीं. कारण ज्या परब्रह्म प्राप्तीकरितां तपश्चर्यादिक कर्में करावयाचीं तें परब्रह्मच साक्षात् सद्गुरु आहे. त्या गुरूस शरण गेल्यानें सर्व कांहीं कार्यें स्थळींच प्राप्त होतात्. तुकोबांनींही म्हटलें आहे:—

सद्गुरु वांचोनी सांपडेना सोय।
धरावे ते पाय आधीं आधीं ॥
आपणा सारिखें करिती तात्काळ।
नाहीं काळ वेळ तयालागी ॥
तुका म्हणे सारें आंधळें हें जन।
गेलें विसरुन खऱ्या देवा ॥

या तुकोक्तीप्रमाणेंच पहा, त्या दरींतील सिंहरूपी सद्गुरुची व मेंढरांतील सिंहरूप शिष्याची जेव्हां गांठ पडली तेव्हां " आपणासारिखें करिती तात्काळ " या उक्तीप्रमाणें लागलींच त्या दरींतील सिंहानें त्या मेंढरांतील बढ्या मेंढरास आपणासारखेंच सिंह केलें. या रीतीनेंच सद्गुरूही शिष्याचा अज्ञानरूपी तम आपल्या उपदेशरूपी ज्योतीनें घालवून त्यास लागलींच म्हणजे उपदेश कानीं पडतांच आपणासारखेंच ज्ञानी करितो. करितां हे शिष्य, मी तुला आतां आपणासारखाच कर-णारं आहें. तुझें फक्त अज्ञानावरण गेलें म्हणजे मजसारखाच होशील. मेंढरांतील सिंह जो स्वताहास मेंढरूं मानीत होता, त्याचा हा पुष्कळ दिवसांचा संगभ्रम फक्त दरींतील सिंहानें नाहींसा केला. बाकी तो स्वतः सिंहच होता, तो नवीन कांहीं सिंह झाला, असें नाहीं. तसा तूंही मूळचा आहेस तसाच आहेस, पण भ्रमानेंच मी देह आहें, असें तूं मानतोस. हा तुझा भ्रम दूर केला म्हणजे तूं आयताच जो आहेस तोच तूं होशील. जसा भ्रम खोटा पण भय खरें. भ्रम गेला कीं भय गेलें. दोरीच्या ठिकाणीं सर्पभास झाला कीं लागलींच पळ काढावा लागतो. पहा सर्परूपी कारण खोटें आहे पण मिथ्या सर्परूपी कार-णाचें कार्य जो पळ काढणें हें मात्र खरें आहे. दुसरा विचार असा समज कीं, जी दृष्टि सर्प पाहते तीच दृष्टि त्याच वेळेस रज्जू-सही ( दोरीस ) पहाते. जेव्हां रज्जूरूपी सत्य पदार्थ नजरेस पडला,

त्याच वेळीं त्या ठिकाणींच सर्पही दृष्टीस पडला. परंतु त्या वेळीं रज्जु दिसत असून त्या रज्जूचें सत्यस्मरण मात्र नाहीं. त्या स्मरणाऐवजीं त्या वेळीं अकस्मिक सर्पस्मरण सर्पाध्यासानें उत्पन्न झालें, हेंच रज्जूचें विस्मरण समजावें. हें रज्जु ज्ञानाचें विस्मरणच भयास अगर पळ काढण्यास कारण आहे. येथें भयास कारण रज्जु म्हणावी तर रज्जूपासून भय वाटणें संभवनीय नाहीं. जर भयास कारण सर्प म्हणावा तर त्या ठिकाणीं सर्प मुळींच नाहीं. तेव्हां नसणाऱ्या वस्तूस कारण समजणें हेंही न्यायाचें होणार नाहीं. रज्जूचे ठायीं सर्प नाहीं, पण आपलेच अंतःकरणांत सर्प स्मरण आहे. त्या अर्थी असें सिद्ध झालें कीं, काल्पनिक सर्पस्मरण हेंच भेडसावण्यास कारण आहे. जर कारणच काल्पनिक मिथ्या आहे, तर त्याचें कार्य जें पळणें हें तरी सत्य कसें ह्मणावें? परंतु पळणें, व भिणें या दोन गोष्टींचा परिणाम सत्यत्वेंकरून मनुष्यावर घडतो. त्याचप्रमाणें ही संपूर्ण सृष्टि भ्रमरूपसर्पस्थानीं असून खोटी आहे. तरी या जगद्भासाचें कार्य जें सुखदुःख तें मात्र खरें दिसतें. असो; वर सांगितल्याप्रमाणें भ्रमरूपी सर्प मनुष्याचे अंतःकरणांतच उत्पन्न होतो, व ज्या ठिकाणीं तो उत्पन्न होतो अशा त्या अंतःकरणावरच त्याचें भयरूपी कार्य घडतें असा अनुभव आहे. यावरून असें समजावें कीं, कार्यकारण हें दोन्ही भाव एका विस्मरणरूप कल्पनेचेच आहेत. ज्यापासून हें भ्रमरूपकार्यकारणभाव उत्पन्न होतात तें अंतःकरणही त्या वेळीं मिथ्याच कल्पनारूपी कार्य उत्पन्न करितें. ह्मणजे भ्रमधारक अंतःकरणही त्यावेळीं मिथ्याच असतें. आतां हें भ्रममूलक स्मरणविस्मरणरूप जें अंतःकरण, तें कांहीं शुद्धान्तःकरण नव्हे. तें तर मनरूपी मलिनांतःकरण आहे. हें मनच भ्रमिष्ट बनतें व अनेक कल्पनारूपतरंग मनोमय कल्पनेचे धरून उत्पन्न करतें व त्या मनोमय पदार्थाप्रमाणें नेत्रेंद्रियावाटें

येऊन स्थूल पदार्थांस पहातें. तेंच मन जेव्हां निद्रेंत असतें तेव्हां त्यास प्रत्यक्ष सत्य सर्पानें स्पर्श जरी केला तरी तो समजत नाहीं. तेंच आपल्या हयातींत त्याच सर्पास पाहून भितें असा अनुभव आहे. याघरून ध्यावयाचें तें एवढेंच कीं, एकटें मनच भ्रमरूप सर्पाकर होतें, व तेंच भितें व पुनः शुद्धीवर येऊन निर्भय होतें; आणि सर्पस्मरण सोडितें. या स्थळीं भ्रमच भयाचें कारण, भ्रमच भ्रमाचें कार्य, व भ्रमच जाणारा व भ्रमच येणारा आहे असें समजावें. याच न्यायास अनुसरून "भ्रम मूल मिदं जगत्' असें ह्मटलें आहे. पहा श्रीकृष्ण भगवान् गीतेंत सांगतातः—

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥

रज्जूला सर्प मानून भितो त्या भेडसावण्याला शत्रु कोणी दुसरा नसतो. पुनः रज्जूला रज्जु मानून निर्भय होतो, ही निर्भयता देण्यास बंधुही कोणी दुसरा नसतो फक्त भ्रमच भयाचें व निर्भयता प्राप्त झाली हें मानण्याचें कारण आहे. भ्रम जिंकला ह्मणजे भ्रम नाहींसा केला म्हणजे तोच भ्रम भ्रमाचा बंधु झाला व भ्रम राखून ठेविला म्हणजे भ्रमच भ्रमाचा शत्रु झाला. त्याप्रमाणेंच मी मनुष्य आहें, मी देह आहें असा निश्चयरूपी भ्रमच कोणी एक शबलात्मा आहे. तो मी जन्मास आलों, मेलों, सुखीदुःखी झालों, असें मानितो हाच भ्रम आहे. हा भ्रम तो राखून ठेवितो यामुळें त्याचा शत्रुही तोच आहे. मी देह आहें हा निश्चयरूपी भ्रम जेव्हा सद्गुरु साह्यानें ह्मणजे आपल्या स्मरणरूप अंतःकरणाचे साह्यानें नाहींसा होतो, तेव्हां तोच त्याचा बंधुही होतो. आतां जेव्हां मी आहेंच हें निश्चयरूपी अज्ञान ह्मणजे भ्रम शरीरास मी ह्मणूं लागतो तेव्हां तोच मंदरांतील सिंहाप्रमाणें अनात्मा होतो, जसा कोणी राजा असून स्वप्नांत

भीक मागतो तसा तो होतो. तोच राजा आपल्या जागृतीचे साह्यानें जसा पूर्ववत् भ्रष्ट झालेलें राज्यपद पावतो तसाच जीव हा अज्ञानाचे संगानें देहाचें आत्मैक्य घेतो व ज्ञानाचे साह्यानें पूर्ववत देह विरहित आत्मस्वरूपाप्रत पावतो. जसा सूर्य अभ्राचे गमनागमनास न जाणतां आहे तसाच राहतो, तसेंच हें जीवरूपी अभ्र आलें आहे तें गेलें, तरी तूं त्या जीवरूपी अभ्रास जाणत नाहींस. हें शिष्य, तूं हें फारच लक्षपूर्वक मनन करून लक्षांत आण ह्मणजे तुला कळेल कीं, तूं व मी या उभयतांस कोठून यावयाचेंही नाहीं, व कोठें जावयाचेंही नाहीं. तुला फक्त भ्रम भासावयास आला आहे, तोच जावयाचा आहे. जशी रज्जु सर्पभासास अगर भयास कारण नाहीं तसाच तूंही या भ्रमास कारण नाहींस. मी देह आहें, मी अज्ञानी आहें, मी ब्राह्मण अगर शूद्रादिक आहें, मी मनुष्य आहें, मी सुखीदुःखी आहें, मी आलों, मी गेलों, मी जन्मलों, मी मरेन, इत्यादि जें तूं मानितोस, तें तूं आपल्या सत्यज्ञानरूपानें ह्मणजे आत्मरूपानें मानित नसून तुझें जें संकल्पविकल्पात्मक भ्रमरूप मन, त्यानेंच मानिलें आहे. हें मन झोंपेंत लीन झालें ह्मणजे त्यास या भ्रमरूप सुखदुःखाचें स्मरण व जात्याभिमानादिक क्रिया व देहाभ्यास, हीं राहत नाहींत; असा अनुभव आहे. यावरून मनच भ्रमाचे व सृष्टीचे उत्पत्तिस्थितीस हेतु आहे असें झालें, पहा म्हटलें आहे.

जाग्रदादौ मनो विश्वं वितनोति चराचरं ।
सुषुप्तौ कुरुते लीनं तस्माद्विश्वं मनोमयं ॥

मनच आपल्या जागृत अवस्थारुपी संकल्पयोगें जगद्रूपानें भासतें, व तेंच मन सुषुप्तींत लीन झालें असतां विश्व भासत नाहीं. तस्मात् हें सर्व मनच नटलें आहे. हें मन अगर इतर ज्या अंतःकरणाच्या चार वृत्ति आहेत त्या सर्व तुझे स्वरूपावर अभ्राप्रमाणें येऊन जाणाऱ्या

आहेत. ढग सूर्यापासूनच उत्पन्न होतात व पुनः तेच त्या सूर्यास आच्छादितात. तद्वतच हे अंतःकरणपंचकादि आभासादिक भ्रमरूप ढग तुजपासूनच उत्पन्न होतात व तुलाच आच्छादितात. जसें ढगाचे येण्याजाण्याच्या क्रियेमुळें सूर्य येतो जातो असें दिसतें, पण वास्तविक सूर्य येतही नाहीं व जातही नाहीं, त्याप्रमाणें तुझे स्वरुपावरून अंतःकरणपंचकरूपी ढग येतात व जातात पण तूं येत जात नाहींस. जसें न चालतां सूर्याचें चालणें उपाधियोगें दिसतें, तसेंच तूंही कांहीं एक करीत नसतां कर्ता भोक्ता, सुखीदुःखी दिसतोस. तूं लहानही नाहींस व मोठाही नाहींस. तूं या शरीरांत कसा आहेस हें सांगतों तें ऐक; ह्मणजे वर सांगितलेलें सर्व कांहीं तुझें लक्षांत भरेल.

**यथा काशोहृषीकेशो नानोपाधि गतो विभुः ।**
**तद्भेदाद्भिन्नवद्भाति तन्नाशे सति केवलः ॥**

या जगद्गुरूंच्या वाक्यान्वयें तूं असें समज कीं, जसें एकच आकाश सर्व अनंतब्रह्मांडांत व्याप्त असून त्यास उपाधियोगें घटाकाश मठाकाश, महादाकाश अशीं नांवें प्राप्त होतात, त्याचप्रमाणें तूंही एकच सर्वत्र असून तुलाही उपाधियोगेंच जीव, प्राणि, मनुष्य अशीं नांवें प्राप्त झालीं आहेत. जसें महदाकाशास घटामध्यें घटाकाश ह्मणतात तसेंच तुला शरीरामध्यें जीव असें ह्मणतात. जसें सूर्यापासून ढग उत्पन्न होतात, तसेंच तुजपासून अंतःकरणादिक तरंग उत्पन्न होतात. जसें ' घटांतील जलांत महदाकाशाचें प्रतिबिंब पडून त्या आकाशास जलाकाश हें नांव प्राप्त होतें; तसेंच अंतःकरणरूपी बुद्धींत तूं जो चैतन्य, त्या तुझें प्रतिबिंब पडलें आहे, त्यासच जीव असें नांव येतें. घटांतील जलांत प्रतिबिंबित झालेलें आकाश जलाचे हलण्यानें हलत आहे असें दिसतें, पण सत्याकाश कांहीं हलत नाहीं; त्याप्रमाणेंच शरीररूपी घटांतील बुद्धिरूपी जलांत पडलेलें तुझें प्रतिबिंब प्राणवा-

यूचेयोगें हलतांना व क्रिया करतांना स्पष्ट दिसतें; परंतु तूं मात्र हलतही नाहींस व क्रियाही करीत नाहींस. जसें घट फुटल्याबरोबर घटांतील जल व जलांतील जलाकाश हीं सर्व अदृश्य होतात, तद्वत्च तुला ज्ञान होऊन पुनः देहधारण करण्याचें प्रयोजन न राहतां तुझा देहरूपी घट फुटला ह्मणजे त्यांतील अज्ञानमूलक बुद्धिरूपी जल व त्यांतील चिदाभासरूपी प्रतिबिंबित जीवही नाहींसा होतो. यांत लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही आहे कीं, प्रतिबिंबित झालेला जीव सुखदुःखाचे भोग भोगीत नाहीं. तर या जीवबुद्धि संयोगांत वासनात्मक सतरा तत्त्वांचा लिंग अथवा सूक्ष्म देह उत्पन्न होतो, तोच सुखदुःख भोक्ता अथवा अभिमान धर्ता, व अनंतक्रिया कर्ता आहे असें समजावें. प्रमाणः—

पंचप्राणमनोबुद्धिदशेंद्रियसमन्वितम् ।
अपंचीकृतभूतोत्थं सूक्ष्मांगं भोगसाधनम् ॥

आत्मबोध.

पांच प्राण, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, मन, व बुद्धि अशीं सतरा तत्त्वें मिळून जो सूक्ष्म देह आहे, तोच सर्व कर्ताभोक्ता व जीवासमवेत एक देह सोडून पुनर्जन्म देह धारण करून चौऱ्याशी लक्षयोनीप्रत गमन करणारा आहे. जसा वायूमध्यें गंध राहतो तसा त्या लिंग देहांत जीव असतो असें समज, व कर्तृत्वभोक्तृत्व आपणावर घेऊं नकोस; ह्मणजे तुला सुखदुःखाचे भोगही भोगावे लागणार नाहींत. यावर तुला अनुभव येईल असा स्वानुभवसिद्ध दृष्टांत सांगतों; म्हणजे तुला कळेल कीं, तूं जन्मलाही नाहींस म्हणून मरणारही नाहींस; तूं आलाही नाहींस व गेलाही नाहींस. पहा, आपण निजलों म्हणजे आपणांस स्वप्न पडतें, त्या स्वप्नांत, आपण इकडे आलों, तिकडे गेलों, दुःखांत पडलों, सुखांत बुडालों, राजा झालों, भिकारी बनलों, मी जन्मलों, मी

मेलों, असें सर्व चंचळ कारभार आपण पाहतों; पण हें स्वप्न देहानें पाहतों जागृत देहानें नाहीं. या स्वप्न देहांत जरी तुला मी आलों व मी गेलों असें वाटलें तरी तुझा सत्य देह एका जाग्यावरच आहे. तो कोठें आलाही नाहीं व गेलाही नाहीं. तुझ्या जागृत देहांत तुझे स्वप्न देहांतील कारभार निरुपयोगी आहेत. त्याप्रमाणेंच तुला जें मी देह आहें, मी जन्मधारक आहें, मी बद्ध आहें असें वाटतें, तें तुला तुझ्या भ्रमरूपी व अज्ञानावरणरूपी स्वप्नदेहामुळें वाटतें. एरव्हीं तूं आहेस तसाच आहेस. जशी तुझ्या सत्यदेहीं म्हणजे जागृत शरीरीं तुझा स्वप्नदेह व स्वप्नसृष्टि मिथ्या आहे, तशीच तुझ्या आत्मरूप जागृतदेहीं या तुझ्या स्थूलदेहासह भासणारी सृष्टि वांझ आहे, म्हणजे मुळींच नाहीं. असें असतां, जसें सत्य शुक्तिकेंत असत्य रजतभास मिथ्या आहे, तसेंच तुझ्या सत्य निराकार स्वरूपीं हें रजतवत् भासणारें जगत्‌ही मिथ्या आहे. या सृष्टीसच माया म्हणतात, व माया म्हणजे जी नाहीं ती. म्हणूनच मायेला वांझेची लेक असें वेदशास्त्रांत म्हटलें आहे. या कारणास्तव तूं या विवर्तभासाविषयीं शंका धरूं नकोस. येथें सगळी शंकाच भरली आहे. यांत कार्यकारणभाव पाहणारा वंध्यासुतच असला पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें या स्थळीं भ्रमच भ्रमाचें कारण, भ्रमच भ्रमाचें कार्य, व भ्रमच भ्रमापासून मुक्त होणारा, व भ्रमच भ्रमाचे बंधनांत पडला आहे असें समजावें. आमचे गुरु विष्णुबावा ब्रह्मचारी म्हणतातः—

जया जागृतीचें स्वप्नदेहीं दृढान्वय ज्ञान ॥
तया स्वप्नदेहीचीं सुखदुःखें स्वप्न देहासमान ॥
अहंताधारक ज्ञानाधिनिराकार ही खूण ॥
जाणे दृढान्वय ज्ञानाची ॥

अशा प्रकारें, हे शिष्य, खंती सोड. तूं कोण आहेस हें मीं

तुला एथ्हांपर्यंत अनुमानिक ज्ञानानें सांगितलें. ही सर्व सृष्टि तुझ्या देहासुद्धां तुझे सत्यस्वरूपांत मुळींच नाहीं असें ध्यानांत आण. संशय असल्यास त्याचें उत्तर भ्रमच भ्रमाचें कारण, भ्रमच भ्रमाचें कार्य व भ्रमच भ्रमास धरणारा आहे, असें समजून तूंही भ्रमच आहेस व मी तुझा सद्गुरुही भ्रमच आहें असें समज. एथ्हांपर्यंत मी भ्रमरूप सद्गुरूनें तूं जो भ्रमरूप शिष्य त्या तुला अनुमानिक ज्ञान तुझ्या भ्रमनाशार्थ सांगितलें तें चांगलें लक्षांत ठेव, व या अनुमानिक ज्ञानावरून तूं कोण असावास याचा अनुमान कर; म्हणजे तुला अनुमानिक आत्मज्ञान झालें. आतां यापुढें तुला परोक्षज्ञान सांगून नंतर अपरोक्ष ज्ञान सांगेन. भिऊं नकोस, नित्य विचार कर, म्हणजे तूं मुक्त होशील.

शि०–गुरु महाराज, मला एथ्हांपर्यंत जो आपण उपदेश केला त्यायोगें मला मोठा आनंद झाला आहे; व पुढें काय बोलावें हें सुचत नाहींसें झालें आहे. खरोखर, मी भाग्यवान् म्हणून माझ्या दृष्टीस हे आपले चरण पडले.

आतां मला काळजी नाहीं. मी आपल्या कृपेनें खातरीनें आत्मसुखास जाऊन पोहोंचेन. मागें आपण जो सिंहाचा दृष्टांत सांगितला, त्यायोगें मला माझ्या स्वस्वरूपाचें विस्मरण झालें आहे असें वाटतें, व आणखी पुढें आपण जो झोंपेंतील स्वप्नाचा दृष्टांत सांगितला त्यायोगें असें वाटतें कीं, झोंपेंत जसा माझा सत्यदेह एकाच ठिकाणीं पडलेला असतां त्या झोंपेच्या पोटीं दुसरा स्वप्नदेह व स्वप्नसृष्टि मिथ्याच निर्माण होते, तद्वतच मी देहविरहित कांहीं वस्तु असून त्या मद्रुप वस्तूवर माझ्या देहासुद्धां सर्व जगद्रुप स्वप्न असावें असें वाटतें. मी निजलों असतां त्या निद्रेच्या पोटीं जो माझा स्वप्नदेह उत्पन्न होतो त्या स्वप्नदेहास जसा मी आपल्या सद्रूप देहानें जाणत

नाहीं, तसाच या माझ्या सांप्रतच्या जागृत देहास व सृष्टीस मी आपल्या सत्य देहानें जाणत नसेन असें अनुमान होतें. आणखी मला असेंही वाटतें कीं, जशा स्वप्नदेहाच्या क्रिया माझ्या निजलेल्या सत्यदेहास बंधन करूं शकत नाहींत, तशाच सांप्रत देहाच्याही क्रिया मला बंधनास कारण होणार नाहींत. जशी माझ्या निजलेल्या देहाची व स्वप्नदेहाची परस्पर ओळख नाहीं, तशीच या माझ्या देहासुद्धां सृष्टीची व माझ्या सत्य स्वरूपाची ओळखही नसेल; व असेल नसेल असें जें वाटतें हाच भ्रम, व हीच माया आहे. मागें आपण परोक्षज्ञान पुढें सांगेन असें म्हणाला होता, तरी कृपा करून परोक्षज्ञान कशास ह्मणावें; हें सांगावें.

गुरु---तूं मोठा बुद्धिमान् आहेस व तुझें अंतःकरण अत्यंत शुद्ध आहे; ह्मणूनच तुला मागील दृष्टांताचेयोगें अनुमानिक ज्ञान प्राप्त झालें. नाहीं तर जगांत बहुतकरून असे कांहीं प्राणि आढळतात कीं, त्यांना किती जरी सांगितलें तरी कांहीं कळत नाहीं. असो, आतां यापुढें फार एकाग्र चित्तानें ऐक; कारण पुढें अति गहन विषय आहे. हा अध्यात्मविषय तुझ्या परिचयाचा नसल्यामुळें एकदम तुला समजला जाणार नाहीं; थोडा कंटाळवाणा वाटेल. परंतु एकदां कां समजला, म्हणजे तुझ्या आनंदास कारण होईल. आतां प्रथम तुला परोक्षज्ञान म्हणजे काय हें सांगतों; व नंतर अपरोक्ष ज्ञानाचा अनुभव तुझे प्रचितीस आणून देईन. परोक्ष ज्ञान म्हणजे जी वस्तु ज्या प्रकारची असेल, त्या वस्तूस त्याचप्रकारें जाणणें. उदाहरणार्थ-एक परीस आहे; त्या परिसास पाहून त्यास परीसच म्हणणें अगर ओळखणें यास परोक्ष ज्ञान म्हणावें; परीस असून त्यास धोंडा म्हणणें हें कांहीं परोक्षज्ञान नव्हे. असा परोक्ष या शब्दाचा अर्थ समजावा. या परोक्षज्ञानास

अनुसरून तुला मी आत्मानात्मविचार सांगतों. कारण आत्मानात्मविचारावेरीज मनुष्य प्राण्यास शुद्ध ज्ञान होणें अशक्य आहे. पहा ह्मटलें आहे 'आत्मानात्मविवेकेन ज्ञानंभवतिनिर्मलं' याचा अर्थ वर आलाच आहे. आत्मानात्मविचार यांत आत्मा या शब्दानें आपलें ज्ञानघन स्वस्वरूप असा अर्थ घ्यावा व अनात्मा या शब्दानें आपल्या निर्विकल्प आत्मरूपाहून ज्या देहादिक इतर वस्तु आहेत त्या घ्याव्या प्रमाण:—

**अनात्मनि शरीरादावात्मबुद्धिस्तु या भवेत ।**
**सैव माया तयैवासौ संसारः परिकल्प्यते ॥**

नामरूपात्मक संपूर्ण देहादिकरून सृष्टींतील सर्व वस्तु जड असून, दुःखरूप आहेत. या संपूर्ण देहादि वस्तु अनात्मा असतां त्या देहासच आत्मा म्हणणें हेंच अज्ञान आहे. या देहास आत्मा असें जाणणाऱ्या बुद्धीसच अविद्या अगर माया इत्यादि नांवें आहेत; व या अविद्येनेंच हा संपूर्ण कल्पून केलेला संसारच अनात्मा आहे. आत्मा ज्ञानघन आहे व देह जड असून पंचमहाभूतांचें संयोगजन्य कार्य आहे. तेव्हां चैतन्य असा जो आत्मा तो व देह एकच असें कसें होईल? जड व चैतन्य हीं परस्परांहून अगदीं भिन्न असून विलग आहेत. प्रमाण:—

**आत्माज्ञानमयः पुण्योदेहोमांसमयोशुचिः ।**
**तयोरैक्यंप्रपश्यंति किमज्ञानमतः परं ॥**

अप्रोक्षानुभूति.

आत्मा स्वतः ज्ञानवान असून पवित्र आहे व देह जड, मांसमय, अपवित्र घाणेरडा असा आहे. त्या देहास व आत्म्यास एकच म्हणणें हें आज्ञान आहे. प्रमाण दुसरें

**आत्माप्रकाशकः स्वच्छो देहस्तामसउच्यते ।**
**तयोरैक्यंप्रपश्यंति किमज्ञान मतः परं ॥**

आत्मा स्वयं प्रकाशमान असून निर्मल आहे व देह परप्रकाशी ह्मणजे आत्मप्रकाशानें प्रकाशिला जाणारा असून जड आहे त्या उभयतांचें ऐक्य पाहणें याहून अज्ञान तें कोणतें?

याप्रमाणावरून असें लक्षांत येईल कीं, देह व आपण म्हणजे आत्मा एक नाहीं. या गोष्टीचा तुला थोडा व्यवहारदृष्ट्या न्याय सांगून, तूं देह नाहींस; तूं देहाहून पृथक आत्मा आहेस, असें स्पष्ट तुझ्या अनुभवास आणून देतों. प्रथम मी तुला कांहीं प्रश्न विचारितों त्यांचीं उत्तरें दे. उत्तर देण्याचा बोजा तुजवर पडला, म्हणजे तुला विचार करणें भाग पडेल. विचार केलास म्हणजे सहज तुला आत्मस्वरुपाची प्राप्ती होईल. कारण विचार हे ज्ञानाचें द्वार आहे. विचाराशिवाय कोटि साधनें केलीं तरी ज्ञानप्राप्ति होत नाहीं. प्रमाणः—

नोत्पद्यतेविनाज्ञानं विचारेणान्यसाधनैः ।
यथापदार्थभानंहि प्रकाशेनविनाक्कचित् ॥

जसें पदार्थाचें भान प्रकाशावांचून होत नाहीं, त्या प्रमाणेंच विचारावांचून ज्ञानप्राप्ति व्हावयाचीच नाहीं.

पाताले भूतले स्वर्गे वने वा गिरिकंदरे ।
विचारेण विनाजन्तुर्नसुखं लभते क्कचित् ॥

पाताळीं, भूतळीं, स्वर्गीं, अरण्यांत, अगर गिरिकपाटीं जाऊन, मनुष्यानें कोटि वर्षे तपःश्चर्यादिक साधनें केलीं, तरी विचाराशिवाय आत्मज्ञान कधींच होत नसून ज्ञानावांचून नित्य सौख्यही प्राप्त होत नाहीं. करितां हे शिष्य, तुला मी जें सांगेन त्याचा विचारच केला पाहिजे. विचारावांचून तुझी अज्ञाननिवृत्ति व्हावयाची नाहीं. तो विचार मुख्यत्वेंकरून कोणते गोष्टीसंबंधी केला पाहिजे हें सांगतों. प्रमाणः—

कोऽहं कथमिदं जातं को वै कर्ताऽस्य विद्यते ।
उपादानं किमस्तीह विचारः सोयमीदृशः ॥

अपरोक्षानुभूति.

मी कोण, हें कसें झालें, या जगाचा कर्ता कोण, व हें जग कोणत्या वस्तूंचें झालें आहे, याचें उपादान कारण ( घटास मृत्तिका जशी उपादान कारण आहे तसें ) काय आहे हें जाणणें, यासच विचार म्हणावें. संसारसंबंधीं विषयप्राप्तीस्तव जो विचार करतात, तो विचार नव्हे. हें जाणून मी तुला तूं कोण आहेस असा प्रश्न करितों. या प्रश्नाचें उत्तर तूं विचार करून दे.

शिष्य—( विचार करून व थोडा वेळ थांबून ) हे गुरुमहाराज, मीं विचार करून पाहिला. आपण मागें जें मला अनुमानिक ज्ञान सांगितलें, तसेंच देहाच्या व आत्म्याच्या वेगळेपणाविषयीं जीं युक्तींच प्रमाणें सांगितलीं त्यावरून, व आत्मा म्हणजे आपलें स्वरूप म्हणून मागें जें आपण सांगितलें, त्यावरून, मी कोण आहें, हें जरी मला अनुमानिक ज्ञानानें कळलें आहे—यथार्थ नाहीं—तरी मी देह नाहीं असें वाटतें; पण पुन्हां माझें मन देहभावनेवर येतें व मी देहच असावा असें वाटतें. या देहात्मबुद्धीमुळें मी ब्राह्मण, मी मनुष्य, मी गोपाळरावाचा मुलगा, मी पंढरीनाथाचा भाऊ, सितारामपंताचा जांवई, घराचा मालक, मुलाचा बाप, जगांतील एकप्राणि, व आपला शिष्य आहें असें वाटतें. व पुनः आपण सांगितलेल्या ज्ञानाची आठवण झाली ह्मणजे मी हें सर्व नाहीं असें वाटतें. तर कृपा करून मी कोण आहें, हें आपणच निर्णय करून माझे अनुभवास आणून द्यावें.

गुरु—ठीक आहे, वैद्याचें औषध देण्याचें कामच आहे. अरे, तूं म्हणतोस कीं, मी देह असावा असें वाटतें; व नसावा

असेंही वाटतें; तर या गोष्टींचा निश्चय ऐक, व मी जें सांगेन त्याचा अनुभव घे. येथें उधारीचें खातें मुळींच नाहीं. पहा, तूं जर शरीररूपी पिंजरा आहेस, तर तो शरीररूप पिंजरा दुसऱ्या कोणत्याही वस्तूंचा झालेला नसला पाहिजे. तूं जो एक वस्तु आहेस त्या तुझाच तो झालेला असला पाहिजे. पण तसें तर दिसत नाहीं. कारण मागें तुला सांगितल्याप्रमाणें हा देह जड असून पंचमहाभूतात्मक परमाणूंचा झालेला आहे. तो चर्ममय, मांसमय, रुधिरमय असा आहे. या सर्व वस्तु जड आहेत. जड वस्तूचे अंगीं जाणीव नेणीव नसते. त्या वस्तूस दुसऱ्या कोणत्याही वस्तूस जाणतां येत नाहीं. तूं जर देह आहेस, तर तुझे जे सजातीय प्राणी आहेत तेही देहच असले पाहिजेत. जर प्राणिमात्र देहाहून भिन्न नाहीं, तर मरणानंतर जेव्हां जीव शरीरास सोडून जातो, तेव्हां शरीररूपी पिंजरा तर जागेवर पडलेलाच राहतो. अशा वेळीं जर शरीराहून मनुष्य हा कांहीं वेगळी वस्तु नाहीं व शरीर जर जाग्यावरच असतें, तर मग मेला अगर जीव गेला असें कशास ह्मणतात ? व शरीर रूपी पिंजऱ्यास सोडून गेला तो कोण? हें तुझ्या लक्षांत येतें काय ? जर प्राणवायु जीवासह व वासनात्मक लिंग देहासह शरीरास सोडून जातो, असें आपल्या प्रत्यक्ष अनुभवास येतें, तर जीव व शरीर एक आहे असें कधीं तरी होईल काय ? जीव व देह कधींही एक होणार नाहींत. जीव व शरीर या दोन वस्तु परस्पर भिन्न असाव्या तरच जीवाचें देहास सोडून जाणें संभवतें. असें जर आहे तर आपलें अस्तित्व जड, निर्जीव देहावर कसें लागू होईल? कारण आपण ज्ञानवान् आहों. मीच देह आहें असें मूर्ख माणूस समजतो. प्रमाणः—

देहोहमित्ययंमूढो धृत्वातिष्ठत्यहोजनः ।
ममायमित्यपिज्ञात्वा घटद्रष्टेवसर्वदा ॥

मीच शरीर आहें असें मूर्ख समजतो. परंतु हें केवढें अज्ञान आहे! जसा मनुष्य माझा घट असें ह्मणतो पण मी घट असें ह्मणत नाहीं; तसाच मनुष्य माझा देह असें म्हणतो मी शरीर असें ह्मणत नाहीं. जसा माझा घट असें बोलण्यानें घट व बोलणारा एक नाहीं असें सिद्ध होतें, तसाच माझा देह असें ह्मटल्यानें कीं मनुष्य व देह एक नाहीं असें सिद्ध होतें. माझा हा शब्द आपणाहून वेगळी दुसरी वस्तु असल्याखेरीज उपयोगांत आणतां यत नाहीं. माझें घर, माझी बायको, माझें शेत इत्यादि म्हटल्यानें तो घर, स्त्री, शेत होत नाहीं, त्याच न्यायानें मनुष्य माझा हात, माझें डोकें, माझा पाय असें बोलतो, पण मी डोकें, मी पाय, असें बोलत नाहीं. यावरून आपण शरीररूप पिंजऱ्याहून अगदीं वेगळें आहोंत असें सिद्ध झालें. आणखी असा विचार करावा कीं, शरीर व शरीराचे जे हात, पाय, नाक, डोळे इत्यादि अवयव आहेत, ते आपणांस कधींही जाणत नाहींत. पण आपण मात्र या शरीरास व शरीराचे अवयवांस जाणतों. यावरून देहास जाणणारा तूं देह नव्हेस असें समज. जो ज्या वस्तूस जाणतो, तो त्या वस्तुहून वेगळा असतो, असा न्यायच आहे. उदाहरण.—जसा भिंतीस जाणणारा भिंत नव्हे, तद्वतच तूं देहास जाणणारा देह नव्हेस. प्रमाणः—

> घटद्रष्टा घटाद्भिन्नः सर्वथा न घटो यथा ।
> देहद्रष्टा तथा देहो नाहमित्यवधारयेत ॥
>
> योगवासिष्ट.

घटाचा जाणणारा जसा घट नव्हे तसाच मी देहरूप घटाचा जाणणारा देह नाहीं असें विवेकानें समजावें. यावरून हे शिष्य, तुला तूं देहाहून वेगळा आहेस असें निश्चयात्मक ज्ञान झालें कीं नाहीं, हें सांग.

शि०—गुरुमहाराज, आपण जें एव्हांपर्यंत मी व देह एक नाहीं अशाविषयीं सप्रमाण सांगितलें, त्यायोगें मी शरीररूप पिंजऱ्यास

जाणणारा शरीररूप पिंजऱ्याहून अगदीं वेगळा आहे असें चांगल्या रीतीनें समजलों. परंतु मी जसा या शरीररूप पिंजऱ्याहून वेगळा आहे तसा आणखी कोणकोणत्या वस्तूहून अगर शरीरांतील भागाहून वेगळा आहे हें कृपा करून सांगा.

गु०–हे शिष्य, हा जो आपला देह आहे, त्यांत आणखी तीन देह आहेत; व हा जो तुला दिसतो आहे तो चौथा देह आहे असें समज.

शि०—हे जे चार देह आपण सांगितले त्यांस नांवें आहेत काय व असल्यास तीं कोणतीं ?

गु०—पहिला देह जो आहे त्यास स्थूल देह, पिंड, अन्नमयकोश औटपीठ अशीं नांवें आहेत. दुसरा जा देह आहे त्यास सूक्ष्म देह अथवा लिंग शरीर अशीं नांवें आहेत. तिसरा जो देह आहे त्यास कारण देह अथवा अज्ञान अशीं नांवें आहेत. व चौथे देहास महाकारण देह किंवा महत् अज्ञान अथवा विज्ञानमयकोश अशीं नांवें आहेत. येणेंप्रमाणें चार देह व चार देहांचीं नांवें समजावीं.

शि०—याशिवाय आणखी देहांत कांहीं आहे काय ?

गु०—होय, आणखी देहमध्यें तीन कोश आहेत. त्यांचीं नांवें प्राणमयकोश, मनोमयकोश, व आनंदमयकोश अशीं आहेत. हे तीन कोश व मागें सांगितलेले अन्नमयकोश, व विज्ञामयकोश हे धरून एकंदर पांच कोश आहेत; याशिवाय या पंच कोशातीत आत्मा आहे असें समज.

शि०—स्थूल देह अथवा अन्नमयकोश अशीं एकाच देहास दोन नांवें असण्याचें कारण काय ? व हा स्थूल देह कोणत्या तत्त्वांचा झालेला आहे व माझा ह्या स्थूल देहाशीं कोणतेप्रकारें संबंध आहे तें कृपा करून सांगावें.

गु० –हा जो शरीराचा पिंजरा वरून कातड्यानें मढवलेला व

आंतून हाडकें जुळलेलीं व शिरांचे दोर बांधलेले व मांसानें सांधे भरलेले असा आहे, यासच स्थूल देह म्हणतात. हा स्थूल देह व्याघ्र व गृध्र इत्यादि तामस पशूंचें खावयाचें अन्न आहे ह्मणून यास अन्नमयकोश म्हणतात. याशिवाय या स्थूल देहाची अन्नापासूनच उत्पत्ति, अन्नापासूनच स्थिति, व अन्न न मिळालें असतां—लय होतो म्हणून यास अन्नमयकोश असें नांव आहे. हा अन्नमयकोश अथवा स्थूल देह पंचमहाभूतांच्या पंचवीस विभागांचा मिळून झालेला आहे. पंचमहाभूतें म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश अशीं आहेत. या पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक भूत चे एकाचे दोन असे दोन दोन विभाग केलेले आहेत; म्हणजे वायूचे दोन विभाग, तेजाचे दोन, आपतत्वाचे दोन पृथ्वीचे दोन व आकाशाचे दोन असे विभाग पाहिले आहेत. पण हा खेळ ईश्वरइच्छेनें होतो. प्रमाणः—

द्विधा विधाय चैकैकं चतुर्धाप्रथमं पुनः ।
स्वस्वेतरद्वितीयांशैर्योजनात्पंच पंच ते ॥

म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक भूताचे दोन दोन विभाग करून, त्यांतून त्या त्या तत्वांचा स्वतःचा एकेक भाग ज्याचा त्यांत तसाच ठेवून, त्याचा बाकीचा उरलेला अर्धा अर्धा भाग घेऊन, त्या प्रत्येक भूताच्या अर्ध्या अर्ध्या विभागाचे पुनः प्रत्येकीं चार चार भाग केले. ते चार चार भाग जे झाले ते परस्परांमध्यें मिसळले, ते असे. भूमितत्वाच्या अर्ध विभागाचे जे चार भाग ते आप, तेज, वायु व आकाश या तत्वांत जाऊन मिळाले. याप्रमाणें पृथ्वीतत्वाचें अर्ध इतर तत्वांत विभागिल्यानंतर पुनः पृथ्वीतत्वाचें जें अर्ध राहिलें त्यांत बाकीच्या भूतांचे प्रत्येकाचे जे चार भाग झाले होते त्या भागांतील प्रत्येक भूताचा एक एक विभाग येऊन मिळाला.

याप्रमाणेंच सर्वभूतें परस्परांत मिळून पुनः त्या मिश्रभूताचे प्रत्येकीं

पांच पांच विभाग केले. अशा रीतीनें पांचांच्या पंचवीस तत्त्वांच्या एकीकरणानें हा स्थूल देह अथवा अन्नमय कोश स्पष्ट झाला. या स्थूल देहांत प्रत्येक तत्वाचे विभाग कोण कोणते आहेत ते समजण्या-कारितां खालीं लिहिलेले कोष्टक पाहावें.

| भूमीचे भाग | आपाचे भाग | वायूचे भाग | तेजाचे भाग | आकाशाचे भाग |
|---|---|---|---|---|
| १ रोम | १ लाळ | १ चलन | १ क्षुधा | १ मृत्यु अथवा काम. |
| २ त्वचा | २ मूत्र | २ धांवन | २ तृषा | २ स्तब्धता अथ. क्रोध. |
| ३ नाडी | ३ रुधिर | ३ निरोधन | ३ आलस्य | ३ वायुरोध अथ लोभ. |
| ४ मांस | ४ रेत | ४ प्रसरण | ४ निद्रा | ४ मूर्छा अथवा मोह. |
| ५ अस्थि | ५ स्वेद | ५ आकुंचन | ५ रेत | ५ विस्मृति अथ. भय. |

या कोष्टकान्वयें स्थूल देहाची रचना समजावी. आतां या स्थूल देहाशीं प्राण्याचा संबंध कसा आहे असें मागें विचारिलें, म्हणून तेंहीं येथें सांगतों वस्तूचा जाणणारा वस्तूहून वेगळा असतो या न्यायानें तुझा शरीराशीं ज्ञातृत्वाचा संबंध आहे. तूं या देहास जाणणारा या स्थूल देहाहून वेगळा आहेस. तूं जो या स्थूल शरीरास माझें शरीर असें म्हणतोस, हें तुझें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कारण हा देह तुझा नसून पंचमहाभूतांच्या अंशांचा झालेला आहे. प्रमाणः—

पंचीकृतपंचमहाभूतसंभवं कर्मसंचितं ।
शरीरं सुखदुःखानां भोगायतनमुच्यते ॥

हा स्थूल देह पंचमहाभूतांच्या पंचिकरण विभागानें मिश्र असा असून भोग भोगण्याचें स्थान आहे, इत्यादि. यावरून हा देह तुझा नाहीं इतकें स्पष्ट झालें. शिवाय हें शरीर जीवाचें राहण्याचें सर्व सोईचें घर आहे. जसा गृहांत लाविलेला दीपक गृहास व गृहांतील सर्व चीजवस्तूस

प्रकाशितो व गृहांत राहणारास सर्व वस्तूंची व्यवस्था लावण्यास उपयुक्त होतो. तसाच तूं या नरदेहरूपी गृहांत आत्मरूप दीपक आहेस. तो तूं आपल्या स्वात्मप्रकाशेंकरून या देहरूप गृहास व त्यांतील प्राणपंचक, व अंतःकरण पंचकादिक वस्तूस प्रकाशून, शरीरांत राहणारा जो जीव त्यास परब्रह्मप्राप्तीचा विचार करितां यावा. अशा रीतीनें उपयुक्त होतोस यावरून उघडच होत आहे कीं, तूं व शरीर या उभयतांमध्यें परस्पर प्रकाश्य प्रकाशक असा संबंध आहे. परंतु जसा घट फुटला असतां घटांतील आकाश नाश पावत नाहीं, तद्वतच देह नाश पावून त्यांतील जीवही देहान्तरास निघून गेला तरी तूं नाश पावत नाहींस व कोठें जातही नाहींस. तुझा या स्थूल शरीराशीं वर सांगितलेल्या संबंधाखेरीज दुसरा कोणतेही तऱ्हेचा संबंध नाहीं. तूं अदृश्य सृष्टींतील ह्मणजे मानसिक सृष्टीचे आंतील आकाशतत्वासारखें तत्व आहेस. व हा स्थूल देह दृश्य सृष्टींतील असून जड तत्वांचा झालेला आहे.

या स्थूल देहरूपी गृहास नवद्वारें आहेत तीं अशीं. उपस्थेंद्रिय हें मूत्ररूपानें पाणी जाण्याचें द्वार. गुदेंद्रिय हें मलविसर्जन करण्याचें द्वार. घ्राणेंद्रिय हें सुवास घेण्याचें द्वार. कर्णेंद्रिय हें शब्द ऐकण्याचें द्वार व नेत्रेंद्रिय हें खिडकीसारखें असून सृष्टींतील अनंत पदार्थ व इंद्रियादिक स्थूल शरीर पाहण्याचें द्वार. येणेंप्रमाणें या स्थूल शरीरास मुख्य द्वारें आहेत. याशिवाय पादेंद्रिय हे जाण्यायेण्याची क्रिया करणारें द्वार असून हस्तेंद्रिय हें देवघेवीचा व्यवहार करणारें द्वार आहे. अशा प्रकारें या स्थूल शरीरांत राहणारा जो क्षेत्रज्ञ जीव त्यास व्यवहार करतां यावा, ह्मणून निरनिराळीं द्वारें केलेलीं आहेत. आतां या शरीरांतील क्षेत्रज्ञ ह्मणजे जीव देहेंद्रियद्वारा कसकसें व्यवहार करितो तें आतां सांगतों. हा क्षेत्रज्ञ नाकावाटें सुगंध घेतो; पण नाक व नाकांतील प्राणवायु यांस हीं जड तत्वें असल्यामुळें सुगंध घेतां येत नाहीं. तसेंच तोच क्षेत्रज्ञ कर्णेंद्रियावाटें

शब्द ऐकितो, व नेत्रेंद्रियावाटें पाहतो. पण कर्ण व डोळे हीं जडें-द्रियें असल्यामुळें त्यांस पाहतां व श्रवण करितां येत नाहीं.

खिडकीवाटें पाहणारा खिडकीचे आंतले बाजूस उभा आहे, तो खिडकी नव्हे. त्याप्रमाणेंच कानावाटें ऐकणारा, व डोळ्यांवाटें पाहणारा, कान डोळे ह्या खिडकीसारख्या ज्या वाटा, त्यांचे आंतील बाजूस उभा राहणारा डोळे व कान नसून त्याहून कोणी वेगळे आहेत, असें प्रत्येक मनुष्यानें जाणून आपआपणास न्यायानें ओळखावें. याप्रमाणें हे शिष्य, तूं या स्थूल शरीराचा जाणणारा स्थूल शरीराहून वेगळा आहेस असें तुझ्या अनुभवास खातरीपूर्वक आलें कीं नाहीं, हें प्रथम सांग; ह्मणजे तुला या शरीराचे आंत असणारा जो लिंगदेह, त्याची माहिती सांगेन.

शिष्य–हे गुरु, आपण जी मला स्थूल देहाची माहिती सांगितली, त्यावरून मी या स्थूल देहाचा द्रष्टा, या स्थूल देहाहून भिन्न आहे असें माझे अनुभवास चांगल्या प्रकारें आलें. परंतु या स्थूल देहाचें आंतील बाजूस जो लिंगदेह आहे, तो मी असावा असें वाटतें. कारण तुह्मी मला मागें सांगितलें आहे कीं, तूं स्थूलदेहाचे आंतील बाजूस जी पोकळी आहे त्या पोकळीचे आंत आहेस. यावरून व लिंगदेहही पोकळींतच आहे यामुळें, मी लिंगदेह असावा असें वाटतें. करितां या लिंगदेहाची माहिती मला सांगावी.

गुरु–हा लिंगदेह अथवा सूक्ष्म देहही तूं नाहींस. हा सूक्ष्मदेह स्थूल देहाप्रमाणेंच अपंचीकृत पंचमहाभूतांच्या सूक्ष्म अंशांचा झालेला असल्यामुळें तोही जडच आहे. ज्या अर्थी हा सूक्ष्म देहही जड आहे, त्या अर्थी तूं तो सूक्ष्म देहही नाहींस असें जाण. या सूक्ष्म देहाचें रूप तुला कळावें ह्मणून येथें सांगतों. त्यायोगें तुझी खातरी होऊन तूं या लिंग देहाहून पृथक निवशील. हा सूक्ष्म देहही पंचमहाभूतांचे पंचवीस विभाग मिळून झालेला आहे. या सूक्ष्म देहांत पंचमहाभूतांचे कसकसे विभाग आहेत हें पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल.

| | भूमीचे भाग. | आपाचे भाग. | तेजाचे भाग. | वायूचे भाग. | आकाशाचे भाग. |
|---|---|---|---|---|---|
| १ | शब्द | वाचा | श्रोत्र | व्यान | अंतःकरण |
| २ | स्पर्श | हस्त | चक्षु | समान | मन |
| ३ | रूप | पाद | जिव्हा | उदान | बुद्धि |
| ४ | रस | उपस्थ | घ्राण | प्राण | चित्त |
| ५ | गंध | गुद | त्वचा | अपान | अहंकार |

याप्रमाणें लिंग देहाचें कोष्टक समजावें. या शिवाय कोणी तत्त्ववेत्त्यांनीं या सूक्ष्म देहाची अथवा लिंगदेहाची सतराच तत्त्वें गणिलीं आहेत. तेंही कोष्टक खालीं देतों. या कोष्टकांत पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पंचप्राण, एक मन व बुद्धि, अशीं सतरा तत्वें आहेत. त्या तत्वांपैकीं ज्या भूताचे जे भाग आहेत, ते त्या भूताच्या नांवाखालीं दिलेले आहेत.

## लिंग देहाचें कोष्टक.

| तेजतत्वाची पंचज्ञानेंद्रियें. | आपतत्वाची पंच कर्मेंद्रियें. | वायूचे भाग पंचप्राण. | आकाशाचे भाग. |
|---|---|---|---|
| १ श्रोत्र | वाचा | प्राण | मन |
| २ त्वचा | पाणी | अपान | बुद्धि |
| ३ चक्षु | पाद | व्यान | |
| ४ जिव्हा | उपस्थ | उदान | |
| ५ घ्राण | गुद | समान | |

वर पहिल्या कोष्टकांत दर्शिवलेले जे भूमीचे पांच भाग लिंग देहांत आहेत, ते जड असल्यामुळें तुला जाणत नाहींत. तूं या शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंचविषयरूप पृथ्वीचे भागांस जाणतोस. म्हणून तूं जाणणारा या पंचभागाहून भिन्न आहेस. आतां आपतत्वाचे भाग जे वाचा, हस्त, पाद, उपस्थ, व गुद आहेत, त्यानांही तूं जाणतोस, म्हणून तूं या पंच विभागाहून भिन्न आहेस. या सूक्ष्म देहांत तेजाचे पांच भाग म्हणजे श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, व घ्राण इत्यादि आहेत, तेही तूं नाहींस. तूं त्यांचा जाणणारा त्या त्या ज्ञानेंद्रियाचे ठिकाणीं असून, भिन्न आहेस.

या प्रमाणेंच वायूचे या सूक्ष्म देहांत पांच भाग आहेत. शरीरांतील सर्व सांध्याचे ठिकाणीं राहणारा, व बोटें वगैरे वळविण्याच्या क्रिया करणारा व्यान, व गुदस्थानीं राहून मलमूत्राचा त्याग करणारा अपान, व हृदयस्थानीं राहून नाकातोंडावाटें श्वासोच्छ्वास करणारा तो प्राण, कंठस्थानीं राहून घशांतून उतरणाऱ्या अन्नांतील रस मनादिक इंद्रियांना पोहोंचविणारा जो उदान, व नाभीचे ठिकाणीं राहून अन्नांतील रस; सर्व शरीरास नाडीद्वारें पोहोंचविणारा तो समान, अशीं या सूक्ष्म देहांतील वायु तत्वाची पांच नांवें आहेत. तूं या पंचप्राण वायूस जाणणारा, या वायूचे आंत ज्ञानवान आहेस. तूं पंचप्राण वायुही नाहींस. आकाशाचे पांच भाग म्हणजे अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार इत्यादि या सूक्ष्म देहांत आहेत, तेही तूं नाहींस. तूं यांचा जाणणारा यांहून भिन्न आहेस. आतां हे जे अंतःकरणादिक आकाशाचे पांच भाग तुला सांगितलें, त्याची फोड करून तुला सांगतों. अंतःकरण हें संपूर्ण आकाश तत्वांत राहतें. त्याचें रूप असें समजावें कीं, शरीरांत जो प्राणवायु आहे, त्या वायूचे अंतर्भागांत जी जाणीव आहे, ती जाणीवच अंतःक-

रणरूप आहे. ही जाणीव जेव्हां शरीराबाहेरील आकाशांत राहणाऱ्या वायूस शरीरांतील पंचप्राण वाय्वाधारें नाकावाटें शरीरांत ओढून घेते, तेव्हां सहज कल्पनारहित असें जें स्वाभाविक स्फुरण उत्पन्न होतें, त्यासच निर्विकल्प स्फुरणरूप अंतःकरण असें म्हणतात. तेंच अंतःकरण जेव्हां प्राणवायूचे आधारें हृदयस्थानीं येतें, तेव्हां तें सविकल्प होऊन संकल्प विकल्प करूं लागतें. अशा त्या संकल्पविकल्पात्मक अंतःकरणाच्या स्थितीस मन म्हणतात. म्हणून मनाचें हृदय हें स्थान होय. हें जाणूनच चित्त जिंकणारे योगी हृदयस्थानीं लक्ष देऊन मन उत्पन्न होऊं देत नाहींत. असो, हेंच अंतःकरण संकल्पविकल्पात्मक मनरूप धारण करून जेव्हां कंठस्थानीं येतें, तेव्हां त्या मनरूप अंतःकरणाची संकल्पविकल्पात्मक स्थिति मावळून तें आपल्या संकल्पविकल्पात्मक स्थितीचा म्हणजे हें करावें का तें करावें, असा जो संकल्प त्यानें हृदयस्थानीं धारण केलेला असतो, त्याचा अमुकच करावें असा जेव्हां निश्चय धरितें, तेव्हां त्या त्याच्या निश्चयात्मक स्थितीसच बुद्धि म्हणावें. तेंच अंतःकरण प्राणवायूचे आधारें कंठस्थानांतून चढून वामनेत्राचे अंतर्भागानजीक येतें व कंठस्थानीं केलेल्या निश्चयाचें चिंतन करीत राहतें; तेव्हां त्याच्या त्या चिंतनात्मक स्थितीस चित्त म्हणावें; तेंच अंतःकरण प्राणवायूचे आधारें घ्राणेंद्रियांत रिघून, तेथील आंत जाणाऱ्या श्वासाबरोबर पुनरपि कंठस्थानांतून, हृदयांतून व नाभीचे खालील भागामधून गुदस्थानीं असणाऱ्या अपानवायूस जाऊन मिळतें, व चित्ताचे ठिकाणीं जें कृत निश्चयाचें चिंतन चाललेलें असतें, तें तडीस नेण्याकरितां धैर्य धारण करून कृत्य करावयाचे हेतूनें परत उर्ध्व मुखाकडेस जोरानें येतें, तेव्हां त्या जोरदार अंतःकरणाचे स्फूर्तीस अहंकार असें म्हणावें. येणेंप्रमाणें हा सूक्ष्म देह अपंचीकृत पंचमहाभूतांच्या पंचवीस विभागांचा

मिळून झालेला, पहिल्या कोष्टकान्तर्यें सांगितला. यांत दुसऱ्या कोष्टकांतील सतरा तत्वांचाही निर्णय आलेला आहे. म्हणून त्याचें स्पष्टीकरण देत नाहीं. हे शिष्य, तूं अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार मिळून होणाऱ्या अंतःकरण पंचकास जाणतोस, व यावरून वस्तूचा जाणणारा वस्तुहून भिन्न असतो, या न्यायानें तूंही या अंतःकरणपंचकास जाणणारा अंतःकरणपंचक नव्हेस, हें तुझ्या अनुभवास आलें कीं नाहीं तें सांग.

शिष्य—द्रष्टा दृश्य पदार्थांहून भिन्न असतो, या नियमाप्रमाणें या सूक्ष्म देहांतील जीं पंचज्ञानेंद्रियें म्हणजे श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा व घ्राण इत्यादिकांस मी जाणतों, म्हणून हीं ज्ञानेंद्रियेंही मी नाहीं. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पंचज्ञानेंद्रियाचे पंच विषय आहेत, म्हणजे श्रोत्र ज्ञानेंद्रियाचा ऐकावयाचा शब्द हा विषय आहे, त्वचा ज्ञानेंद्रियाचा स्पर्श हा विषय आहे, चक्षु ज्ञानेंद्रियाचा रूप हा विषय आहे, जिव्हा ज्ञानेंद्रियाचा रस हा विषय आहे, व घ्राणेंद्रियाचा गंध हा विषय आहे. येणेंप्रमाणें या पंचज्ञानेंद्रियांच्या पंच विषयांस जाणणारा मी पंच विषयांचा साक्षी वेगळा आहे. त्याचप्रमाणें सूक्ष्म देहाचीं जीं पांच कर्मेंद्रियें आहेत म्हणजे मुख बोलण्याचें कर्म करणारें कर्मेंद्रिय, हस्त, देवघेव करणारें कर्मेंद्रिय, उपस्थ मूत्राचा त्याग करणारें कर्मेंद्रिय, आणि गुद, मलाचा त्याग करणारें कर्मेंद्रिय इत्यादि आहेत, यांसही मी जाणतों; म्हणून तीं माझें रूप नव्हें; तीं जड आहेत. तसेंच मी या सूक्ष्म देहांतील पंचप्राण वायूंसही जाणतों, ते मला जाणत नाहींत; ह्मणून मी त्यांचा जाणणारा त्यांहून वेगळा आहे. हीं सर्व तत्वें जड आहेत, म्हणून मी त्यांचा जाणणारा त्या तत्वांहून अगदीं भिन्न आहे, असें सरळ रीतीनें मला पटलें. परंतु या सूक्ष्म देहाचीं मन व बुद्धि अशीं मुख्य दोन तत्वें

राहिलीं आहेत; तीं मी नसेन असें मला वाटत नाहीं. कारण या मनबुद्धिरूप इंद्रियांच्या साह्यानें मला अनेक विचार करितां येतात. तसेंच त्यांच्या साह्यानें संपूर्ण शरीरांतील जड तत्वांस जाणतां येतें; परंतु या मनबुद्ध्यादिकांस कोणीही जाणूं शकत नाहीं. हें मन मोठें चंचळ असून अनिवार आहे, असें अर्जुनासारख्यानें सुद्धां म्हटलेलें आहे. प्रमाणः—

> चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढं ।
> तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

हें मन बहुत चंचल असून इंद्रियांना बलात्कारें विषयांवर ओढून नेतें. आणि विषयांना बरें वाईट म्हणत राहतें. असें करण्याचा त्या मनाला जन्मभर अभ्यास जडला असल्यामुळें तें फारच बलाढ्य झालें आहे. यास्तव त्याचा निग्रह करणें हें श्वासवायु कोंडून धरणें जसें कठिण आहे, तसेंच मन जिंकून ताब्यांत ठेवणें फारच कठीण आहे. अशा प्रकारें मनाचें श्रेष्ठत्व फक्त अर्जुनानेंच वर्णिलें आहे असें नाहीं. श्रुतिस्मृतिमध्येंही या मनाचें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे. योगवासिष्ठामध्यें श्रीरामास वसिष्ठांनीं बोध करते वेळीं म्हटलें आहे:—

> मनो हि जगतां कर्ता मनो हि पुरुषः स्मृतः ।
> मनः कृतं कृतं राम न शरीर कृतं कृतं ॥

या जगद्रुपी संसारास मनच मुख्य कारण आहे; मनानें केलेला हेतु हाच शरीरद्वारें कर्म करण्यास साधनीभूत आहे. या मनाचे योगें मनाची उत्पत्ति, स्थिति, संहार, इत्यादि होतात. यावरून

> पादपः पवनें नैव देहश्चित्तेन चाल्यते ॥

जसें वाय्वाधारें संपूर्ण वृक्ष हलतात, तसेंच या मनाचे आधारें संपूर्ण प्राणिमात्रांचीं शरीरें चलनवलनादिक क्रिया करतात.

मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥
बंधाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतं ॥

मनुष्याचें एकटें मनच जन्म मरणाचे फेऱ्यांत घालितें व स्वस्वरुपाचें ज्ञान प्राप्त करून घेऊन मोक्षाचेंही साधन मनाद्वारेंच प्राप्त होतें. या प्रकारें मन पुण्यपाप, जन्ममृत्यु, स्वर्गनरक प्राप्त करून देणारें आहे. हें मन वश झाल्यावांचून दुःखनिवृत्ति, वासनाक्षय व आनंदावाप्ति प्राप्त होत नाहीं. फार काय, पण विचारावांचून हें जिंकण्याकरितां जरी कडक वैराग्य धारण केलें व कंदमूलें खाऊन तपःश्चर्यादि साधनें केलीं, तरी तें वश होत नाहीं. त्रिभुवनामध्यें सुद्धां या मनास जिंकणारा भेटणें विरळा आहे. अशा प्रकारें मीं मनाचें सामर्थ्य एकिलें आहे तेव्हां मी मन असेन, असें मला वाटतें; करितां हे गुरु, माझें वाटणें यथार्थ आहे कीं नाहीं, हें आपण कृपा करून सांगावें. मन हेंच जर माझें आत्मरूप नसेल, तर तेंही सांगून मला या मनरूप बंधनापासून मोकळें करावें.

गु०—तूं जीं मनाचे पुष्टिकरणार्थ प्रमाणें सांगितलींस तीं सर्व यथार्थ आहेत. मनाचा पराक्रम ज्ञान होईपर्यंत अतर्क्य आहे, असें मीही कबूल करितों. परंतु मी तुला असें विचारतों कीं, ज्या ग्रंथांत या मनाचा असा अतर्क्य महिमा वर्णन केला आहे, त्याच ग्रंथांत मन जिंकण्याचे मार्ग व मनाच्या पंगूपणाविषयीं इतर प्रमाणें कांहीं दिलीं आहेत कीं नाहींत ? त्याच ग्रंथांत मनास आवरून धरावें, तें मूर्ख आहे, असें सांगितलें आहे, तें कोणास ? याचा विचार कर, म्हणजे तुझ्या लक्षांत येईल कीं, तूं मन आवरून धरणारा मनाहून कोणी वेगळा आहेस. पहा अर्जुनास श्रीकृष्ण हे स्वतः मन आवरण्याचा मार्ग सांगतात. श्री भगवानुवाचः—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेनु तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥

हे महाबाहो, कुंतिपुत्रा अर्जुना, तूं बोलतोस त्याप्रमाणेंच ज्यांना ह्या संसार प्रपंचाचा कंटाळा आला नाहीं, त्यांना मन जिंकणें फारच कठिण आहे. कारण मन म्हणजे डोळयांत रूपविषय प्रतिबिंबित होतो, त्याची आकृति डोळयांतून उडून जाणाऱ्या सूक्ष्म पदार्थावर डोळयांतच उमटते. नंतर ती उमटलेली आकृति मस्तकांत उडून जाऊन अव्यक्त होते. ती त्या समष्टि ज्ञात्याचे स्थानीं म्हणजे आत्म्याचे स्थानीं जो व्यष्टि जीवात्मा आहे, त्याला कळते. याप्रमाणें पंचज्ञानेंद्रियांतील पंच विषयांच्या जाणण्यासच मन असें म्हणावें. तें मन संसारी प्राण्यांच्यानें कसें जिंकवेल? परंतु ज्यांना निराकार स्वस्वरूपाचें आत्मज्ञान झालें, व ज्यांना मिथ्याविषयांस जाणण्याची ह्मणजे मनाची गरज राहिली नाहीं असें दृढ वैराग्य झालें, जें इंद्रियांच्या भोगांना अगदीं कंटाळले आणि ज्यांनीं आसनावर बसून नित्य चेतस समाधीचा अभ्यास केला, ते अहंता धरणाऱ्या मिथ्या अशा अष्टधाप्रकृतींतील मनाला धरणाऱ्या जीवप्रकृतीचाच त्याग करून, निराकार आत्मस्वरूप होऊन राहतात; यामुळें मनाचें लक्ष ज्या स्वरूपीं पोहोंचतच नाहीं तेंच ते झाले. मग त्यांनीं सहजच मन जिंकलें असें झालें. कारण ज्या स्वरूपीं मन लक्ष लावूं शकत नाहीं, त्या परब्रह्म स्वरूपीं ते वैराग्यशील योगी ऐक्य पावले. अर्थात् मनाला आधारच नाहींसा झाला. यामुळें मनाला मृत्यूच आला. या प्रमाणें अभ्यासानें मन जिंकलें जातें.

## यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्यमनसासह

ह्मणजे ज्या ठिकाणीं वाचेचें ज्ञान व मनाचें लक्ष पोहोंचत नाहीं, तेंच निराकार परब्रह्म आहे. या वेदश्रुतीच्या वाक्यावर कित्येक मतिमंद ह्मणतात कीं, जर वाचा व मन, परब्रह्मीं पोहोंचत नाहीं, तर आपला उपदेश परब्रह्मप्राप्ति कशी करून देईल? या मतिमंदांच्या प्रश्नाचें

उत्तर सद्गुरु शिष्याला सांगतात कीं; हे शिष्य, वाचा व मन यांचें लक्ष परब्रह्मीं पोहोंचत नाहीं, यास्तव वाचा व मन यांचा उपयोग परब्रह्मप्राप्तिस्तव नाहीं असें समजून तूं वाचेचा व मनाचा त्याग कर; म्हणजे बाकी परब्रह्मच राहतें; हें मतिमंदांनीं ध्यानांत ठेवावें. हे शिष्य, मन जरी अनिवार आहे, तरी वैराग्य म्हणजे विषयांचे ठायीं अप्रीति केल्यानें, व आत्मज्ञान प्राप्त करून घेतल्यानें मनाचा नाश होतो. मनाचा अंत झाला म्हणजे बाकी मनाच्या नाशांतीं मोक्षरूप परब्रह्मच उरतें. हाच मोक्ष मन देतें असें समजावें. मन हयात राहून परब्रह्मप्राप्ति होते असें समजूं नये हें लक्षांत धरून विनाकारण तूं मनास श्रेष्ठत्व देऊं नकोस. अरे, तूं जो आत्मा आहेस, त्या तुझ्याच प्रभेच्यायोगें मनाला कळण्या न कळण्याचें ज्ञान प्राप्त होतें. तुझ्या प्रकाशावांचून मन कोणतीही क्रिया करण्यास असमर्थ आहे. करितां आतां तुला तूं मन नाहींस असें अनुभवास आणून देतों, तिकडे लक्ष दे.

## संकल्पविकल्पात्मकमनः

मन म्हणजे अंतःकरणाची संकल्पविकल्पात्मक स्थिति. हें मन घडोघडीं उत्पन्न होऊन नाश पावतें. जोंपर्यंत संकल्प आहे तोंपर्यंतच मन आहे. संकल्पविकल्प नष्ट झाले म्हणजे मनही नष्ट होतें. हें मन दिवसांतून अनेक संकल्पविकल्पात्मकरूप धारण करितें. अमुक गोष्ट करावी कीं न करावी असा संकल्पविकल्प नित्य करीत राहतें. या गोष्टींचा विचार केलास म्हणजे तुला कळून येईल कीं, संकल्प उत्पन्न होऊन ते लयास जातात; व त्याऐवजीं दुसरे संकल्पविकल्प उद्भवतात; म्हणजे एक मन मावळून दुसरें उत्पन्न होतें. हें निरनिराळें तऱ्हेचें संकल्पविकल्पात्मक मन आलें व गेलें तरी त्या संकल्पविकल्पाबरोबर तूं येत जात नाहींस. तूं जशाचा तसाच असतोस. तूं संकल्पविकल्पात्मक मनच असतास, तर संकल्पविकल्पाच्या नाशाबरोबर तुझाही

नाश झाला असता, परंतु तसें तर होत नाहीं. यावरून तूं असें जाण कीं, हें संकल्पविकल्पात्मक मन चंचळ आहे व तूं निश्चळ आहेस. मनाचे ठिकाणीं अमुक संकल्प उठला व अमुक संकल्प मावळला असें तुजवांचून कोण जाणील? अर्थात् या चंचळ मनास जाणणारा या चंचळ मनाहून तूं वेगळा असला पाहिजेस तूं मन नव्हेस. तूं जागृदवस्थेंत जो असतोस तोच सुषुप्ति अवस्थेमध्येंही असतोस, असा तुला अनुभव आहे. तूं जर सुषुप्तिकाळीं आहेस तसाच न राहतास, तर पुनः तुला जागृदवस्थेवर येतांच आलें नसतें. मन हें जागृदवस्थेंत असतां तेव्हां संपूर्ण विश्वास व देहादिकास जाणण्याची क्रिया करितें; व पुनः सुषुप्तिअवस्थेंत म्हणजे गाढ निद्रेंत जेव्हां लीन होतें, तेव्हां संपूर्ण जगताचें व देहाध्यासाचें स्मरण हेंही त्याबरोबर लयास जातें, व तूं जशाचा तसाच संकल्परहित जागृत्, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही काळीं असतोस. यावरून जरी हें मन विश्वाभासास कारण आहे, तरी तूं मन नव्हेस. तूं या मनाहून वेगळा आहेस. या न्यायान्वयेंच तूं बुद्धिही नाहींस. कारण ती मनाचेच पोटांत संकल्पविकल्पांचा निश्चय करण्याकरितां उत्पन्न होते. त्या मनाच्या अगर अंतःकरणाच्या निश्चयात्मक स्थितीसच बुद्धि म्हणावें. ही बुद्धि तुझें रूप नाहीं. तूं या निश्चयरूप बुद्धीस जाणणारा, त्या बुद्धीहून वेगळा आहेस. तूं निश्चळ असून मन व बुद्धि चंचळ आहे. मनबुद्धीचा नाश तुला करितां येतो. हें कसें म्हणशील तर सांगतों. तूं सृष्टींतील कोणत्याही पदार्थाचें अगर कोणत्याही प्राण्याचें तसेंच तुझ्या शरीराचें व शरीरांचे आंतील प्राणाचें क्षणभर स्मरण न ठेवितां, शरीरांतील प्राणवायूस उदरअचळ राखून स्थित कर; म्हणजे तुला आपोआप कळून येईल कीं, अशा या निश्चल स्थितींत मनाचे संकल्प नसून तूं एकटाच शरीरांतील प्राणाचे आंत निर्विकल्प, ज्ञानवान्, संकल्पविरहित सहजास्तित्वानें आहेस व सृष्टींतील कोणत्याही पदार्थाचें

स्मरणरूप अस्तित्व तुझे स्वरूपांत नाहीं; व अशा तुझ्या त्या शांत रूपानें तूं कोणास जाणतही नाहींस असें तुझ्या अनुभवास येईल. असें झालें म्हणजे संकल्पविकल्पात्मक मन व निश्चयात्मक बुद्धि हीं तत्वें ज्या अर्थी त्या निवांतस्थळीं प्रतितीस येत नाहींत त्या अर्थी मन व बुद्धि हीं दोन्हीही तुझें रूप नव्हें. तूं त्यांचा जाणणारा त्यांहून वेगळा आहेस. आणखी तूं असें समज कीं, हें अंतःकरणपंचक शरीरांतील आकाश तत्वापासून उत्पन्न होऊन त्यांतच राहतें. तें अंतःकरणपंचक म्हणजे अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार हीं पांच मिळून आहे. पहिलें जें अंतःकरण तें आकाशाच्या सत्वगुणापासून झालेलें असल्यामुळें निवळ जाणिवरूप आहे. मन व बुद्धि हीं त्या अंतःकरणाचे पोटीं उत्पन्न होणारी अंतःकरणाच्याच सत्वगुणाचें कार्य आहे. हें अंतःकरण जेव्हां शरीरांतील प्राणाधारें शरीराबाहेरील रजोगुणी वायूस नाकातोंडावाटें शरीरांत आकर्षण करितें, तेव्हां मन बुद्धिरूप सत्वगुणरूपी कार्य रजोगुणानें मिश्रित होऊन, रजसत्वमय होतें. मग रजोगुणी वायूचे योगें चंचळ होऊन प्राण वायूचाधारें नेत्रेंद्रियाचे अंतर्भागांतून नेत्रांवाटें जेव्हां सृष्टींतील पदार्थावलोकन करितें, तेव्हां त्या पदार्थांचें प्रतिबिंब नेत्रांत पडून अंतःकरणाचे जाणीवेशीं ऐक्य पावतें. नंतर त्या पदार्थांस जाणण्याचा मनरूपी गुण उत्पन्न होतो. सृष्टींतील पदार्थ जड व तमोगुणी असल्यामुळें, व त्या पदार्थांच्या प्रतिबिंबानें मन मिश्र होत असल्यामुळें, तेंच मन पुनः तमोगुणी होऊन रजतममय असें होतें. या मनाचें आद्यरूप म्हटलें म्हणजे सत्वगुणी अंतःकरण हें होय. हें अंतःकरण कांहींसें स्थिर असून नुसतें जाणीवरूप मात्र असतें. नंतर तें जाणीवरूपी अंतःकरण, रजोगुणी वायु व तमोगुणी पदार्थांचें प्रतिबिंब यांचेयोगें मिश्र होऊन रजतममय मनरूपी कार्य उत्पन्न करितें; व पदार्थांच्या नित्य चिंतनांत

अक्षय राहून वायूच्यायोगें अति चंचळ होऊन पदार्थांचें चित्त रूपानें चिंतन करीत व सोडीत सदां राहतें, हें अनुभव घेतला असतां कळून येईल. पहा मनुष्यांच्या मनांत सृष्टींतील पदार्थांखेरीज कांहीं तरी असतें काय ? सृष्टींतील पदार्थांच्या स्मरणाखेरीज मनुष्यांचे मनांत दुसरें कांहींही नसतें. या अनुभवावरून, हे शिष्य, तुझे लक्षांत येईल कीं, हें मन जड पदार्थांचेंच झालेले आहे; व तें जड आहे. हें पदार्थ चिंतनीय मन, शरीरांतील प्राणवायूस आकर्षण करून तो छातीचे आंत स्थिर धरला म्हणजे कांहींसें निश्चळ होतें. म्हणजे चिंतन विरहित जाणीवरूपानें केवळ राहतें, व तूं त्या जाणीवरूपी अंतःकरणाचे आंत स्वयंप्रकाशमान असा ज्ञानवान उरतोस. ह्याप्रमाणें अनुभव घेऊन पहा, म्हणजे तुला कळेल कीं, अंतःकरण हें तुझ्या शरीरांतील आकाशाचा जाणीवरूपी स्वभाव आहे. जाणीव, रजोगुणी वायू, तमोगुणी पदार्थांचें प्रतिबिंब या तिहींचें संयोगजन्य कार्यच मनबुद्धिरूप व चित्त-अहंकाररूप अंतःकरणपंचक होतें. शरीरांतील जाणीव, आकांशांतील वायू, व सृष्टींतील पदार्थ यांचा नित्य संयोग आहे, म्हणूनच त्यांचें संयोगरूपी कार्य जें संकल्पविकल्पात्मक मन तेंही नित्य अस्तित्वांत आहे असें भासतें. हें मनच कर्तेभोक्तें आहे. आपणाकडे कर्तेभोक्तेपणाचा मुळींच संबंध नाहीं. आपण या मनाचे साक्षी मनाहून वेगळें आहों. या वर सांगितलेल्या निरूपणावरून तूं मनबुद्धिरूप अंतःकरण नाहींस असें तुझ्या अनुभवास आलें कीं नाहीं तें सांग.

**शि०**—गुरुमहाराज, आपण सांगितल्याप्रमाणें मी शरीरांतील प्राणवायूस न हलवितां स्वस्थ होऊन अनुभव घेऊन पाहिला. त्यांत असें कळून आलें कीं, त्या ठिकाणीं मनाचे अनंत संकल्प व बुद्धीचा निश्चय हीं मुळींच उरत नाहींत; मी मात्र असतों. शिवाय मनाच्या

संकल्पविकल्पात्मक स्थितीस मी जाणतों; व जाणणारा ज्ञेय वस्तूहून वेगळा असतो या नियमाप्रमाणें मी मनबुद्धीस जाणणारा मनबुद्धीहून वेगळा आहें, असें माझ्या प्रतीतीस पक्कें आलें. परंतु मी मनबुद्धीहून वेगळा कसा व कोण आहें हें अद्याप चांगलें लक्षांत येत नाहीं तर जसें आपण मजला स्थूल देहाहून वेगळें काढिलें, व सूक्ष्म देह जो सतरा तत्वांचा कर्ताभोक्ता, त्याहूनही वेगळें काढिलें, त्याप्रमाणेंच मी कोण व कसा आहें, हें कळत नाहीं तें कृपा करून सांगावें.

गु०—हे शिष्य, तूं विचारिलेंस कीं, मी लिंगदेहाचा साक्षी कोण आहें व कसा आहें. तर तूं येथें असें समज कीं, मी कोण आहें व कसा आहें हें सृष्टींतील पदार्थांचे चिंतन शिवाय वाटणें, हाच तिसरा कारण देह आहे; ह्मणजे अहंपण धरणारें ज्ञान मी कोण आहें हें कळत नाहीं असें कल्पितें, हें त्याचें कल्पिणेंच कारण देहांतील अज्ञान अगर कारण देहाचें रूप आहे असें समजावें. या कारण देहास ह्मणजे मी कोण आहें हें कळत नाहीं, या भावनेस तूंच जाणतोस म्हणून तूं या कारण देहाचाही साक्षी कारण देहाहून वेगळा आहेस; व कारण देहाहून वेगळा म्हणजे अज्ञानविरहित ज्ञानवान् आहेस. ज्ञानवान् तर आत्मा आहे. तेव्हां सिद्ध झालें कीं, तूं आत्मा असून कारण देहाचा साक्षी आहेस. हें तुझें साक्षित्व तुला कळावें म्हणून येथें एक दृष्टांत सांगतों.

राजवाड्यांत लाविलेला दीपक जसा राजा, प्रधानादिकरून मंडळी, नायका, वाजंत्री, इतर सभेंतील माणसें, व सभामंडप या सर्वांस एकदम प्रकाशितो, व मंडपांतील संपूर्ण सभाजन उठून गेल्यानंतरही त्या नुसत्या ओसाड मंडपासही प्रकाशितो, तद्वत्च हा स्थूल देहरूपी कोणी एक राजवाडा आहे; त्या राजवाड्यांत तूं आपल्या आत्मरूपानें दीपकासारखा स्वयंप्रकाशमान आहेस; तो स्वयंप्रकाशमान या देहरूप राजवाड्याचे आंत जो चिदाभासरूपी जीव राजा आहे त्या राजास,

तसेंच त्याचा मनरूपी जो प्रधान आहे, त्या प्रधानास, पंचप्राणरूपी मानकऱ्यांस, तसेंच बुद्धि व तिच्या अनंतवृत्ति इत्यादि नायकांस, दशेंद्रियरूप वाजंत्र्यांस व शब्दादिक सभासदांस जागृतकाळीं अगर स्वप्नकाळीं प्रकाशित आहेस. हे सर्व सभासद जीवरूपी राजासह सुषुप्तिकाळीं जेव्हां उठून जातात, तेव्हां त्यांचे अभावींही तूंच या स्थूल देहरूप शून्य गृहास प्रकाशितोस. अंतःकरणपंचक, प्राणपंचक, विषयपंचक, इत्यादि जरी देहामध्यें कारभार करीत आहेत असें दिसतात, तथापि हीं सर्व जड आहेत. तीं तुझ्या प्रकाशाच्या योगें प्रकाशित होऊन सचेतन होतात; व त्यांचा कारभार चालतो असें समज. आणखी असेंही समज कीं, जागृदवस्थेंत तूं इंद्रियें आणि अंतःकरण या दोहींचें साह्यानें व्यवहार करितोस, आणि स्वप्नावस्थेचे वेळीं ह्मणजे जेव्हां आपणांस स्वप्न पडतें अशा वेळीं, तूं इंद्रियांचें साह्य न घेतां एकट्या अंतःकरणाचें साह्यानें स्वप्नावस्थेंत स्वप्न देहास व स्वप्न सृष्टीस प्रकाशून त्यास जाणण्याची क्रिया करितोस; आणि सुषुप्ति अवस्थेचे वेळीं तूं इंद्रियें व अंतःकरण या दोहींचेही साह्यावांचून एकटाच प्रकाशमान असतोस. आतां तूं असें म्हणशील कीं, मी सुषुप्ति अवस्थेंत कोणास जाणत नाहीं. तेव्हां मी तेथें प्रकाशमान असतो असें कशावरून समजावें ? याचें उत्तर असें समज कीं, सुषुप्ति अवस्थेंत ह्मणजे गाढनिद्रेंत जर वस्तु असावी तर तूं त्या वस्तूस जाणावेंस; परंतु सुषुप्ति अवस्थेंत वस्तुच मुद्दल नाहीं. मग तूं जाणशील कोणास ? या गोष्टीचा विचार कर म्हणजे तुला कळेल कीं, निद्रेंत वस्तु नसते म्हणून तूं तीस जाणत नाहींस; परंतु निद्रारूपी जी स्थिति आहे त्या स्थितींत तूं असतोस. तुझा झोपेंत लय होत नाहीं. कारण तूं निजून उठल्यानंतर म्हणतोस कीं, मी गाढ निजलों होतों. मला कांहीं कळलें नाहीं. या तुझे बोलण्यावरून असें सिद्ध होतें कीं, तूं जर निद्रेचा अनुभव

घेतला नसतास तर मला गाढ झोंप लागली होती, असे अनुभवाचे शब्द तुला बोलतां आले नसते. ज्या अर्थी सुषुप्तीचा अनुभव तूं सांगतोस, त्या अर्थी सुषुप्तिकाळीं तूं असतोस, असें तुझ्याच बोलण्यानें सिद्ध होतें. तूं जर झोपेंत नसतास तर तेथें झोंप आली होती असें तुला न पाहतां सांगतां आलें नसतें. यावरून तूं झोपेंत जागा असतोस, म्हणजे जसा आहेस तसाच असतोस, असें अनुभवसिद्ध झालें. आतां तूं म्हणशील कीं, मी जर झोंपेंत जागा असतो, तर मग झोंप कोणास लागते? तर असें समज कीं, जो जागा असतो त्यासच झोंप लागते. तूं जागाही नाहींस व झोंपीही जात नाहींस. जागृदवस्थेंत अंतःकरणपंचक व इंद्रियें तुझ्या प्रकाशानें सृष्टींतील हरएक विषयास जाणतात, म्हणून जागृदवस्था त्यांनाच आहे; तुला नाहीं. जागृदवस्था म्हणजे अंतःकरणास इंद्रियांच्या साह्यानें जें देहादिक पदार्थांचें भान होतें, तें पदार्थांचें भान ह्मणजे स्मरण ठेवणें, अगर अभान म्हणजे पदार्थांचें विस्मरण असणें. हा अंतःकरण पंचकाचा स्वभाव आहे; तुझा नाहीं. यावरून स्मरणविस्मरणरूप जें अंतःकरणपंचक आहे, तेंच इंद्रियांची मदत न घेतां, पाहिलेल्या पदार्थांचें पुढें पदार्थ नसतां, जें निवळ मनोमय चिंतन करितें, त्या अंतःकरणाच्या मनोमय चिंतनात्मक सृष्टीस स्वप्नावस्था म्हणावें; व त्यानें मनोमय चिंतन करण्याचें काम सोडलें ह्मणजे त्यासच निद्रा अगर सुषुप्ति म्हणावें. यावरून जागृत, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था अंतःकरणपंचकालाच आहेत, तुला नाहींत. तूं जागाही होत नाहींस व झोंपीही जात नाहींस. तुझी जागृति म्हटली म्हणजे तूं संकल्पविकल्पातीत, कळण्या न कळण्यातीत एकटेंच असणें ही होय. दीपकास अंधाराचेंही भान नाहीं व प्रकाशाचेंही भान नाहीं; तसेंच तुला कळणेंही नाहीं व न कळणेंही नाहीं. दीपक

कळण्या न कळण्याच्या उभयभावांत जसा स्वयंप्रकाशमान आहे, तसाच तूंही कळण्या न कळण्यातीत आयताच स्वयंप्रकाशमान आहेस. सूर्यास कधींही अंधार नाहीं, पण सूर्याच्या प्रकाशानें व्यवहार करणाऱ्या प्राणिमात्रांस सूर्यास्तामुळें अंधार आहे, तसेंच तुला कधींही भानाभानरूपी अंधार नाहीं. परंतु तुझ्या प्रकाशानें विचार करणारें जें अंतःकरणपंचक त्यासच भानाभानरूप अंधार प्राप्त होतो. सूर्याच्या प्रकाशानें राहणाऱ्या लोकांस अंधार असतो, याचें कारण त्यांचें सूर्यासन्निध नित्य राहणें होत नाहीं. त्यांस अंधार भासणें हा सूर्याचा दोष नसून त्यांचे चंचळपणाचा आहे. तसेंच अंतःकरणाचें नित्य राहणें, तूं जो स्वयंप्रकाशी आत्मा आहेस, त्या सन्निध होत नाहीं, म्हणून त्यास निर्भानरूपी अंधार प्राप्त होतो; हा तुझा दोष नाहीं. तूं नित्य आहेस, व बाकीचीं अंतःकरणादिक इंद्रियें अनित्य आहेत. त्यांस जागृत अवस्थारूपी उत्पत्ति, स्वप्नावस्थारूपी स्थिति, व सुषुप्ति अवस्थारूपी लय प्राप्त होतो. तूं नित्य असल्यामुळें तुला उत्पत्ति लय नाहीं. तूं तिन्ही अवस्थांमध्यें एकसारखाच आहेस. याविषयीं तुला एक दृष्टांत सांगतों. एक पांच भोकें पाडलेला घट आहे. त्या घटांत एक तेलवात घालून पेटविलेला दिवा ठेविला आहे. तो दिवा जसा तेलवातीस व दीपपात्रास प्रकाशित करून घटाच्या पांच भोकांसही प्रकाशितो व त्या पांच छिद्रांवाटें दुसरें पदार्थ धरिले असतां त्यांनाही प्रकाशितो अगर सूर्य पंचमहाभूतात्मक अनंत ब्रह्मांडास एकदम प्रकाशित करितो, तसाच स्थूळ देह हाच कोणी एक घट आहे. त्यास श्रोत्र, चक्षु, जिव्हा, घ्राण व त्वचा हीं पांच ज्ञानेंद्रियरूपी भोकें आहेत. या पंच भोकांच्या स्थूळ देहरूपी घटांत हृदय कमलरूप पात्र आहे. त्यांत मनरूप तेल घातलें आहे, आणि त्यांत बुद्धिरूपी वात घालून ती वात आपोआप आत्मरूप जोतीनें पेटवी

गेली आहे. हा हृदयकमलरूप पात्रांतील दीपक हृदयकमलरूपी पात्रास, मनरूपी तेलास, बुद्धिरूपी वातीस प्रकाशित करून स्थूल देहास, त्याच्या पंचज्ञानेंद्रियरूपी छिद्रांस व त्या छिद्रावाटें उत्पन्न होणाऱ्या शब्द, स्पर्श, रूप, रस गंधरूपी पदार्थांस एकदम प्रकाशित करीत आहे; व आत्मा तर अनंत स्थूल देहरूपी घटांत व अनंत ब्रह्मांडांत एकच असल्यामुळें एकदम सर्वत्रांस प्रकाशित आहे. या सिद्धांतान्वयें तूं आत्मा आहेस असें समज. तुझ्या प्रकाशेंकरून संपूर्ण तुझे शरीरांतील तत्वें व अनंत ब्रह्मांड गोळ, इत्यादि प्रकाशिलीं जात आहेत. जसा सूर्य सर्वत्रांस प्रकाशित असून कोणास जाणत नाहीं; त्याप्रमाणेंच तूंही सर्वांस प्रकाशित असून कोणास जाणत नाहींस:—

न देहो नेंद्रियगणौ न मना बुद्ध्यहंकृती ।
न चित्तं नैव माया च न च व्योमादिकं जगत् ॥
न कर्ता नैव भोक्ता च न च भोजयिता तथा ।
केवलं चित्सदानंदो ब्रह्मैवात्मा यथार्थता ॥

देहेंद्रिय, चित्ताहंकार, बुद्धि, मन, प्राण, कर्ता, भोक्ता इत्यादिकांतील एकही मी नसून केवळ एक ब्रह्मात्माच आहें. अशा प्रकारचें ज्याचें ज्ञान आहे, तेंच शुद्ध ज्ञान होय. या प्रमाणान्वयें हे शिष्य, तूं सर्वांत असून आकाशन्यायें अलिप्त आहेस असें जाण.

शि०—गुरुमहाराज आपण सांगितल्याप्रमाणें या चंचळ लिंगदेहास मी जाणतों, त्याअर्थी मी लिंगदेह नाहीं असें माझ्या पक्कें अनुभवास आलें. हा लिंगदेह स्थूल देहाचे आंतील आकाशांत राहणारा व प्राणवायूचे चंचलतेनें चंचळ होणारा व प्राणवायूचे रोधनाबरोबर स्थिर होणारा असून माझ्या स्वरूपाहून वेगळा आहे; असें मला कळलें. नंतर मी मोठ्या संशयांत पडलों, व मी कोण आहें हें मला कळत नाहीं अशा तऱ्हेचा संशयरूपी देह जो मला प्राप्त झाला तोच कारणदेह

आहे, हेंही समजलें. या अज्ञानात्मक कारण देहास मी जाणतों त्या-अर्थी मी कारणदेहाहून वेगळा आहें. ही अज्ञानात्मक कारण देहाची भावना अंतःकरणाचे अस्तित्वांत उत्पन्न होत असल्यामुळें त्याचीच आहे; कारण मी कोण आहें हें कळत नाहीं, अशी भावना, अंतःकरण सुषुप्ति अवस्थेमध्यें लीन झालें असतां राहत नाहीं. जर ही भावना माझी असती तर तिचा अंतःकरणाचे नाशाबरोबर नाश न होतां माझी मजबरोबर राहिली असती. यावरून मी कोण आहें असा जो अज्ञानमूलक उद्भवणारा प्रश्न कीं ज्यास कारण देह म्हणतात, तो अंतःकरणाचाच तमोगुणात्मक स्वभाव असल्यामुळें माझें रूप नव्हें; मी त्याहून वेगळा आहें. घरांत लाविलेल्या दीपकाचे योगें जसा घरचा मालक व घरांतील इतर माणसें आपापला कारभार करितात, तसा मी स्थूल शरीरांच काय पण अनंत ब्रह्मांडांत एक स्वयंप्रकाशमान आत्मा असून माझे आत्मप्रभेमुळेंच देहांतील अंतःकरणादिक इंद्रियें व संपूर्ण सृष्टि प्रकाशित होत असून माझ्या योगेंच त्यांचे सर्व कारभार चालतात. प्रमाणः—

आत्मचैतन्यमाश्रित्य देहेंद्रियमनोधिया ।
स्वकीयार्थेषु वर्तंते सूर्यालोके यथा जनाः ॥

सूर्यप्रकाशें सर्व लोकांची क्रिया होत असून, जसा सूर्य त्या क्रियेमध्यें लिप्त होत नाहीं, तसाच मी जो आत्माधिष्ठान आहें त्या आत्म-प्रभेनेंच देहेंद्रिय, अंतःकरणादिकांचा उत्पत्तिस्थितिरूपव्यवहार होऊन पुनः त्यांतच लय पावतो. यावरून हे उद्भवलयधर्म त्यांचेच म्हणजे इंद्रियादिकांचेच आहेत. जसा सूर्यप्रकाश सर्वत्र सारखा असून फक्त स्वच्छ आरशामध्येंच विशेष स्पष्ट रीतीनें प्रतिबिंबतो तसा सर्वाधिष्ठान चैतन्यात्म्याचा सामान्य ज्ञानरूप प्रकाश सर्वत्र सारखा असून तो मळरहित अंतःकरणांतच विशेष प्रकारें प्रकाशमान

होऊन स्वस्वरूप विस्मरणरूप जो कारण देह त्यासही प्रकाशितो. या श्लोकान्वयें, मी कारण शरीराहून व स्थूलसूक्ष्म शरीरांहून प्रकाशक या नात्यानें भिन्न आहें, इतकें मला कळलें. गुरुमहाराज, आपणास मला आणखी कांहीं बोध करावयाचा आहे काय ?

गुरुः—आतां तुला आत्म्याचें परोक्षक ज्ञान उत्तम प्रकारें होऊन तूं स्थूल, सूक्ष्म व कारण या तिन्हीं शरीरांस जाणणारा साक्षी वेगळा आहेस हेंही तुला चांगल्या प्रकारें कळलें. तुला आत्म्याचें परोक्षक ज्ञान उत्तम प्रकारें झालें हें पाहून मला मोठा आनंद वाटतो. आतां तुला जीव कशास ह्मणावें हें सांगतों. मागें जो कारण देह तूं ओलांडून आलास तो व जीव हे भिन्न नाहींत. जीव ह्मणजेच अज्ञान. मागें तुला सांगितलेंच आहे कीं, जीव हा आत्म्याचें प्रतिबिंब आहे ह्मणजे आत्मा ज्ञानवान् आहे व जीव अज्ञानी आहे. सत्वगुणात्मक जें अंतःकरण त्यांत जेव्हां आत्म्याचें प्रतिबिंब पडतें, तेव्हां त्यासच जीव ह्मणतात. हा जीव कारण देहाचा अभिमानी आहे. जीव व अंतःकरण या उभयतांचे दरम्यान् मन, बुद्धि, चित्ताहंकार इत्यादि मुख्य वृत्ति उत्पन्न होतात. याचें कारण जीवास स्वस्वरूपाचें ज्ञान नाहीं, हेंच होय.

या अज्ञानमूलक जीवासच भ्रामक असेंही म्हणतात, याचें कारण जीवाचें भ्रम हेंच रूप आहे. या जीवास कारणदेह असें म्हणण्याचें कारण जीव हा आपल्या भ्रमरूपानें प्रपंचरूप गोंधळास कारण झाला आहे. यामुळेंच या भ्रममूलक जगताचा व शरीराचा जीव अभिमान धरितो. कोणत्याही कामांत तें काम होण्याची बळकट आशा असली म्हणजे त्या कामांत कांहीं जीव आहे, असें व्यवहारांत म्हणण्याची चाल आहे. जावत्कालपर्यंत हा भ्रमरूप जीव ह्मणजे चिदाभास शरीरांत आहे, तावत्कालपर्यंतच या शरीरास, जगतास, तसेंच कर्तें भोक्तेपणास जीव आहे असें समजावें. हा जीव आत्मानुभव झाला असतां

नाहींसाच होऊन जातो. मग संसाररूपी गोंधळही त्याबरोबरच लयास जातो. हा जीवच सर्व गोंधळास कारण आहे, ह्मणून सुखदुःख पापपुण्य, बंधमोक्ष व अवस्थात्रय यासच आहेत. आतां जीवास सुखदुःखाचे भोग मिळणें हें अंतःकरणादिकांच्या संगानें घडतें ह्मणून एकटे जीवास सुखदुःख होत नाहीं असें कित्येक ठिकाणीं ह्मटलें आहे. परंतु सुखदुःख जीवाशिवाय इतरांस घडत नाहीं असेंही सांगितलें आहे. याचें कारण ज्यावेळीं जीवास सुखदुःखाचे भोग घडतात त्यावेळीं लिंगदेहासह जीवाचें रूप मानिलें असतें. व तोच अंतःकरणपंचक रूपानें कर्ता भोक्ता होतो प्रमाणः—

स एव जगतां भोक्ता नाद्ययोः पुण्यपापयोः ।
इहामुत्र गती तस्य जाग्रत्स्वप्नादि भोक्तृता ॥

हा जीवच मनेंद्रियद्वारां जागृत्स्वप्नादि अवस्थेंत व्यवहार करितो व तोच कर्ता, भोक्ता आहे. यासच जागृत अवस्थेंत जीव, स्वप्नावस्थेंत प्रातिभासिक अथवा तेजस्, आणि सुषुप्त्यवस्थेंत प्राज्ञ अथवा पारमार्थिक अशीं नांवें आहेत. हाच अनादि कालापासून चालत आलेल्या पुण्यपापामुळें उत्पन्न झालेलें शरीर, ‘ त्यांत राहून शुभाशुभ कर्माचा भोग, परलोकगति, व जागृत, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था प्राप्त करून घेतो. याप्रमाणें अधिष्ठान, चैतन्य, व अंतःकरण असें तीन मिळून जीवाचें रूप आहे. हाच बाह्य विषयगृहणास मनेंद्रियद्वारें जातो. याप्रकारें जीवाचें रूप समजावें. प्रतिबिंब न्यायानें जीवास सत्यत्व देतां येत नाहीं; कारण ज्यामध्यें प्रतिबिंब आहे त्या वस्तूचे नाशाबरोबर आंतील प्रतिबिंबही नष्ट होतें. त्याच न्यायानें अंतःकरणरूपी जल आटण्याबरोबर जीवही नष्ट होतो. म्हणून जीव व जीवाची संपूर्ण सृष्टि मिथ्या आहे.

यथास्वप्नप्रपंचोयं मयि मायाविजृंभितः ।
तथा जाग्रत्प्रपंचोयं मयि मायाप्रकल्पितः ॥

आपले ठिकाणींच जरी स्वप्न सृष्टि व स्वप्न प्रपंच उत्पन्न होतो, तरी त्रो सत्य नाहीं. कारण स्वप्नप्रपंच अंतःकरणपंचकच मनोमय कल्पनाच उत्पन्न करितें, म्हणून तो जसा खोटा आहे त्याप्रमाणेंच जाग्रत्सृष्टिरूपी प्रपंचही मायारूपी अंतःकरणानें मनोमय कल्पनेचाच उत्पन्न केला आहे. म्हणून जीव हा मायोपाधिकच आहे. यावरून जीव व सृष्टि मिथ्याच आहे असें झालें. या जीवाचें रूप कारण देहामध्येंच स्पष्ट बीजरूपानें आहे; म्हणून या जिवाचें निरसन कारण देहाबरोबर होणें इष्ट वाटल्यावरून या स्थळींच केलें. तूं या भ्रमरूप जीवास जिंकलेंस म्हणून तुलाच शिव असें नांव या स्थळीं आहे. मी आत्मा आहें, मी शिव आहें, मी ब्रम्ह आहें असें जें तुला आतां वाटत आहे हाच चौथा महाकारण देह आहे. आतां याच वेळेस तूं हें लक्षांत ठेव कीं,मागें जो तूं स्थूल देहास मी म्हणत होतास, तोच तूं पुढें मी स्थूल देह नाहीं, मी लिंग देह आहे असें म्हणूं लागलास; नंतर लिंगदेहाची स्थिति समजल्यावर मी लिंगदेहही नाहीं असें म्हणूं लागलास. पुढें तोच तूं मी कोण आहें हें कळत नाहीं असें म्हणूं लागलास. मी कोण हें कळत नाहीं, असा जो नेणिवेचा भाव, अंतःकरणाचे साह्यानें शरीरांतील प्राणवायूस चलित करून, मनोमयाधारें ओंठ व जीभ न हालवितां, शरीरांतील आकाशांत स्थूलदेहाच्या इंद्रियांचे साह्यावांचून करीत आहेस, ती नेणिवेची भावना, जर शरीरांतील प्राणवायूचा तूं आधार घेणार नाहींस, म्हणजे शरीरांतील प्राण वायू न हलविणार नाहींस, तर मनोमयाधारें अंतःकरणांत करितां येणार नाहीं. मी कोण आहें हें कळत नाहीं अशी जी कारणदेहाची भावना ती अंतःकरणपंचक व प्राणपंचक यांचे संयोगांतच आहे; म्हणून ती

भावना तुझी नाहीं व कारणदेहही तूं नाहींस. ही अज्ञानमूलक भावना जर तुझी नाहीं, तर तूं या भावनातीत संकल्पशून्यस्थळ आहेस अगर आत्मा आहेस असें मानूं लागलास, हें तरी पूर्वीचा जो विस्मरणरूपी कारणदेह आहे तोच आतां स्मरणरूप होऊन मानीत आहे. येथें दुसरा कोणी आला गेला नाहीं. यावरून सिद्धच झालें कीं, भ्रमच आला होता व भ्रमच गेला. ज्यानें हें भ्रमरूपी पटल धारण केलें होतें, तोच त्या भ्रमास आदि होता व जो आदि होता तोच अंतींही आहे, असें न्यायानें समजावें. आतां मी विकाररहित आत्मा आहें असें तूं मानितोस, तोच तं पूर्वीं मी विकारीदेह आहें असें मानित होतास. यावरून आम्हीं तुझ्या देहात्मभावनेस चिदचिद्ग्रंथी किंवा जीव म्हणजे अज्ञान असें नांव दिलें; व देहविरहित आत्म्याचे ध्यासास शिव म्हणजे स्मरणरूपज्ञान असें नांव दिलें. परंतु येथें जीव म्हणजे कांहीं वेगळी वस्तु आहे व शीव म्हणजे कांहीं वेगळें तत्त्व आहे असें नाहीं. जशी एकाच मनुष्यास पहिल्या वर्गाची परिक्षा पास झाली म्हणजे एक लहानशी पदवी प्राप्त होते व त्याच मनुष्यानें पुनः जास्त अभ्यास करून दुसरी मोठी परीक्षा दिली म्हणजे त्यास त्या प्रकारचीच मोठी पदवी प्राप्त होते, तसेंच येथेंही समजावें.

नेणिवेचे वेळीं तूंच होतास व आतां जाणीवेच्या वेळींही तूंच आहेस. म्हणून कारणपरत्वें तुलाच जीव, शीव अशीं नांवें प्राप्त होतात. जळाचे ठिकाणीं जसे अनेक बुडबुडे अगर तरंग उत्पन्न होतात, तसाच तुझे ठिकाणीं जीवरूप भ्रम उत्पन्न होतो. जळांतील तरंग जसे जळांतच आटले म्हणजे जळच उरतें, तसाच तुझा विस्मरणरूपी भ्रम आटला ह्मणजे तूंच स्मरणरूप महाकारणदेह उरतोस. ह्या स्मरणरूप महाकारणदेहासच, तो विस्मरणरूपी मलरहित आहे, म्हणून जीवाचे शुद्धरूप म्हणतात. या जीवास

श्रुतींत चिदाभास म्हणजे ज्ञानघन जें सच्चिदानंद परब्रह्म त्यावरील आभास ह्मणजे मिथ्या मृगजलवत् भास असें ह्मटलें आहे. प्रमाणः—

**मायिकोऽयं चिदाभासः श्रुतेरनु भवादपि ।**
**इंद्रजालं जगत्प्रोक्तं तदंतः पात्ययंयतः ॥**

हा चिदाभास रूपी जीव. खोटा आहे, असें श्रुति प्रमाणावरून व अनुभवावरून सिद्ध होतें. कारण जग हें इंद्रजालाप्रमाणें मिथ्या आहे असें पूर्वींच सांगितलें आहे, आणि चिदाभासही जगत्भासापैकींच आहे. ह्मणून तोही मिथ्या आहे.

**विलयोऽप्यस्य सुप्त्यादौ साक्षिणाह्यनुभूयते ।**
**एतादृशं स्वस्वभावं विविनक्ति पुनः पुनः ॥**

या जीवाचा लय झालेला सुषुप्त्यादि अवस्थांमध्यें अनुभवास येतो. हें ज्यास स्वमिथ्यत्वाचें स्वसत्यज्ञान प्राप्त झालें आहे, त्या मुमुक्षूसच कळतें. अशीं जीवाचें मिथ्यत्वासंबंधीं वेदांत अनंत प्रमाणें आहत. येथें तर तुझा स्वानुभवसिद्ध प्रमाण मिळालें आहे; तस्मात् सध्यां जो तूं, मी आत्मा आहें असें भावितोस, हें तुझें भावणेंही जीवाचेंच शिवरूप किंवा स्मरणरूप ज्ञान आहे असें समजून तूं या महाकारण देहाचाही त्याग कर ह्मणजे स्मरणविस्मरणातीत तुझें आत्मरूपच अनुभवरूपानें राहील. यावरून हे शिष्य, तुला महाकारणदेह जो चौथा, तो समजला काय?

शि०—गुरुमहाराज, आपण सांगितल्याप्रमाणें मला आत्म्याचा पक्का अनुभव आला. मी स्थूल देहाचा, तसाच सूक्ष्म देहाचा व कारण देहाचा द्रष्टा या तिन्हीं देहांहून वेगळा आहें. महाकारणदेह स्मरणरूप आहे व कारणदेह विस्मरणरूप आहे. आपलें स्वरूप आपणासच न कळणें हें सुषुप्ति अवस्थेचें लक्षण आहे; म्हणून हा कारण देहच अज्ञानरूपी निद्रा आहे. या अज्ञानरूप कारण शरीरांतूनच मी

असें अज्ञानात्मक अंतःकरणपंचकरूप स्फुरण ‘ बीजांत वृक्ष ’ या न्यायानें उत्पन्न होतें. त्या स्फुरणांत ‘ मी कोण ’ याचें स्मरण नसल्यामुळें तेंच अहंस्फुरण, पुढें त्यापासून उत्पन्न होणाऱ्या मानसिक सृष्टिरूप वृक्षास मीच ह्मणून धरितें. हाच लिंगदेह. याची अवस्था स्वप्न ही आहे. स्वप्नावस्था म्हणजे पदार्थ नसतां काल्पनिक पदार्थांची सृष्टि इंद्रियांचे साह्यावांचून मनोमय उत्पन्न करणें हा स्वप्नावस्थारूप लिंगदेह कारण देहाचें कार्य आहे. हा लिंगदेह शरीराबाहेरील वायूस आपल्या मदतीस घेऊन समष्टि-ईश्वराच्या मानसिक सृष्टींतील जो स्थूल देह त्या देहास आपलें रूप समजून राहतो. हीच त्याची निद्रारूपी जागृदवस्था आहे. येणेंप्रमाणें कारण देहास कारणदेहीं सुषुप्तिअवस्था, लिंगदेहीं स्वप्नावस्था व स्थूलदेहीं जागृदवस्था इत्यादि प्राप्त होतात. हें एवढें सर्व माझ्या विस्मरणरूप कारण देहाचें कार्य आहे. आतां पुनः मला जें मी आत्मा आहें, देहादि सृष्टि नाहीं, असें स्मरणरूप ज्ञान झालें, तें तरी विस्मरणामुळेंच. विस्मरणरूपाची जागृदवस्था ही अगदीं शेवटचें रूप असून तेथें स्थूल देहाचा अभिमान आहे. याच विस्मरणरूप कारण देहाचा नाश उलट दृष्टीनें केला, म्हणजे जागृदवस्थाधारी जो स्थूल देह, तो मी नाहीं असें मला कळलें. असें कळतांच जागृदवस्थाही स्थूलदेहाबरोबरच लयास गेली. पुढें स्थूलदेहाचे आंतील सूक्ष्म देहांत जों मी आलों तों मी लिंग देहाचा द्रष्टा आहें असें मला समजलें. असें समजतांच लिंग देहाची जी स्वप्नावस्था म्हणजे मनोमय विचार करण्याची अवस्था तीही मी टाकिली व विचाररहित स्तब्ध राहिलों. इतक्यांत मी पुनः अंतःकरणाचा म्हणजे विचार करणाऱ्या द्वाराचा आश्रय करून, मी कोण असावा असा कारण देहरूपी भाव धरिला. तेव्हां मला अगदीं अंधार कोठडींत पडल्यासारखें झालें. इत-

क्यांत आपण जागें करून सांगितलें कीं, मी कोण असावा अशी जी तूं भावना धरिली आहेस, ती तुझी नसून अंतःकरणाच्याच साह्याची आहे; तूं सर्वाधिष्ठान चैतन्य असा जो विस्मरणातीत आत्मा तो तूं आहेस. तूं या तुझ्या कारण देहरूपी भावनेस जाणणारा शिव आहेस, असें मला आपण सांगताच कारणदेह व कारण देहाची जी सुषुप्ति अवस्था, दोन्हीही मावळून मी विचाररहित झालों. त्या वेळीं माझे शरीरांतील प्राणवायु व त्या प्राणवायूंतील अनंत कल्पना बंद पडल्या व मी श्वासोच्छ्वासरहित झालों. अशा प्रकारें मला शांतिसुखाचा अनुभव आला. ही स्थिति सुमारें दहा अंक मोजेपर्यंत सहज राहिली होती. इतक्यांत त्या शांतिसुखाच्या आनंदाचेयोगें मी सच्चिदानंदरूप आहें असें आपणास बोलून दाखविण्याकरितां अंतःकरणाचें पुनः साह्य घेतलें. मी सच्चिदानंद आत्मा आहें असें म्हटलें, तों इतक्यांत आपण सांगितलें कीं, रे, हाच स्मरणरूप महाकारण देह आहे. तूं याचा जाणणारा या महाकारणदेहाहून वेगळा आहेस, व हीच तूर्या अवस्था आहे. असें कळतांच मी या स्मरणरूप महाकारण देहास सोडिलें व पुनः अंतःकरणाचें साह्य न घेतां स्तब्ध राहिलों. या माझ्या स्तब्धतेबरोबर महाकारण देहाची तूर्यावस्थाही मावळली. मी तूर्यावस्थेचा अनुभव घेत असतां, सूर्यादिकांच्या प्रकाशाहून वेगळा असा एकदम अनंतापार पोकळींत देहाचा अडथळा न घेतां प्रकाश दिसत होता; तोही तूर्यावस्थेबरोबरच नष्ट झाला. नंतर मी अनंतापार पोकळींत निर्भान असा जाणिवेनेणिवेरहित निरंजन राहिलों. इतक्यांत आपण माझ्या योगनिद्रेंतून मला जागें केलें व मी पुनः अंतःकरणाचे आधारें आपणांशीं बोलूं लागलों. आतां मला आपणांस कांहींही विचारावयाचें राहिलें नाहीं. एक सच्चिदानंद ब्रह्मात्मामात्र मी आहें. माझ्या पोटीं आकाशाचे ठिकाणीं जशी निळिमा तशी हीं संपूर्ण पंचमहाभूतात्मक सृष्टि आहे.

आतां आपणास सहज लीलेनें बाकी राहिलेले प्रश्न विचारितों. मागें आपण मला या चार देहाशिवाय आणखी पांच कोश आहेत, असें सांगितलें होतें. त्यांचेंही विवरण थोडक्यांत सांगाल अशी आशा आहे.

गु०—तूं मोठा भाग्यवान्. तुझी योग्यता काय वर्णूं ! तूं केवळ माझा आत्माच आहेस म्हणजे मी व तूं यांत अंतर मुळींच राहिला नाहीं. आतां माझें गुरुत्व व तुझें शिष्यत्व हीं दोन्हीं लयास गेलीं. सहज लीलेनें तूं प्रश्न केलास कीं, पंचकोश कशास म्हणतात व त्यांचीं लक्षणें काय हें सांगावें; तर तेंही सांगतों ऐक.

कोश या शब्दाचा अर्थ झांकण अगर आछादन असा आहे. एकाच पेटींत जसे पांच कप्पे असतात, तसेंच या स्थूलदेहरूपी पेटींत पांच कोश आहेत. त्यांचीं नांवें अन्नमयकोश, प्राणमयकोश, मनोमयकोश, विज्ञानमयकोश, व आनंदमयकोश अशीं आहेत.

अन्नमयकोश ह्मणजे स्थूलदेहच होय. याचें चित्र असें समजावें कीं, नखशिखान्त पिशवीसारखी आकृति व कातड्यानें मढविलेला शरीर पिंजरा, व आंत हाडें जुळून सांधे बसविलेले इत्यादि. हा अन्नमयकोश जड आहे, तो मला जाणत नाहीं पण मी त्या अन्नमय कोशास जाणणारा अन्नमयकोशांच्या आंत आहे, ह्मणून मी अन्नमय कोश नाहीं. अन्नमय कोश नाश पावला अगर जन्मला तरी मी जो अन्नमय कोशाचे आंतील आकाश आहें तो मी जन्मतही नाहीं व मरतही नाहीं. हा अन्नमयकोश सुखदुःखाचे भोग भोगण्याचें स्थान आहे व मी अन्नमय कोशाचा साक्षी शबल ब्रह्म आहें.

प्राणमयकोश म्हणजे शरीरांतील वायु तत्वास ह्मणावें. या प्राणमय कोशाचे दहा प्रकार आहेत. त्यांत पांच मुख्य प्राण आहेत व पांच उपप्राण आहेत. प्राण,अपान, उदान,समान व व्यान हे मुख्य पंचप्राण वायु होत. नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय हे पंच उपप्राण

होत. हे दहा वायु मिळून प्राणमयकोश समजावा. हा प्राणमय कोश अन्नमयकोशास, शरीराचे आंतील आकाशांत राहून तोलून धरितो; व तो अन्नमयकोशाच्या ज्या नाड्या आहेत त्या सर्वांत निरनिराळ्या विभागांनीं निरनिराळ्या ठिकाणीं विभागून गेलेला आहे. म्हणून त्यास निरनिराळे ठिकाणीं निरनिराळीं नांवें आहेत. हा प्राणमयकोश इंद्रियांची उत्पत्ति, स्थिति, आणि लय या तिहींस मुख्य कारण आहे. तूं या प्राणमयकोशाचे आंत आकाशांत आकाशाची जाणीव सोडून आयताच आहेस; तूं प्राणमय कोश नव्हेस. या प्राणमयकोशाचे आधारानें अंतःकरणपंचकास मनोमय ओंठ व जीभ यांचे साह्यावांचून आकाशवाणीनें बोलतां येतें. हा प्राणमयकोश खाल्लेलें अन्न पचवितो, व त्या अन्नांतील कठीण कण श्वासोच्छ्वासाद्वारें बाहेर फेंकून देऊन अन्नांतील रस सर्व शरीरांत पोहोंचवितो. हा प्राणमयकोश अत्यंत महत्वाचा आहे; तरी त्या प्राणमयकोशास जाणणारा, तूं प्राणमय कोशाहून वेगळा आहेस.

तिसरा जो मनोमयकोश तो सूक्ष्म देहांतील अंतःकरणपंचकरूप आकाश तत्वास म्हणतात. शरीरांतील सूक्ष्म पदार्थांची प्राणवायूचे आधारानें काल्पनिक सृष्टि निर्माण करावी, जः पदार्थ स्थूलदेहाचे नेत्रांवाटें पाहिला असेल, त्याचें चिंतन करावें,शब्द,स्पर्श, रूप, रस व गंध इत्यादि जे पंचविषय आहेत त्यांचें स्मरण करून त्यांच्याठायीं तन्मय होऊन राहवें, कर्मेंद्रियांनीं क्रिया कराव्या, व अनंत संकल्प करून ते सोडावे पुनः धरावे, असें मनोमयकोशाचें लक्षण आहे. त्या मनोमय कोशासच अंतःकरण पंचक, षोडशकलात्मक लिंगदेह अथवा सूक्ष्मदेह, अंतरात्मा, देव अशीं नांवें आहेत. हाच भोगदेह समजावा. पूर्व कर्मानुसार जन्म घेणें, अगर सुखदुःख भोगणें व एक देह सोडून दुसऱ्या देहीं प्रवेश करणें, इत्यादि क्रिया हाच करतो. या मनोमय कोशाचा

जाणणारा, तूं मनोमय कोशाचे आंत व बाहेर जें आकाश आहे, त्या आकाशांत अचल आहेस.

चौथा विज्ञानमयकोश आहे. यांत विज्ञान या शब्दाचा अर्थ विशेष ज्ञान असा समजावा. आपण, शरीर, पंचप्राण, पंचविषय, दहा इंद्रियें व अंतःकरण यांहून वेगळें असून, संपूर्ण शरीरांत जें आकाशतत्व आहे त्या आकाशतत्वांत आकाशाचें अस्तित्व उडवून आकाशविरहित एकटे शांत परब्रह्म आहों असें जाणून राहणें या स्थितीस विज्ञानमयकोश ह्मणतात. यासच महाकारणदेह, तूर्या अथवा अर्धमात्रा, सर्वसाक्षी इत्यादि नांवें आहेत. या विज्ञानाचा अथवा तूर्यावस्थेचा अनुभव ज्या वेळीं येतो, त्यावेळीं शरीरांतील आकाशांत चोहोंकडे किंचित् सूर्यकिरणासारखा पण तेजःपुंज असा प्रकाश असून, आसपास देह वगैरे कांहीं नाहीं, परंतु अजूबाजूनें उत्तम तऱ्हेचा नीळरंग चमकत आहे, व तें सगळें प्रकाशमानरूपच आपण आहों असें वाटतें. तूं या विज्ञानमयकोशास जाणणारा विज्ञानातीत निर्विकल्प आहेस.

पांचवा आनंदमय कोश आहे. आपणांस वर सांगितल्याप्रमाणें ज्ञानोत्तर जो आनंद होतो तोच आनंदमय कोश समजावा. परंतु या आनंदाचें रूप व्यवहारांतील आनंदापेक्षां कांहीं वेगळ्या रीतीचें आहे. जागृदवस्थेसारखें ज्ञान व निद्रावस्थेसारखें सुख हीं एकत्र केलीं असतां जें रूप उत्पन्न होईल तें आनंदाचें रूप समजावें. या आनंदमय कोशास जाणणारा तूं निजानंदच स्वतःसिद्ध आहेस असें जाण.

येणेंप्रमाणें तूं पंचकोश विवरण समजून त्या पंचकोशाचा साक्षी जो ज्ञानवान् शबल ब्रह्म आहे तोच या सृष्टीस आदि मध्य अंतीं व्यापून राहिला आहे, त्या साक्षीहून तूं वेगळा आहेस असें जाण. आतां तुला स्वानुभव घेण्याचे एक दोन प्रकार सांगून हा भाग आटोपता घेतों.

अंतःकरणपंचक ह्मणजे जाणीव, मन, बुद्धि, चित्त, आणि अहंकार,

हीं पांच मिळून आहे. तें अंतःकरणपंचक शरीरांतील आकाशरूपानें आहे तेंच शरीरांतील प्राणवायूस धरितें व सोडितें; व तेंच प्राण वायूला हलवून ओंठ व जीभ न हलवितां मनोमय मी मी अशीभावना करितें. याची प्रतीति पहा. झोंपेंत अंतःकरणपंचक लीन होतें, त्यावेळीं प्राणवायूचे व्यापार शरीरामध्यें चालत असतां त्या एकट्या प्राण वायूस मी मी अशी भावना करितां येत नाहीं. यावरून सिद्ध झालें कीं, नुसत्या प्राणवायूचें अंगीं मी मी अशी भावना करण्याचें सामर्थ्यही नाहीं तो जड आहे. त्या प्राण वायूस निद्रेंतून उठून अंतःकरणपंचक येऊन मिळालें ह्मणजे मनोमय मी मी अशी भावना उत्पन्न होते. यावरून अनुभवसिद्ध झालें कीं, मी मी ही स्फुरद्रूप भावना अंतःकरणपंचकाचीच आहे, आपली नाहीं. तेंच अंतःकरणपंचकरूपी आकाश, पंचप्राणवायूचे आधारानें पंचज्ञानेंद्रियांवाटें येऊन पंच कर्मेंद्रियांनीं क्रिया करितें व तेंच कर्तेभोक्तें आहे. मग जर अंतःकरणपंचकच कर्तेभोक्तें आहे, असें अनुभवास येतें, तर, आपण कर्ते-भोक्ते आहोंत असें मानितों, हें चुकीचें झालें. बरें, आपणच कर्ते-भोक्ते आहोंत असें घटकाभर जरी मानिलें तरी आपण अंतःकरणपंचक रूपानें कर्तेभोक्ते आहोंत असें ठरलें. अंतःकरणपंचक जर आकाशभूत आहे तर आपणही अंतःकरणपंचक रूपानें आकाशभूत झालों. जर आपलेपण आकाशावर स्थापन झालें, तर मीच तें आकाश या न्यायानें आकाशास आपणाहून पृथक अस्तित्व रहात [illegible]हीं. आपणच आकाश झालों, व आकाश जर शरीरांत व शरीरा[illegible]हेर एकच अनंत अपार आहे तर आपण आकाश रूपानें शरीरांत [illegible] शरीराबाहेर एकच अनंत अपार आहों असा न्याय ठरलाच [illegible]ला. आपणच आकाश असें म्हटलें ह्मणजे आकाशास पोकळपणा

राहिला नाहीं. जर पोकळीच नाहीं तर जगानें व अंतःकरणादिकानें रहावें कोठें? अर्थात् एक जागेवर दोन वस्तूंचें अस्तित्व टिकत नाहीं या न्यायानें, परब्रह्म नाहीं अशी जागाच रिकामी नाहीं; जर सर्वत्र आपलें आत्मरूप परब्रह्म आहे तर त्या ठिकाणीं वरील न्यायानें जगत् नसलेंच पाहिजे असा न्याय झालाच झाला, व " ब्रह्मसत्यं जगन्नमिथ्या " हा न्याय ठरलाच ठरला. या श्रुतीस अनुसरूनच दासबोधांत श्रीसमर्थ रामदास स्वामीनें लिहिलें आहेः—

**जें झालेंचि नाहीं त्याची वार्ता पुससी कायी.**

दुसरा असा विचार करावा कीं, शरीरामध्यें पोकळी व आपण असें उभयतांचें अस्तित्व आहे किंवा नाहीं. विचाराअंतीं असें भासतें कीं, शरीरामध्यें आपणही आहों व आकाशही आहे. परंतु आपलें व आकाशाचें भान हें कल्पनेच्या अस्तित्वाखेरीज प्रतितीस येत नाहीं. आपण कल्पना सोडली ह्मणून आपलें अस्तित्व नष्ट होत नाहीं, असा झोंपेंत स्पष्ट अनुभव येतो. तसा कल्पनेचा त्याग केला असतां आकाशाचा अनुभव आपणांस येत नाहीं. कल्पनेच्या अस्तित्वांतच मात्र आपणांस आकाश आहे असें वाटतें. यावरून ठरलेंच कीं, आकाश हें कल्पनारूपच असलें पाहिजे. आकाशच जर कल्पनारूप आहे असें झालें तर आकाशापासून होणारीं चारभूतें व तज्जन्य सृष्टि इत्यादि सर्व कल्पनारूपच असलें पाहिजे असा न्याय झालाच झाला, व जगत् काल्पनिक ठरलें. (याचा सविस्तर विचार पुढील विश्वाभास प्रकर्णांत केलेला आहे.) करितां सूज्ञ लोकांनीं या जगताचा शोध न करितां आत्मानात्म विचारानें सावध व्हावें. व असें समजावें कीं,

**नष्टे पूर्वविकल्पे तु यावदन्यस्य नोदयः ।**
**निर्विकल्पकचैतन्यं स्पष्टं तावद्विभासते ॥**

एक इष्टसंकल्प सिद्धीस गेला ह्मणजे दुसरा इष्ट संकल्प उत्पन्न होतो.

या संकल्पांच्यामध्यें एकदोन अंक मोजण्याच्या अवधींत जी संकल्पाची निवृत्ति असते, तीच निर्विकल्प चैतन्यरूप स्पष्ट स्थिति आहे. या स्थितीसच मृत्यु म्हणावें; देह सोडून जाणें यास मृत्यु म्हणूं नये. हीच निद्रा अथवा जीवाचा आनंद आहे, परंतु त्या आनंदाचा किंवा अल्पकाळाच्या मृत्यूचा अथवा निद्रेचा भोक्ता जो आहे तोच विपरीत ज्ञानभाव आहे ह्मणजे अज्ञान भाव आहे. हा अज्ञानभाव अनेक व्यष्टि संकल्परूप एक समष्टि जागृत अवस्था सोडून, प्रहर दोन प्रहरांनीं दुसरी अनेक व्यष्टि संकल्परूप एक समष्टी जागृती धरितो, अशा ह्या एक जागृती सोडून दुसरी जागृती धरण्याच्या दरम्यान जो प्रहर दोन प्रहरांचा जागृत स्वप्नांचे संकलरहित काळ जातो, तोच निद्रा आहे. तसाच एक विषय संकल्प संपून दुसरा विषयसंकल्प उत्पन्न होतो, त्याच्या दरम्यान किंचित् काळाच्या आनंदासारखाच एक जागृत स्वप्नविषय संपून दुसरा जागृत स्वप्नविषय धरण्याचा मध्य संधींतील आनंदाचा प्रहर दोन प्रहरांचा काल आहे त्यालाच सुषुप्ति अथवा सुप्तानंद ह्मणतात. हा सुप्तानंदच जागृतकाळीं विषयानंद भोगतो. हा सुप्तनंद विषयचिंतनाचा अंतशेष आहे. हा सुप्तानंदाचा काल व जागृत स्वप्नादि अवस्थादिकांचा काल, व त्या कालांच्या ठिकाणीं प्राप्त होणारे भोग व त्या भोगांचा भोक्ता इत्यादिकांच्या आभावानें जो सिद्ध होणारा काल तोच परब्रह्म आहे. दुसरा एक आत्मानुसंधान प्राप्त करून घेण्याचा मार्ग आहे. तो असा कीं,

**निद्रादौ जागरस्यांते यो भाव उपजायते ।**
**तं भावभावितं साक्षाज्जीवन्मुक्तो भवेत्सदा ॥**

ज्यास तूर्या अवस्थेचा अनुभव घेऊन आत्म्याचें निजानंद सौख्य भोगणें असेल, व भूतभविष्यादि जाणण्याची शक्ति उत्पन्न होऊन अंतीं परब्रह्म प्राप्तीनें मोक्ष हस्तगत करून घेण्याची आणि योगी

होण्याची इच्छा असेल, त्यानें वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें अक्षय तुर्येस्थ लक्ष ठेवावें. म्हणजे जागृतीचा अंत व निद्रा आली नाहीं या संधींत अमनस्क भाव असतो तो समजून ती स्थिति अभ्यासबळें दृढ राखावी. मनुष्य जागा होण्याची जेव्हां संधी असते, तेव्हां तो जागृत होऊन विषयचिंतन करूं लागण्यापूर्वी, व झोंपही नाहीं अशा वेळीं जी संकल्पशून्य स्थिति असते, तीच तुर्या अवस्था होय. या तुर्येचा नित्य अनुभव घेणारा स्थितप्रज्ञ होतो. मनुष्य निद्रा घेण्याच्या हेतूनें जेव्हां शयन करितो, तेव्हां त्यास एकदम जमीनीवर पडल्याबरोबर निद्रा लागत नाहीं. त्याचें मनांतील चिंतन प्रथम थोडथोडें कमी होत जातें. चिंतन अगदींच कमी झालें कीं निद्रा आवरण करूं लागतें. अशा वेळीं साधकानें मोठा धीर धरून निद्रा येऊं देऊं नये व विषयचिंतन सोडावें; आणि निद्रेचे साक्षी होऊन रहावें. ह्मणजे ध्यान करणारासाधक सिद्धदशेला खातरीनें जाईल.

श्रीमत् परमहंस विष्णुबावा ब्रह्मचारी यांणीं आपल्या निबंधांत लिहिलेला प्रकारही ध्यानांत ठेवण्यासारखा आहे, असें वाटल्यावरून तोही येथें लिहितों.

एक जागृतीचा अंत व प्रहर दोन प्रहरांनीं दुसऱ्या जागृतीची उत्पत्ति यांच्या मधला जो प्रहर दोन प्रहरांचा सुप्तानंदाचा काळ व एक विषय भोगून संपला व दुसरा विषय भोगण्याचा संकल्प उठला नाहीं याच्या दरम्यानचा जो काळ तो मिळून एकच आहे. तोच कल्पनेची क्रिया चालत असतां, जो भविष्याचा भूतकाळ होतो, तो भूतकाळ होणें हेच सुप्तानंद होणें आहे. याप्रमाणें विचार करावा ह्मणजे सर्व जगताचें खेळ, सुप्तानंदाचे भोग भोगण्याकरितां सुप्तानंदानेंच (झोंपेंतील संकल्परहित स्थितीनें) उभे केले आहेत असें समजतें; व एक जन्माचा मृत्यु झाल्यावर भोगसृष्टि अथवा पुनर्जन्म सृष्टि प्राप्त

होते, यांच्या दरम्यानचा जो काळ आहे तोच सुप्तानंदरूप मृत्युरूपी काळ आहे; अथवा मृत्युरूपी आनंदरूप काळच सुप्तानंद अथवा विषयानंद किंवा भविष्यकाळाचा भूतकाळ करणें ह्मणजे भूतकाळ हा सुप्तानंदरूपी वर्तमानकाळाच्या पोटांत राहतो तो करणें, किंवा मी तूं ह्मणण्यालाही आनंदरूप करणें, असा हा आनंदच सर्व आहे. त्या आनंदाचें भोक्तें ज्ञान त्या आनंदांत परब्रह्म शांति-भोक्तें आहे अशा स्मरणानें नसणें, व जें विषयभोक्तें आहे तें कसें आहे हें समजत नाहीं या स्मरणानें असणें, हीच जीवदशा आहे. आनंदांत आनंदाच्या रूपाला परब्रह्म शांतिसुख देऊन ज्ञानानें असणें ही शिवदशा होय. ब्रह्मानंदांत या जीवशिव दशाच नाहींत, तो ब्रह्मानंद प्रकाशरूप ज्ञानरूपी स्वस्वरू-पभावच सद्गुरु आहे. अशा ह्या सद्गुरुस्थानीं चारी देहांची गडब-डच नाहीं. यामुळें तत्वमसि ही शास्त्रप्रचीती व तत्वमसीचा विचार करण्याची आत्मप्रचीती, ह्या दोन्ही प्रचीती गुरुप्रचीतींत अभाव होतात. शांतीच्या ज्ञानस्वरूपाला गुरु म्हणण्याचें कारण इतकेंच आहे कीं, त्याला अज्ञान आकर्षण करीत नाहीं; आणि त्याच्या स्वरुपांत अज्ञानाचा अभाव आहे ह्मणून त्याला गुरु हें नांव कल्पिलें आहे; परंतु कल्पितयांच्या मिथ्यत्वानें त्यांची कल्पना व्यर्थ आहे. व याच न्यायानें ग्रंथकर्ताही अभावच झाला.

---

# प्रकरण चौथें.

---

## विश्वाभास.

या विश्वास अधिष्ठान ह्मणजे मूळ अशीं दोन तत्वें अनादिसिद्ध आहेत. त्या दोन तत्वांपैकीं एकास परब्रह्म म्हणतात व दुसऱ्यास प्रकृति, आदिमाया, मूळमाया, महामाया, महत्ब्रह्म, शबलब्रह्म किंवा महत्तत्त्व असें ह्मणतात. या दोन अनादिसिद्ध तत्वांपैकीं परब्रम्ह हें सत्य, अक्षर, निर्विकल्प, निर्गुण, निरंजन, भेद्याभेद्यरहित, निर्विकार, अचल, सर्वाकाशस्थानापन्न, शुद्ध, ज्ञानघन व स्वयंप्रकाशी असें आहे. दुसरें जें महतत्त्व अगर आदिमायातत्त्व आहे, तें परब्रम्ह-स्थानीं काल्पनिक छायावत असून असत्य,नाशिवंत, सविकल्प, विकारी, एकदेशी, अनंतगुणी, चंचळ व परप्रकाशी असें आहे. परब्रह्माचे अंगीं माया नसून ती आहे अशी भासते. परब्रह्माचे अस्तित्वावांचून हिचें स्वतंत्र अस्तित्व टिकत नाहीं म्हणून या आदिमायेच्या योगानें परब्रह्मास द्वैतत्व येत नाहीं. सूर्याचे रश्मीपासून ढग निर्माण होतात, परंतु त्या ढगांस सूर्य जाणत नाहीं; त्याप्रमाणेंच परब्रह्मापासून ही माया उत्पन्न होत असून परब्रह्म त्या आपल्या मायेस जाणत नाहीं; म्हणून परब्रह्मास निरामय असें नांव आहे. सूर्य अचल असून त्यापासून होणारे ढग जसे चंचळ आहेत, तसेंच परब्रह्म अचल असून माया चंचळ व नाशिवंत अशी आहे. म्हणून मायेस चंचळ, क्षर, विकारी अशीं नांवें आहेत; व परब्रह्मास अक्षर, अचंचल, निर्विकारी अशीं नांवें आहेत; या परब्रह्माशीं मायेचा संबंध कसा आहे हें प्रथम दृष्टांतरूपानें सांगतों, म्हणजे उभयतांचा परस्पर संबंध वाचकांचे पूर्ण लक्षांत येईल.

जसें आकाशतत्व सर्वत्र व्याप्यव्यापक भावातीत अचल व निर्विकल्प असून त्याचे पोटीं 'आकाशाद्वायुः' या श्रुतीप्रमाणें वायु उत्पन्न होतो, परंतु तो आकाशाप्रमाणें निश्चळ न होऊन चंचळ व एकदेशी उत्पन्न होतो, व ज्या आकाश तत्वापासून तो उत्पन्न होतो त्या तत्वास तो जाणत नाहीं, तसेंच परब्रह्मापासून ही आदिमाया उत्पन्न होऊन परब्रह्माप्रमाणें निश्चळ न होतां चंचळ उत्पन्न होतें, व परब्रह्मास जाणण्याचें तिच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. याकरितां तीस जड अशी संज्ञा आहे. जसा वायु निघून गेला असतां आकाश कोठें जात नाहीं, तशी ही आदिमाया नाश पावली असतां परब्रह्म नाश पावत नाहीं. जसा लोहचुंबक लोखंडास न जाणतां त्यास चलित करितो, तसेंच परब्रह्म मायेस न जाणतां तीस सचेतन करितें. जसें वायूस चंचलत्व आल्यानें आकाश चंचलत्वास येत नाहीं, त्याप्रमाणेंच मायेच्या ठिकाणीं मी ब्रह्म असें कल्पनारूप स्फुरण उत्पन्न झाल्यानें परब्रह्माची निर्विकल्पता नाश पावत नाहीं. जसें किरणाचें ठिकाणीं मृगजळ उत्पन्न झाल्यानें किरणास द्वैतत्व येत नाहीं, त्याप्रमाणेंच या मूळ मायेचे अथवा शबल ब्रह्माचे योगानें परब्रह्मास द्वैतत्व येत नाहीं. परब्रह्म अद्वैत असून एक अनेकांतीत व स्वतःसिद्ध आहे. प्हा म्हटलें आहे 'परब्रह्मतत्वं त्वद्वैत मेवहि' म्हणजे परब्रह्मतत्व एकटेंच अद्वैत असून आहे तसेंच आहे. असो, जसा आकाशतत्वास वायूचा आधार नको, तसाच परब्रह्मास या शबल ब्रह्माचा अगर महत्तत्वाचा आधार नको. जसा वायूस आकाशाचा व मृगजळास किरणाचा आधार पाहिजे तसाच या मूळ मायेस परब्रह्माचा आधार पाहिजे.

आकाशावांचून जसें वायूचें अस्तित्वच असणें संभवनीय नाहीं, तसेंच परब्रह्मावांचून मायेचें अस्तित्व सिद्ध होणार नाहीं. मृगजळास

अस्तित्वांत येण्यास जसें किरण पाहिजे, तसेंच मायेस अस्तित्वांत येण्यास परब्रह्म कारण आहे. किरणाची व मृगजलाची जशी परस्पर ओळख नाहीं, तशीच या आदिमायेची व परब्रह्माची परस्पर ओळख नाहीं. मृगजलाचें असत्यत्व समजल्यानें जशी जलाशा नष्ट होते, तशीच मायेचें असत्यत्व कळल्यानें जन्ममरणउपाधि नष्ट होते. जसें मृगजल मिथ्या असून मृगांस तें सत्य भासतें व तृषा भागविण्याच्या हेतूनें त्यांस व्यर्थ धांव घ्यावयास लावितें, तद्वत् माया ही मिथ्या असून अज्ञानी जीवास विषयेच्छेनें जन्ममरण फेऱ्यांत जावयास लाविते. मृगजलाच्या मागें धांवणाराची जशी तहान भागावयाची नाहीं, तशीच माया व तिचा जगत्रूपी संसार सत्य मानणाराची विषय भोगण्याची इच्छा तृप्त होणार नाहीं; व जन्ममरण उपाधि बंद पडणार नाहीं. जसें मृगजल हें किरणाचे ठिकाणीं मिथ्या भास आहे, असें समजल्यानें सत्य किरणच अनुभवास येतो तसेंच माया मिथ्या समजल्यानें म्हणजे अपापलें अहंपण धरणारें ज्ञान मिथ्या समजल्यानें सत्य परब्रह्माचा अनुभव मिळतो.

जसें दोरीच्या ठिकाणीं भासणाऱ्या सर्पाचें भय नाहींसें होण्यास दोरीचें ज्ञानच झालें पाहिजे, तसेंच परब्रह्माच्या ठिकाणीं भासणाऱ्या मायेचें भय दूर होण्यास परब्रह्माचें सत्यज्ञानच झालें पाहिजे. ज्याप्रमाणें किरणच मृगजल रूपास येतात, त्याप्रमाणें परब्रह्मच मृगजलरूपी मायारूपास येतो. ज्याप्रमाणें मिथ्या रजतभासास सत्य शुक्तिका अधिष्ठान आहे, त्याप्रमाणेंच मिथ्याभासरूपीमायेस सत्य परब्रह्म आधार आहे. ज्याप्रमाणें वस्तूची छाया वस्तूस सोडून नसते त्याप्रमाणेंच परब्रह्माची माया परब्रह्मास सोडून नाहीं. ज्याप्रमाणें घटामध्यें सर्व मृत्तिकाच व्याप्त आहे. त्याप्रमाणेंच या विश्वामध्यें सर्व ब्रह्मच भरलेलें आहे. मृत्तिकेचें कार्य जो घट तो अस्तित्वांत

असतांच जसा घट मिथ्या होऊन मृत्तिकाच सत्य ठरतें, तसेंच मायेचें जगत्कार्य दृष्टीपुढें दिसत असतांच मिथ्या ठरून परब्रह्मच सत्य ठरतें. ज्याप्रमाणें मिथ्या बागुलबावाचें भय बालकासच सत्य आहे त्याप्रमाणेंच मिथ्या मायेचें भय अज्ञान्यांस सत्य आहे. यहा म्हटलें आहेः—

यथा बालस्य वेतालो मृत्युपर्यंतदुःखदः
असदेव सदाकारं तथा मूढमतेर्जगत् ॥
अज्ञस्य दुःखौघमयं ज्ञस्यानंदमयं जगत्
अंधं भुवनमंधस्य प्रकाशं तु सचक्षुषः ॥

आत्मविचार.

जसें बालकास खोट्या पिशाचभ्रांतीनें मरणांत दुःख होतें, किंवा जो जन्मतःच अंधळा आहे त्यास जसा अक्षय अंधारच आहे, तसाच हा मायारूप नामरूपात्मकजगद्भास अज्ञान्यांस मरणांत दुःख देण्यास व परब्रह्माचा वियोग भासण्यास कारण असून, जसा डोळपास प्रकाश अनुभवास येतो तसाच ज्ञान्यास सर्वत्र आत्मा अगर परब्रह्मच अनुभवास येतें. जसा माध्यानकाळीं सूर्यप्रकाश चोहोंकडे पसरला असतां घुबडास त्याच वेळीं मध्यरात्र भासते, त्याप्रमाणेंच सर्वत्र सर्वकाळ परब्रह्म असतां आज्ञान्यांस सर्वत्र जगत् दिसतें. असो, स्वप्नामध्यें जो संकटांत पडला आहे त्यास स्वप्नांतच स्वप्नांतील संकटापासून सोडविणारा मित्र प्राप्त होतो, त्याप्रमाणेंच मायेच्या कचाट्यांत जे सांपडले आहेत, त्यांस मायेच्या कचाट्यांत सांपडलेलाच पण ज्ञानी असा सद्गुरु येऊन सोडवितो. ज्याप्रमाणें स्वप्नामध्यें व्याघ्रमुखीं पडलेल्या मनुष्यास स्वप्नांतीलच राजा येऊन व्याघ्रवध करून मुक्त करितो, तद्वत जे अज्ञानी जीवात्मे जन्ममरणरूपी व्याघ्रमुखांत पडले आहेत, त्यांस मायारूपी स्वप्नांत असलेले जे संत अगर ज्ञानी पुरुष आहेत,

तेच मुक्त करितात. ज्याप्रमाणें निद्रा आहे तों पर्यंतच स्वप्नसृष्टि खरी, त्याप्रमाणेंच अज्ञान आहे तोंपावेतों मायारूप जें आपलें अस्तित्व व जगद्रूप संसार खरा आहे. जसें जागे झालें असतां स्वप्नसृष्टि व स्वप्नभय मावळून जागृदवस्थेंत फक्त स्वप्नस्मरण व स्वप्नसृष्टींतील देखाव्याचा भास मात्र कांहीं वेळ असतो, त्याप्रमाणेंच मायारूप स्वप्नांतून आत्मज्ञानानें जागा होऊन म्हणजे आपलें मिथ्यत्व समजून जो रहातो त्यास ज्ञानोत्तर ही मायावी सृष्टि आयुष्य संपेपर्यंत स्वप्नतुल्य भासते. वारा निघून गेला असतां असे वायूचे पश्चात् वृक्ष कांहीं वेळ पूर्व वायूच्या वेगामुळें हलत रहातात, त्याप्रमाणेंच अज्ञाननिवृत्ति होऊन ज्ञानप्राप्ति झाली तरीही कांहीं वेळ हा देहरूपी वृक्ष व त्याच्या क्रियारूपी खांद्या पूर्वकर्मरूपी वायूच्या योगानें हलत रहातात; ज्याप्रमाणें स्वप्नामध्यें आपलाच मृत्यु आपणांस पाहतां येतो, त्याप्रमाणेंच या जगद्रूपी संसारांत आपलेंच मिथ्यत्व आपणांस पाहतां येतें; ह्मणूनच तुकोबांनीं 'नाहींच होऊनि राहिजे' 'तरिच पाविजे आत्मसुखा' असें अभंगांत ह्मटलें आहे. यावरून असें समजावें कीं, आपण आहों असें भासणें हेंच मायेचें रूप आहे व त्यामुळेंच मी कोणीएक आहें व ब्रह्म अगर ईश्वर कोणी एक दुसरा आहे असें द्वैतरूपी भान होतें. आपणच नाहीं असें झालें म्हणजे द्वैत नष्ट होऊन अद्वैत परब्रम्हच राहतें. या करितां मायेचा म्हणजे आपापल्या अहंपण धरणाऱ्या ज्ञानाचा स्वात्मज्ञानानें त्याग करा म्हणजे मिथ्या समजून रहा म्हणजे तुमचें अज्ञान ज्ञानाग्नीनें दग्ध होऊन जसें भाजलेलें बीज पेरिलें असतां उगवत नाहीं, तसें पुनर्जन्म फेऱ्यांत जाण्यास तुम्ही उरणार नाहीं व सुखदुःखाचे भोगही तुम्हांस भोगावे लागणार नाहींत. याठिकाणीं स्वतःचे कल्पनेवांचून अन्य माया नाहीं. पहा म्हटलें आहे:—

अहं ममत्वयोर्बंधो नाहंममत्व मुक्तता ॥

" मी आहें व माझें आहे " असें दृढ स्मरण असणें हेंच मायेचें बंधन असून जन्ममरणाचे फेऱ्यांत पाडणारें आहे, व " मी नाहीं व माझें नाहीं " असें दृढ स्मरण असणें हेंच मोक्षास कारण आहे. आतां आपण आपल्या अहंपण धरणाऱ्या ज्ञानाचा त्याग कसा करावा असें म्हणाल तर सांगतों.

असा विचार करावा कीं, जोंपर्यंत शरीरांतील अंतःकरणपंचकरूप जाणीवेस मीपणाचें स्फुरण आहे, तोंपर्यंतच त्यास सुखदुःख होतें. तेंच अंतःकरण झोंपेंत लीन असतें त्या काळीं त्यास मीपणाचें स्मरण व सुखदुःखाचें भान होत नाहीं. यावरून स्पष्टच झालें कीं, जर आपणांस मीपण अगर सुखदुःख सतत चिकटलेलें असतें तर तें झोंपेंतही आपल्या अनुभवास आलें असतें; परंतु तसें तर होत नाहीं, व यावरून मीपण हें आपणांस चिकटलेलें नसून आपणांहून वेगळें, काल्पनिक आहे असें ठरलें. मीपणच जर काल्पनिक ठरलें तर मीपण धरणारें जें अज्ञान तें मीपण धरण्यापूर्वी व मीपण धरून सोडण्याअंतीं मीपणातीत आहे असें झालेंच. यावरून असें समजावें कीं, जर मीपण धरण्याचें आदिअंतीं मीपणातीत, मीपण धरणारें ज्ञान म्हणजे अज्ञान आहे तर " जें आदिअंतीं असतें तें मध्येंही असलेंच पाहिजे" या सिद्धान्ताअन्वयें तें अहंपणातीत ज्ञान त्यानें अहंपणा धरिला तरीही त्यामध्यें अहंपणातीतच असलें पाहिजे, असें झालें. तसेंच, हें अहंपण धरणारें जें ज्ञान तें ज्ञान नसून कूटस्थ अज्ञानरूपी पुरुष आहे आणि त्याची अहं अशी स्फुरणरूप भावना तीच प्रकृति आहे. ही त्याची प्रकृति संकल्पात्मक असल्यामुळें तिचा संकल्पाच्या नाशांनीं व जागृतीच्या अंतीं नित्य नाश आहे म्हणून तीस क्षर म्हणजे नाशिवंत असें म्हणतात; व अहंपणातीत जें अहंपणाधरणारें ज्ञान तें अहंपणरूपी प्रकृति नाश पावली असतां तिचे नाशाबरोबर

नाश पावत नाहीं म्हणून त्या कूटस्थ अज्ञानासच अक्षर, किंवा पुरुष असें नांव आहे. या कूटस्थ पुरुषासच आत्मा, शबलब्रह्म, समष्टि, ईश्वर, सगुणनिर्गुण अशीं अनंत नांवें आहेत. परमात्मा या क्षर प्रकृतीहून व अक्षर पुरुषाहून अतीत आहे. यास प्रमाणः—

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ॥
अतोऽस्मिलोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥

भगवद्गीता अ० १५.

श्रीकृष्ण म्हणतात, ' मी आपल्या निराकार रूपानें पुरुषाचें जें अक्षररूपी म्हणजे उत्पत्ति, स्थिति, संहार विरहितरूपी ज्ञानस्वरूप, त्या ज्ञानस्वरूपाची जी क्षर अहंतारूपी प्रकृति म्हणजे शक्ति जी पुरुपाच्या ज्ञानानें पुरुषच मी आहें अशा रूपानें अक्षर आहे, जी शामसुंदर श्रीहरीचें शरीर, त्याचा शामप्रकाश, त्याचे अनंत ग्रहतारांगणरूपी सृष्टीचे गोलरूप किरण, या रूपानें विश्वरूप अशी भासत आहे, ती पुरुपाच्या ज्ञानरूपाची, मी ज्ञानस्वरूप आहें अशी अक्षररूप म्हणजे अहंताधारक ज्ञानाच्या अक्षरत्वाइतकी अक्षरअहंता म्हणजे शक्ति आहे. ती प्रकृति म्हणजे प्राणिमात्रांचे देहांतील "मी" असें स्फुरण समजावें. तें " मी " हें स्फुरण प्राणिमात्रानें आपल्या पुरुपरूपानें म्हणजे आत्मरूपानें धरण्यापूर्वी भविष्यकाळांत असतें व मी अशी भावना केल्याबरोबर तें " अहं " हें स्फुरण भूतकाळांत जातें; म्हणून या प्रकृतीस वर्तमानकाळांत अस्तित्वच नाहीं. त्या वर्तमानकाळांत म्हणजे, भूतकाळाचा अंतःशेष व भविष्यकाळाचा प्रारंभशेष, यांच्या मध्य संधींत म्हणजे भविष्याच्या भूतकाळरूपी प्रकृतीचे अंतीं मी आपल्या अहंताधारक ज्ञानानें भूत भविष्याच्या मध्य वर्तमानकालरूपी शेषावर शयन करणारा जो आदिनारायण

अक्षर पुरुष आहे त्या अक्षर पुरुषातीत व क्षररूपी जी प्रकृति त्या प्रकृतीहून वेगळा सच्चिदानंद परमात्मा आहे.

या वर सांगितलेल्या कृष्णोक्तिप्रमाणें आपापलें अहंपण धरणारें ज्ञान शोधून त्या अहंताधारक ज्ञानातीत आपण परमात्माच आहों अशा ऐक्य भक्तीनें अगर धारणेनें आमरण पर्यंत रहावें म्हणजे अपापलें अहंपण धरणारें ज्ञान मिथ्या होऊन तो मुक्त होतो.

पहा, जगांतील कोणत्याही वस्तूनें आपणांस बंधन केलें आहे असें नाहीं. आपणच त्या वस्तुंचा लोभ धरून शोकमोहाचे बंधनांत पडलों आहों. करितां आपणच संसाराची आसक्ति व परस्परांवरचा लोभ टाकिला पाहिजे. संसारांतून मुक्त होणें हें ज्याचें त्यावरच अवलंबून आहे असें जाणूनच श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे:—

निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ॥
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥

भगवद्गीता अ० १५.

प्राणिमात्रानें निर्मान होऊन म्हणजे अहंपण धरणाऱ्या ज्ञानाचा वियोग करून सृष्टींतील पदार्थांचा संग म्हणजे पदार्थावरील प्रीति टाकावी, म्हणजे तो द्वैतरूपी सुखदुःखांतून सुटून माझें जें अव्यक्त अविनाश स्थान त्या स्थानाप्रत पावेल. या ठिकाणीं प्राण्यास मुक्त करणारा दुसरा कोणी मित्र नाहीं; म्हणून अज्ञानाचा त्याग ज्याचा त्यानेंच करावा. माझें ज्ञानरूप तेंच प्राण्याचें ज्ञानस्वरूप असल्यामुळें मी व मनुष्यप्राणि यांत ज्ञानस्वरुपाच्या स्थितीनें अंतर मुळींच नाहीं. परंतु प्राणि आपलें अस्तित्व मजहून पृथक् गणून अज्ञानाचा अंगिकार करितो व मी विपरीत ज्ञानाचा अंगिकार करीत नाहीं. जीव मात्रानें आपल्या विपरीत ज्ञानाचा त्याग केल्यास तो सहजच ज्ञानवान असें माझें रूप होईल.

यावरून वाचकांनीं असें समजावें कीं, जसा रज्जुस्थानीं सर्पभास मिथ्या असून सर्प मानणारें ज्ञान सत्य ज्ञानोदयीं ( रज्जुच आहे सर्प मु ीच नाहीं असें ज्ञान होतें तेव्हां ) मिथ्या आहे; तसेंच मी एक आहें असें संकल्पसहित अस्तित्व, संकल्पांच्या त्यागांतीं उरणाऱ्या वर्तमान काळांत मुळींच नाहीं; ह्मणजे शरीरांतील प्राणवायूस हलवून ओंठ व जीभ न हलवितां मनोमय आकाशवाणीनें मी, मी, अशी भावना केली कीं, तत्काळ ती भावना ह्मणजे "मी" हें स्फुरण भूतकाळांत जातें, व तेंच प्राणवायूस हलवून मनोमय उच्चारण्यापूर्वीं भविष्यकाळांत असतें. परंतु वर्तमान काळांत त्या अहंपणधरणाऱ्या अज्ञानाचा अत्यंत आभावच आहे, ह्मणजे अशा त्या वर्तमानकाळरूपी समष्टि ईश्वररूप अस्तित्वाच्या नित्यानंदरूपी ज्ञानांत भविष्याचा भूतकाळरूपी जो असत्अहंकारधारकमिथ्याभ्रमरूपजीवात्मा विवर्तभासरूप आहे त्यास मी एक आहें असें अस्तित्व मानणारें ज्ञानही मुळींच नाहीं. वर्तमानकाळांत अनुभवास न येणाऱ्या अभावरूप ज्ञानाचेंच नांव माया आहे. माया या शब्दांतील मा शब्दाचा अर्थ नाहीं असा आहे व या शब्दाचा अर्थ जी असा आहे; तस्मात् जें वर्तमानकाळांत ठरतच नाहीं त्याचेंच नांव माया, असें झालें. ज्याप्रमाणें भ्रमिष्ट मनुष्यासच भ्रम खरा आहे, त्या प्रमाणेंच आज्ञानी मनुष्यासच माया सत्य आहे. ज्यास कामीण झाली आहे त्याच्या डोळ्यास संपूर्ण सृष्टि पिवळ्या रंगाची दिसते परंतु ज्याचे नेत्र निरोगी आहेत त्यास सृष्टि आहे तशीच दिसते. त्याप्रमाणेंच ज्याच्या नेत्रास अज्ञानरूपी कामीण झाली आहे त्यासच ही माया व तिनें कल्पिलेली सृष्टि सत्य भासते. परंतु ज्याची अज्ञानरूपी निद्रा मावळली त्यास माया सत्य दिसत नाहीं. जसा गुहेंतील कोट्यावधि वर्षांचा अंधार नाहींसा करण्यास प्रकाशावांचून अन्य उपाय व्यर्थ आहे, त्याप्रमाणेंच माया

सत्य न भासण्यास ज्ञानच कारण आहे. आत्मज्ञान झाल्यावांचून मायेची ह्मणजे भ्रमाची अगर द्वैताची किंवा भयाची निवृत्ति कोटिवर्षे वादविवाद करून अगर अनंत शास्त्र धुंडून किंवा तपश्चर्या करूनही व्हावयाची नाहीं. याकरितां शहाणे लोकहो, जर तुह्मांस वेद प्रतिपाद्यधर्म ह्मणजे अद्वैतधर्म असें सिद्ध धरावयाचें असेल, किंवा तुम्हांस अद्वैत परब्रह्माची प्राप्ति करून घ्यावयाची असेल, तर तुम्हीं आपापलें अहंपण धरणारें जें ज्ञान त्याचा आत्मज्ञानानें नाश करा; ह्मणजे माया कशी झाली, कोणी केली, सृष्टीचा कर्ता कोण अशाविपयींच्या तुमच्या सर्व शंका जातील, व एक अद्वैत परब्रह्मच सत्य ठरेल. नंतर तुमचें अस्तित्वच मायारूप होऊन तुमचे मिथ्यत्वाचाच अंतशेष परब्रह्म आहे व मधले तुम्हीं वंध्यासूत आहां असें अनुभवास येईल.

पहा, पाण्यापासून झालेलें बर्फ जसें पाण्यावरच तरंगतें, तशीच आकाशापासून झालेलीं चार भूतें वायु, तेज, आप आणि पृथ्वि हीं अक्षय आकाशांतच तरंगत आहेत असें अनुभवास येतें. जरी चार भूतें आकाशापासून होऊन आकाशावरच तरंगतात तथापि तीं आकाशांत मिश्र न होतां आकाशाहून भिन्न राहिलीं आहेत. आकाश हें स्थिर, अचल, सर्वव्यापी, असें आहे व त्याचे पोटांत उत्पन्न होणारीं चार भूतें हीं चंचल, एकदेशी, नाशिवंत व वेगवेगळीं अशीं आहेत असें आपल्या अनुभवास येतें. ज्याप्रमाणें आपण या चारभूतांखेरीज आकाशाची गणना वेगळी करितों; त्याप्रमाणेंच परब्रह्मापासून झालेली माया ही परब्रह्माहून वेगळी कां गणीत नाहीं ? अहो, आकाश जसें निश्चळ आहे तसेंच परब्रह्महो निश्चळ आहे. जशी आकाशापासून होणारीं भूतें चंचळ आहेत तशी परब्रह्मापासून होणारी मायाही चंचळ आहे. जसें आकाश पंचमहाभूतात्मक सर्व सृष्टींत आयतेंच व्याप्त आहे त्याप्रमाणेंच परब्रह्म या मायारूपी चंचल सृष्टींत व्याप्त आहे.

आकाश सर्वत्र असून जसें कोणत्याही वस्तूस जाणत नाहीं, तसेंच परब्रह्मही मायापार्थीक सृष्टीस जाणत नाहीं. आकाशाखेरीज संपूर्ण चार भूतांचें अस्तित्व जसें सिद्ध होत नाहीं तसेंच परब्रह्मावांचून मायेचें व जगताचें अस्तित्व सिद्ध होत नाहीं. जशी आकाशाखेरीज मनुष्यास कोणतीही क्रिया करितां यावयाची नाहीं पण आकाश कांहीं करीत नाहीं, त्याप्रमाणेंच परब्रह्मावांचून कोणतीही क्रिया होत नाहीं व परब्रह्म कांहीं करीत नाहीं. असो, याप्रमाणें येथपर्यंत माया व ब्रम्ह या उभयतांचा परस्परांशीं संबंध कसा आहे, व माया म्हणजे काय हें सांगितलें. आतां मायेनें सृष्टि कशी निर्माण केली हें सांगतों. परंतु वाचकांनीं या पुढील मायावी सृष्टिक्रमास फारसें भुलूं नये. कारण मागें सांगितलेंच आहे कीं, ही संपूर्ण सृष्टि परब्रह्माचे अस्तित्वांत मायेसुद्धां व जीव ईश्वर इत्यादिकांसुद्धां मृगजलवत् आहे व एक अनेकातीत परब्रह्मच सत्य आहे. प्रमाण

माया ख्यायाः काम धेनोर्वत्सौ ।
जीवेश्वरवुभौ यथेष्टं पिवतां द्वैतं ॥
तत्वं त्वद्वैत मेवहि ॥

मायारूपी कामधेनूचीं जीव आणि ईश्वर अशीं उभय बालकें आहेत. त्यांनीं द्वैतरूपी दग्ध खुशाल प्राशन करावें; परंतु परब्रह्मतत्व हें एकच अद्वैत सत्य आहे व माया मिथ्या आहे.

याप्रमाणें परब्रह्मास सत्यत्व देऊन मायेस फारसें अस्तित्व देऊं नये. जशी निद्रा स्वप्नावस्थेंत अनंत सृष्टि उत्पन्न करते परंतु ती निद्रा अगर तिचें कार्य जी स्वप्नसृष्टि, हीं उभयही जशीं जागृदवस्थेंत मिथ्या ठरतात त्याप्रमाणेंच ही मायारूपी निद्रा अनंत ब्रह्मांड गोळास व त्यांतील अनंत वस्तूंस व अनंत प्राण्यांस निर्माण करते. परंतु ही माया व

तिचें कार्य अशीं उभयही परब्रह्माचें ज्ञान प्राप्त झालें असतां मुळींच मिथ्या आहेत असें समजून येतें. अज्ञानावरण आहे तोंपर्यंतच सगळा कारभार करावयाचा आहे असें जाणून व अज्ञानावरण आहेच असें घेऊन सध्यां येथें मायेनें सृष्टि कशी निर्माण केली हें प्रमाणसिद्ध सांगतों. जसा निजलेला मनुष्य निद्रेस जाणत नाहीं व जशी निद्रा व मनुष्य एक नसून परस्पर भिन्न आहेत व निद्रेस प्राण्याचे आधाराशिवाय इतर ठिकाणां अस्तित्वच राहत नाहीं, त्याप्रमाणेंच परब्रह्म हें स्वतः निद्रेसारख्या निर्विकल्प स्थितिमध्यें अक्षय आहे; त्यास जागृत स्वप्न सुषुप्ति या तिन्ही अवस्थांचा गंध सुद्धां नाहीं. त्याची सारखी निर्विकल्प स्थिति त्रिकाळ अबाधित असून त्यास कधींही स्वस्वरूपाचा वियोगच नाहीं. सतत त्याला त्याचा योगच आहे म्हणून त्याच्या निर्विकल्प स्थितीस योगनिद्रा असें म्हणतात. परंतु जशी निद्रा मनुष्यास सोडून निघून जाते म्हणजे अव्यक्त होते, तशी ही योगनिद्रा परब्रह्मास कधींही सोडून जात नाहीं. कारण त्याची योगनिद्रा व तो परस्पर कांहीं भिन्न नाहीं; त्याच्या निर्विकल्प स्थितीसच आपण योगनिद्रा असें नांव दिलेलें आहे. म्हणून त्याची ती योगनिद्रा अखंड आहे. आपली निद्रा जागृदादि अवस्थेंमध्यें प्रतितीस येत नसून वियोग पावते, म्हणून तीस योगनिद्रा असें म्हणूं नये. असो, अशा प्रकारें परमात्मा आपल्या योगनिद्रेंत अखंड निर्विकल्प असून आपल्या या अशा त्रिकाळ अबाधित स्थितीस जाणत नाहीं; म्हणून अशा त्याच्या अजाणत्या स्थितीसच तत्ववेत्त्यांनीं योगनिद्रा, आदिमाया, शबलब्रह्म, आत्मा, मूळमाया अशीं नांवें दिलीं आहेत. याशिवाय योगमायेस प्रकृति अशीही संज्ञा कित्येक ठिकाणीं दिलेली आहे. या प्रकृतींत मुख्य तीन गुण बीजांत वृक्ष या न्यायानें अव्यक्त आहेत. हे गुण सारख्या प्रमाणानें तिच्या ठिकाणीं स्वतःसिद्धच असल्यामुळें तीसच

साम्यप्रकृति असेंही म्हणतात. जसें एकच पाणी हें पातळ, थंड व तुरट अशा तीन गुणांनीं युक्त स्वतः सिद्धच आहे त्याचप्रमाणें या साम्य-प्रकृतीचा न्याय समजावा. या प्राकृतीस आपल्या आत्मरूपाचें म्हणजे ब्रह्मरूपाचें 'अहंब्रह्म' अशा स्फुरणरूपानें स्मरण आहे. हे कल्पनारूप स्फुरण होतांना मध्यंतरीं जो अवकाश मिळाला तेंच कल्पनारूप आकाश समजावें व स्फुरण हाच वायु समजावा. साम्य प्रकृतीस मूळ पुरूष असेंही नांव आहे. प्रकृतीनें जेव्हां अहं असें स्फुरण धरिलें नव्हतें ह्मणजे ती जेव्हां स्फुरणरहित होती तेव्हां त्या स्फुरणरहित स्थितीसच पुरूष अशी संज्ञा आहे व त्याच स्फुरणरहित तत्वानें अहं ह्मणजे मी असें सूक्ष्म ध्वनीरूप स्फुरण धरिलें ह्मणजे त्यालाच प्रकृति असें नांव येतें. या पैकीं पुरुषास शबल ब्रम्ह अगर आत्मा व प्रकृतीस मूळ माया अशीं कारणपरत्वें नांवें दिलीं आहेत. शिवाय या प्रकृतीपुरुषरूपास माया असें एकच नांव आहे. असो, या शबल ब्रह्मानें प्रथम मी ब्रम्ह आहें अशी भावना धरली. नंतर त्याच शबल ब्रह्मानें पुनः आपणच एकाचे अनंत व्हावें असें इच्छिलें. आपण अनंत झालों म्हणजे आपण त्या अनंत रूपांवर श्रेष्ठत्वानें देखरेख करावी व सृष्टीची उत्पत्ति करून कांहीं खेळ करावा असें इच्छिलें. नंतर तें शबल ब्रम्ह आपण श्रेष्ठ ईश्वर आहों असें मानूं लागतांच त्यास ईश्वरत्व आलें व त्याच शबल ब्रह्मानें आपण अनंत जीव आहोंत अशी कल्पना केली व लागलींच त्याच्या इच्छामात्रें अनंत सूक्ष्म जीव देहविरहित उत्पन्न झालें. अशा प्रकारें एकच शबल ब्रह्म आपल्या श्रेष्ठ अंशानें अगर अहंकारानें ईश्वर झालें व कनिष्ठ अंशानें जीव झालें. (या गोष्टीचा म्हणजे जीवेश्वरोत्पत्तीचा व सृष्ट्युत्पत्तीचा निर्णय यथासांग प्रमाण-सिद्ध पुढें क्रमाक्रमानें आलेला आहे) या शबल ब्रह्माचे कनिष्ट अंशास

वेदामध्यें नाना प्रकारच्या अविद्या व श्रेष्ठ अंशास माया अगर विद्या अशीं नांवें दिलेलीं आहेत. याप्रमाणें एकच शबल ब्रह्म इच्छामात्रें करून द्विधा झालें. या दोन रूपांपैकीं एकास ईश्वर म्हणावें व दुसऱ्यास नानाजीव असें म्हणावें.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टींविषयीं वेदामधील कांहीं प्रमाणें देतों. प्रथम प्रमाण वेदश्रुति 'ब्रह्माहमस्मि' म्हणजे मी ब्रह्म आहें असें आत्म्यास स्फुरण झालें. दुसरें प्रमाण श्रुति "अथ एकाकी नरमते" म्हणजे मी एकटाच ब्रह्म आहें व असें एकटें राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कांहीं तरी कर्मणूक काढली पाहिजे, अशी दुसरी भावना शबल ब्रह्मानें धरिली. तिसरें प्रमाण "एकोहं बहुस्यां" म्हणजे ज्या अर्थी एकटे राहून कर्मणूक होत नाहीं व दुसरें कोणाचें अस्तित्वही नाहीं त्या अर्थी आपणच एकाचे अनेक होऊन करमणूक करून घ्यावी. अशी तिसरी भावना शबल ब्रम्हानें धरिली. या प्रमणान्वयें एकाच शबल ब्रम्हानें म्हणजे मिथ्या ब्रम्हानें तीन भावना धरिल्या. त्यांपैकीं पहिली जी 'ब्रम्हामस्मि' म्हणजे मी ब्रम्ह आहें, अशी भावना धरिली ती सत्य जें परब्रम्ह तेंच मी आहें मजवांचून दुसरें कोणी नाहीं अशा सत्य वस्तूस अनुसरून धरिल्यामुळें या भावनेस सत्वगुण असें वेदांत म्हटलें आहे. या ब्रम्हाहमस्मि भावनेवेयोगें द्वैत सिद्ध होतच नाहीं. कारण त्या ठिकाणीं ब्रम्हाखेरीज दुसऱ्या वस्तूचें स्मरण नाहीं; व दुसरी जी 'अथएकाकी नरमते' म्हणजे एकटें राहून करमणूक होत नाहीं अशी भावना धरिली ती एकापेक्षां कांहीं अधिक असावें अशा अर्थाची असल्यामुळें तीस रजोगुण अशी संज्ञा आहे व रजोगुण म्हणजे ज्ञानाच्या अंगचा लोभी स्वभाव. 'एकोहं बहुस्यां' म्हणजे मी एकाचा अनेक होईन अशी तिसरी भावना धरिली. ही अज्ञानी जे जीव त्यांचे उत्पत्तीस कारण असल्यामुळें या

भावनेस तमोगुण म्हणजे ज्ञानाचा विस्मरणरूपी तामस स्वभाव असें नांव आहे. आतां या तीन भावनांसच तीन गुणांची संज्ञा दिली याचें कारण असें कीं, पूर्वीं जी त्रिगुणसाम्य प्रकृति सांगितली, त्या प्रकृतींत अव्यक्त रीतीनें त्रिगुण म्हणजे सत्व, रज, तम हे असतात; तेच वर सांगितल्याप्रमाणें वेगवेगळ्या भावना धरितात, म्हणून त्या वेगवेगळ्या भावनेस कारणपरत्वें सत्व, रज, तम अशीं नांवें दिलीं. याप्रमाणें त्रिगुणरूपकार्य उत्पन्न झाल्यानंतर तें शबलब्रम्ह वरील त्रिगुणरूप भावनेसह कांहीं वेळ स्थित झालें. याचेयोगें त्या त्रिगुरूप भावना पुनः परस्परांमध्यें मिश्र झाल्या. अशा रीतीनें शबलब्रह्म त्रिगुणमिश्रित होऊन नंतर या प्रकृतिरूप शबलब्रह्मानें आपली कल्पना इच्छामात्रें द्विविध केली, ती अशीः—ज्यामध्यें सत्वगुण अधिक म्हणजे परब्रम्हाचें स्मरणरूप ज्ञान अधिक व रज, तम हे दोन गुण कमी आहेत अशी एक काल्पनिक रचना केली. या रचनेस वेदान्तशास्त्रांत विद्या अगर माया अशी संज्ञा आहे. याप्रकारें सत्व प्रधान असा मायारूप एक भाग झाला. आतां दुसऱ्या भागाची रचना अशी केली आहे कीं, जींमध्यें परब्रह्माचें ज्ञानरूप स्मरण ठेवणारा जो सत्वगुण तो कमी व रज तम हे विस्मरणरूपी अज्ञानात्मक दोन गुण अधिक. या रचनेस वेदान्तशास्त्रांत अविद्या असें म्हटलें आहे. ही अविद्या नानाप्रकारची असून अनंत वेषधारी आहे. अशा प्रकारें शबलब्रह्मानें आपली प्रकृति इच्छामात्रें माया व अविद्या अशा उभयरूपानें विभागिली. नंतर मायेचा अहंकार घेऊन तेंच ईश्वर होऊन नानाप्रकारच्या अविद्येचे नाना अहंकार धारण करून नाना जीव झाले. या वरील संपूर्ण गोष्टीचा निर्णय खालीं लिहिल्याप्रमाणें आधारभूत घ्यावा. वेदान्तशास्त्रांत या जीव ईश्वरोत्पत्तीच्या क्रमास बिंबप्रतिबिंब न्याय असें म्हटलें आहे, तो क्रम असाः—

**चिदानंद मय ब्रम्ह प्रतिबिंब समान्विता ।**
**तमोरजः सत्वगुणा प्रकृतिर्द्विविधाच सा ॥**

पंचदशी.

आदिमाया ही स्वतः ब्रह्माचे आंगची शक्ति असून ती चिज्जड आहे. त्या आदिमायेंत परब्रम्हाचें प्रतिबिंब पडलें आहे, त्यायोगें ती सचेतन, ज्ञानवान अशी झाली असून तींत सत्व, रज, तम हे त्रिगुण सारख्या मानानें आहेत. या आदिमायेस शबलब्रम्ह किंवा प्रकृति असें म्हणतात. या प्रकृतीचे माया व अविद्या असें दोन विभाग झाले अशाविषयीं प्रमाणः—

**सत्व शुद्धय विशुधिभ्यां मायाऽविद्येच ते मते ।**
**माया विंबो वशी कृत्यतांस्यात्सर्वज्ञईश्वरः ॥**

पंचदशी.

या वर सांगितलेल्या प्रकृतीचे परब्रम्ह प्रकाशामुळें दोन प्रकार झालेले आहेत. जीमध्यें सत्वगुण अधिक असून तो इतर दोन गुणांनीं गढूळ झालेला नसतो त्यास माया म्हणावें, व जीमध्यें सत्वगुण कमी असून इतर दोन गुण जे रज, तम यांचे योगें म्हणजे यांच्या अधिकत्वानें तो गुण गढूळ झालेला असतो त्यास अविद्या म्हणावें. पहिली जी सत्वप्रधान माया सांगितली, तीमध्यें सच्चिदानंद परब्रह्माचें प्रतिबिंब आहे, त्यास सर्वशक्तिमान् ईश्वर म्हणावें. या ईश्वरास सत्वप्रधान प्रकृतीचे साह्यानें उपजतच मी ब्रम्ह आहें व मी मुक्त आहें, असें योगसिद्ध ज्ञान आहे. प्रकृति स्वभावतःच जड असल्यामुळें व तींत प्रतिबिंबित असलेला ईश्वर जड नसल्यामुळें त्यानें ती माया आपल्या स्वाधीन ठेविली आहे. आतां जीवोत्पत्तीविषयीं प्रमाण सांगतों:—

**अविद्या वश गस्त्व न्यस्तद्वैचिव्या दने कधा ।**
**साकारण शरीरंस्यात् प्राज्ञस्तत्राभिमानवान् ॥**

पंचदशी.

रज तम हे दोन गुण विशेष आहेत जीमध्यें, अशी जी अविद्या, त्या अविद्येमध्यें जें सच्चिदानंद ब्रम्हाचें प्रतिबिंब पडलें आहे, त्यासच जीव म्हणावें. ही अविद्या "समुद्र एक पण बुडबुडे अनेक" या न्यायानें प्रकृतिरूपी सागरांत नानाप्रकारची उत्पन्न झालेली असून त्या नाना अविद्येंत एकाच परब्रम्हाचीं नाना प्रतिबिंबें पडलेलीं आहेत म्हणून जीव अनंत आहेत. हे अज्ञानी जीवात्मे निरनिराळ्या आकाराचा वेगवेगळा देह धारण करितात.

याप्रमाणें जीवेश्वरन्याय आधारयुक्त सांगितला. आतां ईश्वरानें पुढें स्थूळसृष्टि म्हणजे दृश्यसृष्टि आणि अदृश्यसृष्टि कशी निर्माण केली हें सांगतों.

ईश्वरानें आपल्या स्वमायेंकरून म्हणजे त्याचा जो रज, सत्व आणि तमरूपी स्वभाव, त्या स्वभावेंकरून, प्रथम पंचमहाभूतें काल्पनिक, अदृश्य अशीं उत्पन्न केलीं. हीं पंचमहाभूतें ईश्वराचा जो तमोगुण, त्या तमोगुणाचीं झालेलीं आहेत. यास प्रमाणः—

**तमः प्रधा प्रकृतेस्तद्भोगायेश्वरा ज्ञया ।**
**वियत्पवन तेजोंबु भुवोभूतानि जज्ञिरे ॥**

पंचदशी.

जीवास सुखदुःखाचा भोग व्हावा म्हणून तमप्रधान प्रकृतीपासून ईश्वराच्या आज्ञेनें आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वि हीं पंचमहाभूतें काल्पनिक निर्माण झालीं. तीं अशीं ॥ श्रुति ॥ "तस्मात् आत्मनः आकाशः संभूत" म्हणजे अहंब्रह्म भावना धरणारा जो माईक ईश्वर तोच 'आत्मापुरुष ईश्वरः'

या श्रुतीप्रमाणें आत्मा आहे. त्या आत्म्यापासून आकाश म्हणजे पोकळी, तिची कल्पना उत्पन्न झाली; पुढें 'आकाशाद्वायुः' या श्रुतीप्रमाणान्वयें त्याच पोकळीरूप कल्पनेपासून वायूची परमाणुरूप

कल्पनासिद्धि उत्पन्न झाली. येथें हेंही लक्षांत ठेवावें कीं, जें जें भूत काल्पनिक निर्माण झालेलें आहे, त्या त्याच्या कल्पनारूपभूताचे ठिकाणीं आत्मा अगर ईश्वर कल्पनाधारक या नात्यानें वास्तव्य करीतच असतो. दासबोधांत श्रीरामदास म्हणतात 'मायाब्रम्हीं जो समीर ॥ त्यांत जाणता तो ईश्वर' ॥ म्हणजे शबलब्रम्हाचे अगर मायेचे ठिकाणीं जें परमात्म्याचें प्रतिबिंब पडलेलें आहे तें प्रतिबिंब मी ब्रम्ह अशा स्फूर्तिरूपानें आहे; ही स्फूर्तिच वायु होय. या स्फूर्तीनंतर स्फूर्तीमध्येंच प्रतिबिंबित झालेला जो ज्ञाता ईश्वर, हाच वायूंत म्हणजे स्फूर्तिरूप वेगांत जाणता आहे.

या प्रमाणें वायूची उत्पत्ति झाली. पुढें "वायोरग्निः" या श्रुतीप्रमाणें वायूपासून अग्नि, प्रकाश, उष्णता, विद्युल्लता इत्यादि अग्नीची परमाणुरूप कल्पना उत्पन्न झाली. श्रुति 'अग्नेरापः' ह्मणजे तेज तत्व जो अग्नि त्यापासून उदकाची ह्मणजे पाण्याची परमाणुरूप कल्पना उत्पन्न झाली. श्रुति 'अद्भयः पृथिवीः' ह्मणजे उदक जें त्यापासून परमाणुरूप पृथ्वीची कल्पनारूपसिद्धि उत्पन्न झाली. या वर लिहिलेल्या श्रुत्यन्वयें जीं पंचमहाभूतें उत्पन्न झालीं तीं आत्मा जो शबलब्रम्ह त्यापासूनच उत्पन्न होऊन, आकाश उत्पन्न होण्यापूर्वीं आकाशासारखें जें आत्म्याचें आयतेंच रूप आहे, त्या आत्मरूपावरच तरंगत होतीं. याप्रमाणें आत्म्यापासून ह्मणजे शबलब्रम्हापासून प्रथम सूक्ष्म काल्पनिक अशी बीजवत् भूतें निर्माण होऊन, त्या भूतांस शबलब्रम्हानें आपल्या आकर्षणशक्तीनें आकर्षण करून धरलेलीं आहेत. नंतर पूर्वोक्त नानाप्रकारची जी अविद्या, तिनेंही आपल्या नानाजीवरूपानें नाना अहंब्रम्हभावना वेगवेगळ्या आपल्या मिथ्या ज्ञानानें धरिल्या; तेच नाना अहंपणात्मक भावना धरणारे जीव होत. ह्या जीवांनीं लहानथोर अशीं रूपें धरिलीं. नंतर पूर्वोक्त मायेमध्यें प्रतिबिंबीत जो

ईश्वर त्यानें आपल्या त्रिगुण भेदेंकरून त्रिगुणांचीच स्वप्रकाशमय अशीं स्पष्ट तीन शरीरें धरिलीं; तीं अशीं—सत्वगुणानें चतुर्भूज विष्णूचें रूप धरिलें आणि सृष्टीचें पालन करण्याचा अधिकार आपणाकडे घेतला. नंतर त्याच ईश्वरानें आपल्या इच्छावशें रजतम हे दोन गुण मिश्र करून उभय गुणात्मक ब्रम्हदेवरूपी जाणीवनेणीवगुणांनीं युक्त असें पंचानन( पांचमुखें )आहेत ज्यास असें चतुर्भूज शरीर धारण करून सृष्ट्युत्पत्ति करण्याचें काम आपणाकडे घेतलें. पुढें पूर्वोक्त ईश्वरानेंच आपल्या तमोगुणापासून तमोगुणात्मक महेशाचें रूप धारण करून त्याकडे सृष्टीचा संहार करण्याचें काम सोंपविलें. नंतर ब्रम्हदेवानें आपल्या स्वेच्छेनें पूर्वोक्त जी परमाणुरूप काल्पनिक अव्यक्तबीजरूप पंचमहाभूतें सांगितलीं, त्या पंचमहाभूतांचे प्रत्येकीं दोन दोन विभाग केले. ते असे कीं, आकाशापासून जो वायु उत्पन्न झाला तो अव्यक्त होता, तो स्पष्ट करून ( म्हणजे आपल्या कल्पनेसच वेग देऊन ) त्या वायूचे दोन विभाग केले, एक उष्णवात व दुसरा थंड वात. थंड वातापासून चंद्र तारांगणादि गोल स्पष्ट उत्पन्न करून उष्णवातापासून सूर्य, विद्युल्लतादि उष्णस्वप्रकाशी असे गोल व पदार्थ उत्पन्न केले. नंतर बाकीचीं भूतें अशाच प्रकारें विभागून म्हणजे एक अग्नीचा भाग आकाशांत ठेवून, दुसऱ्या अर्ध भागापासून पाणी म्हणजे आपतत्व मेघरूपानें उत्पन्न केलें. तेही दोन विभागांत विभागून एक भाग आकाशांत ठेवून दुसरा अर्धभाग घट्ट अटवून पृथ्वीतत्व उत्पन्न केलें. हें पृथ्वीतत्व हीं आकाशांतच शबलब्रम्हानें आपल्या आकर्षणशक्तीनें तोलून धरिलेलें आहे. नंतर पृथिव्या ओषधयः या श्रुतीप्रमाणें नानातऱ्हेची वनस्पति उत्पन्न केली. "औषधी भ्योन्नं" या श्रुतिप्रमाणें औषधीपासून अन्न उत्पन्न केलें. नंतर 'अन्नात्पुरुषः' या श्रुत्यन्वयें अन्नाचे रसापासून रक्त, रक्तापासून मांस व वनस्पतींतील जो

कठीण मगज म्हणजे पृथ्वींचा कठीण अंश त्यापासून हडें व मांसापासून चर्म अशा प्रकारें उत्पन्न करून ब्रम्हदेवानें त्या पदार्थांची निरनिराळीं स्त्रीपुरुष जातीचे देह म्हणजे नाना शरीरें उत्पन्न केलीं. त्यांत मानवी शरीरही उत्पन्न केलें.

याप्रमाणें 'मी ब्रम्ह' अशी भावना धरणारें जें शबलब्रम्ह, म्हणजे मिथ्या ब्रम्ह तेंच 'एकोहं' अशा स्फूर्तीरूपानें ईश्वर झालें व तेंच स्फूर्ति उत्पन्न होतांना अवकाश घेऊन आकाश रूप झालें. तेंच पोकळी रूप कल्पना घेऊन वायु आदिकरून चार भूतें व अनंत प्राण्यांचीं अनंत शरीरें व ब्रह्मा, विष्णु, महेशादि तीन सृष्टिचालक इत्यादि झालें. हेंच त्याचे 'एकोहं बहुस्यां' असें होणें समजावें. या प्रमाणें शबलब्रम्ह म्हणजे समष्टि ईश्वररूप हेंच आपल्या इच्छावशें, पांचभूतें व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृतिरूपास आलें. पुढें तेंच आपल्या अष्टधाप्रकृति रूपानें विश्वाकार भासूं लागलें. त्यानेंच आपल्या इच्छावशें वर सांगितल्याप्रमाणें नाना शरीरें उत्पन्न केलीं! परंतु हें समष्टी ईश्वररूप जरी 'एकोहं बहुस्यां' या न्यायानें संपूर्ण सृष्टिरूप झालें तरी देहधारी मागें सांगितलेले अनंत अविद्यात्मक जीव हे तें झालें नाहीं. हे जीव स्वतंत्र पंचभूत सृष्टीपूर्वीं अविद्येतील प्रतिबिंबरूपानें अनंत आहेत. त्यांनीं आपला सजातीय जो समष्टि ईश्वर, त्यास पहावयास इच्छिलें; परंतु त्या वेळीं समष्टि ईश्वर आपल्या अष्टधा प्रकृतिरूपानें सृष्टीरूप झाला होता, तो त्यांना ओळखतां येईना. म्हणून त्या जीवांस असें वाटलें कीं, आपण या समष्टि ईश्वररूप सृष्टीस धरून राहणें हेंच आपलें कर्तव्य आहे. असें झाल्यानंतर त्या जीवांनीं या पंचमहाभूतात्मक शरीरास भुलून त्यास आकर्षण करून अनंत शरीरांत प्रवेश केला. त्यांपैकीं कांहीं जीवांनीं स्वयंप्रकाश अशीं जीं सूर्य, चंद्र, तारांगणें वगैरे

गोळरूप शरीरें होतीं तीं धारण केलीं व कांहींनीं चर्ममय, मांसमय अशीं शरीरें धारण केलीं. याप्रमाणें जीवांनीं लहान मोठीं अनंत शरीरें धारण केलीं. नंतर ज्या ज्या गोळावर हे शरीरधारी जीव आहेत त्या त्या गोळावर त्या त्या गोळाच्या आकर्षणशक्तीनें त्या त्या जीवांस आकर्षण करून धरिलें, व शबलब्रम्हानें तर या अनंत देहधारी जीवांस व अनंत ब्रम्हांडास आपल्या आकर्षणशक्तीनें आकर्षण करून धरिलें. असें झाल्यानंतर सृष्टिपालनकर्ता जो विष्णु त्यानें वरील देहधारी जीवात्म्याकडे पाहिलें तों त्यांस असें दिसून आलें कीं, ते स्तब्ध राहिले आहेत. नंतर त्यानें त्या जीवात्म्यांकरितां मागें सांगितल्याप्रमाणें पंचमहाभूतांचे जे अर्धभाग आकाशांत राहिले होते त्यांच्या अपंचीकृत भागापासून सतरा तत्वांचा लिंगदेह उत्पन्न केला म्हणजे त्यानें आपली एकच इच्छा सतरा प्रकारें विभागिली. प्रमाणः—

**पंचप्राण मनोबुद्धि दशेंद्रिय समन्वितं**
**अपंचीकृत भूतोत्थं सूक्ष्मागं भोग साधनं ॥**

पंचप्राण म्हणजे प्राण, अपान, समान, व्यान व उदान हे वायु व दशेंद्रियें म्हणजे पंचज्ञानेंद्रियें, व पंचकर्मेंद्रियें. पंचज्ञानेंद्रियें म्हणजे श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा व घ्राण; व पंचकर्मेंद्रियें म्हणजे हस्त, पाणी, पाद, उपस्थ आणि गुद. हीं दहा इंद्रियें व वर सांगितलेले पंचप्राण मिळून पंधरा तत्वें आणि मन व बुद्धि मिळून सतरा तत्वें या वासनात्मक लिंग देहांत, अथवा सूक्ष्म शरीरांत आहेत. असें हें सूक्ष्म शरीर, जीवांनीं जीं अनंत शरीरें धारण केलीं होतीं त्या शरीरांत घातलें. त्यायोगें जीवांस वासना उत्पन्न होऊन सुखदुःखाचे भोग होऊं लागले. आतां हीं लिंग देहाचीं सतरा तत्वें कशीं निर्माण झालीं याविषयीं प्रमाणः—

**व्योम्नः श्रोत्रं भुवो घ्राणं जलाज्जिव्हाथ तेजसः**
**चक्षुर्वायोस्त्वगुत्पन्ना तेषां भौतिकता ततः ॥**

आकाश तत्वापासून श्रोत्र उत्पन्न झालें, पृथ्वी तत्वापासून घ्राण, आप तत्वापासून जिव्हा, तेज तत्वापासून नेत्र, वायूपासून त्वचा, या प्रमाणें पांच भूतांपासून ईश्वराचे इच्छावशें पंचज्ञानेंद्रियें उत्पन्न झालीं; आणि

**व्योमादीनां समस्तासात्विकांशेल्प एवतु ।**
**जायते बुद्धिमनसी बुद्धिः स्यान्निश्चयात्मिका ॥**

पांच भूतांचा सत्व गुणात्मक अंश एकीकरण होऊन मन व बुद्धिरूपी अंतःकरण उत्पन्न झालें. तशींच पंचकर्मेंद्रियें हीं सर्वभूतांच्या रजांशापासून वेगवेगळीं उत्पन्न झालीं; व

**समस्तेभ्यो रजोंशेभ्यः पंचप्राणादिवायवः ।**
**जायते सप्तदशकमेवं लिंगशरीरकं ॥**

पांच भूतांचे रजांश मिळून पंचप्राण उत्पन्न झाले. याप्रमाणें सतरा तत्वांचें लिंग शरीर उत्पन्न झालें. हा अपंचिकृत पंचमहाभूतापासून झालेला जो लिंग देह तो स्थूल शरीरांत विष्णूचे इच्छावशें उत्पन्न झाला असल्यामुळें या सूक्ष्म देहाचें दैवत विष्णु आहे असें वेदांत लिहिलें आहे. व स्थूल देह हा पंचमहाभूतांपासून ब्रम्हदेवाचे इच्छावशें उत्पन्न झाला असल्यामुळें स्थूल देहाचें दैवत ब्रम्हदेव आहे असें समजावें. अशा प्रकारें स्थूल देहांत लिंगदेह उत्पन्न झाल्याबरोबर जीवानें त्यास भुलून मीच तो लिंगदेह आहें अशा हेतूनें त्या लिंगदेहास आकर्षण करून धरिलें. नंतर त्यास बोलण्याचालण्याच्या क्रिया करितां येऊं लागल्या. नंतर त्या देहाचें रक्षण व्हावें म्हणून तो देहद्वारें अन्नपाणी ग्रहण करूं लागला. नंतर स्त्रीपुरुषांचे ठिकाणीं प्रेम व काम यांची उत्पत्ति होऊन स्त्रीपुरुषांच्या युग्मापासून ईश्वरी नियमानें प्रजा उत्पन्न होऊं लागली. याप्रमाणें सृष्टिक्रम समजावा.

यावरून लक्ष्यांत येतें कीं, जीव हा ईश्वरनिर्मित नसून जीव व ईश्वर हे उभयही मायेपासूनच उत्पन्न झालेले आहेत. या जीवेश्वरोत्पत्तीस वर बरींच प्रमाणें दिलेलीं आहेत व आणखीही कांहीं येथें देतों;

**मायायां प्रतिबिंबं चैतन्यं ईश्वरः**
**अविद्यायां प्रतिबिंबं चैतन्यं जीवः ॥**

मायेमध्यें जें सच्चिदानंद परब्रह्माचें प्रतिबिंब आहे त्यास ईश्वर म्हणावें व अविद्येमध्यें जो प्रतिबिंबित चिदात्मा त्यास जीव म्हणावें. दुसरें प्रमाणः—

**आनंदमय विज्ञानमया वीश्वर जीवकौ ।**
**मायया कल्पितावेतौ ताभ्यां सर्वं प्रकल्पितं ॥**

आनंदमय ईश्वर व विज्ञानमय जीव हे आदिमायेनें ह्मणजे शबलब्रह्मानें काल्पनिक स्वेच्छेंकरून उत्पन्न केले आहेत. नंतर जीव व ईश्वर यांनीं बाकीची सृष्टिरचना केली. मायेपासून जें उत्पन्न झालें तेंही जगच आहे म्हणून जीव, ईश्वर हे जगतापैकींच समजावें. असो, याप्रमाणें जीवेश्वर हे मायोपाधिक असतां त्यास ब्रम्हांश म्हणतात, याचें कारण असें समजावें कीं, जीव व ईश्वर हे परब्रम्हाचीं प्रतिबिंबें आहेत व मायेसच शबलब्रम्ह असें नांव आहे, म्हणून जीव व ईश्वर ब्रम्हाचें अंश आहेत असें म्हणतात. वास्तविक पाहतां ब्रम्ह आहे तसेंच आहे; त्याचा अंश म्हणजे तुकडा झालाच नाहीं. तसाच जीवही ईश्वराचा अंश स्वगतभेदानें म्हणजे शरीराचा तुकडा या न्यायानें नसून तो ईश्वराचा सजातीयत्वानें अंश आहे; म्हणजे जीव व ईश्वर हे एकाच मायेपासून झालेले आहेत. ईश्वर सर्वज्ञ असून त्यास त्याचें जें सत्यस्वरूप परब्रह्म त्याचें आयतेंच ज्ञान आहे व जीव हा सर्व शक्तिमान नसून तो आपल्या सत्य परब्रम्ह स्वरूपास विसरला आहे. ईश्वर मुक्त व ज्ञानी आहे म्हणून ईश्वराच्या उपदेशें जीवास ज्ञान होतें कीं, मी व ईश्वर असे उभयतां एकाच परब्रह्माचीं प्रतिबिंबें आहोंत व परब्रह्म

रूपानें ईश्वर आणि जीव एकच आहे. असें स्वतंत्र आत्मज्ञान जीवास झालें ह्मणजे "ज्ञानीत्वात्मैवमेमतं" या श्रीकृष्ण ईश्वराच्या म्हणण्या-प्रमाणें ज्ञान प्राप्त करून घेतलेला जीव ईश्वराचाही आत्मा ह्मणजे सत्य परब्रह्म स्वरूप आहे असें होतें. असा जीव ज्ञानी झाला ह्मणजे नंतर "ममैवांशो जीव लोके" या गीतेंतील वाक्याप्रमाणें त्या जीवास ईश्वर आपला अंश समजणार नाहीं. परंतु समष्टिरूपी ईश्वर जो 'एकोहं बहुस्यां' अशा कल्पनेनें आकाशाद्वायुः या क्रमानें अन्नात्पुरुषः म्हणजे अन्नापासून देह रूप झाला आहे, त्या देहाच्या आश्रयानें प्रत्येक जीवाचें अहंपण धरणारें ज्ञान राहतें. यामुळें तें अहंपण धरणारें ज्ञान म्हणजे जीव हा समष्टि ईश्वररूप जो देह त्यासच मी असें ह्मणून त्या देहाच्या ह्मणजे समष्टि ईश्वराच्या तो स्वाधीन होतो, आणि आपली स्वतंत्रता विसरतो. त्यामुळेंच त्यास ईश्वराचा अंश जीव अशी पदवी येते. असें जर न होतें तर 'एकोहं बहुस्यां' ह्मणजे मी एकाचा अनेक होईन असें कल्पिणारा ईश्वर जसा आपल्या बद्धमुक्तपणावि-षयीं स्वतंत्र आहे, तसाच प्रत्येक प्राण्याच्या शरीरांतील अहंपण धर-णारा जीव जो चिदाभास तोही आपल्या बद्धमुक्ततेविषयीं स्वतंत्र असता. आणखी यास्थळीं अशी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, जेव्हां हा समष्टि ईश्वर आपल्या पंचमहाभूतात्मक काल्पनिक सृष्टीचा ह्मणजे देहाचा आपल्या निराकार ज्ञानाच्या विचारानें प्रलय करून घेतो, तेव्हां 'अन्नात्पुरुषः या न्यायानें ईश्वर रूप जो देह तोही नाश पावतो. परंतु देहधारी जीवात्मा नाश पावत नाहीं. तो देहधारी जीवात्मा व त्याचें अहंपण धरणारें ज्ञान मागें राहतें; त्याप्रमाणेंच ईश्वराचें-ही अहंपण धरणारें ज्ञान प्रलयरूपी समाधि उत्थान पावली असतां मागें रहातें. नंतर 'तस्मादात्मनः आकाशः संभूतः' या क्रमानें त्या अहंपण धरणाऱ्या ईश्वरापासून ह्मणजे आत्म्यापासून पुनरपि सृष्टि

उत्पन्न होते. त्यामुळें तो ईश्वरच सृष्टि आहे. त्या सृष्टींतील देहास जीव पुनरपि आकर्षण करून देह धारण करितो. याप्रमाणें प्रलयकाळीं सुद्धां अज्ञानी जीवांची पुनर्जन्म फेऱ्यांतून सुटका होत नाहीं.

जीवास जर ईश्वराचा अंश समजणें असेल तर असें समजावें कीं, जसा बापाचा मुलगा हा अंश आहे असें म्हणतात, पण बापाचा व मुलाचा जीवात्मा एक आहे असें समजत नाहींत, भिन्न भिन्न आहे असें समजलें जातें, व फक्त पुत्राचें शरीर मात्र बापाच्या रेतापासून झालें असल्यामुळें पुत्राचा देह बापाचा अंश आहे, जीव नाहीं; असें मानिलें जातें त्याप्रमाणेंच जीवाचें शरीरच समष्टि ईश्वर आहे असें ह्मणावें; पण जीव ईश्वराचा अंश आहे असें म्हणूं नये. जीव ईश्वराचा अंश आहे असें म्हणणेंच झालें तर जीव हा ईश्वराचा सजातीय अंश आहे असें समजावें, किंवा तो प्रतिबिंबांश समजावा. आतां ईश्वर हा जीवाचा पिता आहे ह्मणजे बाप आहे असें ह्मणतात. याचाही भावार्थ असाच आहे. जीवास मीं ब्रह्म आहें असें ज्ञान नसल्यामुळें तो देहासच मी ह्मणतो. देह तर ईश्वरापासून झालेला आहे ह्मणून देहाचाच ईश्वर हा बाप आहे, व तें नातें जीवानें आपणाकडे स्वस्वरूपाच्या अज्ञानामुळें घेतलें आहे असें समजावें.

वर सांगितल्याप्रमाणें जीव व ईश्वर यांचा परस्पर संबंध समजावा; व असेंही समजावें कीं, जीव हा जर आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन देहाध्यास व देहाहंकार सोडून आपण प्रतिबिंबरूपानें मिथ्या आहों व बिंबरूपानें साक्षात् परब्रह्म आहों असें समजेल, तर तो तरून जाण्यास ह्मणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होण्यास स्वतंत्र आहे. या कारणास्तव जीवानें विचार करण्याचें द्वार जें नवद्वारपूर नरदेहरूप नगर त्या नगरांत राहून विचार करून मुक्त व्हावें.

या देहास नवद्वारपुरी असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं,,

शरीरांत नऊ वाटा आहेत, त्या अशा—नरक व मूत्र सोडण्याच्या पोटांतून निघालेल्या दोन वाटा, डोळ्यांतून घशांत उतरलेल्या दोन वाटा, कानांतून घशांत उतरणारीं दोन द्वारें, नाकपुड्यांतून घशांत उतरणारीं दोन द्वारें, व दुसऱ्या जिभेखालच्या व दाढाकडल्या दोन द्वारासहित घशांत मिळालेलें एक मुखद्वार, अशीं नऊ द्वारें या देहाला आहेत. आतां यास पूर म्हणण्याचें कारण असें आहे कीं, या शरीरांत अनेक प्रकारच्या मोठ्या शहरासारख्या चार रचना आहेत. याचा पाया हृदय व फुप्फुस हा होय. यांतील राजमहाल मेंदु व मज्जा तंतु आहे. हृदयाखालील पडद्यांतील पोकळीचे आंतून कर्में करण्याची जागा आहे व मेंदूचे आंतील पोकळींतून विषय जाणण्याची जागा आहे व ह्याचे आंत रक्ताची गंगा वाहत आहे. ह्या गंगेची व्याप्ति स्वर्ग, मृत्यु, पाताळ, म्हणजे डोकें, धड, पाय, या तिन्ही लोकांत आहे. ही नाभिस्थान जें दशदलचक्र त्यांतील व्यापक विष्णुपासून गर्भांत निघाली आहे. ही हृदयकमलांत शिवस्वरूपीं एकदां गुप्त होऊन पुनः त्याच्याही जटेंतून निघाली आहे. अशा ह्या गंगेच्या चौफेर किनाऱ्यावर केशाकर्षण करून शेतकरी आपापलीं कामें करीत आहेत. ही गंगा धक् धक् धक् अशी वाहत असते. तिच्या जलदीच्या अंदोलनाप्रमाणेंच डोळ्यांचे आंत एक अंदोलन डोळे मिटल्यावर दिसत असतें. तें त्या गंगेचें धांवणें आहे. तिला अतिशय पूर आला म्हणजे ती सर्वांचा कोंडमारा करिते; तिला डोळ्यांचे आंत पाहणारा ज्या वेळेस पाहतो त्या वेळेस त्याला अनेक प्रकारचे कफ, वात, पित्ताचे आकृतिरूप सृष्टीचे समुदाय दिसतात. तिला डोळ्यांच्या आंत जो पाहतो, तोच त्या दिसण्याला बरें वाईट म्हणतो, व तो पाहणाराच वर सांगितलेला देहधारी जीवात्मा आहे अथवा देही आहे. त्या दिसण्याला बरें वाईट असें न म्हणतां जो स्तब्धतेनें

साक्षित्वच फक्त करतो तोच ईश्वर, (ऑलमायटी गॉड अथवा होरमज्द, अगर खुदा ह्मणजे खुद्द आपण ) आहे. व त्याचे पोटांत बॅरें वाईट ह्मणत वसलेला तोच दुसरा जीव आहे. त्या जीवालाच सोल, हेरमन, अथवा सैतान अशीं नांवें आहेत. साक्षित्व करणाऱ्या ईश्वरातील जो साक्षित्व न करितां आयता निरंजन आहे तोच निराकार परमात्मा आहे. त्यालाच पवित्र आत्मा असें ह्मणावें. इतर पुष्कळ ठिकाणीं आत्मा हा शब्द जीवास व ईश्वरासही लावितात. अशा वेळीं आत्मा ह्मणजे शबल ब्रम्ह अगर माया असें समजावें. परंतु कित्येक ठिकाणीं आत्मा या शब्दाचा अर्थ परब्रम्ह असाही घेतात. या परब्रह्मास पाहणें झालें तर लक्ष्य व लक्षिता हे भाव सोडून पाहावें. असो, याप्रमाणें या नव-द्वारपुराचें विवेचन समजावें.

आतां कोणी अशी शंका काढील कीं, ईश्वरानें जर ' एकोहं बहुस्यां ' ह्मणजे मी एकाचा अनेक होईन अशी इच्छा धरून तो जगद्रूपास व देहरूपास आला नसता तर जीवास देहाचें बंधन प्राप्त झालें नसतें. आयताच तो देहविरहित राहिला असता. मग जीवास अशा तऱ्हेच्या मुक्ततेकरितां खटपट करावी लागली नसती. यावर समाधान असें द्यावें कीं, जशी दोरी मला सर्प मानून भ्या असें ह्मणत नाहीं. पण लोकच रज्जूचे अज्ञानामुळें तिला सर्प मानून भितात, हा रज्जूचा अपराध नसून मनुष्याच्या अज्ञानाचाच अपराध आहे; तसेंच जीव हे विभु जो ईश्वर त्याला ईश्वर न मानून पंचभूत-रूप मानितात व त्याच्याच पंचभूत मानलेल्या भासरूपी शरीराला मी शरीर आहें असें मानून जन्ममरणाचें भय धरून पापपुण्य करितात. ह्याचें कारण ईश्वर नसून, जीवच आपल्या जीवस्वरूपाची म्हणजे आपल्या मिथ्यारूपी अस्तित्वाची ओळख सोडतात हेंच आहे. जीवाचें अज्ञानच देह धरण्यास कारण आहे. ईश्वर कोणाला पापपुण्य

करण्यास अगर शरीर धारण करण्यास लावीत नाहीं; अज्ञानी रहा असे ह्मणत नाहीं, व अज्ञानी होण्याचें कारणही उत्पन्न करीत नाहीं. कारण अज्ञान हें कारणाचें कार्य नसून हें किरणाहून पृथक् असणाऱ्या मिथ्या मृगजलाप्रमाणें स्वयंभूच आहे. म्हणून हे अज्ञान ज्याचें त्यानेंच नाहींसें केलें पाहिजे. परंतु जीवांस आपणांस आपलें अज्ञान दूर करण्याचें स्मरणरूपी अगर ज्ञानरूपी साधन प्राप्त करून घेतांच येत नाहीं. हें जाणून ईश्वरास त्याची दया आली आणि त्यानें जीवांचा उद्धार व्हावा ह्मणून व त्यांस ज्ञानामृत पाजून साधन करण्याकरितां राम, कृष्ण, वराह, मच्छ, कच्छ, वामन, परशराम, नारसिंह, बौध्य, कलंकी, शेषशायीनारायण, श्रीविठ्ठल, दत्तात्रय, कूर्म, हनुमान, इत्यादि अनंत अवताररूपी लीलाशरीरें धारण केलीं व जीवास बोध केला. ह्मणून ईश्वर हा जीवाचा सद्गुरु आहे. करितां जीवांनीं ज्ञानप्राप्तीकरितां ईश्वरास भजावें हें उत्तम आहे.

ईश्वरानें जगाच्या उद्धारार्थ इच्छामात्रें प्रथम विष्णुचा अवतार धारण केला. नंतर त्यानें प्रथमतः ब्रह्मदेवादिक ऋषीस ज्ञानाचा बोध केला, व ब्रह्मदेव आणि विष्णु या उभयतांचे दरम्यान जो ज्ञानसंबंधीं संवाद झाला तोच वेद आहे. वेद या शब्दाचा अर्थ ज्ञानाचा संवाद असा आहे. हें ज्ञान स्वयंभूच ईश्वराचे अंगीं असल्यामुळें या ज्ञानास ह्मणजे वेदास अनादि असें म्हणतात. हा वेद ईश्वरप्रणित ह्मणजे ईश्वरानें सांगितलेला आहे ह्मणून तो मनुष्यप्रणीत नाहीं. ब्रह्मदेवादिक ऋषींनीं हें ज्ञान प्राप्त करून घेण्याचें मार्ग ग्रंथांत लिहून ठेविले आणि त्या ग्रंथासही वेद असेंच नांव दिलें. जरी ग्रंथ मनुष्यांनीं लिहिले तरी त्यांतील वेद म्हणजे ज्ञान हें मनुष्यप्रणीत नाहीं म्हणून वेद अनादि म्हणतात हेंच बरोबर आहे. वेदास अनादि म्हणण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, वेदरूपी ग्रंथ हा दुसऱ्या

कोणत्याही ग्रंथाधारें रचिलेला नाहीं. वेदास दुसरा ग्रंथ आदि नाहीं सबब तो अनादि आहे हेंच सिद्ध झालें. हे वेद चार आहेत. त्यांचीं नांवें–ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वण वेद. वेद चार आहेत ह्मणजे त्या ग्रंथांतील वेद ह्मणजे ज्ञान हें चार प्रकारचें आहे असें समजूं नये. चारी विभागांत ह्मणजे चारी वेदांत ज्ञान एकच आहे. एकच वेद चार प्रकारें लिहिला आहे. जसें एकच शरीर पण त्यास निरनिराळीं अवयवें आहेत तसाच वेद एकच पण त्यास निरनिराळीं नांवें आहेत. वेदाचे ग्रंथ चार आहेत. त्या चार ग्रंथास, अवयवास जसें वेगवेगळें नांव आहे, तसें वेगवेगळें नांव दिलेलें आहे असें समजावें. प्रत्येक वेदांत ज्ञान सांगण्याचे शब्द जरी भिन्न आहेत तरी लक्षांश एकच आहे. जसें सोनें एक परंतु अलंकार भिन्न भिन्न असतात, त्याचप्रमाणें वेद एक, पण त्याचे चार वेदरूपी अलंकार भिन्न-भिन्न आहेत. जसें मनुष्यास दोन डोळे असण्याच्या योगें मनुष्याचा निर्वाह चालतो व एक असला तरीही चालतो तसेच चार वेद व एक वेद यांची तऱ्हा समजावी. सामवेद गायन सुरांत बसविलेला आहे त्याचा गाऊन उपयोग करावा. नंतर कथेकऱ्याप्रमाणें त्याचा अर्थ सांगावा, अशा अर्थानें रचिला आहे. परंतु सध्याची प्रजा संस्कृत भाषेविषयीं अगदीं अज्ञानी निपजली असल्यामुळें तिला या सामवेदाचा उपयोग वाटत नाहीं. जर लोक संस्कृत शिकून तयार होतील व सामवेद गायन सुरांत बसवून त्याचा अर्थ जाणतील, तर त्यांस सध्याचीं नाटकीं पदें ठुंबऱ्या, ख्याल व बीभत्स श्रृंगार ज्यामध्यें आहे अशीं गाणीं गाण्याचें व आपला व्यर्थ काळ खर्चिण्याचें योग्य वाटणार नाहीं. असो. वेदाचे आणखी तीन भाग केले आहेत. त्यांचीं नांवें, कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड. ज्या वेदरूपी ग्रंथाच्या भागांत कोणत्याही श्वासवान जीवास मारूं नये, वनस्पती खाऊन निर्वाह करावा, परमेश्वरानें वेळो-

वेळीं जगास बोध करण्याकरितां जे युगानुयुगीं अवतार घेतले त्या अवतारांचीं नामें जपावीं, त्यांच्या तसबिरीप्रमाणें स्मारकासाठीं करून ठेविलेल्या नाना धातूंच्या प्रतिमेचें म्हणजे मूर्तीचें यथासांग पूजन करावें, स्नान करते वेळीं, भोजनाच्या वेळीं परमेश्वराचे स्मरण ज्यामध्यें आहे असे मंत्र जपावे, इंद्रियें जिंकावीं, स्नानसंध्यादिक कर्में निष्कामभावानें मनःशुद्ध्यर्थ करावीं इत्यादि कर्में करावयास सांगितलीं आहेत त्यास कर्मकांड म्हणावें; व नित्य मनामध्यें बाळगावें कीं, हें सर्व विश्व भासमात्र असत्य आहे, व एक परमात्माच सत्य आहे. आपल्या अंतःकरणानें परमेश्वर निराकार सर्वत्र आहे असें मानून तोच आपलें आत्मस्वरूप आहे असें समजावें, मनोमय अवतार धारण करणाऱ्या ईश्वराचें ध्यान करावें, निराकार परमात्म्याचे अस्तित्वांत परमाणुजन्य सृष्टीचें अस्तित्व मुळींच नाहीं, असें ध्यानांत धरून निराकार परमेश्वराची अनन्यभावें उपासना करावी इत्यादि ज्या वेदाच्या भागांत सांगितलें आहे त्यास उपासनाकांड म्हणावें. तसेंच शरीरांतील प्राणवायूस हलवून अंतःकरणाधारें मनोमय मी मी असें स्फुरण करितां येतें, त्या स्फुरण धरणाऱ्या अज्ञानातीत मी शरीराचे आंत व बाहेर जी पोकळी आहे असें भासतें त्या पोकळीचे आंत अचंचल निराकार परमात्मा स्वतः सिद्ध ज्ञानवान साक्षित्वातीत आयताच अद्वितीय आहे अशा अनुभवानें रहावें असें ज्या भागांत सांगितलें आहे त्यास ज्ञानकांड म्हणावें. या ज्ञानकांडाप्रमाणें ज्याची बुद्धि अद्वैत स्वरूपीं शांत झाली त्या प्राण्यास मोक्ष नको ह्मणत असतांही प्राप्त होतो; व पापपुण्याच्या क्रियेचें फळ भोगण्याचें साधन जे पुनर्जन्म देहधारण, तेंही प्राप्त होत नाहीं. करितां मनुष्य प्राण्यांनीं या वेदांतील तीन कांडांप्रमाणें आचरण ठेवावें. वेदास ईश्वरप्रणीत समजून तो मानवकृत नाहीं, मनुष्याच्या शरीरांतील साक्षी ज्ञानासही

वेद ह्मणतात हें लक्षांत ठेवावें व वितंडवाद करीत राहूं नये. वेदांतील वाक्यांस श्रुति असें नांव आहे. वेदास अनुसरून श्लोकबद्ध रचलेलीं वचनें अगर ईश्वरी आज्ञा ज्यांत लिहिल्या आहेत त्यांस स्मृति असें म्हणतात. याशिवाय आणखी पुरातन कथा ज्यामध्यें वर्णिल्या आहेत त्यांस पुराणें ह्मणावें. हीं पुराणें अठरा आहेत. वेदप्रतिपाद्य धर्मांतील नीति कळण्याकरितां रचलेलें धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, पूर्वमिमांसा, न्यायशास्त्र, योगशास्त्र, व वेदांतशास्त्र अशीं सहा शास्त्रें आहेत. हीं शास्त्रें व साधुसंतांनीं जीवांस ज्ञान व्हावें ह्मणून रचिलेले अनंत ग्रंथ इत्यादि सर्व निराकार परमेश्वराविषयींचे अज्ञानावरण दूर करण्याकरितांच आहेत म्हणून या सर्वांचा उपयोग आहे असें समजून त्यांत सांगितलेल्या रीतीनें प्राण्यांनीं वर्तन ठेवावें हें योग्य आहे.

हे अज्ञानी जीवहो, तुह्मांवर ईश्वराचे केवढे उपकार आहेत कीं, तो युगानयुगीं जीवाचे उद्धारार्थ अवतार धारण करितो. पहा श्रीकृष्ण भगवान् श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मणतात:—

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

ज्यावेळीं जीवांस आपलें कल्याण कळत नाहीं असें होतें व ते स्वकल्याणाचा मार्ग सोडून दुष्कृत्यें करितात तेव्हां त्यांना शासन करून सत्य धर्म दाखवून त्यांचें व साधुसंतांचें रक्षण करण्याकरितां प्रत्येक युगाचे ठिकाणीं मी अवतार धारण करितों. आतां साधूंचें रक्षण व दुष्टांचा नाश परमेश्वर स्वतःच येऊन करितो असें नाहीं. एका दुष्ट राजावर दुसरा दुष्ट राजा घालून त्यांचा परस्पर भांडून नाश झाला ह्मणजे तिसरा चांगला सुष्ट राजा उपजून तो धर्माचरणशील होऊन राज्य चालवितो. अथवा साधूंच्या अंगांत ईश्वर प्रवेश करून त्यांच्या वादविवादाच्या द्वारें, तसेंच उपदेशाचे द्वारें, अगर सगुण

भक्तांना साक्षात्कार देऊन भक्तीच्या लालसीनें, तो धर्मरक्षण करितो असें समजावें. इतक्याही उपायानें जर दुष्टांचा नाश झाला नाहीं व धर्माची ग्लानि होत गेली, तर तो स्वतःच रामकृष्णासारखे अवतार धरून दुष्टांचा नाश करितो. याप्रमाणें वेदप्रतिपाद्यधर्माचा रक्षण करणारा ईश्वरच असल्यामुळें हा धर्म बाटे लोकांच्या उपदेशामुळें बुडेल असा नाहींच नाहीं. याप्रमाणें सृष्टीचें रक्षण करणारा जो ईश्वर आहे तो चार युगें एक हजार वेळ जाईपर्यंत सृष्टीचा कारभार चालवून कल्पांतीं सर्व सृष्टीचा आपल्या निद्रेच्यायोगें म्हणजे तमोगुणी जो शंकर त्याच्याद्वारें प्रळय करितो. तो असाः—पंचमहाभूतांचे परमाणु होऊन ते आकाशांत प्रथम उडून जातात. नंतर तें आकाश म्हणजे ईश्वराची कल्पना, ईश्वर आपल्या निद्रेंत नाहींशी करितो. असा प्रळय झाला तरी जीव अमरच असल्यामुळें ते आपल्या स्मरणरूप देहाध्यासासुद्धां झोंपेसारख्या अवस्थेंत समष्टी ईश्वराच्या पोटांत राहतात; नाश पावत नाहींत. अशा प्रळय काळरूपी सुषुप्ति अवस्थेंत बीजवत् सर्व जीव एक कल्पकाळ लोटेपर्यंत राहतात. नंतर समष्टी ईश्वराच्या पोटांतून म्हणजे कल्पनेंतून अगर प्रकृतींतून रजोगुणरूपी ब्रम्हदेव उत्पन्न होतो. तो ब्रम्हदेव म्हणजे ईश्वराचा अयोनिसंभव मानसपुत्र आहे. तो सर्व अव्यक्त झालेले परमाणु जमवून त्यांची पूर्ववत् अनंत ब्रम्हांड गोलरूपी सृष्टि रचना करितो. तींत शरीररूपी पिंजरे तयार झाले म्हणजे जीवांच्या वासनात्मक लिंगशरीरांतून पुण्यपापरूपी भोगदेह आपोआप स्वप्नदेहवत् निर्माण होतात, व ते ज्या जीवाचे त्या जीवापुढें अचुक उभे रहातात. पुण्यपापाचे भागापैकीं जो भाग अधिक असेल त्या भागाप्रमाणें तो जीव उंच नीच म्हणजे मनुष्यदेह अथवा पशु देह या देहांत प्रवेश करितो; व बाकीच्या राहिलेल्या पापपुण्याप्रमाणें त्यांस विषयांची प्राप्ति व केलेल्या पापाचें भोग त्या त्या शरीरांत प्राप्त होतात. इतकी घडामोड झाली

तरी जीवांस कांहीं माहीत नसतें. त्यांना वाटतें कीं, आम्हीं नुकते झोंपेंतूनच जागे झालों आहों. देह प्राप्त होण्याबरोबर त्यांस पुर्वजन्माचें स्मरण राहत नाहीं. हा अनुभवच आहे ह्मणून या गोष्टीविषयीं संशय मुळींच नको.

अशा प्रकारें सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, व लय होतो. हा उत्पत्ति, स्थिति व नाश अनंत कालापासून असाच चालत आलेला थोडक्यांत सांगितला. तथापि या स्थलीं पुष्कळ महत्वाच्या गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत; परंतु त्या ग्रंथविस्ताराचे भयास्तव सांगितल्या नाहींत.

ज्याप्रमाणें तेज तत्वापासून उष्णता उत्पन्न होते व ती तेजतत्वापासून उपाधीयोगें ह्मणजे वायूचे आघातांचे योगें तेजतत्वाहून भिन्न भासते, त्याप्रमाणेंच परब्रह्मापासून माया उत्पन्न होऊन ती परब्रह्माच्या अस्तित्वरूपी प्रकाशामुळें दृश्य होते असें समजावें. तेज तत्वापासून विद्युल्लता व प्रकाश उत्पन्न होऊन तात्काळ तो प्रकाश व विद्युल्लता अदृश्य होऊन पुनः अव्यक्त तेजतत्वरूपानेंच अंतीं राहतात व दृश्य होत नाहींत. त्याप्रमाणेंच परब्रम्हापासून मायारूपी विद्युल्लता उत्पन्न होऊन कांहीं वेळ स्वतंत्रपणें जगद्रूपानें दृश्य होऊन पुनः ती माया आपल्या विश्वरूपी कार्यासह नाश पावून अंतीं परब्रह्म रूपानेंच उरते; ह्मणजे अंतीं ही माया राहतच नाहीं असें समजावें. जसा वट बीजामध्यें अनुद्भूत वटवृक्षाकार गुप्त असतो ह्मणूनच तो वृक्षरूपास येतो व पुनः तेंच बीज वृक्षाच्या पोटीं जन्म घेतें व जन्मांतीं आपल्या सूक्ष्मरूपांत गगनाकार वृक्षरूप गुप्त करून घेऊन तुटून पडतें त्याप्रमाणेंच ही माया अथवा शबलब्रह्म जगद्रूपी वृक्षास जन्म देऊन त्या जगद्रूपी वृक्षाच्या पोटीं पुनः आपणच उदयास येऊन जगदूरूपी वृक्षाचा आकार घेऊन प्रळयान्तीं बीजरूपानें ह्मणजे ब्रह्मावर आभास रूपानें राहतें. हें मायेचें अंतींचें अस्तित्वच स्फुरण

आहे. जर मायेचें अस्तित्वच स्फुरण रूपानें आहे असें ह्मटलें, तर ब्रह्मीं स्फुरण होऊन न झालें असें जें वेद आदिकरून ग्रंथांत लिहिलें आहे त्याचा भावार्थ तरी हाच आहे, म्हणजे परब्रह्मीं स्फुरणच झालें नाहीं असा आहे. परंतु ही माया अज्ञान्यांस अज्ञानांधकारामुळें आहे अशी भासते. वास्तविक मायेचा जर जन्मच वांझ आहे तर तिची स्थिति व लय हेहीं वांझच ह्मणजे खोटे असले पाहिजेत असें सिद्ध झालें. असो, आत्म्याचा अपरोक्षानुभव आल्याखेरिज मायेचें मिथ्यत्व अनुभवास येणें अति दुर्घट आहे. असें जाणून मायेचें रूप लक्षांत येण्याकरितां एक दृष्टांत देतों त्यावरून मायेचें स्वरूप लक्षांत घ्यावें.

आपणांस निद्रा येते पण आपणांस आपण येतों असें नाहीं. ज्या अर्थीं आपण आयतेंच स्वयभू आहों, त्या अर्थीं आपलें येणें जाणें खोटें आहे. त्याप्रमाणेंच ब्रम्हास मायारूपी स्फुरण येतें पण ब्रम्हास ब्रम्ह येत नाहीं ह्मणजे ब्रह्माचा ब्रह्माला कधींही वियोगच नाहीं. आपणांस निद्रा येते ह्मणूनच ती निद्रा आपणांस सोडून जाते. त्याप्रमाणेंच ब्रम्हीं माया उत्पन्न होतें म्हणूनच ती लयास जाते. जशी निद्रा लयास गेल्यानें आपण लयास जात नाहीं त्याप्रमाणेंच मायेचा नाश झाल्यानें ब्रम्ह नाश पावत नाहीं. जशी निद्रा चंचळ असून आपण निश्चळ आहों, त्याप्रमाणेंच माया चंचळ असून ब्रम्ह निश्चळ आहे. जसें निद्रेस आधार आपण आहों त्याप्रमाणेंच मायेस आधार ब्रह्म आहे. जशी आपणाशिवाय निद्रा इतर ठिकाणीं अनुभवास येत नाहीं त्याप्रमाणेंच माया ब्रह्मास सोडून इतर ठिकाणीं अनुभवास येत नाहीं. जशी निद्रा आपणांस एकदेशी भासते, सर्वत्र प्रचितीस येत नाहीं, त्याप्रमाणेंच माया एकदेशी असून ब्रह्म सर्वदेशी आहे. जशी निद्रा आपणांहून भिन्न स्थळीं दिसत नाहीं तशी मायाही ब्रह्माहून भिन्न भासत नाहीं. जशी निद्रा आपणांहून अगदीं भिन्न आहे तशी मायाही परब्रह्माहून अगदीं भिन्न आहे.

जशी निद्रा आपणांस जाणत नाहीं तसें परब्रह्महि मायेस जाणत नाहीं. जशी निद्रा आपल्या जवळ असतां सतत आपली व तिची भेट होत नाहीं तशी परब्रह्मीं माया असतां परब्रह्माची व तिची भेट होत नाहीं. जसा निद्रेचा अपरोक्षानुभव घेण्यास आपण निद्रारूपच झालें पाहिजे त्याप्रमाणेंच मायेस अगर मायानिर्मित जीवांस परब्रह्माचा अपरोक्ष अनुभव घेणें असेल तर परब्रह्मच झालें पाहिजे. जसें निद्रारूप आपण झालों ह्मणजे आपण निद्रेस जाणत नाहीं त्याप्रमाणेंच परब्रह्म आपण झालों ह्मणजे मायेस जाणत नाहीं. जसा निद्रेचा अंमल आपणांवर बसत चालला ह्मणजे कांहीं सांगितलें तरीं व्यर्थ जातें त्याप्रमाणेंच मायेचा अंमल ह्मणजे अज्ञानावरण ज्यास आहे त्यास कितीही सांगि-तलें तरी व्यर्थ होतें. जशी निद्रा व आपण एकरूप झालों ह्मणजे निद्रेस आपणासारखेंच दुसरें स्वाप्निकरूप निर्माण करण्याची शक्ति येते तशी माया व ब्रह्म यांची एकरूपता झाली असतां मायेस निराकार परब्रम्हासारखेंच शबलब्रह्म ह्मणजे मिथ्या ब्रह्म अगर समष्टी ईश्वर उत्पन्न करितां येतो. जशी निद्रेस स्वाप्निक सृष्टि व स्वाप्निक अनंत जीव अगर प्राणि स्वप्नांत उत्पन्न करितां येतात, त्याप्रमाणेंच मायेसही एकाच समयीं म्हणजे अल्प काळांत अनंत जीव व अंनत ब्रम्हांडें उत्पन्न करितां येतात.

जसा आपला स्वाप्निक देह व स्वप्नांतलि अनंत जीव हे परस्पर सजा-तीय आहेत त्याप्रमाणेंच एक ईश्वर व अनंत जीव एक जातीचे आहेत. जसें स्वप्नांतील स्वाप्निक पुरुषास निजलेल्या सत्यदेहधाऱ्याची आठ-वण होते व त्या जागृतावस्थेंत अनुभवास येणाऱ्या आपल्या सत्य-देहाचा अहंकार नित्य स्वप्नावस्थेंत असतो तसेंच ईश्वरास त्याचा सत्य-देह जो निराकार परब्रह्म त्याचें ज्ञान व मी ब्रह्म असा ब्रह्माध्यास आ-यताच आहे. जसें स्वप्नांतील अनंत प्राण्यांस जागृतावस्थेंत अनुभवास

येणाऱ्या सत्यदेहाचें स्मरण नसतें. त्याप्रमाणेंच माया व ब्रम्ह या उभयतांच्या दरम्यान उत्पन्न होणारे जे अनंत जीव त्यांना परब्रम्हाचें ईश्वराप्रमाणें आयतें स्मरणरूप ज्ञान नसतें. ते जन्मतःच अज्ञानी आहेत. जशी निद्राच काल्पनिक एक पुरुष व अनंत जीव व अनंत ब्रम्हांडें उत्पन्न करून त्या अवस्थेंत कांहीं वेळ राहून पुनः तीच निद्रा लागलीच जागृतावस्थेंत येतें व स्वाप्निक सृष्टीच्या जातीच्या स्थूल सृष्टीचा अनुभव स्पष्ट घेतें, त्याप्रमाणेंच माया ही प्रथम काल्पनिक एक ईश्वर व अनंत जीव व अनंत ब्रम्हांडें उत्पन्न करून नंतर पुनः तशाच जातीची स्पष्ट स्थूल सृष्टि उत्पन्न करिते. जशी निद्राच स्वप्नावस्थेचे रूपास येऊन स्वप्न सृष्टींतील प्राण्याच्या रूपानें सुखदुःख भोगून स्वप्नांतून पुनः परत निद्रेंत न जातां स्वप्नकाळानंतर जागृतावस्थेप्रत येते, ( स्वप्न पडलेल्या मनुष्यास पुनः किंचित् जागे झाल्याखेरीज निद्रा येतच नाहीं ) त्याप्रमाणेंच माया हीच सृष्टिरूपास आलेली आहे. म्हणूनच सर्व मायावी ह्मणजे खोटें आहे असें म्हणतात. व या कारणास्तवच या प्रकरणास विश्वाभास असें नांव दिलेलें आहे. असो. जशी निद्रा हीच जागृतावस्थेचे रूपास येऊन नंतर तीच पुनः निद्रेचें स्मरण करिते त्या प्रमाणेंच माया ही जीव व ईश्वर या रूपांस येऊन पुनः आपले मायारूपाचें स्मरण करीते व आपण क्षणिक आहों असें जाणते. ज्याप्रमाणें निद्रेला कधींही निजलेल्या माणसाचें स्मरण होत नाहीं परंतु निद्रेच्या पोटीं उत्पन्न होणाऱ्या स्वप्नांतील पुरुषास मात्र त्या निजलेल्या सत्य देहाचा अभिमान असतो व आपण एक व निजलेला एक असें द्वैतरूपीभान न ठेवितां अद्वैत रीतीचें स्मरण असतें, त्या प्रमाणेंच मायेस परब्रम्हाचें केव्हांही स्मरण व ज्ञान नसून तिचे पोटीं उत्पन्न होणारा पुरुष जो ईश्वर त्याला मात्र परब्रह्माचा अभिमान व

व अद्वैतस्मरण चिरकाल असतें. निद्रेस जसें मी निद्रा आहें असें ज्ञान नसतें तसेंच मायेसही मी माया आहें असें ज्ञान नसतें. ह्मणूनच मायेस व निद्रेस जड असें ह्मणतात. जशी निद्रा निजलेल्या माणसाचे ठायीं स्वप्नसृष्टि उत्पन्न करिते व त्या वेळेस जसा निजलेला त्या स्वप्नसृष्टीस अगर आपल्या स्वप्नदेहास ओळखत नाहीं अगर जाणत नाहीं तसेंच परब्रह्मही त्याचे पोटांत मायानिर्मित असलेल्या सृष्टीस तीस जाणत नाहीं. तें जसें सृष्टीस सृष्टीचे अस्तित्व असतां जाणत नाहीं तसेंच तें सृष्टीचे नाशांतींही तिचे नाशासही जाणत नाहीं. या कारणामुळेंच परब्रम्हास निर्विकल्प, निरंजन असें ह्मटलें आहे.

एवढा वेळ मायेची व आपल्या निद्रेची तुलना केली, तशीच परब्रह्माची व आपलीही तुलना केली. या गोष्टींचा विचार या स्थळीं लक्षांत ठेविला पाहिजे तो असा; मनुष्याची निद्रा व माया ह्या दोन नाहींत. त्या कशा म्हणाल तर सांगतों. जशी आपल्या निद्रेच्या पोटीं स्वप्नांत दुसरी निद्रा उत्पन्न होऊन त्यांत आपण निजतों अगर स्वप्नांतील इतर प्राणि झोंपी जातात, त्याप्रमाणेंच मायेच्या पोटीं ही निद्रारूपी तिची कन्या अगर छोटी माया उत्पन्न झालेली आहे. मनुष्याची निद्रा ही पिंडींची माया होय व जगत् उत्पन्न करणारी ही ब्रह्मांडांतील बडी माया होय. ही बडी माया ब्रम्हदेवादिकांची निद्रा आहे व छोटी निद्रारूपी माया अज्ञानी जीवाकरितां आहे. असें जरी आहे तरी बड्यामायेचेंच निद्रा हें अविद्यात्मक रूप आहे असें समजावें. ही बडी माया विश्वाची उत्पत्ति स्थिति, व लय करिते व आपली निद्रा ही जागृत, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्थांची उत्पत्ति स्थिति व लय करिते. पिंडामधील निद्रेचें स्वरूप आपण जसें समजतों त्याप्रमाणेंच मायेचें स्वरूप लक्षांत आणावें. ही मायाच, अनंत ब्रम्हांड गोल रूपांस, नाना शरीर रूपांस, जीवेश्वर रूपांस, शरीरांतील अंतःकरणरूप जाणीव

रूपास आली असून तीच जागृत, स्वप्न, सुषुप्ति इत्यादि अवस्थारूपं होऊन क्रिया करणें अगर न करणें इत्यादि सर्व व्यापार करिते. या प्रमाणें माया व आपली निद्रा एकरूप झाली; कारण ब्रम्हांडांत आपला देह आला; तेव्हां पिंडाचीं निद्रा हीच माया झाली. आतां बाकी राहिलों आपण व परब्रह्म. पिंडीची निद्रा व माया ही जर उभयतां एकच अद्वितीय आहेत, तर आपण जे निद्रेस आधार असणारे ते, व मायेस आधार असणारें जें परब्रह्म तें, एकच कां नसावें? अर्थात् आपल्या ठिकाणीं असणाऱ्या जागृदादि अवस्था जर मायेच्या ठरल्या तर आपण अवस्थातीत निरंजन परब्रम्हच आहों असें ठरलें. जर परब्रम्हच आपण निर्विकल्प आहों तर त्या आपल्या निरंजन स्वरूपांत माया मुळींच नाहीं व तिचें सृष्टिरूप कार्य-ही नाहीं असें सिद्ध झालें.

या स्वानुभविक दृष्टांतावरून ज्ञात्यांनीं मायेचें स्वरूप व तिची सत्यता लक्षांत आणावी. आतां अशी शंका कदाचित् येईल कीं, जर जीव व ईश्वर हे दोघेही मायिक म्हणजे मिथ्या आहेत तर बंधन कोणास झालें होतें व तुम्ही जें ज्ञान सांगता तें कोणास? तसेंच, जर सर्वच मिथ्या आहे तर वेदादिकरून ग्रंथांमध्यें केलेल्या उपदेशाचें फळ काय? कारण त्यांचा उपदेश व ते मिथ्याच आहेत. याचें उत्तर असें समजावें कीं, स्वप्न खोटें व स्वप्नांतील सुखदुःख भोगणारा पुरुषही खोटाच आहे. तसाच स्वप्नांतील पुरुषास संकटांतून सोडविणारा मित्रही खोटाच आहे; व संकट आणि संकटांतून सुटणें हेंही खोटेंच आहे. परंतु त्या खोट्या स्वप्नांत संकटीं सांपडलेला जो आहे त्यास त्या खोट्या मित्राचाच उपयोग होतो व त्याच्या मदतीनें तो संकटांतूनही मुक्त होतो. त्याप्रमाणेंच येथेंही समजावें. आपला देह परमाणूंचा झालेला आहे व अंतीं त्याचे परमाणु होऊन उडून जातात हें खरें आहे. परंतु हा विचार करणें तो मात्र परमा-

णुरूप देह आहे तोंपर्यंतच करावयाचा. देहाचे परमाणु होऊन उडून गेले म्हणजे हा विचार करितां यावयाचा नाहीं. त्याप्रमाणेंच माया मिथ्या आहे व आपणही मायिकच मृगजलवत् आहों, हा विचार जों-पर्यंत माया आहे व तिचें कार्यरूप आपण आहों तोंपर्यंतच करा-वयाचा. हा विचार जीवाच्या नाशांतीं म्हणजे ज्ञानानें जीव मुक्त झाल्यानंतर करावयाचा नाहीं. जर सृष्टि दिसत आहे, भासत आहे, व सुखदुःख होत आहे येवढ्या कारणावरून मायेस अगर सृष्टीस मिथ्या म्हणतां येत नाहीं, तर मग गारुडी ऐंद्रजालिक विद्येनें नाना पदार्थ उत्पन्न करितो ते आपणांस दिसतात त्यांस मिथ्या कां म्हणावें ? जर गारुड्याचें गारुड खोटें आहे तर माया व तिचें कार्य जें, तेंही खोटेंच असलें पाहिजे. जसें काळोखाचे ठिकाणीं आकारी भलें मोठें पिशाच्च दिसतें पण तें खोटें आहे, तशी मायाही दिसत असून खोटी आहे. असो. आत्म्याचा अनुभव आला असतां सत्य व मिथ्या दोन्हीही प्रतीतीस येत नाहींत. करितां ज्यास मायेचे फेऱ्यांतून सुटावयाचें असेल, त्यानें आत्मज्ञान प्राप्तीचाच उद्योग करावा. शंका अगर कल्पना हीच माया आहे. कल्पना टाकिली असतां शंकाच राहत नाहीं, मग वाद कोठचा ?

मागें जें ईश्वराचें रूप सर्वाकाशस्थानापन्न सांगितलें तेंच पुरुष आहे असें समजावें; व ज्यामध्यें तो प्रतिबिंबरूप ईश्वर आहे त्यासच माया अगर प्रकृति ह्मणावें. या ईश्वरापासून पंचभूतें व त्रिगुण यांची उत्पत्ति झालेली आहे तीच अष्टधाप्रकृति होय. वायूमध्यें जें जाणी-वरूप आहे तेंच ईश्वर अथवा पुरुष समजावा, व वायु हीच माया अगर प्रकृति आहे असें समजावें. ही प्रकृति व पुरुष मिळून जें रूप होतें त्यासच मूळमाया किंवा साम्यप्रकृति असें ह्मणावें. वायूच्या अंगीं जाणीव आहे. त्या जाणीवेचे अंगीं आकर्षण शक्ति आहे. त्या आक-

र्षणशक्तीनेंच अनंत ब्रह्मांडें व त्यांतील अनंत जीवांचीं अनंत शरीरें आकर्षण करून धरिलीं आहेत. वायूचे पोटांत सर्वाकाश-स्थानीं व्यापक असें निराकार तत्व आहे तें आपल्या अनुभवास येत नाहीं. याचें कारण सर्व स्थळीं जीवाचें अस्तित्व नाहीं हेंच होय. जीव ह्मणजे चिदाभास; हा साडेतीन हात देहांत आहे. त्यास पिंडांतील तत्वें मात्र अनुभवास येतात. 'यत्पिंडे तत्ब्रह्मांडे' या न्यायानें जें तत्व ब्रह्मांडांत आहे तेंच तत्व मनुष्याचे शरीरांतही आहे. ह्मणून शरीरांत ईश्वर व त्याची आकर्षणशक्तिही आहे. याचा विचार असा आहे कीं, आपल्या शरीरांत प्राणवायु आहे. त्या प्राणवायूच्या अंगीं ह्मणजे प्राणवायूंत अंतःकरण-रूपी ईश्वर आकाशतत्व आहे. हाच साक्षि पुरुष समजावा. त्या साक्षी समष्टि ईश्वराच्या पोटांत चिदाभास ह्मणजे ज्ञानासारखा व प्रकाशासारखा भासणारा अज्ञानी जीवात्मा आहे. तोच सुखदुःखाचें साक्षित्व करितो. ईश्वर त्याच ठिकाणीं सुखदुःखाच्या स्मरणविस्मरण भावांतीत आयता जीवाचेंही साक्षित्व करणारा आहे. ह्मणून ज्या वेळेस सुखदुःखाचें भान असतें अशा वेळेस जीवदशा अनुभवावी. ज्यावेळीं तो जीव मी सुखदुःखास जाणणारा सुखदुःखाहून वेगळा साक्षि आहे असें समजतो, व सुखदुःखास स्मरणारीं जी मनादिक इंद्रियें त्यांचा त्याग करून झोंपेसारख्या अवस्थेंत शांत रहातो, त्या वेळीं तो ईश्वरासारखा सुखदुःखाच्या साक्षित्वातीत असतो. तोच जीव संकल्पविकल्पांस सोडून राहिला ह्मणजे पुढें ईश्वराच्या अष्टधाप्रकृतीच्या साह्यानें ह्मणजे अंतःकरणपंचकाच्या साह्यानें जाणतो कीं, मी मिथ्या आहें व माझा जो स्वमिथ्यत्वाचा अंत तोच निराकार परब्रम्ह आहे. अशा प्रकारें अंतःकरणपंचकरूप ईश्वराच्या साह्यानें जाणून निरंजनाचा ध्यास करितो. नंतर तो ध्यास सोडून ह्मणजे कल्पनारूप

प्रकृतीस व तिचें मीपणरूपी स्फुरणास सोडून निर्विकल्प राहतो. या प्रकारें सद्गुरुसाह्यानें ज्ञानामृत प्राप्त करून घेतलेला जीवात्मा देहाचा अंत म्हणजे देहाचा त्याग होईपर्यंत वियोग दूर करण्याचा योग करीत रहातो. शेवटीं जसें पाणी आटण्याबरोबर त्यांतील प्रतिबिंबाचा नाश होऊन अंतीं मृत्तिकाच उरते, त्याप्रमाणेंच अज्ञानरूपी जल आटण्याबरोबर त्यांतील प्रतिबिंबित जीवात्माही नाहींसा होऊन अंतीं परब्रह्म स्वरूप उरतें. असें होणें यासच जीवाचें ब्रह्म झालें असें म्हणावें. अगर जीव ब्रह्मांत जाऊन मिळाला अथवा जीवाचा मोक्ष झाला असें ह्मणावें. जीव ब्रह्मीं मिळाला ह्मणजे भेद्याभेद्यरहित परब्रह्मास फाडून त्यांत शिरला असा अर्थ मात्र घेऊं नये. आतां विचार करावयाजोगी राहिलेली गोष्ट ही आहे कीं, परब्रम्ह, ईश्वर, जीव, व माया हीं सर्व एकाच ठिकाणीं कशीं राहतात? याचें समाधान असें आहे कीं, जशी मनुष्याची शक्ति ज्ञान व कल्पना, हीं एक ठिकाणींच राहतात, तसेंच हेंही समजावें. जसें तेल, सुवास, व पातळपणा हीं एकत्र असून परस्पर भिन्न आहेत तसेंच परब्रम्ह, माया, जीव, व शीव इत्यादि भिन्नाभिन्न आहेत. आकाश, वायु, तेज, मेघ हीं सर्व जशीं एकस्थळीं असून भिन्न आहेत तशीच माया, सृष्टि, व परब्रह्म भिन्नाभिन्न आहेत असें समजावें.

आकाश जसें सर्वत्र आहे व त्यापासून वायु, तेज, आप, पृथ्वि, हीं तत्वें उत्पन्न होतात व तीं पोकळीस सोडून पोकळींतच फिरत राहतात, पण पोकळी त्या सर्व तत्वांत आयतीच असून त्यांचे बरोबर फिरत नाहीं, त्याप्रमाणेंच पोकळीसुद्धां पंचभूतरूपी माया परब्रह्मीं उत्पन्न होते व ती माया परब्रह्मींच फिरत राहते. परंतु त्या मायेंत परब्रह्म असून तें त्या मायेचे फिरण्याबरोबर फिरत नाहीं. जसा पोकळींतच पृथ्वीमय ह्मणजे मृत्तिकामय घट उत्पन्न होतो, व त्यां- तच जल भरलें म्हणजे तीच पोकळी त्या जलांत प्रतिबिंबते,

व त्या पोकळीसच जलाकाश असें नांव येतें, त्याप्रमाणेंच परब्रह्मीं मृगजलवत् अविद्यारूपी घट उत्पन्न होतो व त्या अविद्येंत परब्रह्माचें जें प्रतिबिंब पडलेलें आहे त्या प्रतिबिंबासच जीव ह्मणावें. हा जीव अविद्येंत प्रतिबिंबित झाला म्हणजे ती अविद्या चंचल होऊन परमाणु-प्रमाणें प्रथम आकाशांत भ्रमण करीत असते. ती एकठिकाणीं रहात नाहीं. अशाप्रकारें जीव चंचल आहे व माया ही सर्वाकाश स्थाना-पन्न वायुरूपी असून त्या सर्वाकाश वायुरूपी मायामय महदाकाशा-मध्यें जें परब्रह्माचें प्रतिबिंब पडतें त्यास ईश्वर ह्मणावें. हा ईश्वर एक आहे व जीव अनंत आहेत. ईश्वर महदाकाशवत् सर्वत्र असून जीव त्याचे सजातीय पण, घटाकाशवत् अल्प स्वरूपधारी असल्यामुळें ते ईश्वराचे पोटांत येतात. ह्मणून ज्या ठिकाणीं जीव आहे त्या ठिकाणीं समष्टि ईश्वरही आहे. हा ईश्वर सर्वशक्तिमान असल्यामुळें तो आप-ल्या ईच्छामात्रें अनंत ब्रम्हांडें उत्पन्न करितो व मनुष्याचीं शरीरेंही तोच कल्पनारूपानें होऊन पुनः त्या शरीरांत व अनंत ब्रम्हांडांत आपल्या अव्यक्त रूपानें म्हणजे निराकार ज्ञानरूपानें आहे तसाच राहतो. म्हणून प्रथमतः शरीरांतील जीवास असा बोध केला आहे कीं, तूं प्रथम ईश्वराच्या अष्टधा प्रकृतींतील जें शरीर आहे तें, व शरीरांत अंतःकरण पंचकरूपीं जें त्या ईश्वराचें विभूती विष्णुरूप आहे, इत्यादि सोडून ह्मणजे जाणीवेचा अंतशेप पाहून समष्टी ईश्वरास पहा; व त्यास शरण होऊन आपण मिथ्या आहोंत असें मानून नाहींसा हो. म्हणजे ईश्वर व ईश्वराची अष्टधाप्रकृति इत्यादि कांहींच राहणार नाहीं. एकटें परब्रह्मच राहील. शरीरांत जीवासन्निध साक्षि ईश्वर आहे याविषयीं प्रमाण सांगतों. श्रीकृष्ण भगवान् गीतेंत अर्जुनास सांगतात-

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥

मी जो समष्टि ईश्वर तो 'सर्वस्य' म्हणजे अनंतग्रह तारांगणरूपी अनंत ब्रम्हांडगोलांच्या हृदयांत व त्या गोलांवरील अनंत प्राणिमात्रांच्या शरीरांतील हृदयांत, शिवरूपी ज्ञानस्वरूपानें आहे.

॥ हृदयंचाप्यधोमुखं नाभ्यामुपरि तिष्ठति ॥

या उपनिषद् श्रुतीप्रमाणें सर्वांचें जें हृदय त्या हृदयांत मी शिवरूपी पुरुषरूपानें प्रवेशलों आहे. म्हणजे श्वासवायु आंत ओढण्यानें फुप्फुसांत अशुद्ध रक्ताचें शुद्धिकरण होतें, त्या शुद्धिकरण होण्यांत कांहीं परमाणु आपल्या परमाणु रूपाला मुकून पंचप्राणरूपता, अंतःकरणपंचकरूपता व मी जो त्याच्या प्रकृतीरूपानें झालेला ज्ञानरूपशिव त्या माझ्या ज्ञानरूपतेला पावतात. त्या माझ्या शिव म्हणजे निराकारासारख्या ज्ञानस्वरूपाचा प्रवेश सर्वांच्या हृदयापर्यंत आहे आणि त्यापुढें माझ्या रूपाचा प्रवेश अंतःकरणपंचकरूप, प्राणपंचकरूप प्रकृतिरूपानें सर्व इंद्रियांत आहे. याप्रमाणें मी जो मृत्तिका, पाषाण, वायु इत्यादि पंचभूतरूप जड रूपानें भासतो, तोच मी श्वासोच्छ्वासानें जडतत्वांचें पृथक्करण करून, शिवरूपी ज्ञानस्वरूप होऊन, सर्वांच्या हृदयांत प्रवेश करितों. त्या माझ्या ज्ञानस्वरूपापासूनच म्हणजे अंतःकरणरूपी जाणीवेपासूनच मी तूं म्हणणें, संकल्पविकल्प करणें, इत्यादि ज्ञानेंद्रियांचे व कर्मेंद्रियांचे चलन व्यापार उत्पन्न होतात. त्यांचें स्मरण राहून मजपासूनच मी आहें खरा, परंतु तो मी कसा आहें हें माझें स्वरूप मला कळत नाहीं, असें अज्ञानरूपी जीवत्व उत्पन्न होतें. तें जीवत्व अंतःकरणपंचकाचे व्यापारांत निमग्न झालेलें माझ्या परमात्मरूपाचें प्रतिबिंबरूप शिवज्ञानत्व आहे. तें अज्ञानरूपी संकल्परूप चलन मजपासूनच उत्पन्न होतें. मी ज्ञानरूपी

जो शिवरूप आहें त्या माझें रूप अव्यक्त बिंदुरूपी वर्तुळाकाश, त्रिंदुरूपी वायु, त्रिकोणरूपी तेज, अर्धचंद्ररूपी आप, आणि चतुष्कोण रूपी पृथ्वि, या पंचभूतांच्या मूळ रूपानें अनंत ब्रम्हांडरूपी सर्व सृष्टि भासत आहे; तरी सर्व सृष्टि माझ्या ज्ञानरूपी शिवरूपाच्याच अस्तित्वानें मूळभूतरूपी अस्तित्वांत आहे. तीच माझी ज्ञानरूप प्रकृति अथवा शक्ति आहे. ती ज्या ज्ञानरूपाच्या आकर्षणशक्तीनें नाहींशी होते, तेंच ज्ञान मी शिव आहें. यास्तव विश्वरूपी पंचभूत प्रकृति ज्ञानस्वरूप शिव आहे, असें ज्ञानही माझें मलाच सर्वांच्या हृदयांत आहे. सर्व वेद ह्मणजे ज्ञान्यांचे ज्ञानरूपी ग्रंथ आहेत. ते पाहून ज्ञानेंकरून जो जाणावयाचा तो सर्व हृदयस्थ मीच ज्ञानरूपी ईश्वर आहें. माझ्या ज्ञानरूपी ईश्वररूपांचा अंत ह्मणजे वेदान्त व त्या वेदान्तानंतरच्या ज्ञानरूपाचा वेत्ता परब्रह्मरूपानें ज्ञानरूप राहणारा, तोही माझाच भाव आहे. म्हणजे माझ्या अंतःकरण रूपानें मी म्हणणें अशी जी माझी संकल्पविकल्पात्मक प्रकृति, ती माझ्या वर्तमानकाळरूपी अंतःकरणाच्या ह्मणजे जाणीवेच्या तृतियनेत्ररूपी वर्तमानकाळांत नाहीं. वर्तमान काळरूपीं प्रकृतीचा ज्ञाता जो शिवरूपी ज्ञान तोही मी नाहीं. याप्रमाणें अंतःकरणरूपी ज्ञानाचा सहज समज्ञानांत अंत होतो म्हणजे जेव्हां प्राणिमात्रांचें अंतःकरण मी नाहींच असें ज्ञान येतें तेव्हां तेंच वेदान्त आहे. त्या वेदान्ताचें ज्ञान उत्पन्न कर्ता व तें सांगणारा मीच गुरु आहें. याप्रमाणें सर्वांच्या हृदयस्थ मी आहें. ह्मणून संपूर्ण प्राणिमात्र आपापणांस मी मी असें भावितात. ही प्राणिमात्रांची भावना त्यांनीं सोडिली म्हणजे मीच जाणीवरूपानें उरतों. त्या मलाच ईश्वर, विष्णु, अंतःकरण अशीं नांवें आहेत. त्या माझ्या विष्णुरूपाचा जो आदि अंत तोच प्राणिमात्रांचे स्वमिथ्याज्ञानाचा ज्ञानरूप भाव सत्य परब्रम्ह आहे. त्या मला प्राणिमात्रांनीं मी नाहींच व मीपण धरणारें

ज्ञानही नाहींच असें अनुभवून पाहिलें तर ते स्वतः मायारूप शबल नसून सच्चिदानंद जें परब्रम्ह तेंच ते आहेत असें होईल. इत्यादि श्लोकार्थ आहे. यावरून मागें याच प्रकरणांत एकच शबलब्रम्ह जीवदशेस कसें आलें व त्यानेंच ईश्वररूप धरून त्रिगुणरूप प्रकृतीपासून पंचमहाभूतात्मक सृष्टिरचना करून तिची व्यवस्था करावयाकरितां ब्रम्हा, विष्णु, महेश, असे इच्छामात्रें अवतार कसे धारण केले हें सर्व सांगितलें आहे. त्यावरून सर्वांनीं हा विश्वाभास आहे असें जाणून त्याप्रमाणें आपापला भ्रम दूर करून स्वात्मैक्य ज्ञानानें तरून जावें.

असो, या वर लिहिलेल्या गोष्टीवरून वेदप्रतिपाद्यधर्मास अद्वैतधर्म म्हणण्याचें कारण वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. पहा, वेदांत असें सांगितलें आहे कीं, श्रुति, " सर्व खल्विदं ब्रम्ह " म्हणजे एक समष्टि ईश्वरच सुवर्णाचे नाना अलंकारवत् " आत्मनः आकाशः संभूत " या श्रुतीप्रमाणें आकाशादिक पंचमहाभूतात्मक जगद्रूपास आला आहे; परंतु त्यांतील जीव मात्र तो झाला नाहीं. कारण मागें

**आनंदमय विज्ञानमयावीश्वर जीवकौ**
**मायया कल्पितावेतौ ताभ्यां सर्वं प्रकल्पितं ॥**

असें प्रमाणसिद्ध सांगितलेंच आहे. विज्ञानमय जीव व आनंदमय सर्व शक्तिमान् ईश्वर हे उभयही मायेनेंच कल्पिलेले आहेत. जर ईश्वराच्या बरोबर जीवोत्पत्ति आहे तर, तो व ईश्वर एकच कसें होईल ? होणार नाहीं. दुसरें असें समजा कीं, जर जीव व ईश्वर हे एकच परब्रह्म झालें असतें तर जेव्हां महाप्रलय होतो व जेव्हां सर्व सृष्टि नाश पावते तेव्हां एकदम सर्व मुक्त झाले असते; मग निराळा मोक्षाविषयीं प्रयत्न कशास करावयास पाहिजे ? ऋग्वेदामध्यें " ज्ञानादेवतुकैवल्यं " म्हणजे ज्ञानाशिवाय मोक्ष मिळणेंच नाहीं, असें जें म्हटलें आहे तें

खोटें होईल, व मग गुरु शास्त्रादिकांची व पापपुण्याची किंमतच राहणार नाहीं. यावरून, सोन्यापासून अलंकार होतात, ते पुन्हा आटले म्हणजे सोन्यांत लीन होतात व पुन्हा त्या सोन्याचे पूर्ववत् अलंकार होतात, त्याप्रमाणेंच म्हणजे सोन्याच्या उदाहरणाप्रमाणें निराकार परब्रह्म जगताचें उपादान कारण आहे, व जग त्या निराकाराचें आकारी कार्य आहे असें मानणें चुकीचें होतें. ज्या कोणास आत्मज्ञान नाहीं व खरा वेदार्थ कळत नाहीं तो घोक्याशास्त्री अगर घोक्यापंडित असें समजतो. पहा श्रीकृष्ण भगवान गीतेंत सांगतात.

**यद्गत्वान निवर्तंते तद्धाम परमं मम ।**

ह्मणजे माझ्या निर्विकल्प निराकार परब्रम्हरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेऊन जे मत्स्वरूपीं पोहोंचतात ते पुनः जन्म घेण्यास परत येतच नाहींत. ते वंध्यासुतवत् मजमध्यें नाहींसें होतात. यावरून असें समजावें कीं, परब्रम्हीं गेलेले पुनः येत नाहींत. परब्रम्ह निर्विकार असल्यामुळें त्यास विकार होऊन तें जगद्रूपास येतच नाहीं व तें जीव ही होत नाहीं व ईश्वरही होत नाहीं असें न्यायानें समजावें.

वर सांगितल्याप्रमाणें "सर्वं खल्विदंब्रम्ह" या श्रुतीचा अर्थ आत्मनः आकाशः संभूतः, आकाशाद्वायुः 'वायोरग्निः' 'अग्नेरापः,' अद्भ्यः पृथ्वी, पृथिव्यो ओषधयः, ओषधीभ्योन्नं; अन्नात्पुरुषः," या क्रमानें मी ब्रम्ह भावना धरणारा जो समष्टि ईश्वर, तोच शबलब्रम्ह आहे ह्मणजे मिथ्या ब्रम्ह आहे. तोच 'एकोहंबहुस्यां' या श्रुतीप्रमाणें एकाचा अनेक असा क्रमाक्रमानें झाला आहे. तोच अन्नात्पुरुषः या न्यायानें जीवानें धारण केलेलें शरीरही झाला पण त्या शरीरांतील अहंपण धरणारें ज्ञान ह्मणजेच अज्ञानी जीव तो झाला नाहीं. कारण जर जीवही तोच झाला असता व शरीरही तोच झाला असता तर "आत्माविनिष्कलो ह्येको देहो बहुभिरावृतः, तयोरैक्यं प्रपश्यंति किम

ज्ञान मतः परम्," या वाक्याप्रमाणें देह व आत्मा भिन्न आहे असें ह्मण-ण्याचें कारण नव्हतें आणि देह व आत्मा एकच आहे असें मानणांरास वरील श्लोकांत मूर्खही ठरविलें नसतें. असो. न्यायानें बोलावें ह्मणजे चूक होत नाहीं. आतां सर्व ब्रम्हच आहे असा अर्थ जर करावयाचा असेल तर असें समजावें कीं, जगताच्या नाशांतीं ह्मणजे माया व तिचें जगद्रूपी कार्य मिथ्या मृगजलवत् विवर्त भासमात्र आहे असें झाल्या-नंतर जें जगद्रूपास बाधित करून उरणारें परब्रम्ह तत्व, तें जगत् झालेंच नाहीं म्हणून जगद्रूपासही आलें नाहीं, जगत आहे असें जें वाटतें तो सर्व भ्रम आहे; ह्मणून जगत् नाहींच. सर्व ब्रह्मच स्वतः-सिद्ध, एक अनेकातीत, आयतेंच, निर्विकल्प, निरंजन आहे तसेंच आहे.

'यत्पिंडे तत्ब्रम्हांडें' या वाक्याप्रमाणें पिंड म्हणजे आपलें जें शरीर, त्या शरीरींच आपणांस जो अनुभव येतो त्यावरूनच ब्रम्हांडाचा न्याय समजावा. पिंडीचा प्रळय म्हटला ह्मणजे निद्रा ही होय. जसा मनुष्य अगर जीव आपल्या निद्रारूपी प्रळयांत आपलें अस्तित्व ह्मणजे अहंकार सोडून सहज असतो, पण निःशेष नाश पावत नाहीं, त्या-प्रमाणेंच हें ब्रम्हांड प्रळयकाळीं परमाणुरूपानें आकाशांत अगर ईश्वरस्वरूपीं आकारास टाकून अव्यक्त रीतीनें वास करितें; व जीवही ब्रम्हांडाच्या प्रळयकाळीं नाश न पावतां विदेही होऊन आकाशांत अव्यक्त राहतात. ते झोंपेसारख्या अवस्थेंत दीर्घकाल-पावेतों असतात. जसा मनुष्य झोंपेंतून आपल्या पूर्वदेहाचें स्मरण घेऊन उठतो, त्याप्रमाणेंच पुनः सर्व जीव प्रळयकाळानंतर आपल्या झोंपेसारख्या अवस्थेंतून उठतात व पूर्वजन्मीं केलेल्या कर्माप्रमाणें पुनः चौऱ्याशी लक्ष योनींपैकीं एखादा उंच अथवा नीच देह धारण करितात. तसेंच हे जिवांस धारण करण्याजोगे देह ईश्वरेच्छेनें उत्पन्न होतात असें समजावें. जीवांच्या पूर्वकर्मानुसार जन्म मरणाच्या फेऱ्यांत त्यांस जावें लागतें.

करितां प्रळयकाळीं आपोआप जन्ममरणाचे फेऱ्यांतून सुटून आपण मुक्त होऊं अशा विश्वासावर कोणी स्वस्थ न बसतां नरदेह आहे तोपर्यंतच ज्ञानप्राप्तीच्या उद्योगास लागावें.

मागें सांगितलें आहे कीं, अविद्या नाना प्रकारची आहे. त्या नानाप्रकारच्या अविद्येनें सृष्टीच्या आरंभीं नाना जीव उत्पन्न केले आहेत म्हणजे अविद्येनें नाना जीवरूपें धारण केलीं आहेत. या गोष्टीस पुरावा पाहिजे असल्यास याच देहीं मिळतो, म्हणून शंका धरण्याचें कारण नाहीं. पहा, मनुष्य जेव्हां निजतो तेव्हां त्यास स्वप्न पडतें; व स्वप्नांत नाना देहधारी जीवात्मे उत्पन्न होतात. हें सामर्थ्य कोणाचें आहे ? सुषुप्तीचें हें सामर्थ्य नाहीं असें जर मानिलें, तर मनुष्यास निद्रा आल्याखेरीज त्यास स्वप्नसृष्टि उत्पन्न करितां येत नाहीं. यावरून सिद्धच झालें कीं, निद्रेचे पोटांत, बिजाचे पोटीं वृक्ष या न्यायानें, स्वप्नसृष्टिरूप वृक्ष असतो व म्हणूनच तो झोपेचे पोटीं उत्पन्न होतो. यावरून निद्रेचेंच सामर्थ्य स्वप्नसृष्टिरूप धारण करून नाना जीवरूपें धारण करण्याचें आहे असें सिद्ध झालें. या झोंपेसच पिंडी अविद्या, अज्ञान, तमप्रधान प्रकृति अशीं नांवें आहेत. निद्रारूपी अविद्या ब्रह्मांडांतील अविद्येच्याच पोटीं उत्पन्न झालेली आहे; म्हणून हिचे सामर्थ्यावरून महा अविद्येच्या सामर्थ्याचेंही लक्षण समजावें. पहा म्हटलें आहे:--

स्वप्नेथशून्ये सृजति स्वशक्त्या
भोक्त्रादि विश्वं मन एव सर्वं ।
तथैव जाग्रत्यापि नो विशेष
स्तत्सर्वमेतन्मनसो विजृंभणं ॥

स्वप्नांत एकच पुरुष म्हणजे अविद्यात्मक जीव, अन्य कांहीं साधन नसतां आपल्या मनसंकल्पाचेच योगानें नगर, पर्वत, गाई, हत्ती,

व्याघ्र, मनुष्य व सर्व सृष्टींतील नाना आकारी वस्तु उत्पन्न करून बोलण्याचालण्याचे सर्व व्यवहार करितो. हे सर्व व्यवहार करण्यास तेथें त्याचे कल्पनेवांचून कोणतीच वस्तु नसते. असें असतां तो आपली कल्पनाच नाना वस्तुरूपांस आणून त्यांत व्यापार करितो. पण हे सर्व कारभार झोंप आहे तोंपर्यंतच तो करीत असतो. त्यांस तो काल्पनिक न समजतां सत्य मानितो व त्यामुळेंच तो सुखदुःखाचे भोग भोगितो. याप्रमाणें जर सुषुप्तीचें सामर्थ्य कल्पनामात्रें सृष्टि उत्पन्न करण्याचें आहे तर मायेचेंही सामर्थ्य जीव व ईश्वर उत्पन्न करून त्यांचे द्वारें जगत् उत्पन्न करण्याचें असलेंच पाहिजे असें उघड होतें. जर मायेनें ही सर्व अनंत ब्रम्हांडगोलरूपी सृष्टि काल्पनिक उत्पन्न केली आहे, तर ती स्वप्नवत् कां नसावी? जी वस्तु सत्य असते तिचा त्रिकालीही नाश होत नाहीं असा सिद्धांत आहे. सृष्टीचा झोंपेंत अनुभव येत नाहीं. ती आपल्या मीपणासह नाश पावते. यावरून ही मिथ्याच असली पाहिजे असें ठरलें.

मनुष्याच्या निद्रेचें स्थान हृदय हें आहे; असें असतां त्या हृदयाहून वेगळ्या ठिकाणीं स्वप्नसृष्टि दिसते, हा निद्रादोषच आहे. त्याप्रमाणेंच ही संपूर्ण सृष्टि आपल्या संकल्पांत असून, अज्ञान भ्रांतिमुळेंच ती आपल्या संकल्पाच्या बाहेर अन्य ठिकाणीं भासते. स्वप्नाचा नाश होण्यास जसें जागेंच झालें पाहिजे, त्याप्रमाणेंच ही जागृतावस्था व तिच्यायोगें भासणारी सृष्टि न दिसण्यास आत्मज्ञानच झालें पाहिजे.

ज्या ठिकाणीं जी वस्तु उत्पन्न होते त्या ठिकाणींच पुनः तिचा अंत होतो असा न्याय आहे. या न्यायास अनुसरून शरीरांतील पोकळींत संकल्प उत्पन्न होतात व पुनः त्याच पोकळींत ते नाश पावतात. तसेंच आकाशापासून होणारीं चार भूतें वायु, तेज, आप, पृथ्वि हीं सर्व आकाशांतच नष्ट होतात.

ज्या आकाशापासून पंचमहाभूतें व तज्जन्यसृष्टि उत्पन्न होते, तें आकाश काय आहे असें पाहूं गेलें तर तें कांहींच नाहीं असें सिद्ध होतें. यावरून या कांहीं नसणाऱ्या आकाशाचें कार्य जें पंचमहाभूतात्मक सृष्टिरूप, आहे तेंही नसलेंच पाहिजे; व ' ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या ' म्हणजे सृष्टि भासमात्र आहे असें ह्मणणेंही योग्यच झालें.

ज्याअर्थी कारणावांचून कार्य उत्पन्न होत नाहीं त्याअर्थी सृष्टीस कांहीं कारण असलें पाहिजे. ही पंचमहाभूतात्मक सृष्टि आकाशापासून झालेली आहे असा ज्या अर्थी सिद्धांत आहे त्याअर्थी आकाश हें कांहीं तरी तत्व आहे असें सिद्ध झालें. जर आकाश या सृष्टीस कारण आहे तर तें मुळींच कांहीं नाहीं असें व्हावयाचें नाहीं. कारण जें अस्तित्वांतच नाहीं त्यास नांव तरी कसें संभवेल ? जर आकाशतत्वास नांव आहे तर त्याची स्थितीही असली पाहिजे असें सिद्ध झालें. आतां जर आकाशास अस्थित्वच आलें तर तें काय वस्तु आहे अथवा त्याचें काय रूप आहे हें आपण शोधिलेंच पाहिजे. आकाश काय वस्तु आहे हें पाहूं गेलें तर आपणांस " आत्मनः आकाशः संभूतः " या श्रुतीची आठवण होते. या श्रुतीचा अर्थ असा आहे कीं, आत्मा जो शबलब्रम्ह त्यापासून आकाशरूपाची कल्पनासिद्धि झाली; म्हणजे आत्म्यापासून जी कल्पना उत्पन्न झाली ती कल्पनाच आकाशतत्व आहे. या श्रुत्यर्थावरून सिद्धच झालें कीं, आकाश हें कांहीं स्वतंत्र तत्व नाहीं, पण तें आत्म्याची कल्पना आहे. आतां या आत्म्याचे कल्पनेस म्हणजे आकाशास भूत असें नांव देण्याचें कारण तें आत्म्यापासून झालेलें आहे. आकाश पाहिलें तर सर्वत्र अनुभवास येतें; व आकाश म्हणजेच जर कल्पना असा अर्थ आहे तर आकाशरूपानें कल्पना म्हणजे पोकळीच चोंहोंकडे व्यापक आहे असें झालें. जर कल्पनाच आकाशरूपानें पंचमहाभूतात्मक सृष्टीस कारण

आहे, तर त्या कारणाचें कार्य जें जगत् तेंही काल्पनिकच असलें पाहिजे असें ठरलें; व वेद आदिकरून ग्रंथांत जगास भासमात्र ठरविलें आहे तेंही रास्तच आहे असेंही सिद्ध झालें.

असो. आतां कल्पना म्हणजे काय तत्त्व आहे हें आपण पाहूं. अनुभव असा येतो कीं, आपल्या शरीरांतील प्राणवायु आपण स्थिर केला कीं लागलीच आपली कल्पनाही बंद पडते, व तोच प्राणवायु चंचल केला ( श्वासोच्छ्वास चालू केला ) म्हणजे त्या वायूच्या चंचल अस्तित्वांत कल्पना करितां येतें. यावरून सिद्धच झालें कीं, कल्पना ही वायुरूपच आहे. जर कल्पना वायुरूपच आहे तर वायूचे अंगचाच कल्पना हा गुण आहे असें ठरलें. वायु व कल्पना ज्या अर्थी एकरूपात्मकच आहेत त्या अर्थी वायु हेंच आकाशाचें रूप झालें. वायु जर चंचल आहे तर ज्या स्थळावर वायूचें येणें जाणें होतें तें निश्चळ तत्त्व काय आहे हें आपणांस शोधिलें पाहिजे. चंचल कल्पनारूपापूर्वी ह्मणजे आकाशरूपी स्फूर्ति उत्पन्न होण्यापूर्वी तर आत्माच आहे. यावरून उघडच झालें कीं, आपणांस शरीराचे आंत बाहेर जें पोकळ स्थान भासतें तें पोकळ नसून तें आत्मतत्व घनदाट सर्वाकाशस्थानापन्न असें आयतेंच आहे.

आत्मा सर्वत्र व्यापक आहे म्हणून तो मानवी प्राण्यांच्या शरीरींही आहे. एवढ्याकारितां ज्यास आत्मज्ञान करून घ्यावयाचें असेल त्यानें आपल्या शरीरामध्येंच आत्म्याचा शोध करावा ह्मणजे तो प्राणि आत्मज्ञानेंकरून तरून जाईल:—

स्वसुगंधमबुध्वैणस्तृणेषु भ्रमते यथा।
स्वरूपानंदमज्ञात्वा तथा भोगेष्वबुद्धयः॥

नाभिस्थानीं असणाऱ्या कस्तुरीचा सुगंध आपलेच पाशीं आहे असें न जाणून जसा हरण भ्रांतीनें अन्य स्थळीं कस्तुरीचा शोध घेत फिरतो

तसा मनुष्यही आपल्या स्वस्वरूपाचें आनंदसुख आपलेच पाशीं आहे असें न जाणून, भ्रांतीनें या जगद्रूपी मृगजलवत् संसारांत विषय भोगण्यांत सुख आहे असें मानून उगीच भ्रमण करितो व शेवटीं कष्टी होतो. जी वस्तु घरांत आहे ती बाहेर पाहिल्यानें कशी प्राप्त होईल? यावरून ज्यास सुखी होण्याची इच्छा असेल त्यानें स्वशरीरींच आत्मसुखाचा शोध करावा.

अशा प्रकारें जाणून जो प्राणि स्वशरीरींच शोध करूं लागतो त्यास ब्रम्हांडाचाही शोध आपल्या शरीरींच लागतो. पहा, ब्रम्हांडाची उत्पत्ति. ही प्राण्याचे उत्पत्तीवरून कळते, ब्रम्हांडाची स्थिति प्राण्याचे स्थिती. वरून कळून येते, ब्रम्हांडाचा लयही प्राण्याचे लयावरून कळून येतो, व ब्रम्हांडांतील जो जगदात्मा त्याचाही शोध पिंडांतील आत्म्यावरून होतो, असें असतां जे लोक ब्रम्हांडाचा व ईश्वराचा शोध स्वशरीरीं करीत नाहींत, त्यांची दशा नाभि सोडून अन्य ठिकाणीं कस्तुरीचा शोध करणाऱ्या मृगासारखी होते. मृगास जसा अन्य ठिकाणीं कस्तुरीचा शोध लागत नाहीं, त्याप्रमाणेंच स्वशरीराहून अन्य ठिकाणीं ईश्वरास अगर परमात्म्यास पाहूं इच्छिणारास शोध लागत नाहीं. जो विश्वात्मा विश्वांत व्यापक आहे, तोच आपल्या शरीरीं अनुभव घेणारास प्राप्त होतो. पहा श्रीकृष्ण भगवान श्रीमद्भगवद्गीतेंत अर्जुनास सांगतातः—

**अहमात्मा गुडाकेश सर्व भूताशय स्थितः ।**
**अहमादिश्च मध्य चं भूतानामंत एव च ॥**

प्रत्येक प्राण्याच्या शरीरांतील हृदयस्थ ज्ञाता जो मी, समष्टि म्हणजे सर्वत्र एक असणारा ईश्वर आहें तोच आत्मा आहे. तो कसा म्हणशील तर सांगतों. 'अहमात्मा' ह्मणजे तुम्ही जे सर्व जीवभूत आपापणांस आहों असें मानितां, त्या तुमचें आपलेंपण ह्मणजे अहंपण धरण्याचें जें अनेकरूपी मिथ्यारूप, त्या अनेकरूपी व्यष्टि जीवांच्या ठिकाणीं मी त्यांच्या

कल्पना धरणाऱ्या ज्ञानातीत आयताच आत्मा आहें. तोच मी, तुम्ही जे अनंत जीवभूत आहां त्या जीवभूतांच्या आदि व अंतीं म्हणजे नाश झाल्यावर तसाच मध्येंही आहें. जर मी आदि, मध्यें व अंतीही आहें, तर तुम्ही जे जीव ते माझ्या ठिकाणीं, एक जाग्यावर दोन वस्तूंचें अस्तित्व ठरत नाहीं या न्यायानें मिथ्या आहां म्हणजे किरणाच्या ठिकाणीं भासणाऱ्या मृगजलासारखे आहां. किरण जसे मृगजलास आदि, मध्य, अंतीं व्यापून आहेत त्याप्रमाणेंच मीही तुमच्या अस्तित्व मानणाऱ्या शबलज्ञानास आदि, मध्य, अंतीं व्यापून आहें. मी जो आत्मा तो कोठें नाहीं अशी जागाच नाहीं. मला म्हणजे तुमच्या आत्म्याला जर तुम्हांस पहावयाचें असेल तर तुम्ही आपले अस्तित्वाचें स्मरण सोडा म्हणजे कल्पना धरणाऱ्या हृदस्थ अज्ञानाचा त्याग करा ह्मणजे मी आयताच आत्मा सुखदुःखाच्या साक्षित्वातीत आहें तो मी तुम्हांस प्राप्त होईन.

यावरून असें सिद्ध झालें कीं, आत्मा कल्पना धरणाऱ्या ज्ञानापूर्वी म्हणजे अज्ञानातीत आहे. तोच आत्मा आपलें सत्य स्वरूप आहे. जें आपलें सत्यरूप आहे त्या सत्यरूपावरच श्रीकृष्ण ईश्वरही ‘ अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ’ या श्लोकान्वयें आपलें अस्तित्व ठेवितो. या श्लोकांत त्यांनीं असेंही सुचविलें आहे कीं, मी आपल्या आत्मरूपानें सर्वभूतांचें आशय ह्मणजे अज्ञानरूपी वस्तिस्थान जें आहे, त्या वस्तिस्थानास आश्रयस्थान आहें व म्हणूनच प्रत्येक प्राणि आपल्या आत्म्यावर ममत्व ठेवितो. असो, श्रीकृष्ण भगवान् यांचे अंगीं स्वतःसिद्ध ज्ञान असल्यामुळें मी आत्मा आहें असें ते म्हणतात व मनुष्य प्राणि अज्ञानावरणानें आच्छादित असल्यामुळें त्यास मी आत्मा आहें असें स्मरण नाहीं. मनुष्यप्राणि आपलें अस्तित्व देहावरच ठेवितो व देह हाच आत्मा आहे असें मानितो, आणि

आपल्या सत्य निराकार ज्ञानघन अशा सच्चिदानंदात्म्यावर आपलें ममत्व मात्र ठेवून व आत्मा आपलें स्वरूपाहून पृथक आहे असें दाखविता. असें होण्यास कारण काय झालें हें समजण्याकरितां येथें एक दृष्टांत देतों. कोणा एका विद्वान ब्राम्हणास त्याच्यामित्रमंडळींनीं आग्रह करून तो बेशुद्ध होई इतकी भांग पाजिली. त्यायोगें ब्राम्हण घरीं जावयास निघाला असतां रस्त्यांत बेशुद्ध होऊन पडला. त्याची ती दुर्दशा पाहून रस्त्यांतील जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनीं त्यास विचारिलें, महाराज, आपण कोण आहां व येथें कां पडलां? ब्राम्हणानें उत्तर दिलें,मी भांग आहे तुम्ही विचारणारे कोण! असें त्या भ्रष्ट ब्राम्हणानें उत्तर दिल्यानंतर विचारणारे लोक असें होण्याचें कारण न समजून घेतां आपापल्या मार्गानें गेले. इतक्यांत तेथें एक शाहणा माणूस आला. त्यानें त्या ब्राह्मणास आपण कोण आहां असें विचारतांच मी भांग आहें असें त्या ब्राह्मणानें पूर्ववतच उत्तर दिलें. विचारणारा ज्ञाता पुरुष असल्यामुळें त्यानें त्याच्या बोलण्याचा राग न मानितां असें होण्याचें कारण कांहीं अमली पदार्थाचा कैफ असावा असें जाणिलें. नंतर तो आपल्या घरीं गेला व त्या ब्राह्मणांस उतार देण्याकरितां थोडें दहीं व तूप घेऊन आला आणि तें त्या ब्राम्हणास प्यावयास दिलें. आणि मग थोडेच वेळानें तो ब्राह्मण शुद्धीवर आला. नंतर पुनः त्या सद्गृहस्थानें त्यास विचारिलें कीं, महाराज आपण कोण आहां व आपलें नांव काय? ब्राह्मणानें उत्तर दिलें, मी जातीचा ब्राम्हण असून मला रामशास्त्रि म्हणतात. असो. या दृष्टांतांतील ब्राम्हणाप्रमाणेंच या देहधारी जिवाची स्थिति झाली आहे. जीव हा मूळचा स्वतः साक्षात् आत्मा असून अज्ञानरूपी भांग प्राशन करून त्यायोगें मी मनुष्य आहें, मी शरीर आहें, मी क्षत्रिय आहें इत्यादि बरळत आहे. या जीवास कोणी सत्पुरुष भेटला ह्मणजे तो त्यास आपला उपदेशरूपी उतार पाजून

त्याचा अज्ञानरूपी कैफ दूर करितो. नंतर तोच देहाभिमानानें बोलणारा जीव आपला देहाभिमान सोडून मी आत्मा आहें, माझा देहाच्या जातिवर्णादि धर्माशीं कांहीं संबंध नाहीं असें बोलूं लागतो. नंतर आत्मानुभव दृढ होण्याकरितां तो खालीं लिहिल्याप्रमाणें भजन करूं लागतो.—

**न भूमिर्न तोयं न तेजो न वायुर्न खं नेंद्रियं वानतेषां समूहः ।**
**अनैकांतिकत्वात्सुषुप्त्येकसिद्धस्तदेकोऽवशिष्टःशिवःकेवलोऽहम्॥**
**न वर्णा न वर्णाश्रमाचारधर्मा न मे धारणाध्यानयोगा दयोऽपि।**
**अनात्माश्रयोहं ममाध्यास हानात्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोहं॥**

निर्वाणदशक.

ह्मणजे मी भूमि, जल, तेज, वायु, आकाश अगर तज्जन्य कार्य जें देहादि इंद्रियांचा समूह तोही नाहीं. मला जातिधर्म, आश्रम किंवा ध्यानधारणा इत्यादिकांची मुळींच अपेक्षा नाहीं. मी स्वतः इंद्रियादिकांचा साक्षी शिव म्हणजे ज्ञानवान आत्मा आहें. तो मी आत्मा देहादिक जड इंद्रियांहून अगदीं भिन्न आहें. कारण देहादिक, इंद्रियें हीं माझें रूप नसून तीं ईश्वररूप आहेत. येणेंप्रमाणें ज्ञानोत्तर आत्मध्यास दृढ होऊन संपूर्ण सृष्टीचे ठिकाणीं त्यास एक समष्टि ईश्वरतत्वच दिसूं लागतें. हें चराचर सृष्टिरूप एकटा ईश्वरच आहे अशाविषयीं प्रमाणः—

**एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
**अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥**

भगवद्गीता अ० ७ श्लो० ६.

श्रीकृष्ण भगवान् ह्मणतात—हें सर्व स्थिरचर सृष्टीचें स्वरूप मी एक ईश्वरच आहें. कारण मी जो ईश्वर आहें, तोच इच्छामात्रें अनंतरूपें धारण करून जगद्रूपास येतो. नंतर त्या सृष्टीस नियम लावून

देण्याकरितां अनंत अवतारशरीरें मीच धरितों. नंतर पुनः मी आपल्या लीलारूपी अवतारशरीरास इच्छामात्रें नाहींसें करून विदेही अशा निराकार स्थितीनें सहज उरतों. यामुळें माझेंही अहंताधारक मायारूप अंतीं नाश पावतें म्हणजे मिथ्या होतें; व तुम्ही जे अज्ञान जीवात्मे आहा, ते तुम्हीही स्वस्वरूपज्ञानप्राप्ति करून घेऊन जर मुक्त व्हाल तर तुमचेंही अहंताधारक ज्ञान अंतीं मिथ्या होईल. म्हणून तुम्ही व मी असें उभयतांही अंतीं अभाव आहों, म्हणजे परब्रह्म रूपानें एकच आहों. आतां जीं जीवांचीं रूपें व माझीं रूपें अंतीं नाहींशीं होतात, तीं आदिही मिथ्याच आहेत असें समजावें. यावरून अत्यंत आभाव असा जो वंध्यासुत म्हणजे नसून दिसणार जो भाव आहे, तोच जीवांच्या व माझ्या उत्पत्तीचें आदिकारण व नाशाची स्थिति आहे. त्या मिथ्या स्थितीला मी ईश्वर माझें रूप समजतों. यामुळें तोच मी एका अहंकारानें ईश्वर झालों, म्हणजे मी ब्रह्म आहें अशा स्मरणरूप स्थितीच्या अहंकारानें राहिलों आहें; व तोच मी एका अहंकारानें म्हणजे मायेच्या विस्मरणरूपी अविद्यात्मक कल्पनेनें नाना जीव झालों आहें. याप्रमाणें मी वेगवेगळ्या अहंकारानें जीव व ईश्वर इत्यादि रूपांस आलों. नंतर मी आपल्या ईश्वररूपानें अनंत ब्रह्मांड गोलरूपी प्रकृतिरूप धरिलें; व त्या अष्टधाप्रकृतिरूप माझ्या देहाचा मी ईश्वर आहें असा अहंकार धरिला. अशा रीतीनें मी अष्टधाप्रकृतिरूप होऊन तिचा अहंकार धरीत आहें इतक्यांत जीवरूप अहंकारांनीं ईश्वररूप अहंकारास म्हणजे आपलें श्रेष्ठ रूपास पहावयास इच्छिलें; तो ईश्वररूप अहंकार अष्टधाप्रकृतिरूपी ह्मणजे पंचभूतें आणि त्रिगुणमिश्रितरूपी अनेक ब्रह्मांडगोलांच्या रूपानें जीवांस दिसूं लागला. त्या वेळीं या नाना जीवांनीं अष्टधाप्रकृतिरूपास धरून राहणें हेंच आपलें मुख्य ज्ञान आहे असें जाणून अष्ट-

धाप्रकृतिरूपास घट्ट धरिलें. परंतु जसा कोणी मनुष्य सुवर्णाचा अलंकार आपले हातांत असतां मजजवळ सोनें नाहीं जसें म्हणतो त्याप्रमाणेंच हे संपूर्ण जीव, मी अष्टधाप्रकृतिरूपानें त्यांचेपाशीं उभा असतां, ईश्वर आम्हांस भेटत नाहीं असें म्हणतात व ईश्वर प्रीतीनें मला न भजतां विषयांच्या प्रीतीनें भजतात. विषयेच्छा तर कधींही तृप्त होतच नाहीं. म्हणून त्यांना ती विषयांची लालसा जन्ममरणरूपी फेरे खावयास लाविते. तेच जीव जर आपल्या मिथ्या अहंकारास म्हणजे माझ्या प्रकृतिरूप देहास अज्ञानवियोगानें सोडतील तर त्या जीवांना मी अष्टधाप्रकृतिरूपानें रज्जुसर्पवत् न दिसतां रज्जुस्थानापन्न जें निराकार परब्रह्म, त्या परब्रह्मरूपानें दिसेन. असें सत्यज्ञान जीवांस स्वमिथ्याज्ञानाच्या वियोगानें झालें म्हणजे मीं जसा सांप्रत श्रीकृष्ण रूपानें श्यामसुंदर, कमलनयन देहधारी असून विदेही किंवा मुक्त आहें व मला कांहींच अप्राप्य नाहीं तसेंच जीवांनाही होईल; व अंतीं म्हणजे प्राणोत्क्रमणानंतर ते परब्रह्मरूपाप्रत पावतील.

यांत असें सुचविलें आहे कीं, मनुष्यानें एकदां दोरी आहे असें ओळखिलें व नंतर ती दोरी जरी पूर्वस्थळीं तशीच पडून राहिली तरी त्या दोरीस सर्प मानून तो भीत नाहीं. तद्वत्च आत्म्याचें ज्ञान प्राप्त झाल्यानंतर तात्काल जरी देह नष्ट झाला नाहीं, तरी तो आपल्या निराकार भावरूपी निर्विकार क्षेत्राचें स्मरण अक्षय बाळगितो; व देहरूप क्षेत्र नाशिवंत असून ते समष्टिरूप ईश्वराचें आहे असें जाणून त्यावर तो प्रेम ठेवीत नाहीं; आणि त्यामुळें त्यास पुनर्जन्मही घ्यावा लागत नाहीं. कारण प्राण्यास पुनर्जन्म प्राप्त होणें, हें मुख्यत्वेंकरून त्याच्या वस्तुचिंतनावर अवलंबून आहे. मी मनुष्य अगर शरीर आहें अशा स्मरणरूपाचे अस्तित्वांत जर प्राण्याचा प्राणत्याग झाला तर तो देहपातानंतर चौऱ्याशी लक्ष योनींपैकीं कोणताही

देह आपापल्या कर्माप्रमाणें धारण करितो. मनुष्यास अंतकाळीं मी निराकार परब्रह्म अहंपण धरणाऱ्या ज्ञानातीत आयताच आहें असें स्मरण राहून जर प्राणत्याग झाला, तर तो अंतीं निराकाराच्या अस्तित्वांत, एका ठिकाणीं दुसऱ्याचें अस्तित्व राहत नाहीं, या न्यायानें नाहींसाच होऊन आलेल्या आयत्याच रूपानें परब्रह्म आहे तसाच राहतो. कारण 'अंतीं मति सा गतिः' असा न्यायच आहे. ज्या प्रकारची अंतीं मति म्हणजे स्मरण असेल त्या प्रकारच्या वस्तूप्रत तो पावतो. जर मनुष्याची अत्यंत सोन्यावर प्रीति असेल तर तो सोन्याच्या खाणींतील किड्याचा जन्म घेतो. जर स्त्रीवर अति प्रेम राहून तिचे ध्यानानें प्राणत्याग झाला तर तो पशुपक्ष्यादिकांतील मादीचे जन्मास जातो अगर स्त्रीचे डोक्यांतील ऊं होतो. या प्रमाणें प्राणिमात्रांच्या अंतकालच्या स्मरणाप्रमाणें त्यास गति प्राप्त होते. करितां प्राणिमात्रानें अंतकाळीं परब्रह्म चिंतन राहून मरण यावें म्हणून आपल्या आत्म्याचा ध्यास क्षणोक्षणीं करीत रहावें हें बरें. पहा श्रीकृष्ण सांगतात.

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥**

गीता अ० २ श्लो० ७२.

जो ह्या माझ्या परब्रह्मरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेतो, व आमरणपर्यंत मी निराकारपरब्रह्म अज म्हणजे जन्ममरणरहित सच्चिदानंद आहें असें चिंतन ठेवितो, त्यास देहाचे परमाणु होऊन उडून जातांक्षणींच परब्रम्ह स्थिति प्राप्त होते. असो, याप्रमाणें प्राण्यास ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें पुनर्जन्म फल प्राप्त होतें, आणि जर आत्मज्ञान होऊन प्राणोत्क्रमण झालें तर तो मुक्त होतो. एवढ्याकरितां प्राणिमात्रांनीं विषयांचें चिंतन जावें व ब्रह्मचिंतन घडावें ह्मणून पुढील प्रमाणें भाव ठेवावा.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामे वैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥
गीता अ० ९ श्लो० ३४.

ज्याला निराकार स्वरूपाला पावणें आहे त्यानें परब्रह्म स्वरूपाला न पावण्याचीं जीं कारणें आहेत तीं दूर करावीं. तीं निराकार स्वरूपीं न पावण्याचीं कारणें अशीं दूर करावीं कीं. 'मन्मनाभव' ह्मणजे मन हें 'इंद्रियाणां मनश्चास्मि' या कृष्णोक्तीप्रमाणें ईश्वराची प्रकृति आहे असें समजावें;आणि त्या मनरूपी प्रकृतिरूपानें सर्व ठिकाणीं ईश्वरच चराचर सृष्टिरूपानें उभा आहे असें कल्पून तें अव्यभिचार भक्तींत गर्क करावें व असें समजावें कीं, ईश्वरभक्त ह्मणजे निराकारीं वेगळें अज्ञान नाहीं, परंतु प्रकृति पुरुषाच्या अस्तित्वाला जडलेलें तत्सजातिय ह्मणजे प्रकृति पुरुपाची जाति जीवरूपी अज्ञान आहे; तें निराकारी त्रिकाळीं नाहींच, या भावनेनें अज्ञानाचा वियोग करणें; ह्मणजे ईश्वराच्या निराकार स्वरूपांतील विभक्तपणा दूर करून ऐक्य होणें होय. तसाच मद्याजी ह्मणजे जी जी क्रिया शरीररूपी प्रकृतीच्या साह्यानें होते ती ती क्रिया होणेंच सर्वसाक्षि अंतरांतील शिवाचें पूजन आहे. या प्रमाणें ज्ञानानें राहणें याचेंच नांव मद्याजी आहे; तसें आपण होऊन ईश्वराला नमस्कार करावा ह्मणजे अहंपणाचा त्याग करून व निराकार स्वरूपीं अहंपण धरणारें ज्ञान किंवा अज्ञानरूपी जीव मुळींच अभाव आहेत असें जाणून रहावें. असें होणें हेंच 'मत्परायणः' ह्मणजे ईश्वरांत लीन होऊन राहणें आहे. या रीतीनें ईश्वराशीं अनन्य होऊन राहवें हा अनन्यचिंतन करण्याचा प्रकार चांगला जाणावा ह्मणून मनुष्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें विचार करावा. ह्मणजे त्याला असें कळून येईल कीं, भविष्यकाळांत ह्मणजे श्वासोच्छ्वास होण्याचे अंतीं सहज असणारा जो वर्तमान काळरूपी साक्षीज्ञानरूप ईश्वर, त्या ईश्वरांत

त्रिकाळींही अज्ञानरूपी जीवाचें अस्तित्व नाहीं. या अज्ञानरूपी जीवाचा नाश करण्याचा प्रकार असा आहे कीं, प्रथम स्वस्थ बसून शरीरांत मी ह्मणणारा कोण आहे, या गोष्टीचा विचार करावा. विचाराअंतीं असें कळून येतें कीं, मी मी ही भावना ओंठ व जीभ यांचे साह्यावांचून शरीरांतील पोकळींत केवळ फुप्फुसांतील प्राणवायूस हलविल्यानें अंतःकरणांत करितां येते. ही मी मी अशी भावना ज्ञानाचे मदतीशिवाय ह्मणजे जाणिवेशिवाय करितां येत नाहीं. इतकें अनुभवास आल्यानंतर असे विचार करून पाहवें कीं, जर इंद्रियांचे साह्यावांचून मी मी अशी भावना शरीरांतील पोकळींत उत्पन्न होते, तर मी देहादिक जडेंद्रियें कसा असेन? ज्या अर्थीं मला 'मी मी' ही भावना इंद्रियांचे साह्यावांचून केवळ आकाशवाणीनें करितां येते त्या-अर्थीं मी शरीर व इंद्रियें नसून शरीरांतील ज्ञाता पुरुष आहें. तस्मात् मी हें सर्वनाम मतीच्या अंतर्यामीं जो मतीचा जाणणारा आहे त्यासच अनुलक्षून आहे. याप्रमाणें समजल्यावर तो मतीचा जाणणारा मी शरीरांत कोठें आहे हें पाहूं लागावें. म्हणजे समजतें कीं, मी विषयांस जाणणारा ह्मणजे शरीर व शरीराहून पृथक् दिसणाऱ्या सृष्टीस जाणणारा मेंदूचे आंतील पोकळींत आहें. तोच मी शरीरास व इंद्रियांस जाणते वेळीं हृदयांतील फुप्फुसास लागलेल्या पोकळींत असतों. तो मी शरीरांत कोणत्या जातीचें तत्व आहे असें पाहूं लागल्यावर असें समजतें कीं, मी पंचविषयांना म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस, व गंध इत्यादिकांना व पंचज्ञानेंद्रियें म्हणजे श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा व घ्राण इत्यादिकांना जाणणारा इत्यादिकांहून वेगळ्या जातीचें तत्व आहें. तें तत्व काय आहे असें पाहिलें म्हणजे अनुभवास येतें कीं, शरीरांत आकर्षणशक्ति आहे; त्या आकर्षणशक्तीनें शरीरांतील चलन गुणास

म्हणजे प्राणवायूस व त्यांतील मनोमय कल्पनेस आकर्षण करून नाहींसें केल्यावर पृथ्वी, आप, तेज व वायु या चार भूतांच्या शरीरांतील आकृतिगुणांचा प्रलय होतो. अशा प्रकारें प्रलय झाल्यानंतर आकर्षण करण्यासच कांहीं राहत नाहींसें झाल्यामुळें आकर्षण करण्याचा गुणही अव्यक्त होतो. नंतर जें मागें राहतें, तेंच शब्दगुणरूप आकाशभूत आहे. आकाश हें शब्दगुणरूपाचेंच नामाभिधान असल्यामुळें तें ज्ञानरूप सर्वगुणसंपन्न आहे असें अनुभवास येतें. नंतर अशी समजूत पटते कीं, हल्लीं आकाशाची मर्यादा जशी आपण शरीराचे व अनंत ब्रह्मांडगोलाचे आंत बाहेर एक अनंत अपार पाहतों, तशी नाहीं. कारण ज्या ठिकाणीं शब्दगुणरूप आकाश आहे त्याच स्थानीं चार भूतांचें अस्तित्व आहे. हीं चार भूतें सर्वत्र नाहींत. चार भूतें हीं आकाशाच्या कांहीं भागांत आहेत; व आकाश तर सर्वत्र आहे. यामुळें तें रूप आपल्या मी म्हणण्याच्या मर्यादेहून ह्मणजे शब्द गुणरूप आकाशाहून वेगळ्या ठिकाणीं आहे असें दिसतें. इतके पाहून आपण मी असें म्हणण्याचें सोडून कल्पनारहित सहज राहिलों, म्हणजे असें अनुभवास येतें कीं, तें सर्वगुणसंपन्न आकाश व आपणासारखे अनंत जीवात्मे इत्यादि सर्व एक जातीचें तत्व आहे. हें पाहण्यास डोळे व प्रकाश यांची गरज लागत नाहीं. कारण दुसऱ्या जाग्यावर पाहण्याचा जो आपले ठिकाणचा अज्ञान गुण, त्यांत जें आपणांस पहावयाचें असेल तें प्रतिबिंबतें. ह्मणून चर्मचक्षूचे साह्यावांचून आयतेंच तें दिसतें. याप्रमाणें झाल्यावर विचार करावा कीं, मी म्हणणारा जो आहे, तो माझें वेगळें अंगच आहे. याठिकाणीं मी हृदयांत आहें असेंही म्हणणें राहत नाहीं. यावरून असें कळून येईल कीं, मी जो ज्ञाता आहें, तो आपल्याच इच्छेनें कमजास्त होतो. यास्तव आपल्या अंगीं गुण किती आहेत हें पाहूं लागावें.

तेव्हां कळून येतें कीं, आपण ज्या अनंतगुणी आकाशाच्या जागीं आहोंत, त्या जागेयेवढें आपणाच्यानें होववत नाहीं. कारण आपण कितीही वाढलों अथवा सूक्ष्म झालों, तरीही आपल्या अंगीं आपण एक आहों हा गुण आहेच. परंतु ज्या जागेच्या ठिकाणीं आपण असतों तीमध्यें हा गुण नसतो. यामुळें जागा आपल्या आजूबाजूस राहतेच. यास्तव जागा हें काय तत्व आहे हें पाहवें. मग जागाच मी आहें असा भाव धरावा. नंतर त्या जागेच्या अंगीं मी म्हणण्याचा व कल्पना करण्याचा गुण नाहींच असें समजून, मीपणा व कल्पना यांचा त्याग करावा. म्हणजे जागाच मी आहें, असें म्हणण्यापलीकडील स्थळच आपण होतों. त्यायोगें मी या भावनेचा अत्यंत आभाव होतो. आपल्या मीपणाच्या अस्तित्वाचा आभाव झाल्यामुळें त्या जागेचा अनुभव सांगण्यास कोणी उरतच नाहीं. याप्रमाणें झालें, म्हणजे असें ज्ञान दृढ होतें कीं,

> ज्ञानेनतु तदज्ञानं येषां नाशित मात्मनः ।
> तेषामादित्य वज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥

सूर्याच्या ठिकाणीं जसा त्रिकाळींही अंधार नाहीं तसा जो जीवात्मा आपल्या ज्ञानेंकरून अज्ञानाचा निःशेष नाश करितो, तो आत्मरूपानें स्वयंप्रकाश असा निराकार परब्रम्हच झाला. मग त्याचें अंगीं अहंपण व अहंपण धरणारें ज्ञानही राहत नाहीं.

पहा! कल्पना जो धरतो व सोडतो, तो कल्पनारूप कसा होईल? तो कल्पनेहून वेगळा असावा, तरच त्यानें कल्पनेस धरावें व सोडावें. जर आपण कल्पना धरितों व सोडितों, तर आपण कल्पनेहून वेगळ्या जातीचें तत्व असलेंच पाहिजे असें झालें. कारण आपण कल्पना टाकिली, तर, आपण कल्पनातीत निर्विकल्पच होऊं. जर कल्पनांतीं आपण निर्विकल्प उरतों, तर, तें आपण कल्पनेपूर्वींही निर्विकल्पच असलों

पाहिजे. कारण जर कल्पनेच्या आद्यंतीं आपण निर्विकल्प आहों, तर कल्पनेचे अस्तित्वांत सुद्धां आपण आहों तसेंच निर्विकल्प असलों पाहिजे असें सिद्ध झालें. कल्पना करणें हा तर अंतःकरणपंचकरूपी आकाशाचा गुण आहे. आपण या आकाशास व त्याचे कल्पनारूप गुणास जाणतां व जो ज्या वस्तूस जाणतो तो त्या वस्तूहून वेगळा असतो, या न्यायानें आपणही कल्पनेस जाणणारे त्या कल्पनारूप आकाशाहून वेगळे असलों पाहिजे असा न्याय झाला. असा अनुभव दृढ झाला म्हणजे अंतःकरणपंचकच प्राणवायूस चलित करून मनोमय मी असें ह्मणणारें आहे व तेंच आकाशरूपानें कर्तें भोक्तें आहे असें अनुभवास येईल. मग आपण अंतःकरणपंचकास व त्याच्या मीपणाचे भावनेस जाणणारे असल्यामुळें त्या मीपणाहून व कर्तेभोक्तेपणाहून वेगळे आहों, असेंही प्रतीतीस येईल. नंतर आपण कर्तृत्वभोक्तृत्वरहित जी पोकळी शरीरांत व शरीराबाहेर एक अनंत अपार आहे तीच आहों असें होतें. असें दृढ ज्ञान झालें ह्मणजे सहज लक्षांत येईल कीं, जागृत, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था अंतःकरणपंचकासच आहेत, आपणास नाहींत. कारण अंतःकरण पंचक जें आकाशभूत आहे, तें आपल्या कल्पनारूप गुणासुद्धां सुषुप्ति अवस्थेंत म्हणजे निद्रेंत लीन झालें असतां त्याच्या लयाबरोबर त्याची जी जागृतावस्था, तीही मावळते; व तें निद्रेंतून उदयास आलें, म्हणजे त्याचें येणेंच जागृतावस्थारूप होतें. तेंच अंतःकरण इंद्रियांचे साह्यावांचून कांहीं वेळ सुषुप्तीचे पोटांत राहून मनोमय कल्पून सृष्टि उत्पन्न करितें. म्हणून त्याचे मनोमय इंद्रियांचें साह्यावांचून कल्पिणेंच स्वप्नावस्था आहे. यावरून या तिन्ही अवस्था एकट्या अंतःकरणाच्याच आहेत, असा न्याय झाला.

या तीन अवस्था अंतःकरणरूपच असल्यामुळें आपण अवस्थातीत आहों असें झालें. ज्या अर्थीं आपण सुषुप्ति अवस्थेंत म्हणजे निद्रेंत

कल्पनारहित निर्भान असतों व आपण आणि निद्रा असे परस्परांहून वेगळे आहों, त्या अर्थी आपलेंरूप निर्भान व निर्विकल्पच असलें पाहिजे. जर आपण निर्भान व निर्विकल्प आयतेच आहों, तर जागृतावस्थेंत जरी आपेंतून अंतःकरणपंचक उठून कल्पना करूं लागलें, तरीही आपण त्याच्या कल्पनारूप चंचलगुणांत सुद्धां निर्भान व निर्विकल्पच असलों पाहिजे असें झालें. जर जागृत, सुषुप्तिमध्यें आपण निर्भान व निर्विकल्प आहों, तर स्वप्नावस्थेंत सुद्धां आपण निर्विकल्पच असलों पाहिजे असें झालें. आतां जे आपण तिन्ही अवस्थामध्यें सारखे निर्भान आहों, ते आपण आहों तरी कसें, असें म्हणाल तर, तेंही सांगतों. आपण आपल्या शरीरांत निश्चळ जें आकाश तत्व आहे तेंच आहों. त्या आपल्या आकाशरूपानें आपण कोणत्याही गोष्टी जरी आपल्या ठिकाणीं केल्या तरी आपण आहों तसेंच राहतों. नंतर जे आपण सर्व वस्तूंस आधार आहों त्या आपल्या निश्चळ आकाशरूपांत चंचळ जे अंतःकरणपंचकाचे कारभार चालतात ते वायुरूप आहेत असें अनुभवास येतें; व आपण जे आकाशस्थानापन्न आकाशाची कल्पना सोडून आयतेच कूटस्थ आहों, त्या आपणावर अंतःकरणपंचक हें जलतरंगवत् आहे, अथवा आकाशाच्या ठिकाणीं भासणाऱ्या नीळिमेप्रमाणें मिथ्याच मायारूप आहे असें होतें.

जसा किरणच मृगजलास प्रकाशितो, तसेंच आपणही या अंतःकरणपंचकास प्रकाशितों. म्हणजे आपल्या प्रकाशानेंच अंतःकरणपंचकास सर्व व्यवहार करितां येतात. आपल्या प्रकाशानेंच तें अंतःकरणपंचक स्वप्नांत इंद्रियांचे साह्यावांचून व सूर्य अगर इतर प्रकाशमान वगैरे वस्तूंचे साह्यावांचून कारभार करितें, व तेंच सर्व वस्तुरूप होऊन त्या वस्तूंचें साक्षित्व करितें. स्वप्नावस्थेंत आपण प्रकाश देणाऱ्या दीपकाप्रमाणें असून अंतःकरणपंचक हें आपल्या स्वात्मप्रकाशाधारें

अनंत क्रिया करणारें व सुखदुःख भोगणारें आहे. अंतःकरणपंचक हेंच मनोमय शरीरांतील सूक्ष्म पदार्थाचा देहधारण करितें व मनोमय कल्पनेचे अनंत पदार्थ उभारितें व आपणच अनंत वस्तुरूपास आलों आहों असें न जाणतां त्या आपल्या स्वकल्पित पदार्थापासून आपणास सुखदुःख प्राप्त होतें असें मानितें. यावरून घ्यावयाचें तें येवढेंच कीं, कर्तेंभोक्तें अंतःकरणपंचक जें आकाशभूत आहे तेंच पंचप्राणाधारें पंचज्ञानेंद्रियांनीं पंचकर्मेंद्रियावाटे घेऊन पंचविषय भोगितें. तेंच शरीरांत कर्तेंभोक्तें आहे. आपण कर्तेंभोक्तें नसून अंतःकरणपंचकास व त्याचे कारभारास प्रकाशक या नात्यानें आपणच आधार आहों. जसें स्वप्नावस्थेंत आपण प्रकाशमान आहों, पण क्रिया करणारे नाहीं म्हणजे अक्रिय आहों, तसेंच स्वप्नरूप जें अंतःकरणपंचक तें इंद्रियांचें साह्य घेऊन त्या इंद्रियाधारें कारभार करितें. या त्याच्या व्यवहाररूप काळास जागृतावस्था ह्मणतात. अशा जागृतावस्थेंत म्हणजे सुषुप्तीचे अंतीं आपण पूर्ववत् प्रकाशक या न्यायानें अक्रियच आहों. याप्रमाणें अंतःकरणपंचकाचें कर्तृत्वभोक्तृत्व यथार्थ समजून, व अवस्थात्रयांस उत्पन्न करून तिन्ही अवस्थांमध्यें व्याप्त झालेलें तेंच आहे असें जाणून आपण "**अवस्थात्रयसाक्ष्यास्मिचाहमेवाहमन्यः**" या जगद्गुरूंच्या उक्तीस अनुसरून अवस्थात्रयांहून भिन्न म्हणजे वेगळे आहों असें समजावें. जागृत्, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्था अंतःकरणपंचकापासून उत्पन्न होऊन, त्यासच भोगून, त्यामध्येंच पुनः गुप्त होतात. अशा ह्या त्रयअवस्थारूप अंतःकरणपंचकाचा साक्षी म्हणजे सुखदुःखाच्या साक्षित्वातीत सहज स्वभावरूप जो आत्मा तोच मी स्वयंप्रकाशी असून परप्रकाशक आहे असें निश्चयेंकरून जाणावें.

आत्मचैतन्यमाश्रित्य देहेंद्रिय मनोधिया ।
स्वकीयार्थेषु वर्तंते सूर्या लोके यथा जनाः ॥

जसे सर्व लोक सूर्याच्या प्रकाशानें आपापलें संपूर्ण व्यवहार करितात, त्याप्रमाणेंच देह व त्याची जी मनबुद्ध्यादिक इंद्रियें हीं आत्म्याचे ह्मणजे आपल्या स्वात्मप्रकाशेंकरूनच जडरूप न राहतां प्रकाशमान होतात ह्मणजे सचेतन होतात; व आपापल्या वेगवेगळ्या क्रियाही करितात. जसा सूर्य जगत्क्रियेस प्रकाशक या नात्यानें कारणीभूत आहे पण लोकांच्या क्रियेसंबंधीं मात्र कर्तृत्वविरहित अक्रिय आहे तसेंच आपण जें आत्मरूप ह्मणजे स्वमिथ्यत्वाचें जें स्वसत्यज्ञान तें, इंद्रियादिकांस प्रकाशून त्यांच्या क्रियेमध्यें अलिप्त असें आहों.

देहेंद्रियगुणान्कर्माण्यमले सच्चिदात्मनि
अध्यस्यंत्यविवेकेन गगने नीलतादिवत् ॥

सच्चिदानंद जो आत्मा त्याचे ठिकाणीं कर्तृत्वाचा गंधही नसतां ह्मणजे तो सतत अक्रिय निर्विकल्प भेद्याभेद्यरहित गुणातीत असतां, 'जसें अज्ञानी जन आकाशाचे ठिकाणीं नसणाऱ्या' नीलिमेचें अस्तित्व मानितात त्याप्रमाणेंच स्वात्मज्ञानास विन्मुख झालेले असे जे अप्रौढ जन तें कर्म करणें हा गुण इंद्रियांचा आहे व देह हेंच कर्मबीज आहे असें यथार्थ न जाणतां कर्माचें कर्तृत्व आपणाकडे घेतात ह्मणजे सच्चिदानंद आत्म्यावर, लागू करितात.

अज्ञानान्मानसोपाधेः कर्तृत्वादीनिचात्मनि ॥
कल्प्यतेऽबुगतेचंद्रे चलनादियथांभसः ॥

ज्याप्रमाणें पाण्यांत पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबास पाण्याचा धर्म जो चंचलत्व अगर हलणें आहे तो लागू करितात, त्याप्रमाणेंच अज्ञानी लोक, आत्म्याचें प्रकाशरूपी प्रतिबिंब अंतःकरणरूप जलांत पडलें असतां, अंतःकरणाचा चंचल गुण आत्म्यावर लागू करितात. या

ठिकाणीं ध्यावयाचें तें एवढेंच कीं, जलामध्यें आकाशांतील चंद्र जसा आपल्या अभावरूपानें आहे, तसाच आत्माही अंतःकरणरूप जलाचे ठिकाणीं आपल्या अभावरूपानें आहे. जसें चंद्राचें प्रतिबिंब पाण्यांतील अभावरूप जलोपाधियोगें हलत आहे असें दिसतें, तद्वतच आत्म्याचें अभावरूप ह्मणजे आत्म्याचा किरणरूप भाव जें अंतःकरणपंचक व त्यांतील प्रतिबिंबित चिदाभास, तोही कर्त्ताभोक्ता दिसतो. जसा जलाचे ठिकाणीं चंद्र प्रतिबिंबरूपानें आहे असें भासलें, तरी आकाशांतील चंद्राचें स्थलांतर झालें असें होत नाहीं, तो स्वयमेव आहे त्यास्थलीं जशाचा तसाच आहे व जसा तो प्रत्यक्ष जलाचे ठिकाणीं आलाही नाहीं व गेलाही नाहीं, त्याप्रमाणेंच सच्चिदानंद ज्ञानघन सर्वस्थानापन्न व्याप्ति आहे ज्याची असा जो आत्मा, तो आपल्या सत्यरूपानें अंतःकरणपंचकरूपी जगद्रूपास व त्यांतील चिदाभासरूपी जीवरूपास आलाही नाहीं व गेलाही नाहीं.

मिथ्या रजतभासास जशी सत्य शुक्तिका अधिष्ठान आहे, तसा आत्माही अंतःकरणपंचकादिकांस व अनंत जीवरूपांस अधिष्ठान आहे. सत्यशुक्तिका व मिथ्या रजतभास हीं परस्परांहून भिन्न आहेत असें भासतें, परंतु मिथ्या रजतभास हा वंध्यासुतवत् मुळींच अभाव आहे असें जाणलें म्हणजे उभयतांमधील द्वंद्वभाव नष्ट होऊन केवल शुक्तिकाच खरी ठरते; त्याप्रमाणेंच आत्म्याचे ठिकाणीं म्हणजे आपलें जें निर्विकल्प परब्रह्मरूप आहे त्याचें ठायीं सुखदुःख भोगणारें, कर्तुत्व घेणारें, तसेंच द्वंद्व उभारणारें जें अज्ञानरूपी शबलरूप तें मुळींच अभाव असून शुक्तिका रजतवत आहे. ही संपूर्ण स्थिरचर सृष्टि अभावरूप झाली म्हणजे एक अद्वैत परब्रम्ह आहे तसेंच अनुभवास येईल. असा न्याय ठसला ह्मणजे अज्ञानी लोकांचा जो आत्म्यावर कर्तृत्वाचा व भोक्तृत्वाचा धर्म लागूं करण्याचा समज आहे तो चुकीचा ठरेल.

असो, वर सांगितल्याप्रमाणें जर जीवात्मे आपापलें अज्ञानावरण दूर करणार नाहींत व स्वमिथ्यत्वाचें स्वसत्यज्ञान प्राप्त करून घेणार नाहींत, तर तें ज्ञानाचे अभावानें अनादिसिद्ध अज्ञानरूपी जीवात्मे ठरतील. त्यांचें अज्ञानावरण दूर न झाल्यामुळें त्यांच्या ठायीं देहाध्यास पूर्ण राहतो. त्यामुळें जीवात्म्यांना देहाच्या आकाराची व देहधारण करण्याची अप्रीति उत्पन्न होतच नाहीं. जरी जीवासमवेत अंतःकरणपंचक एका शरीरास सोडून अन्य शरीरीं गेलें, तरी आत्मा सर्वत्र असल्यामुळें त्या ठिकाणींही तें सचेतन राहतें, व सुखदुःखाचे भोग भोगतें. आपण आरशांत रूप पाहतों तेव्हां आपलें प्रतिबिंब आपणास पुढें आरसा असतां जसें दिसतें तसेंच आरसा बाजूस ठेविला तरीही मनोमय दिसतें. याचें कारण त्या आरशांतील प्रतिबिंबाचें उलट प्रतिबिंब आपल्या नेत्रेंद्रियावाटें अंतःकरणांत पडतें. त्याप्रमाणेंच जीवासमवेत असणारें अंतःकरणपंचक हें नेत्रेंद्रियावाटें पंचमहाभूतांच्या शरीररूप पिंजऱ्यास नित्य पाहत असतें, त्यायोगें शरीराचें व सृष्टीचें उलट प्रतिबिंब नेत्रेंद्रियावाटें अंतःकरणांत पडतें व अंतःकरणपंचक त्या देहाध्यासामुळें आकाररूप शरीराचें स्मरणरूपानें अस्तित्व घेतें. असें झाल्यानंतर अंतःकरणास मी शरीराचे आंतील प्राणाचे आंत असणारें आकाशरूप आहें असें स्मरण होत नाहीं. मी शरीररूप पंचमहाभूतात्मक पिंजराच आहे असा देहाध्यास होतो. वास्तविक पहातां देह दृश्य असून अंतःकरणपंचक अदृश्य आहे. देह हा पंचमहाभूतांचें संयोगजन्य कार्य आहे व अंतःकरणपंचक हें अपंचीकृत भूतांपैकीं आकाशाचा गुण आहे. यामुळें देहाच्या नाशाबरोबर अंतःकरणाचा व त्याबरोबर असणाऱ्या जीवाचा नाश होत नाहीं. अंतीं जरी जीवानें देह सोडून दिला तरी देहाची स्मरणरूप आकृति जीवात्म्याबरोबर राहतेच. त्यामुळें देह पातानंतर स्वप्न-

सृष्टिवत् भोगसृष्टि आपोआप त्या त्या जीवात्म्यापासून निर्माण होते; व भोगदेह ज्याचा त्याचयापुढें आपोआप उभा राहतो. भोग घडणें हें देहधारण केल्यावांचून घडत नाहीं, त्यामुळें तो वासनात्मक लिंगदेह पूर्व देहाच्या जातीचा पण आकृतीनें मात्र भिन्न असा चौऱ्याशी लक्ष योनींपैकीं एखादा देह धारण करण्याकरितां प्राणिमात्रांच्या शरीरीं अन्नामधून, श्वासामधून, अगर उदक प्राशनांतून प्रवेश करितो. हा वासनात्मक लिंगदेह जेव्हां जन्म घ्यावयास जातो तेव्हां प्रथम पुरुष जातीच्या प्राण्याच्या शरीरीं प्रवेश करितो. नंतर तो बापाच्या रेतास आकर्षण करून रेतांत मिश्र होऊन राहतो. अशा ह्या रेत रूपानें तो बापाच्या शरीरीं एकूणपन्नास दिवसपर्यंत असतो. त्यापैकीं पहिले सप्तकांत म्हणजे सात दिवसांत रसरूप उत्पन्न होतें. द्वितीय सप्तकांत त्या रसाचें रक्त होतें. तृतीय सप्तकांत रक्ताचें मांस होतें. चतुर्थ सप्तकांत मद्य बनतें. पंचम सप्तकीं मज्जा उत्पन्न होते. सहाव्या सप्तकीं अस्थि पैदा होते, व सप्तम सप्तकांत शुक्र उत्पन्न होतें. अशा रीतीनें एकूणपन्नास दिवसांत तो वासनात्मक लिंगदेह शुक्ररूपाप्रत येऊन पितृकोठ्यांत राहून नंतर मैथुनकाळीं मातृगर्भ कमळीं योनिद्वारें बुडबुड्याच्या आकृतीनें प्रवेश करितो. त्या वेळीं बाप जर आपल्या नासिकांतील उजवा स्वर जोरानें वाहत असेल अशा वेळीं स्त्रीसंभोग करील व त्या संभोगांत जर बापाचें रेत स्त्रीचे रक्तापेक्षां अधिक असेल तर पुरुष जन्म प्राप्त होतो. बापाचा डाव्या नासिकांतील श्वास अधिक जोरानें वाहत असेल आणि संभोगकाळीं जर स्त्रीचें शोणित पुरुषाचे रेतापेक्षां अधिक होईल तर कन्येचा जन्म प्राप्त होतो. जर उभयतांचे समस्वर चालत असून उभयतांचें रेत व रक्त समसमान होईल तर नपुंसकाचा जन्म प्राप्त होतो. परंतु हें होणें पूर्वसंचितावर अवलंबून आहे. आईचे उदरीं नऊ महिने तागाईत

तो राहतो. त्यांत प्रथम मासीं त्यास शिर प्राप्त होतें. द्वितीय मासीं भुजा, तृतीय मासीं उदर आणि अवयव, चतुर्थ मासीं हस्त व पाद, पंचम मासीं अस्थि व शिरा, सहावे मासीं त्वचा, व रोम; सातवे मासीं नखें व केश, व आठवे, नववें मासीं जातिस्मरण याप्रमाणें अनुक्रमें साव-यव देह प्राप्त होतो. नंतर तो योनिमुखांतून बाहेर पडतो. तेव्हां लागलेंच त्यास पूर्वदेहाचें विस्मरण होतें आणि त्यामुळें घाबरून तो रडूं लागतो. नंतर त्या रडण्यांत कोहं कोहं ह्मणजे मी कोण मी कोण अशा अर्थाचा शब्द काढितो. मी कोण हें कळत नसल्यामुळें तो प्राणि ज्या जातीचा देह प्राप्त झालेला असतो, त्या देहासच मी ह्मणून राहतो. त्याच्या त्या शरीरांतील भागांपैकीं तीन धातु पित्याच्या शरीरांतील असतात आणि मातेच्या शरीरांतील चार असतात. असे सप्त धातु मिळून शरीर होतें. त्यांत अस्थि, शिरा व मज्जा या तीन धातु पित्याच्या, व त्वचा, रोम, मांस आणि रक्त या मातेच्या धातु आहेत असें समजावें. याशिवाय या शरीरांत बहात्तर हजार नाड्या व साडे तीन कोटि रोम आहेत. बहात्तर हजार नाड्यांपैकीं मुख्य नाड्या दहा आहेत. पैकीं तीन नाड्या तर सर्वश्रुतच आहेत. त्यास इडा, पिंगला, सुषुम्ना असें ह्मणतात. असो. या प्रमाणें स्वस्वरू-पाच्या अज्ञानामुळें हे अनंत जीव आपापल्या वासनात्मक लिंग देहासह चौऱ्यायशीं लक्ष योनींत फेरे खात फिरतात.

या अनंत जीवांचा न्याय 'प्रतिबिंबं चैतन्यं जीवः' या न्यायानें समजावा. म्हणजे मलीन अंतःकरणांत जें सच्चिदानंद आत्म्याचें प्रति-बिंब पडलें आहे त्यासच जीव ह्मणतात. वास्तविक बुद्धिरूप अंतःक-रण जड आहे, परंतु आत्मा मात्र जड नाहीं. ज्ञानवान् आत्म्याचें प्रतिबिंब जें बुद्धींत पडलें आहे तेंही आत्म्याप्रमाणेंच ज्ञानवान आहे. ज्ञान असणें हा आत्म्याचा अनादिसिद्ध एक गुण आहे. या ज्ञानवन

आत्म्याचे प्रतिबिंबेंकरून बुद्धिरूप अंतःकरण जड असतां सचेतन ह्मणजे ज्ञानवान् असें झालें आहे. जीव व आत्मा यांत भेद इतकाच आहे कीं, बुद्धिरूपी आदर्शाचा नाश झाला कीं जीवही नाश पावतो, तसा आत्मा मात्र नाश पावत नाहीं. पाण्याच्या आटण्यानें पाण्यांतील प्रतिबिंबाचा नाश होतो सूर्य कांहीं नाश पावत नाहीं; त्याच न्यायें बुद्धिरूप जल आटलें असतां त्यांतील प्रतिबिंब जो जीव तो नष्ट होतो, परंतु आत्मा नष्ट होत नाहीं. बुद्धिरूप जल आटणें हें तर आत्म्याच्या ज्ञानप्राप्तिवांचून होतच नाहीं. त्यामुळें अज्ञान आहे तोंपावेतों जीवही अविनाश व अक्षय आहे. ह्मणून अज्ञानी प्राण्यांना सुखदुःखाचे भोग व जन्ममरणाची उपाधि अक्षय आहे. तसें ज्ञान्याविषयीं मात्र समजूं नये. त्यास आत्मज्ञानप्राप्ति झाली असल्यामुळें त्याचें अज्ञानरूपी जलच आटलें मग त्यांतील प्रतिबिंबित जो चिदाभास त्यास हयाती कोठची ? तो स्वात्मज्ञानेंकरूनच तरला म्हणजे नाहींसा झाला, व परब्रह्मरूपानें अक्षय सुखी आहे तसाच राहिला. आतां जीव हा श्रीकृष्णानीं आपला अंश आहे असें गीतेंत सांगितलें आहे त्याचाही स्पष्टार्थ सांगतों. श्रीकृष्णानीं अर्जुनास बोध करते वेळीं ह्मटलें आहेः—

ममैवांशो जीव लोके जीव भूतः सनातनः ।

म्हणजे जीव हा माझा सनातन सजातीत्वानें अंश आहे. यांत अंश ह्मणजे भाकरीचा चतकोर तुकडा हा जसा अंश आहे तसा जीव हा ईश्वराचा तोडलेला अंश नाहीं. परंतु एकाच धान्याची जशी एक मोठी भाकर व अनंत लहान लहान भाकरी करितात, व त्या जशा भंग न होतां परस्परांच्या अंश आहेत, त्याचप्रमाणें समष्टिरूप ईश्वर एक परब्रह्मस्थानीं ज्ञानरूपी स्मरणरूप भाव आहे व त्याच परब्रम्हस्थानीं अनंत जीव हे विस्मरणरूपी अविद्यात्मक भाव आहेत. परंतु जविेश्वराची जाति व ऐक्यता परब्रह्मरूपानें एकच

आहे म्हणून श्रीकृष्णांनीं जीवास अंश ह्मटलें हें योग्यच आहे. मागें जें शबल ब्रम्ह सांगितलें, तें परब्रह्म स्थानीं सत्य नसून काल्पनिक इच्छारूप आहे. ही इच्छा ह्मणजे परब्रम्हस्थानीं असलेली, 'ब्रह्माहमस्मि' ही स्फूर्ति होय. ह्मणजे मी ब्रम्ह आहें अशी जी स्वस्वरूपाची स्मरणरूप भावना तीच ज्ञानवान् ईश्वर आहे. मी ब्रह्म आहें असें शबलब्रम्हानें आपणांस ह्मटल्यानें त्यास द्वैतपणा येत नाहीं. कारण यास्थळीं दुसऱ्या वस्तूचें स्मरण घडतच नाहीं.

अहंब्रम्ह अशी जी शबलब्रम्हीं ज्ञानरूप स्फूर्ति त्यापैकीं 'अहं' असा जो ध्वनि तो निर्माण होण्यापूर्वीं भविष्यकाळांत होता. तोच निर्माण झाल्याबरोबर भूतकाळांत गेला व बाकी एक सच्चिदानंद अहंब्रम्ह अशा भावनेविरहित आहे तसेंच राहिलें. जी भावना भूतकाळांत गेली ती पुनः येणेंच नाहीं व वर्तमानकाळीं तिचें अस्तित्वही राहत नाहीं. मग भविष्यकाळीं तिचें अस्तित्व कसें संभवेल? असें जर आहे तर परब्रह्म निर्विकार नसावें तर कसें असावें? अर्थात् तें निर्विकारच आहे. 'अहं ब्रम्ह' अशी भावना झाली असें म्हटलें कीं, ती पूर्वीं नव्हती असें सिद्ध तर झालेंच; व अंतींही त्या भावनेचा नाश होतो असें अनुभवास येतें. यावरून जी आदि अंतीं नाहीं ती मध्यें तरी कशी असेल?

जी आदि नाहीं, ती अंतीं व मध्येंही नसलीच पाहिजे; असा सिद्धांत आहे. यावरून उघड होत आहे कीं, वंध्या सुताचे अस्तित्वाप्रमाणें परब्रम्हीं 'ब्रह्माहमस्मि' या स्फूर्तीस अस्तित्व येतें. यास अनुसरूनच दासबोधांत श्रीरामदास ह्मणतात. 'निश्चळीं चंचळ स्फुरलें व स्फुरलें तें वायां गेलें.' यावरून उघडच झालें कीं, परब्रह्मीं 'अहंब्रम्ह' ही भावना झालीच नाहीं. व ही भावना नाहीं ह्मणून जगतही नाहीं. परंतु असें दृढ ज्ञान होणें हें विचार केल्यावांचून कळावयाचें नाहीं. असें जाणून ग्रंथकारांनीं सृष्ट्युत्पत्ति वगैरेचा निर्णय ग्रंथांत केला आहे.

जो गाढ निद्रेंत आहे तो निद्रेचा अनुभव निद्रेहून पृथक न राहतां घेतो. त्याप्रमाणेंच ज्ञानीही परब्रम्हाचा अनुभव द्वैत सोडून ह्मणजे आपल्या अहंपणाचा त्याग करून घेतो; परंतु हें वर्म अज्ञानी प्राण्यास कळत नाहीं. हें जाणून त्यांना कळण्याकरितां पुढें जास्त विवेचन करितों.

मागें जी ब्रम्हीं इच्छा झाली म्हणून सांगितलें, तीसच वेदान्त शास्त्रांत महतत्व असें म्हटलें आहे. त्या महतत्वाचे पोटीं ध्वनिरूप ओंकार उद्भवला. ओंकारामध्यें बिजांत वृक्ष या न्यायें साडेतीन मातृका आहेत. त्या अकार, उकार, मकार अशा आहेत; व तिन्ही मात्राचा मिळून होणारा जो ॐ असा ध्वनिरूप नाद, त्या नादासच अर्ध मात्रा असें ह्मणतात. यांत ॐ कारासच साम्यप्रकृति असे म्हटलें आहे. त्याचें कारण ॐकारांत अकार रजोगुण, उकार सत्वगुण, व मकार तमोगुण, असे तिन गुण सारख्या प्रमाणानें आहेत. हे तीन गुण मूळ एकाच नादाकार अर्धमातृकेंत गुप्त असल्यामुळें त्या नादांत ते अव्यक्त राहतात. म्हणून अर्धमातृकेस कित्येक ठिकाणीं अव्यक्त ॐकार असेंही म्हटलें आहे. हे तिन्ही गुण जेव्हां ब्रह्मा, विष्णु, महेश व पंचमहाभूतें यांच्या रूपानें भासूं लागले, तेव्हां त्यांसच व्यक्त ॐकार असें नांव दिलें. हा ॐकार पूर्वीं जें 'अहं' असें स्फूर्तिरूप स्फुरण सांगितलें 'त्या स्फूर्तींत बिजांत वृक्ष' या न्यायें अव्यक्त असतो. यामुळें 'अहं' या स्फुरणास त्याच्या आद्यरूपानें अव्यक्त ॐ कार असेंही नांव दिलें आहे. 'अहं' या शब्दाच्या नादास अर्धमात्रा असेंही ह्मणतात. नादविरहित जो अव्यक्त ॐकार त्यास पुरुष असें म्हणावें, व नादाकार ओंकारास प्रकृति अगर महदाकाशही म्हणावें. अर्धमातृकेंत सच्चिदानंद ब्रह्माचें जें प्रातिबिंब पडलें आहे त्यासच सर्व शक्तिमान ईश्वर असें ह्मणतात. हा ईश्वर प्रत्येक प्राणिमात्रांच्या शरीरीं अहंपणाचा अंतशेष जें निश्चळ ज्ञानस्वरूप तत्व आहे त्या शिव स्वरु-

पानें अनुभवास येतो व सुखदुःखाच्या साक्षित्वरहित 'अहंब्रम्ह' या महाकारण देहांतील भावनेचा म्हणजे स्मरणरूप महतत्वाचा अगदीं जो सत्वगुण आहे, त्यांतील प्रतिबिंबरूपानें अनुभवास येतो. या ईश्वरास मी निराकार एक अनेकातीत आयताच स्वतःसिद्ध निर्विकार आहें असें स्वभावसिद्ध ज्ञान आहे. यामुळें त्यास परब्रह्मप्राप्तीचा योग साधावा लागत नाहीं. तो इच्छामात्रें लागेल तें करण्यास समर्थ आहे. माया ही त्याचे ताब्यांत आहे, कारण तो सत्वप्रधानप्रकृति धारक आहे. जीवास लागेल तें न करितां येण्याचें कारण माया ही त्याचे स्वाधीन नाहीं. कारण सत्वप्रधानगुण ईश्वरानें आपल्या स्वतः करितां आकर्षिल्यामुळें प्रकृतींत रज, तम हे अज्ञानमूलक दोन गुण अधिक राहिले. त्यामुळें रजतममय प्रकृतींत प्रतिबिंबित जें ब्रम्हरूप त्यासच जीव म्हणतात. हे जीव एका अग्नीच्या जशा अनंत ठिणग्या असतात त्याप्रमाणेंच एका अविद्येपासून अनंत झालेले आहेत. त्यामुळें ते स्वतः स्वसंवेद्य, ज्ञानी, निर्विकार, सर्वशक्तिमान असे नाहींत. जीव व ईश्वर यांचा भेद दाखविते वेळीं कित्येक ग्रंथांत जीवास घटाकाशाची उपमा दिलेली आहे व ईश्वरास महदाकाशाची उपमा दिलेली आहे. महदाकाशास उपाधि बिलकुल नाहीं व घटाकाशास घटाची उपाधि आहे. घट हा अति लहान क्षुल्लक पदार्थ असल्यामुळें घटाकाशामध्यें कार्येंही क्षुल्लकच होतात. पण महदाकाशाची गोष्ट तशी नाहीं. महदाकाश एकच अनंत अपार निरुपाधिक असल्यामुळें त्यांत कार्येंही पाहिजे तीं होऊं शकतात. सामर्थ्यासंबंधानें पाहतां घटाकाश व महदाकाश यांत महदंतर आहे. परंतु स्वरुपाचे संबंधानें तसें नाहीं. घटाकाश व महदाकाश हें एकच अभेद तत्व आहे. जरी घटांतील पोकळी व महदाकाश ह्मणजे घटाचे आंत बाहेर व अनंत अपार ब्रह्मांडगोलांचे आंत बाहेर असणारी पोकळी एकच अभेद आहे, तथापि

'उपाधितोमलः' या उक्तीप्रमाणें घटाकाशास गौणत्व येतें. या दृष्टांतान्वयें जीवास अविद्योपाधिक घटाची उपाधि आहे. ती महदाकाशस्थानापन्न असणाऱ्या ईश्वरास नाहीं. जीवाची स्वस्वरूपाविषयींची विन्मुखता गेली म्हणजे अज्ञानावरणरूपी घट फुटला म्हणजे 'जीवो. ब्रह्मैवनापरः' या उक्तीप्रमाणें जीव व ब्रह्म यामध्यें भेदच राहणार नाहीं. करितां जीवानें आपला अज्ञानावरणरूपी घट फोडण्याविषयीं अवश्य प्रयत्न करावा. हा ज्ञानप्राप्तीचा उद्योग सफल होण्यास ज्ञानी पुरुषांचेंच साह्य असलें पाहिजे. ईश्वरावांचून स्वयंभु ज्ञानवान असा अन्य कोणी नाहीं. म्हणून जीवानें आत्मज्ञान प्राप्त्यर्थ प्रथम ईश्वरोपासनाच केली पाहिजे. ईश्वरोपासना करण्याचे मार्ग अनंत आहेत. त्यांत मुख्य ते येथें सांगतों. ईश्वराचें ध्यान व मानसपूजा करण्याचे प्रकार मुख्य तीन आहेत. त्यांसच शिवयोग, विष्णुयोग व ज्ञानयोग असें म्हणतात. शिवयोग म्हणजे मनोमय वाटोळा प्रकाशमय असा नीलबिंदु मस्तकाचे आंत भ्रुमध्यासमोर कल्पून त्या बिंदूवर विषयांवरील मन काढून लावणें व चित्त स्थिर करणें. प्रथमारंभीं बिंदु दृष्टीसमोर स्पष्ट दिसत नाहीं; करितां निश्चय न सोडतां नित्य ध्यान करीत गेल्यानें बिंदु स्थिर होऊन स्पष्ट दिसूं लागतो. करितां बिंदु स्थिर होईपर्यंत ध्यान केलें म्हणजे शिवयोग पूर्ण झाला. नंतर त्याच स्थिर झालेल्या प्रकाशमय बिंदूस हस्तपादादिक अवयव कल्पून श्रीविष्णूच्या मूर्तीचें ध्यान करावें. त्या बिंदूचे ठिकाणीं जसजसा अवयव प्रकट दिसूं लागेल तसतसा ध्यात्यास आनंद होत जातो. सर्व अवयव प्रकट होऊन श्रीविष्णूची सावयव, चतुर्भुज, शामरंगी, सुहास्य वदनी, आकर्ण नेत्री, कंठीं वैजयंती माला, व कौस्तुभमणि, कानांत कुंडलें, दंडीं, अंगदें, करांगुलींत मुद्रिका, मस्तकीं मुकूट, भाळ विशाळ, अशी मूर्ति स्पष्ट दिसूं लागली म्हणजे

ध्यान योग सिद्ध झाला असें समजावें. अशा या श्रीविष्णूचे ध्यानास विष्णुयोग म्हणतात. हें ध्यान सिद्ध करणारास इच्छिलेलें प्राप्त होऊन, एकांतवास आरोग्य, शरीरास कांति इत्यादि अवश्य प्राप्त होतात. त्याच मनोमय कल्पिलेल्या बिंदूचा किंवा बिंदूला कल्पिलेल्या अवयवासहित मतीचा अंतर्यामीं जो जाणणारा अनंत अपार पोंकळीचे आंत स्वयंप्रकाश, अचंचल, ज्ञानवान आहे, तोच मी आहें, असा ध्यान करणारानें भाव धरून अहंपण धरणाऱ्या ज्ञानाहून आपणांस वेगळें पाहून विषय साक्षित्व नसतां सहज आपण देह पिंजऱ्याचे आंतील व बाहेरील जी एक अनंत अपार पोंकळी त्या पोंकळीचा भाव सोडून, मींच ती पोंकळी, अशा भावनेनें स्वयंप्रकाश अद्वैत निराकार आहें असें अंतर्दृष्टीनें समजणें यास ज्ञानयोग असें ह्मणावें. हे तन्हीही योग निराकार परमेश्वराचें ज्ञान होऊन स्वात्मैक्य ज्ञानानें तरून जावें अशा हेतूनें जे आचरतात, त्यांसच ईश्वराचे खरे भक्त ह्मणावें व तेच तरले असें समजावें. हें योगाचरण न करणारास ईश्वरी साक्षात्कार व ज्ञान हीं होणेंच नाहीं. ह्मणून प्राणिमात्रांनी हे वर सांगितलेले योग अवश्य साधावे. ध्यान धारणा केल्यावांचून नुसतें तोंडानें निराकार निराकार म्हणणारे ईश्वरभक्त होत नाहींत. निराकाराचा वियोग दूर होणें हें काम मनाच्या व इंद्रियांच्या दमनशक्तीवर अवलंबून आहे. मन स्थिर होणें हें काम दृष्टापुढें विषय असल्यावांचून होणें नाहीं. म्हणून वेदांमध्यें सुद्धां ही वर सांगितलेली बिंदुधारणा सांगितलेली आहे. प्रमाणः—

'नीलतोयदमध्यस्थयाविद्युल्लेखेव भास्वरा ॥
नीवारशुकवत्तन्वीपीताभास्वत्यणूपम ॥'

श्रुति.—

याप्रमाणें बारीकशा अग्नीच्या ठिणगीएवढा अगर मोहरीच्या आठ-

ल्या हिरशाइतक्या बारीकशा नील बिंदूचें ध्यान अगर मूर्तीचें ध्यान करण्यास बसण्याबरोबर सर्व शरीर व शरीरांतील पंचप्राणवायु स्थिर होतील व मनही कांहीं वेळ निश्चळ होईल; आणि जसजसा त्या बिंदूस अवयव फुटेल तसतसें ध्यान करणारास अधिकाधिक सौख्य होऊं लागेल, व ध्यानांतून उठण्याबरोबर झोंपेंतून उठण्यानंतरच्या सुखाहून कांहीं वेगळ्या जातीचे सौख्य होईल. यास्तव हें वर सांगितलेलें ध्यान अवश्य करावें,

श्रीकृष्णाची अगर श्रीरामाची शामसुंदर कमलनयन सुहास्यवदन अजानुबाहु जी रमणीय अवतार मूर्ति, ती मनोमय ध्यानांत दृढ राहिली असतां, सत्वगुण म्हणजे वृत्तीचा उत्तम स्वभाव, तो उत्पन्न होऊन ध्यान करणारास शांतीचा अनुभव मिळतो व आत्मज्ञानाच्या गोष्टि सांगितल्या असतां त्यास कळूं लागतात. अथवा रजोगुण म्हणजे वृत्तीचा लोभी स्वभाव व तमोगुण ह्मणजे वृत्तीचा घातकी स्वभाव हे दोन्ही शेवटीं गडबडतात किंवा नाहींसे होतात. असा साकार सगुण ध्यानाचा महिमा आहे. हें जाणून आणखी एक मानसपूजेचा सुंदर मार्ग येथें लिहितों. ही मानसपूजेची राहणी सर्वांनीं ह्मणजे कोणी ज्ञानी असो किंवा अज्ञानी अल्पमति असो त्या उभयतांनीं उपयोगांत आणावी. यांत अत्यंतच फायदा आहे. ही मानसपूजेची रहाणी अशी आहे कीं, आपलें शरीर हेंच कोणी एक देऊळ आहे असें समजावें; या शरीररूप देवळांत आपल्या शरीरांत जे पंचप्राण व मन इत्यादि आहेत त्यांचीच अवतार मूर्ति कल्पून करावी. त्या अवतार मूर्तीच्या ठिकाणीं सर्वोपचार प्राण व मन यांचेच करावे; आणि मानसपूजा करावी. येणेंकरून मन स्थिर होतें. मनाचीच मूर्ति केल्यामुळें त्या मूर्तिरूप मनाचे साक्षि जे आपण ते त्या मनाहून कांहीं वेगळ्या जातीचें तत्व आहों असा विचारांतीं अनुभव येतो, हा मोठाच

फायदा आहे. शिवाय असें करण्यापासून योग करणारास दूरदृष्टि येऊन तो भूत, भविष्य, वर्तमान काळीं होणाऱ्या गोष्टि जाणतो व आपण एक निर्विकल्प निराकार ज्ञानघन सच्चिदानंद आहों असें त्यास कळून येतें. शिवाय तो ज्या अवतारी मुर्तीचें ध्यान करितो ती थोडेबहुत अनुभवाचें अंग दाखवून त्याचे बुद्धीस अस्तिकपणा देते. त्यामुळें प्राण्यास ब्रह्मप्राप्ति होऊन तो जन्ममरणाच्या यातायातींतून सुटतो. करितां वर सांगितल्याप्रमाणें देह हेंच एक देऊळ आहे असें मानून डोळे मिटून बसावें. नंतर डोळ्यांचे अंतर्भागांत ह्मणजे भ्रूमध्याचें समोर मनाची मोहर डोळ्याचे आंतून ऊर्ध्व करून एक सुंदर रत्नजडीत व सुवर्णखचित असें स्थळ कल्पावें. त्या स्थळाचे आजुबाजूस एक सुंदर बकूळ, पारिजातक, तुळस, मांदार, कल्हार इत्यादि वृक्ष पुष्पफळें करून युक्त, असें अरण्य कल्पावें. जिकडे तिकडे स्वच्छंदी व मनुष्याचें बंधनरहित शुक, मयुर, मैना, तास, चंडोल, अशा जातींचे सौम्य पक्षी वृक्षांवर बसून सुंदर शब्द करिताहेत असें कल्पावें. अनेक गाई, मृग इत्यादि स्वच्छंदानें इकडे तिकडे हिंडताहेत व आपापल्या वत्सांवर प्रीति करिताहेत, असें कल्पावें. छाया घनदाट आहे, आणि जशी मयूर पिच्छें सूर्याच्या किरणानें चमकतात तसा प्रकाश त्या छायेंत पडला आहे असें कल्पावें. चंदन, देवदार, व उत्तम फुलांनीं फुललेल्या मधुमालती इत्यादि वृक्षांवरून सुगंधयुक्त शीतळ वायु वाहत आहे असें कल्पावें. सिताफळी, रामफळी, केळीं, नारळी, पोफळी, अंजीर, द्राक्ष, डाळिंब, जायफळ, लवंगा, अंबे, आंवळे, लिंबें इत्यादि अनंत जातीचे वृक्ष फलपुष्पादिकें करून लवले आहेत, असें कल्पावें. व अनेक औदुंबर वृक्षही कल्पावें. नंतर देवदारू, चंदन, व बकूळ इत्यादि वृक्षांचे मध्यभागीं एक अति शोभायमान रत्नजडित सुवर्णाचें मंदिर कल्पावें. त्या मंदिरांत दिवा-

णखाने, शयनाच्या जागा, व एकांत बसण्याच्या जागा बहुत असून त्याचे अष्ट दिशांस आठ चौक आहेत, व मध्यभागीं एक विशाळ वर्तुळ अशी जागा आहे असें कल्पावें. त्या जागयांत मोत्यांचें छत दिलें आहे व सुवर्णाची सर्व भूमिका आहे, व सर्व सभेंतील कठडे वर्तूळ असून त्या वर्तूळ कठड्याप्रमाणें वर्तूळ कठड्याचे घेर पांच आहेत, ते असे; पहिला हिऱ्यांचा, दुसरा पांचेचा, तिसरा माणिकांचा, चवथा त्याचे आंतील पुष्परागांचा व पांचवा सुवर्णावर मोतीं, हिरे, पुष्पराग, माणिक, यांच्या जडावाचा, असे कठडे एकाचे आंत एक आहेत असें कल्पावें. त्या कठड्यांचे आंत जाण्यायेण्यास वाटा असून मध्यभागीं एक सुंदर सुशोभित अष्टदल कमलपुष्पासारखें व बहुत रत्नांनीं जडलेलें असें पाहणाराच्या उराइतकें उंच सिंहासन आहे, त्याजवर बसण्याचें आसन आहे; त्या आसनावर मयूर पिछांची गादी घातली आहे, व मोत्यांचे घोंस लोंबताहेत असें एक छत्र त्या आसनावर शोभिवंत आहे असें कल्पावें. इतकी मनोमय कल्पना करून नंतर त्या आसनावर सीतेसहित जगदोद्धारक श्रीरामचंद्र बसले आहेत व आपण हात जोडून प्रार्थना करीत आहोंत, अशी भावना करावी व सर्व स्वरूप अवलोकन करावें. भगवान् श्रीरामचंद्र शामसुंदर सगुणरूप असून श्रीरामाचे चरणतल, ध्वज, वज्र, अंकुश, कमल इत्यादि रेषासहित आरक्त आहेत, व अंगुलींचीं नखें स्वच्छ ताऱ्याप्रमाणें झळकत आहेत, पायांत सुंदर तोडे आहेत, पोटऱ्या इंद्रनील मण्यासारख्या झळकत आहेत, जानु, जंघा ह्या अतिसुकुमार शाम रंगाच्या ओंतिव भासताहेत, शुभ्र जरीकांठी तांबड्या किनारीचा धोतरजोडा श्रीराम नेसले असून त्याची कांस घातली आहे, कमरेस मोतीं, हिरे यांची मेखला आहे, उदर सरळ सुशोभित आहे, कटिभाग वामसव्य भागांकडून कमानदार. व वक्षस्थळाकडील बाजूस रुंदावत गेलेला

आहे, त्यावर कौस्तुभमणी, व एकेरी मोत्यांचे हार जानुपर्यंत पदक-युक्त रूळताहेत, कंठ सरळ आहे, वक्षस्थळावर उजवेबाजूस श्री-वत्सलांछन आहे, श्रीरामाचे बाहु अजानु ह्मणजे उभे राहिलें असतां गुडघ्यापर्यंत पोहोंचतात, असे आहेत, हातांत मुद्रिका, वीरकंकणें, दंडांत मोत्याची पोंचीं, बाहूवर रत्नजडित कवच, कानांला लागलेलीं अशीं कुंडलें आहेत, त्यांचा आकार मच्छासारखा आहे, तीं स्कंधा-खालील कवचास जडलेलीं व स्कंधाचे बाहेर गेलेलीं अशीं आहेत; मस्तकावर रत्नजडित सुंदर सोळा कळसांचा मुकूट आहे, ते कळस परस्परांशीं समान आहेत, डावे बाजूस पांढऱ्या चौरीप्रमाणें मोत्यांचा तुरा मुकुटांत खोंचलेला, कपाळास चंदनाचा उभा तिलक लाविलेला, त्या तिलकावर मध्यभागीं केशर व कस्तु-रीचा बिंदु आहे, आणि कपाळ विशाळ शामसुंदर आहे, भिवया अति सुरेख असून ओंठ आरक्त आहेत, नाक सरळ व सुरेख आहे, हनुवटी किंचित् दोहोंबाजूंचे समान आकार दाखविणारी आहे आणि मुख किंचित् किंचित् हांसरे आहे. आकर्ण नेत्र असून ते प्रफुल्लित केले असतां कमळासारखे, व मध्यभागीं काळें बुबूल, सुंदर कमळांत भ्रमर तसे शोभिवंत आहेत, व प्रकाशमय कृपादृष्टीनें श्रीराम आपणाकडे पहाताहेत, असें कल्पावें. हातांत धनुष्यबाण इंद्रनील मण्याच्या रंगाचे, परंतु त्यांत आरक्तता अशा प्रकारची शोभिवंत आहे, व त्यांत इतकी शक्ति आहे कीं, ह्या सूर्य गोल व भूगोलासारख्या अनंत गोलांचे एकच बाणानें फुटून तुकडे होऊन जावे, मग तोफा, बंदुका, वगैरे शस्त्रें श्रीरामापुढें अगदीं निरुपयोगीं आहेत असें कल्पावें. श्रीराममूर्ति द्वादश वर्षांची कोमल व मुख स्मश्रूरहित आहे, त्यांत कधीं फेर व्हावयाचाच नाहीं, आणि सुंदर केंस मुकुटाखालीं झांकले आहेत परंतु किंचित् बाजूनें कृष्णवर्ण झळकताहेत, अशी श्रीराममूर्ति

मनोमय मनाचीच करून त्यासन्निध सिंहासनावर वामभागीं त्रैलोक्य सुंदरी सीता, जिचें मुख आल्हादकारक, नेत्र मृगासारखे व वदन सुहास्य आहे अशी श्रीरामाचे आंगाशीं स्पर्श करून बसली आहे, व दोघेही आपणांकडे कृपादृष्टीनें पाहत आहेत, याप्रमाणें मनोमय आपल्या मनाचाच आकार कल्पून अहंपण धरणाऱ्या ज्ञानानें डोळ्याशिवाय मनोमय पहावा. त्या श्रीरामापुढें आपलें कल्पित शरीर मनोमय कल्पनेंचच धारण करून उत्तम प्रकारानें श्रीरामाच्या व सीतेच्या गळ्यांत बकुळीच्या पुष्पांचे हार तुळशीच्या मंजिरांनीं युक्त असे घालावे. आंगावर अनेक पुष्पें उडवावीं आणि सुंदर शीतळ उदक घेऊन श्रीराम व श्रीसीता मजवर कृपा करावयास आलीं आहेत असें समजून सेवेंत तत्पर रहावें. नंतर श्रीराम व श्रीसीता ह्यांचे पाय आपण प्रक्षालन करावें, आचमनास शुद्धोदक द्यावे, आणि श्रीसीतेस व रामचंद्रजीस उत्तमोत्तम पक्क फळें भोजनास द्यावीं. त्यांच्या संकेतानुरूप उदक प्राशनास द्यावें आणि फलहार झाल्यावर मुख व हस्त प्रक्षालन करून श्रीसीता रामचंद्रजी स्वस्थ बसले आहेत असें पाहून मग तांबूलार्पण करावें. सुगंधिक द्रव्यें अर्पण करून प्रार्थना करावी कीं, हे राजाधिराज, हे अयोनिसंभव, हे विश्वव्यापक, हे अंतर्साक्ष, हे जगन्नायक, हे ज्ञानदायक हे कोटिसूर्य प्रकाशमान असून हिमकर सुशीतळ, हे सुखदायक, हे जगदोद्धारक मी तुला अनन्य शरण आहें. मला तुझी प्रीति अखंड राहो, व मला तुझ्या अखंड प्रीतीनें आत्मज्ञान होईल व निराकार स्वरूपाची शांति तुझ्या कृपेनें सहज प्राप्त होईल. शरीरांतील सर्व रोग, सर्व जीवापासून पीडा व मेल्यानंतर वासनात्मक सूक्ष्म देहास भोगस्वप्न पडतें, त्या भोगस्वप्नांत सुखदुःख होतें, पुनः पुनः जन्मास यावें लागतें, तें सर्व दुःख तुझ्या कृपेनें माझें दूर होवो, आणि पापपुण्य तुझ्या कृपेनें कांहींच न राहो. स्वर्गास जाऊन सुख भोगणें व नरकांत

पडून दुःख भोगणें हें तुझ्या कृपेनें माझे जीवास नसावे आणि मला तुझ्या कृपेनें संतोष असावा. माझी बुद्धि तुझ्या कृपेनें वाईट कर्माकडे न वळावी, मला मद्य, मांस खाण्याची इच्छा होऊं नये व कोणत्याही श्वासवान् जीवाचा माझ्या हातून वध न व्हावा आणि माझ्या मनांत जागेपणांत व स्वप्नांत तुझें अखंड स्मरण रहावें अशी प्रार्थना करावी. नंतर असें समजावें कीं, हें सगळें सगुणरूप आपल्या मनोमय पदार्थांचेंच झालेलें आहे व आपण सगुणमूर्तीस जाणणारे जे अहंता धारक ज्ञान, त्या ज्ञानाहून वेगळे सच्चिदानंद आहों तसेंच आहों. असें ध्यान झाल्यावर व्यवहारधंद्यास लागावें. तेणेंकरून ध्यान करणाऱ्या जीवात्म्यास शांति सौख्य मिळतें. हें मानसपूजेचें ध्यान आमचे गुरु विष्णुबावा ब्रह्मचारी यांणीं आपलें ग्रंथांत सांगितलें आहे. सर्वांनीं प्रेमानें हें ध्यान करावें व प्रचीति पहावी. केल्याशिवाय कांहींही होत नाहीं असें जाणून आळस टाकावा व ध्यानास लागावें. अशा प्रकारें ध्यान जर घडणार नाहीं तर प्राणिमात्राची विषयांवरील प्रीति नष्ट होणार नाहीं. यदाकदाचित् पूर्वाभ्यासामुळें स्वस्वरूपाचें ज्ञान जरी कोणास प्राप्त झालें असलें तरी त्याचें मन नेहमीं शांतच रहातें, असें नाहीं. एवढ्याकरितां ज्ञाते पुरुषांनींसुद्धां हें ध्यान सोडूं नये. पहा स्वतः श्रीकृष्ण भगवान् श्रीमद्भगवद्गीतेंत अर्जुनास सांगतातः—

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः**

अध्याय १२ वा. श्लोक २ रा.

अष्टधाप्रकृतिरूपी व त्या अष्टधाप्रकृति रूपाच्याच रूपानें जो स्वस्वरूप कसें आहे हें कळत नाहीं असें करविणारा अज्ञातेपणाचा भाव आहे, तोच जीवात्मा आहे. अशा अनेक जीवात्म प्रकृतिरूपी व ईश्वररूपी उभयरूपी राहणारा जो मी विश्वरूप परमेश्वर त्या 'मयीं' ह्मणजे माझ्या सगुणस्वरूपीं

'आवेश्यमनः' ह्मणजे मन ठेऊन मी जो श्वासोच्छ्वासाच्या मध्य संधींत संकल्परहित आनंदस्वरूप आहें, तोच मी चोवीस अथवा अनंत गुण, जे परमाणूंच्या अव्यक्त होण्यांत उत्पन्न होतात, त्यांतील श्वासोच्छ्वासाच्या चलनापासून मनबुद्धिअहंकारादिक अष्टधा प्रकृतिरूपाच्या उत्पत्तीच्या मध्यसंधींत वर्तमान काळांत नसून भविष्याचा भूतकाळ होण्याच्या अज्ञानरूपानें आनंदरूप आहे, त्या माझ्या आनंदरूपी मध्यसंधींतील नास्तित्वाच्या अस्तित्वांत मनाची उत्पत्ति व त्याचा अंत हे दोन्हीं भाग आहेत. त्या मनाच्या उत्पत्ति व अंत अशा दोन्हीं भागांना श्वासोच्छ्वासाच्या मध्यसंधींतील जो आनंद त्या आनंदस्वरूपाच्याच ठिकाणीं सुतांत कापूस या न्यायानें मनाचे अनंत संकल्परूप होऊन जें ध्यान घडतें त्यांत मी आनंदाचाच मनरूपींविश्वास तंतुपट आहे, असें मन माझ्या आनंदस्वरूपी अनन्य ओळखून ह्मणजे वेगळें न राहून त्या आनंदरूपाच्या ठिकाणीं सर्वकाळ 'युक्ता' ह्मणजे जडलेला राहून अनित्य अयुक्ता अज्ञाता जो सहजानंदाचा भोग सर्वकाळ असून तोच भोग विषयानंदाचा आहे असें मानितो, त्या अज्ञात्याचा अज्ञानाच्या नास्तित्वानें नाशच आहे, तसा अज्ञात्याचा अत्यंत आभावरूपी अस्तित्वाचा नाश ओळखून अयुक्तत्व ह्मणजे विपरितत्व सोडून जो युक्त झाला व मां म्हणजे मी जो त्याच विश्वरूपांतील ब्रम्हानंद रूपानें सर्वकाळ श्रीकृष्ण शामसुंदर कमलनयन उभा आहें, त्या मला 'यः' म्हणजे जो 'श्रद्धया परयः उपेता' ह्मणजे श्वासोच्छ्वासाच्या मध्यसंधींतील जो आनंद त्या सहजानंदाची विषयातीत प्राप्तीच हा शामसुंदर श्रीकृष्णदर्शन विषय आहे, असा उत्कृष्ट जो प्रेमभाव त्या प्रेमभावांत जडून राहून विश्वरूपी जो मी आनंदरूप त्या माझ्या श्वासोच्छ्वासाच्या मध्यसंधींतील रूपाशीं आत्मैक्य म्हणजे विभक्त नव्हे असा भक्त राहून त्या भक्तीचें रक्षण ह्मणजे भविष्याचा भूतकाळ होण्याच्या

मध्यसंधींतील वर्तमान काळांतील सहजानंद समस्वरूपाचें रक्षण आहे. तेंच श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीहरी, श्रीपांडुरंग, श्रीविठ्ठल या नांवांनीं माझ्या शामसुंदर स्वरूपाचें सगुणध्यान व नामोच्चयार करणें अथवा नामोच्चाराबरोबर गुण उच्चार करणें व सर्व काळ माझें शामसुंदर रूप आठवणें, याप्रमाणें ' उपासते ' ह्मणजे माझी उपासना करितात, ते जे ते ' युक्ततमः ' ह्मणजे युक्त असे जे श्वासोच्छ्वासाच्या मध्यसंधींतील आनंदाच्या अस्तित्वाचे ऐक्य, त्या एक्यानें पावलेले असून माझ्या शामसुंदर श्रीकृष्ण अगर श्रीरामरूपाच्या अन्वय प्रेमानें राहून दुसऱ्या लोकांस सहजानंद देणारे असे शक्तिमान् आहेत. ह्मणून ' मे मतः ' ह्मणजे माझ्या मतें ते युक्ततम म्हणजे श्रेष्ठ जे युक्त ज्ञानि अशा त्या ज्ञान्यांतच ज्ञानि असून सगुण उपासक अगर भक्त जे, तेच माझ्यामतें युक्ततम म्हणजे अत्युत्कृष्ट ज्ञानि आहेत; परंतु ज्ञानि होऊन हट्योग करून समाधिस्त होणें हें उपासनाकर्म करणारे युक्ततम नव्हेत कीं काय अशी शंका उद्भवेल, तर ते हटयोगकर्म मानवी शरीराला अत्यंत कष्टसाध्य आहे म्हणून ते हटयोग करणारे मानव युक्ततम नाहींत. तथापि ते स्वार्थाभिलाषि माझ्या निराकार स्वरूपाचा जीवात्म्यांतून वियोग जावा ह्या हेतूनेंच योग करितात ह्मणून ते माझेच भक्त आहेत. हट्योग प्राप्त करून घेऊन जे परमार्थ साधणारे यांच्या हातून परोपकार होत नाहीं. त्यांच्या इंद्रियांचा विषयभोग त्यास न मिळतां क्लेशप्राप्ति मात्र होते. करितां ज्ञानि होऊन माझी सगुण ध्यान धारणा श्रद्धेनें करणारे, तेच माझे खरे राजयोगी भक्त आहेत.

याप्रमाणें श्रीकृष्णांनीं सुद्धां ज्ञानि असून सगुणोपासना करणारेच भक्त मानिले आहेत. करितां वर सांगितलेला मानसपूजेचा मार्ग सर्वांनीं उपयोगांत आणून स्वात्मैक्य ज्ञानानें तरून जावें.

पहा ध्यानमात्र रामायणामध्यें सुद्धां श्रीरामाच्या ध्यानाचें वर्णन केलें आहे, तें असें:—

हत्वायुत्धेदशास्यंत्रिभुवनविषमंवामहस्तेनचापं ।
भूमौविष्टभ्यतिष्ठंनितरकरधृतंभ्रामयन्बाणमेकं ॥
आरक्तो पांतनेत्रः शरदलित वपुः कोटिसूर्य प्रकाशो ।
वीरश्रीबंधु रांग त्रिदश पति नुतः पातुमां वीर रामः ॥

अर्थ स्पष्टच आहे. याप्रमाणें श्रीरामचंद्रजीचें रूप मनोमय चिंतावें, व अतिशय ध्यान धारणा करावी म्हणजे साक्षात्कार होतो.

कोणी कोणी मतवादी लोक मूर्तिपूजा करणें हें चुकीचें समजतात व मूर्तिपूजा करीत नाहींत. ते म्हणतात कीं, निर्जीव किंवा जड वस्तूस देव म्हणणें रास्त नाहीं. तर त्याचें हें म्हणणें बरोबर नाहीं. पहा साक्षात् भगवंतांनीं हा मूर्तिपूजेचा विधि एक कल्पकाळापूर्वीं प्रथम ब्रह्मदेवास सांगून नंतर कश्यप, भृगु आदिकरून ऋषींना सांगितला आहे. प्रमाण

निःसृतंते मुखां भोजाद्यदाह भगवानजहः ।
पुत्रेभ्यो भृगुमुख्येभ्यो देवौच भगवान भवः

अर्थ वर दिलेलाच आहे. श्रीकृष्णांनीं उद्धवास असें सांगितलें आहे कीं, हा मूर्तिपूजेचा मार्ग अत्यंत महत्वाचा असून विधियुक्त आचरण करणारास अति जलद फल प्राप्त करून देणारा आहे. प्रमाण—

नह्यंतोनंतपारस्य कर्मकांडस्य चोद्धव ।
संक्षिप्तंवर्ण यिष्यामि यथा वदनु पूर्वशः

हा प्रतिमा पूजेचा मार्ग यथास्थित वर्णन करणें फारच अशक्य व श्रेष्ठ आहे. करितां हे उद्धवा, हा मार्ग तुला थोडक्यांत सांगतों. याप्रमाणें भगवंतानीं स्वमुखानें प्रतिमा पूजेच्या मार्गाचें महत्व वर्णन केलें आहे भागवतामध्यें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे.

वैदिक स्तांत्रिकोमिश्र इतिमे त्रिविधो मखः
त्रयाणा मीप्सितेनैव विधीनामासमर्चयेत्.

माझी पूजा करण्याचे मुख्य तीन मार्ग आहेत, ते असे, पहिला वेदांतील मंत्राचा जप करून वेदाची पूजा करणें, दुसरा, शास्त्रांत व वेदांत सांगितल्याप्रमाणें साकार मूर्तींच्या प्रतिमा करून पुजणें, तिसरा, वेदांतील मंत्रोच्चार करून तांत्रिक पूजाविधि करणें. याशिवाय आणखी मूर्तिपूजेविषयीं पुष्कळ प्रमाणें आहेत. हा मूर्तीपूजेचा मार्ग फक्त अज्ञानि लोकांकरितांच आहे असें नाहीं. तर मोठमोठ्या महात्म्या पुरषांनीं सुद्धां हा आचरण केला आहे. प्रमाण—

एतद्वदंति मुनयो मुहुर्निः श्रेयसंनृणाम्
नारदो भगवान व्यास आचार्योऽगिरसः सुतः

वेदाचारनिष्ठ असे जे सुरवर मुनि आजपर्यंत होऊन गेले, त्यांनीं हेंच पूजाविधान सांगितलें आहे व स्वतः आचरणही करून दाखविलें आहे. त्या श्रेष्ठ पुरुषांचीं नांवें नारद, भगवान्, व्यास अशीं आहेत. अशा प्रकारें जर सिद्ध पुरुषांनीं सुद्धां हा प्रतिमा पूजेचा मार्ग अत्युत्कृष्ट मानिला आहे, तर मग तो गौण कसा ठरेल ? श्रीमत् परमहंस चछंकराचार्य यांणीं सुद्धां मूर्तीचें ध्यान करण्याचा मार्ग लिहून ठेविला आहे. ते म्हणतात. प्रमाण--

भगवान्मानसपूजा

हृदंभोजे कृष्णः सजल जलदश्यामलतनुः ।
सरोजाक्षः स्रग्वी मुकुटकटकाद्याभरणवान् ॥
शरद्राकानाथ प्रतिमवदनः श्रीमुरलिकां ।
वहन्ध्येयो गोपी गणपरिवृतः कुंकुमचितः ॥ १ ॥
पयोंभोधेर्द्वीपान्ममहृदयमाया हि भगवन् ।
मणिव्रातभ्राजत्कनकवरपीठं भज हरे ॥

सुचिन्हौ ते पादौ यदुकुलजने नेज्मि सुजलैः ।
गृहाणेदंदूर्वा फलजल वदर्घ्यं मुररिपो ॥ २ ॥
त्वमाचामोपेंद्रांत्रिदश सरिदंभोतिशिशिरं ॥
भजस्वेमंपंचामृतरचितमाप्लावमघहन् ॥
द्युनद्याः कालिंद्या अपि कनककुंभस्थितमिदं ।
जलं तेन स्नानं कुरु कुरु कुरुष्वाचमनकम् ॥ ३ ॥
तडिद्वर्णे वस्त्रे भज विजयकांताधिहरण ।
प्रलंबारिभ्रातर्मृदुलमुपवीतं कुरु गले ॥
ललाटे पाटीरं मृगमदयुतं धारय हरे ।
गृहाणेदं माल्यं शतदल तुलस्यादि रचितम् ॥ ४ ॥
दशांगं धूपं सद्वरदचरणाग्रेऽर्पितमये ।
मुखंदीपेनेंदुप्रभवरजसा देव कलये ॥
इमौ पाणी वाणीपतिनुतसकर्पूररजसा ।
विशोध्याग्रे दत्तं सलिलमिदमाचामनृहरे ॥ ५ ॥
सदा तृप्तान्नं षड्रसवदखिलव्यंजन युतं ।
सुवर्णामत्रे गोघृतचषकयुक्ते स्थितमिदम् ॥
यशोदासूनो तत्परमदययाऽशान सखिभिः ।
प्रसादं वांछद्भिः सह तदनु नीरं पिबविभो ॥ ६ ॥
सचंद्रं तांबूलं मुखरुचिकरं भक्षय हरे ।
फलं स्वादु प्रीत्या परिमलवदास्वादयचिरम् ॥
सपर्यापर्यास्यै कनकमणिजातं स्थितमिदं ।
प्रदीपैरारार्तिं जलधितनया श्लिष्ट रचये ॥ ७ ॥
विजातीयैः पुष्पैरभिसुरभिभिर्बिल्व तुलसी ।
युतैश्चेमं पुष्पांजलिमजित ते मूर्ध्निनिदधे ॥
तव प्रादक्षिण्यक्रमणमघविध्वंसि रचितं ।

चतुर्वारं विष्णो जनिपथगतिश्रांत विदुषा ॥ ८ ॥
नमस्कारैऽष्टांगः सकलदुरित ध्वंसनपटुः ।
कृतं नृत्यं गीतं स्तुतिरपि रमाकांत त इयम ॥
तव प्रीत्यै भूयादहमपि च दासस्तव विभो ।
कृतं छिद्रं पूर्णं कुरु कुरु नमस्तेऽस्तु भगवन् ॥ ९ ॥
सदा सेव्यः कृष्णः सजलघननीलः करतले ।
दधानो दध्यन्नं तदनु नवनीतं मुरलिकाम् ॥
कदाचित्कांतानां कुचकलशपत्रालिरचना ।
समासक्तः स्निग्धैः सह शिशु विहारंविरचयन् ॥ १० ॥
मणिकर्णीच्छया जातमिदं मानसपूजनम् ।
यःकुर्वीतोषासि प्राज्ञस्तस्य कृष्णः प्रसीदति ॥

उदकानें पूर्ण भरलेल्या मेघाप्रमाणें शामवर्ण कांति आहे ज्याची, कमलनेत्र, गळ्यांत वैजयंती माला, मस्तकीं सुवर्णमय मुकूट, मनगटांत कडीं व तोडे, दंडांत अंगदे, करांगुल्यांत मुद्रिका, हातांत मनोहर मुरली, केशर कस्तुरी इत्यादि सुगंधयुक्त द्रव्यांनीं चर्चितांग, सुंदर अशा गोपिकांच्या समुदायांनीं वेष्टित, पौर्णिमेचे चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखकमल आहे ज्याचें, अशा श्रीकृष्ण भगवंता, तूं क्षीर समुद्रांतून माझी प्रार्थना ऐकून ये, व माझ्या हृदयकमलाचें ठायीं तूं आहेस अशा रीतीनें मला दर्शन दे. अशा प्रकारें परमात्म्याची प्रार्थना करून नंतर ती शामसुंदर मूर्ति आपल्या हृदयकमलाचे ठायीं असणाऱ्या रत्नखचित सुवर्ण पीठावर बसले आहेत असें ध्यानीं आणून त्याची सप्रेम होऊन प्रार्थना करावी व नंतर मानसपूजा करावी. ती मानसपूजेचा प्रकार असा. हे हरे, हे यदुकुलांत श्रेष्ठ असणाऱ्या परम पुरुषा, मी तुमची सुलक्षणांनीं चिन्हीत जीं पदकमलें तीं प्रक्षालन करितों. हे मुररिपो, तुम्ही दुर्वादलाप्रमाणें स्वच्छ अर्घ्य

सेवन करा. देवादिकांनाप्रिय अशी जी भागीरथी तिच्या अति शीतल जलानें आचमन करा. असें मुखानें म्हणून आपल्या मनोदयाप्रमाणें पदप्रक्षालन करावें, आचमनास शुद्धोदक द्यावें व नंतर हे पापांतून सोडविणाऱ्या परमात्म्या, असें मुखानें बोलून पंचामृतानें व शुद्धोदकानें स्नान घालावें, व आचमनास शुद्धोदक द्यावें नंतर त्या सर्वत्र विजयी असणाऱ्या परमात्म्यास विद्युल्लतेप्रमाणें दैदिप्यमान अशी वस्त्रें नेसवावीं, कपाळीं सुंदर कस्तुरी तिलक लावावा. गळ्यांत बकूलांच्या फुलांचा तुळसीच्या मंजिरांनीं युक्त असा हार घालावा, व चंद्रापेक्षांही प्रकाशमान अशा पंचारतीनें ओवाळावें. षड्रस पक्वानें घालून भोजन द्यावें, परमात्म्याचे जे पूज्य भक्त त्यांनाही परमात्म्याबरोबर भोजनास घालावे, भोजन आटोपल्यानंतर सुंदर फळें भक्षणास द्यावीं, तांबूल अर्पण करावा, लक्ष्मीसह नारायण बसलेले पाहून सुंदर रत्नखचित दीपकानें त्या उभयतांस ओवाळावें व नानातऱ्हेचीं सुगंधीक पुष्पें व तुळशी बेल आदिकरून श्रीलक्ष्मीनारायणावर प्रेमानें उडवावीं, व साष्टांग नमस्कार घालावा. इतके झाल्यानंतर पुनः मुखानें प्रार्थना करावी. ती अशी, हे ईश्वरा, तुझ्या कृपेनें माझ्या पातकांचा नाश होवो, माझ्या हातून झालेल्या अपराधांची मला क्षमा कर व तुझें अक्षय प्रेम मला दे.

याप्रमाणें जे वेदार्थ जाणणारे व ज्यांनीं वेदाचीं भाष्यें करून जगापुढें आणिलीं अशा महात्म्यांनीं सुद्धां सगुण भजन, मानसपूजा, व प्रतिमापूजा केली आहे. मग इतर जनांची कथा काय? आपण श्रेष्ठांनीं घालून दिलेले कित्ते वळविलेच पाहिजेत; व मूर्तिपूजेचा अंगीकार केला पाहिजे. पहा, सामान्य तेजरूप अग्नि सर्वत्र आहे, परंतु तो काष्टादिक उपाधीशिवाय अथवा सूर्य, दीपक इत्यादिकांचे उपाधीशिवाय दृश्य होत नाहीं. त्याप्रमाणेंच सर्वगुणसंपन्न जो समष्टि ईश्वर

आहे, त्याचे गुण त्यानें रामकृष्णादिक अवताररूपीं शरीरोपाधीनें दाखविले तेव्हां कळलें. यास्तव ज्याला अग्नीचे गुण पहावयाचे आहेत, त्यानें काष्टाची अथवा तेलवात इत्यादिकांची योजना करून अग्नीचे गुण पहावेत. त्याप्रमाणेंच ज्याला समष्टिरूप ईश्वराचे गुण कळावे अशी इच्छा असेल त्यानें रामकृष्णादिक अवतारांची प्रतिमा करून, मनानें त्या मूर्तीचें ध्यान व मानसपूजा करण्याचा नेम अति प्रीतीनें ठेवावा, म्हणजे ईश्वराचे गुण कळतील. असें न केलें तर ईश्वराचे गुणही कळणार नाहींत व साक्षात्कारही होणार नाहीं. शहाणे लोकहो, अजून तरी उमजा, उगीच विटंबना करूं नका. पहा, तुकोबा हे पूर्ण निराकाराचे भक्त होते व त्यास निराकार परमेश्वराचें स्वात्मैक्य ज्ञानही होतें, असें त्यांनीं केलेल्या अभंगावरूनच स्पष्ट होतें. तुकोबा महाज्ञानि असतां त्यांनीं सुद्धां मूर्तीपूजा न करणारांचा अव्हेर केला आहे व त्यांस पाखांडी ठरविलें आहे प्रमाण—

अवघे ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव ।
प्रतिमा तो देव कैसा नोहे ॥
नाहीं भाव तया सांगावें तें किती ।
आपुलाल्या मती पाखंडिया ॥
तुका म्हणे संतीं भाव केला बळी ।
न कळतां खळी दोषिला देव ॥

अभंग-तुकारामकृत.

यांत तुकोबा महाराजांनीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, ही संपूर्ण पंचमहाभूतात्मक सृष्टि एक समष्टि ईश्वरच झाला आहे, म्हणून सर्व ब्रह्मरूपच आहे. मग तेवढ्या प्रतिमेचाच द्वेष कां करितां ? प्रतिमासुद्धां देवच आहे. ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’ यांतील सर्व या शब्दांत प्रतिमाखेरीज बाकी सर्व ब्रह्म आहे असा अर्थ नाहीं. सर्व या शब्दांत

प्रतिमेचाही समावेश होतो. जे लोक पाषाणाची मूर्ति करून पुजतात, ते लोक आम्ही पाषाण पुजितों असें समजत नाहींत. जरी ते पाषाणाची पूजा करितात, तरी त्यांचें अंतःकरणांत प्रतिमा पाहून पाषाणाचें स्मरण उत्पन्न होत नाहीं. उलट ती प्रतिमा ईश्वराचे जे रामकृष्णादिक अवतार झाले आहेत त्यांचें स्मरण सुचविण्यास कारणीभूत होते. मूर्तिपूजक दगडांत सुद्धां देव आहे असें समजतो; व सर्वत्र समबुद्धि ठेवितो. भक्तास म्हणजे मूर्तिपूजकास पाषाणसुद्धां ईश्वर स्मरण करून देण्याचे कामीं उपयोगीं होतो, व नास्तिकांससुद्धां मूर्तीकडे पाहिल्यानें ईश्वराची आठवण होते. मग ती खऱ्या प्रेमबुद्धीनें होवो अगर कुटाळ समजुतीनें होवो. मूर्तिपूजा करणारांचें दिवसेंदिवस परमेश्वराविषयीं प्रेम वाढत जातें व जिकडे जाईल तिकडे त्यास देवालयांतील प्रतिमा पाहून ईश्वर स्मरण होतें. परंतु मूर्तिपूजेचे द्वेष्टयांना ते जातील तिकडे त्यांस सगळा द्वेष दिसतो व कुटाळया कराव्याशा वाटतात. यामुळें मूर्तिद्वेष्टयांचे अंगीं द्वेष व हलकटपणा हे गुण अगदीं भिनून जातात. मूर्तिपूजा करणारा नित्य स्नान संध्यादिक कर्में वेळच्या वेळीं करून आळसास घालवून लावितो. मूर्तिपूजेच्या द्वेष्टयांना तशीं कर्में करणें आवडत नसल्यामुळें ते आळशी व घाणेरडे मात्र होतात. त्यांना दारूच्या बाटल्या झोंकणें व अमंगळ खाणें खाणें आवडतें, चेहरा साबणानें धुऊन साफ झाला म्हणजे स्नान संध्यादिक कर्में आटोपलीं असें त्यांस वाटतें. मूर्तिपूजा करणाऱ्या लोकांस बागेंत जाऊन देवाकरितां दुर्वा, तुलसी, बेल, पुष्पें वगैरे आणावीं असें वाटतें, व त्या पदार्थांकडे पाहून त्यांना सहज ईश्वरस्मरण घडतें, तसें नास्तिकांना घडत नाहीं. उलट अशा प्रकारच्या बागेकडेस पाहून त्यांना विलासकरावेसे वाटतात. कांहीं कांहीं तर पापाचरण करण्यास सुद्धां प्रवृत्त होतात. मूर्तिपूजा करणाऱ्या मनुष्यास

देवाचे निमित्तानें नित्य नेमानें फुलें, फळें, कर्पूर उदबत्ती इत्यादिक सुवासिक द्रव्यांचा सुवास प्राप्त होऊन त्याचें अंतःकरण आनंदित होतें. व शरीर निरोगी रहातें. मूर्तिपूजा द्वेष्ट्यांना नित्य दारूचा वास, मांसादिक तामस पदार्थांचा आहार असतो व त्यायोगें नित्य शरीरास कांहीं तरी पीडा होत असतेच. मूर्तिपूजा करणारा पापभीरू असतो, व द्वेष्टा यथेष्टाचरणी असतो. याप्रमाणें परस्परांमध्यें बरेंच अंतर आढळून येतें. कित्येक दीर्घ शहाणे म्हणतात कीं, जे महान् साधु होऊन गेले त्यांनीं तीर्थादिकांची गरजच ठेविली नव्हती. अशी गोष्ट सिद्ध करून दाखविण्याकरितां ते कांहीं सत्पुरुषांच्या तोंडचीं प्रमाणें देतात, त्यांपैकीं येथें एक देतों.

**जाऊनिया तीर्था काय त्वां केलें, चर्म प्रक्षाळिलें वरी वरी।**
**अंतरीचें शुद्ध कासयानें झालें भूषण त्वां केलें आपण या ॥**
**वृंदावन फळ घोळीजे साखरा, भीतरील थारा मोडीन्विना॥ इ०**

हें प्रमाण अगर अशा तऱ्हेचीं अन्य, प्रमाणें कांहीं लोक पुढें आणितात. आणि समजतात कीं तीर्थादिकांची गरजच नाहीं. परंतु हें त्यांचें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. तें कसें म्हणाल तर सांगतों. हा वर लिहिलेला तुकोबांचा अभंग जरी वर लिहिल्याप्रमाणें आहे तरी विचारांती विचार करणारास असें कळून येईल कीं, या अभंगांत तुकोबांनीं तीर्थादिकांचा आभाव केला आहे असें नाहीं. फक्त एवढेंच सुचविलें आहे कीं, स्नान करण्यास जसें चिखलाचे योगें गढूळ झालेलें पाणी उपयोगाचें नाहीं, तसेंच तीर्थादिकांपासून ज्यास फळ पाहिजे असेल त्यांचें अंतःकरण विषयेच्छेनें मलीन असतां कामा नये. रोग निवारणार्थ जर औषध घ्यावयाचें तर त्यास पथ्य सांभाळणें अवश्य आहे. इतकाच अर्थ अशा तऱ्हेच्या अभंगापासून घ्यावा, कारण दुसरे अभंगात तुकोबा म्हणतात.—

**तिर्थीं व्रतीं भाव धरीरे करुणा। शांती दया पाहुणा हरि करी ॥**

यावरून व

**सकळही तीर्थें घडती एक वेळां। चंद्रभागा डोळां देखलिया ॥**

या अभंगावरून लोकांनीं तीर्थव्रतास अनुसरून वागावें असें तुकोबांनीं सुचविलें आहे. एवढ्याकरितां निवडक अभंग घेऊन पाखांड मत काढूं नये.

श्रीमत्च्छंकराचार्य ह्मणतात—

**न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षश्चिदानंद रूपः शिवोहं शिवोहं ॥**

या जगद्गुरूच्या उक्तीस अनुसरून कांहीं नास्तिक लोक देव धर्म इत्यादि मिथ्या समजतात; परंतु हें त्यांचें ह्मणणें वेडेपणाचें आहे. श्रीमत्छंकराचार्यांनीं धर्मस्थापना करण्याकरितां अवतार धारण केला होता. त्यांनीं अनंत पाखांडमतें खंडन करून वेदप्रतिपाद्यधर्म उदयास आणिला हें जगजाहीर आहे. त्यांनीं अनेक गंगाष्टकें, पांडुरंगाष्टकें, वेदस्तुति, रामस्तव इत्यादि सगुणमूर्तींचें अनंत ठिकाणीं वर्णन केलें आहे. यावरून नास्तिक व ज्ञानि, या सर्वांनीं समजावें कीं, निराकार परमेश्वराचे स्वात्मैक्यज्ञान झाल्यानंतर सुद्धां सगुणोपासना केलीच पाहिजे. श्रीकृष्णांनीं सुद्धां श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे,

**ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥**

यावरून उघडच होत आहे कीं, ज्ञानोत्तर सुद्धां समष्टिरूप ईश्वराची सगुणभक्ति प्रेमानें केली पाहिजे. ज्ञानोत्तर भक्तीचे, एकनाथ भागवतीं एवढें महिमान् मानिलें आहे कीं, ‘ ज्ञानोत्तर भक्ति होणें ह्मणजे ईश्वरास जगदोद्धारार्थ अवतार धारण करण्यास लावणें होय.

**ज्ञानोत्तर जी भक्ति तीच माझी अवतार शक्ति ॥**

एकनाथी भागवत.

असो, ज्यास आत्मज्ञान प्राप्त झालें नसेल, त्यानें आत्मज्ञान प्राप्त्यर्थ सगुणोपासना करावी, व ज्यास ज्ञानप्राप्ति झाली असेल त्यानें तें

परिपक्क होण्यासाठीं सगुणोपासना करावी. कारण सगुणोपासना केल्या-खेरिज ईश्वर भजन होतच नाहीं. ज्ञान प्राप्त होणें हें ईशकृपेवर अवलंबून आहे. ईश्वर हा स्वयंभूच ज्ञानी आहे. त्यानें जगताच्या उद्धारार्थ राम, कृष्ण, वराह, वामन, परशुराम, मच्छ, कच्छ, बौध्य, कलंकी, मारुति, देवी, इत्यादि बहुत अवतार इच्छामात्रें धरिलें. त्यानें प्रथम विष्णूचा अवतार धरून वेद रूपानें ब्रम्हदेवादिक ऋषीस आत्मज्ञानाचा उपदेश केला. वारंवार तोच प्रत्येक युगाचे ठायीं भक्ताचें रक्षण करण्याकरितां व दुष्टांचा संहार करण्याकरितां अवतार धारण करितो. याप्रमाणें त्यानें वेळोवेळीं अनेक अवतारशरीरें अयोनिसंभव इच्छामात्रें धरिलीं. असें कशावरून म्हणाल तर सांगतों, त्याच्या अवतार मूर्तींच्या प्रतिमा अद्याप भूतलावर आहेत. त्यानें उपदेश केल्याचीं पुस्तकें हीं अद्याप पावेतों दृष्टीस पडतात. पहा, रामगीता रामानें लक्ष्मणास सांगितली. श्रीमद्भगवद्गीता ही श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितली. वेद श्रीविष्णूनें ब्रम्हदेवास व कश्यपादि ऋषीस सांगितला. याप्रमाणें आणखी बहुत ग्रंथ आहेत.

जेवढ्या ह्मणून वेदप्रातिपाद्य धर्मांतील लोकांच्या देवालयांत प्रतिमा स्थापन केल्या आहेत, तेवढ्या सर्व ईश्वराचे जे आवतार, रामकृष्णा-दिक झाले त्यांच्या आहेत. ह्या प्रतिमा त्यावेळच्या सूज्ञ पुरुषांनीं त्या अवतारी पुरुषांच्या स्मरणार्थ करून ठेविल्या आहेत. व असें समजावें कीं, हे अवतार ज्या ज्या वेळीं झाले, त्या त्या वेळीं त्या त्या काळच्या लोकांनीं जशी त्या अवतारांची पूजा अर्चा केली, ह्मणजे प्रेमानें जाऊन त्यांच्या गळ्यांत हार घातले, अवतार धरण्याचें वेळीं अति-उल्हासानें व मोठ्या गडबडीनें भोजनादिक क्रिया करण्याचें विसरून सहज उपोषण करून त्यांचे दर्शनास गेले, व मोठ्या प्रेमानें त्यांचे नामाचा घोष करून थाटानें उत्साह केला इत्यादिक सर्व कृत्यांच्या

प्रतिमा, सध्यां लोक रामनवमी, गोकुळ अष्टमी वगैरे दिवशीं उपोषणादि करून त्यांचा नामाचा घोष करून त्यांच्या जन्मकाळीं हार तुरे घेऊन दर्शनास देवालयादिकांच्या ठिकाणीं जातात ह्या सर्व आहेत. एवढ्याकरितां मूर्तिपूजादिक कर्में करून सगुण उपासना अवश्य करावी.

ज्यांस ज्ञान प्राप्त झालें आहे त्यांनीं असें समजावें कीं, त्यांनीं पूर्वजन्मीं सगुणभक्ति, वेदोक्तधर्माप्रमाणें आचरण, जपतपादिक अनंत साधनें केलीं आहेत ह्मणूनच ह्या जन्मीं त्यांस अल्पप्रयासानें ज्ञान प्राप्त झालें. ज्ञानोत्तर सुद्धां मोठमोठ्या महात्म्यांनीं सगुण उपासना केली आहे. तुकोबा, रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर इत्यादि महात्मे पूर्ण ज्ञानि असतां त्यांनीं त्यांचा देहान्त होईतोंपर्यंत सगुण उपासना सोडिली नाहीं असें त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसून येतें. याचें कारण ज्ञानप्राप्तीबरोबर सगुण देह व सगुण अंतःकरण हीं नाश पावत नाहींत. कारण, सगुण जो समष्टि ईश्वर त्याच्या नियमानुसार देहादिक इंद्रियांचा नाश होतो. तो मनुष्यांच्या प्रयत्नेंकरून होणें नाहीं. असें समजून जोंपावेतों शरीरीं जाणीव म्हणून आहे व शरीरीं होणारे क्रियेस प्राणि जाणतो तोंपावेतों मी क्रियेचा साक्षि क्रियेहून वेगळा आहें असा दृढ भाव राखून सगुण उपासनादिक चांगलीं कर्में अवश्य करावीं. जर प्राणि सगुण उपासना करणार नाहीं तर त्यास सुखही होणें नाहीं. सगुण उपासना म्हणजे ईश्वराचें नामस्मरण व ध्यान करीत करीत समष्टिरूप ईश्वराचे साह्यानें जर आपण आपलें अंतःकरण निराकार आत्मस्वरूपीं लीन केलें तरच तें स्वस्वरूपोन्मुख कधींही होणार नाहीं. मन आकलन करण्याचे जरी योगादिक अनंत मार्ग आहेत तरी ते सर्व सगुण उपासनेंतच मोडतात. कारण नियमच आहे कीं, क्रिया होणें ती सगुणांत होते. निर्गुण परब्रम्ह

अक्रिय असल्यामुळें त्या स्थानीं क्रियाही नाहीं व क्रिया करणाराचाही अभाव आहे. करितां ज्ञानोत्तर आपण उपासनादिक कर्मे करावीं. तीं कशीं करावीं ह्याचे मार्ग अज्ञ जनांस समजावून द्यावे हें ज्ञान्यास उचित आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत श्रीकृष्ण म्हणतात--

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोपयेत्सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥

ज्ञानि मनुष्य जर वेदविहित कर्मे करणार नाहींत, तर ज्यांना कर्मे केल्याशिवाय मोक्ष गतीचा मार्ग कळणेंच कठीण आहे असे जे अज्ञ जन तेही कर्मांचा त्याग करतील. ते म्हणतील कीं, जर थोर ज्ञानी लोक कर्मे करीत नाहींत तर कर्मे करून आम्ही आपणांकडेसच वेडेपणा कां घ्यावा ? यामुळें मनुष्यशरीर धारण करूनही ते अज्ञ जन पशुवत् कर्माविना राहतील आणि त्यांचा तरणोपाय होणार नाहीं. यावरून उघडच होत आहे कीं, ज्ञात्यांनीं कर्मे न करणें म्हणजे अज्ञ जनांस अधोगतीस नेणें होय. एवढ्याकरितां जो कोणी ज्ञानवान आहे, त्यानें यथासांग विधियुक्त कर्मे व सगुणभक्ति केलीच पाहिजे. जर ज्ञानी मनुष्यास ज्ञान प्राप्त होण्यापूर्वीं सर्व कर्मत्यागी पाखंडीच मनुष्यें भेटतीं तर तोही तसाच पाखंडी झाला असता. म्हणून श्रीकृष्ण म्हणतात, ज्याला बोळ्यानें दूध पाजावयाचें त्याला भाकरी दिली असतां तो कशी खाईल ? व देणारास कोण ज्ञानी म्हणेल ? ज्ञानी हे जगताचे मायबाप आहेत त्यांनीं जगाचे कल्याणार्थ वेदविहित कर्मांचा अव्हेर करितां कामा नये.

मित्रहो, सांप्रतचे जे लोक आपणांस सुधारक म्हणवितात, आणि यथार्थ ज्ञान नसतां धर्माचरणाचा त्याग करितात, तसे पूर्वीचे ज्ञाते पुरुष नव्हते. ते वेदप्रतिपाद्यधर्माप्रमाणें वागणारे होते. त्यांनीं जगास तरणोपायाचा मार्ग दाखविण्याकरितां ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग, उपासना-

दिक चांगलीं कर्में करण्याचें मार्ग दाखवून दिले आहेत. पहा रामदासस्वामी जरी आत्मज्ञानि असे पूर्ण बाणिदार साधु होते, व त्यांना मूर्तिपूजा करण्याचें जरी कारण राहिलें नव्हतें, तरी त्यांनीं अज्ञ जनास भक्तीस लावण्याकरितां कित्येक ठिकाणीं स्वतः मारुतीच्या, श्रीरामचंद्रजीच्या मूर्ति स्थापन करून ठेविल्या आहेत. आमचे सद्गुरु श्रीमत् परमहंस विष्णुबावा ब्रम्हचारी म्हणतात, खोट्यापासून खऱ्याची अशी प्राप्ति होते कीं, किमया खोटी आहे; परंतु किमयाच्या नादापासून रसायनशास्त्र म्हणजे पदार्थसंयोगधर्म कसे होतात या विचाराचें शास्त्र उत्पन्न झालें हें खरें आहे, व परीस, चिंतामणि मनुष्यांना मिळणेंच नाहीं, तस्मात् त्यांच्या नादास लागणें हा मार्ग खोटा आहे, तथापि परीस, चिंतामणि शोधण्याच्या नादानें हिरे, माणीक, पाच, प्रवाल, इत्यादि पदार्थांचा शोध लागला हें खरें आहे. त्याप्रमाणेंच प्रतिमा दगडादिकांच्या, परंतु अवतारी पुरुषांच्या प्रतिमा पाहून अवतारी पुरुषांचें स्मरण, व त्यांनीं केलेल्या उपदेशाचें स्मरण करण्याचा मार्ग, प्रतिमा करण्यामुळें सांपडला, हा परिणाम खरा निघाला. करामती करण्याचें सामर्थ्य यावें हा नाद खोटा आहे, परंतु या नादापासून योगशास्त्र व सगुण साक्षात्कार, निर्विकल्प समाधिशांति व आत्मज्ञानानें मोक्ष होणें, इत्यादि कारणें उत्पन्न झालीं हीं खरीं आहेत. धर्मसंबंधीं अनेक नास्तिक मतें, कुतर्क, संशयकाढणें हें खोटें आहे, परंतु त्या कुतर्कीं संशयरूपी नास्तिक वादामुळें निराकार परब्रम्ह एक आहे, व अहंपण धरणारें ज्ञान व त्या ज्ञानाला कळतें तें जग उभयतां मिथ्या आहे असें वेदान्त शास्त्र उत्पन्न होतें हें खरें आहे. त्याप्रमाणेंच अहंपण धरणाऱ्या ज्ञानापूर्वी आपण शुद्ध निराकार परब्रह्म परमात्मा आहों, असें जें वेदान्त शास्त्राच्या अभ्यासाचें फळ उत्पन्न होतें तें खरें आहे, व तारक आहे. याप्रमाणें खोट्या

शोधानें खरें निघतें. पहा, खोटी संख्या धरून खरा हिशेब होतो याजवर लक्ष द्यावें, म्हणजे कळेल कीं, मूर्ति दगडाच्या व मूर्तीत राम म्हणणें खोटें, परंतु तिजकडे पाहून रामकृष्णादिक अवतारी पुरुषांचे स्मरणहोतें हें खरें फल आहे, व मूर्ति करणें हेंच लिहिणें समजावें. ज्याप्रमाणें क, ख, ग,इत्यादि अक्षरांकडे पाहून जसें बालकांस नाहीं पण लिहिणारास ज्ञान होतें, तसेंच रामकृष्णादिकांच्या प्रतिमा ह्याच क, ख, ग, इत्यादि अक्षराप्रमाणें असून, लिहितां येत नाहीं, अशा बालकासही अवतारी पुरुषांचें प्रेम व स्मरण देण्यास कारण होतात. तस्मात् ज्याचें स्मरणाचें फारच अगत्य आहे, त्याचें स्मरण मूर्ति केल्यानें विशेष होईल. 'पहा, भाकरीची आकृति हेंही अक्षर आहे, व करंजीची आकृति, लाडूची आकृति, अंगरख्याची आकृति, व क, ख, ग, घ, ङ, इत्यादि आकृति, व राम, कृष्ण, विष्णु, देवी, शंकर, गजानन, इत्यादिकांच्या प्रतिमारूप आकृति, मिळून जितक्या आकृति, तितक्या सर्व लेखन आहेत, व त्यांजकडे पाहून त्यांना ओळखणें हें वाचन आहे, व त्यांचे गुण समजणें हें अर्थज्ञान आहे. पहा, ईश्वरानें आकृतिरूप सर्व सृष्टि केली, त्या आकृतिरूप सृष्टीकडे पाहून तिला ओळखणें हें वाचनज्ञान नव्हे काय ? होय, हेंच वाचनज्ञान आहे. याप्रमाणें विचार आहे तो न समजून, म्लेंच्छ मतांच्या मुख्यांनीं, व त्या मतांतील लोकांनीं वगैरे जो मूर्तीचा द्वेष केला तो मूर्खपणा नव्हे काय ? होय, तो त्यांचा मूर्खपणाच आहे; तस्मात् अशा त्या मतवाद्यांचीं पुस्तकें खोटीं नव्हेत काय ? होय, त्यांचीं मतवादक पुस्तकें अगदीं खोटीं आहेत. यास्तव शाहणे लोक हो, तुम्ही खूप समजा कीं, वेदोक्तधर्माखेरीज पृथ्वीवरील म्लेंच्छादिकांचीं सर्व मतें खोटीं आहेत हें वरील न्यायावरून सिद्ध होतें. तुकोबा म्हणतात, पाषाणाची जरी मूर्ति करून पुजिली तरी ती पूजा पाषाणाला अर्पण न

होतां ज्या दैवताची त्याच दैवताला अर्पण होते; व भक्तास पाषाण साक्षात्कार न देतां तें दैवतच साक्षात्कार देतें. प्रमाण अभंग,

पाषाणाचा केला विष्णु ॥ परि पाषाण नोहे विष्णु ॥
विष्णूची पूजा विष्णूला घेणें ॥ पाषाण राहे पाषाणपणें ॥
कांशाची केली आंबा ॥ परि कांसे नोहे अंबा ॥
अंबेची पूजा अंबेला घेणें ॥ कांसे राहे कांसेपणें ॥

यावरून उघडच होत आहे कीं, महात्म्या पुरुषांनासुद्धां हा मूर्तिपूजेचा मार्ग आवडतो. असें असून विनाकारण मर्म न जाणतां अलिकलील कुतर्की लोक मूर्तिपूजेचा अव्हेर करितात. हें जाणून शहाणे लोकांनीं या कुतर्की लोकांचे नादीं लागून फसूं नये. वेदामध्यें मानवी प्राण्याची योग्यता जाणून, त्यांच्या योग्यतेनुरूप जीं नित्यनैमित्तिक कर्में करावयास सांगितलीं आहेत, तीं त्यांनीं अवश्य करावीं. कारण कर्मविरहित राहणें पशूचेंच आहे. हें जाणून श्रीमत्च्छंकराचार्य म्हणतातः—

वेदोनित्यमधीयतां तदुदितंकर्म स्वनुष्ठीयतां
तेनेशस्य विधीयतामपिचितिः काम्येमतिस्त्यज्यताम् ।
पापौघः परिधूयतां भवसुखे दोषोऽनुसंधीयताम्
आत्मेच्छा व्यवसीयतां निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम् १
संगः सत्सुविधीयतांभगवतो भक्तिर्दृढा धीयतां
शांत्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु संत्यज्यताम् ।
सद्विद्वानुपसर्पतां प्रतिदिनं तत्पादुके सेव्यतां
ब्रह्मैकाक्षर मर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं समा कर्ण्यताम् २
वाक्यार्थश्च विचार्यतां श्रुतिशिरः पक्षः समाश्रीयतां
दुस्तर्कात्सुविरम्यतां श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयताम् ।

ब्रम्हैवास्मि विभाव्यतामहरहर्गर्वः परित्यज्यतां
देहेहंमतिरुज्झतां बुधजनैर्वादः परित्यज्यताम् ३
क्षुद्व्याधिश्चचिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यतां
स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन संतुष्यताम्।
शीतोष्णादिविषह्यतां न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम्
औदासीन्यमभिप्स्यतां जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम् ४
एकांते सुखमास्यतां परतरे चेतःसमाधीयताम्
पूर्णात्मा सुसमीक्षतां जगदिदं तद्बाधितं दृश्यताम्।
प्राक्कर्म प्रविलाप्यतां चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यताम्
प्रारब्धं त्विह भुज्यतामथपरब्रह्मात्मना स्थीयताम् ५

इत्यादि.

यांत श्रीमच्छंकराचार्य म्हणतात, वेदामध्यें सांगितल्याप्रमाणें मानवी प्राण्यानें निष्काम बुद्धीनें कर्मे आचरण करावीं. निष्काम बुद्धीनें वेदविहित कर्माचरण घडल्यास किती जरी पातकाचा संचय झाला असला तरी तो नाहींसा होतो, व अंतःकरण शुद्ध होतें. अंतःकरणाच्या शुद्धतेमुळें आत्मज्ञान प्राप्तीची इच्छा होते. आत्मज्ञानप्राप्तीच्या इच्छेमुळें सत्समागम घडतो. सत्समागमामुळें ईश्वरभक्ती करण्याचे मार्ग कळून मानवीप्राण्याची बुद्धि भगवच्चरणीं दृढ राहते. शांति, दया, क्षमा, धैर्य, वैराग्य, शम, दम इत्यादि साधकास प्राप्त होतात. कारितां सत्पुरुषांची सेवा करून एक अनेकातीत जें अद्वैत परब्रह्म त्याची प्राप्ति करून घ्यावी. मनामध्यें कुतर्कास ठाव देऊं नये. अहंपणाचा त्याग करून, अहंपण धरणाऱ्या ज्ञानातीत असलेले आपापलें ब्रम्हरूप ओळखून राहावें. ज्ञानप्राप्तीनंतर देहाचे ठिकाणीं अहंपण लागू करणाऱ्या प्राण्याशीं वितंड वाद आदिकरून करणें वर्ज करावें. असें वर्तन करी-

त असतां प्रारब्धाची योग्य मदत नसल्याकारणानें जरकरितां साधकास उदरनिर्वाहार्थ अन्नसामग्री प्राप्त न झाली तर त्यानें लाज टाकून खुशाल भिक्षा मागून निर्वाह करावा. भिक्षा पतकरली असतां जें मिळेल त्यांत संतोष असावा. सुख दुःख, मानापमान, थंड, उष्ण, चांगले वाईट जें काय होईल त्याकडे लक्ष पुरवूं नये. विषयासंबंधीं उदास रहावें. कारणावांचून व्यर्थ बडबड करूं नये. नेहमीं एकांतवासांत राहणें होईल अशा बेतानें राहण्याची सोय करावी. देह प्रारब्धाचे स्वाधीन करून स्वशरीर रक्षणाची काळजी सोडून एक जी शरीरीं मी मी अशी स्फुरणरूप भावना आहे तिचा अंत करून म्हणजे मी एका सच्चिदानंद परब्रम्हाच्या अस्तित्वांत मुळींच नाहीं असें अनुभवजन्य ज्ञान सद्गुरुसाह्यें प्राप्त करून घेऊन सर्वत्र एक आत्माच आहे असें जाणून आत्मस्वरूपीं रममाण होऊन चेतः समाधि घेण्याचा नित्य अभ्यास करावा. अशाप्रकारें वागणारा प्राणि जन्ममरणाच्या फेऱ्यांतून स्वअज्ञानाच्या त्यागानें सुटतो, व परब्रम्हस्थान जो केवळ मोक्ष, त्या मोक्षाप्रत प्राप्त करून घेतो

हा चेतःसमाधीचा अभ्यास करण्याचा मार्ग असा आहे कीं, प्रथम पद्मासन घालून म्हणजे उजवे पाऊल डाव्या मांडीवर टांच जांघेला लागेल असें ठेवून डावे पाऊल उजव्या जांघेला लागेल असें त्यावर चढवून दोन्ही हात गुडघ्यावर तर्जनी व अगुंष्ट यांची चिमट करून ठेवावे. नंतर मनांतील विषयांचें चिंतन सोडावें, सद्गुरूस नमस्कार करावा, व अंतःकरण निर्मल करून बसावें.

नंतर एक घटिका पावेतों कुंभक, रेचक, पुरक, असा त्रिविध प्राणायाम करावा. ( याची विशेष माहिती पुढील योगाभ्यास प्रकरणीं चांगली दिली आहे. ) असें केल्यानें मनास धैर्य व प्राणवायूस स्थिरता येते, व संकल्प करण्याचें काम थोडे बंद पडतें. या प्रमाणें

झाल्यावर मस्तकांतील जो सर्वांचा “सेरिब्रम” नावाचा मेंदु आहे. त्या मेंदूचा ध्यानानें मनोमय ताळवेच्या हाडाखालचा जो मधला गड्डा त्या गड्ड्यांतून परमाणू एवढें चतुष्कोन चक्र उत्पन्न करून त्याच्या आंत त्या चतुष्कोनाहून एक सुटा रेषेचा त्रिकोण उत्पन्न करून, त्या त्रिकोणाहून वेगळे अनंत अंतरावर त्या त्रिकोणाचे आंत एक रेषेचे कडे उत्पन्न करावें. नंतर त्या कड्याच्या पोकळ जाग्याच्या आंतून अनंत अंतरावर श्रीराम अगर श्रीकृष्ण, श्रीविष्णु यांची शामसुंदर कमलनयन दोन्ही हात कमरेवर ठेऊन त्या वर्तुळ कड्याची मर्यादा सुटी सोडून त्याच्या मध्यभागांतून आपला शाम सुंदर प्रकाश भ्रूमध्याचे समोर मस्तकांतील मेंदूत पाडला आहे, अशी मूर्ति कल्पावी. असें झालें म्हणजे पाठीच्या कण्याच्या वरील मेदल्ला अब्लांगेटा नामक मेंदूच्या आंतील जाग्यांत जी संकल्पाचे योगें, रक्तांतून निघालेल्या उष्णता विद्युल्लता व प्रकाशरूपी अनेक रंगाच्या अनेक आकृति दिसतात त्या दिसत नाहींशा होतात. यामुळें पंचविषयांचें पंचज्ञानेंद्रियांवाटें जाणणें होतें तें होत नाहीं; आणि त्या स्थानीं शाम सुंदर मूर्तीपासून आलेला प्रकाशच दिसूं लागतो. नंतर हा प्रकाश कोठून आला हें पाहूं लागावें. चतुष्कोण, अर्धचंद्र, त्रिकोण, वर्तुळकडे यांना सोडून श्रीराम अगर श्रीविठ्ठल जो शामसुंदर श्रीहरी, त्यापासून प्रकाश आला असें पहावें. असें पाहिलें म्हणजे मेदल्लयाचे आंतून म्हणजे काकी मुखांतून अगर दहावे खिडकींतून म्हणजे पाठीच्या कण्याला जे एकवीस मणी आहेत त्या मण्याच्या शेवटच्या मण्याचेवर चर्मानें झांकलेले मानेच्यावरील बाजूस जें भोंक आहे त्यांतून सर्व शरीरांतील मज्जातंतूत शिरून पाठीच्या कण्याकडून डायफ्रमच्या म्हणजे कमरेंतील मणक्याच्या मूळच्या देठांतून स्वर सुटून म्हणजे प्राणवायूचें गुंतणें सुटून तो पाठीच्या कण्याच्या आंत

मध्यमार्गीं उदयास येतो, म्हणजे त्या स्थलीं जाऊन पोहोंचतो. असें झाल्यावर त्या श्रीहरीकडे प्रीतीनें पहात पहात त्याचे जवळ जाऊन उभें रहावें. तेणेंकरून सर्व देहभान व देहाभिमान नष्ट होऊन आपण सहज शांत सुखरूप आहोंत असें वाटतें. नंतर आपण ती शामसुंदर मूर्ति आपणाकडे हास्यवदन करून कृपादृष्टीनें पाहत आहे अशी पहावी; ह्मणजे त्या मूर्तीकडे पाहत असतां मध्येंच एकदम चोहोंकडे प्रकाश चमकतांना दिसतो. त्यायोगें आपण त्या शामसुंदर मूर्तीचे ठिकाणीं नाहींसें होऊन जातों व सुमारें मिनिट दोन मिनिटेंपर्यंत निर्भान अशा रामरूपानें चेतःसमाधीचा भोग घेतो. दोन मिनिटें गेलीं म्हणजे निद्रेंतून स्वप्न जसें, तसें पुनः आपोआप आपण स्वशरीरावर शरीर भानानें येतो. असें नित्य ध्यान करणारास अनंत चमत्कार दिसून त्यास इच्छिलेलें प्राप्त होतें व आते ध्यानानें भूतभविष्यादिक क्रियाही समजूं लागतात, शरीर तेजःपुंज व निरोगी असें होऊन तो मनुष्य सत्वगुणी गंभीर असा होतो. करितां वर सांगितल्याप्रमाणें चेतःसमाधीचे प्राप्त्यर्थ नित्य ध्यान, धारणा व वेदविहित कर्मे करण्यास सूज्ञ पुरुषांनीं आळस करूं नये, अशी त्यांस ग्रंथकाराची विनंति आहे.

# प्रकरण पांचवें.

——:o:——

## योगाभ्यासक्रम.

### अध्याय १ ला.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुपरमात्मनेनमः श्रीगुरु-सच्चिदानंदरूपायनमः । अथब्रह्म निर्देशनाम मंगल ॥ तूं सुख नित्यविभु प्रकाश । आणि आधार या नाम रूपास । बुद्धि न जाणे परी ग्राह्य जो बुद्धीस । तो मी अहंपणातीत वेगळा ॥ १ ॥ सच्चिदानंद रूप अपार । त्याचा नकळे कोणासही पार । ऐसें जाणोनि मी सर्वेश्वर । नमितों आजि तुजलागीं ॥ २ ॥ ॐ नमोजी आद्यपुरुषा । सकल गुणनिधान सर्वेशा । निखिल निरंजन व्यापकेशा । अखंड निर्विकल्पा तुज नमो ॥ ३ ॥ तुजमजमध्यें अंतर नाहीं । अंतर तोच जगद्विलास पाही । जगद्विलासांमध्यें मीही । आलों जाण निश्चयें ॥ ४ ॥ तुझिया स्वरूपीं जगचि मिथ्या । तेथें मम अस्तित्व कैसें असेल सत्या। हें जाणोनि विचारदृष्ट्या । गेलों मिळूनि तुजमध्यें ॥ ५ ॥ मी तूं-पणाचें द्वंद्व उडालें । तेथें आत्मरूपचि पूर्ण संचलें । मजमाजीं जग आटलें । उरी राहिलों ब्रह्मरूपें ॥ ६ ॥ मुनी ज्याचें करिती ध्यान । तें होतसें उपाधीकरून । उपाधीच नाहीं जाणून । राहिलों अद्वैत एकचिपैं ॥ ७ ॥ ज्याशीं न जाणून हें सर्व जगत । आहे केवळ रज्जुसर्पवत । तो मी स्वयंभूच जगदातीत । जेवीं रज्जु असे पैं ॥ ८ ॥ रज्जुस्थानीं सर्पचि नाहीं । मग मजमध्यें जगासी पाही । अस्तित्व असेल कोणे ठायीं । विचारें झालों स्वतंत्र ॥ ९ ॥ तो मी स्वतंत्र आपोआप। मुळींच असे पूर्ण निष्पाप । अजन्मा पूर्ण प्रकाशरूप । आहेंच जाण

सर्वदा ॥ १० ॥ सत्कृत्यें सदा निष्काम। बोध प्राप्तिस्तव भजावा राम।
तो मी आहें आत्मा पूर्णकाम । करूं प्रमाण कोणाप्रति ॥ ११ ॥
संग तितुका नाशिवंत । सोडूनि व्हावें निवांत । अहंपणाचा अंत ।
झालिया समाधान ॥ १२ ॥ एकपणाचा ध्यास। तैसीच त्रिपुटीही सावकाश।
काढूनि व्हावें स्वयंप्रकाश । करी नाश द्वैताचा ॥ १३ ॥ अहमात्मा
ऐसा हेतु । हेंही नाशिवंत ज्ञान टाकी तूं । मग आयताच उन्मनीचा
प्रांतु । हस्तगत होय ॥ १४ ॥ मी ब्रह्म ऐसा अनुभव झाला । तोही
नाशवंतामध्यें आला । प्रचीति वेगळा राहिला । तो तूंचि आत्मा ॥ १५ ॥
हेंही नव्हे बोलणें । संपूर्ण वेदशास्त्र पुराणें । नसतांचि मुळीं जाणणें ।
सर्व असतां अभावरूपी ॥ १६ ॥ ग्रंथांहूनि वेगळा । आत्मा राहे शब्दा
निराळा । त्या आत्मारामास विरळा । जाणे कोणी जगामाजीं ॥ १७ ॥
ऐसें जाणोनि आजी । अज्ञानांधःकार निरसावया लागीं । बुद्धीस करूनि
ज्ञान वेगीं । वदतां झालों योगमार्ग ॥ १८ ॥ जय जय अढळ
निर्विकारा । लीलाविग्रही करुणाकरा । ज्ञानरूप बोध सागरा । करी
कृपा आजि येथें ॥ १९ ॥ तुझिया कृपेवांचून । अज्ञानांधःकार
निरसन । योगमार्गाचें सत्यज्ञान । होणें जाण दुर्लभ असे ॥ २० ॥
तूंच हृदयामाजीं प्रवेशुनी । वदावया ज्ञानमार्गाची खाणी । योग मार्गाची
कठिण · कडसणी । दावावयालागीं करी कृपा ॥ २१ ॥ तूं असशी
परोपकारी । सर्वसाक्षी श्रीकृष्ण मुरारी । अज्ञान रूप तिमिरासि
अरी । तूंचि एक असशीपैं ॥ २२ ॥ इच्छामात्रें लीलारूपें । श्रीराम
श्रीविठ्ठल इत्यादि स्वरूपें । धरिलीं अवतार शरीरें अमूपें । जगदुद्धार
करावया ॥ २३ ॥ प्रत्येक युगामाझारीं । तूं लीलाअवतार धरिसी
भारी । तेणें प्राणिमात्रांचो दृष्टि साजिरी । ज्ञान मार्गीं होतसे ॥ २४ ॥
ब्रह्मादिक ऋषी कारणें । तुझा महिमा न कळणें । तेथें मज कीटकाचा
पाड काय गणणें । तव थोरी वदावया ॥ २५ ॥ वर्णितां सहस्त्रमुखी

शेषावतार । ऋषिगण सर्वही साचार । थकले वर्णावयालागी परिकर । चकित झाले सर्वहीते ॥ २६ ॥ तुझ्याच भक्तिमार्गाचा आदर । करूनि सर्व देवगणांचा भार । जाते झाले वैकुंठीं साचार । करितां करावी तुझी भक्ति ॥ २७ ॥ सांप्रत बौध्यावतार धरूनि । बैसलासी होऊनि मौनि । परम भक्ति प्रेम पाहुनि । भक्तासी भेट देतोसी ॥ २८ ॥ आत्मभेटीची परी ऐसी । अहंता धारक ज्ञान विनाशी । त्या ज्ञानातीत निराकार आहेसी । ख्रूण जाणती अनुभवी हे ॥ २९ ॥ तूं निराकार निर्गुण । घटाकाश रूपें प्रत्येक शरीरीं जाण । स्वयंभूच महदाकाशींही पूर्ण । निराकार रूपें भरलासी ॥ ३० ॥ तुज शरीरीं बोलती आत्मा । जनीं बोलती जगदात्मा । व्यापक म्हणून सर्वात्मा । ऐसें जाण बोलती ॥ ३१ ॥ जैसें एकची आकाश । असे घटीं मठीं सावकाश । महदाकाश ही भिन्नाकाश । नसेंच पाहीं ॥ ३२ ॥ याच न्यायें तूंचि एक । घटाकाश रूपें होशी अनेक । नाना जीव तूंचि देख । अभाव रूपें ॥ ३३ ॥ घटाकाश नाम जीवास । मठाकाश नाम शिवास । महदाकाश नाम ईश्वरास । ऐसें संज्ञार्थ वदताती ॥ ३४ ॥ दृश्य वस्तूचे आंत बाहेर । दिसतसें जें अपरंपार । तेंचि जाणावें महदाकाश थोर । अनंत अपार समष्टि तत्व ॥ ३५ ॥ ईश्वरासी बोलती समष्टि ऐसें । जीवासी बोलती व्यष्टि पिसे । जीवेश्वरातीत परब्रह्म ऐसें । स्वरूपास जाण बोलती ॥ ३६ ॥ जिकडे तिकडे स्थीर शांत । जें सुखमय असे गगनवत । पूर्ण प्रकाशें स्वानंद-भरित । सहजाद्वैत तें ब्रम्ह ॥ ३७ ॥ अनंत ब्रह्मांड गोलक । चंद्र सूर्य अनंत तारांगणादि देख । परस्परांचें आकर्षण चोख । करूनि फिरती ब्रम्हामध्यें ॥ ३८ ॥ ऐसें जें त्रिगुणातीत अनंत । स्थिर निर्विकार अलिप्त जगांत । पापपुण्याची नचले मात । आपुलें स्वरूप तेंचि पैं ॥ ३९ ॥ ऐसा जोकां ब्रम्हरूप । त्या तुज पहावया योगी अमूप । प्रयत्न करिती आपोआप । वियोगासी दूर करिती ॥ ४० ॥ ज्ञातेजन

पाहती तुजलागुनि । आपापलें अहंपण त्यागुनी । अहंताधारक ज्ञान निवारूनी । निराकारचि होताती ॥ ४१ ॥ याही उपरी ज्ञातेजन । कैसें शोधिति तुज लागून । तेंही सांगतों विचारें करून । कळावया जगालागीं ॥ ४२ ॥ प्राणी मनोमय बोलती । आकाशवाणी नामजयाप्रति । मनोमय उच्चार करिती । अधर जिव्हां न हलवितां ॥ ४३ ॥ जरी मनोमय बोलणें । होतसें अधराजिव्हेंविणे । तरी प्राण वायु धरिल्या सोडिल्याविणे । नये मनोमय बोलतां ॥ ४४ ॥ श्वासाधारें होतें जें बोलणें । तें आकाश तत्वाची क्रिया समजणें । सक्रिय आकाशास बोलती पंचअंतःकरणें । विष्णु ऐसेंही बोलती ॥ ४५ ॥ ऐसें जें विष्णुरूप आकाश । शब्दोत्पत्तीचा जें होई ईश । तें नव्हें जड परप्रकाश । परी स्वात्माराम तो आमुचा ॥ ४६ ॥ ऐसें जाणूनि सज्जन । संकल्पात्मक वाणीस त्यागून । श्वासोच्छ्वासांचा विराम गाठून । समष्टि होऊनि राहती ॥ ४७ ॥ श्वासोच्छ्वासांअंतीं । उरे जी निश्चळ संकल्पाचीण स्थिति । तोचि एक ईश्वर सर्वसाक्षी । कूटस्थ आत्मा तोची पैं ॥ ४८ ॥ आत्मा पुरुष ईश्वरः इति । ऐसे बोलते श्रुति । ह्मणूनि आत्म्यासीच पुरुष निगुति । नाम असे जाणावें ॥४९॥ त्या आत्म्याची सहजेच्छा । तीच जाणावी संकल्पात्मक कामेच्छा । कारणावांचून आयतीच ईच्छा । तीसच प्रकृति ऐसें बोलती ॥५०॥ त्या प्रकृति भितरीं । ब्रम्हाचें असे प्रतिबिंब साचारी । तोचि जाणावा ईश्वर अंतरीं । प्रतिबिंबरूपें ॥ ५१ ॥ प्रकृती पासून निर्माण भाग । रजतम गुणाधिक्यें सांग । अविद्यानाम बोलती तया मग । जीवाची माता तेचि पैं ॥ ५२ ॥ अविद्येमाजीं असे । प्रतिबिंब ब्रम्हाचें सौरसें । तोचि जीव अज्ञान ऐसें । मानिला वेदादि ग्रंथीं ॥ ५३ ॥ गीतेमाजीं बोलती । श्रीकृष्ण अर्जुनाप्रति । ममैवांश असे जीव निगुती । परि अज्ञान वशें झाला बद्ध ॥ ५४ ॥ जैसें एकचि महदाकाश । अनंत घटजळीं असे सावकाश । त्यासच बोलती प्रतिबिंबाकाश । प्रत्येकघटीं

वेगळालें ॥ ९५ ॥ वायूयोगें घटजल हालतां । प्रतिबिंबाकाश दिसे चालतां । जीवाचाही न्याय तत्वतां । ऐसाचि असे ॥ ९६ ॥ आत्मा तो बिंबरूप असे । नानाजीव प्रतिबिंबें सौरसें । बुद्धिजळ हालतां दिसे । जीवही हालता ॥ ९७ ॥ आत्म्यास स्वयंभूच असे ज्ञान । जीव तो मुळचाच अज्ञान । त्यामुळें पावतसे बंधन । नेणोनि आत्मस्वरूपा ॥ ९८ ॥ स्वस्वरूपाचें ज्ञान नाहीं । प्रकृतीस मीपणें पाही । क्षेत्रज्ञ रूपें शरीरीं राही । तळमळ करी आहो दिवस ॥ ९९ ॥ समुद्र जैसा एकचि असे । अनंत कल्लोळीं तोचि वसे । कल्लोळही तोचि होतसे । परी एकपणा न मांडी ॥ ६० ॥ एक अद्वैत परब्रह्म स्थळ । जीव रूपी नाना कल्लोळ । अनंत ब्रह्मांड गोळ । असती सर्व तुज मधीं ॥ ६१ ॥ असो आतां बहुत बोलणें । दिससी तूं अनंत गुणें । तुझिया गुणांस गणणें । न होय शेषादिकांसी ॥ ६२ ॥ तुझिया गुणांस नये गणतां । ह्मणोनि तुज निर्गुण ऐसें ताता । बोलती वेदही तत्वतां । याच प्रकारें ॥ ६३ ॥ निर्गुण म्हणजे बहु गुण । त्याची गणना करील कोण । धरिलें आम्हीं येथें मौन । न वदवे तव गुणांसी ॥ ६४ ॥ अनंत गुणांपैकींच जाण । मुख्य तीन असती गुण । ब्रह्मा विष्णु महेश आपण । तूंचि एक असती पैं ॥ ६५ ॥ नेणीवरूपें जीव अनेक । जाणीव रूप ईश्वर एक । सर्वहि मिळून जंगमादिक । तूंचि एक असशी गा ॥ ६६ ॥ त्या तुझिया ब्रह्मांड रूपाशीं । अहंता सांडूनि नम्रतेसी । ऐक्यरूपें शरणांगतासी । समर्पितो तुज लागीं ॥ ६७ ॥ जयजयाजी कमलाकांता । अनाथनाथा स्वानंदभरिता । सच्चितानंद परब्रह्म आयता । नमन माझें अंगिकारी हें ॥ ६८ ॥ तूं गुणातीत निर्गुण । सकळ होऊनि भाससी सगुण । स्वसंवेद्य परिपूर्ण । भेदाभेदरहित तूं ॥ ६९ ॥ तुझिया कृपेची थोरी । मज दीनासि न वदवे साचारी । जगद्रूपी स्वप्ना माझारीं । सावध केलें मजलागीं ॥ ७० ॥ हे जगद्रूप परमेश्वरा । आद्यंतरहिता अक्षरा । ज्ञानदायक कृपा

सागरा । नमन माझें अंगिकारी हें ॥ ७१ ॥ माझा देह तवचि जाण । त्या देहासी मी ह्मणणें अज्ञान । अज्ञानांतीं मी ज्ञानघन । हेंही ह्मणणें तुझेंचि ॥ ७२ ॥ मी ज्ञानी ना अज्ञानी ॥ देहीना देहा वांचोनि । चारी देह तुज समर्पुनि । झालों स्वरूप तुझेंचि ॥ ७३ ॥ तुज काय मी समर्पूं । माझें मीपणाचि तुज अर्पूं । नाशूनि अहंपणाचा प्रांतु । पावन करी मजलागीं ॥ ७४ ॥ असो आतां तव कृपें । योग मार्ग वदावया मती फांके । ज्ञानामृत जल टाके । करविजे कथन योग मार्ग ॥ ७५ ॥ योगमार्ग अति गहन ॥ जो साधी नित्य नेमें करून । त्याचे अज्ञानात्मक बंधन । सहज जाय तुटोनि ॥ ७६ ॥ पूर्व पुण्य गांठीं असल्याविना । हा योग मार्ग हस्तगत न होय जाणा । परी केल्या ईश्वरोपासना । सर्व साध्य होतसे ॥ ७७ ॥ असो आता योग मार्ग सांगतसे । यातें विचार युक्त मानसें । आळस सांडूनि प्रेम रसें श्रवण करावें ॥ ७८ ॥ आळसाचा आळस करी । योगामृत पिइजे अभ्यास करीं । तरिच पाविजे सत्वरी । सकळ सिद्धीतें ॥ ७९ ॥ अभ्यास केल्याविना । समाधिसिद्धि न होय जाणा । चंचल मन रूप राणा । स्थिर न होय कदापि ॥ ८० ॥ ऐसें मुमुक्षूनें जाणणें । अभ्यासासी विन्मुख न होणें । सकल संकटें मानणें सुखा ऐसी ॥ ८१ ॥ योगाभ्यासी जनांसी । काम क्रोधादि वैरी ग्रासिती । त्याचा नाश आसनेंसी । होतो ऐसें जाणावें ॥ ८२ ॥ आसनें नित्य नेमें करणें ॥ त्या योगें संपूर्ण रोग नासणें । होउनि वासना क्षया कारणें । अनुग्रह पाविजे दैवताचा ॥ ८३ ॥ दैवताची कृपा होतसे । विकल्पादि सर्व जातसे । मनाचें स्थैर्य होतसे । मानस पूजें ॥ ८४ ॥ अजपा गायत्री जपावी । मनाची मोहोर फिरवावी । सहस्रदळीं दृष्टि ठेवी । श्रवण करी दशनाद ॥ ८५ ॥ याचें फल मनाचें खंडन । होऊनि शरीराचें दोहन । शांति सुखाऐक्य होऊन । मुमुक्षु पावे सौख्यासि ॥ ८६ ॥

व्यायामादिक सकल क्रिया । आहार निद्रा मित् घेऊनिया । युक्त भाषण संतोष ठेऊनिया । राहवें एकांत स्थळीं पैं ॥ ८७ ॥ योग सिद्धि होईपर्यंत । ब्रह्मचारी राहवें निश्चित । तरीच पाविजे योग सिद्धीप्रत । इतरा साध्य न होय ॥ ८८ ॥ योग बळाचें सुख । असें अमुप देख । वदावया जिव्हा नचले चोख । परी अलभ्य सौख्य लाभतें ॥ ८९ ॥ अणिमादिक अष्ट सिद्धि । वाचादिक सकल शब्दीं । सत्यता येऊनि प्रसिद्धि । होतसे जाणा ॥ ९० ॥ बहुकाल पर्यंत । जगणें होतसें निवांत । काळाचाही अंत । योगीच करी॥९१॥ भूत भविष्य वर्तमान । सकळ कळे गुप्त धन । दुसऱ्यांचे मनांतील जाणून । प्रसिद्धि होय जगतीं पैं ॥ ९२ ॥ शरीरीं तेजःपुंजता येणें। सूक्ष्म होणें स्थूळ बनणें । गुप्त होऊनि प्रगटणें । अवश्य साधे योग-बळें ॥ ९३ ॥ ऐसें जाणोनि श्रीकृष्ण बोलती । गीतेमाजीं अर्जुना प्रति । होई योगी तूं निश्चिती । प्राप्त करी सकल कांहीं ॥ ९४ ॥

प्रमाणः—

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपिमतोऽधिकः
कर्मिभ्यश्चाऽधिकोयोगी तस्माद्योगी भवार्जुन ॥

तपस्व्याहुनिही योगी श्रेष्ठ । ज्ञान्याहुनिही तो वरिष्ठ । कर्माधिकाऱ्या परि श्रेष्ठ । करितां आचरी योग मार्ग ॥ ९५ ॥ या कृष्णोक्तीप्रमाणें । मुमुक्षूनें योगाभ्यास करणें । मोक्ष सुख अनायासें पावणें । याच मार्गें ॥ ९६ ॥ संपूर्ण योगकृत्य जरी । ये जन्मीं साध्य न होय तरी । पुण्य लोकाप्रत जायी सत्वरी ।अक्षय सुखातें पावता ॥९७ ॥ येविषयीं प्रमाण इष्ट । श्रीकृष्ण वदतसे स्पष्ट। परिसावें आतां वरिष्ट । एकाग्र चित्तें ॥९८॥

प्रमाणः—

प्राप्य पुण्य कृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ २॥
तत्र तं बुद्धि संयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरूनन्दन ॥ ३ ॥

परब्रह्म प्राप्तिस्तव आयता । निष्कामपूर्वक योग आचरतां । सत्वगुणी साधक होय तत्वता । योगासी पूर्ण अधिकारी ९९ मग त्या सत्व-गुणाधारें । पुण्य लोकाप्रत जाय त्वरें । समष्टि ईश्वराधारें । प्राप्ति होय सत्यादि लोकांची ॥१००॥ जैशी जैशी शाश्वती । स्वर्ग वैकुंठ कैलासा· प्रति । तितका कालनिगुति । सौख्य भोगितसे तो योगी ॥ १ ॥ स्वर्गादिकांतील सुख । भोगीत असतां न होय दुःख । त्याचा न वर्णवे हरिख । होय राहता आनंदें ॥ २ ॥ कांहीं काल सुख भोगुनी । श्रीमंता उदरीं जन्म घेऊनी । पूर्ण नरदेह धारण करूनी । साफल्य करी योगातें ॥३ ॥ श्रीमान तो असे नारायण । त्याच्या विभूती जेथ जाण । ज्या ईश्वरनिष्ट तत्परायण । त्यांच्या कुलीं जन्मतो ॥ ४॥ तया नावडती विषय भोग। पूर्व अभ्यास बळें मग । स्फुरद्रूप होय अंतरंग । योगाभ्यास करावया ॥ ५ ॥ ऐसेंही जरी न होय । योगिया गृहीं जन्मा जाय । पितृ समागमें सोय । होय त्या योग पुत्राची ॥६॥ परी असेल योगी न करी स्त्रीसेवन । मग कैसें प्राप्त होईल तें स्थान । तरीच जन्मा येणें घडे । स्त्रीस जरी बहुत धन । पुण्याइचें ॥ ७ ॥ योगियाचि मिठी पडे । ज्ञानेश्वरा ऐसा पुत्र सांपडे । बहुत भाग्यें ॥८॥ ऐसा जो का योग भ्रष्ट । तया कळे पूर्व जन्मादि स्पष्ट । भूत भविष्य जाणावया कष्ट । न पडती तया ॥ ९ ॥ या परि होतसे कालांतरीं । करितां आळस सांडूनि दुरी । सत्वर फलदायक योग जन्मांतरीं । योग साधकासी मुख्य । एकांत पाहिजे स्थळ सौख्य । अर्जुनाप्रति श्रीकृष्ण पथ्य ॥ वदतसे ऐसेंची ॥ ११ ॥ करावें योगाचरण ॥ १० ॥

प्रमाणः—

योगी युञ्जीत सतत मात्मानं रहसिस्थित : ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीर परिग्रहः ॥

योगप्राप्तीची जया इच्छा । त्यानें टाकावी विषयेच्छा । सोडावा पुत्रादिकांचा पिच्छा । रहावें एकांत जाऊनी ॥ १२ ॥ पुत्र कलत्रांची आशा सोडितां । जरी मनादि इंद्रियांस नये स्थोरता । तरी मीच मिथ्या असे तत्वतां । मनीं जाण विचारावें ॥ १३ ॥ ऐसिया परि विचार करितां । मनास येई निश्चलता । इंद्रियें नियमीं घालितां । जाय चंचलता उडोनि ॥ १४ ॥ ऐसिया परि अभ्यास केलिया । आपापलें अहंपण त्यागूनिया । मग तो उरे योगिया । परमात्मरूपें ॥ १५ ॥ अंतःकरणाच्या वृत्ति । बाहेरील विषयांकडे धांव घेती । तरी अंतःकरणास स्थापिजे मागुती । आकाश मार्गीं ॥ १६ ॥

श्लोकः—

शुचौदेशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्

योगाभ्यास करावयासाठीं । शुद्ध जागा पाहुनि दिठीं । आसन घालावया पाठीं । भूमी दोष निवाडिजे ॥ १७ ॥ भूमी खणूनि त्या मधील दगड । शुद्ध मृत्तिका राखूनि निवड । वरी घालिजे दर्भांकुर नितोड । उपरी घालिजे मृगाचर्म ॥ १८ ॥ त्या कृष्णाजिना वरपडी । अष्ट पदरी धृत वस्त्राची घडी । नसावें आसन घरपुडी । करी सज्ज मना ऐसें ॥१९॥ उत्तराभि मुखि बैसावें । वामभागीं सुर्यास्तासी राखावें । सव्यभागीं रविबिंब असावें । पृष्टभागीं ठेविजे अग्नि ॥ २० ॥ मोठालीं तीन लांकडें । पेटवुनि ठेविजे मणक्याकडे । कमरेच्या मुळा शेक घडे । आसनस्थ ऐसें बैसावें ॥ २१ ॥ उंच नीच नसावें आसन । जेणें होय शरीर चालन । ढेंकुण पिसा चिलटें जाण । उपद्रव यांचा नसावा ॥२२॥

नीट उभारूनि मेरू सोटा । तेवी शिर कमळाच्या देंटा । अर्धोन्मीलन नेत्र कपाटा । दृष्टि ठेविजे नासाग्रीं ॥ २३ ॥ ऐशिया नासिकाग्रीं दृष्टि-बंध । सहज असो द्यावा संबंध । भ्रुमध्यस्थानीं तो प्रबंध । सदा जाण असावा ॥ २४ ॥ मग भ्रुमध्यस्थानीं । सुनीळ बिंदु आणिजे ध्यानीं । तो मसुर प्रमाण असूनि । राहतो जाण आकाशीं ॥ २५ ॥ बिंदुवरी लक्ष ठेवावें । ध्याऊनि मन एकाग्र करावें । कांहीं दिवस आचरावें । ऐसेचि रीती ॥२६॥ प्रथम थोडे दिवस । न दिसे बिंदु दृष्टीस । अभ्या-सिता कांहीं दिवस । दर्शन घडे बिंदूचें ॥२७॥ बिंदुध्यानाप्रति । शिव-योग ऐसें भाविती । विष्णु योगाचीही प्रचीति । असे याच मध्यें ॥२८॥ त्या बिंदुमीच अवयवें । हस्तपादादिक कल्पावे । चतुर्भुज आणि श्री-मुख देखावें । तयामध्यें ॥२९॥ श्रीविष्णु अथवा श्रीराममूर्ति । ध्याइजे सप्रेमें अक्षय स्थिति । तेणें होय विष्णु योगाची प्राप्ति । शामसुंदर मुर्ति प्रकटेल ॥३०॥ आजानु बाहू सुहास्य वदन ॥३१॥ सुनीळ उत्तम तनुस्थान । आकर्ण नेत्र हातीं बाण । मूर्ति ऐसी ध्याइजे ॥ ३२ ॥ श्रीराम ध्यानीं प्रकटल्यावरी । इच्छिलें कार्य होय सत्वरीं । योगा-भ्यासीं प्रीति साजिरी । उपजे तेव्हां ॥ ३३ ॥ यापरि विष्णुयोग सिद्धि पावता । ज्ञानयोगाची सहज होय प्राप्तता । मी मूर्तीचा तो ध्याता । शरीरा भीतरीं कोण असें ॥ ३४ ॥ ऐसें पाहतां मग । त्यास सद्गुरु साङ्गपग । सांपडे यथास्थित ज्ञान मार्ग । कीं साक्षी तूंची वेगळा ॥ ३५ ॥ जो ज्या वस्तूस जाणे । तो त्या वस्तूहूनि भिन्न होणें ॥ न्याय ऐसा शास्त्र ह्मणें । तेणें होतसे वेगळा ॥ ३६ ॥ नंतर सद्गुरु कृपा कटाक्षी । दावी त्यासि सुख दुःख साक्षी । अज्ञानी जीव तो अक्षी । सुखदुःखाहूनि वेगळा ॥ ३७ ॥ सुखदुःखा परता । असे सुखदुःखांचा जाणता । ऐसा ज्ञानमार्ग हा-तां । आल्याविण न कळे ॥ ३८ ॥ जेव्हां प्राणि सुखदुःखास जाणें ।

तेव्हां त्या साक्षीस जीव बोलणें ॥ हाचि न्याय मानणें । राहवें दुःखातीत वेगळे ॥ ३९ ॥ ईश्वराची परी ऐसी । सुखदुःखाचें भान ज्या जीवासी । त्या जीवाच्या ज्ञात्यासी । साक्षी ईश्वर म्हणावें ॥ ४० ॥ ज्या साक्षि ज्ञानासी । सुखदुःख भाव नसे त्यासी । स्थिति जाणावी समष्टीची । ईश्वर ऐसेंही म्हणावें ॥ ४१ ॥ दाविलें ईश्वरास शरीरीं ह्मणूनि । हृदयस्थो जनार्दनः श्रुतीनीं । देखिलें नाहीं मदांधांनीं । व्यर्थ तळमळती बापुडे ॥ ४२ ॥ शरीरा भीतरीं जो अवकाश । तेंचि जाणावें कल्पनारूप आकाश । कल्पनांतीं उरे चिदाकाश । ईश्वर असे तोचि पैं ॥ ४३ ॥ आकाश असे स्वशरीरीं । सबाह्य व्यापूनि अंतरीं । एकचि असे आंत बाहेरी । ऐसेंच लक्षण ईश्वराचें ॥ ४४ ॥ पंचभूतांसीं ज्यानें । अचेतन सचेतन करणें ॥ ऐसिया परी रंग देणें । केलें म्हणूनि पांडुरंग ॥ ४५ ॥ पंचभूतात्मक सकल । जे जड मूर्ति केवळ ॥ शरीरें चालवूनि चंचल । केलीं जाण बोलतीं ॥ ४६ ॥ अनंत ब्रम्हांडें अंडाकार । बृहत् म्हणजे मोठालीं साचार ॥ म्हणून बोलणें ब्रह्मांडाकार । ईश्वर त्यांचें नियमन करी ॥ ४७ ॥ ऐसिया ईश्वरा कारणें । जाणतो योगी नीटपणें ॥ सद्गुरु साह्यें ठेवितो ठाणें । ईश्वर स्वरूपीं अखंड ॥ ४८ ॥ ऐसिये परी ज्ञानयोग । सिद्ध होतसे यथासांग ॥ उणें काय त्याला मग । सर्वेश्वर साह्य त्यासी ॥ ४९ ॥ यापरी आचरावें त्रय योग । शिव विष्णु ज्ञान चांग । निवेदिलें यथासांग । कळावया मुमुक्षूंसी ॥ ५० ॥ योगत्रय साधिल्या उपरी । आसनें सिद्ध करावीं भारी । तेणें शुद्धता होय शरीरीं । योग्य जी योगा कारणें ॥ ५१ ॥ पुढिलिये अध्यायीं जाण । असे संपूर्ण आसनविधि कथन । श्रोतें व्हावें सावधान । एकाग्र चित्त परिसावया ॥५२॥ पंचम प्रकरणाचा प्रथमाध्याय । संपविला येथें ज्ञानमय । अर्पण केला निरामय । श्रीराम चरणीं ॥ ५३ ॥ श्रीराम परब्रम्ह आयता । त्यासीं

अहंभाव मागुता । अर्पूनि मागतसे सायुज्यता । राजाराम हा ॥ १४ ॥
इति श्री नित्याानित्य विवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारीकृत । प्रथमाध्याय संक्षिप्त । सद्गुरु साह्यें संपविला ॥ १९९ ॥

---

## आसन निरूपण.

### अध्याय २ रा.

श्रीगणेशायनमः । मज नये ओनामा । कैसा वदावा महिमा । श्रीरामाचा ॥१॥ ज्ञान तितुकें रामाचें । अज्ञान असे जीवाचें । निरसलिया अवश्य वांचे । होय दग्ध ज्ञानानें ॥ २ ॥ ज्ञान झालिया उपरी । सर्व संकल्प जाती दुरी । आत्माराम राहे उरी । त्यासी आतां वंदितों ॥ ३ ॥ श्रीराम जगाचा जिव्हाळा । जाणता असे कोणी विरळा । दया करी आतां कृपाळा । ज्ञान देई वदावया ॥ ४ ॥ सर्वाकाश हें तुझें घर । तेथें मी अजाणता असें खर । करितां येई सत्वर । सोडवी या जन्मांतुनी ॥ ५ ॥ तुझें ज्ञान जरी नाहीं । तरी मानव शरीर व्यर्थचि पाही । करितां सांग मी देहीं । कोण असे ॥ ६ ॥ सर्वत्र तुझें वास्तव्य असणें । जागासी ठाव कोणें ठायीं मिळणें । हें पाहिलें असतां शहाणपणें । जगचि मिथ्या ॥ ७ ॥ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या । ऐसें वदती वेद सत्या । श्रुति शास्त्रें तुज अनुभव रित्या । अद्वैतच ठरविताती ॥ ८ ॥ रिकामी जागा जरी होणें । तरीच जगाचें असित्व असणें । स्थळाविणा वस्तूनें राहणें । कधींही जाण होत नसे ॥ ९ ॥ जळीं काष्ठीं पाषाणीं । तुज देखती सर्व प्राणी । उपाधि भेदें मना आणी । न लक्षिति स्वात्मरूपें ॥ १० ॥ तरंग जळास नसे सोडूनि । तैसें जगही नसे तुजवांचूनी । तरंगाकार कल्पना वारुनी । एक जलची पाहवें ॥ ११ ॥ तैसाचि तुजमध्यें जगद्रूप तरंग । अपरोक्षानुभवें करा दूर व्यंग । मग जाय द्वैतरूप पांग ।

राहसी तूंचि एक निर्विकार पैं ॥ १२ ॥ मानवी कल्पनेस ग्रासी सुषुप्ति । तव जगद्रूप वृक्ष नये प्रचिती । आत्मस्थिति त्या सुषुप्त्याद्यंतीं । मध्येंही जाण असेंच पैं ॥ १३ ॥ संपूर्ण जगाचा निद्राप्रळयीं । किंचित् अनुभव नसे पाही । परी आपुलें अस्तित्व तया ठायीं । अनुभवाविण अनुभवावें ॥ १४ ॥ ज्ञातृ ज्ञेया विहिन । नुसतेंचि जें गगन । तेंचि तूं सच्चिदघन । स्वात्माराम पैं आमुचा ॥ १५॥ तुजवांचून अन्य नसे। सृष्टिरूप द्वैत निरसे। ऐसें न जाणतां वेडे पिसे । भांबावती व्यर्थची ॥ १६॥ ज्ञाते जन म्हणती एकाचि ब्रह्म । श्रुतिमध्येंही तेंचि वर्म । सर्वं खल्विदं ब्रह्म । दूजे नसे यया ठायीं ॥१७॥ ऐसें पाहूनि नमितों तुज । श्रोता वक्ता दुजा नसे आज। सर्वहि सिद्धीस नेता काज। तुज वांचूनि आन नसे॥१८॥ आतां संपूर्ण आसन प्रकार। वद तूंचि येथें सविस्तर । मुमुक्षु जनांस तो आचार। करणें अवश्य असेगा ॥१९॥ मुमुक्षु म्हणजे मोक्षेच्छा असणें। एसें जें ध्यायीजे अंतःकरणें। त्या अंतःकरणासच मुमुक्षु ह्मणणें । तेंचि येथें अधिकारी ॥२०॥ मी आणि माझें अंतःकरण । ऐसेंचि बोलती जगतीं जाण । मी शब्द दर्शक तूंचि संपूर्ण । अहंपणातीत वेगळा ॥२१॥ ऐसा जो तूं अहंपणातीत । त्या पासाव अहं रूप भाव उठत । तोचि मी शब्दें घेइजे अतीत । अहंपणाहूनि वेगळा ॥२२॥ जरी मी शब्द आत्मदर्शक असे । तरी तो आत्म्याहूनि भिन्न वसे । विचारें जाणावें ऐसें। आत्मा राहे निराळा॥ २३ ॥ अहंपणाच्या आदिअंतीं । निःशब्द रूप आत्म्याची वस्ती । परी मीशब्दाहूनि वेगळी ती। दाविता नये ॥ २४ ॥ निःशब्द रूपास पुरुष बोलती । अहंरूप शब्दास माया म्हणती । फुकाचि द्वंद्व उभारिती । होती तेणें मतिमंद ॥२५॥ मी शब्दें ध्यावी प्रकृतीची प्रचीति । निःशब्दें जाणावी परप्रकृति । मीपणा पोटीं त्रिगुण वसती । सत्व रज तम हे जाणावें ॥ २६ ॥ या त्रिगुणांची पिंडीं वस्ति । ब्रह्मा विष्णु महेश मानिती । ब्रह्मांडीं ऐसें जाणती

। या नामें ॥ २७ ॥ पिंडीं बोलती अंतःकरण । विष्णूसीच हें नाम जाण । मुमुक्षुरूप शाहाणपण । सत्वचि येथें असे पैं ॥ २८ ॥ ज्ञाते जाणावें मुमुक्षुरूप । ध्वनिरूप ॐकार स्वरूप । पिंडीं ध्यावा मुमुक्षु अमूप । ओंकार जाण ब्रह्मांडीं ॥ २९ ॥ सेव्य सेवक भाव । अखंड असे देवाधिदेव । श्रीदाशरथीराम सावयव । अहंपण आमुचें तोचि पैं ॥ ३० ॥ तो मम सद्गुरु रामचंद्र । बोधित असे मनश्चंद्र । वियोगरूप दारिद्र । घालवावया लागीं ॥ ३१ ॥ राहों आतां हें बोलणें । गुण वर्णावया थकलीं वेद पुराणें । मज मतिमंदाचा पाड काय गणणें । करितां चालवूं क्रमासि ॥ ३२ ॥ आतां होतसें कथन ॥ आसन प्रकार गहन । एकाग्र करी मन । ऐकावयालागीं ॥ ३३ ॥ आसनें चौऱ्याशी लक्ष आहेती । जितुक्या योनि तितुकी गणती । हीं सर्व कोणी न जाणती । एक जाणें परमात्मा ॥ ३४ ॥ कपिल गोरक्ष पांतजली । आसनें फक्त चौऱ्याशी लिहिलीं । पैकीं प्रथम येथ सांगितलीं । प्रमुख तींच ॥ ३५ ॥ कांहीं असतीं शरीर शुद्ध्यर्थ । बाकीं जाणावीं समाधि प्रीत्यर्थ । हाचि असे येथ मुख्यार्थ । ऐसें श्रोतीं जाणावें ॥ ३६ ॥ चौऱ्याशी आसनापैकीं । मुख्य तींच येथ ऐकीं । आणावीं तीं आपुल्या पारखीं । मुमुक्षूनें ॥ ३७ ॥ मुख्यासनें असती चार । तींही ऐका साचार । सिद्धासन पद्मासन सिंहासन परिकर । भद्रासन तें चौथें ॥ ३८ ॥ या चार आसनांपैकीं । सिद्धासन पद्मासन ऐकीं । द्वयासनें घालावीं नेटकीं । प्राणायामाभ्यास वेळीं ॥ ३९ ॥ या चार आसनापूर्वीं । पुढील आसनें प्रथम करावीं । त्यांचींही नामें ऐकावीं । पुढील प्रमाणें ॥ ४० ॥ प्रातःकाळीं उठूनि सत्वर । मुखमार्जनादिविधि सविस्तर । सारूनि न्हावें सादर । करावया जाण आसनें ॥ ४१ ॥ गणपति आसन प्रथम करावें । उत्तराभिमुखी उभे रहावें । वामचरणास दृढ

ठेवावें । भूमीवरी ॥ ४२ ॥ सव्यपद उचलूनि । वाम गुडघ्या वरूनि । बोटें आणिजे नडगी वरी ॥ ४३ ॥ सव्य पायाचा वळसा देऊनि । बोटें आणितां वळवूनि रेटें । सहज वळसा लगटे । वाम सव्य पायाचीं बोटें । उभय कर जोडावें । मस्तकीं नेऊनि ठेवावें । गणपिंढरीसी ॥ ४४ ॥ यासीच पैं ॥ ४५ ॥ द्वितीय करावें पुढील पती आसन बोलावें । सव्य पाद भूमी दृढ राखून । आसन । नाम त्याचें दक्षिणामूर्ति जाण । अवश्य जाण वाम पाद उचलावा ॥ ४६ ॥ वाम चरण आडवा । तर्जनि अंगुष्टे- करावा । चरण तळवा ठेवावा । सव्य गुडघीं ॥ ४७ ॥ कुवड्यास रखे क्य करूनि नंतर । उभय कर ठेवावे दो गुडघ्यावर । उभे कर । शरीर तेव्हां ॥ ४८ ॥ ऐशिया रीति उभे राहवें । कांहीं वेळ नेट राखावें । नंतर वामचरणासी ठेवावें । भूमीवरी ॥ ४९ ॥ मग करावें पूर्ववत् । क्षण एक रहावें निवांत । कमर अवश्य वांकत । ऐसें श्रोतीं जाणावें ॥ ५० ॥ तृतीयासन ऐसें करावें । एक पायासी उच- लावें । टांचेसी उरूमुळीं लावावें । गुडघ्यासी गुडघा भिडवावा ॥५१॥ ऐसें पुनः पुनः करिजे । चतुर्थ आसन परीसीजे । प्रमाण सिद्ध लक्षि- जे । नाम तया मयुरासन ॥ ५२ ॥

प्रमाणः—

धरामवष्टभ्य करद्वयेन तत्कूर्परेस्थाप्यचनाभि पार्श्वः ।
उच्चासनो दंड मदुत्थितःस्यान्मयूरमेतत्प्रवदंति पीठः ॥

भूमीवरी ठेवी हस्त तळ । कोपर लावी नाभीजवळ । शरीर आपुलें सकळ । हस्ताधारें तोलावें ॥ ५३ ॥ हस्त पोटऱ्या काढाव्या बाहेर । पद शरीर सकळ पसर । पाय आंखडूनि वळवावें पाठीवर । आणावें मयूर पिच्छापरी ॥ ५४ ॥ यासी बोलती मयुरासन । ऐकें तत्फल कथन । सांगतों एकाग्र करी मन । श्रवणास सादर होईजे ॥ ५५ ॥

हरति सकलरोगानाशुगुल्मोदरादी
नभिभवति च दोषानासनं श्रीमयूरम् ॥
बहुकदशनभुक्तं भस्मकुर्यादशेषम् ।
जनयाति जठराग्निं जारयेत् कालकूटम् ॥ १ ॥

उदरगत सकल रोगांचा । नाश होय त्वरित त्यांचा । वातपित्त कफादिकांचा । उठाव होय तात्काळ ॥ ९६ ॥ जरी भक्षिलीं कठोरान्नें । कालकूटविष पक्वान्नें । भस्म होत मयूरासनें । सुख होय शरीरासी ॥ ९७ ॥ आतां पंचमासन अवधारी । प्रमाणसिद्ध सांगतों सत्वरी । नित्यनेमें आचरण करी । तेणें पाविजे सिद्धीसी ॥ ९८ ॥

**प्रसार्य पादौ भुवि दंडरूपौ, दोर्भ्यांपदाग्रद्वितियं गृहीत्वा ।**
**जानूपरि न्यस्तललाटदेशो वसेदिदं पश्चिमतान माहुः ॥**

नेटें पादद्वय पसरुनि । दोन्ही पादांगुष्ट दो हस्तें धरुनि । ललाट गुडघ्यावरी । टेकूनि । रहावें स्वस्थ कांहीं वेळ ॥९९॥ यासी ह्मणती पश्चिमतानासन । फल याचें सांगतों निधान । करावें आतां श्रवण । पुढील प्रमाणें ॥ ६० ॥

इति पश्चिमतानमासनाग्र्यं पवनं पश्चिमवाहिनं कुरुते ।
उदयं जठरानलस्य कुर्यादुदरे कार्श्यमरोगतांच पुंसाम ॥

सर्वांमध्यें श्रेष्ठ जाण । मानिलें असे पाश्चिमतासन । येणें त्वरित जातसे समीरण । सुषुम्ना मार्गें चढोनि ॥ ६१ ॥ जठराग्नि तो वृद्धि पावत । शरीर होय रोगरहित । मस्तकांतील रोग समस्त । नासती सर्व अभ्यासें ॥ ६२ ॥ येथें पांच आसनें पूर्ण झालीं । षष्ठमासनाची बोली । तीही पाहिजे ऐकिली । मुमुक्षूंनीं ॥ ६३ ॥ दोन्ही पाय हस्तें । धरूनी ठेविजे माने वरुते । एकावरी एक निगुते । बोलिजे यासी मारुतिआसन ॥ ६४ ॥ सप्तमासन श्रवण करा । मच्छेंद्रपीठ नाम मनीं धरा । तोही प्रकार अवधारा । सांगतों येथें ॥ ६५ ॥

वामोरुमूलार्पित दक्षपादं जानोर्बहिर्वेष्टित वाम पादम् ।
प्रगृह्य तिष्ठत परिवर्तितांगः श्रीमत्स्यनाथोदितमासनंस्यात् ॥

सव्य पायाची टांच देऊनि । वाम जांघीं स्थापन करूनि । नाभीकडे रेटुनि । दृढ धरावी ॥ ६६ ॥ पुढें सव्य मांडीवरून । वाम पाद नेऊन भूमीवरी ठेऊन । दृढ राखावा ॥ ६७ ॥ सव्य हस्ताचा नंतर । वळसा द्यावा वामचरणास परिकर । वामपायाचा अंगुष्ट धर । नंतर उलट याचें करावें ॥ ६८ ॥ यासी बोलती मच्छेंद्रपीठासन । याचें फल पुढील प्रमाणें जाण । प्रमाण श्लोक करी श्रवण । लिहिला येथें ॥ ६९ ॥

मत्सेंद्रपीठं जठरप्रदीप्तं प्रचंडरुङ्मंडलखंनास्त्रम् ।
अभ्यासतः कुंडलिनीप्रबोधं चंद्रस्थिरत्वं च ददाति पुंसाम् ॥

या मत्स्सेंद्र पीठाचा गुण । आहार वाढे अति जाण । जठराग्नि प्रदिप्त रोग निवारण । कुंडलिनी होय जागृत ॥ ७० ॥ तालुस्थानीं चंद्रामृत खाण । त्यांतूनि अमृत स्रवतसे जाण । होतसे शरीरपोषण । उत्तम प्रकारें ॥ ७१ ॥ येथें सात आसनें संपलीं । आतां अष्टमासनाची बोली । तीही जाण निरूपली । पुढीलप्रमाणें ॥ ७२ ॥

पदांगुष्ठौ तु पाणिभ्यां गृहीत्वा श्रवणावधि ।
धनुराकर्षणं कुर्यात् धनुरासनमुच्यते ॥

दोन्ही पाय पसरावें । हस्तें पादांगुष्ट पकडावें । ओढून आणूनि लावावें । आपुले कर्णाप्रति ॥ ७३ ॥ वीर जैसें धनुष्याकर्षती । तैसेंच येथें पाय आकर्षनिगुती । नळ सर्व साफ होती । बोलती यास धनुरासन ॥ ७४ ॥ यापुढें नवमासन । नाम ज्याचें लांगलासन । उताणें आपण निजून । करावें आसन नववें हें ॥ ७५ ॥ उताणें पहुडल्याउपरी । दोहस्तें कमर धरी । द्वयपाद नेऊनि सत्वरी । मस्तकावरी न्यावेगा ७६ ललाट भागा वरूनि । समोर भूमीवरी स्थापूनि । पाद उभय ठेउनि । रहावें

निवांत ॥ ७७ ॥ आतां दशमासन अवधारी । पद्मासन नाम निर्धारी । तोही प्रकार श्रवण करी । पुढीलप्रमाणें ॥ ७८ ॥ वाम बाजूचे उरुमुळावरी । सव्य पायाची टांच धरी । मग वामचरण त्याही उपरी । ठेविजे दक्षिण जांघीं ॥ ७९ ॥ यासी बोलती पद्मासन । गुण याचा अलौकिक जाण । करी आतां श्रवण । एकादशासन गा ॥ ८० ॥

**पद्मासनं संस्थाप्य जानूर्वोर्वांतरे करौ ।**
**निवेश्य भूमौ संस्थाप्य व्योमस्थं कुक्कुटासनम् ॥**

पद्मासन घालावें । हात उरुजान्वंतरीं रेवावे । भूमीवरी ठेवावे । तोलावे शरीर हस्तावरी ॥ ८१ । यासी कुक्कुटासन बोलती । याचाही भेद ऐक निगुती । नाम त्याचें कुर्मांगती । द्वादशासन हेंचि पैं ॥ ८२ ॥ कुक्कुटासन केल्याउपरी । अढीमधील हस्त न काढितां बाहेरी । भूमीवरी बैठक करीं । धरीं मस्तक दोहस्तें ॥ ८३ ॥ यासी बोलती उत्तान कुर्मक । करूनि हें करावा पूरक । कांहीं वेळ राखूनि कुंभक । हृदयामाजीं धरावा ॥ ८४ ॥ ऐशीं आसनें कथिलीं बारा । बाकींचीं मुख्यासनें अवधारा । सिद्धासन सर्वांमध्यें वरिष्ट धरा । त्रयोदशासन हेंचि मानीं ॥ ८५ ॥

**योनिस्थानकमंघ्रिमूलघटितं कृत्वा दृढं विन्यसेत् ।**
**मेंढ्रे पादमथैकमेव व्हदये कृत्वा हनुं सुस्थिरम् ॥**
**स्थाणुः संयमितेंद्रियोचलदृशा पश्यद् भ्रुवोरंतरं ।**
**ह्येतन्मोक्षकपाटभेदजनकं सिद्धासनं प्रोच्यते ॥**

गुदस्थानाजवळील शिवणीं । टांच देयी न्हेटूनी । वाम चरण मांडी घालूनि । लिंगोर्ध्वस्थानीं ठेवा दक्षिण ॥ ८६ ॥ मेरू सोटा सरळ उभारूनि । हनवटी लावी हृदयभुवनीं । बुब्बुळें तेणें एकवटुनी । दृष्टि भ्रुमध्यें स्थिर होतें ॥ ८७ ॥ यानाम सिद्धासन । मोक्षकपाट भेदक-

पूर्ण । याचें अन्यमतें मांडण । करितों आतां ॥ ८८ ॥ दक्षिण पायाचा घोंटा । लिंगस्थानावरी रेटा । त्याही उपरी वामचरण ओटा । करा आसन सिद्ध हें ॥ ८९ ॥ चौऱ्याशी आसनामधीं । श्रेष्ठ हें सिद्धासन साधी सर्व नाडींची शुद्धि । होतसे येणें ॥ ९० । सिद्धासनासारिखें ॥ येर आसन नसे । प्राप्त करावें अभ्यासें । अवश्य जाणा ॥ ९१ ॥ या आसना उपरी । प्रहर एक बैठक करी । अभ्यास करितां वर्षभरी । सिद्ध होय हें ॥ ९२ ॥ हें सकळ रोगातें हारवी । कामादि ज्वरांस घालवी । सकल सिद्धींसी आणवी । गुणश्रेष्ठ असेगा ॥ ९३ ॥ ऐशीं आसनें झालीं तेरा । आतां चौदावें अवधारा । मनासी आपुल्या एकाग्र करा । नाम जाणा सिंहासन ॥ ९४ ॥

गुल्फौ च वृषणस्याधः सीवन्याः पार्श्वयोः क्षिपेत् ।
दक्षिणे सव्यगुल्फं तु दक्षगुल्फं तु सव्यके ॥
हस्तौ तु जान्वोः संस्थाप्य स्वांगुलीः संप्रसार्यच ।
व्यात्तवक्त्रो निरिक्षेत नासाग्रं सुसमाहितः ॥
सिंहासनं भवेदेतत्पूजितं योगिपुंगवैः ॥

वृषणाच्या खालील शिवणीवरी । वामभागीं दक्षिण टांच धरी । वाम पायाची टांच अवधारी । दक्षिणभागीं ठेविजे ॥ ९५ ॥ उभय हस्त उभय गुडघ्यावरी ठेवी । पायाचे टांचेवरी बैठक ठेवी । जिव्हा बाहेर कादावी । मुख पसरावें सिंहवत् ॥ ९६ ॥ यासी बोलती सिंहासन । पंधरावें सांगतों भद्रासन । तेंही करावें श्रवण । पुढील प्रमाणें ॥९७॥ सिंहासनावरी बैसिजे । परी सव्य टांच सव्य भागींच ठेविजे । वाम भागीं न्हेटिजे । दृष्टि ठेवि नासाग्रीं ॥९८॥ यासच गोरक्षासन म्हणती । गोरक्षें अभ्यास केला निगुती । याचाही गुण बहुत बोलती । अभ्यासयाचाही करावा ॥९९॥ सांगतों आतां सोळावें । आळस सांडून अभ्या

सावें । साधकें विश्रांतीसी ध्यावें । नाम याचें शवासन ॥१००॥ शववत् भूमीवरी निजणें । उताणें पडून रहाणें । सर्व श्रम दूर करणें । यया आसनें ॥ १ ॥ आतां ऐका सतरावें आसन । विपरीत करणी नाम जाण । मानेवरी उताणें निजून । पाय न्यावें ऊर्ध्व आकाशीं ॥२॥ हस्त पृष्टभागीं जमिनीवरी टेकावे । कांहीं वेळ तैसेंचि असावें । स्वस्थ चित्तानें पहुडावें । मग पायासी आढी घालावी ॥ ३ ॥ या आसनाचा अमोल्य गुण । असे चंद्रामृत वाम भ्रगुटीं जाण । तें नाभीकमळीं पतन पाऊन । न होय भस्म कदापि ॥ ४ ॥ येथें सतरासनें संपलीं । बाकींचीं मोठ्या ग्रंथीं लिहिलीं । पाहिजेत तरी अवलोकिलीं । पाहिजेत श्रोतीं॥५॥ सतराच आसनें मुख्य आहेती । दर आसनावरी रहावें एक प्रहर निगुती । ऐसा अभ्यास केल्या अंतीं । आसन जय केला त्यानें ॥ ६ ॥ हीं सकल आसनें आचरतां । काय फल येतसे हातां । तेंही श्रवण करावें आतां । एकाग्र चित्तें ॥ ७ ॥

**अनलसत्वमुपस्थबलक्षयो अनिलबोधपटुत्वमनूर्मिता।**
**पवनमंथरताप्युपजायते स्थिरमतेरिह पीठजयात्किल ॥**

आसन जयो होतां । द्वंद्व न बाधे कधींच चित्ता । चित्ताची जाय चंचलता । ऐसें निश्चयें जाणावें ॥ ८ ॥ नित्य करितां अभ्यास । तयास सोडुनि जाय आळस । निर्बलत्व येतसे उपस्थेंद्रियास । प्राप्त करी सुखातें ॥ ९ ॥ अमूर्ति ह्मणजे क्षुधा तृषा । सीतोष्णादि सकलाशा । सर्व नष्ट आसन प्रकाशा । कधींही जाण न बाधती ॥ १० ॥ प्राणजय होतसे येणें । रोगोत्पत्ति होते जी अजीर्णें । सर्व नष्ट होय ऐसें जाणें । करी आसनें यास्तव ॥ ११ ॥ आसन जय झालियाविणा। नुसतां योगाभ्यास करूनि जाणा । तैसेंच जपादि केलिया नाना । योगासी पूर्णता न होय ॥ १२ ॥ ह्मणूनि आसनाभ्यास आधीं

अवश्य करावा निरवधी । प्रत्येकासन प्रहर पर्यंत साधी । नित्य नेमें करूनि ॥ १३ ॥ आसनारंभीं जाण । करावें शेषाचें ध्यान । अनन्य भावें शरण । त्यासीच जावें ॥ १४ ॥ शेषाचें ध्यान प्रसंगीं । मंत्र जपावा हृदयांगीं । बैसावें जाऊनि एकाग्रीं । ऐकावा तो मंत्र आतां ॥ १५ ॥

"मणिभ्राजत्फणासहस्त्रविधृत विश्वंभरा-
मंडलायानंताय नागराजाय नमः ॥"

सर्व नागांचा अधिपति । सहस्त्रफणी शेषावतारा प्रति । करावा नमस्कार निगुती । ध्यान मंत्रें करूनि ॥ १६ ॥ शेषाचा रंग जाणावा । विजेसमान ओळखावा । पिंवळट पांढरा अवलोकावा । दिव्यमणि असे मस्तकीं ॥ १७ ॥ गुदस्थाना बाहेर आकाश । असे त्यांत शेष स्वयंप्रकाश । आसन जय होऊनि पाश । तुटे भवबंधाचा ॥ १८ ॥ ऐशी सप्रेमें प्रार्थना करावी । मूर्ति त्याची प्रथम अवलोकावी । नित्य नेमें ध्याना आणावी । नंतर आसनाभ्यास करावा ॥ १९ ॥ विधियुक्त गुरूमंत्रेंकरुनि । जो साधितो योगमार्ग कडसणी । त्याची होतसे भवभयाची झाडणी । अनायासें ॥ २० ॥ येथें आसनाध्याय संपला । राजाराम सद्गुरुचरणीं रत झाला । द्वंद्वाचा ठाव मोडिला । येणेंचि पंथें ॥ २१ ॥ इति श्री नित्यानित्यविवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारी कृत । द्वितियाध्याय संक्षिप्त । वर्णून जाण संपविला ॥ २२ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ १२३ ॥

---

## अध्याय तिसरा.

### षट्कर्म निरूपण.

श्री गणेशायनमः ॥ ॐनमोजि गणनायका । सकळ देह प्राण धारका । तूंचि एक सकळिका । भरूनि जाण असशीपैं ॥ १ ॥ सर्वत्र

तुझें वसणें । ह्मणूनि वासुदेव तुज ह्मणणें । सर्वत्रवास करूनि असणें । सर्वातीत ॥ २ ॥ तुज वांचूनि सर्व जें भासें । तें सर्व भ्रममूलक असे । सूर्यकिरणीं मृगजळ जैसें । तैसें हें सर्व जगतपैं ॥ ३ ॥ आकाशीं जैशी नीळिमा । तैसा मींहि तुज पोटीं जीवात्मा । आकाशीं नीळिमेचा महिमा । मुळींच नाहीं ॥ ४ ॥ तैसा मींहि तुजमध्यें वाव । त्वंरूपें साच असे स्वयमेव । अज्ञानतिमिरां सावयव । दिसतसे मी ॥ ५ ॥ अहंशब्देन विख्यात । सर्व शरीरीं तुझीं ख्यात । तेथें मी ह्मणण्याची मात । नचलेच कीं ॥ ६ ॥ मागील मंगळाचरणीं । दाविलीं अहंशब्द ध्वनीची करणी । ती स्वयमेव तुझीच फणी । बोलती त्या माया ऐसें ॥ ७ ॥ माया ह्मणजे नसेच कांहीं ॥ मी वांचूनि आन नाहीं । हें जाणूनि ग्यांहीं । आपुलें अस्तित्व सोडिलें ॥ ८ ॥ पाहतां पाहणें हरलें । मीपण तटस्थाचि झालें । अहंपणातीत भासलें । तुझें स्वसंवेद्य रूपाचि ॥ ९ ॥ अहंपण हेंची तुझी प्रकृति । इंद्रिय गणांमाजी वास्ति । श्री ऐसें प्रथम लिहिलें ॥ १० ॥ त्याकारणें त्या अहंपणा प्रति । अनंत गुणी जिची वास्ति । ब्रह्मांडरूपें श्री ह्मणजे अतर्क्य शक्ति । तुझिया शक्तीप्रती । जगदंब ऐसें भासती । तुझ्यापुढें ॥ ११ ॥ मीपण रूपें कवणाची वास्ति । सकल शरीरीं असे बा ॥ १२ ॥ ह्मणती । अनंत गुणी तुझी स्त्री । जप करिती तिचा मंत्री । ती अहंपणरूप श्री । आयती त्रिगुण नेणूनि आपल्या स्वरूपा ॥ १३ ॥ अहंपणरूप माया । विभागिली दोन ठाया । जीवशिव रूपें ॥ १४ ॥ रूप जाया ॥ अंगिकारिला । शिवरूपें जाणीव गुण जीव रूपें नेणीव गुण स्वीकारिला । आपुला पक्ष ॥ १५ ॥ असे धरिला । ज्ञानाज्ञानातीत जीवरूपें शिष्यरूप होऊनी । जगद्रूप शिवरूपें गुरुरूप धरूनि । दाविली तिनेंची ॥ १६ ॥ नेणीवरूपें अनंत जीव लीला करूनि । शिवा वास्ति । ईश्वर त्यासीच बोलती । असती । ज्ञानरूपें एकचि

अवश्य करावा निरवधी । प्रत्येकासन प्रहर पर्यंत साधी । नित्य नेमें करूनि ॥ १३ ॥ आसनारंभीं जाण । करावें शेषाचें ध्यान । अनन्य भावें शरण । त्यासीच जावें ॥ १४ ॥ शेषाचें ध्यान प्रसंगीं । मंत्र जपावा हृदयांगीं । बैसावें जाऊनि एकाग्रीं । ऐकावा तो मंत्र आतां॥१५॥

"मणिभ्राजत्फणासहस्रविधृत विश्वंभरा-
मंडलायानंताय नागराजाय नमः ॥"

सर्व नागांचा अधिपति । सहस्रफणी शेषावतारा प्रति । करावा नमस्कार निगुती । ध्यान मंत्रें करूनि ॥ १६ ॥ शेषाचा रंग जाणावा । विजेसमान ओळखावा । पिंवळट पांढरा अवलोकावा । दिव्यमणि असे मस्तकीं ॥ १७ ॥ गुदस्थाना बाहेर आकाश । असे त्यांत शेष स्वयंप्रकाश । आसन जय होऊनि पाश । तुटो भवबंधाचा ॥ १८ ॥ ऐशी सप्रेमें प्रार्थना करावी । मूर्ति त्याची प्रथम अवलोकावी । नित्य नेमें ध्याना आणावी । नंतर आसनाभ्यास करावा ॥ १९ ॥ विधियुक्त गुरुमंत्रेंकरूनि । जो साधितो योगमार्ग कडसणी । त्याची होतसे भवभयाची झाडणी । अनायासें ॥ २० ॥ येथें आसनाध्याय संपला । राजाराम सद्गुरुचरणीं रत झाला । द्वंद्वाचा ठाव मोडिला । येणेंचि पंथें ॥ २१ ॥ इति श्री नित्यानित्यविवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारी कृत । द्वितियाध्याय संक्षिप्त । वर्णून जाण संपविला ॥ २२ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ १२३ ॥

---

## अध्याय तिसरा.

### षट्कर्म निरूपण.

श्री गणेशायनमः ॥ ॐनमोजि गणनायका । सकल देह प्राण धारका । तूंचि एक सकळिका । भरूनि जाण असशीपैं ॥ १ ॥ सर्वत्र

तुझें वसणें । ह्मणूनि वासुदेव तुज ह्मणणें । सर्वत्रवास करूनि असणें । सर्वातीत ॥ २ ॥ तुज वांचूनि सर्व जें भासे । तें सर्व भ्रममूलक असे । सूर्यकिरणीं मृगजळ जैसें । तैसें हें सर्व जगतपैं ॥ ३ ॥ आकाशीं जैशी नीळिमा । तैसा मीहि तुज पोटीं जीवात्मा । आकाशीं नीळिमेचा महिमा । मुळींच नाहीं ॥ ४ ॥ तैसा मीहि तुजमध्यें वाव । त्वंरूपें साच असे स्वयमेव । अज्ञानतिमिरां सावयव । दिसतसे मी ॥ ५ ॥ अहंशब्देंन विख्यात । सर्व शरीरीं तुझीं ख्यात । तेथें मी ह्मणण्याची मात । नचलेच कीं ॥ ६ ॥ मागील मंगलाचरणीं । दाविलीं अहंशब्द ध्वनीची करणी । ती स्वयमेव तुझीच फणी । बोलती त्या माया ऐसें ॥ ७ ॥ माया ह्मणजे नसेच कांहीं ॥ मी वांचूनि आन नाहीं । हें जाणूनि ग्यांहीं । आपुलें अस्तित्व सोडिलें ॥ ८ ॥ पाहतां पाहणें हरलें । मीपण तटस्थचि झालें । अहंपणातीत भासलें । तुझें स्वसंवेद्य रूपाचि ॥ ९ ॥ अहंपण हेंची तुझी प्रकृति । इंद्रिय गणांमाजी वस्ति । त्याकारणें त्या अहंपणा प्रति । श्री ऐसें प्रथम लिहिलें ॥ १० ॥ श्री ह्मणजे अतर्क्य शक्ति । अनंत गुणी जिची वस्ति । ब्रह्मांडरूपें भासती । तुझ्यापुढें ॥ ११ ॥ तुझिया शक्तीप्रती । जगदंब ऐसें ह्मणती । मीपण रूपें कवणाची वास्ति । सकल शरीरीं असे बा ॥ १२ ॥ ती अहंपणरूप श्री । अनंत गुणी तुझी स्त्री । जप करिती तिचा मंत्री । नेणूनि आपल्या स्वरूपा ॥ १३ ॥ अहंपणरूप माया । आयती त्रिगुण रूप जाया ॥ विभागिली दोन ठाया । जीवशिव रूपें ॥ १४ ॥ जीव रूपें नेणीव गुण अंगिकारिला । शिवरूपें जाणीव गुण असे धरिला । ज्ञानाज्ञानातीत स्वीकारिला । आपुला पक्ष ॥ १५ ॥ शिवरूपें गुरुरूप धरूनि । जीवरूपें शिष्यरूप होऊनी । जगद्रूप लीला करूनि । दाविली तिनेंची ॥ १६ ॥ नेणीवरूपें अनंत जीव असती । ज्ञानरूपें एकचि शिवा वस्ति । ईश्वर त्यासीच बोलती ।

श्रुतिशास्त्रेंही पैं ॥ १७ ॥ ऐशिया प्रकारें तुझी शक्ति । मूळ त्रिगुणरूपें जिची वस्ति । तीसच साम्य प्रकृति । अव्यक्त ओंकार ह्मणावें ॥ १८ ॥ असो आतां पुढील प्रकरणीं । सकलोत्पत्ति ओंकार विवरणीं । दाखवूं उत्तम प्रकारें जाणी । तूर्त आरंभू योगमार्गातें॥१९॥ श्रोतें व्हावें सावधन । मागील समासीं कथन । आसन विधि सांगितला पूर्ण । आतां सांगतों षट्कर्म ॥ २० ॥ योगाभ्यासी मुमुक्षु जनानें । हें षट्कर्म सद्गुरु मुखानें । श्रवण करूनि अंतःकरणें । आचरण याचें करावें ॥ २१ ॥ तोही प्रकार अवधारा । खालीं लिहिला असे खरा । त्याचा श्लोक अवधारा पुढील प्रमाणें ॥ २२ ॥

धौतिर्वस्तिस्तथा नेतिस्त्राटकं नौलकं तथा ॥
कपालभातिश्चैतानि षट्कर्माणि प्रचक्षते ॥

षट्कर्म नामें ख्याती । धौति त्राटक वस्ती । नौली नेति कपालभाती । जाणावीं हीं षट्कर्में ॥ २३ ॥ प्रथम सांगतों धोती प्रकार । तो श्रोतीं ऐकावा सविस्तर । नित्यनेमें आचरूनि सत्वर । साध्यकीजे ॥ २४ ॥

चतुरंगुलविस्तारं हस्तपंचदशायतम् ॥
गुरूपदिष्टमार्गेण सिक्तवस्त्रंग्रसेच्छनैः ॥
प्रत्याहारमतेनैतदुदितं धौतिकर्मतत् ॥
गुल्मज्वरप्लीहकुष्टकफपित्तविनाशकृत ॥
आरोग्यं वलपुष्टिश्च भवेत्तस्य दिने दिने ॥

नवनि झिरझिरीत वस्त्र घ्यावें । तें चार अंगुलें रुंद असावें । पंधरा हात लांब मोजावें । धोती कर्म करावया ॥ २५ ॥ ऐसें अतिमृदु वस्त्र घेऊन ॥ उष्णोदकीं अथवा दुग्धीं भिजवून ॥ पुरतें त्यांतें आरद्र करून ॥ मुखीं घालिजे ग्रासवत् ॥ २६ ॥ साधकें गुरुसन्निध रहावें ॥ रोज एक एक हात वस्त्र गिळावें ॥ ओढून पुनः बाहेर काढावें ॥ अभ्यास करावा नित्य ऐसा ॥ २७ ॥ दर दिवशीं

एक हात गिळिजे । पंधरावे दिवशीं वस्त्र संपविजे । वस्त्राचा शेवट बाहेर राखिजे । धरिजे मग दंतीं आपुल्या ॥ २८ ॥ नंतर पीळ घालूनि पदर । धरुनि हळुवार काढिजे बाहेर । ही क्रिया प्रथम साध्य कर । होईल शरीर शुद्ध येणें ॥ २९ ॥ कुष्टप्लीहादि रोग समस्त । नाशूनि जाती सर्व यथार्थ । ह्मणूनि अभ्यास करी तूं येथ । होई समर्थ योगाभ्यासा ॥ ३० ॥ धोती प्रकार निरोपिला । आतां ऐकीं बस्तीची लीला । तिचाही प्रकार लिहिला । प्रमाण सिद्ध ॥ ३१ ॥

पीतमूलस्य दंडेन मध्यामांगुलिनाऽपि वा ॥
यत्नेन क्षालयेत गुह्यं वारिणा च पुनः पुनः ॥
वारयत्कोष्ठकाठिन्यमजीर्णं न निवारयेत् ॥
करणं कांतिपुष्टिं च दीपनं वन्हिमडलं ॥
अपानक्रूरता यावत् तावन्मलं विशोधयेत् ॥
तस्मात् सर्वप्रयत्नेन मूलशोधनं कारयेत् ॥

पिवळक वृक्षाची मुळी । अथवा सहा बोटें लांब देवनळी । घेऊनि बैसिजे खोल जळीं । नाभी इतुक्या ॥ ३२ ॥ ती गुदांत चार बोटें घालावी । दोन बोटें बाहेर राखावी । जळ त्या नळीनें शोषवी । उदरामध्यें ॥ ३३ ॥ मग हातीं नळी धरूनि । पाणी सिंपिजे आंतुनि । कमर जरा उचलूनि । उभे रहावें ॥ ३४ ॥ नळी मग काढावी बाहेरी । ऐसें पुनः पुनः करी । सांठा असे मलाचा उदरीं । बाहेर काढी येणें मार्गें ॥ ३५ ॥ पाणी कोठ्यांतरीं न राखावें । प्रयत्नें करूनि बाहेर काढावें । न निघे तरी मयुरासन करावें । येई तेणें बाहेर ॥ ३६ ॥ येणें जठराग्नीसी प्रदीप्ति । यतसे देहासी कांती । गुरुमुखें विचारूनि-युक्ति । साधन जाण करावें ॥ ३७ ॥ मुळी न मिळालिया जाण । मध्यमांगुली घालूनि आचरण । करावें शरीर दोहन । नित्य नेमें ॥ ३८ ॥ गुदस्थानीं आहे अपान । तो गुद आकर्षण करून जाण । उर्ध्व होतसे

समीरण । जायी जल चढूनि ॥ ३९ ॥ अपो या परि बस्तिकर्म । जाणणें साधकाचा असे धर्म । आचरुनि हें योग वर्म । जाणावेंगा ॥४०॥ आतां नेतिकर्म अवधारी । तेंही कर्म अवश्य करी । आरोग्यता येई शरीरीं । प्रमाण यास ऐकावें ॥ ४१ ॥

सूत्रं वितस्तिसुस्निग्धं नासानाले प्रवेशयेत् ॥
मुखान्निर्गमयेच्चैषा नेतिः सिद्धैर्निगद्यते ॥

ग्रंथीरहित सुताचा धागा । घृतमेण लाऊनि मृदु करिगा । नासिका मार्गें घालून बघा । मुखा बाहेरी काढावा ॥४२॥ धागा असावा लांब एक वीत । ऐसे पदर असावेगा सप्त । एकवट करून शेंड्यास पीळ देत । घर्षण करी हळुवार ॥ ४३ ॥ तेणें सर्व मस्तक रोग नासती । दिव्य दृष्टि नेत्रांसी येती । खेचरी मुद्रेची प्राप्ती । सहज जाण होतसे ॥४४॥ ऐका आतां त्राहटक भेद । सविस्तर सांगतों एकविद । होईल तेणें आनंद । नेत्र रोग नाशुनी ॥ ४५ ॥ सुखासन घालून बैसावें । दृष्टि लावून समोर पहावें । एकाग्रचित्तें नेत्र लावावें । पुढील पदार्थावरी ॥४६॥ नेत्रांतून जळ वाहे जाण । तववरी ते उघडे ठेवून । रग लागतां नेत्रांसी पूर्ण । अवश्य जाण मिटावें, ॥ ४७ ॥ त्रहाटक क्रिया ऐशी करितां । नेत्र रोग नासती तत्वतां । निद्रालस्य जाय मागुता । नेत्रास येई स-तेजत्व ॥ ४८ ॥ पाचवें तें नौलिकर्म । श्रवण करावें त्याचें वर्म । मार्ग सांपडे सुगम । धौति बस्तीसी ॥ ४९ ॥

अमंदावर्तवेगेन तुन्दं सव्यापसव्यतः ॥
नतांसो भ्रामयेदेषा नौलिः सिद्धैः प्रचक्षते ॥

खालीं करुनि मान । कोंपर गुडघ्यावरी ठेवून । सव्यापसव्यें जाण । उदर फिरवावें, ॥ ५० ॥ यासी नौलीकर्म बोलती । जठरांतील नल साफ राहती । उदरगत सर्व रोग नासती । याचकर्मे ॥ ५१ ॥ कपाल

भाती ती सहावी । तिचीही क्रिया पहावी । अभ्यास बळें करावी । स्वाधीन आपुल्या ॥ ९२ ॥

**नासाभ्यां जलमाकृष्य पुनर्वक्त्रेण रेचयेत् ॥**
**न जायते वार्धकत्वं ज्वररोगादि नाशयेत् ॥**

नांशिकाद्वारें जल घेइजे। मुखांतूनि बाहेर रेचिजे । येणें प्रकारें साधिजे। कपाल भाती ॥ ९३ ॥ हा अभ्यास येतां हातां । शरीरास नये वार्धक्यता । ज्वरादि नासती तत्वतां । अवश्य येणें ॥ ९४ ॥ ही कपाल भाती खरी । होते जलेविण अवधारीं । लोहाराच्या भात्या परी । रेचक पूरक करावें ॥ ९५ ॥ वामनासापुटें पूरक करावा । दक्षिण नासापुटें सत्वर रेचावा । अति त्वरें आचरावा । हा मार्ग ॥ ९६ ॥ ऐशिया परी कपाल भाती । करितां सकल रोग नाश पावती । तात्काळ मिळतसे शांति । मन होय उन्मन ॥ ९७ ॥ येणेंप्रमाणें षट्क्रिया । नित्य आचरण केलिया । योगी सत्वर व्हावया । येतसे येणें ॥ ९८ ॥ प्राणायामादिक सकलाचरण । सिद्धीस यथार्थ जावया जाण । षट्क्रियांचें पाहिजे अवसान । तरिच पाविजे सिद्धीतें ॥ ९९ ॥ येथें षट्क्रियाध्याय संपला । राजाराम अहंकार अर्पिला । मिथ्या होउनि रत झाला । सद्गुरुचरणीं ॥ १०० ॥ इति श्री नित्यानित्यविवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारी कृत । तृतियाध्याय संक्षिप्त । सद्गुरुसाह्यें संपविला ॥ १०१ ॥ अथ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

---

## पिपिलिकाध्यानोपदेश.

### अध्याय ४ था.

ॐ परमात्मनेनमः । जयजय चिदैक मूर्ती । ज्ञानदायक जयाची स्फूर्ती । चिदेक रूपें तुझी वस्ती । चिन्मयानंदा ॥ १ ॥ तुझें निर्विकार

स्वरूप। आयतेंच आहे अमूप। तेथें जगताचें हें रूप। मुळींच नाहीं ॥२॥ ज्या तुझ्या स्वरूपीं जगचि नाहीं। तेथें मी कैसा असेन पाहीं। नाहींच म्हणून राही। नमनेविण ॥ ३ ॥ तुझिया स्वरूपाप्रत। जो निरामय असे अतीत। जो अज्ञानें न होय पतीत। त्यास्वरूपेंचि नमितों ॥४॥ तुझ्या स्वयंप्रकाशस्वरूपाचा विलास। मध्यप्रदेश असे हा कसल. विश्वाभास। भासरूपें असूनि सर्व जगद्विलास। शोभसी तूंची ॥ ५ ॥ मग त्या समष्टिईश्वर विराटातें। सर्वतः पाणिपादातें। चित्प्रकाश असे जो त्यातें। नमितों त्याच रूपें ॥ ६ ॥ तुझिया स्वरूपाचा शेंवट। नकळे कवणा ही चोखट। जाणण्याची सोडूनि खटपट। नमितों त्यासी अग्ररूपें ॥ ७ ॥ जें आदि अंतीं असे ॥ तेंचिमध्यें ही प्रवेशे। ऐसें जाणूनि सावकाशें मानितों एकचि निर्विकार ॥ ८ ॥ ऐसें जें कां निर्विकार स्वरूप। ज्यापासून झालेंची नाहीं हें अमूप। अभावरूप सकल जगद्रूप। भासें तें सर्व व्यर्थचि ॥ ९ ॥ नमिताचि असे वाव। मग तुझें जें स्वरूप स्वयेमव। तुझा तुलाचि नित्यानुभव। म्हणूनि न नमणेंचि नमन तुझें ॥१०॥ मृत्तिकेमाजीं घट आलाचि नाहीं। परी आज्ञानी तो मृत्तिके ठायींच पाही। तद्वताचि हा जगद्विलास देहीं। नसतांचि भासे ॥ ११ ॥ घट जैसा मृत्तिकाच असे। किंवा गारेसी गारट्यानें वेष्टिलें जैसें। तैसे एकचि ब्रह्म जगद्विलासें। व्यक्त झालें ॥ १२ ॥

यथायथावभासोयः शिव एवेति पश्यति ॥
तथा तथा महाभावं भजते यत्न तस्तुसः ॥
यथा यथा प्रथापुंसः स्वयमेव व्यवस्थिता ॥
तथा तथानुसंधानं स्वभावे नैव पूजनं ॥

ब्रह्मगिता.

जें जें हें भासमान। तें शिवेचि शिवरूपपूर्ण। हें जाणिजे जैं खुण। तैं शिव भजन होय सत्य ॥ १३ ॥ जें जें कांहीं आचरण। तें तें अनुश्रुत

आत्मकलाचि जाण । हेंचि तेथील अनुसंधान । स्वभावें पुजन तेणेंचि तया ॥ १४ ॥ ऐशिया परी करून नमन । मागील अनुसंधान आठवून । करितो आतां ॐकार विवरण । पुढील प्रमाणें ॥ १५ ॥ मागें निरूपिली अहंपणरूप माया । परमात्म्याची नसताची छाया । अव्यक्त ओंकार रूप जाया । तीच असे पैं ॥ १६ ॥ निर्विकल्पीं जें प्रथम स्फुरण । जें नसूनच स्वयमेव असे जाण । ब्रम्हाचें जें स्वसंवेद्यपण । त्यासचि म्हणावें आद्यतत्व ॥ १७ ॥ स्फुरणस्वतः असें जड । तेंचि ब्रम्ह प्रकाशें होतें चिज्जड । चिज्जड होणेंच पूर्ण आवड । परब्रह्माची ॥ १८ ॥ स्फुरणासि नसे स्फुरणपण । त्याचयाच अंगीं जें जाणपण । ईश्वर तयासीच म्हण । शबळ ब्रम्ह जो ॥ १९ ॥ स्फुरणास प्रकृति बोलती । या प्रकृतीची जया ठायीं वस्ती । तोचि आत्मा सर्व साक्षि निगुती । आहे ऐसें जाणावें ॥ २० ॥ प्रकृती माजीं जें प्रतिबिंब असें । आयतेंच जें सावकाश वसे । तेंचि अर्धनारीनटेश्वर होतसें । प्रकृति योगें ॥ २१ ॥ या अर्धनारी नटेश्वरास । प्रकृति पुरुष बोलावें सावकाश । उभय मिळून चित्प्रकाश । एकाचाची ॥ २२ ॥ अग्नीची दाहकता आग्नि नेणें । परी अग्नीची दाहकता अग्नीसी जाणे । थंडगार असे स्वयमेवपणें । ऐशीच स्थिती परब्रह्माची ॥ २३ ॥ परब्रह्म आयतेंच निर्विकार । तेथें आयतेंच स्फुरण सविकार । नसे भिन्न परि स्फुरणाहुनि पर । असें जाण परब्रह्म तें ॥ २४ ॥ शुभ्रत्वासी द्रवत्वासी । दुग्धीं गोडी असे सरसी । तेवीं स्फुरणरूप प्रकाशासी । भिन्नता नसे ॥ २५ ॥ भिन्नता जरी असणें । तरीच परब्रह्म स्फुरणास जाणें । भिन्नताचि नाहीं ह्मणून असणें । निर्विकल्परूपें ॥ २६ ॥ परी ब्रह्माची जी आखंडता । किंवा असे जी त्याची अक्षयता । हीच जाणावी त्याची सत्ता । पुरुष रूपें ॥ २७ ॥ दुग्धामाजी गोडी । तेंवी सत्तेमध्यें ज्ञानाची परवडी । आयतीच आहे सिद्ध आवडी । वेइजे हीची चित्शब्दें ॥ २८ ॥

जेवीं साखरेसी गोडीचा संबंधु । आयताच असे न बोधिता बोधु । तेंवी ज्ञानामाजी आनंदु । सहजची असे ॥ २९ ॥ गोडित्वासी शुभ्रत्वासी । तैसेंच जाणा द्रवत्वासी । दुग्ध न जाणें परि त्या गुणासी । मुकलें नाहीं ॥ ३० ॥ तैसेंच जें स्वयमेवतत्व । तें न जाणून आपुलें स्वरूपत्व । घेतसे सहज श्रेष्ठत्व । सच्चिदानंद रूपें॥३१॥सत्ता ज्ञान आणि आनंदु । एकचि स्वयमेव ब्रम्हानंदु । हाचि परिपूर्ण अव्यक्तबिंदु । अव्यक्त ओंकारही म्हणावें ॥ ३२ ॥ सत्ता ज्ञान आनंदु । मिळून असे ओंकार प्रसिद्ध । ॐऐसानादरूप सिंधु । जाणावी तीच अर्धमात्रा ॥ ३३ ॥ ओं ह्मणजे देह चतुष्टयातीत । जें परब्रह्म असे सर्वातीत । ज्याची नयेची कधींही प्रतीत । तोचि ओंकार असेगा ॥३४॥ ह्या नादाकार ओंकाराची । स्फुरणरूप प्रकृति आनंदाची । अनंत ब्रह्मांडांच्या बीजाची । भूमिका हेचि ॥३५॥ साडे तीन मातृका असती । अकार उकार मकार निगुति । मिळून होणाऱ्या नादासीती । अर्धमात्रा ह्मणावी॥३६॥ ओंकारामाजीं उत्पत्ति । तासम अहंकाराची निगुति । त्या अंहकारापासाव सृजति । पंचमहाभूतें ॥३७॥ पंचमहाभूतें आणि त्रिगुण । मिळून झाली अष्टधा प्रकृति जाण । तीच स्थावर जंगमादिकांची खाण । अव्यक्त रूपें असें पैं ॥ ३८ ॥ ईश्वर तो असे निरवयव । पंचभूतात्मकें झाला सावयव । परितो निराकार स्वयमेव । आयताचि असे ॥ ३९ ॥ औट मिळून मातृकांचा । ओंकार अव्यक्त बीजरूप साचा । बीजामध्यें विस्तार वृक्षाचा । तैशाच सर्व मातृका असती ॥ ४० ॥ अकार उकार मकार । ओंकाराच्या तीन डाहाळ्या परिकर । अर्ध मातृका चौथी नादाकार । मिळून होती चत्वार अंगें ॥ ४१ ॥ अकार मातृका स्वयें ब्रम्हा । तैसाचि उकारीं असे स्वयमेव गरिमा । विष्णु नावें ह्याचा महिमा । जाणीव रुप तोचि असे ॥४२॥ तिसरी ती मकर मातृका । तिचाहि महिमा ऐका । ती आयतीच महेश देखा । नानांधकार ही

तोची ॥ ४३ ॥ ब्रम्हांडीं विष्णु ऐसें बोलति । तयाची प्रत्येक शरीरीं वस्ती । अंतःकरणरूप जाणा ती । ओळखा जाणीवरूपें ॥ ४४ ॥ जें जाणीव रूपस्फुरण । तयासी ह्मणावें अंतःकरण । संकल्प सांडिल्याविण । नये त्याची प्रतीती ॥ ४५ ॥ त्या अंतःकरणाचेच फाटे । मन बुद्धि चित्त अहंकार उमटे । पंचप्राणही तोचि होऊनि रहाटे । शरीरामाजीं । ४६ ॥ अंतःकरण स्वअंशेंकरून । शरीरीं व्यानरूप धरून । सर्वत्र राहे प्रवेशून ॥ करी व्यापार वळणाचे ॥ ४७ ॥ मन तोचि समान । नाभि कमळीं वसे जाण । अन्नरस उत्पन्न करून । पोंहोचवी सर्व शरीरीं ॥ ४८ ॥ ऐशिया परि उकार मातृका । मनोमय सृष्टि उत्पन्न करी देखा । इंद्रियग्राह्यविण ओळखा । स्वप्नामाजीं ॥ ४९ ॥ उकाराचि झालें ज्ञानेंद्रिय श्रवण । शब्दरूप होई तो समान । शरीरांतील आकाश तेंचि जाण । असे शरीरीं व्यापुनी ॥५०॥ बुद्धि उदान वायु जाण । कंठस्थानीं राहून । चक्षुरिंद्रियावाटें देखण । करूनि निश्चय करी ॥ ५१ ॥ चित्त तें प्राणवायु झालें । जिव्हेंद्रियांत जाऊन राहिलें । रस विषयाचें जाणणें केलें । त्यानेंचि गा ॥ ५२ ॥ तेंचि प्रवेशून उपस्थेंद्रियांत । रतिसुख जाण भोगत । कंठस्थाना खालीं राहत । हस्तेंद्रियांत प्रवेशे तेंची ॥ ५३ ॥ हस्तेंद्रिया वाटे । कर्म करी चोखटें । ऐशियापरि रहाटें । विषय चिंतन तेंचि करी ॥ ५४ ॥ अहंकार तो पांचवा । गुदस्थानीं अपान लक्षावा । मलमुत्राचा त्याग करावा । ऐसें असें कर्म त्याचें ॥ ५५ ॥ एवं पिंडीं असे उकार मातृका । अनुभव घेउनि तिचाही ऐका । अर्पण करावे विष्णूसी एका । रहावे कर्तृत्वाभोक्तृत्वातीत ॥ ५६ ॥ पिंडांतील अंतःकरणपंचक । तैशीच उकार मातृकाच प्राणपंचक । ब्रम्हांडीं जाणा हिरण्यगर्भ चोख । तीच असे ॥ ५७ ॥ आतां सांगतों मातृका मकार । तिसरा अज्ञानात्मक कारण देह

साचार । महेशनाम जयासी परिकर । अवस्था जाण सुषुप्ति ॥ ५८ ॥ या कारण देहाचें लक्षण । न कळे मी शरीरीं असे कोण । स्वतः महेश आपण । झाला असे ॥ ५९ ॥ स्थूल देहाचा जाणता । असे स्थूल देहा परता । याच न्यायें अंतःकरणादिकांचा ज्ञाता । तोचि असे वेगळा ॥ ६० ॥ मी जरी देहचि नाहीं । तैसाच सूक्ष्म देहही पाही । ज्ञातेपणें मीच नाहीं । तरी मी असावा कवण ॥ ६१ ॥ ऐसी शंका जया स्थानीं । लक्षितो जीव तो अज्ञानी । ती शंकाचि समर्पुनि । महेशासी देइ जे ॥ ६२ ॥ अकार मात्रका तो स्वयें ब्रह्मा । स्थूल देहींच त्याचा महिमा । तो त्यासीच अर्पण करी जडात्मा । होई वेगळा त्याहुनी ॥ ६३ ॥ जैसा मृत्तिकेचा घट जड । तैसा स्थूल देह अस्ति मांसाचा दगड । जीवात्मा राहून त्या आड । जाणतसे त्या देहासी ॥ ६४ ॥ जैसा सोंगाडचा सोंग वेई । परी तो सोंग नव्हेचि पाही । तैसा जीवही शरीर नाहीं । ऐसें जाणावें ॥ ६५ ॥ सोंगानुसंधान नसे सोंगासी । तैसेंच देहानुसंधान नये देहासी । सुख दुःखही नकळे त्यासी । कदाकाळीं ॥ ६६ ॥ शरीरीं जें सुख दुःख असे । ते जीवचि स्वतः जाणतसें । साक्षी रूप तेथें वसे । म्हणून ऐसें ॥ ६७ ॥ सुषुप्ति काळीं नसे साक्षित्व । म्हणूनि त्यासी अभोक्तृत्व । तेंचि परम अज्ञानतत्व । कारण देहही तोची पं ॥ ६८ ॥ कारण देहाचें अज्ञान । न कळे कारण देहा लागून । ऐसें जया होई ज्ञान । तोची असे वेगळा ॥६९॥ ऐसें समजून देह कारण । करी नेणीव भावासह समर्पण । मकार मातृका महेश जाण । त्यासी हें सर्व समर्पी ॥ ७० ॥ नेणीवचि जेथें नाहीं । तेथें स्वयमेव जाणीवचि पाही । ऐसी जी स्थिती येते देहीं । तीच जाणावी अर्धमात्रा ॥ ७१ ॥ ॐकाराच्या तीन मातृका । संपूर्ण सांगितल्या आतां ऐका । चौथी ती असे अर्ध मातृका । मिळूनि झालें ॐकार विवरण ॥ ७२ ॥ चौथा देह तो

महाकारण । स्वयें असे अर्ध मातृका जाण । हीच परम ज्ञानाची खाण । आत्माराम तो वेगळा ॥ ७३ ॥ मी आत्माचि स्वयंप्रकाश । ऐसें जें स्मरणरूप स्फुरण तयास । तेंच निरटून सावकाश । राहवें निवांत ॥ ७४ ॥ ॐकाररूप बीज जाणा । जगद्रूप वृक्ष गणा । सर्वही तोचि झाला असे माना । राहे परब्रम्ह वेगळें ॥ ७५ ॥ सूत्र, शेला, दोरा । मिळून एकचि कापूस खरा । तेवींच जळ आणि जळगारा । ॐकारची जगद्रूप ॥ ७६ ॥ स्थूलासीच बोलती अधःशून्य । अकार-मातृका तोचि अन्य । सूक्ष्मदेह तोचि उर्ध्वशून्य । उकार मातृका तोचि पैं ॥ ७७ ॥ कारण देह तो मध्य शून्य जाणा । मकार मातृका त्यासीच म्हणा । चतुर्थ शून्य महाकारणीं गणा । अर्ध मातृका तेंचि पैं ॥ ७८ ॥ अकारीं जागृतावस्था असे । उकारी तें स्वप्न वसे । मकारीं सुषुप्ति सावकाशें । तुर्या जाणा महाकारणीं ॥ ७९ ॥ याप्रमाणें ओंकार कळा । जगद्रूप वृक्ष ही त्याची लीला । परब्रम्हरूप स्वयें आगळा । ऐसें श्रोतीं जाणावें ॥ ८० ॥ ब्रम्हीं जाहला ओंकार उल्लेख । त्याचाची विस्तार हें जग देख । ओंकारातीत वस्तुसुरेख । असे कल्पनातीत वेगळी ॥ ८१ ॥ ब्रम्ह स्वतः निर्विकार परम । तेथें ओंकाररूप विकार उगम । लावावया मती सुगम । दिसतचि नाहीं ॥ ८२ ॥ जैसें गोंडाळ सारितां दुरी । शुद्धोदक येतसे करीं । तैसें अज्ञान होतां दुरी । भासे एकचि परब्रह्म ॥ ८३ ॥ ओंकार नाहीं ज्या अक्षरीं । ऐसें अक्षरचि नसे साचारी । मंत्रामध्यें ओंकाराची परी । श्रेष्ठ असे जाणावें ॥ ८४ ॥ ज्या शब्दामागें ॐकार नसे । त्यासी मंत्र ह्मणणेंचि अनारिसें । ओंकारीं सर्व सिद्धी वसे । ह्मणून तो जपावा ॥ ८५॥ ओंकार जप अवश्य करावा । गुरुमुखें समजून घ्यावा । ओंकार स्वयंप्रकाश ध्यावा । स्वनयनीं पूर्ण तो ॥ ८६ ॥ येथें ओंकार महिमान संपलें । नित्य कर्म आरंभिलें । योगाभ्यासीं योग्य भलें । तेंचि

आतां सांगतों ॥ ८७ ॥ दिशेसी जाऊनि यावें । मुख प्रक्षालनादिक करावें । शुचिर्भूत होऊन रहावें । आसनें नंतर करावीं ॥ ८८ ॥ मागें निरुपिलीं आसनें । करावीं नित्य तीं दक्षतेनें । आसनें आटेपूनी मुमुक्षूनें । व्हावें तत्पर अभ्यासीं ॥ ८९ ॥ मग घालावें पद्मासन । सिद्धासन ही योग्य असे जाण । एकाग्र करी अंतःकरण । अल्प प्राणायम करावया ॥९०॥ पूरक कुंभक रेचक करी । तेणें होय शरीर शुद्ध सत्वरी । गुरुपादुकांचें ध्यान करी । सप्रेम भावें ॥ ९१ ॥ मस्तकामध्यें ललाट भागासमोर । श्रीसद्गुरु ध्यावा सुखकर । त्याविषयीं मानसपूजा प्रकार । सांगतों आतां ॥ ९२ ॥ जैसा विधि सद्गुरूनें निवेदिला । तोचि येथें असे कथिला । तोचि आतां ऐकिजे वहिला । एकाग्र चित्तें करूनिया ॥ १ ॥ सहस्रदळीं कल्पवृक्ष कल्पावा । त्यावृक्षमुळीं रत्नखचित सिंहासनावरी ध्यावा । द्विभूजश्री सद्गुरु अवलोकावा । मंत्र ह्मणावा पुढील प्रमाणें ॥ २ ॥ सद्गुरु तैसाचि भावावा । मंत्रार्थ घेऊन पूजावा । सप्रेम भावें आळवावा । श्रीरामचंद्र ॥ ३ ॥

मंत्र.

ब्रम्हानंदं परम सुखदं केवलं ज्ञान मूर्तीं ॥
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यं ॥
एकं नित्यं विमल मचलं सर्वधी साक्षिभूतं ॥
भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरुं तंनमामि ॥

ऐसें मंत्रध्यानें करूनि । पुढील मंत्र साग्र ह्मणूनि । अर्थ लक्षांत आणोनि । जपावागा ॥ ४ ॥

ॐ लं पृथिव्यात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यां गंधं समर्पयामि ॥
ॐ हं आकाशात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यांपुष्पं वौषट् ॥
ॐ यं वाय्वात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यां धूपं समर्पयामि ॥
ॐ रं अग्न्यात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यां दीपं समर्पयामि ॥

ॐ वं अमृतात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यां नैवेद्यं समर्पयामि ॥
ॐ सं सर्वात्मकं श्रीमत्सद्गुरु पादुकाभ्यां तांबुलदक्षिणादिसर्वोपचारान्समर्पयामि ॥ इति पंचोपचार पूजा ॥

॥ सद्गुरु स्तुति ॥

ॐ नमस्ते नाथ भगवन् शिवाय गुरुरूपिणे ॥
विद्यावतार संसिध्यैस्वीकृतानेक विग्रहः ॥ १ ॥
नवायनवरूपाय परमार्थैक रूपिणे ॥
विवेकिनां विवेकाय विमर्शया विमर्शिनां ॥ २ ॥
प्रकाशानां प्रकाशाय ज्ञानिनां ज्ञानरूपिणे ॥
सर्वाज्ञानतमोभेदभानवेचिद्घनायते ॥ ३ ॥
स्वतंत्रायदया क्लृप्त विग्रहाय चिदात्मने ॥
परतंत्राय भक्तानां भव्यानां भव्यरूपिणे ॥ ४ ॥
पुरस्तात्पार्श्वयोः पृष्ठे नमस्कुर्यादुपर्यधः ॥
सदामच्चित्तरूपेण विधेहिभवदासनं ॥ ५ ॥
इत्येवं पंचभिः श्लोकै स्तुवीतयतमानसः
प्रातः प्रबोध समये जयात्सुदिवसोभवेत् ॥ ६ ॥

ऐशी स्तुति मनःपूर्वक करुनि । भ्रुमध्यें दृष्टिस्थापूनि । गुरुमानसपूजासंपवुनि । रत्नमय मंदिर कल्पावें ॥ ५ ॥ त्या रत्नमय मंदिरीं जाणा । श्रीरामचंद्र वैकुंठराणा । सप्रेमभावें ध्यानीं आणा । नंतर विसर्जन करा निर्माल्य ॥ ६ ॥ सुगंधयुक्त उष्णोदक घ्यावें । श्रीरामाचें मुख प्रक्षालन करावें । कर्पुर शकलें दंत घर्षणावें । आटोपा मुखगंडुषविधान ॥ ७ ॥सुवर्ण शलाकेनें । जिव्हालेखन करणें । सूक्ष्म स्वच्छ वस्त्र घेणें । मुख प्रोच्छन करावें ॥ ८ ॥ ललाटीं अष्टगंध तलिक लावा । पंचोपचारें पूजावा । निर्माल्योपकर्ष मंत्र ह्मणावा । सांगतों आतां ॥ ९ ॥

मूलमंत्र.

श्रीसीतारामायनमः निर्माल्यमपकर्षयामि ॥

मूलं श्रीसीतारामायनमः उष्णोदकेनमुखं प्रक्षालयामि ॥

मूलं श्रीसीतारामायनमः सुवर्णशलाकया जिव्होलेखनं परिकल्पयामि ॥

मूलं श्रीसीतारामायनमः सुगंधितोष्ण जलगंडुषैर्मुख क्षालनं परिकल्पयामि ॥

मूलं श्रीसीतारामायनमः सूक्ष्मवस्त्रेण मुखप्रोच्छनं परिकल्पयामि ॥

मूलं श्रीसीतारामायनमः ललाटे अष्टगंधेन तिलकं परिकल्पयामि॥

ऐसा मंत्र जपावा । श्रीरामपंचोपचारें आळवावा । सहस्त्रदळीं सप्रेमें ध्यावा । प्राणायाम आचमन करूनि ॥ १० ॥ आतां ऐका षट्चक्र भेदन । जें गोप्य असे परम जाण । ज्याचा अलोलिक महिमान । कळतां होय प्राप्त सिद्धि ॥ ११ ॥ ही पिपिलिका मार्गाची कड-सणी । साध्य झालिया होतो ज्ञानी । सर्व सिद्धि साह्य होऊनि । देतात सकळ समृद्धि तें ॥ १२ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । एकाग्र चित्तें ऐकावें पूर्ण । होईल शुद्ध अंतःकरण । अनायासें होय मोक्ष ॥ १३ ॥

## आधार चक्र ध्यानोपदेश.

पद्मासनावरी बैसावें । गुदस्थानीं लक्ष न्यावें । आधारचक्र पहावें । करी ध्यान खालील प्रमाणें ॥ १४ ॥ आधारचक्रीं चतुर्दळ कमळ असे । तें ताम्रवर्णी अति सौरसें । चतुरांगुळ विस्तार दिसे । लक्ष त्यावरी ठेवावें ॥ १५ ॥ प्रथम आधार चक्राच्या शुद्धचर्य । पुढील मंत्र जपावा यथार्थ । तो आतां निवेदितों येथ । श्रोतीं परिसावा॥१६॥

मूलाधार मंत्र.

ॐ ॠं उं; ॐ ॠं सुधा सुधैः ॐ ॠं स्वाहा ।

ॐ अव्वुं उव्वुं अगस्त्यशाप नशि नशि ॥

ॐ शिवायनमः नवसिद्धिःशाप नाशि नशि ।
ॐ शिवाय शुक्रःशाप नशि नशि ।
ॐ सीयुं गज शाप नाशि नशि ।। इति

ऐसें मंत्र ध्यान प्रथम । साधकें करावें परम । येणें सफल होइल कर्म । नाहिं तें जाय व्यर्थचि ॥ १७ ॥ प्रत्येक मंत्राप्रति । शाप आहे निगुति । त्याचे विमोचनार्थ जपती । वरील मंत्र ॥ १८ ॥ मंत्र जपल्यावरी । कमळ पाकळ्या भीतरीं । पुढील अक्षराकृति ध्यान करी । सांगतों येथें ॥ १९ ॥ प्रथम पांकळी मध्यें जाण । वं वङ अक्षराकृति म्हण । द्वितिय पांकळी मध्यें अवलोकन । शं शङ अक्षराकृतीं करावें ॥ २० ॥ तृतीय पांकळी मध्यें असे । षं षङ अक्षराकृति वसे । चतुर्थ पांकळी सावकाशें । अवलोकी सं सङ अक्षराकृति ॥ २१ ॥ ऐसें अक्षराकृति लक्ष ठेवणें । वरील मंत्र मनोमय म्हणणें । अधर जिव्हा न हालविणें । मुळींच जाणा ॥ २२ ॥ हे बीजाकृती ध्यान । करावें एकाग्र करूनि मन । चतुर्दळ कमळीं अवलोकन । सगुण मूर्तीचें करावें ॥ २३ ॥ अधार चक्रीं पुजावा । गणपति देव ओळखावा । षोडशोपचारें आळवावा । येणेंचि होय कृपा त्याची ॥ २४ ॥ गणेशाच्या उभय अंगास । स्त्रिया दोन कल्पाव्या त्यास । रिद्धि सिद्धि नाम तयास । त्यांचीही पूजा करावी ॥ २५ ॥ ऐशिया स्त्रियासह । गणपति पूजेचा प्रमेह । जाणोनि करावा प्रवाह । तया स्तुतिपाठाचा ॥ २६ ॥ तो मानसपूजा मंत्र । येथें ऐका स्वतंत्र । घेऊनि त्याचा अर्थ । जपाणा अंतरीं ॥ २७ ॥

ॐ नमः शिवाय ॐ आँ क्रौं, ह्रीं, श्रीं, क्लीं, क्लौं, गं
गेहे गेहे गणपतयनमः ।

**गणानां त्वां गणपतिं हवामहे ।**

प्रियानां त्वा प्रियपतिं हवामहे ।
निधीनां त्वा निधिपतिं हवामहे ।
वसोम्र अहमजानी गर्भधमात्व मजासि गर्भधम् ।

हे द्वय मंत्र मुखें म्हणुनी । श्री गणपति पूजावा मुमुक्षुनी । प्रसन्न मग तो होउनी । देतो पंचकृत्य शक्तीतें ॥ २८ ॥ ऐसें ध्यान आटोपिल्यावरी । ॐकाराक्षरीं तें गुप्त करी । आतां नेतिध्यान अवधारी । म्हणजे झालीं तीन ध्यानें ॥ २९ ॥ एकास मंत्राकृति म्हणती । दुसऱ्यास सगुणामाजीं गणती । तिसरें तें निर्गुण प्रांतध्याती । ॐकाराक्षराकृतीनें ॥ ३० ॥ ॐकार अक्षराकृति कल्पावी । मन त्यावरी गुंतवी । पुढील मंत्र म्हणवी । मुखा कडुनि ॥ ३१ ॥

मंत्र.

नाहं पृथ्वी भूतो; नाहं आपभूत मेव
नाह मग्निर्भूतो, नाहं वायुर्भूत मेव
नाहमाकाश भूतो, नाहं सर्व भूत मेव
अहं सर्व साक्षि सदा आनंदमात्र ब्रह्मोस्मि

याचा अर्थ ध्यानीं आणावा । तो निवेदितो ओळखावा । सर्व साक्षीस काढावा । शरीराहूनि वेगळा ॥ ३२ ॥ पृथ्वीचा जाणता । असे मी पृथ्वी तत्वापरता । पृथ्वीचाच अंश देह आयता । माझें रूप नव्हेची ॥ ३३ ॥ शरीरीं असे आपतत्व । शोणित लाळ मूत्रादि समस्त । जाणता मी अतीत । असे जाणा वेगळा ॥ ३४ ॥ शरीरीं प्राण वायु असे । तैसेंच अग्नि तत्वही वसे । आकाश तत्वही जाण सावकाशें । साक्षी असे मी भिन्न ॥ ३५ ॥ साक्षित्वातीत मी आयता ब्रम्ह । ऐसें आणोनि ध्यानीं परम । होउनि आपण आकाशधाम । राहावें जाण निवांत ॥ ३६ ॥ ध्यान करणारास फल । काय प्राप्त होतें म्हणाल । तेंही सांगतो प्रांजळ । ऐका आतां ॥ ३७ ॥ संपूर्ण पंचभूत व्यवहार ।

येणें होतसे नष्ट साचार । विषयांचा अंतःकरणांतून विचार । निघून जातो ॥ ३८ ॥ ध्यान झालिया वरी । मन मुडावें शरीरा भीतरीं । मध्यमा नाडीचे अंतरीं । नेऊनि जाण ठेवावें ॥ ३९ ॥ पाश्चिम मार्ग जया ह्मणती । अथवा सुषुम्ना नाम देती । तिची पृष्ठीच्या कण्या माजीं वस्ती । आहे ऐसें जाणावें ॥ ४० ॥ कण्यास एकवीस मणी असती । त्यासच एकवीस स्वर्ग ह्मणती । त्या मण्या मधूनि जाण निगुती । गेली असे सुषुम्ना ॥ ४१ ॥ आधार चक्र पासूनि । ते थेट ब्रम्ह रंध्रापर्यंत जाणी । लक्ष त्या नाडी मधून आणी । ब्रम्ह रंध्रा बाहेर ॥ ४२ ॥ तालूचे अंतरीं । ब्रह्मरंध्र असे अवधारीं । त्या रंध्रांतूनि बाहेरी । असे आकाश एकचि गा ॥ ४३ ॥ कल्लोळीसबाह्य वसे । जैसें जळचि सावकाशें । तैसें आपणासबाह्य आकाश असे । व्हावें आपण तेंचि पैं ॥ ४४ ॥ मीच आकाश ऐसें भावावें । आकाशाचें स्मरण सोडावें । स्मरणांतील आकाश व्हावें । राहवे अद्वैत होऊनि ॥ ४५ ॥ अल्प काळ लोटिलया उपरी । पुनः येई माघारीं । ब्रम्हरंध्रांतूनि अंतरी । नासाग्रीं यावें ॥ ४६ ॥ नासिका मधील छिद्रें । एकवट होऊनि तीं रंध्रें । कंठीं मिळालीं समग्रें । त्यांतूनि येईजे कंठस्थानीं ॥ ४७ ॥ कंठांतूनि काढिजे मन । करद्वय नाड्या ओळखून । सव्य हस्तांतील नाडी मधून । यावें मध्यमाग्रीं ॥ ४८ ॥ पुनः त्यांतूनि परतावें । वामहस्तीं जाऊनी यावें । ऐसें करद्वय शुद्ध करावें । यावें माघारें हृदय स्थानीं ॥ ४९ ॥ हृदयापासूनि नाभी खालीं । अन्नमय नाडी असे गेली । त्या नाडीमधून नेली । पाहिजे आपुली दृष्टि गा ॥ ५० ॥ तेथूनि ही परतावें । वाम कुक्षीं प्रवेशावें । मग माघारें यावें । हृदयस्थानीं ॥ ५१ ॥ हृदयामधून आधारचक्रीं जाण । यावें श्रीगणपतीचें दर्शनालागीं आपण । दर्शन घेऊन लिंगस्थान । परत आपण गाठावें ॥ ५२ ॥

## स्वाधिष्ठान चक्रध्यानोपदेश.

आधार चक्रापासूनि दुरी । चार अंगुलें लिंगस्थान उपरी । तयास्थानीं स्वाधिष्ठान चक्र अवधारी । बोलती त्या षट्‍दळ ऐसें ॥९३॥ तें षट्‍दळ कमळ पीतवर्ण । त्यास सहा पांकळया असती जाण । याचें ही आतां परीक्षण । करावें एकाग्रचित्तें ॥९४॥ ऐसें ध्यान केलयाउपरी । पुढील मंत्र ह्मणा सत्वरी। अधर जिव्हा न हालवितां अंतरीं । जपावागा ॥९५॥

मंत्र.

ॐ नं, शिं, ऋं, शुक्रदेवायस्वाहा सुधासुधैः ।
ॐ अं शं वं ब्रम्हदेव शाप नाशि नाशि ॥

ऐसा येथें जपावा मंत्र । अधरजिव्हेवीण स्वतंत्र । हेंचि शापविमोचन तंत्र । आहे ऐसें जाणावें ॥ ९६ ॥ हा जप आटोपून सत्वर । करावें अक्षराकृति ध्यान सुंदर । बंपासून लं पर्यंत निर्धार । त्यांचा असे ॥ ९७ ॥ प्रथम पांकळीमध्यें जाण । बं बङ अक्षराकृति म्हण । द्वितीय पांकळीमध्यें अवलोकन । भं भङ अक्षराकृति करावें ॥ ९८ ॥ तृतीय पांकळीमध्यें असे । मं मङ अक्षराकृति वसे । चतुर्थ पांकळीं सावकाशें । अवलोकीं यं यङ अक्षराकृति ॥ ९९ ॥ पंचम पांकळी-मध्यें असती । रं रङ बिजाक्षराकृति । षष्टम् पांकळीमध्यें वस्ती । असे लं लङ अक्षरांची ॥ ६० ॥ ऐसें अक्षराकृति लक्ष फिरवा । वरील मंत्र मनोमय जपावा । जिव्हा अधर न हालवावा । रहावे ध्यानस्थ होउनि ॥ ६१ ॥ बीजाकृति ध्यान संपलें । आतां सगुण ध्यान पाहिजे ऐकिलें । स्वाधिष्टानीं ब्रम्हदेवास अवलोकिले । पाहिजे ऐसें जाणावें ॥ ६२ ॥ स्वाधिष्टानीं पंचमुखी ब्रम्हदेव । असे आयताच स्वयमेव । सावित्रीशक्ति सावयव । तीही असे सान्निध ॥ ६३ ॥ पुर्वे मंत्र करूनि । पंचोपचार पूजा आटोपुनि । यथासांग मानस पूजा संपवूनि । करावी स्तुति पुढील मंत्रे ॥ ६४ ॥

मंत्र.

ॐ शिवायनमः, लंपृथ्व्यैनमः, ।
ऐं सरस्वत्यैनमः, ॐ ब्रह्मदेवायनमः ॥

हा मंत्र जपल्या उपरी । ब्रम्ह देवाची प्रिय अंतुरी । संतुष्ट होते अंतरीं । करी कृपा मुमुक्षुवरी ॥ ६५ ॥ पुढें ब्रम्हदेव स्तवावा । सप्रेम भावें आळवावा । मुखें पुढील मंत्र ह्मणावा । येणेंचि तो संतुष्ट ॥६६॥

वेदस्तुति.—

या कुन्देंदु तुषार हार धवला या शुभ्र वस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकर प्रभृतिभि र्देवैस्सदा वंदिता ।
सा मांपातु सरस्वती भगवती निश्शेषजाड्यापहा ॥ १ ॥
सरस्वति मया द्रष्टा, वीणापुस्तकधारिणी ।
हंसवाहनसंयुक्ता विद्यादानं कुरुष्वमे ॥ २ ॥
श्वेतपद्मासना देवी श्वेतचंदनचर्चिता ।
वरदा सिद्धगन्धर्वै ऋषिभिःस्तुवते सदा ॥ ३ ॥
स्तोत्रेणच तथा देवी जगद्धात्री सरस्वती ।
पद्मपीठा त्रिकालज्ञा सर्वसिद्धिप्रदायिनी ॥ ४ ॥

ऐशी वेदस्तुति करावी । सप्रेम भावें समर्पावी । ब्रम्हदेवाची मूर्ति ध्यावी । येणें प्रकारें ॥ ६७ ॥ ऐसें सगुणध्यान आटोपावें । नकार अक्षराकृतीं गुप्त करावें । ज्ञानाकृति लक्ष ठेवावें । व्हावें तत्पर नेति ध्यानीं ॥ ६८ ॥ सगुण ध्यानाचें निर्गुण करणें । निराकारीं लक्ष ठेवणें । सगुणाचा आत्मा होणें । यासी नेती ध्यान ह्मणावें ॥ ६९ ॥ नेति ध्यानाचा मंत्र जपावा । तो आतां ऐकावा । सार्थ लक्षांत आणावा । होय तेणें आत्म प्राप्ति ॥ ७० ॥

नेति ध्यानोपदेश मंत्रः—

नाहं शब्देंद्रियो नाहं स्पर्शेंद्रियमेव ।
नाहं रुपेंद्रियो नाहं रसनेंद्रिय मेव ॥
नाहं गंधेंद्रियो नाहं सर्वेंद्रिय मेव ।
अहं सर्वव्यापक नित्यानंद मात्र ब्रम्हास्मि ॥

मी जो ध्यान कर्ता । तो असे कर्णेंद्रिया परता । तैसाच त्वगेंद्रियाचा जाणता । चक्षुरिंद्रियाहूनिही भिन्न ॥ ७१ ॥ मी जिव्हा नाहीं घ्राण नाहीं । सकल इंद्रियांचा समूह नाहीं । या सर्वांचा ज्ञाता पाही । स्वतः एक ब्रह्म असें ॥ ७२ ॥ ऐसा अर्थ मनीं आणावा । वरील मंत्र सार्थ जपावा । आत्मप्राप्तीचा ठेवा । अवश्य लाभे ॥ ७३ ॥ या ध्यानाचें फल । सर्वेंद्रियांचें चंचलत्व सकळ । जाऊनि तात्काळ होतीं निश्चल ज्ञानही येणेंच लाभतें ॥ ७४ ॥ ध्यान आटोपा ऐशा प्रकारें । मागें निवेदिलें जें निर्धारें । तैशी सर्व शरीरीं दृष्टि न्यारे । राहावें आकाश गामीं होऊनि ॥ ७५ ॥ पुनः पूर्ववत ब्रम्हरंध्रांतुनि । अंतरीं घुसावें यावें हृदयामधुनी । स्वाधिष्ठान चक्र अवलोकुनी । शरण जावें ब्रह्म-देवा ॥ ७६ ॥ पुनः उर्ध्व चलावें । नाभी कमळीं यावें । मणिपूर चक्रासी अवलोकावें । याचस्थानीं ॥ ७७ ॥

## मणिपूरचक्र ध्यानोपदेश.

नाभीस्थानीं असें मणिपूर चक्र । दशदळ कमळ तें स्वतंत्र । वर्ण असे त्याचा शुभ्र । श्रोतीं ऐसें जाणावें ॥ ७८ ॥ या दशदळ कमळीं लक्ष ठेवावें । शापविमोचन मंत्रासी जपावें । त्या मंत्रासी आतां ऐकावें । सांगतों येथें ॥ ७९ ॥

मंत्रः—

ॐ शिं, क्रिं, मं नमः ॐ अं सं वं विष्णुर्शाप नशि नशि ॥

हा जपावा मंत्र ऐसा । आतां दशमातृका परिसा । करा तत्पर मानसा ।

ऐकावया ॥ ८० ॥ प्रथम पांकळीमध्यें जाण । डं ढङ् अक्षराकृति
ह्मण । ऐसें फंफङ् मातृकेपर्यंत अवलोन। यथार्थ जाण करावें ॥ ८१ ॥
डंपासून फंपर्यंत असती । दशमात्रा निगुती । त्या अवलोकोनि श्रोतीं ।
ध्यान करावें ॥ ८२ ॥ या बीजाकृतिध्यानें करून । त्रयोदशासिद्धिवश
जाण । होऊनि देतात मुमुक्षूस ज्ञान।करितां मातृकाध्यान करावें ॥८३॥
आतां याच चक्रीं दुसरें ध्यान । चतुर्भुज विष्णु कल्पून । लक्ष्मि शक्तिसह
जाणून । पूर्वमंत्रें करावें ॥ ८४ ॥ पुजा षोडशोपचारें करी । आतां
वेद मंत्र अवधारी । जपावया पाठकरी । निवेदितों येथें ॥ ८५ ॥

ॐ नमो नारायणाय वं आपोनमः । हरिः ॐ विष्णुदेवायनमः

श्रां श्रीं श्रुं श्रूं श्लीं श्रौं श्रुं श्रौं, अष्ट लक्ष्यैनमः ॥

क्लिं सर्वसुखलक्ष्म्यै नमः । श्रीहरिः ॐ मायायैनमः ॥

हा वेद मंत्र मनोमय जपावा । सप्रेमें विष्णूस समर्पावा ॥ पुन
वेदस्तुतिमंत्र ह्मणावा । पुढील प्रमाणें ॥ ८६ ॥

**वेदस्तुतिः—**

**सौभाग्य वृद्धिं कुरुमे गृहेश्री ॥**
**धनधान्य वृद्धिं कुरुमे गृहेश्री ॥**
**सौवर्ण वृष्टिं कुरुमे गृहेश्री ॥**
**सम्पत सुवृद्धिं कुरुमे गृहेश्री ॥**

ऐशिया प्रकारें वेदस्तुति । मुखें ह्मणावी गा निगुति । होतो
संतुष्ट लक्ष्मिपती । देतो सकल समृद्धीतें ॥ ८७ ॥ तिसरें नेति-
ध्यान अवधारी । विष्णूसी मकाराक्षरीं गुप्त करी । मकाराकृति
सत्वरीं । ध्यानीं आणा ॥ ८८ ॥

**मंत्रः—**

**नाहं जागृतावस्था नाहं स्वप्नावस्था एव**
**नाहं शुषुप्त्यावस्था नाहं तुर्यावस्था एव**

नाहं तुर्यातितावस्था नाहमुग्रशान्तमौनावस्था एव
अहं सर्वशांत मौनातित अनादि नित्य स्वय ब्रह्मास्मि ॥
नाहमन्नमयकोशो, नाहं प्राणमयः
नाहं मनोमयकोशो नाहं विज्ञानमयकोशः
नाहमानंदमयकोशो नाहं तिरोधानमलमयकोशः
अहं सर्वकोशैक्य साक्षी आनंद शिवमय ब्रम्हास्मि ॥
नाहं रागद्वेषकामगुणो, नाहं क्रोधलोभ मोहगुणमयः
नाहं तपोहंकारगुणो नाहमिति सर्वगुणस्वरुपमेव
अहं सर्वगुणातीतः सदा आनंदसाक्षी ज्ञानमयोस्मि ॥

देहाच्या चार अवस्था । माझ्या नव्हती मम परौता । मी त्यांचा साक्षी स्वयमेव आयता । सच्चिदानंद स्वरूप ॥ ८९ ॥ शरीरामध्यें पंच कोश असती । अन्नमय प्राणमय मनोमय निगुती । विज्ञानमय आनंदमय मिळून होती । पांच जाणा ॥९०॥ शरीरामध्यें ज्ञानाची वस्ती । ज्ञानासीच शिव बोलती । तो ज्ञानवान शिव मी निगुती । आहें ऐसें जाणावें ॥९१॥कामक्रोधादि षड्रिपु । शरीरामध्यें आपेआपु । कारणपरत्वें निर्माण अमुपु । तैसेच नष्टही होताती ॥ ९२ ॥ मजमध्यें हे षड्रिपु उपजती । ते कारण सरलिया नाश पावती । नाश पावण्या कारणेंच उत्पन्न होती । मजमध्यें हें ॥ ९३ ॥ मी त्यांचा जाणता । असे आयताचपरता । यांचेयोगें आत्मप्राप्ति नये हाता । ह्मणून त्याग जाण करावा ॥ ९४ ॥ ऐसा सार्थ जप करा । सर्वांहूनि मी भिन्न खरा । ऐसा मनीं निर्धार धरा । व्हा स्वयें ब्रह्मची ॥ ९५ ॥ या ध्यानाचें फळ । त्रयोदश रागद्वेषादि सकल । नाश पावती ते अमंगळ । शांति मिळते साधका ॥ ९६ ॥ सार्थ जपावलोकन करा । पूर्ववत् ब्रम्हरंध्रांतूनि. या बाहेरा । देऊनि आकाशगामी फेरा । करा शुद्ध सकल नाडी ॥ ९७ ॥ येथें मणिपूर

ध्यानोपदेश संपला । आतां अनाहत चक्र ध्यानाला । सांगण्याचा हेतु असे भला । तरी तोही ऐकावा ॥ ९८ ॥

## अनाहतचक्र ध्यानोपदेश.

अनाहतचक्र हृदयस्थानीं । द्वादशदळ कमळवर्ण जाणी । विजेसमान असे विलोकुनी । ध्यान त्याचें करावें ॥९९॥ प्रथम योगभावनामंत्र । जपावा येथें स्वतंत्र । तो सागतों आतां अत्र । देईजे लक्ष ॥ १०० ॥

ॐ सीं कीं नमः, ॐ अं सं वं रुद्रशाप नशि नशि ।

मंत्र हा जपतां । शापाची होय दग्धता । बीजाकृति पहा आतां । सांगतों येथें ॥ १ ॥ द्वादशदळ कमळ पांकळ्या माझारीं । प्रत्येकीं एक एक अक्षर निर्धारीं । कं कङ्पासून ते ठं ठङ्पर्यंत साचारी । अक्षरें जाणावी ॥ २ ॥ मंत्र ह्मणावा मनोमय । व्हावें नंतर निर्विषय । दृष्टि करावी अंतराय । मातृकांमध्यें ॥ ३ ॥ मंत्र बिजाकृति ध्यान । आटोपूनि करा सुशोभित स्थान । अनुहत चक्रीं मेहश महिमान । पार्वतीसह जाणावें ॥ ४ ॥ पूर्वमंत्रें करूनि । निर्माल्य विसर्जनादि आटपुनी । पंचोपचारें पुजा करूनी । उभयास करा नमस्कार ॥ ५ ॥ ऐसी द्वितीय सगुण भावना । पुजन करा एकाग्र मना। पुढील मंत्र मनीं म्हणा । निवेदितों येथें ॥ ६ ॥

मंत्रः—

शिवाय रं रङ् अग्नि देवायनमः हं हङ् यमदेवायनमः ।
सिं सिङ् रुद्रदेवायनमः सौं सौङ् रुद्रिदेवायनमः ॥

हा मंत्र अशा प्रकारें । जपणें झालियावरी दुसरें । वेदस्तुतिध्यान निर्धारे । पुढील प्रमाणें ॥ ७ ॥

वेदस्तुति—

शरणांतरुणेंदुमंबरे शरणंमेगिरिराजकन्यका ।
शरणं नान्य दुपैमि दैवतम् ॥

बहवो भवताऽनुकंपिताःकिमितीशान ममानुकंपसे ।
दधताकिमु मंदराचलं परिमाणूकमठेन दुर्धर ॥

या जपानें शंकर पार्वती । मनोभावें संतुष्ट होतीं । भक्तावरी कृपा करिती । सामर्थ्य येई संहाराचें ॥ ८ ॥ आतां तिसरें नेति ध्यान अवधारा । शकाराक्षरीं पार्वती वरा । ध्यानीं आणूनि गुप्त करा । धरा ध्यान शकारीं ॥ ९ ॥ पुढील मंत्र मुखीं ह्मणणें । अर्थ विचार द्वारा जाणणें । सर्व साक्षि होऊन राहणें । पाहणें आपुलें स्वस्वरूप ॥ १० ॥

नेतिध्यानोपदेश मंत्र—

नाहं मनोऽन्तःकरणो, नाहं बुद्धिरंतःकर्ण मेव ।
नाहं चित्तोन्तःकरणो नाहमहंकारांतःकरणमेव ॥
नाहं संकल्प विकल्प भ्रांतिः नाहं सर्वांधकारकरणोदयमेव ।
अहं सर्वांतःकरणलयबोधानंदमात्र ब्रम्हज्ञानोस्मि ॥

या ध्यानाच्या योगें । अंतःकरण व्यवहार भंगे । चित्त होऊन जाय पांगे । शांति मिळे साधका ॥ ११ ॥ येथें अनाहत चक्रध्यान संपलें । पुढें पाहिजे लक्षिलें । असे येथें बोधिलें । विशुद्ध चक्र ॥ १२ ॥

## विशुद्धचक्र ध्यानोपदेश.

विशुद्ध चक्र तें पंचम । षोडश दळ कमळ नाम । धुम्रवर्ण जयाचा परम । कंठ हें स्थान तयाचें ॥ ३ ॥ विशुद्ध चक्र शुद्ध होतें । पाप विमोचन मंत्रानें तें । तो मंत्र सांगतों येथें । ऐका आतां ॥ १४ ॥

शापविमोचन मंत्रः—

ॐ यं क्लीं यङ् नमः ॐ अंग संङ् वङ् महेश्वर शाप नाशि नाशि ।

हा मंत्र अंतरीं ह्मणावा । एकाग्र चित्तें अवलोकावा । अधर मुखींच न हालवावा । अवलोकावी बिजाकृति ॥ १५ ॥ षोडशदळकमळ पांकळ्या भीतरीं । षोडस मातृका स्वयमेव अवधारी । अंपासून तें अः

पर्यंत साचारी । जाणाव्या त्या ॥ १६ ॥ दृष्टि लावावी न्हेटन । न द्यावी मातृकावरूनि निसटून । नंतर सगुण ध्यानास विनटून जावें शरण ॥ १७ ॥ अष्टदशभुजा आहेत जिशी । शेंदूर चर्चित स्वयं-प्रकाशीं । अकस्मिक उत्पन्न झाली ऐशी । पाहूनि पुजा करावी ॥ १८ ॥ नंतर जपावा मंत्र । तोही ऐका स्वतंत्र । वेदस्तुति ही अत्र । सांगेन आतां ॥ १९ ॥

शिवसिततम वायुदेवायनमः क्रींमहेश्वरायनमः ॥
यं वायवेनमः शिवज्ञानबोध शिवमहेश्वर देवायनमः ॥

वेदस्तुति—

नमः शिवायच, मयोभवायच
नमः शंकरायच, मयस्कराय
नमः शिवायच, शिवतरायच

ऐसा मंत्र आणि वेदस्तुति । मनोमय म्हणा अवश्य निगुति । तेणें होईल जगदंबती । प्रसन्न जाणा ॥ २० ॥ देवी पूजन आटोपून । तें सगुण ध्यान गुप्त करी नेऊन । वकार अक्षरीं चित्त देऊन । नेतिध्यान करावें ॥ २१ ॥ वकार अक्षराकारीं लक्ष ठेविजे । पुढील मंत्र मुखें ह्मणजे । अर्थ त्याचा ही जाणिजे । होयी सावध स्वस्वरूपीं ॥ २२ ॥

साक्षि ध्यानोपदेश मंत्रः—

नाहं रजोगुणो, नाहं तमोगुणमेव, नाहं सत्वगुणो. ॥
नाहं रजोगुणवृत्ति, नाहं तमोगुणवृत्ति, नाहंसत्वगुणवृत्ति ॥
अहं त्रिगुणातीत आनंद ज्ञानब्रह्मास्मि ॥

या मंत्राचा अर्थ । सांगतों आतां यथार्थ । चित्त देऊनि येथ । ऐकावा तो ॥ २३ ॥ रजोगुण ज्ञानाचा लोभीस्वभाव । जो बंधन करूनि देतो विष-यानुभव । तमो गुण ज्ञानाचा तामस स्वभाव । जया पासूनि होताती षड्विकार ॥ २४ ॥ ज्ञानाच्या शांत स्वभावासी ह्मणती ।

सत्व गुण तो ज्ञानाभिलाषवृत्ति । जाणूनि ध्या यांची प्रतिती । ज्ञाते तुम्ही आहां भिन्न ॥ २५ ॥ तुम्ही स्वतः स्वसंवेद्य ब्रम्ह । तोचि मी अहंपणातीत परम । हें जाणूनि मुमुक्षूनें वर्म । व्हावें त्रिगुणातीत ॥ २६ ॥ एसें त्रिगुणातीत होऊनि । शरीरीं दृष्टि व्यापुनि । आकाश गामीं होऊनि । यावें परत भ्रुमध्यें ॥ २७ ॥

## अज्ञाचक्र ध्यानोपदेश.

भ्रुमध्यें अज्ञाचक्र असे । तया अग्निचक्रही नामवसे । त्रिदळ कमळ अति सौरसें । तेंची जाणा ॥ २८ ॥ शापविमोचनार्थ ह्मणावा । पुढील मंत्र अवधारावा मनोमय जाण बोलावा । सांगतों येथें ॥ २९ ॥

**प्रथम योग भावना मंत्र.—**

ॐ यं, ऋं, उं नमः ॐ अङ्, सङ्, वङ्,सदाशिव शाप नाशि नाशि ॥ या मंत्रोच्चारणायोगें । त्रिमळ नष्ट होऊनि पांगे । अतःकरण होई जागे । बीजाकृति ध्यान करावया ॥ ३० ॥ त्रयपांकळ्या माझारीं । त्रय मातृका अवधारी । हं क्षं ळं निर्धारी । आहेत ऐसें जाणावें॥३१॥ मातृकाकार लक्ष ठेवणें । यासी बीजाकृति ध्यान म्हणणें । पुढें सगुण ध्यान करणें । याचचक्रीं ॥ ३२ ॥ अज्ञा चक्रीं ललाटस्थानीं । भ्रुमध्यें आंत दृष्टि रोखुनि । अकस्मिक श्रीगुरुदत्तात्रयास विलोकुनि । करावें ध्यान त्याचेंगा ॥ ३३ ॥ मूर्ति कल्पावी एक मुखी । सहा हस्त तया देखीं । हास्यवदन अवलोकी । पुजा त्याची करावी ॥ ३४ ॥ पूर्व मंत्रें करूनि जाणा । मानस पूजाविधिमंत्र म्हणा । पुजा सप्रेमें गुरुराजराणा । स्वयंप्रकाशी अनादि जो ॥ ३५ ॥

**॥ सगुणध्यानोपदेश मंत्र ॥**

ॐ दत्त दत्त, ॐ दत्ता दत्तात्रेय ॐ दत्त दत्त ।

ॐ दत्तात्रय दत्ता ऱ्हीं गौर्यैनमः ।

मनोमय म्हणा हा मंत्र । गुरुदेव दत्तात्रयाचा स्वतंत्र । रचना याचीही विचित्र । असे जाणा ॥ ३६ ॥

वेद स्तुतीः—

**नमः कपर्दिनेच व्युप्तकेशायच नमः सहस्राक्षायच ।**

**शिपिविष्टायच नमो निमीदुष्टमायचेषु मतेच. ।**

ही वेदस्तुति उत्तम परी । स्वमुखें म्हणावी अंतरीं । ऐका आतां भावना तिसरी । एकाग्र चित्तें ॥ ३७ ॥ श्री गुरुदत्तात्रयाची मूर्ति । गुप्त करी यकारीं निगुति । यकाराक्षर ध्याईजे मागुति । नेति ध्यान हें तिसरें ॥३८॥

**॥ नेतिध्यानोपदेश मंत्र ॥**

**नात्र प्राणवमलो, नाहं काम्यमलमेव नाहं मायामलोनाह मावर्ण मलमेव ।**

**अहं सर्वमलातीत तन्मात्र आनंदमय शिवमय ब्रम्हास्मि ।**

ज्ञानदायक हा मंत्र म्हणुनि । पुढें पूर्ववत दृष्टि फिरउनि । आकाश स्थानापन्न होउनि । यावें वरतें सहस्रदळीं ॥ ३९ ॥

## सहस्रदळ चक्र ध्यानोपदेश.

मस्तकाचे मध्यमार्गीं । सहस्र पांकळ्या सहस्ररंगी । कमळ असे याच जागीं । बीजाकृति ती ज्ञ असे ॥ ४० ॥

**मंत्र.** ॐ ॠं ज्ञान सूर्यग्रह स्वाहा ।

हा मंत्र मनोमय म्हणा । ज्ञकाराक्षर ध्यानीं आणा । हें ध्यान आटोपुनि जाणा । ध्यावें श्रीराम मूर्तीसी ॥ ४१ ॥ रत्नखचित सुवर्णमय सिंहासनीं । अष्ट बोटें उंच तें मांडुनि । श्रीरामासी तया स्थानीं । विराजमान करावें ॥ ४२ ॥ पूर्व मंत्रें मानसपूजा करा । मणिपूरचक्रीं मंत्र म्हणितला अवधारा । तोचि येथें जपाकारणें वरा । आळवा तेणेंचि श्रीपति ॥ ४३ ॥ ध्यान केलियाविना । षट्चक्र भेदन न होय जाणा । स्थिर न होय मनरूपराणा । करितां करावा

ध्यानाभ्यास ॥ ४४ ॥ एक वर्षपर्यंत नेमें । आचरलिया हा ध्यान मार्ग प्रेमें । सकळ जळजळ विरामे । प्राणजय सहज होय ॥ ४५ ॥ यासी बोलती पिपीलिका मार्ग । पुढील अध्यायीं प्राणायामांग । कथिलें असें यथासांग । श्रोतें तेंही परिसावें ॥ ४६ ॥ येथें चतुर्थाध्याय संपला । राजारामें अहंकार अर्पिला । मिथ्याहोऊनिरत झाला । सद्गुरुचरणीं ॥ ४७ ॥ इति श्री नित्यानित्यविवेकग्रंथ । राजाराम ब्रह्मचारी कृत । चतुर्थाध्याय संक्षिप्त । सद्गुरु साह्य संपविला ॥ ४८ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु । ओव्या ॥ १४९ ॥

---

## अध्याय पांचवा.

### प्राणायामलक्षण.

श्रीगणेशायनमः । जय जयाजी सद्गुरू । सच्चिदानंद ज्ञानसागरू । मायारूपें जगदाकारू । तूंची एक झाळासी ॥ १ ॥ जैसी एकचीं मृत्तिका । आयतीच घटीं अनेका । मृत्तिका वांचूनि वेगळिका । घटासी नाहीं ॥ २ ॥ मृत्तिकेच्या ठायीं । घट मुद्दल आलाचि नाहीं । ऐसें असतां पाहीं । घट कशास ह्मणावें ॥ ३ ॥ मृत्तिकेस तव घट ह्मणणें नलगे । तिचें मृत्तिकापण कधीं न भंगे । मृत्तिकाच जरी स्वयमेव अंगें । तरी घट हें नाम मात्र ॥ ४ ॥ नामरूपात्मक आकृति । मुळींच मृत्तिकीं नसे आयती । म्हणून घट घटाकार भिन्न जाती । मुळींच नसे ॥ ५ ॥ तैसें निराकाराचें निराकारपण । न भंगेची कदापिही जाण । परि व्यर्थचि भासे जगदाकार आन । मुळींच नसे जो ॥ ६ ॥ मृत्तिके ठायीं घट आलाचि नाहीं । तैसेंचि निराकारीं जगही नाहीं । नसतांचि घट भासतो पाही । तैसें हें जग निराकारीं ॥ ७ ॥ जेथें जगचि नाहीं । तेथें निराकार स्थान पाहीं । निराकारीं हें झालेंचि नाहीं । जाणावें ऐसें ॥ ८ ॥ जें मुद्दलची नाहीं ।

त्यास अधिष्ठान परब्रह्मतें कायी । हा बोलचि मिथ्या पाही । आहे परब्रह्मस्वयमेव एक ॥ ९ ॥ मृत्तिके माजीं घट विलास । तैसा ब्रम्हींही जगद्विलास । हें जाणून सावकाश । आपुलें अस्तित्व सोडावें ॥ १० ॥ दीपक प्रकाशितो स्वप्रकाशासी । तैसें परब्रम्ह जें स्वयंप्रकाशी । प्रकाशी आपुल्या स्वमायेसी । सहज न्यायें ॥ ११ ॥ स्वयंप्रकाश दीपकामधुनी । प्रकाश काढिला निपटुनी । तरी दीपक राहेल कैसा उरूनी । मागें जाणा ॥ १२ ॥ अथवा प्रकाशामधूनि दीपका । वेगळा काढितांच नये देखा । तैसें परब्रम्हही पारखा । स्वमायेहुनि भिन्न नसे ॥ १३ ॥ दीपक प्रकाश एकची दिसती । परी नामें मात्र द्वय भासतीं । आयताच प्रकाश स्वयंज्योती । दीपक आणि प्रकाश रूपें ॥ १४ ॥ तैसें माया आणि परब्रह्म । द्वय नामें विख्यात परम । परी परब्रम्हाचि एक उत्तमोत्तम । नसे आन यया- ठायीं ॥१५॥ दीपक प्रकाश एक असूनि । प्रकाशाचि भासे व्यापक म्हणूनि । तैसी माया ही परब्रम्हाहुनि । स्पष्ट भासे चोहोंकडे ॥१६॥ दीपकाचि जैसा प्रकाश रूपें भासे । तैसें परब्रह्मची जगद्रूपें विलासें । मग स्वतंत्र जग कोणे ठायीं वसे । विचार ऐसा पाहावा ॥१७॥ जैसा घट दिसताचि मिथ्या । मृत्तिका एक स्वयमेवाचि सत्या । तैसें जगही दिस- ताचि मिथ्या । नामरूप व्यर्थचि ॥१८॥ घट नाम घटकार काढितां । आयती स्वयमेव मृत्तिकाच तत्वता । तद्वत नामरूपात्मक जग त्यागि- तां । एकचि चिन्मय परब्रम्ह ॥१९॥ घटीं घट नाम घटाकार घटासी नाहीं । तें स्वयमेव नामरूप कल्पनींच पाहीं । तैशी जगद्रूपें नामरूपा- त्मक मायाही । आहे जाणा काल्पनिक ॥२०॥ असो आतां प्राणायाम लक्षण । सांगतों येथें उत्कृष्ट परिपूर्ण । हाही मार्ग करी श्रवण । पाविजे योग सिद्धीतें ॥२१॥ प्राणायाम साधण्यापूर्वी जाणा । ओंका- राचें ध्यान अवश्य मनीं आणा । शोधावें ओंकारोद्भवाचें स्थान जाणा ।

ज्योती रूप ॥२२॥ ध्वनीचें अंतरीं जोति असत । मन प्रवेशें त्यांत । मग तें मन लय पावत । विष्णू परम पदीं ॥२३॥ प्राणायाम लक्षणें । पंचप्रकार जाणणें । ओंकाराचा जप करणें । दुसरा जपी गायत्री मंत्र ॥ २४॥ तिसरें भृगुटिमध्यें लक्ष लावा । चौथें नासाग्रीं प्राणापान सम करावा । आत्मस्वरूपीं सोहं जपावा । ऐसें हें पांच प्रकार ॥२५॥ आतां हाचि प्रकार । सांगतों येथ सविस्तर । सावध करूनि अंतर । ऐका आतां ॥२६॥ मागें निरूपिल्याप्रमाणें । सिद्धासन दृढ घालणें । अथवा वज्रासनावरी बैसणें । नंतर करावा अभ्यास ॥२७॥ वज्रासन दृढ करी । लावूनि सव्य टांच गुदद्वारीं । वाम ठेविजे नाभी मूळद्वारीं । लक्ष ठेविजे भृगुटीमध्यें ॥ २८ ॥ भ्रूमध्यासमोर लक्ष न्यावें सुंदर । मसुरप्रमाण निलबिंदु परिकर । स्थिर होईल मग येणें ॥२९॥ पृष्टदंड नीटधरी । हनवटी ठेवूनि उरावरी । जालंदरबंध अवश्य करी । गुडध्यावरी ठेवी हस्त ॥ ३० ॥ प्रथम करावें सूर्यभेदन । ह्मणजे सव्य नासापुटींतून । आंत हळुवार वायु घेऊन । पूरक जाण करावा ।३१॥ आंत वायु घेणें । यास पूरक म्हणणें । तोचि पुनः बाहेर सोडणें । रेचक यासी ह्मणावें ॥ ३२ ॥ असो पूरक केलिया उपरी । वायुशक्तिनुसार कोंडून धरी । कुंभक नामाची परी । अंतरीं जपावे अवश्यमंत्र ॥ ३३ ॥ पूरक करण्या वेळ लागे । त्याचे चौपट कुंभक अंगें । रक्ताभिसरण होय चांगे । मग रेचक करावा ॥ ३४ ॥ कुंभकाच्या निम्पट । रेचक हळुवार करी चोखट । त्वरा करी तरी जाय सकट । शक्ति होय क्षीण येणें ॥३५॥ पूरक करितां ह्मणा । षोडश ओंकार जाणा । अधर जिव्हा हालविल्याविना । कुंभकीं जपा चौसष्ट ॥३६॥ रेचकीं बात्तिस जपावें । अथवा याच न्यायें मनोभावें । गायत्री मंत्रही जपावे । अथवा जपावा नाम मंत्र ॥ ३७ ॥ कुंभक केलीया उपरी । मूलबंध अवश्य

करी । मुलबंधची परी । सागतों आतां ॥३८॥ गुदस्थानीं अपान वसे । हृद्यस्थानीं प्राण असे । उभयतांची ऐक्यता परिसे । होत असे या मूलबंधें ॥ ३९ ॥ गुद ऊर्ध्व आकुंचुनी । आपानवायु आणणें नाभि स्थानीं । प्राणापान सम करूनी । रहावें निवांत ॥ ४० ॥ यासी मुलबंध बोलती । आतां उड्डियान कैशा रीती । आचरण करावा मागुती । तेंही ऐका ॥ ४१ ॥ रेचक करिते वेळीं । नाभि पृष्टिकडे नेहटी सकळी । हळुवार दावीत तया काळीं । करावा रेचक हळुवार ॥ ४२ ॥ पहिला जालंदरबंध । दुसरा मूलबंध । तिसरा उड्डियानबंध । ऐसें त्रिबंध करावें ॥ ४३ ॥ हे त्रिबंध केलियाविना । प्राणजय न होयाचि जाणा । करितां हे आणूनि ध्याना । अवश्य आचरावे ॥४४॥ लिंगस्थानापासूनि । नाभिपर्यंत पसरूनी । कुंडलिनी आहे व्यापूनि । तिचाही प्रकार अवधारा ॥ ४५ ॥ नाभिखालीं कुंडलिनीशक्ति । नागिणी ऐशी आहे आयती । साडेतीन वेढे स्वांगाभोंवतीं घालूनि । निद्रिस्त असे ॥ ४६ ॥ ती जागृत झालियावांचूनि । प्राणजय कदापि नोहे जाणी । तीस जागृत करण्यालागुनि । बंधाविना मार्ग नसे ॥ ४७ ॥ उड्डियान बंधाचे योगें । मूलबंधे करूनि जागे । ऐसा जाणून विचार अंगें । करावी तीस जागृत ॥ ४८ ॥ ती जागृत होते वेळीं । उदरीं दुःखदायक कल्लोळी । पोटांत दुखे आंत लोळी । ऐसा प्रकार होतसे॥४९॥ या दुःखाचें योगें । न व्हावें घाबरें अंगें । ही कुंडलिनीच जागे । तेणें हातसें दुःख भारी ॥ ५० ॥ अल्प काळ गेलिया उपरी । दुःख सरे सत्वरीं । कुंडलिनी शांत होय अंतरीं । भक्षि सकल किलिमशातें ॥५१॥ शरीरांत वातापित्त कफ भारी । श्लेष्मादिक सकल सारी । भक्षूनि मग प्रवेश करी । सुषुम्नेमध्यें ॥ ५२ ॥ पाठीच्या कण्यामधूनि । कुंडलिनी जाय प्रवेशूनि । शरीरांतील प्राणास घेऊनि । पोहोंचवी जाण ब्रह्मरंध्रीं ॥५३॥ ब्रह्मरंध्रीं प्राणाचा ठेवा । झाहलिया येई समाधीचे गांवा ।

परी शरीराचा ठेवा । होत जाय कृश येणें ॥ ९४ ॥ शरीरास येई कृशता । अस्ति चर्माचा देह तत्वता । दिसे केवल कोमलता । तेजः- पुंजता अवश्य येई ॥ ९५ ॥ जैसा कोमल आणि गौरवर्ण । केळिचा कोंब असे जाण । तैसा देह होय सकुमार गहन । कोंबा ऐसा ॥ ९६ ॥ ऐशिया प्रकारें करावा । प्राणजय हातीं आणावा । व्यवहारकालींही आचरावा । उड्डियानबंध ॥ ९७ ॥ वामनासापुटीं पूरक करावा । दक्षिण नासापुटींतूनि रेचावा । पुनः उलट पूरक करावा । दक्षिण नासापुटें ॥ ९८ ॥ दक्षिण नासापुटीं पूरक करी । वाम नासापुटीं रेचक करी । ऐशी उलटपलट करी । होय भेद न चंद्रसूर्य ॥ ९९ ॥ सव्य नासापुटीचीं नांवें । दक्षिण सूर्य तीसच म्हणावें । वाम नाडीसी गणावें । ईडेमाजीं ॥ ६० ॥ सुषुम्ना ती मध्य बोलिली । मागें सविस्तर विस्तारिली । कुंभकामाजीं प्रवेशिली । तीच जाणा ॥ ६१ ॥ शरीरांतील आकाशास । कोणी बोलती सावकाश । सुषुम्ना नाम तयास । कारण परत्वें ॥ ६२ ॥ तिसराही सुषु- म्नेचा विचार । दोन्ही नासापुटीं वाहे सम स्वर । त्यासीही बोलती सविस्तर । सुषुम्ना ऐसें ॥ ६३ ॥ येथें प्राणायाम लक्षण संपलें । राजारामें अहंकारासि अर्पिलें । मिथ्या होऊनि रत केलें । स्वस्वरूपीं अस्तित्व ॥ ६४ ॥ इतिश्री नित्यानित्य विवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारीकृत । पंचमाध्याय संक्षिप्त । सद्गुरुसाह्यें संपविला ॥ ६५ ॥

॥ श्रीसितारामचंद्रार्पणमस्तु ॥

---

## अध्याय ६.

### अनुहतध्वनि निरूपण.

श्रीगणेशायनमः ॥ मागें जग फोल केलें । तेव्हां ब्रह्मरूपचि संचलें । आत्मबोधासी पाहिलें । पाहिजे आतां ॥ १ ॥ आपणांस आपला

वियोग । कदापि नसे जरी मग । किमर्थ साधावा हा योग । स्वस्वरूपा कारणें ॥ २ ॥ या गोष्टीचा विचार करा । ह्मणजे कळेल तत्वार्थ खरा । कीं न मिळालिया ज्ञानझरा । आपण न मिळे ऐसें नाहीं ॥ ३ ॥ अथवा कांहीं आपणा न मिळे । तरी आपण स्वयंभ आपणा मावळे ॥ ऐसें कधींही नाहीं झालें । आयतेंच आपण सिद्ध रूपें ॥ ४ ॥ आपण ज्ञानी झालों । अथवा पूर्ण अज्ञानी राहिलों । अथवा ज्ञानाज्ञानासी जरी मुकलों । तरीही आपणा आपणची ॥ ५ ॥ आपली जाणीव बुझाली । अथवा नेणीवही गेली । तरी आपुली अस्तिक्यता नष्ट झाली । ऐसें नोहे कदाही ॥ ६ ॥ नानादुःखें होरपळलों । अथवा सुखें आपण सुखावलों । किंवा ज्वरादिकें पिडिलें गेलों । तरी आपला वियोग नाहींच नाहीं ॥ ७ ॥ सुखें आणि दुःखें आलीं । तीं जैशीं आलीं तैशींच गेलीं । परी आपुली वस्ती नाहीं मोडिली । सदा आपण सुखरूप ॥ ८ ॥ सुखामध्यें जें सुखरूप । तेंच आपण दुःखामध्येंही सुखरूप । सुखरूप ह्मणजे आनंदरूप । आयतेंचि जें ॥ ९ ॥ प्राण्यासी वेड लागलें । अथवा ते भ्रमिष्ट झाले । किंवा शहाणपणें नांदले । तरी त्यांचे तेंचि ॥ १० ॥ तैशीच आपणा ठायीं कल्पना आली । अथवा समूळ नष्ट झाली । तरी आपुली आस्तिक्यता नाहीं मोडिली । ऐसें अनुभवा नये ॥ ११ ॥ असो आपण ह्मणजे आत्मरूप । जें परब्रह्म स्वरूप अमुप । त्यासी स्वस्वरूप आपोआप । प्राप्तचि असे ॥ १२ ॥ एवं आपणावीण कांहीं । देश भेद उरला नाहीं । मग जेथें ऐसें ज्ञान नाहीं । अज्ञानचि तें सर्व ॥ १३ ॥ अखंड जो चित्प्रकाशरूप । जेथें उदय अस्ताचें नाहीं माप । तेथें काळ गण नाहीं पाप । आयतेंच आपण ज्ञानमात्र ॥ १४ ॥ जेथें काळत्रयाची वस्ती नाहीं । तेथें ये काळीं आहे ते काळीं नाहीं । किंवा पूर्वीं नव्हता हेंही । असंबद्ध

ज्ञान ॥ १५ ॥ अहो जग जीवेश्वरेंवीण । निखिळ चित्सदानंद पूर्ण । तोंचि आपण वियोगहीन । शोध करावा कोणाचा ॥ १६ ॥ जैसें नगचि सुवर्णा आले । तैसें जगतचि आत्मरूप आपुलें । ज्ञानाज्ञानांतीं पाहिलें । पाहिजे जाणीव सोडूनि ॥ १७ ॥ असो आतां हें बोलणें । बोलून अबोलणें पाहाण । हें वर्म ज्ञानीच जाणे । दुसऱ्यास सदा टकमक ॥ १८ ॥ अनुहत नादाचा गजर । कैसा ऐकावा परिकर । तोहि सांगतों आतां प्रकार । श्रवण कारावा ॥ १९ ॥ दोन्ही कानांमध्यें दोन अंगठे । घालून रेटिजे नेटें । मग अंगुष्टाजवळील बोटें । ठेवावीं नेत्रावरी ॥ २० ॥ द्वय मध्यमा नासिकावरी । अनामिका मुखावरी । षण्मुखी मुद्रा ऐसी करी । श्रवण करावें दशनाद ॥ २१ ॥ तेचि पाही दशनाद । सांगेन आतां सावध । चित्तें करूनि विशद । अनुभवा हे ॥ २२ ॥ पहिला चिंचीणी नाद जाणावा । दुसरा किंकिणी ओळखावा । तिसरा घंटा नाद अनुभवावा । अभ्यास बळें ॥ २३ ॥ चौथा जाणिजे शंख नाद । पांचवा तंति तारांचा भेद । सहावा टाळ नाद । पोवा मोहरी सातवा ॥ २४ ॥ आठवा भेरी गर्जतसे । नववा तो मृदंग नाद परिसे । दहावा मेघ समरसें । जाणावें हें दशनाद ॥ २५ ॥ तंत वितंत घन सुस्वर । हे जाणावें चारी स्वर । यांपासोन दशनादांचा विस्तार । संत महतीं जाणिजे ॥ २६ ॥ या नादांची प्राप्ति । जाहलिया काय फळ श्रुति । हें सांगतों श्रोतयाप्रति । अवधान द्यावें ॥ २७ ॥ प्रथम चिंचिणि नाद जाणावा । सुस्वरें ओळखावा । अनुभव याचा पहावा । अभ्यास योगें ॥ २८ ॥ ह्या नादाचिये प्राप्ति । शांति पावे निश्चिती । षड्विकार सहसा न उठति । भूत कृपा प्राप्त होय ॥ २९ ॥ दुसरा शिंगी नाद ह्मणती । जैशी योगी शिंगी वाजविती । तैशी ध्वनीची येई प्रचिती । साधकीं ऐसें

जाणावें ॥ ३० ॥ हे संपूर्ण साधे ध्वनि । एकाग्री होतां मनीं । स्फूर्ति होय अंतःकरणीं । कवित्वाची ॥ ३१ ॥ तिसरा तंती नाद जाणावा । अनुभव खुणें ओळखावा । मग तेथींचा निवडावा । फळश्रुतिधर्म ॥ ३२ ॥ वीणा किन्नरी सार मंडळ । जितके तंतुपासून वाजेल । सुस्वर अति कोमळ । तो तंती नाद ॥ ३३ ॥ ये नादीं मन वेधलियावरी । संकल्प विकल्प संव्हारी । त्वचेंद्रिय अवधारी ॥ स्पर्शासहित जाय निवारिले ॥३४॥ जो समरसें तंतीं नादीं । तो संतोषें भोगी समाधि । अहोरात्र समानंदी । आनंद जाण भोगतो ॥ ३५ ॥ चौथा ताळ नाद ओळखिजे । दृढ आसनीं बैसिजे । मग फळश्रुति पाविजे ॥ ताळ नादाची ॥ ३६ ॥ अखंडित ध्वनि असे ॥ तरी अखंड आयुष्य भासे । हें जाणावें ऐसें अनुभवेसी ॥ ३७ ॥ समरसी जो ताळ नादीं । त्यासी प्राप्त वाचा सिद्धि । अखंड भोगी समाधि सुखभरित जी ॥३८॥ आतां पंचम नाद ध्वनी । तोही ऐका विवेकें करूनी । वंशी नाद ऐसें म्हणुनि । पावा मोहरीही बोलती ॥ ३९ ॥ वंशी नाद म्हणजे पावा मोहरी । ते शब्द ओळखिजे चतुरी । तेथील फलश्रुति अवधारी । सांगिजेल आतां ॥ ४० ॥ भूत भविष्य वर्तमान । सकळ कळो लागे ज्ञान । ऐसा होय येणें पूर्ण । हें साधन आचरतां ॥ ४१ ॥ मग षष्ठम वर्षानाद । तेथींचा जाणावा भेद । जेवी मेघ वर्षतां उठति शब्द । तैशी हे ध्वनि ॥ ४२ ॥ ते. संपूर्ण साध्य होये । तरी त्यासी दूर दृष्टि लाहे । दूर श्रवणही ऐकताहे । यथाज्ञानें ॥ ४३ ॥ शंखनाद तो सप्तम । ध्यानीं आणी तेथींचें वर्म । शंख नाद जैसा उत्तम । तैशी हे ध्वनि ॥ ४४ ॥ या नादीं जे समरस होती । चौदा विद्यांची तयासी प्राप्ति । ऐशी या नादाची गती । जाण निश्चिती साधका ॥ ४५ ॥ अष्टम घोष नाद निगुती । तेथींची कैशी शब्दगती । तिचाही प्रकार तुम्हांप्रति । सांगतों आतां ॥ ४६ ॥

बहुत मिळून ब्राम्हणवर । करिती वेदशास्त्रांचा उच्चार । तेथें उठती जे ध्वनि निरंतर । तैसा असे हा घोषनाद ॥ ४७ ॥ तेथील फळभोग परिसावा । अनुभव घेऊन जाणावा । साधकानें साध्य करावा । पुढील प्रमाणें ॥ ४८ ॥ या नादापासूनि फळें । प्राप्त होतीं रिद्धिसिद्धींचे सोहळे । अष्टम नादाचेनि मेळें । राहतां प्राप्त होती ॥ ४९ ॥ मग भेरी नाद नववा । तोही आतां ऐकावा । साध्य अवश्य करावा । सकळ सामर्थ्य येई येणें ॥ ५० ॥ मग दहावा मेघनाद । ऐकतां होई पूर्ण सिद्ध । सकळ सिद्धि आनंद । भोगितो योगी ॥ ५१ ॥ मग इच्छिलिया ठायां जाय । सकळ देवता वंदिती पाय । काळासी जिंकिता होय । जाणे परकाया प्रवेश ॥५२॥ जळांतरीं जळींच राहणें । अग्नीमध्येंही प्रवेशणें । ऐसें प्राप्त होतें येणें । सीत उष्ण बाधेना ॥ ५३ ॥ विष आणि अमृत-सरी । जें द्यावें तें प्राशन करी । वरकड सिद्धि सांगतां विस्तारी । जाईल ग्रंथ ॥ ५४ ॥ हें दशनाद विवरण । ऐकूनी लुब्धती साधुजन । सिद्धींची आशा घेऊन । मनामाजीं ॥ ५५ ॥ जो सिद्धीसी भुलला । तो ऐहिका परत्रा मुकला । आत्मलाभ त्यानें सोडिला । अंतीं नागवला नरदेहा ॥ ५६ ॥ हें इतुकेंही साधन । न घडे योगाभ्यासा-विण । करितां साधावा योगमार्ग जाण । सांभाळी नागवण सर्व सि-द्धींची ॥ ५७ ॥ यालागीं वैराग्य विरक्ति दारूण । धैर्य साधावें दृढ-तर जाण । इह स्वर्ग भोगादि ब्रम्हभुवन । मलप्राय जो मानी ॥ ५८ ॥ त्यासीच साध्य योगाभ्यास । आणि पावे आत्मलाभास । येर ते भुलून सर्व सिद्धीस । जाती नरका ॥ ५९ ॥ जे आत्मरूपीं रत होय । ते न धरती रिद्धिसिद्धींची सोय । सहज स्थिति साध्य होय । सिद्धी लीलें करूनि ॥ ६० ॥ काष्ट पडलें अग्नींत । अग्निरूपचि होय निश्चित । चैतन्य होय मग चित्त । पावे आत्मरूपासी ॥ ६१ ॥ अपरोक्ष ज्ञानें सर्व त्याग । होऊनि मन लय पावे चांग । त्यासीच अनुभव म्हणावा

सांग । कैवल्या हीची पैं ॥ ६२ ॥ दश नाद ध्वनि मावळे । सर्वेचि उठती रोमांचळें । तदंतरीं सुकुमार सांवळे । तेज अवत्र दिसतसें ॥ ६३ ॥ त्या तेजीं न थारे दृष्टि । सर्वेच दृष्टीस पडे मिठी । हीं जाणिजे गोमठी । समाधि लहरी ॥ ६४ ॥ जो ये समाधीं गुंतला । जो उन्मनीसी ओळंगला । योग निद्रेसी गुंतला । तोच जाण राजयोगी ॥ ६५ ॥ तेणें संसार केला ठेंगणा । कळीकाळासी घातले आंगणा । योगीश्वरांचा तोचि राणा । झाला ऐसें जाणावें ॥ ६६ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति अवस्था । या तिहींसी ओलांडूनि तत्वतां । साधावी मग तुर्यावस्था । गुरुकृपें करुनी ॥ ६७ ॥ ब्रम्हज्ञानाच्या योगें । त्रिभुवन भारितां स्वांगे । मोडतील अवश्य पगे । जन्ममरणाची ॥६८॥ जैसी जळाची धार अखंड । तैसी अर्धमात्रा ही प्रचंड । प्रणवाचि स्वयमेव अखंड । आहे ऐसें जाणावें ॥६९॥ हें योग ज्ञान प्राणियासी । दुर्लभ आहे पारि येसी । सर्वदा लंपट विषय मानासीं । करितां साध्य न होय ॥ ७० ॥ जेणें जिव्हा शिश्न आवरिलें । त्यानें दशमद्वारीं गमन केलें । दश दिशांशीं व्यापिलें । दशेंद्रियेंही जिंकिलीं ॥ ७१ ॥ तथापि चित्त असमाधान । विषयासक्त मूळ जन । तयासी सर्वथा नव्हें ज्ञान । कल्पांत काळीं ॥ ७२ ॥ तया ज्ञानाची प्राप्ति । करावया साधन निगुती । आहे जाण संतसंगती । एरव्हीं साध्य न होय ॥ ७३ ॥ जोंवरी माया मानसीं । तोंवरी प्राप्त न होय वस्तूसी । न उलंघी जन्मांतरासी । वैराग्यानें सर्व साधे ॥ ७४ ॥ वैराग्य म्हणजे विराग । विराग म्हणजे प्रीतिरहित चांग । होऊनी सर्व वासनांचा त्याग । होणें निर्विषय पैं ॥ ७५ ॥ सर्व संपदा वैभव असोन । त्यागी त्या श्वानविष्टेसमान । भोग भोगितां उदासीन । परोपकारीं सर्व करी ॥ ७६ ॥ जो सदा सर्वदा निरहंकारी । चित्त ज्याचें परोपकारी । आशेपासून जाण निर्धारी । दूर राहतो ॥ ७७ ॥ सर्वत्र घेयी भगवत्दर्शन । सहज

पुजा स्थिति स्तवन । न रिघे सुखदुःखीं ज्याचें मन । तोच जाणावा वैरागी ॥ ७८ ॥ सहज रूप कळावया कारणें । नाना हटयोग साधन करणें । ऐसें जाणूनि योगाभ्यासाकारणें। अवश्य झटे॥ ७९ ॥ करितां सोडावें यथेछाचरण । व्हावें वैराग्यशील पूर्ण । तरीच जाय जन्ममरण। उदासपणें ॥ ८० ॥ हें मन स्थिर व्हावया । अभ्यास सांगेन साधाया । मनोजय झालिया । वस्तुप्राप्त सहजची ॥ ८१ ॥ हें चंचळ मन नादें स्थिर । मग बिंदुमध्यें स्वरूपीं उर । सत्रावीयेकळे माजीं सुंदर । जोति पाहे उन्मनीं ॥ ८२ ॥ जैसा नागस्वर वाजतां सर्प तल्लिन । घंटानादें स्थिर होय हरण । पतंगलुब्धे दिपका देखोन । तैसें नादीं मन सुखावें ॥ ८३ ॥ पतंग मीन गज भ्रमर । आपुलाले विषयीं तत्पर । तैशीं पंचेंद्रियेंही सत्वर मनोमायें वर्तताती ॥८४॥ आत्मस्वरूपीं लागतां मन । आत्मसत्तेनेंचि होय लीन । कल्पना जाय मावळून । इंद्रियें होतीं चलनरहित ॥ ८५ ॥ थिजल्या घृताचा पुतळा झाला । तो ऊष्ण घृतांत ठेविला । अवयवाकार विराला । ऊष्ण घृतांतचि ॥ ८६ ॥ अथवा लवण जळासी भेटी होतां । लवणाचि जाय विरून तत्वतां ।तेवीं मन आत्मत्वीं रत होता। मनही जातें विरूनी ॥ ८७ ॥ नातरी साखर आणि गूळ । मिश्रित झालीं तात्काळ । साखरपणाचा आळ । नाहींसा होय ॥ ८८ ॥ अल्प साखर गुळांत पडे । तैं गूळचि होऊनी साखरत्व मोडे।तैसें साधका ध्यातां निर्गुण जोडे । कर्माकर्म तुटे सहजचि ॥ ८९ ॥ तैसेंच मन आत्मस्वरूपाकार झालें । मग मनपणासि जाण विसरलें। संकल्प विकल्प कर्म राहिलें। केवळ झालें वस्तुमय॥९०॥ भोपळीचियें वेलीं । प्रथम जाण पुष्पें आलीं । नंतर सूक्ष्म फळें झालीं । फुलें गेलीं सुकोनि ॥ ९१ ॥ ज्ञान झालिया कर्म नाहीं । तैशाचि नाना सिद्धि पाही । सोडूनि व्हावें विदेही । स्वस्वरूपीं ॥ ९२ ॥ आतां

सांगतां मुद्रांचा विचार । चार मुख्य असती साचार । अगोचरी, खेचरी, भूचरी आचर । चौथी जाणा गगनचरी ॥ ९३ ॥ मुद्रा आतां अगोचरी । ध्यान करावें अभ्यंतरी । जिव्हेंद्रिया मौन्य धरी । नेत्र झांकी दोन्हीही ॥ ९४ दृष्टि कांहीं न पहावें । मन दृढ राखावें । आपण अगोचर व्हावें । करावें स्थान हृदयामाजीं ॥ ९५ ॥ मनीं कांहीं न आणावें । मनीं काय संकल्प उठतो पहावें । ऐसें सदा स्थिर असावें । मग अवश्य मोक्ष साधतो ॥ ९६ ॥ दुसरी खेचरी मुद्रा अवधारी । नित्य नेमें तास तास अभ्यास करी । जिव्हा काढोनि बाहेरी । ओढावी जाण द्वय हस्तें ॥ ९७ ॥ जैसे गौळी द्वय करीं । गोस्तन दुग्ध काढावया धरी । ओढी सोडी लक्ष धारीं । तैसी ओढी स्वजिव्हा ॥ ९८ ॥ ऐसा अभ्यास करते वेळीं । असणारा बंध जिव्हे खालीं । ती शिर पाहिजे छेदिली । घेऊनि तीक्ष्ण शस्त्र पैं ॥९९॥ रोम मात्र गा छेदन । प्रत्येक सप्त दिवशीं जाण । करूनि वरी लावावें मिश्रण पुढील प्रमाणें ॥ १०० ॥ घ्यावें हिरडेदळ आणि सैंधव ॥ चूर्ण वस्त्रगालित करूनि लाव ॥ जिव्हे खालीं मर्दन करीव ॥ नित्य नेमें ॥ १ ॥ ऐशिया क्रमें जिव्हा लांब करा । ती उलटूनि पडजिव्हे जवळील छिद्रा । आणावी चढवावी कपाळकुहरा । प्राशन होतें अमृताचें ॥ २ ॥ विषारी सर्पानें दंश केला । तरी तो बाधेना त्याला । मृत्यु व्याधि त्यानें जिंकिला । क्षुधा तृषा मग कैची ॥ ३ ॥ आतां भूचरीमुद्रा अवधारी नासीकाग्रीं दृष्टि स्थिर करी । अभ्यास करितां मग सत्वरी । स्वमुख होय सन्मुख ॥ ४ ॥ आपुलेंच मुख आपणांस दिसतें । दुसऱ्याचें मनांतील जाणतां येतें । ऐसें अलोलिक गुण बहुतते । असती जाणा ॥ ५ ॥ आतां ऐका गगनचरी भ्रूमध्यें दृष्टि स्थापन करी । हळूच दृष्टि आकाशीं धरी । कल्पी तेथें श्रीराममूर्ति ॥ ६ ॥ इचाहि गुण अलोलिक । रिद्धिसिद्धी जाण सकळिक । श्रीराम कारु-

ण्यसिंधु देख । वश होय येणें ॥ ७ ॥ ऐसें चारी मुद्रासि सांगितलें । कुंडलिनी शक्तिसी अन्य मुद्रेंजागविलें । त्याही मुद्रात्रयासी पाहिजे कथिलें । ह्मणूनि येथें सांगतों ॥ ८ ॥ पहिली ती महामुद्रा । तिचेंही लक्षण अवधारा । वामपद टांचे दाबून धरा । आपुली शिवण ॥ ९ ॥ मग दक्षिण पाद सन्मुख पसरोन । लांब करी टांच ठेवी भूमी लागून । अंगुलिका सर्व पसरोन । हस्तें पदांगुष्ट धरावा ॥ १० ॥ मागें निवेदिल्याप्रमाणें । कंठी जालंधर बंध देणें । मग पूरक करूनि वायुरेचणें । हळूवारपणें ॥ ११ ॥ जैसा दंड प्रहारें सर्प सरळ । तैसी कुंडालिनि शक्ति समुळ । घाबरून जागृत होई सकळ । सुषुम्ना मार्गें जावया ॥ १२ ॥ ऐकी महाबंध मुद्रालक्षण । वामचरणाचे टांचे दाबी शिवण । वाम मांडीवरी ठेवा दक्षिण चरण । करावा पूरक कुंभक ॥ १३ ॥ यथाशक्ति करा कुंभक । शनैः शनैः रेचावा देख । मग दाक्षिणांगें ही सम्यका । करी तैसेंचि ॥ १४ ॥ आतां महावेध मुद्रा तिसरी । प्रथम नासापुटीं पूरक करी । मग जालंदरबंध निर्धारी । देऊनि करा कुंभक ॥ १५ ॥ दोन्ही करतळहस्त । भूमिये टकींगा त्वरित । दोन्ही चरण शिवणस्थित । जडूनि ठेवी ॥ १६ ॥ मग तळहातावरी भार देऊन । किंचित उचलावें आसन । पुनः भूमीसी टेकून । उचली पुन्हां ॥ १७ ॥ शरीर संचगा अघवा । आसन उचलितां तोलावा । ऐसें परि करावा अभ्यासगा ॥ १८ ॥ ही क्रिया पुनः पुनः करितां । वायु सुषुम्ना मार्गें निघे तत्वता । सोमसुर्याग्नि देवता । जया नाडीं ठायीं ॥ १९ ॥ हाचि मोक्ष मार्ग प्रमाण । मृतप्राय अवस्था होय जाण । प्राणातें यावेळीं उत्क्रमण । होऊं पाहे ॥ २० ॥ ऐसें परी होतां अवस्था । धैर्य धरावेंगा चित्ता । मग शनैः शनैः तत्वतां । सोडावा वायु ॥ २१ ॥ यासी महावेध म्हणती जाण । हा महासिद्धीचें मूळ कारण । वार्ध

क्यता मुळींच नये जाण । अष्टसिद्धि सहज प्राप्त ॥ २२ ॥ महामुद्रा महाबंध । तैसाचि जाणा महावेध । या तिघांचा ऐक्यबोध । असे जाणा ॥ २३ ॥ नित्य नित्य आठ प्रहरीं । अभ्यास करावा आदरीं । या त्रय मुद्रांना क्षणभरी । न विसंबावे ॥ २४ ॥ या त्रय मुद्रा आचरत असतां । उड्डियानबंध आचरितां । कुंडलिनीसी येई जागृतता । समाधीसी योग्य होय ॥ २५ ॥ ऐशियापरी आचरूनि । मागें निवेदिल्याप्रमाणें अभ्यासूनि । प्राणायाम त्रिविध जाणूनि । पद्मासनीं बैसावें ॥ २६ ॥ ऐसा नित्यनेमें अभ्यास करितां । आपोआप वायु चढे तत्वतां । ब्रम्हरंध्रीं जाऊन मागुता । होतो स्थीर ॥ २७ ॥ ऐसें जाहल्या पाठीं । निर्विकल्प होई संपूर्ण दिठी । मनासी येई उन्मीलनता गोमटी । राहे योगी आत्मस्वरूपें ॥ २८ ॥ समाधि घेणाराचा संकल्प । असेल जितका वेळ घेण्याचा अल्प । तितक्याच वेळ राहे निर्विकल्प । पुढें आपोआप उतरे ॥ २९ ॥ समाधीचें अमूप सुख । न वर्णवे कोणासी देख । सर्व सिद्धि अनुकूळ चोख । मागूति होताती ॥ ३० ॥ प्रथम ज्या वेळीं समाधि घेणें । तया वेळीं गुरु सान्निध असणें । संवय होतां घेणें । लागेल तेव्हां ॥ ३१ ॥ ऐसी संधि मिळेपर्यंत । असावें निमग्न अभ्यासांत ॥ कुंभक दहा मिनिटेंपर्यंत । टिकेलसा करावा ॥ ३२ ॥ अति उत्तम मार्ग । कुंभक घटिकापर्यंत चांग । टिकावा ऐसा योग । सांगतों ऐका ॥ ३३ ॥ पद्मासन घालून बैसावें । दोन्ही नासापुटींद्वारें वायूसी ध्यावें । चट्चट् पूरक रेचक करावें । बहुत वेळपर्यंत ॥ ३४ ॥ जैसा लोहाराचा भाता । चाले भट्टिजवळ फुंकिता । तैसें वायूसी घेऊनि सोडितां । थकवा येइ सहजची ॥ ३५ ॥ आतां वायु घेववत नाहीं । ऐसी जेव्हां होईल सोयी । तेव्हां एकदम झट् कुंभक करी पाहीं । रहावें ताटस्थ स्वस्थ चित्तें ॥ ३६ ॥ यासी भस्त्रा कुंभक बोलती । होई वायुची स्थीर गति ।

बहुतकाळपर्यंत निगुति । कुंभक टिके ॥ ३७ ॥ अभ्यास आचरते वेळीं । हाही कुंभक नेमें करी । गुण अलौकिक निर्धारी । मन होई उन्मन ॥ ३८ ॥ असो आतां हें कथन । मागें सांगितलें असें जाण । कीं नियम करावे पाळण । मग होईल योगसिद्धि ॥ ३९ ॥ ब्रह्मचर्य मिताहार । मित भाषण अभ्यासी तत्पर । ऐसा वर्ष एक अभ्यास कर । नित्य नेमें त्रिकाळ ॥ ४० ॥ ऐसीयापरी एकचि धंदा । वर्ष मात्रचि जो करी सदा । त्यावरी मग काळाची गदा । मुळींच नचले ॥ ४१ ॥ प्राणायाम सिद्धि त्यास । अनुभवा येत साधकास । करितो ठेंगणा कळिकाळास । होई पावन याच देहीं ॥ ४२ ॥ प्राणायामाभ्यास तीन वेळ करणें । पहाटे दोन प्रहरीं सायंकाळ साधणें । फावल्या वेळीं आसनें करणें । मुखीं जपावा सोहंमंत्र ॥ ४३ ॥ ॐ हंसः सोहंस्वाहा महामंत्र असे परम हा । मनोमय जपावा पहा । लक्ष ठेवावें अनुहत ध्वनीं ॥ ४४ ॥ मागें निवेदिल्याप्रमाणें । दो कानांमध्यें दो अंगुष्ट घालणें । जोरानें दाबून धरणें । ध्वनि प्रकटतील तात्काळ ॥ ४५ ॥ कर्णीं बोटें न्हेटूनी । तासपर्यंत तशीच राखूनि । नित्य नेमें ऐसें करूनी । अभ्यास करावा ॥ ४६ ॥ अभ्यास करीत असतां । दशनाद क्रमवार उठती तत्वतां । अनुभव घेऊन पहा आतां । अनुपम हें ॥ ४७ ॥ या नादांचा नाद धरी । वरील मंत्र जपे अंतरीं । नंतर प्राणायामाभ्यास करी । घेई करूनि प्राप्त सिद्धि ॥ ४८ ॥ येथें अनुहतध्वनि निरूपण संपलें । येर मुद्रादि प्रकार कथिले । गुह्य सार जें राहिलें । तें कथूं पुढील अध्यायीं ॥ ४९ ॥ इति श्री नित्यानित्यविवेक ग्रंथ । राजाराम ब्रह्मचारी कृत । षष्टमाध्याय संक्षिप्त । सद्गुरुसाह्यें संपविला॥५०॥

श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

---

## अध्याय ७ वा.

### मुद्रादि गुप्तमार्ग कथन.

॥श्रीगणेशायनमः ॥ ॐ नमो सद्गुरु निजानंद सागरा । आत्म सिंहासनीं बैससी तूंचि खरा । त्या तुज देखावया करिती मुद्रा । योगी लक्षिती अलक्षीं ॥ १ ॥ तूंचि ममसद्गुरु श्रीरामचंद्र । तूंचि दशेंद्रिया- माजीं नरेंद्र । प्रकाशूनि दशेंद्रियें समग्र । रहासी सदा निजस्थानीं ॥२॥ तुझी जी प्रकाश ज्योति । मम माता तीच सीता सती । विराट्रूप तीच प्रकृति । आदिमायाही तीच पैं ॥ ३ ॥ शरीरीं असे जो प्राण । त्याचाची अंतशेष हनुमान । नाना सद्वृत्तिच वानर गहन । लक्ष तोची लक्ष्मण ॥ ४ ॥ इडा पिंगळा एक वटल्या । आत्मछंदीं नित्य लागल्या । शत्रुघ्न भरत याच बोलिल्या । अहंकार हाचि रावण ॥५॥ ॐकार धनुष्य हातीं धरिसी । अहंभाव रावण मारिसी । त्रिकुटाचळीं जीवा नेसी । राज्य देसी लंकेचें ॥ ६ ॥ त्रिकुटगिरीचें राज्य भोगुनि । जीव जातो सच्चिदस्थानीं । परम गूढ उभारिणी । आत्मयाची ॥ ७ ॥ आतां आत्मानुभवाची खुण । न मिळे सद्गुरु वांचून । करितां साधकें सेवन । करावें सद्गुरु चरणाचें ॥ ८ ॥ गुरु केवळ माया माऊली । शि- ष्यासी देई ज्ञानकळी । जनन मरणांतूनि तात्काळी । तोचि करी मुक्त एक ॥ ९ ॥ गुरुपासून ज्ञान घेई । आणि गुरूची हेळणा करी । तयासी निजधन निर्धारीं । कधींही न लाभे ॥ १० ॥ जो करी सद्गुरु सेवा । तन मन अर्पी धरुनि भावा । त्यासीच आत्मसुखाचा ठेवा । प्राप्त होय ॥ ११ ॥ करितां साधी सद्गुरु चरण । मन आवरावयाचा प्रकार गहन । सांगेल तोचि अवतार पूर्ण । यथास्थित ॥ १२ ॥ तो प्र- कार ऐसा । एकाग्र चित्तें परिसा । आचरण करी अहोदिवसां । सांगूं नये अभाविकासी ॥ १३ ॥ मध्यरात्रीं सिद्धासन घालूनि । शरीरानें शांत होऊनि । एकाग्र मानस करूनी । बैसावेगा ॥ १४ ॥

सन्मुख ठेवावा दीपक । लक्ष लाव त्यावरी देख । दीप ज्योति अवलोक । निश्चळ दृष्टीं ॥ १५ ॥ दोन घटिका दृष्टीसी अर्पी । ज्योतीमध्यें प्रकटेल मूर्ति । तेव्हां फाटेल ज्योति रात्रीं । दर्शन होईल श्रीरामाचें ॥ १६ ॥ ऐसा अभ्यास षण्मासपर्यंत । जाहलिया ईश्वर दर्शन प्राप्त । करितां साधकें असावें ध्यात । नित्य नेमें ॥ १७ ॥ आतां ऐकी गुह्य मुद्रा । जेणें पावती आत्मसमुद्रा । प्राप्त तुर्या जाऊनि निद्रा । तात्काल होई मन उन्मन ॥ १८ ॥ उलट्या दृष्टीचें पाहणें । नयनीं नयन दृष्टि लावणें । नेत्रांतील बिंदु पाहणें । दृष्टि स्थिर करूनि ॥ १९ ॥ प्रथम सोडावी सरळ दृष्टि । आकाशामधूनि नेहटी । हळू हळू आणी दिठी । नासाग्र भागीं ॥ २० ॥ नंतर आणिजे नेत्रीं । पुनः किंचित् त्रिकुट धरित्रीं । स्थिर करूनि बुब्बुळ नेत्रीं । जलद जाण फिरवावे ॥ २१ ॥ ऐसा उभय नेत्रीं अभ्यास । करावा एकाग्र चित्तें सावकाश । मग दिसेल स्वयंप्रकाश । आत्मयाचा ॥ २२ ॥ कांहीं दिवस अभ्यास केल्यावरी । मध्यें मसुर प्रमाण निल बिंदु सत्वरी । दिसलिया पुण्यवान तो भारी । देखणा तोचि आत्मरूपें ॥ २३ ॥ बिंदु दर्शन झालिया उपरीं । चित्त स्थिर करी तया अंतरीं । अंतर्लक्ष हेंचि निर्धारीं । येर तें बहिर्लक्ष ॥ २४ ॥ ऐसिया परि लक्षिजे । अलक्षीं लक्ष स्थापिजे । निजात्म दृष्टि जाणिजे । येणेंचि रीति ॥ २५ ॥ मन जरी असेल स्थिर । तरीच हा साधेल विचार । मन कल्पना अनिवार । आवरितां ही नावरती ॥ २६ ॥ संकल्पविकल्प उद्भवणें । नेत्र पातीं चंचल होणें । अंधकार पुढें दिसणें । ऐसे विक्षेप होताती ॥ २७ ॥ करितां यांचे निवारणार्थ । आठवितां सद्गुरुचरण यथार्थ । अभ्यास करितां मनोरथ । षण्मासांत पुरतील ॥ २८ ॥ दोन्ही नेत्रांची दृष्टि एक । पाहतां तुर्या प्रकाशक । दग्ध मन होऊनि कौतुक । दिसेल सद्गुरु कृपेनें ॥ २९ ॥ ऐसिया प्रकारें जो वर्तत ।

तयासी सहज ज्ञान प्राप्त । आपली भेट आपणास होत । उत्तम प्रकारें ॥ ३० ॥ परि जिंकिले पाहिजे मनास । ठेऊनि अंतरीं विवेकास । कीं पूर्वकर्मानुसार आस । विषयांचीं पुरल ॥ ३१ ॥ विषयीं होई विरक्त । सद्गुरूंचा पादभक्त । आत्मलाभीं आसक्त । होई मानवा ॥ ३२ ॥ शरीराची काळजी सोडी । त्याचा मालक अंतरात्मा सांगडी । योगाभ्यासी मन धरपुडी । विवेकानें असावें ॥ ३३ ॥ शरीर हे रथ जाणा । काळासीच चक्र गणा । पूर्वकर्म सारथी ह्मणा । मन हेंचि अश्व झालें ॥ ३४ ॥ अश्वनेई दिशा दाहीं । रथ तत्र जावया असमर्थ पाहीं । तैसें मनची विषयारण्यीं जाई । ऐसें ओढाळ हें परम ॥ ३५ ॥ करितां न जावें मनाच्या पाठीं । शांति विवेक असावे गाठी । योगाभ्यासी हौस मोठी । ऐसें मन असावें ॥ ३६ ॥ मनासि पाजी बोधामृत पाणी । कीं सर्व ब्रह्मच एक चक्रपाणीं । तयाविरहित नसे कोणी । असें सर्व मृगजल हें ॥ ३७ ॥ ऐसें एकविध ज्ञान जाणूनि । स्वात्मस्वरूपची सर्व लक्षूनी । निंदास्तुतीसी अव्हेरूनि । अखंड करावें ईशस्मरण ॥ ३८ ॥ विषयांचा काम सोडावा । ईश्वरची एक आठवावा । निर्धार ऐसा ठेवावा । नसावी आशा देहाची ॥ ३९ ॥ मोह लोभ भ्रांती नसावी । उदास वृत्ति असावी । वैर मत्सर न ठेवी । दया मानसीं अखंड ॥ ४० ॥ दंभ अहंकार नसावा । निरहंकृति देह वागवावा । परदोष कधीं न वदावा । पाखांड्यांसी न करी वाद ॥ ४१ ॥ ऐसा जो का वर्तत । त्यासी सहज परमार्थ । साध्य होऊन अर्थ । आत्मयाचा लाभतो ॥ ४२ ॥ असो आतां अन्यमार्ग जाण । जो परम श्रेष्ट असे गहन । ज्याचा उकल न कळे बहुता लागून । तोचि आतां निवेदितों ॥ ४३ ॥ सर्वांस कारण ओंकार । ज्यापासाव सकल विस्तार । जो योगीयांचें माहेर घर । त्याचा उकल दावितों ॥ ४४ ॥

प्रथमं नादलुब्धश्च बिंदुश्चैव तदुच्यते ।
तृतीयं च कला प्रोक्तं ज्योतिरूपंच पश्यति ॥

ॐकाराचें ज्योतिरूप । तीन प्रकारें अमुप । प्रथम नादलुब्ध माप । द्वितीय जाण बिंदुरूपें ॥ ४५ ॥ तृतीय कळा उल्हासे। तिन्ही मिळून प्रकाश परिसे । सविस्तर प्रकार सांगतसे । पुढें आतां ॥ ४६ ॥ नादरूप तो अकार । बिंदुरूप तो उकार । कळारूप तो मकार । संपूर्ण मिळूनि ज्योतिरूप ॥ ४७ ॥ मागें अनुहताची बोली । सकळ जाण विस्तारिली । दशप्रकारें विभागिली । तैसा नाद जाणावा ॥ ४८ ॥ या अध्यायीं कथिलें । बिंदु ध्यानासी दाविलें । नाद ऐकितां सहज देखिले । तोचि जाण कळारूप ॥ ४९ ॥ नागस्वरें भुलें भुजंग । घंटा नादें जैसा कुरंग । दीपयोगें जैसा पतंग । मन अनुहतीं तैसें रत॥५०॥ इंद्रियामाजीं मन असे । श्रेष्ठ सर्वांहूनि अनिवार परिसें । तें जाय तेथें अनायासें । सर्वेंद्रियें जातातीं ॥ ५१ ॥ तेंच नादीं गुंतता । इंद्रिय चेष्ट मागुता । कैशा उरतील जाण ताता । सहज तल्लीन आत्मस्वरूपीं ॥ ५२ ॥ करितां अनुहाताचा नाद धरी । सोहंमंत्र सतत उच्चारी । दृष्टि दृष्टिमाजीं धरी । नयनीं नयन लावूनी॥ ५३ ॥ यानंतर मनासी येती । चार भूमिका पाहती । पहिली विक्षेपता आयती । मनासी वाटे बहुत भय ॥५४॥ हें भय सर्व टाकावें । तैसेंच स्थिर असावें । ह्मणजे आपोआप सुख स्वभावें। भोगावें वाटे ॥ ५५ ॥ भय सांडूनि स्वसुख भोगणें। गतायाता यासीच ह्मणणें । आत्मसुखी इच्छा राहणें। संश्लिष्टता ती जाण ॥५६॥ आत्मप्राप्ति जाहलिया उपरी। अक्षय लीन होऊनि अंतरीं। स्वसुख आनायासें प्राप्त करी । सुलिनता हीसच बोलिजे ॥ ५७ ॥ सुलिनता आलिया जाण । वृत्ति होय लीन । तुर्या भोग भोगून । मन जाय उन्मनीं ॥ ५८ ॥ सुलिनता आलिया हातां । मन कधींही नसे मागूता । त्यासी नित्य आत्मैक्यता । सहज लाभे ॥ ५९॥ असो ऐसा अभ्यास करावा । भ्रुमध्यें लक्षासि लावा । द्विदळ सुंदर पद्मीं ठेवा । दृष्टि आपुली ॥ ६० ॥ भ्रुमध्यासमोर । असे वायुमंडळ परिकर ।

तयामध्यें आत्मज्योती निर्धार। बिंदुरूप प्रकाशशक्ति ॥ ६१ ॥ त्या शक्तीचा प्रकाश । असे पीतवर्ण विकाश। रक्तश्वेत आणि कृष्णाकाश। आहे ऐसें भासतें ॥ ६२ ॥ तयाचे अंतरीं आहे । स्थान तयाचें अमर्याद पाहे । ब्रह्मज्योति केवळ हें । सहज जाण शिवरूप ॥ ६३ ॥ यासीच हृदय बोलिजे। हें जाणण्या गुरुकृपा पाहिजे। मग ज्योति लक्षिजे। सबाह्य अभ्यंतरीं ॥ ६४ ॥ दुसरा एक मार्ग असे। आरसा समोर ठेवूनि बैसे । आपुलें प्रतिबिंब अनायासें । दृश्य होतें सहजची ॥ ६५ ॥ मग प्रतिबिंबांत जाण । आपलाच चक्षु आपणालागून। आयताच दिसतो प्रकाशमान । त्यांत पाहवे बाहुलीसी ॥ ६६ ॥ त्या मसूर प्रमाण बाहुली माझारीं । दोन घटींसारखीं दृष्टि धरी । अचलमुद्रा धारणकरी। अंतरीं दिसेल प्रकाश ॥ ६७ ॥ त्या प्रकाशाभितरीं । सुंदर सकुमार मूर्ति साजिरी । अतिसूक्ष्म अवधारी । पलिकडे चिदाकाश सर्वत्र॥६८॥ ऐसा अभ्यास नेमें आचरावा । षण्मास तरी अवश्य करावा । नंतर सहजानंद परिसावा । ज्ञान मार्गें ॥ ६९ ॥ ज्ञान मार्ग अतिगहन । सर्वोत्कृष्ट अवघड पूर्ण।सच्चिदानंद ज्ञानघन। आयताच सर्वाकाशरूप॥७०॥ त्याबिंदूचें आंत बाहेर । दिसतसे जें अपरंपार । तेंची आहे निरंतर । निःशून्यपें ॥७१॥ तें अनंत अपार आकाश । मीच आहें स्वयंप्रकाश । ऐसा भाव सावकाश । अक्षय ठेवावा ॥ ७२ ॥ आकाश स्थानीं दृष्टि फिरवी । मीच ते आकाश ही कल्पना उरवी । जें निर्विकल्परूप निरवयवीं । तेंच जाणावें परब्रह्म ॥ ७३ ॥ या ध्यानास बोलती । श्रेष्ट विहंगम मार्ग ध्याती । परिमेयता ब्रह्मास न देती । ध्यातीं अक्षय स्वरूपत्वें ॥ ७४ ॥ कोणी कोणी ध्याति । छाया पुरुष पाहती । वर्षांतीं तयाची प्रचिती । येती जाण निर्धारें ॥ ७५ ॥ प्रातःकाळीं उठूनि सत्वरी । बहिर्दिशादि विधी सारी। निर्जन अरण्यांत त्वरा करी। ठेवि पृष्टभागीं रविबिंब ॥ ७६ ॥ नंतर पुढें पडे शरीराची छाया ।

त्या छायेच्या कंठठाया। दृष्टि सारखी लावूनिया। जपावे मंत्रास अंतरीं ॥ ७७ ॥ ॐ र्‍हीं परब्रम्हणेनमः ॥ मंत्र जपावा नेमा ॥ एकशें आठवेळ परम। नंतर उर्ध्व करा दृष्टीतें ॥ ७८ ॥ मस्तकावरीं आकाशांत। दृष्टि ठेवावी अचल तेथ। एक घटि अवकाश पर्यंत। नित्यनेमें ॥ ७९ ॥ येणें दिसेल छाया पुरुष। शुभ्र स्फटिकवत् देह दृश्य। परम उत्कृष्ट पुरुष। साक्षात् शंकर जो ॥ ८० ॥ याचें दर्शनांतीं। भूत भविष्य कळो लागे चित्तीं। ज्ञान होऊनि मुक्ती। सहज होय ॥ ८१ ॥ नानाप्रकारचीं नानामतें। लिहितां वाढेल ग्रंथ येथें। ह्मणूनि सोडूनि हीं देत। पावन होई ज्ञान मार्गे ॥ ८२ ॥ सर्वत्र आयतेंच ब्रह्म। त्याची प्राप्ति आयतीच परम। कासया प्रयत्न गरम। करावया लागे ॥८३॥ अहंपणाची अंत। झालिया आयताच संत। ऐसें जाणून महंत। निवांत होऊनि राहती ॥ ८४ ॥ येथें नित्यानित्य विवेक संपला। श्रीसद्गुरुकृपें पूर्ण झाला। सद्गुरु विष्णुबावा बोलिला। ब्रम्हचारी ही बोलती ॥ ८५ ॥ सद्गुरूनें कृपा केली। वेदान्त किल्ली हातीं दिधिली। वेदोक्त प्रकाश ग्रंथीं पाहिली। समग्र जाणा ॥ ८६ ॥ अद्वैत ज्ञान सहज झालें। जेणें समूळ अस्तित्व नेलें। अद्वैत भावावीण राहिलें। सहजाद्वैत ॥ ८७ ॥ ऐसा आमुचा सद्गुरु। सहजाद्वैत ज्ञानसागरु। जाणीव नेणीव सोडूनि गुरु। त्याच मध्यें ॥ ८८ ॥ आम्ही म्हणणेचि नेणीव। ही निरसताचि जाणीव। जाणीव निरसलियाचि स्वयमेव। निजवस्तु ॥८९॥ जाणिव निरसण्याचें बोलणें। मी स्वयमेव आयता जाणणें। हें टाकूनि अनुभव घेणें। अनुभवेंवीण ॥ ९० ॥ जेथें अनुभव येई। तें स्थळ स्वप्निकचि पाही। नाहींपणें निमालें सर्वही। आहे नाहीं जाऊनि ॥ ९१ ॥ पुढें नित्यरामाचें सांगातीं। बलदेव मैत्रीची प्राप्ति। ज्या योगें ग्रंथाची समाप्ति। सहज झाली ॥ ९२ ॥ पिता आयताच ज्ञानी। केशवराव बाळाजी जाणी। चंद्रभागामाता-सद्गुणी। विठ्ठलभक्त ॥ ९३ ॥ श्रीरामें कृपा

केली । योगी माता भेटविली । भक्ति प्रेमें सदा भरली । श्रीगंगाबाई पंडित ॥ ९४ ॥ ऐसीं आमुचीं बहुत दैवतें । कृपें हेलावलीं समस्तें । ग्रंथ संपवुनि निजधामातें । जातीं झालीं ॥९५॥ विलंबनाम संवत्सरासी । कार्तिकशुद्ध एकादशीसी । ग्रंथ पावला समाप्तीसी । सद्गुरुकृपें ॥९६॥ वदविता श्रीराम । व्यर्थ फुंदका काय काम । नाचवी बाहुली आत्माराम । जो सर्वांघटीं पूर्ण एक ॥ ९७ ॥ इतिश्री नित्यानित्यविवेक ग्रंथ । राजाराम ब्रम्हचारीकृत । सप्तमाध्याय संक्षिप्त । सद्गुरुसाह्यें संपविला ॥ ९८ ॥ श्री रामचंद्रार्पणमस्तु ॥

---

### राजारामबावा ब्रह्मचारीकृत.

## बोधपर श्लोक.

नसें प्राण वर्गे नसें पंच कोशें ।
न ते मी सदा व्याप्त त्यांसीच आसें ॥ १ ॥
वसे ज्या प्रकारें नभीं नीलिमारे ।
तसें हें असे सर्व कोशादि सारे ॥ २ ॥
असें व्योम हें नीळिमा व्यापुनीरे ।
तसा मी असें सर्व कोशांतरीं रे ॥ ३ ॥
जसें नांव हें नीळिमा व्यर्थ आहे ।
तसें नांव हें व्यर्थची सर्व पाहे ॥ ४ ॥
घटाकाश हें सर्व आकाशिं जेवीं ।
मला हा असे पिंडची भास तेवीं ॥ ५ ॥
जसा कुंभ हा देह आकाशिं आहे ।
तसा हा मला पिंडचि व्यर्थ पाहे ॥ ६ ॥
नसे हा नभा बंधची साच मानीं ।
तसा मी नसें नित्य देहाभिमानी ॥ ७ ॥
जसें स्वघटीं लिप्त नोहे कधीं ही ।
तसा मीही राही सदा भिन्न देहीं ॥ ८ ॥

वदे हा सदा राजरामाभिमानी ।
कदा लिप्त नोहे सदा स्थूळ गामीं ॥ ९ ॥
रकारीं असे विश्व ही वीण वारे ।
जकारीं असे जन्ममरणादि सारे ॥ १० ॥
रकारीं असे सर्वही वासु ज्याचा ।
रमाकांत तो रामही सर्व साचा ॥ ११ ॥
मकरीं असें रम्यतें राम नाम ।
नमंतीं असे मंगलीं नीजधाम ॥ १२ ॥
निजानंद तो सर्व व्यापूनि राहे ।
कुसूमीं जसा वास वासासि आहे ॥ १३ ॥
जसा गंध तो वायु वेगें दुरी हा ।
निजानंद तैसा मनासी अरी हा ॥ १४ ॥
हरीवीण नाहीं दुजे सर्व कोतें ।
नमस्कारितों मी तया आत्मयातें ॥ १५ ॥
सदानंद हा पूर्ण आनंद साचा ।
तया भाव हा भास विवर्तकाचा ॥ १६ ॥
उठारे उठा सर्व आपैस चाले ।
तरारे तरा सर्व निष्काम व्हारे ॥ १७ ॥
नमितों तुम्हां सद्गुरु नाम देतों ।
कसा विष्णु चित्तासि आनंद देतो ॥ १८ ॥
तया ब्रम्हचारी नमीतों मि आजी ।
चतुर्ब्रम्ह तो स्थूल सूक्ष्मादि या जी ॥ १९ ॥
असे हा दिसे सर्व आचार ज्याचा ।
तया वंदितों मी गुणातीत साचा ॥ २० ॥
असें हें नसें सर्व कांहींच नोहे ।
जशाचें तसें सर्वही एक पाहे ॥ २१ ॥

समाप्त.